# महाराष्ट्रातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास : विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिक विद्या शाखांतर्गत 'समाजशास्त्र' विषयातील

विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध


संशोधक

**रविंद्र पुंजाजी मते**

(कायम नोंदणी क्रमांक– ०२११२००६१८३)

मार्गदर्शक

**डॉ.प्रशांत पोपट बनसोडे**

संशोधन केंद्र

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,**

**पुणे**



नोव्हेंबर २०१८

# प्रतिज्ञापत्र

मी संशोधक श्री.रविंद्र पुंजाजी मते लिहून देतो की, **''महाराष्ट्रातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास : विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा.''** या प्रबंधातील सर्व माहिती मुळ संदर्भातुन संकलित केली असून त्याचा योग्य त्या ठिकाणी तसा उल्लेख केलेला आहे. आणि सदर माहितीचा या प्रबंधा व्यतिरिक्त अन्यत्र कोठेही उपयोग केलेला नाही.

**ठिकाण : अहमदनगर** **संशोधक**

**दिनांक :** **रविंद्र पुंजाजी मते**

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री.रविंद्र पुंजाजी मते यांनी, **''महाराष्ट्रातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास : विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा.''** या विषयावरील शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे यांच्या सामाजिक शास्त्रे विभागाअंतर्गत समाजशास्त्र विषयात पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी लिहिलेला असून तो संपूर्ण स्वतंत्र आहे. हा शोध प्रबंध अन्य कोणत्याही पदवी किंवा परीक्षेसाठी सादर केलेला नाही. या विषयावरील केलेले संशोधन कार्य मुळ आणि अस्सल असुन ते पीएच.डी.पदवीसाठी योग्य आहे.

**ठिकाण : पुणे** **मार्गदर्शक**

**दिनांक :** **डॉ.प्रशांत बनसोडे**

# ऋणनिर्देश

कोणत्याही चांगल्या प्रयत्नांमागे किंवा कार्यामागे अनेक लोकांच्या प्रेरणा आणि आशिर्वाद असतात. यातूनच व्यक्तीचे प्रत्येक पाऊल सक्षम बनत असते. संशोधन म्हटले की मला अतिशय कठीण कार्य वाटायचे पण हे कठीण कार्य ज्यांच्या प्रेरणा व सहकार्यामुळे मी पूर्ण करू शकलो ते माझे आई-वडील, जेष्ठ बंधू सुबेदार सर्जेराव पुंजाजी मते व माझी पत्नी प्रा.सौ.अनुराधा रवींद्र मते व काही गुरूजनवर्ग यांच्या मुळेच.

या सर्वांचे ऋण कधीही न फिटणारे !!

प्रस्तुत संशोधन *''महाराष्ट्रातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास : विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा.''* या विषयावर पीएच.डी. पदवी साठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे समाजशास्त्र विभागा अंतर्गत शोध प्रबंध सादर करतांना मोलाचे सहकार्य करणाऱ्या प्रत्येकाब- ल कृतज्ञता व्यक्त करणे अगत्याचे ठरते. कोणतेही संशोधन कार्य हे मार्गदर्शका शिवाय केवळ अशक्य !!! मार्गदर्शक म्हणून लाभलेले डॉ. प्रशांत बनसोडे (गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्रसंस्था, पुणे ) यांनी संशोधना दरम्यान सातत्याने लक्ष दिले वेळोवेळी केलेल्या सूचना व त्यांनी केलेल्या सहकार्यामुळे संशोधन कार्य पूर्ण होऊ शकले. या ब- ल मी त्यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

संशोधन कार्य निष्ठापूर्वक आणि निर्धारपूर्वक पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन व मार्गदर्शन देणारे टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विशाल जाधव तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे आदरनीय डीन प्रा. कुलकर्णी सर यांचे संशोधना दरम्यान लाभलेल्या मार्गदर्शलाब- ल मी त्यांचा ऋणी आहे.

शिवाय संशोधनात ज्यांची मला मोलाची साथ मिळाली असे माझे मित्र डॉ.नागेश शेळके, प्रा.अनिल जायेभाय, प्रा.संतोष शेळके, बाणेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जाधव सर, तसेच प्रा.डॉ.मुळे, प्रा.डॉ.शेख यांचा ही मी अतिशय ऋणी आहे. त्याचप्रमाणे मॉर्डन महाविद्यालयाच्या उपप्राचार्या व समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.ज्योती गगणग्रास व त्यांचे सहकारी प्रा. राजकुमार गांधले यांनी मला संशोधन कार्यासाठी सतत प्रेरीत केले. याब- ल त्यांचे ऋण व्यक्त करणे मी अगत्याचे समजतो. मी कार्यरत असलेल्या अहमदनगर कॉलेज मधील माझे सहकारी प्राध्यापक मित्र

डॉ. सताप्पा चव्हाण, डॉ.पराग कदम, प्रा.एस.डी.मोरे, डॉ. जी.एस.गायकवाड, डॉ.च.वी.जोशी,डॉ. सुधाकर शेलार प्रा.माधव जाधव, प्रा.आनंद त्रिपाठी, यांच्या ही प्रेरणा व प्रोत्साहनामुळे मी हे संशोधन कार्य पूर्णत्वास घेऊन जावू शकलो यांचा देखील मी ऋणी आहे. तसेच संशोधनाकरीता मला मार्गदर्शन व आर्थिक मदत करणारे माझे मित्र डॉ.सिनारे पोपट यादव यांचे ऋण न फिटणारे असेच आहे. माझ्या विभागातील सहकारी प्राध्यापक डॉ.समीर मोहपात्रा यांनी मला संशोधनासाठी मार्गदर्शन व प्रेरणा दिल्या त्याब-ल मी त्यांचा ऋणी आहे. तसेच सी.एस.आर.डी मधील ग्रंथपाल गिरीश सर व सहाय्यक ग्रंथपाल किरण गिते यांनी संशोधनास उपयुक्त अशी अनेक दुय्यम साधने मला उपलब्ध करून दिली तसेच अहमदनगर महाविद्यालयातील ग्रंथालयातील,पुणे विद्यापीठ ग्रंथालयातील, टी. आर.टी. आय पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील कर्मचारी वर्गाने केलेलया सहकार्या ब-ल त्यांचेही आभार. माझे मित्र ॲड.अरूण चांदणे, ॲड.बाळ जं बोठे पाटील, प्रा.गोवर्धन उपाध्ये या सर्वांचे लाभलेले सहकार्य व प्रेरणा यातूनच मी हे संशोधन कार्य पूर्णत्वास नेवू शकलो, त्याब-ल या सर्वांचे आभार.

**श्री. रवींद्र पुंजाजी मते**

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| **प्रकरण पहिले** | **प्रस्तावना** | **१ ते ७७** |
| | १.१ प्रास्तविक. | २ |
| | १.२ समाजशास्त्रात समूहांच्या अभ्यासाचे महत्व. | ३ |
| | १.३ आदिवासी ,भटके व विमुक्त जमातींचा अर्थ | ६ |
| | १.४ आदिवासी समूहाब- लचे विविध दृष्टीकोण | ५८ |
| | १.५ भटक्या विमुक्तांच्या चळवळी | ६५ |
| | १.६ सारांश | ७१ |
| | १.७ प्रकरणांची मांडणी | ७२ |
| | संदर्भ सूची | ७५ |
| **प्रकरण दुसरे** | **संशोधन साहित्याचा आढावा व संशोधन पध्दती** | **७८ ते १४३** |
| | २.१ प्रस्तावना | ७९ |
| | २.२ संशोधन क्षेत्र | ८२ |
| | २.३ संशोधन साहित्याचा आढावा | ९४ |
| | २.४ संशोधन आराखडा | १२१ |
| | २.५ संशोधन समस्या | १२३ |
| | २.६ संशोधन उद्दिष्टे | १२३ |
| | २.७ संशोधन व्याप्ती | १२४ |
| | २.८ संशोधन विषयाची उपयुक्तता व महत्व | १२४ |
| | २.९ संशोधनाच्या मर्यादा | १२५ |
| | २.१० सैध्दांतिक आधार | १२५ |
| | २.११ संशोधन पध्दती | १२९ |
| | २.१२ तथ्य संकलन | १३५ |
| | संदर्भ सूची | १३७ |

| | | |
|---|---|---|
| **प्रकरण तिसरे** | **पारधी जमातीची ओळख** | **१४४ ते २७४** |
| | ३.१ प्रस्तावना | १४५ |
| | ३.२ पारधी जमातीची ऐतीहासीक पार्श्वभूमी | १४७ |
| | ३.३ पारधी जमातीचे सामाजिक जीवन | १६७ |
| | ३.४ पारध्यांचे सांस्कृतिक जीवन | १८५ |
| | ३.५ पारध्यांचे धार्मीक जिवन | १९१ |
| | ३.६ पारधी समाजाची जातपंचायत | २०५ |
| | ३.७ पारधी जमातीचे लोकसाहित्य | २२४ |
| | ३.८ महाराष्ट्रातील पारधी समाजाबद्दल सामाजिक संघटनांचे योगदान | २६० |
| | ३.९ आदिवासी वैयक्तिक लाभाच्या शासकिय योजना | २६२ |
| | ३.१० वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास योजना | २६५ |
| | ३.११ सारांश | २६७ |
| | संदर्भ सूची | २६८ |
| **प्रकरण चौथे.** | **पारधी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि शैक्षणिक बाबी विषयक तथ्यांचे विश्लेषण** | **२७५ ते ३४७** |
| | ४.१ पारध्यांची कौटुंबिक माहिती | २७७ |
| | ४.२ सामाजिक जीवन विषयक माहिती | २८४ |
| | ४.३ पारध्यांची आर्थिक माहिती | २९२ |
| | ४.४ शैक्षणिक माहिती | ३१० |
| | ४.५ पारध्यांच्या सांस्कृतिक, धार्मिक जीवन विषयक माहिती | ३१९ |

| | | |
|---|---|---|
| | ४.६ पारध्यांना मिळणा-या शासकीय योजना व सवलती विषयक माहिती | ३२५ |
| | ४.७ पारध्यांची आरोग्य विषयक माहिती | ३२१ |
| | ४.८ पोलीस व पारधी यांच्यातील संबंधाविषयक माहिती | ३४१ |
| **प्रकरण पाचवे** | **संशोधन निष्कर्ष आणि शिफारशी** | **३४८ ते ३७६** |
| | ५.१. निष्कर्ष | ३५० |
| | ५.२. शिफारशी | ३५६ |
| **परिशिष्टये** | मुलाखत अनुसूची | २५८ |
| | सामान्य ग्रंथ सूची | ३६८ |
| | अहमदनगर जिल्हयातील नमुना तालुके व गावे दर्शविणारा तक्ता | ३७५ |

# प्रकरण - पहिले

## प्रस्तावना

१.१ प्रास्तविक

१.२ समाजशास्त्रात समूहांच्या अभ्यासाचे महत्व.

१.३ आदिवासी व भटक्या विमुक्त जमाती

१.३.१ आदिवासी जमाती.

१.३.२ आदिवासी समूहांचे वांशिक वर्गिकरण

१.३.३ आदिवासी समूहांची वैशिष्टये

१.३.४ भारतातील आदिवासीच्या आर्थिक व सामाजिक समस्या

१.३.५. आदिवासी कल्याण कार्यक्रम

१.३.६. भटक्या जमाती

१.३.७. विमुक्त जमाती

१.३.८ पारधी: आदिवासी की विमुक्त जमात ?

१.४. आदिवासी समूहांच्या विकासा बद्दलचे विविध दृष्टीकोण

१.४.१ डॉ.जी.एस. घुर्ये यांचा सामिलीकरणाचा दृष्टीकोण

१.४.२ व्हेरीअर एल्वीन यांचा अलिप्ततावादाचा दृष्टीकोण

१.४.३ पंडीत जवाहरलाल नेहरु यांचे पंचशील तत्वे

१.४.४ पंडीत नेहरु व ठक्कर बाप्पा यांचा एकात्मिकरणाचा दृष्टीकोण

१.५ भटक्या विमुक्तांच्या चळवळी

१.६ सारांश

१.७ प्रकरणांची मांडणी

संदर्भ सूची.

# प्रकरण - पहिले

# प्रस्तावना

## १.१ प्रास्तविक :-

भारत देश हा जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश आहे. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या उच्च मानवी मुल्यांची जोपासना करणारा व त्याचे पालन करणारा देश म्हणून भारत देश ओळखला जातो. परंतु आज स्वातंत्र्योत्तर भारतात मोठया प्रमाणावर विषमता असल्याचे जाणवते. पुरातन समाज व्यवस्थेच्या विळख्यात अडकलेले अनेक समाज घटक आजही जंगले, उजाड माळराने व पर्वत रांगात आपले जीवन व्यथित करतानां दिसतात. भारतीय समाज हा अति प्राचीन व तितकाच गुंतागुंतीचा दिसतो. या देशात अनेक जाती, जमाती, धर्म, संस्कृत्या व विभिन्न बोलीभाषा बोलणाऱ्या लोकांचे वास्तव्य दिसून येते. भारतीय समाज हा एकूणच विविधता पूर्ण आहे.भारतीय समाज व्यवस्थेचा एक मोठा भाग असलेल्या अनुसूचित जमातींना वर्षानुवर्ष शोषणाचा सामना करावा लागला. भारतीय समाजात वास्तव्य करणा-या विविध जाती व जमातींच्या लोकांना समाजात असणारे स्थान व प्रतिष्ठा ही देखील भिन्न आहे. निम्न जाती व निम्न जमाती यांना समाजात असणारे स्थान उच्च जाती व वर्णांच्या व्यक्तींपेक्षा निम्न असलेले दिसून येते. या जमातीतील लोकांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक मागासलेपणा व वंचीतता देखील वरील कारणानेच दिसून येत. वास्तविक पहाता जाती व जमाती या भारतीय समाज व्यवस्थेचाच एक भाग आहे व या जाती-जमातींचे अस्तीत्व वर्षानुवर्षा पासून भारतीय भूमीवर असलेले दिसून येते.

आज एकविसाव्या शतकात आपण विज्ञान आणि तंत्रज्ञानात अगदी पुढे गेलो आहोत. समाजव्यवस्थेत भौतिकवाद आणि चंगळवादाला मोठया प्रमाणात उधान आलेले आहे. परंतु भारतीय समाजातील विषमता आजही स्थिर असलेली दिसते. दरम्यानच्या काळात ब-याच शोषण व हक्कांसाठी चळवळी झाल्या तरीही काही जाती व जमातींच्या वाटयाला आलेले भटकेपण व सामाजिक वंचना ही संपुष्टात आलेली दिसून येते नाही.

भारतीय समाजात असणारी विषमता ही जरी भारतीय समाजाचे खास वैशिष्टये असले तरी विषमतेमुळे एखादा समाज मूळ सामाजिक प्रवाहातून कायमचाच वंचीत राहावा हे मात्र योग्य नाही. एखाद्या समाजाला / जमातीला भारत देशाचा नागरिक म्हणून कोणतेही हक्क व आर्थिक सुधारणेचे

साधन वर्षानुवर्षे उपलब्ध न होणे हा त्या समाजव्यवस्थेच्या अपयशाचा भाग होय. एखाद्या जमातीत केवळ जन्माला येणे म्हणजेच गुन्हेगार होणे हे कितपत योग्य आहे. भारत देशाची विविधता (जात, धर्म, संस्कृती, बोली, जमाती इ.) ही जरी इतर देशांसाठी कुतूहलाची बाब असली तरी भारतातील या विविधतेत बरेच लोक शोषीत असलेले दिसून येतात काळ बदलला तसे या शोषीत जाती व जमातीमध्ये म्हणावे तसे परिवर्तन आलेले नाही. परिवर्तन हा निसर्ग नियम आहे परंतु हा निसर्ग नियम भटके, विमुक्त व आदिवासींना कितपत लागू होतो हे पाहणे गरजेचे आहे. सदर संशोधनामधून भारतात आढळणारी '*पारधी*' या जमातीचे सामाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास व विश्लेषण करण्याचा प्रयत्न आहे कारण भारतीय समाजातील जाती व जमांतींवर बरेच अभ्यास झालेले आहेत परंतु पारधी या जमातीब-ल बरेच कमी प्रमाणात संशोधन झालेले आहे.व जे संशोधन झालेले आहे ते एकांगी स्वरुपाचे आहेत. तसेच सदर संशोधनातुन पारध्यांच्या वंचीततेचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. आज एकविसाव्या शतकात देखील पारधी गुन्हेगारीच्या कलंकापासून मुक्त झालेले नाहीत. गुन्हेगारी जमात म्हणून ओळखल्या जाणा-या पारधी समाजाचा अभ्यास करणे व त्यांची सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक स्थिती अभ्यासने सदर संशोधनाचा मुख्य उद्देश असला तरी सदर संशोधनात उपरोक्त बाबिंकडे टिकात्मक व वंचीततेच्या दृष्टीकोनातून पहाण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच भारताचे नागरीक म्हणून त्यांची काय स्थिती आहे, आधूनिकतेत मध्ये त्यांचे काय स्थान आहे ? समाजातील लोक यांच्या कडे कोणत्या दृष्टीने पहातात, नवउदारमतवाद हा यांची वंचीतता वाढवण्यास जबाबदार ठरतो का ? त्यांची व्यवसायीक गतीशीलता होते का ? हे शोधण्याचा प्रयत्न सदर संशोधनातून केलेला आहे.

### १.२.समाजशास्त्रात समूहांच्या अभ्यासाचे महत्व-

समूह करुन राहणे ही मानवाची पृथ्वीवरील अस्तीत्वा पासूनची प्रवृत्ती आहे.पृथ्वीवरील जेथे जेथे मानवी वस्ती आहे तेथे तेथे त्यांनी समूह प्रवृत्ती जोपासलेली दिसते. व प्रत्येक समूह हे इतर समूहां पेक्षा संस्कृती, बोलीभाषा, पेहराव, खाण्यापीण्याच्या पध्दती बाबत भिन्न असलेले दिसतात.समाजशास्त्रामध्ये मानवी समाजाच्या अभ्यासावर लक्ष केंन्द्रीत केले जाते. समाज हा लोकांनी मिळून बनलेला असतो आणि समाजात अनेक समूह व उपसमूहांचे अस्तित्व आढळते. समूहांशिवाय आपण मानवी समाजाची कल्पना करूच शकत नाही. त्याला आपल्या विविध गरजा भागविण्यासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते.व त्यासाठी त्याला समूह करूनच रहावे लागते

जेणेकरून तो इतरांना सहकार्य करून स्वत:च्या गरजा देखील भागवू शकतो.विशिष्ट भू-प्रदेशावर एकत्रीत राहणा-या अनेक समुहांनी मिळून समाज बनतो. समाज या संकल्पनेब-ल मॅक आयव्हर व पेज असे म्हणतात की ''समाज म्हणजे सामाजिक संबंधांचे जाळे होय.''[१] हे सामाजिक संबंध समाजात आढळणा-या सर्व समूहांकडून अभिप्रेत असतात.ॲरिस्टॉटल या विचारवंताचे समाजा बदद्दल असे मत आहे की ''मनुष्य हा समाजशील प्राणी आहे.''[२] म्हणजेच तो समाजात राहणे पसंत करतो, तो एकटा व समाजाशिवाय राहूच शकत नाही. समूह करून राहणे ही मानवाची सहज प्रवृत्ती आहे. त्यामुळे कोणत्याही समाजाचा अभ्यास करतांना त्या समाजातील सामाजिक समूहांचा अभ्यास अत्यंत महत्वाचा असतो. हॅरी जॉन्सन या विचारवंतांने समाजशास्त्राला ''सामाजिक समूहासंबधी उहापोह करणारे शास्त्र असे म्हटले आहे.''[३] कारण सामाजिक समूहाची संस्था आकार व वैशिष्टये या सारख्या गोष्टींवर समाज रचना अवलंबून असते.अनेक व्यक्ती स्वत:च्या गरजा भागविण्यासाठी एकत्र येवून परस्पराशी आंतरक्रिया करतात व त्यावेळी त्यांचे गट निर्माण होतात.समाजामध्ये विविध गरजांच्या अनुषंगाने अनेक गट निर्माण झालेले असतात. तसेच एखाद्या मोठया गटात उपगट सुध्दा असू शकतात. आदिवासी समूहांच्या टोळ्या हे देखील याचेच उदाहरण होय. डॉ.सर्जेराव साळूंखे समूहां ब-ल असे म्हणतात, ''मनुष्य हा जन्मत: केवळ एक प्राणी असतो त्याचे सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून सामाजिक प्राण्यात रूपांतर होत असते.हे सामाजिकरण प्रामुख्याने सामाजिक समूहांच्या माध्यमातून होत असते. मनुष्य एकटा न राहता जन्मापासुन मृत्यूपर्यंत तो आपले जिवन समूहातच व्यथित करतो याचे मुख्य कारण म्हणजे माणूस व पशुपक्षी यांच्यात काही मुलभूत फरक आहेत. पशुपक्षांच्या गरजा या पाणी आणि चारा या पुरत्याच मर्यादित आहेत. मनुष्य मात्र अन्न, वस्त्र आणि निवा-या व्यतिरिक्त शारिरीक व मानसिक गरजांची पूर्तता होणे आवश्यक आहे. साहजिकच या गरजांची पूर्तता तो एकटा राहून करू शकत नाही आणि म्हणूनच मनुष्य हा समूहाने राहणे पसंत करतो. तो एकाकी राहून आपल्या गरजा भागवू शकत नाही म्हणून मानवी समाजाचा समूह हा एक अविभाज्य भाग आहे.''[४] टिशलेर व्हायटन व हंटर हे विचारवंत समूहांन विषयी मत मांडतांना असे म्हणतात की ''आपण एक विभीन्न सामाजिक एकक असल्याची जाणीव असणा-या व समाज संघटनाच्या एखादया प्रतिमानानूसार वारंवार आंतरक्रिया करणा-या दोन किंवा अधिक व्यक्तींचा सामाजिक समूहात समावेश होतो.''[५] समूह म्हणजे अशा

लोकांचा समुच्चय की ज्यांना आपले सदस्यत्व व आंतरक्रिया यांची जाणिव असते. ऑगबर्न व निमकॉफ हे देखील समूहा ब-ल बोलतांना असे म्हणतात की, “जेंव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्र येऊन परस्परांवर प्रभाव टाकतात तेंव्हा सामाजिक गटांची निर्मीती होते.”[६].समाजशास्त्रात फर्डिनांड टॉनिज यांनी सामाजिक समूहाचा उल्लेख गैसिलशैफ्ट (Gesellschaft) आणि गेमिनशैफ्ट (Gemeinscheft) अशा स्वरूपात केला आहे याचा आपण शब्दश: अर्थ पाहिला तर हरिकृष्ण रावत यांनी सांगितल्यानुसार “गेमिनशैफ्ट जर्मन भाषा का एक शब्द जिसका प्रयोग समाजशास्त्र में 'समुदाय' की अर्थ में किया गया है। टोनिज ने घनिष्ठता, स्थायित्व तथा समाज में एक दूसरे की प्रस्थिती के स्पष्ट बोध पर आधारित सामाजिक संबंधों के ताने-बाने द्वारा बने समूह के लिए इस अवधारणा का प्रयोग किया है। इन विशेषताओं से मुक्त समूह के सदस्य जीवन में आनेवाले दु:खो एवं सुखों को हंस-मिल कर बांट लेते हैं। गेमीनशैफ्ट की विशेषताओं वाला समूह अपेक्षाकृत की अन्य विशेषताएं स्थानीय,नातेदारी,भावनात्मक एकता निरन्तरता, प्रामाणिकता और भावप्रवणता है।”[७] टोनिज यांचे मत असे आहे की, “इस शब्द का प्रयोग ऐसे सामाजिक संबंधों का बोध देणे वाले सामाजिक समूह के लिए किया जिसकी प्रकृती अवैयक्तिक, अनुबंधात्मक तथा स्वार्थमय होती है। इस प्रकार की संबंधों की अन्य विशेषताएँ उनकी आंशिकता, उपयोगवादीता तथा विशिष्टता है।”[८]

वरील विचारवंतांच्या विचारावरुन समूह नेमके कशाला म्हणावे हे निदर्शनास येते.सामाजिक संबंध, आप-आपसात असणा-या आंतरक्रियांची जाणिव एका समूहापासून आपले वेगळे अस्तीत्व आहे याची जाणिव समूहातील लोकांना असते. या जाणिवेमुळेच लोक समूह करून राहू लागले व आपला समूह हा इतरांच्या समूहापेक्षा कसा भिन्न आहे याची जाणीव समूहां प्रती आत्मभावना त्या-त्या समूहांतील लोकांच्या मनात निर्माण होते. भारतीय समाज व्यवस्थेत असे अनेक समूह, गट व उपगट असलेले पहावयास मिळतात. भारत देशात अनेक जाती समूह, धर्म, समूह, वंश समूह हे काही हजार वर्षांपासून अस्तित्वात असलेले दिसतात. स्वत:च्या जातीत, धर्मात व रितीरीवाजात राहणारे व त्यातच मशगुल असणारे समूह भारत देशात आढळतात आज एकविसाव्या शतकात, वैज्ञानिक युगात देखील समूह भावणेचा प्रभाव लोकांमध्ये कमी झालेला दिसत नाही. एक समूह हा दुस-या समूहा पासून भिन्न आहे. काही समूह हे आजही समाज

व्यवस्थेपासून दूर असलेले दिसतात. शासकीय दप्तरात त्यांचे नाव नाही ज्यांना प्रतिष्ठा नाही असे अनेक समूह येथे आहेत व अशा समूहांना याच कारणाने भटके जीवन जगावे लागते. हयाच समूहांनी स्वातंत्र्य युदधात देखील भाग घेतलेला दिसतो मात्र देशाला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर आज इतकी वर्षे ही समूह भटकेपणाचे जिवन जगतांना दिसतात. १९२८ साली सशस्त्र क्रांतिकारकांना उद्देशून महात्मा गांधी यांनी एक लेख लिहीला होता त्यात त्यांनी एक प्रश्न विचारला होता तो पुढीलप्रमाणे-

१.हिंदू मुस्लीम ऐक्य २.स्त्रियांना बरोबरीचा अधिकार ३.दलित-मागासांना उचित संधी दिल्या शिवाय भारताला खरे स्वातंत्र्य मिळेल काय ? खरोखर आहे स्वतंत्र भारतात गांधीजींची १९२८ साली केलेला हा प्रश्न किती समर्पक वाटतो.

## १.३. आदिवासी जमाती, भटके व विमुक्त जमातींचा अर्थ-

केवळ भारतातच नव्हे तर संपुर्ण जगात वेगवेगळया आदिम समूहांचे अस्तीत्व असलेले दिसून येते. आरंभी मानव हा टोळी किंवा समूह करून राहत होता. अन्नाच्या शोधात हे समूह एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी स्थलांतर करीत असत. यातील काही टोळयांना हळूहळू स्थैर्य प्राप्त झाले व भटकेपणातून त्यांची सुटका झाली. आदिवासी जमाती, भटके विमुक्त हे सर्वच याच टोळयांचे वंशज होय. हे टोळी समूह संपूर्ण जगात सर्वत्र विखूरलेले होते. त्याचं स्वरूप भारतातही दिसून येते, आजचे भारत राष्ट्र हे देखील पूर्वीच्या टोळीचे उन्नत रूप होय. तरीही आज भारत देशात बरीच लोकसंख्या ही आदिवासी व भटके विमुक्त यांनी व्यापलेली दिसते. या सर्व जमातींना समाजव्यवस्थेत असणारे स्थान हे दुय्यम दर्जाचे आहे, या मूळे या जाती व जमातींचा अभ्यास समाजशास्त्रीय अभ्यासाचाच एक भाग बनलेला आहे.

### १.३.१ आदिवासी जमाती-

या देशातील मूळ निवासी म्हणून डॉ.व्हेरीयर इल्विन तसेच ठक्कर बाप्पा यांनी त्यांना ‘आदिवासी‘ म्हटले आहे.तसेच वनात राहणारे म्हणून ‘वन्यजाती’ असे ही म्हणतात. भारतीय संविधानातील कलम ३४१ आणि ३४२ मध्ये दिलेल्या तरतूदी प्रमाणे तयार केलेल्या सूचीत समाविष्ट करण्यात आलेल्या जनसमूहांना ‘अनुसूचित जनजाती’ म्हणतात. अनुसूचित जनजाती पृथक आणि अंतर्मुख जनसमूह असून उत्पादन आणि उपभोगाच्या दृष्टीने समरूप असतात.

आर्थिक बाबतीत मागासलेल्या या समूहातील लोकांचे इतरांकडून शोषण केले जाते. भाषा, वंश, धर्म जीवनशैलीचा विचार करता त्यांच्यात इतरांपेक्षा वेगळेपणा दिसतो'. (य.च.म.मु.वि.भारतीय समाज,एस.ओ.सी.२२३,४२.) प्राचिन व मध्ययुगीन कालखंडात कोणत्याही भाषेत आदिवासी असे शब्द प्रचलित नव्हते. त्यांचा उल्लेख फासे पारधी, भिल्ल अशा विशिष्ट नावाने करण्यात येत असे. तसेच हिंदू धर्म ग्रंथात जसे रामायणात शबरी भिल्लीणीचा उल्लेख होता व 'श्रीमदभागवत या ग्रंथात श्रीकृष्णाचा मृत्यू हा पारधी व्यक्तीच्या बाणाने झाला' असा उल्लेख आहे. आधुनिक काळातील आदिवासी इतिहासाची सुरूवात इंग्रजांच्या आगमनानंतर झाली. इंग्रज देशात सर्व भागात आपले शासन पक्के करू इच्छित होते. तसेच उद्योगधंद्यासाठी नैसर्गिक साधनसामग्रीच्या शोधात होते. त्यासाठी त्यांनी भारताच्या विभिन्न भागांना केंद्रीय प्रशासनाशी जोडले. त्याचबरोबर नवीन कर पध्दती सुरू केली. भूमिसंबंधी कायदे केले, जंगल विषयक कायदे केले, त्यातून जंगलाचे ठेकेदार, व्यापारी, सावकार, अधिकारी व श्रमिकांना या क्षेत्रात प्रवेश मिळाला व काही भागात आदिवासींनी या पध्दतीविरूध्द चळवळी व बंड केले.

आदिवासी जमातींब- ल गोविंद गारे असे म्हणतात की,समान भाषा बोलणा-या सामाजिक संघटनांचे व संस्थाच्या नियमांचे पालन करणा-या व्यक्तींच्या गटाला जमात अशी संज्ञा वापरली जाते. व्यापार, शेती, किंवा युध्द यासारख्या क्षेत्रात यश मिळविण्यासाठी जमातीतील व्यक्ती एकत्रपणे परिश्रम करीत असतात. एक नाव, समान प्रदेश,समान चालीरीती, समान जिवनमार्ग व समान वंशपरंपरा ही या जमातींची गुणवैशिष्टये होत. जमात ही अनेक स्थानिक समूदायांनी मिळून बनलेली असते आणि अशा अनेक जमातींच्या एकवटलेल्या प्रदेशाचा राष्ट्र या संकल्पनेत समावेश होतो. होली ग्राम ही स्थानिक समूदायांची उदाहरणे म्हणून देता येतील. काटेकोरपणे निर्माण झालेल्या प्रादेशिक संघटनांचा मोठया राज्यातील समाजांना जमात ही संज्ञा क्वचीतच वापरली जाते परंतु विस्तृत अशा नातेव्यवस्थेने बध्द असलेल्या व तो सामाजिक एवसमानतेचा पाया मानलेल्या समाजाला मात्र जमात असे म्हणतात. "आदिम समाज हा इतर कोणत्याही समाजा पेक्षा अनेक दृष्टीने वेगळा असलयाची प्रचीती येते."[९]

वरील विवेचनातुन समान भाषा, समान नाव, समान भु-प्रदेशावर राहणारे, समान चालीरितींची जोपासना करणारे, समान जिवनमार्ग असणारे व समान वंशपरंपरेने युक्त असणा-या

जन समूदायास जमात ही संज्ञा वापरलेली दिसते. ते इतर समुदाया पासून दूर राहून जिवन व्यथित करण्यात धन्यता मानतात. त्यांना स्वत:च्या चालीरीती व संस्कृतीची विशेष आत्मीयता असते. त्यांचे राहणीमान, आचार विचार व जिवन पध्दती ही इतरांन पेक्षा भिंन्न असते. आदिवासी समूहात प्रामुख्याने धार्मिक श्रध्दा, प्रथा, परंपरा, चालीरीती यावर विशेष भर असतो. उपरोक्त सर्व बाबींमूळे ते वर्षानूवर्षे समातव्यवस्थे पासून दूर राहीले व सर्वच बाबींची वंचना यांच्या वाटयाला आली.

आदिवासी जमातीचे आकलन होण्यासाठी आपण महाराष्ट्रातील आदिवासी जमाती या पुस्तकात डॉ.गोविंद गारे यांनी विविध विचारवंतांनी ज्या आदिवासी जमातीच्या व्याख्या सांगितल्या आहेत त्या अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत.

**१.गिलिन आणि गिलिन यांच्या मते-**

“एका विशिष्ट भू-प्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जिवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात”.[१०]

**२.डॉ.रिव्हर्स असे म्हणतात की-**

“ज्या समूहातील सदस्य एक समान बोलीभाषा बोलतात युध्द वगैरेसारख्या उद्दिष्टे पूर्तीकरीता एक होवून झटतात अशा सरळ व साध्या सामाजिक समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात”. [११]

**३.इंपिरियल गॅझेट नुसार :**

“समान बोली भाषा बोलणाऱ्या एकाच भूभागात राहणाऱ्या, सुरवातीला अंतरविवाही असण्याची शक्यता असलेल्या पण सर्व सामान्यपणे अंतरर्विवाही नसलेल्या व समान नाव धारण करण्याऱ्या कुटुंबांच्या समुच्चायाला आदिवासी समाज असे म्हणतात.”[१२]

**४.डी.एन.मुजुमदार :**

“समान नाव असणाऱ्या ,एकाच भू प्रदेशावर वास्तव्य करण्यारा, एकच भाषा बोलणारा व विवाह , व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पध्दतशीर व्यवस्था स्विकारण्याऱ्या कुटुंबांचे किंवा कुटुंबसमुहांचे एकत्रिकरण म्हणजे आदिवासी होय ”.[१३]

**५.ई.बी.टायलर :**

"एका सामाजिक भूप्रदेशात राहणाऱ्या व एक बोली भाषा , संस्कृतिक एकजिनसीपणा आणि एकात्मिक सामाजिक संघटन असलेला सामाजिक गट म्हणजे आदिवासी गट होय .त्याचे समान पूर्वज, समान देवता , सामान्यता: समान नेतृत्व असते.त्यांच्या गटातील कुटुंबे आर्थिक , सामाजिक,धार्मिक तसेच कौटुंबिक आणि रक्तसंबंधी धाग्यांनी परस्पपरांशी संबंधित असतात."[१४]
वरील व्याख्यांचे अवलोकन केले तर आदिवासी समूदायाची पूर्ण प्रचीती येते.

१) आदिवासी समूह हे भारतीय समाजाचे अविभाज्य असे घटक आहेत.

२) आदिवासी जमातींची एक विशिष्ट बोली असते.

३) त्यांचे सांस्कृतिक जिवन हे इतर समाजापेक्षा भिन्न असते.

४) आदिवासी समूहात प्रामुख्याने धार्मिक श्रध्दा, प्रथा, परंपरा, चालीरीती यावर विशेष भर असतो.

हा समाज साक्षर नसल्याने व या समाजातील लोकांनी मुख्य समाज प्रवाहात सामावून न घेतल्याने त्यांच्यात अनुक्रमे जास्त बदल जाणवत नाही व त्यामुळे ते आपल्या सांस्कृतिक जिवणावर जास्त भर देतात. या शिवाय भारतीय समाजशास्त्राचे जनक डॉ.जी.एस.घुर्ये यांचा उल्लेख "तथाकथीत मूळचे रहिवासी (So called Aboriginal ) व 'मागासलेले हिंदू'( Backward Hindus) असा करतात "[१५] आशा पध्दताने आदिवासीं बददल विवीध मते दिसून येतात.

## १.३.२ आदिवासी समूहाचे वांशिक वर्गीकरण-

**वंश (Race)** :-

वंश हा घटक समाजिक विषमता निर्माण होण्यास जबाबदार आहे. सामान्यपणे पृथ्वीतलावर जितके मानवी समूह आहेत. त्या सर्व मानवी समूहांमध्ये ज्या प्रमाणे भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक, जातीय, भाषिक, जमातीय विविधता दिसून येते. तसेच हया सर्वच मानवी समूहांमध्ये रंग, उंची, केस, चेहऱ्यांची ठेवण इ. मध्ये देखील भिन्नता दिसून येते. आशिया खंडातील लोक हे आफ्रिका खंडातील लोकांपेक्षा भिन्न आहेत. तसेच भारतीय समाजातील विविध राज्यांचा विचार केला तरीही महाराष्ट्र, राजस्थान, आंध्रप्रदेश, बिहार, जम्मु व काश्मिर, नागालॅण्ड व मिझोराम या राज्यात राहणारे व्यक्ती हे उंची, रंग, चेहऱ्याची ठेवण इ. बाबतीत

इतरांपेक्षा, एकमेकांपेक्षा भिन्न असल्याचे दिसून येते. या भिन्नतेलाच वांशिक भिन्नता असे म्हणता येईल. कारण वरील सर्व व्यक्तींचे शारीरिक लक्षणे ही एकमेकांपासून भिन्न असल्याचे दिसते म्हणजेच त्यांच्यात वांशिक भिन्नता दिसून येते.

वंश हा शारीरीक लक्षणांवर आधारीत अशा लोकांचा समूह असतो ज्यांच्यात काही अनुवंशिक गुणांमध्ये साम्य दिसून येते व ही अनुवंशिकता किंवा अनुवंशिक लक्षणे दिर्घकाळापर्यंत विवाह संबंध माध्यमातून प्रजननाच्या माध्यमातून एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रमित होताना दिसतात. वंश या शब्दाचा प्रयोग सर्वप्रथम आंग्ल भाषेत सोळाव्या शतकात व्यक्तींच्या अशा समूहासाठी केला गेला की ज्यांच्यातील समान लक्षणांमुळे ते एकाच पूर्वजाशी संबंधित आहेत असे मानले गेले. सन १८५९ मध्ये चार्ल्स डार्विन या विचारवंताने एक 'ओरिजिन ऑफ स्पीशीज ' नावाचे पुस्तक लिहले व त्यात असे नमूद केले की निसर्गात कोणतेही स्थिर वर्ग नाहीत. मानव प्राण्याचे पृथ्वीतलावावर प्रथम आगमन कोठे व कसे झाले याबाबत बरेच मतभेद आहेत. या बाबत डॉ.दा.धो.काचोळे असे लिहतात, "पुराणवस्तु संशोधन शास्त्र आणि मानव वंशशास्त्र या दोन शास्त्रांचे असे एक मत आहे की, सुमारे पाच कोटी वर्षापूर्वी माणसाची निर्मिती माकड, वानर या सारख्या प्राण्यांपासून झाली असावी. मानवेत्तर प्राण्यांचे शत्रू पासून संरक्षण व्हावे म्हणून निसर्गाने त्यांना नखे, शिंगे, सुळे, दात अशी साधने पुरविली आहेत."[१६]

वंश ही संकल्पना सविस्तरपणे जाणून घेण्यासाठी पुढील व्याख्या लक्षात घेणे गरजेचे आहे.

**१) क्रोबर :-**

"वंश ही एक यथार्थ अशी जीवशास्त्रीय कल्पना आहे. अनुवंश, प्रजातीयगुण किंवा उपजाती यांच्याद्वारा वांशिक गटाचे संघटन होत असते."[१७]

**२) फ्रांस बोअस** :-

"रोजच्या बोलण्यात आपण वंश हा शब्द वापरतो तेव्हा त्याचा अर्थ समान अशा काही शारीरिक व मानसिक वैशिष्टयांनी युक्त असलेला एक मानवगट असा होतो".[१८]

**३) होबेल :-**

"वंश म्हणजे जीवशास्त्रीय दृष्टाय अन्त: प्रजोत्पादित व्यक्तींचा असा एक गट असतो की ज्याच्या ठिकाणी विशेष अशी शारीरिक वैशिष्टये जमा झालेली असतात व ती पुढच्या पिढीत ही अनुवंशाच्या यंत्रणेद्वारे उतरतात".[१९]

**४) डॉ.मुजूमदार :-**

"जर एखादा मानवगट आपल्या समान अशा अनेक शारीरिक गुणविशेषांमुळे दुसऱ्या गटातून भिन्न ठरविता आला, तर अशा जीवशास्त्रीय गटातील सदस्य दूरवर पसरले असले तरी त्याचा एक वंश तयार होतो".[२०]

**५) मार्शल जोन्स :-**

"काही निश्चित स्वरूपाचे मोजता येण्यासारखे,एकाच तऱ्हेचे अनुवंशिक शारीरिक गुणधर्म असलेल्या मानवगटास वंश असे म्हणता येईल."[२१]

वरील व्याख्यांवरून 'वंश' या संकल्पनेबाबत असे सांगता येईल की,

१) 'वंश' या घटकात अनुवंश, प्रजातीयगुण किंवा उपजाती महत्त्वपूर्ण असतात.

२) यात समान शारीरिक व मानसिक वैशिष्टये महत्त्वपूर्ण असतात.

३) यात विशिष्ट शारीरिक वैशिष्टयांचे संक्रमण हे पुढील पिढीतही होत असते.

४) वंश या घटकात एखादा मानवी समूह समान शारीरिक लक्षणांमुळे दुसऱ्या मानवी गटांपासून भिन्न ठरविला जातो.

५) 'वंश' या घटकात काही वांशिक गटांमध्ये मोजता येणारे समान शारिरीक गुणधर्म दिसून येतात.

थोडक्यात वंश म्हणजे विशिष्ट शारीरिक, मानसिक लक्षणांनी युक्त असणारा मानवी समूह होय.

- **वांशिक समूहांचे वर्गीकरण :-**

जगाच्या पाठीवर जेथे जेथे मानवी वसाहती आहेत तेथे राहणारे व्यक्ती हे एकमेकांपासून शारीरिक गुणधर्माने भिन्न दिसतात. म्हणजे रंग, उंची, चेहऱ्याची ठेवण इ. बाबतीत या लोकांमध्ये बऱ्याच प्रमाणात भिन्नता असलेली दिसून येते. म्हणजेच या सर्व मानवजातीवर त्या-त्या प्रदेशातील भौगोलिक परिस्थितीचा परिणाम झालेला असला तरी त्यांच्या या शारीरिक भिन्नतेबाबत विचार

करणे, योग्य आहे. म्हणूनच मानवाची पारंपारिक विचार सरणी लक्षात घेऊन युनोस्कोने मानवाचे चार वंश निश्चित केले आहेत. म्हणजे त्यांच्या मते संपूर्ण मानवजात ही "कॉकेसॉइड, मंगोलॉइड, निग्रॉइड आणि ऑस्ट्रेलॉइड या चार वंशाची मिळून बनलेली आहे, असे मानले जाते ".[२२]

वरील वांशिक वर्गीकरणाचा विचार केला तरी या व्यतिरीक्त यांचे काही उपगट किंवा उपवंश कल्पिले जातात. उदा. अल्पाईन, नॉर्डिक, मेडीटरेनियम व डिनॅरिक या उपवंशाचा समावेश कॉकेसॉईड वंशात समावेश केला जातो.

- **भारतातील वांशिक समूहांचे वर्गीकरण :-**

भारतीय इतिहासाचा जर अभ्यास केला तर आपणास असे दिसून येते की, भारत देशावर मागील बऱ्याच शतकांत विविध मानव वंशानी आक्रमणे केलेली आहेत. व नंतर येथे ज्या मानववंशानी आक्रमणे केली पुढे ते याच देशात स्थायिक झालेले आढळून येतात. हर्बर्ट रिस्ले, भारतीय मानव वंश शास्त्रज्ञ मुजूमदार, इरावती कर्वे, तसेच हॅटन व रणजीत गुहा यांनी या ब-ल परस्पर विरोधी अनुमान काढल्याचे दिसून येते.

"भारतातील वंश वर्गीकरणाचा आढावा अनेक तज्ञांनी घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात प्रामुख्याने सर हर्बट रिस्ले यांनी निरनिराळया शारीरिक गुणधर्माच्या आधारावर भारतातील जनतेचे एकूण सात वंशात वर्गीकरण केले आहे".[२३]

**१) तुर्को-इराणीयन :-**

या वंशाच्या लोकांची लक्षणे पुढीलप्रमाणे सांगितली जातात. लघुशीर्षी-सुरेख किंवा तत्सम नाक, तसेच लांबट नाक, उंच साधारणपणे गडद काळे डोळे, क्वचित राखी रंगाचे डोळे, केसाळ तसेच भरपूर दाढी-मिशा वगैरे यात बलूची लोक, ब्राहुअी व अफगाणी लोकांचा समावेश होतो.

**२) इंडो-आर्यन :-**

या प्रकारात पुढील लक्षणांचा समुदाय येतो.लंबशीर्षी लांब व अरूंद नाक, गडद रंगाचे डोळे, उंच चेहऱ्यावर केस वगैरे प्रामुख्याने पंजाबी, राजपूत व जाट खत्री (काश्मीरी खोऱ्यातील ) यांचा समावेश होतो.

**३) सिथी-द्रविडीयन :-**

सिथीयन व द्रविडीयन या प्रकारची संकरीत अशी ही वंशवृध्दी होय. यांची लक्षणे पुढीलप्रमाणे आढळतात. लघुशीर्षी, दिसायला सुरेख, चेहऱ्यावर तुरळक केस, मध्यम उंची इ. यामध्ये मराठा, ब्राम्हण (यात सध्याचे महाराष्ट्रीयन ब्राम्हण) गुजरातव कुर्ग येथील कुर्गी लोकांचा समावेश होतो. शिवाय या वंशात उच्च सामाजिक थरामध्ये सिथीयन तर नीच सामाजिक थरामध्ये द्रविडियन तत्वे आढळतात.

**४) आर्यो-द्रविडीयन :-**

आर्य व द्रविडीयन यांच्या संकरीत प्रकारची लक्षणे पुढीलप्रमाणे साधारणपणे लांबशीर्षी ते समशीर्षी, सौम्य ते गडद रंगाची कातडी, मध्यम आकाराचे नाक, काही वेळा रूंद नाक, कमी उंची वगैरे यात उत्तरप्रदेश, राजस्थान व बिहार येथील लोकांचा समावेश होतो.

**५) मंगोलो-द्रविडीयन :-**

मंगोलीयन व द्रविडीयन वंशाच्या एकत्रीकरणातून, या वंशाची लक्षणे पुढीलप्रमाणे होत. समशीर्षी ते लघुशीर्षी, रूंद ते अरूंद प्रकारचे नाक, कातडीचा रंग गडद, चेहऱ्यावर भरपूर केस, मध्यम उंची, पंरतु काही वेळा खुजे प्रकारची येतात. प्रामुख्याने बंगाली कायस्थांचा यात समावेश केला जातो.

**६) मंगोलॉईड :-**

लघुशीर्षी व अरूंद नाक, काही वेळा रूंद नाक, सपाट चेहरा, डोक्यावर मंगोलीयन दुमड दिसते. कमी उंचीचे, कातडीचा रंग गडद परंतु पिवळट झाक असलेला. एकंदर केसाचे प्रमाण कमी इ. लक्षणांचा समूदाय या प्रकारात मोडतो. आसाम, नेपाळ व ब्रम्हदेश येथील लोकांचा समावेश यात होतो.

**७) द्रविडीयन :-**

लंबशीर्षी, रूंद नाकाचे, बसक्या नाकाचे, काळा रंग, काळेभोर केस, कुरळे व भरपूर केस, खुजे इत्यादी लक्षणे या प्रकारात मोडतात. दक्षिण भारतातील छोटा नागपूर वगैरे लोकांत ही लक्षणे विशेषत्वाने आढळतात. दक्षिण भारतातील पनिया व छोटा नागपूर मधील संस्थाल या आदिवासींचा उल्लेख शुध्द द्रविडियन म्हणून केला जातो.

वरील रिस्ले यांच्या वांशिक वर्गीकरणाचा विचार केला तर असे दिसून येते की, सदर संशोधनासाठी निवडण्यात आलेली पारधी ही विमुक्त जमात ही आर्यो-द्रविडीयन या वांशिक गटात समाविष्ट होतांना दिसते. परंतु रिस्ले या विचारवंताने जे भारतातील वांशिक गटाचे वर्गीकरण केलेले आहे. त्यावर मोठया प्रमाणावर टिका झालेली दिसून येते. त्यामुळे त्यांचे वर्गीकरण कितपत योग्य आहे या विषयी शंकाच आहे.

भारतातील वांशिक समूहाच्या वर्गीकरणाबाबत श्यामचरण दुबे यांनी असे मत व्यक्त केले आहे की 'विविध वांशिक समूहांविषयी जी माहिती आपल्याला मानववंशशास्त्रातून मिळते तिच्या आधारे भारतातील आद्य रहिवाशी कोण होते या विषयी काही अंदाज बांधू शकतो. बी.सी.गुहा यांनी केलेले वर्गीकरण हे सर्वात अधिकृत आणि सर्वमान्य होईल असे आहे. त्यांच्या मते निग्रिटो, प्रोटोऑस्ट्रेलॉईड, मंगोलाईड, मेडीटेरियनियन, वेस्टर्न ब्राचीसेफल आणि नॉर्डिक हे सहा प्रमुख वांशिक समूह भारतात आढळतात. यातील पहिले तीन वंश हे या उपखंडातील सर्वात प्राचीन रहिवाशी आहेत, पण काही छोट्या छोट्या भागापुरतीच त्यांची वस्ती मर्यादित आहे. दक्षिणेतील कदार, इरूला आणि पनियन, तसेच अंदमान बेटांवरील ऑंग आणि आंदमानी लोकांत निग्रो वंशाची लक्षणे दिसतात. या समूहाची काही लक्षणे राजमहल टेकड्यांवरील बागडी आणि अंगामी नागा या जमातीतील लोकांमध्ये दिसतात, पण हे लोक नंतरच्या काळात अरब व्यापा-यांबरोबर भारतात आले असावेत. भारताच्या बहुरंगी संस्कृतीत निग्रो वंशाचा नेमका वाटा किती हे आपल्याला माहित नाही. संस्थेच्या दृष्टिने प्रोटो-ऑस्ट्रेलॉइड समूह अधिक महत्वाचा आहे. मध्य भारतातील वन्य जमाती याच समूहात मोडतात. आर्य ज्यांना अनस, दास, दास्य आणि निषाद म्हणत ते हेच लोक होत. या सर्व संज्ञा मानहानीकारक आहेत. मंगोलाईड समूह या दोन शाखांमध्ये विभागाला गेलेला दिसतो. हिमालयातील आणि उत्तरपूर्व भागातील वन्य जमाती मंगोलाईड वंशाच्या आहेत. आसाम, पश्चिम बंगाल, मणिपूर आणि त्रिपुरा या पूर्वेकडील राज्यात वन्य नसलेल्या जमातीतही मंगोलाईड वंशाची लक्षणे दिसतात. हे वांशिक समूह भारताचे आद्य रहिवाशी असावेत असे मत श्यामचरण दुबे यांनी व्यक्त केले.

वरील वंशिक वर्गिकरणावरून असे दिसते की भारतीय समाजात जे विविध समूह आढळून येतात किंवा भारतात आढळणारे लोक हे रंग, उंची, चेह-याची ठेवण, डोळे व केस रचना या बाबतीत मोठया प्रमाणावर भिन्नता दिसते. भारतातील पूर्व, पश्चीम, उत्तर व दक्षीण या

चारही भागातील लोक हे एक-मेकांपासून अतिशय भिन्न असलेले दिसतात. त्यांच्यात देहीक पातळीवरून सांस्कृतिक पातळीत बरेच फरक आहेत.

"सर हर्बर्ट रिस्ले यांनी भारतीय वांशिक समूहांचे शारिरीक वैशिष्टये लक्षात घेऊन भारतामध्ये सात मानववंश असतात असे मत प्रतिपादन केले आहे. हे गट किंवा समूह पुढील प्रमाणे आहेत."[२४]

### १) इंडो आर्यन-

या वंश गटाची शारिरीक वैशिष्टये अशी असतात अ.डोबे-लांब, ब. नाक अरूंद क. रंग उजळ ड.उंची उंच इ. डोळे काळे व ई. केस भरपूर या शारिरीक वैशिष्टयाचे लोक पूर्व पंजाब, कश्मीर व राजस्थान या भागांत आढळतात. राजपूत, खत्री, जाट हे लोक यांचे चांगले प्रतिनिधी आहेत. भारतातील ७५ टक्के लोक या वर्णनाचे आढळतात.

### २) द्रविडीयन-

या गटाची शारिरीक वैशिष्टये- अ. डोके लांब, ब. नाक-रूंद क. रंग-अगदी काळा, उंची बुटके इ. डोळे-काळे व ई.केस कुरळयात जमा होणारे या शारिरीक वैशिष्टयांचे लोक दक्षिण भारतात आढळतात. विशेषत: तमीळनाडू, हैद्राबाद, दक्षिण मध्य प्रदेश व छोटा नागपूर, दक्षिण भारतातील पनियन व छोटा नागपूर प्रदेशातील संथाल या लोकांत ही द्रविडीयन वैशिष्टये पुरेपूर प्रमाणात आढळतात. भारतातील मूल लोकांत यांचा समावेश होतो. भारतातील २० टक्के लोक या वंशाचे आहेत.

### ३) मंगोलाईड-

या वंशाच्या गटाची शारिरीक लक्षण खालीलप्रमाणे आहेत. अ. डोळे-रूंद, ब-नाक रूंद नाकात जमा क. रंग काळा पण पिवळसर झाक ड.उंची गिट्टे इ.डोळे, पापणीवर एक कानयाचा जादा पडदा व ई.केस विरळ. भारतात हिमालयालगतच्या पट्टयात हे विशेषकरून आढळतात. नेपाळ, भूतान, सिक्कीम, ब्रम्हदेश व आसाम या भागात या वर्णनाचे लोक आहेत. कुलू खो-यातील कानेर व दार्जिलिंग मधील लैपचया लोकांत ही शारिरीक वैशिष्टये आढळतात.

**४) आर्य द्रविड-**

या वंशाची शारिरीक लक्षणे अ.डोके-लांब पण मध्यम मस्तकाकडे झुकणारे, ब. नाक-मध्यम प्रकारचे पण रूंद ही आढळते क.रंग-हलक्या तपकीरी रंगापासून काळ व ड.उंची कमी, भारतातील उत्तर प्रदेश, बिहार व राजस्थानचा काही भाग यामध्ये हे लोक आढळतात. यांना हिंदूस्थानी पध्दतीचे लोक म्हणतात. आर्य व द्रविड यांच्या संयोगातून हा वंश निर्माण झाल्याचे मानले जाते.

**५) मंगोलो-द्रविडियन-**

या वंशातील लोकांचे शारिरीक लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत अ. डोके-रूंद व गोल, ब.नाक -मध्यम प्रकारचे पण रूंदपणाकडे कल क. रंग-काळा ड.उंची मध्यम पण गिड्डे व केस भरपूर चेह-यावर अधिक. बंगाल व ओरीसा मध्ये या वंशाचे लोक आढळतात. बंगाली ब्राह्मण, कायस्थ व मुसलमान लोकांमध्ये ही शारिरीक वैशिष्टये आढळतात. मंगोलीयन द्रविडीयन वंशाच्या संयोगाने हा वंश तयार झाला आहे.

**६) सिथो-द्रविडीयन-**

या वंशाची शारिरीक वैशिष्टये खालील प्रमाणे अ.डोके रूंद ब. नाक-पातळ क.रंग-उजळ ड. उंची मध्यम इ. केस-विरळ मध्य प्रदेश, सौराष्ट्र व कूर्ग भागातील जंगल पटट्यात हे लोक आढळतात. सिंथो वंशाची लक्षणे या भागातील उच्च जातीत आढळतात तर द्रविडीयन लोकांची लक्षणे या भागातील कनिष्ठ जातीत आढळतात.

**७) तुर्की-इरानियन-**

या वंशाच्या लोकांची लक्षणे अ.डोक-रूंद ब.नाक-लांब पण अखंड, क.रंग उजळ ड. उंची-सर्वसामान्य सरासरी पेक्षा अधिक इ.केस-विपूल केस ई.डोळे काळे व करडे अफगाणिस्तान बलुचिस्तान या भागातील लोकांत ही लक्षणे आढळतात.

"डॉ.बी.एस गुहा यांचे (वर्गीकरण) भारतीय वांशिय समूहांबाबतचे वर्गिकरण-डॉ.गुहा यांनी भारतातील लोकांचे ६ प्रमुख प्रकारांत व ९ उपप्रकारांत वर्गिकरण केलेले आहे. हे प्रकार पुढील प्रमाणे आहेत."[२५]

**१.निग्रीटो-**

डोके मध्यम, गोल व लांबही आढळतात नाक-रूंद व चपटे, रंग काळा, उंची-५ फुटांपेक्षा कमी, केस कुरळे व वेटोळे युक्त-लोकरीसारखे या वंशाचे लोक केवळ आदिमांमध्येच आहेत. वायव्य भारतातील अंगामी नागा व दक्षिण भारतातील कादिर, पलियन, इरूला या लोकांत ही वैशिष्टये आढळतात.

**२.प्रोटो-ऑस्ट्रोलॉईड-**

लांब डोळे, नाक-चपटे व रूंद तपकीरी पासून पूर्ण काळा, उँची गिड्डे, केस कुरळे पण लोकरी सारखे नाहीत आणि ओठ-मांसल या वंशाचे लोक विशेषकरून भारतातील आदिमांपैकीच आहेत. दक्षिण व मध्य भारतातील आदिवासींपैकीच आहेत. दक्षिण व मध्यभारतातील आदिवासींमध्ये ही शारिरीक लक्षण आढळतात.

**३.मंगोलॉइड-**

या वंशाची लोक सपाट चेहरा, लक्षणीय हनुवटी, डोळे बदामा सारखे तिरकस पापणीवर अधिक पडदा, केस विरळ, ईशान्य चिन मधून या वंशाचे लोक तिबेटमध्ये आले व नंतर भारतात सरकले. आसाम, बंगाल भागात या वैशिष्टयाचे लोक आढळतात. यातील पॅलेमंगोलाईड वंशाचे लोक ईशान्य भारतात आढळतात. सेमानागा हे त्यांचे प्रातिनिधीक उदाहरण होय. रूंद डोक्याचे मंगोलाईड, पूर्व बंगाल दार्जिलिंगमधील लोपचा यामध्ये ही वैशिष्टये आढळतात. सिक्कीम व भूमान भागात, निबेटो मँगोलाईड आहेत.

**४.मेडिटरेनीयम-**

या लोकांच्या शारिरीक वैशिष्टयात डोके, लांब, उंची मध्यम, रंग अगदी काळा, बांधा मध्यम ही वैशिष्टये भारतातील आदिवासी सोडून इतर लोकांत आढळतात.यामध्ये पॅलिमेडिटरेनियम, मेडिटरेनीयम पौर्वात्य असे प्रकार आढळतात.

**५.रूंद डोक्याचे लोक-**

हे लोक डोंगरभागात आढळतात. डोंगरावरील हवामान, डोक्याच्या विकासासाठी पोषक असते. हैद्राबाद व तिन्रे खो-यात हे लोक दिसून येतात. याचेच अल्पिनौईड, डिनारीक व आर्मेनाईड असे तीन उपप्रकार आहेत.

**६.नॉर्डिक-**

या वंशातील लोकांची शारिरीक वैशिष्टये डोके-लांब, भव्य कपाळ, चेहरा लांब, हनुवटी लक्षणीय केस मध्यम बांधा, रूंद उजळया वर्णनाचे लोक हे परकीय आहेत. पश्चिम भारत व बंगाल या भागात हे लोक आढळतात

समूहांच्या वरिल वर्गीकरणांवरून असे दिसून येते की भारतीय समाजात अनेक वांशिक समूह दिसून येतात. रंग, डोक्याचा आकार, डोळे, उंची या शारिरीक लक्षणांवरून त्यांचे भिन्न गटांत विभाजन झाल्याचे दिसून येते. भारतात आढळणा-या अनेक भटक्या आणि विमुक्त जमातीत वरिल वांशिक समूहांची लक्षणे आढळून येतात.सदर संशोधनासाठी अभ्यासत असलेली पारधी या जमातीचे लोक मूळचे राजस्थानमधील असल्याने व राजस्थान प्रांतातील लोकांचे शारिरीक गुणधर्म हे सर हर्बर्ट रिस्ले यांनी वांशिक समूहांचे जे वर्गिकरण केले आहे त्यात इंडो आर्यन या वंशिक समूहात हे लोक मोडतात.

## १.३.३ आदिवासी समूहांची वैशिष्टये-

भारतीय समाजात आदिवासी समूहांचे वेगळेपण हे त्यांच्यात आढळणा-या लक्षणावरून दिसून येते. आदिवासी समाजाची एक विशिष्ट जिवणशैली व सांस्कृतिक वेगळेपणाने हा समाज इतर समाजापेक्षा किती व कसा भिन्न आहे हे दिसून येते. हे भिन्नत्व जाणून घेण्यासाठी आपण "गुरूनाथ नाडगोंडे यांनी आदिम समाजाची काही वैशिष्टये सांगितलेली आहेत."[२६]

**१.विशिष्ट भू-प्रदेश-**

कोणताही समाज हा एक प्रादेशिक समूह असतो. प्रत्येक समाजाचे हे प्रभेदक लक्षण आहे. त्याविना कोणताही समाज अस्तित्वात येणार नाही. आदिवासी समाजही या नियमाला अपवाद नाही. काही आदिवासी हे आजही भटक्या अवस्थेत आहेत, हे खरे उदा. जानसार, भार, नागा, कुकी, खासी, कचाटी इ.पण हे लोक जरी भटक्या अवस्थेत असले तरी सुध्दा ज्या प्रदेशात यांची भ्रमंती चालू असते, त्याच प्रदेशाला ते आपला मानतात.सर्व सामान्यपणे बाह्य संपर्कापासून अलिप्त व दुर्गम असलेल्या डोंगराळ भगात आदिम समाजाचे वास्तव्य असते. या डोंगराळ भागात बाहेरून प्रवेश करावयास रस्ते तर नसतातच पण पायवाटा देखील अगदी तुरळक असतात. नद्यानाले दाट झाडे, झुडपे व अन्य जनावरे यांचे अडथळे असतातच. जणू काही त्यांच्या भू-प्रदेशाला नैसर्गिक तटबंदी असते.

**२.प्रमाण लघुता-**

इतर कोणत्याही समाजाशी तुलना करता आदिम समाज हा अनेक बाबतीत लहान असतो. आदिवासी समाजाची विशिष्ट भू-प्रदेशावरील लोकसंख्या शे-दोनशेच्या घरात असते.थोडया लोकांचाच तो समूह असतो. ज्या विशिष्ट भू-प्रदेशावर आदिम राहतात तो भू-प्रदेश मर्यादित असतो.समाजातील संस्था मर्यादित असल्याने त्यांच्या सामाजिक संपर्काचे क्षेत्रही तितकेच लहान असते. विशिष्ट भू-प्रदेश मर्यादित लोकसंख्या इत्यादी मूळे त्यांच्या सामाजिक संपर्कावरही मर्यादा पडतात.

**३. एकाच रक्तसंबंधावर आधारीत-**

समाजातील लोक परस्परांना रक्त संबंधीत मानतात. आदिम समाजातील लोकांची उत्पत्ती एकाच पूर्वजा पासून झाली हा त्यांचा दृढविश्वास असतो हा पूर्वज कोण होता.केंव्हा झाला, याब-ल  त्यांना ज्ञान असो वा नसो पण आपला पूर्वज एक आहे ही भावना प्रबळ असते. या दृढविश्वासामुळेच त्यांच्यात विलक्षण बांधिलकी, प्रेम, आपुलकी व साहचर्य निर्माण झालेले असते.

**४.स्वत:ची बोलीभाषा व लेखन कलेचा अभाव-**

आदिम समाजातील सर्व व्यक्तींना एकत्र जोडणारा अत्यंत महत्वाचा दूवा म्हणजे स्वत:ची बोलीभाषा होय. कोणत्याही समाजाची भाषा म्हणजे त्यांचे सामाजिक संबंध, श्रध्दा, नात्या-गोत्याचे संबंध व्यक्त होतात पण त्यांची भाषा ही बोलीभाषाच असते. भाषेला लिपी नसल्याने त्यांची लोकगिते, लोककथा, म्हणी, वाक्यप्रचार, नृत्ये, कोडी, उखाणे हे साहित्य पुढील पिढीस तोंडीच हस्तांतरीत केले जाते. याचाच परिणाम म्हणजे आदिम समाजात वाङ्:मय निर्मिती आढळून येत नाही. कला, ज्ञान व धर्मशास्त्र इत्यादींची वाढ प्रगत समाजात जशी झाली तशी आदिम समाजात होवू शकली नाही. बोलीभाषेला लिपी नाही हेच याचे कारण आहे.

**५.स्वत:ची वेगळी जीवन पध्दती-**

आदिम समाजाची जीवनपध्दती इतर कोणत्याही समाजाहून अगदी वेगळी असल्याचे दिसून येते. त्यांचे सामाजिक संबंध रक्त व दर्जा यावर आधारलेले आहेत. म्हणूनच व्यक्ती-व्यक्तीचे परस्पर संबंध करारात्मक नसतात. आप्तसंबंधानाच त्यांच्या जिवनात महत्वपूर्ण स्थान असते. त्यांची सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था अत्यंत कार्यक्षम व मजबूत असल्याचे आढळते

त्यांचे रिती रिवाज, रूढी, परंपरा, धर्मश्रध्दा इत्यादींनीच त्यांचे सामाजिक जीवन नियंत्रीत झालेले असते. समान सांस्कृतीत जीवन असल्याने त्यांचे खाने-पिणे, आचार-विचार, वेश-भूषा, केश-भूषा व एकूण जीवन विषयक दृष्टिकोन यामध्ये समानता आढळून येते.यामूळे इतर कोणत्याही समाजात दिसून न येणारे सामाजिक ऐक्यभाव त्यांच्यात दिसून येतो. त्यांच्या निषेधाज्ञा व कायदा यांचे काटेकोरपणे पालन केले जाते. त्यांच्या भंग करणा-या व्यक्तीची गय आदिम समाज कधीही करत नाही.

**६.साधी अर्थव्यवस्था-**

आदिम जमातीची साधी अर्थव्यवस्था हे एक महत्वपूर्ण वैशिष्टये आहे. त्यांच्या निर्वाह-प्रधान अर्थव्यवस्थेचे उद्दिष्टे केवळ दैनंदिन गरजांची पूर्ती हेच असते. केवळ उपभोगापुरतेच उत्पादन एवढेच त्यांना ठाऊक असते. पण उपभोग्य वस्तुचेही उत्पादन इतके अपुरे असते की त्यांच्याही गरजा निटपणे पु-या होवू शकत नाही. साहजिकच वस्तुंचा संचय व वस्तुंचा विनिमय नसल्याने पैसा व बाजारपेठ यांचा अभाव त्यांच्या अर्थव्यवस्थेचे प्रमुख लक्षण बनले आहे. फायदा मिळविणे हे आधुनिक अर्थव्यवस्थेचे ध्येय आदिमांच्या अर्थव्यवस्थेत आढळून येत नाही. त्याऐवजी एकमेकांना मदत करणे व सर्वांना सहभागी करून घेण्याची प्रवृत्ती विशेषत्वाने आढळते. स्त्री पुरूषांमध्ये श्रम विभाजन आढळते. पण विशेषीकरणाचा पूर्ण अभाव आहे. आर्थिक क्रिया पार पाडतांना निसर्ग शक्तींचाच वापर अधिक करून घेण्यासाठी स्वत:च्या परिश्रमावरच हे लोक विसंबलेले असतात सारांश, कायमचा परिसर, अर्थोत्पादनाच्या साधनाचे सातत्य, जिवनाच्या किमान गरजा व त्या भागविण्यासाठी लाभलेली निसर्ग संपत्ती यामुळे त्यांचा आर्थिक जिवनात आंदोलीने न आढळता एक प्रकारची स्थिरता व समतोल अधिक आढळतो.

**७.सिमीत तंत्रविद्या-**

त्यांच्या साध्या अर्थव्यवस्थेवरून हे नि:संशयपणे स्पष्ट होते की, त्यांची तंत्रविद्या अत्यंत माफक आहे. सर्व आर्थिक क्रियांत आदिम वापरत असणारी हत्यारे व अवजारे अत्यंत अविकसित व माफक असतात. शेतीकरिता जमीनिची मशागत करण्याचे तंत्र व इतर आर्थिक क्रियांतील पध्दती जूजबी व मागासलेली असते. स्वत:च्या अनेक वर्षांच्या अनुभवातून सर्व हत्यारे स्वत:च तयार केलेली आहेत. धनुष्य बाण, मासे पकडण्याची जाळी, झोपडी, जनावरांचे व शेळया कोंबडयांचे संरक्षण करण्यासाठी बंदिस्त जागा. इतर सर्व वस्तुंचे उत्पादन तो स्वत:च करीत असतो. सारांश,

आदिमांची आसूद्ये, हत्यारे, अवजारे व त्यांच्या आर्थिक क्रियांचे स्वरूप लक्षात घेता हे स्पष्ट होते की  त्यांचे तंत्र विघात्मक ज्ञान अगदीच तोकडे आहे.

**८.समान धर्म-**

आदिम समाजातील धर्म व धर्माचरण यांना अनन्यसाधारण असे महत्व आहे. निसर्गाच्या सतत सहवासाने व निसर्गाच्या ऋतुचक्रात व इतर चमत्कार याविषयी त्यांच्या मनात निसर्गाविषयी विलक्षण आदर वास करीत असतो. निसर्ग शक्तींना ते अनन्य भावे शरण जातात. अतिमानवी शक्तींना संतुष्ट करण्यासाठी आदिम लोक, पूर्वजपूजा, भूतपूजा, देवपूजा व निसर्गपूजा करतात या अतिमानवी शक्तींना आपलेसे करून घेण्याचे काम भगत जादूटोणा, मंत्रतंत्र इत्यादींच्या सहाय्याने करू शकतो. अशी त्यांची श्रध्दा दिसून येते. आदिम समाजाच्या या श्रध्देने त्यांचा जिवन विषयक दृष्टिकोण निश्चित झालेला दिसतो. या मूळेच आदिमांचे समान धर्म हे वैशिष्टये आहे.

**९.सामाजिक एकजिनशीपणा-**

आदिवासी समाजाचे हे प्रमुख लक्षण आहे. समान बोलिभाषा, समान धर्माचरण, समान संस्कृती व समान सामाजिक नियमने यामुळे आदिमांच्या संपूर्ण आचार विचारात एकजिनशीपणा दिसून येतो. त्यांचे रितीरिवाज, धर्मश्रध्दा व परंपरा यांचा प्रभाव जनमानसांवर इतका परकोटीचा असतो की त्यांचे पालन ते अत्यंत काटेकोरपणे करीत असतात. त्यांच्या जिवनातील सर्व घटनांची चिकित्सा याच निकषांवर ते करीत असतात. या मुळे जिवनात घडणा-या कोणत्याही घटनेविषयी सर्व आदिमांची प्रक्रिया एकच असते याच लोकमनाचा प्रभाव त्यांच्या जीवनावर पडलेला असल्याने त्यांच्या आचरणात भिन्नता आढळत नाही.

वर उल्लेख केलेल्या आदिवासी समूहाच्या वैशिष्टयावरून असे दिसून येते की इतर समाजाच्या तुलनेत आदिम समाज हा भिन्न आहे. त्याच प्रमाणे हा संम्पूर्ण समाज जंगल, द-याखो-या, डोंगराळ प्रदेशात वास्तव्य करतो. त्यांना जंगल निवासच योग्य वाटतो. त्यांच्या सांस्कृतिक गुणांवरून आदिवासी व जंगल यांचा अतिशय जवळचा संबंध असलेला दिसतो. निरक्षरतेमूळे या समाजाची प्रगती खुंटलेली दिसते. आदिवासी जी बोलीभाषा बोलतात त्या भाषेला लिपी उपलब्ध नसल्याने त्यांच्या साहित्याला खिळ बसली आहे व मौखीक वाङ्:मयाचा प्रभाव या लोकांत दिसतो त्यांच्या आर्थिक जिवनाचा विचार केला तर ते जास्त प्रभावी दिसून येत नाही कारण आदिवासी हे केवळ उपभोगापुरतेच उत्पादन करतात तेंव्हा त्यांची आर्थिकता वाढण्याची शक्यता फारच कमी

दिसते. आदिवासींचे सामाजिक जिवन मात्र अतिशय परिपूर्ण असल्याचे वरील वैशिष्टयांवरून दिसते. दोन घराण्यांना एकत्र बांधणारा दुवा म्हणून ते विवाहाकडे पहातात. तसेच समाजीवनात कोणतेही संकट येवू नये म्हणून ते धर्माचरण, व जमातीच्या नियमांचे पालन अतिशय काटेकोर पणे करतांना दिसतात.उपरोक्त वैशिष्टयावरून आदिवासींच्या जिवना विषयी माहीती प्राप्त होते.

### १.३.४ भारतातील आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक समस्या

- **भारतातील आदिमांचे प्रश्न**'' [२७]

सर्वसाधारपणे भारतातील आदिमांचे प्रश्न दोन प्रकारचे आहेत. त्यातील एक प्रकार म्हणजे आदिमांच्या पारंपारिक जीवन पध्दतीने निर्माण केलेल्या समस्या होय.त्यांच्या जीवन पध्दतीचे हे अंगभूत प्रश्न आहेत तर त्यांच्या जीवनात नवीन समस्यांची निर्मिती इतर सांस्कृतिक संपर्काने झालेली आहे. तेव्हा इतर सांस्कृतिक संपर्कातून आदिम जीवन ढवळून निघत आहे व त्यातून निर्माण होणा-या समस्यांचा प्रकार व त्याचे स्वरुप वेगळे आहे.म्हणून त्यांच्या समस्यांची उगमस्थाने लक्षात घेऊनच आदिमांच्या समस्यांच्या ऊहापोह केला पाहिजे. आदिमांच्या प्रश्नांचे जटिल स्वरुप यावरुप स्पष्ट होणार आहे. त्यांच्या दुर्गम निवासस्थानांपासून निर्माण झालेले प्रश्न व त्यात इतर समाजाच्या संपर्कातून निर्माण झालेल्या प्रश्नांची भर यामुळे आदिमांचे प्रश्न जितके साधे असावेत असे वाटतात तितके ते नाहीत याची सहज कल्पना येईल. आदिमांच्या समस्येची सर्वंकष कल्पना येण्यासाठी त्यांच्यापुढील समस्यांचे प्रकार खालीलप्रमाणे सांगता येतात.

अ ) आर्थिक समस्या,

ब ) सामाजिक व सांस्कतिक समस्या,

क ) प्रतिकूल शासनामुळे निर्माण झालेल्या समस्या व

ड ) आरोग्य विषयक समस्या

**अ ) आर्थिक समस्या** -

भारतातील आदिम समाजाची आर्थिक समस्या ही मूलभूत व महत्वपूर्ण आहे. रोटी, कपडा व मकान याच मूलभत गरजांच्या पूर्तीसाठी सबंध मानवी जमातीची धडपड चाललेली असते. व्यक्तींचे व समुदायाचे अस्तित्व याच आर्थिक गरजांच्या पूर्तीवर अवलंबून असते. किंबहुना मानवी समाजाची आजची सर्वंकष प्रगती प्राथमिक गरजांच्या पूर्तीनंतर झालेली आहे. पोटात ओरडणारे

कावळे शांत झाल्याविना काव्य निर्माण होत नाही, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. या वरुनच सर्व सुधारणांचा आधार शैक्षणिक व प्राथमिक शिक्षणातील सुधारणा आहे, असे कोणताही उत्साही सुधारक निश्चितपणे म्हणेल याबदद्ल वाद असावयाचे कारण नाही. पण वारल्यांच्या सारख्या आदिमांच्या बाबतीत भाकरीचा प्रश्न त्या आधी सोडविला पाहिजे. भुकेची नैसर्गिक गरज प्रथम भागविली पाहिजे. ज्या लोकांना दोन वेळेला पोटभर भाकरी मिळत नाही त्यांच्या विषयी साक्षरता हा अवास्तव विषय होईल.

महाराष्टातील सहयाद्री पर्वतातील ठाकूर लोक वर्षातून ४ महिने दोन वेळेला कसेबसे जेवू शकतात. बाकीचे सर्व दिवस बोरी, करवें, झाडपाला यावर ते काढीत असतात.गुजरातमधील भिल्ल लोकांचे उदाहरण तर अधिक विदारक आहे. जीवन निर्वाहाच्या साधनांचा अभाव व त्यांच्या मूलभूत गरजांकडे प्रशासकांनी केलेले अक्षम्य दुर्लक्ष याचमुळे भिल्ल लोकांना चोरी, दरोडा यांचा आसरा घ्यावा लागला. भिल्ला सारखे सरळ मार्गी आदिवासी गुन्हेगार जमात झाली याचे कारण दारिद्रय आहे, हे अमान्य करता येत नाही. तेव्हा आदिमांच्या अधिक प्रश्नांवर विशेष गांभीर्याने विचार व्हावयास हवा. हे आर्थिक प्रश्न खालीलप्रमाणे सांगता येतात.

**१) स्थानांतरित शेती -**

आदिवासींच्या जीवनपध्दतीतून निर्माण झालेली ही समस्या आहे. लोकांकडे जाळून निर्माण झालेल्या राखेच्या गादीत भोके पाडून बी-बियाणे टाकून शेती करण्याची ही पध्दत अतिमागासलेली आहे, यात काहीच शंका नाही. यातून येणारे उत्पन्न अती-तुटपुंजे असते. त्यांच्या दारिद्रयाचे हे कारण आहे. भारतातील पहाडिया,बैगा,बिरहोर, कोरवा हे लोक नांगरणी करीत नाहीत. आजही त्यांच्यामध्ये स्थानांतरित शेती रुढ आहे. त्याचबरोबर या पध्दतीने विलक्षण जंगलतोड होऊन बनसंपत्ती नष्ट होत आहेच. शिवाय जमिनीची धूप होऊन कोरडी पडते. जमिनीचा कसही त्यामुळे कमी होतो. त्याचमुळे आदिमांचा शेतीसाठी नवीन जागा पाहावी लागते.

**२) जमीन मालकी व जंगलसंबंधी समस्या** -

सुरुवातीला संपूर्ण जंगलावर आदिमांचा अधिकार होता. ते जंगलचे अनभिषिक्त राजे होते.त्यांच्या इच्छेप्रमाणे ते जंगलातील कोणतीही जागा निवडीत व तेथील जंगलतोड करुन त्यांच्या पध्दतीप्रमाणे ते शेती करीत. पण जंगलविषयक कायदे केल्याने आदिमांच्या जंगलविषयक

अनिर्बंध स्वातंत्र्यावर मर्यादा आली. आदिवासींना अनुकूल व्हावेत असे या कायदयाचे स्वरुप नाही. त्यामुळे बहुसंख्य आदिमांना त्याची झळ लागलेली आहे.

त्याच बरोबर जंगलमधील नैसर्गिक वस्तूंचाही उपभोग आदिम आता घेऊ शकत नाहीत. जंगलातील पशूंची शिकार करणे, दारु गाळणे, मध गोळा करणे व इतर जंगलातील वस्तू गोळा करणे इत्यादींवर जंगल कायदयांनी निर्बंध निर्माण झाले आहेत. अर्थात यामुळे आदिमांचे आर्थिक स्वातंत्र्य तर संपलेच पण त्यांच्या कष्टात भर पडली. हे जाणूनच छोटा नागपूर मधील आदिम- बैगा, गोंड, कोरकू, भिल्ल इत्यादी जमातींबाबत सरकारने आपले धोरण सौम्य केलेले आहे. पण तरीसुध्दा जंगल कायदयाने त्यांच्या आर्थिक जीवनावर विपरीत परिणाम केलेला आहे, हे अमान्य करता येत नाही.

**३) मुद्राप्रधान अर्थव्यावस्था व कर्जबाजारीपणा** -

जंगलकायदयाप्रमाणे आदिमांच्या जीवनावर दूरगामी परिणाम करणारी दुसरी बाब म्हणजे पैशाच्या अर्थव्यवस्थेचा जन्म होय. आदिवासी जमातीत वस्तूंची देवणा-घेवाण होत असे. पण पैशाच्या अर्थशास्त्राने त्यांच्या बंदिस्त व स्वतंत्र जीवनावर सरळ सरळ आक्रमण केले. अत्यंत अज्ञानी व डोंगरकपा-यांत जगापासून दूर राहणा-या आदिमांच्या समस्यांत त्यामुळे भरच पडली. व्यापारी , महाजन, सावकार यांनी त्यांच्या अज्ञानाचा पुरेपूर फायदा उठविला व एक प्रकारचे आर्थिक शोषण चालू केले. सहकार्यावर आधारलेली त्यांची वस्तुंची देवाण-घेवाण पध्दती मागे पडून पैशाची अर्थव्यवस्था आदिम जीवनात डोकावू लागलेली आहे.

**४) व्यापारी दलाल**-

सावकार यांनी आदिमांना कर्ज कर्दमात पूर्णपणे बुडविले. भरमसाठ व्याजाने कर्ज देऊन आदिमांच्या जमिनी पूर्णपणे गिळंकत केल्या. पैसे उसनवार देताना सावकार त्यांच्यावर विपरीत अटी घालीत व कर्ज घेणारे आदिम हे सावकारांचे जवळ जवळ गुलाम होत. अगतिक व असाहाय्य असलेल्या आदिवासींची अवस्था भूमिहीन मजुरासारखी झाली.

**५) जंगल कामगारांचे शोषण** -

जंगल कंत्राटदार झाडे तोडण्यासाठी आदिमांना मजूर म्हणून कामाला लावतात.हे कंत्राटदार स्वत:च्या अपरिमित नफयासाठी आदिमांचे शोषण करु लागले. आपल्याला हमखास मजूर मिळावेत म्हणून गरजू आदिमांना अगोदर पैसे देऊन त्यांना बांधून टाकीत. पठाणी पध्दती

वापरुन आदिमांना सक्तीने काम करावयास लावीत. त्याचबरोबर जंगलतोडीच्या, गाडीवाहतुकीच्या व कोळसा वाहतुकीच्या कामाचा हिशेब आदिमांना ठेवता येत नाही. तेव्हा हे कंत्राटदार त्यांना हातोहात फसवतात. जंगल कंत्राटदाराचे धूर्त गुमास्ते यांनी केलेले हिशेब आदिमांना समजत नाही.

**६) जमिनीचे हस्तांतरण** -

आदिवासी अगतिक, असाहाय्य व अज्ञानी असल्याने त्यांच्या या स्थितीचा गैरफायदा धूर्त जमीनदार व सावकार यांनी उठविलेला आहे. स्वभावाने साधे भोळे व त्यात कायदयाचे अज्ञान यामुळे सावकारांनी आदिम कुळांना हुसकावून लावले व त्यांच्या जमिनी आपल्या पदरात पाडून घेतल्या. संथाळ, उराँव, मुंडा, वारली समाजातील अनेक आदिवासींनी आपल्या जमिनी हरवल्या आहेत.

**७) वेठबिगारी पध्दती** -

आदिमांच्या आर्थिक शोषणाचा हा प्रकार अजूनही अस्तित्वात आहे. जमीनदार आदिमांकडूनच आपल्या जमिनीची मशागत करून तर घेतात. सर्व दष्टींनी सोयीची जमीन ते आपल्यासाठी ठेवून बाकीची जमीन ते आदिमांना खंडाने लावतात. भरमसाठ खंड वसूल करणे व सक्तीने मोफत अगर अगदी माफक मोबदल्यात काम करवून घेण्याची वेठबिगारी पध्दती प्रचलित आहे. श्रीमती गोदावरी परुळेकर यांनी जेव्हा माणूस जागा होतो. या पुस्तकात वेठबिगारी पध्दतीविरुध्द बंड करणा-या वारली लोकांचा कसा अमानुष बंदोबस्त करीत असत याची अनेक उदाहरणे सांगितलेली आहेत. कोळशाच्या भटट्रीत त्यांना जाळल्याची उदाहरणे आहेत. सारकारांच्या व जमीनदारांच्या आवाराचे रक्षण करणारे आवारी म्हणजे हे वारली कातकरी असे आदिवासी असत. अर्थातच या पध्दतीने त्यांच्या आर्थिक जीवनावर अनिष्ट परिणाम झालेला आहे.

सावकाराच्या घरी जाऊन त्यांचे कपडे धुणे, भांडी घासणे, त्यांच्या समारंभात रात्रंदिवस खपणे, जंगलातील लाकूड गोळा करुन ती फोडून सारकाराच्या घरी पोचती करणे इत्यादी कामे वेठपध्दतीनेच त्यांना करवी लागतात. काही वेळेला जे पैसे उसने घेतलेले असतात. त्याची परतफेड पैशाच्या रुपात त्यांना करणे शक्य नसते. तेव्हा आदिम त्याची फेड कामाच्या रुपात करतात. पण कित्येक पिढया सावकाराच्या घरी काम करुनही हे कर्ज फिटत नाही, हे मोठे दुर्दैव आहे.

**८) कुळकायदयाचे परिणाम** -

आदिमांच्या आर्थिक जीवनावर कुळकायदयाने अनिष्ट परिणाम केलेले आहेत. किंबहुना त्यांना पूर्ण त-हेने नागवे करण्याचे हे पध्दतशीर साधन जमीनदार व सावकारांना लाभले. न्यायालयीन पध्दती व भाषा आदिमांना अजूनही कळत नाही. आपली जमीन ही केवळ आपली आहे, ती कोणीही काढून घेवू शकत नाही. अशी समजूत आदिमांची होती. पण जमिनीच्या मालकीविषयक ब्रिटिशांनी केलेले कुळकायदे व जमीन महसूल कायदे यामुळे आदिमांचे आर्थिक जीवन अत्यंत कष्टमय झाले. सावकारांनी त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्या जमिनी हडप केल्या.

**८) औदयोगिक क्षेत्रातील आदिम प्रश्न -**

आधुनिक उदयोगधंदयांचे जाळे वाढता वाढता दुर्गम परिसरात राहणा-या आदिमांनाही त्याचा स्पर्श झालेला आहे. त्यांच्याच परिसरात चालू झालेल्या खाणीत अगर मळयात आदिम काम करण्यास जाऊ लागले खरे, पण तेथेही त्यांचे शोषण चालू आहे. ठेकेदार त्यांच्याकडून भरपूर काम करवून घेतो. व त्याचा मोबदला अत्यंत अल्प दिला जातो. आसाममधील चहा, कॉफीच्या मळयात राबणा-या आदिमांची ही अवस्था आहे. त्याचबरोबर त्यांना कित्येक मैल पायी चालत येऊन काम करावे लागते. याचाही परिणाम त्यांच्या जीवनावर होत आहे.

सारांश, आदिमांच्या संपूर्ण समस्यांची छाननी करताना त्यांच्या आर्थिक प्रश्नांना अग्रक्रम दिला पाहिजे, हे आर्थिक प्रश्नांच्या स्वरुपावरुन सहज कळून येते. भाकरीचा प्रश्न किती मूलभूत असतो व तो प्रश्न सतत ग्रासत असेल तर त्याच्यासाठी संपूर्ण जीवनाची किंमत अशी दयावी लागते. याचे जिवंत उदाहरण म्हणजे आदिमांचे जीवन आहे. त्यांच्या आर्थिक दैन्यावर तोडगा शोधून काढणे ही एक आधुनिक समाजाची नैतिक जबाबदारी आहे. अज्ञान, अगतिकता व असहाय्यता इत्यांदींची लूट करणे अमानुषपणाचे आहे याचे भान आधुनिक समाजाला केव्हा होणार आहे, हा एक प्रश्न आहे, पण आदिमांच्या साध्या, सरळ व निर्मळ जीवनात वादळे निर्माण करणे हा तर एक अक्षम्य गुन्हा आहे ही जाण हवीच आहे. म्हणूनच त्यांच्या पुनर्वसनाच्या कार्यक्रमात आदिमांचे आर्थिक प्रश्न मानवतेच्या दृष्टिकोणातून विचारात घेतले पाहिजेत.

**ब) सामाजिक व सांस्कृतिक समस्या** -

आदिमांच्या आर्थिक प्रश्नांची चर्चा केल्यानांतर आदिम जीवनात उभ्या राहिलेल्या सामाजिक सांस्कृतिक समस्यांचाही आढावा घेतला पाहिजे. आधुनिक समाजाचा संपर्क दिवसेंदिवस अटळ होत आहे. पण या संपर्कातूनच आदिम जीवन ढवळून निघत आहे, हे स्पष्टपणे दिसते. आधुनिक समाजाचा दुर्गंध हळूहळू आदिम समाज पूर्णपणे प्रदूषण करीत आहे. एवढेच नव्हे, तर सर्वात चिंतनीय बाब म्हणजे आदिमांच्यांत न्यूनगंडाची भावना निर्माण होऊन त्यांच्या जीवनातील काही मानवी मूल्यांचाही ते त्याग करीत आहेत. हे अध:पतन कसे थांबवावयाचे हा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. म्हणूनच आदिमांच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्यांचे स्वरुप समजून घेतले पाहिजे.

**१)संपर्क -**

आधुनिक समाजाच्या संपर्कातून आदिम जीवनात काही समस्या निर्माण झालेल्या आहेत. ब्रिटिश सत्ताधारी व श्रीमंत जमीनदार, हिंदू लोक व ख्रिस्ती धर्मप्रसारक यांचा संपर्क आदिवासी लोकांशी येऊ लागला व त्यामुळे आदिम जीवनात स्थित्यंतरे घडू लागली. ब्रिटिश लोक व श्रीमंत जमीनदार आर्थिक दृष्टीने संपन्न होते. म्हणूनच ते अधिक प्रभावी होते. त्यामुळेच वन्य जीवन जगणा-या आदिमांना बाहय जगातील लोकांबद्दल विलक्षण आदर वाटू लागला होता. आदिमांच्या मनात यांच्या बद्दल श्रेष्ठत्वाची भावना तर निर्माण झाली पण स्वत:बद्दल त्यांच्या मनात न्यूनगंडाची भावना निर्माण झाली. या संदर्भात छोटा नागपूरमधील हो लोकांचे उदाहरण अगदी बोलके आहे. शेजारच्या सभ्य लोकांच्या सहवासाने भारावून गेलेल्या हो लोकांनी आपल्या रीतिरिवाजांचा त्याग केला. आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्यासाठी त्यांनी त्या लोकांची जीवनपध्दती उचलली. यामुळे अर्थातच दोन प्रकारचे प्रश्न त्यांच्या जीवनात उभे राहिले. एक म्हणजे त्यांनी जेव्हा सभ्या लोकांच्या रीतिरिवाजांचा स्वीकार केला त्या वेळी त्यांच्या भाईबांधवांना ते दुरावले. दुसरा प्रश्न म्हणजे ज्यांच्या जीवनपध्द्तीचा स्वीकार त्यांनी केला. ते लोक आदिमांना समानतेची वागणूक दयावयास तयार नाहीत. त्यामुळे आदिमांच्यात विलक्षण न्यूनगंड निर्माण झालाच पण बरेच आदिवासी विफलतेपोटी पुन्हा परंपरागत जीवन जगू लागले. स्वाभाविकच त्यांच्या जीवनात सामाजिक व सांस्कृतिक विस्कळीतपण निर्माण झाला.

हिंदु लोक व ख्रिस्ती धर्मप्रसारक यांनी आदिमांच्या सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न केले आहेत. हिंदू लोकांबद्द्ल आदिमांच्या मनात उच्च भावना होती. त्यामुळे आदिम स्वेच्छेने

हिंदू जीवनपध्दतीचा स्वीकार करु लागले. पण ख्रिस्ती धर्म-प्रसारकरांचा हेतू जाणूनबुजून ख्रिस्ती धर्मप्रसार करणे हाच होता. अनेक ठिकाणी त्यांनी आदिमांना बाटविण्याचा चंग बांधला होता. तेव्हा या प्रक्रियेमुळे आदिम जीवन ढवळून निघू लागले. हिंदू धर्माबद्द्लच्या आदरापोटी काहींनी हिंदू जीवनपध्द्ती योग्य मानली तर ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी त्यांना प्रलोभित करुन ख्रिस्ती धर्मतत्वे स्वीकारणे भाग पाडले. याचाच परिणाम म्हणजे मूळ एकजिनसी असलेल्या आदिमांच्यात समूह निर्माण झाले. काही हिंदू धर्माचे, काही ख्रिस्ती धर्माचे, तर काही परंपरागत जीवन जगणारे. त्यामुळे त्यांची एकत्वाची भावना तर संपलीच पण त्यांच्यामध्ये कधी नव्हता तो व्देष, मत्सर निर्माण झाला. आदिमांच्या जीवनात सामाजिक व सांस्कृतिक तणाव निर्माण झाला.

बाहय संस्कृतीच्या संपर्काने आदिम जीवनात वादळी बदल होत आहेत. डॉ. मजुमदार यांनी हो व कोल्हान जमातीची उदाहरणे देऊन हे स्पष्ट केले की, जे आदिवासी आतापर्यंत समूह व सामूहिक जीवन यांना अनन्य महत्व देत होते ते आदिवासी समूहाच्या हितसंबंधाचा विचार करावयास तयार नाहीत. ते अधिकाधिक स्व केंद्रित बनत चालले आहेत.जमातींपेक्षा ते व्यक्तीला अधिक महत्व देऊ लागले आहेत. जमातीच्या भावनेपेक्षाही वर्गीय भावना त्या समाजात प्रकर्षाने दिसू लागली आहे. तेव्हा बाहय जगाच्या संपर्कात आलेल्या व त्रिशंकूसारखी अवस्था झालेल्या या आदिवासींच्या पुनर्वसनाचा प्रश्न वेगळया दृष्टीने हाताळला पाहिजे.

**२) व्दिभाषिकता** -

बाहय संस्कृतीच्या संपर्काचाच हा एक मोठा परिणाम आहे. शेजारच्या सुधारलेल्या लोकांच्या भाषेचाही स्वीकार करु लागले. पण सगळयात चिंतनीय बाब म्हणजे त्यांनी आपल्या भाषेचा त्याग केला आहे. भाषा ही प्रतीकरुप असते. प्रत्येक भाषेचे सामर्थ्य त्यातील प्रतिकात असते. त्या त्या समाजाच्या सांस्कृतिक मूल्यांचे प्रतिबिंब भाषेच्या प्रतिकात उमटत असते. त्यामुळे भाषेचा लोप होणे म्हणजे परंपरागत जीवनपध्दती हळूहळू पण निश्चितपणे नाहीशी होणे होय. साहजिकच नवीन सामाजिक व सांस्कृतिक जीवनध्दतीशी मिळतेजुळते घेणे न जमल्याने आदिमांच्या जीवनात निश्चितपणे पोकळी निर्माण झाली आहे.

**३) वेषभूषेतील बदल** -

आदिम समाजाच्या वेषभूषेतील बदल बाहय जगाच्या संपर्काचा एक दृश्य परिणाम आहे. आदिवासी लोक अर्धनग्न स्थितीतच रहात असतात. कमीत कमी कपडे वापरणे हे डोंगरकपा-यांत

वावरणा-या आदिमांना आवश्यक वाटते व आर्थिक दृष्टीने ते परवडण्यासारखेही असते. पण सुधारलेल्या जगाशी संपर्क आल्याने नखशिखांत कपडे घातलेल्या लोकांचा त्यांना हेवा वाटू लागला. त्यालाच अर्धनग्न अवस्थेत असलेल्या आदिमांकडे पाहण्याचा सुधारलेल्या लोकांचा दृष्टिकोणही उपेक्षेचा असतो. आजही वारली, कातकरी, भिल्ल, गोंड इत्यादी लोकांना जंगली किंवा लंगोटये अशी नावे ठेवली जातात. तेव्हा आदिमांनाही आपणही पूर्ण पोशाख करावा असे वाटले तर आश्चर्य नाही.त्यांनी पूर्ण पोशाख वापरण्यास सुरुवात केली. हे खरे, पण त्याला अनुषंगिक असणारी काळजी ते घेत नाहीत किंवा घेऊ शकत नाहीत. त्यामुळेच त्यांच्यापुढे समस्या निर्माण झाली आहे. रोजच्या रोज आंघोळ करणे, साबण - सोडयाने कपडे धुणे इत्यादी ते करीत नाहीत व साबण सोडा त्यांना परवडतही नाही. परिणामत: घाणेरडा कपडा सतत अंगावर राहिल्याने व आरोग्याची कमीत कमी काळजी ते घेऊ शकत नसल्याने त्यांना कातडीचे रोग होऊ लागले आहेत. कपडयांचे दुसरे जोड नसल्याने ओलेच कपडे अंगावर ठेवल्याने न्यूमोनियासारख्या रोगांना ते बळी ठरतात. तेव्हा सर्व दृष्टींनी कमीत कमी कपडे घालणे हे उष्ण भागात राहणा-या आदिमांना योग्य आहे व त्यांनी वापरण्यास योग्य असणा-या कपडयांची स्वच्छतेच्या दृष्टीने काळजी घेतली पाहिजे या बाबी त्यांच्या मनावर ठसवल्या पाहिजेत.

**४) अनिष्ट प्रथांचा शिरकाव -**

बाहय लोकांशी संपर्क आल्याने आदिमांच्या काही चांगल्या प्रथा इतिहास-जमा होऊ लागल्या आहेत. पण त्याचबरोबर बाहय जगातील अनिष्ट प्रथांचा आदिम जीवनावर शिरकाव ही चिंतनीय बाब आहे. अ] आदिवासी समाजात बालविवाहाची पध्द्ती नव्हती. पण हिंदुसमाजाच्या संपर्काने बालविवाहाची प्रथा आदिम जीवनात आली. ब] वधू-मूल्य घेण्याची पध्दत आदिमांच्यात नाही असे नाही. पण हे वधू-मूल्य केवळ प्रतीक म्हणून घेतले जात होते. त्यामुळे सामाजिक आशय होता.पण सुधारलेल्या लोकांच्या अर्थव्यवस्थेशी व समाजव्यवस्थेशी संबंधित असणारे आदिवासी वधू मूल्य पैशाच्या रुपात मागू लागले. त्यामुळे वधू-मूल्य पैशाच्या रुपात उभे करण्यासाठी आदिम अनेक मार्ग चोखाळू लागले. कर्ज काढून ते सावकारी पाशात सापडले व ज्यांना हे मान्य नाही ते आदिवासी मुली जबरदस्तीने पळवून नेऊ लागले. क] स्त्री-पुरुषांच्या संबंधांकडे त्यांची पाहण्याची दृष्टी अगदी निकोप होती. प्रेमाइतकी चांगली व महत्वाची बाब दुसरी कोणतीही नाही, असे ते मानीत. त्यामुळे विवाहपूर्व व विवाहबाहय संबंधाकडे उपहासाने ते पहात

नसत. पण आधुनिक समाजातील याविषयी असणारी संकुचित मते आदिम समाजात शिरु लागली. विवाहपूर्व व विवाहबाहय स्वातंत्र्यावर बंधने येऊ लागली. औरस व अनौरस संतती यांमध्ये भेद होऊ लागला.

**५) युवागहांचा -हास** -

आदिम समाजाच्या विघटनाचे हे प्रमुख कारण आहे. सामाजिक व सांस्कृतिक महत्व असणारी ही आदिमांची संस्था आहे. परंपरा, प्रथा व जीवनपध्दती इत्यांदीचे संस्कार नवीन पिढी तयार करुन आदिम समाज जीवनाचे अभंगत्व व सातत्य टिकविण्याचे महत्वपूर्ण कार्य युवागृहांनीच केलेले आहे हे अमान्य करता येत नाही. त्यांच्या आर्थिक कार्यातही सहभागी होण्याचे शिक्षण तरुण पिढीला मिळत राहिल्याने एका बाजूने समूहाबदद्लची बांधिलकी त्यांच्या मनात निर्माण होत होती तर दुस-या बाजूने जीवन जगण्याचे सामर्थ्य आपोआपच मिळत राहिल्याने तरुण पिढीला भवितव्याचा प्रश्न कधीच छळीत नव्हता. पण सभ्य लोकांच्या संपर्काने युवागृहात जाणे कमीपणाचे मानू लागले. शाळांमध्ये जाणारी मुले व युवागृहांकडे येईनात रेंगामा नागा तर युवागहे समाजात होती, हे मानावयासही तयार नाहीत. सारांश, युवागृहासारख्या उपयुक्त संस्थांचे पतन म्हणजे आदिम जीवनावर फार मोठा आघात आहे, यात काहीच शंका नाही, पण त्यांच्या जागी दुसरी कोणतीही संस्था अजून आलेली नाही. ही बाब अधिक चिंतनीय आहे.

**६) व्यसनाधीनता** -

मदयपानाचे व्यसन आदिम समाजात खोलवर रुजलेले दिसून येते.सिमिंग्टन म्हणतात, सर्व आदिवासी जमातच व्यसनी असते. त्यांच्या मुलांना लहानपणापासुनच पिण्याचे धडे मिळतात. कोणतीही व्यक्ती स्त्री असो वा  पुरुष असो, या व्यसनापासून वाचू शकत नाही. कुठूनही उसनवारी करुन अगर भीक मागून दारु विकत घेण्याइतके पैसे मिळाले की हे लोक दारु पितात. भिल्ल , वारली व इतर आदिवासी जमाती व्यसनाधीन असल्याने त्यातील एखादया व्यक्तीला या व्यसनातून मुक्त होणे क्वचितच शक्य होते. थोडक्यात या जमातींना व्यसनमुक्त होण्याची मुभा नसते. ज्या ठिकाणी व्यक्तीला आत्मनिर्धाराने व्यसनमुक्त होण्याचे स्वातंत्र्य असू शकते किंवा ज्या भागात व्यसनामुळे सर्व जमातीचे अध:पतन होण्याचा धोका इतका भयंकर नसतो अशा ठिकाणांपेक्षा या आदिवासी भागांत दारुबंदीची, जर ती कायदयाने घडवून आणणे शक्य असेल तर, अधिक आवश्यकता आहे असे माझे मत आहे.

सारांश, व्यसनाधीनतेमुळे आदिवासी खरोखरच अगतिक झाले आहेत. त्यामुळे तर ते दारिद्रियाच्या दृष्ट चक्रात सापडलेले आहेत. जमीनदार व जंगल कंत्राटदार तर एखादी ताडीची बाटली देऊन त्यांच्याकडून भरपूर कामे करुन घेतात. वारली जमातीत त्याला पेणी देणे असे म्हणतात. मक्तेदार तर त्यांच्या कामाच्या जागी गुत्ते उघडून त्यांना मिळणारी मजुरीही तेथेच लुटतात. तेव्हा व्यसनाधीनता ही आदिम समाजाला लागलेली कीड आहे, यात काहीच शंका नाही. मानसिक दौर्बल्य, अगतिकता, गुलामीवृत्ती , शारीरिक अनारोग्य व दारिद्रय इत्यादी सर्व प्रश्नांचे मूळ त्यांच्या व्यसनाधीनतेत आहे.

### ७) धर्म व जादू यांचा अस्त

प्रगत समाजाच्या संपर्कात आदिम जीवनावर धर्म व जादू यांचा प्रभाव कमी होत चाललेला आहे.साक्तीचे किंवा खुषीचे धर्मांतर केले जात असल्याने आदिमांचा सर्वात्मवादावरील व जादूटोण्यावरील विश्वास उडत आहे. त्याचबरोबर त्यांच्या धर्माची टर उडविण्याचा प्रयत्नही इतर लोक करीत असतात. पण यामुळेच आदिवासींसमोर काही समस्या उभ्या राहिलेल्या आहेत, याचे भान मात्र कोणाला नाही. धर्म, जादू यावरील त्यांच्या श्रध्दांचे महत्व व उपयुक्तता केवळ अनन्यसाधारण आहे. त्यांचा वैयक्तिक व सामुदायिक अडचणींचे निवारण धर्म व जादूमुळे होत होते. किंबहुना जीवनात न सुटणा-या कोडयांचा उलगडा त्यांना धर्म व जादू यांच्यामुळे होत होता. धर्म व जादूचा आसरा घेतल्याने त्यांना विलक्षण मानसिक शांती व समाधान लाभत होते. त्याचबरोबर त्यांच्या समाजातील एकता, स्थिरता व एकरुपता टिकवून ठेवण्यात धर्म व जादू यांचीच भूमिका  मोठी होती, यात काहीच शंका नाही. पण प्रगत समाजाच्या संपर्काने व धर्मांतर यामुळे आदिमांचा बुध्दिभेद होऊन त्यांच्याच मनात धर्म व जादू याविषयी विलक्षण संभ्रम निर्माण झालेला आहे. धर्माच्या आधारावर उभी राहिलेली त्यांची सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थाच कोलमडत आहे. तेव्हा धर्म व जादू यांचे व्यावहारिक मूल्य लक्षात न घेता यांच्या जीवनातून धर्म व जादू उखडून टाकण्याचे प्रयत्न अन्याय्यकारक आहेत, हे नाकारता येत नाही.

### क) प्रतिकूल शासनामुळे निर्माण झालेल्या समस्या -

आदिवासी संबंधीचे वेळोवेळी आखलेले व कार्यवाहित केलेले शासनाचे धोरण यामुळे ही आदिमांचे जीवन विस्कळीत झाले आहे. त्यांच्या जीवनातील दृढ साहचर्यावर जबरदस्त आघात झालेला आहे. आदिमांच्या गरजा नीट समजून न घेता शासनाने अवलंबिलेले धोरण हे निश्चित

सदोष होते. ठक्करबाप्पा व डॉ. मजुमदार यांनी अदिम जीवन विस्कळीत होण्याचे महत्वाचे कारण म्हणून प्रतिकूल शासनाचा उल्लेख केलेला आहे. डॉ. मजुमदार यांनी खालील मुदद् मांडले आहेत-

१) ब्रिटिश सरकारच्या जकातविषयक धोरणाने आदिमांचे दारुचे व्यसन तर वाढलेच. पण त्याबरोबर त्यांना स्वत:च्या पध्द्तीने दारु निर्माण करणे आर्थिक दृष्टीने न परवडल्याने ते दारुगुत्याकडे खेचले जात आहेत.

२) ज्या लोकांना आदिमांबददल सहानुभूती, कणव व त्यांना समजून घेण्याची प्रवृत्ती नसते अशा लोकांची नियुक्ती आदिवासी अधिकारी म्हणून झाल्याने आदिम जीवनाच्या विघटनाला वेगच आला.

३) बदलती शेती करणा-या आदिमांची जमीन कोणतीही नुकसानभरपाई न देता काढून घेण्यात आली.

४) बदलती शेती करीत असलेल्या भूप्रदेशातील वाळू, कच्चे धातू दगड गोळा करणे किंवा तेथील वन्य प्राण्यांची शिकार करणे यांच्यावर बंदी घालण्यात आली. त्यांच्यासाठी परवान्याची जरुरी निर्माण झाली.

५) बदलत्या शेतीवर बंदी घातल्याने व नांगरशेतीचे पूर्ण अज्ञान असल्याने आदिमांचे नुकसान झाले.

६) अपहरण विवाह इंडियन पिनल कोडव्दारे गुन्हा ठरविण्यात आला. त्यामुळे वधू-मूल्य देऊ न शकणा-या तरुणासमोर प्रश्नच उभा राहिला. अपहरण विवाहाची पध्द्ती वाटते तितकी भयंकर नसते, पण हा गुन्हा समजला गेल्याने आदिम समाजाचे ऐक्य व नियमनात्मक व्यवस्था धोक्यात आली.

७) आदिमांचे सण व समारंभ म्हणजे त्यांच्या परमोच्च आनंदाचे क्षण आहेत. पण त्यांची जागा आठवडयाचे बाजार व जत्रा यांनी घेतलेली आहे. पण सण व समारंभात आदिम जेवढे एकरुप होतात तेवढे जत्रा व बाजाराज होत नाहीत.

८) आदिमासींना दिले जाणारे शिक्षण व शिक्षणपध्द्ती यामुळे ही आदिमांचा काही फायदा झालेला नाही. हो लुशाई व इतर अन्य आदिमांच्या उदाहरणावरुन स्पष्ट होते की, हे शिक्षण त्यांना उपकारक नसून अपायकारक आहे. हे शिक्षण त्यांच्या मूळ संस्कृतीला अनुरुप नसते.

त्यातच पुस्तकी शिक्षण घेतलेले आदिम तरुण आपल्याच जीवनाकडे पाठ फिरवतात.

९) ब्रिटीश राज्यकर्त्यांनी सुरु केलेली न्यायालयीन व्यवस्था आदिम जीवन विस्कळीत करण्यास कारणीभूत आहे. आदिमांचे रीतिरिवाज, प्रथा व परंपरा यांचे ज्ञान नसलेले न्यायाधीश आदिमांवर विलक्षण अन्याय करतात.

१०) ख्रिस्ती धर्मप्रचारकांचा आदिमांवरील प्रभाव आदिमांना उपकारक ठरलेला नाही. त्यांना स्वधर्माचा त्याग केलाच पण ते त्याची उपेक्षा करु लागले.स्वधर्म,परंपरा, यांच्याकडे पाठ करुन त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. पण तो त्यांना मानवत नाही ही वस्तुस्थिती आहे.

**ड) आरोग्यविषयक समस्या** -

आदिमांच्या जीवनात आरोग्यविषयक समस्या कधी नव्हे इतकी गंभीर झालेली आहे.

१) प्रगत समाजाच्या संपर्कात आल्याने ते सुती कपडे घालू लागले आहेत.पण दारिद्रयामुळे अधिक कपडे त्यांना नसल्याने कपडयांच्या अस्वच्छतेने त्यांना चर्मरोग होत आहे. त्याचबरोबर ओले कपडेच त्यांना पावसाळयात वापरावे लागत असल्याने त्यांच्यामध्ये न्यमोनियाचा प्रसार होत आहे.

२) अगोदरच दरिद्री असणा-या आदिमांना नेहमीच पोटभर जेवणाची भ्रांत पडते. त्यातच सरकारने आदिम तयार करीत असणा-या दारुनिर्मितीवर बंदी घातली आहे. मांस-मासे, ताडामाडाची व तांदळाची दारु यामुळे त्यांना ब व क जीवनसत्वे मिळत होती. पण यावर बंदी घातल्याने ते जीवनसत्वाला तर मुकलेच पण त्याचबरोबर कारखान्यात तयार झालेल्या अधिक मादक व अपायकारक दारुने आदिम शरीरावर अनिष्ट परिणाम होऊ लागले आहेत.

३) आदिम जीवनात प्रचलित असणा-या काही श्रध्दा तर अगदीच अनिष्ट आहेत. त्यामुळे डॉक्टर व उपचाराची सोय काही आदिम जमातींत उपलब्ध असून सुध्दा आदिम त्यांचा उपयोग करुन घेत नाहीत.उदा. अ] बाईला दिवस गेले की तिला औषध कटाक्षाने दिले जात नाही. मग तिला रक्तक्षय, रक्तदाब किंवा कावीळ इत्यादी आजार झाले असले तरी औषधाची उपाययोजना केली जात नाही. ब] लहान मुलाला एक वर्षभर पाणी पाजावयाचे नाही. क] मुलाला गोवर झाला की, त्याला मांत्रिकाकडून डागून आणावयाचे.

४) औदयोगिक क्षेत्राच्या आसपास राहणा-या आदिमांवर प्रगत समाजाच्या संपर्काने आणखी एक भयंकर आरोग्यविषयक आपत्ती आलेली आहे. आदिमांच्या गरिबीचा फायदा आदिम

स्त्रियांना वेश्यावृत्तीचा स्वीकार करण्यास भाग पाडले जात आहे. त्यामुळे आदिम स्त्रियांमध्ये गुप्त रोगाची लागण लागलेली आहे. तोडा समाजातील स्त्रियांचा संबंध गो-या लोकांशी आल्याने तोडा स्त्री गुप्तरोगाला बळी पडलेली आहे.त्याचबरोबर सावकार,दलाल, व्यापारी, जंगल अधिकारी आदिवासी स्त्रियांना शरीर बहाल करण्यास प्रवृत्त करतात. तेव्हा वेश्यावृत्ती व गुप्त रोग ही आधुनिक समाजातील कीड आदिम जीवनातही डोकावली आहे.

सारांश, आदिम जीवनातील समस्यांचे स्वरुप किती जटील आहे, हे यावरुन दिसून येते. दुर्गम निवासस्थान व पारंपारिक श्रध्दा यावर आधारलेल्या त्यांच्या जीवनातून काही समस्या निर्माण झालेल्या आहेत. पण त्यांच्यावर धर्म व जादू या प्रभावी साधनांच्या सहाय्याने आदिमांनी मात केलेली आहे. त्यांच्या जीवनामध्ये वादळे व अशांती निर्माण झाली ती प्रगत समाजाच्या संपर्काने, हे नाकारता येत नाही. प्रगत जीवनाला लागलेले शाप आदिम जीवनालाही लगटावेत हे खरोखरीच दुर्दैवी आहे. त्यातच ज्या ज्या राज्यकर्त्यांनी भारतावर राज्य केले त्यांनी आदिमांच्या कल्याणाकडे तर दुर्लक्ष केलेच, पण त्यांची अक्षम्य उपेक्षाच केली. दारिद्रयाच्या मगरमिठीत सापडलेल्या आदिमांचे दुर्दैवी व दैन्य जीवन सुधारण्याचा कोणी मनापासून प्रयत्नच केला नाही. त्यांच्या प्रथा, परंपरा प्रगत समाजालाही आदर्शभूत ठराव्यात अशी सामूहिक जीवनपध्दती, संगीत ,नृत्य, लाकूड, दगड, शिंगे यावरील नक्षीकाम, अत्यंत सुबक असे हातमागाचे कापड तयार करण्याचे कसब जिवंत ठेवण्याचे प्रयत्न कोणीही केले नाहीत. उलट सब घोडे बारा टक्के हे सूत्र धरुन जे धोरण राज्यकर्त्यांनी अवलंबिले त्याने आदिम समाजावर उपायच अधिक झाले आहेत. प्रगत समाजाची शिक्षणपध्द्ती आदिमांना कोणत्याही दृष्टीने अनुरुप नसतानाही या शिक्षणपध्दतीचा आग्रह धरणे हे खरोखरच अन्यायकारक आहे. या शिक्षणाने त्यांच्या अंधश्रध्दा तर नष्ट झाल्या नाहीतच पण त्यामुळे त्यांच्या मनात आपल्या संस्कृती व परंपराबददल अप्रीती व अनादराची भावना निर्माण झाली. म्हणूनच ठक्करबाप्पांनी आदिमासींच्या समस्या, दारिद्रय, दुर्गमता , अज्ञान, अनारोग्य, सदोष शासन व नेतत्वाचा अभाव सविस्तर विशद करुन म्हटले आहे की, कितीतरी शतके दुर्लक्षित झालेल्या भारतातील आदिमांच्या समस्यांकडे त्वरित लक्ष दिले पाहिजे. भारतातील इतर नागरिकांच्या पातळीवर आदिमांना आणण्यासाठी आदिमांची सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात वेगाने प्रगती व्हावी म्हणून परिणामकारक उपाययोजना केल्या पाहिजेत. म्हणून वन्य भागात व इतर भागात राहणा-या आदिमांच्या विकासाकडे लक्ष देण्याची अगदी गरज आहे.

आदिवासींच्या उपेक्षेचे व अवहेलनेचे दिवस आता संपविले पाहिजेत. विश्वबंधुत्वाचा महामंत्र जपणा-या आधुनिक समाजाने कणवेपोटी का होईना पण आदिमांकडे लक्ष पुरविले पाहिजे. आजच्या युगात अंधारात राहणा-या व काळवंडून गेलेल्या आदिम जीवनाबददल आस्था न वाटणे हा एक नैतिक गुन्हा आहे. व्यक्ती मग खेडयातील असो अगर शहरातील असो-तिला आपला समाज सोडून दुसरा समाज कोणत्या परिस्थितीत राहतो याविषयीची माहिती नसेल तर ती व्यक्ती पुरेशी सुशिक्षित आहे, असे म्हणता येत नाही. सारांश, आदिमांच्या समस्या मानवी दृष्टिकोणातून समजून घेऊन त्यावर उपाय- योजना करणे ही काळाची गरज आहे.

## १.३.४ ) "आदिवासी कल्याण कार्यक्रम "[२८]

भारतीय आदिवासींच्या विविध समस्या ब्रिटिश शासनकाळात स्पष्ट झाल्या होत्या. ब्रिटिश राजवटीत भारतीय आदिवासींच्या काही कल्याणाकडे ब्रिटिश शासनकर्त्यांनी जरी दुर्लक्ष केले असले तरीही भारतीय आदिवासींच्या काही कल्याण कार्यक्रमांचा प्रारंभ याच काळात सुरु झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासी कल्याणासाठी काही ख्रिश्चन मिशन-यांनी उल्लेखनीय कार्य केले, हे मान्य करावे लागते. तसेच महात्मा गांधींकडून प्रेरणा घेऊन अनेक समाजसुधारकांनी आदिवासींचे प्रश्न सोडविण्यात हातभार लावला आहे. इ.स. १९२२ मध्ये कै. ठक्करबाप्पा यांनी गुजरातमध्ये भिल्ल सेवा ही संस्था स्थापन केली. त्याचबरोबर श्रीमती गोदूताई परुळेकर यांनी आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. थोडक्यात, स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी बिन सरकारी पातळीवर तुरळक स्वरुपाचे प्रयत्न झाले. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र आदिवासींच्या कल्याणकारी अनेक योजना सरकारने सुरु केल्या आहेत. त्यांची माहिती खालीलप्रमाणे -

### १) आदिवासींच्या कल्याणासाठी घटनात्मक तरतुदी

आदिवासी जमातींच्या संरक्षणासाठी राज्यघटनेने आदिवासींना देशातील इतर नागरिकांप्रमाणे समान दर्जा प्राप्त करुन दिला आहे. वेठबिगारी पध्दती घटनेच्या २३ व्या कलमानुसार बेकायदेशीर ठरविली. व्यक्तींना धार्मिक स्वातंत्र्य व आदिवासींच्या शैक्षणिक व सांस्कतिक हक्कांची जपणूक केली आहे. लोकसंख्येच्या आधारावर राखीव किंवा सुरक्षित मतदार संघाच्या तरतुदींमुळे आदिवासी प्रतिनिधी विधानसभेत व लोकसभेत आदिवासींचे प्रश्न मांडू शकतील.

ओरिसा, बिहार व मध्य प्रदेश या तीन घटक राज्यांमध्ये आदिवासींची लोकसंख्या बरीच जास्त आहे. म्हणून या तीन घटक राज्यांमधील कोणत्याही मंत्रिमंडळात आदिवासी कल्याणसाठी व विकासासाठी एक स्वतंत्र मंत्री नियुक्त करावा. घटनेच्या २४४ व्या कलामाच्या ५ व्या शेडयुलनुसार आदिवासी क्षेत्राच्या प्रशासनासाठी एक स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. घटनेमध्ये आदिवासी जमाती असणा-या राज्यात राज्यपालाला आदिवासी कल्याणासाठी सल्ला देण्याकरिता एक आदिवासी सल्लागार मंडळ नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच संविधानातील ३३५ व्या कलमानुसार आदिवासी उमेद्वारांकरिता शासकीय सेवेत काही जागा आरक्षित ठेवल्या असून त्यांच्यासाठी नोकरीतील प्रवेशासाठी वयोमर्यादेची अट शिथिल करण्यात आली आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून दहाव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत आदिवासी कल्याण कार्यक्रमासाठी कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात अमलात आलेल्या आदिवासी कल्याण कार्यक्रमाचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

**२) शिक्षण**

आदिवासींसाठी अनेक शैक्षणिक सवलती उपलब्ध करुन देणे, हे कल्याणकारी राज्यसंस्थेचे प्रमुख कर्तव्य आहे. आदिवासींच्या नवीन पिढीला शिक्षण मिळावे व त्याचबरोबर त्यांच्या व्यावसायिक शिक्षणाची सोय निर्माण व्हावी या हेतूने आदिवासी विभागांमध्ये आश्रमशाळा काढण्यात आल्या आहेत. बिहार, मणिपूर भागातील आश्रम शाळेत इलेटिकल व मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण दिले जाते. आसाम, बिहार,ओरिसा,मध्यप्रदेश,मणिपूर या भागांत आश्रमशाळां प्रमाणेच आदिवासींसाठी तांत्रिक शिक्षणाच्या शाळाही उघडल्या आहेत.

शालांत परीक्षेपर्यंत आदिवासी मुलांना पुस्तके, पोशाख, दुपारचे भोजन इत्यादींचा खर्च भागविता यावा म्हणून आदिवासी विदयार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्याची योजना शासनाने आखली आहे. ही योजना सर्वच घटक राज्यांमध्ये राबविली जाते. उच्च शिक्षणासाठी अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये काही राखीव जागा ठेवल्या आहेत. वेगवेगळया योजनांमुळे आदिवासी समाजात साक्षरतेचे प्रमाण पूर्वीपेक्षा वाढले आहे.

**३) आर्थिक विकास**

आदिवासींची आर्थिक प्रगती व्हावी यासाठी शेती, कुटीरदयोग, सहकारी संस्था, गृहनिर्माण योजना इत्यांदींचा समावेश आदिवासी कल्याण कार्यक्रमात होतो. आदिवासींच्या

शेतजमिनींचे हस्तांतरण टाळण्यासाठी शासनाने एक विधीनियम मंजूर केला आहे. या विधीनियमानुसार आदिवासींच्या ताब्यातील जमिनीची विक्री, देणगी, गहाण ठेका याबाबतचे व्यवहार बिगर आदिवासींना करता येणार नाहीत तसेच शेती व्यवसाय करण्यासाठी रासायनिक खते,बी-बियाने, शेतीसाठी लहान-मोठी अवजारे कमी किंमतीत आदिवासी शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.  कुटीरोदयोग, पशुपालन, कुक्कुटपालन, डुक्करपालन या पूरक व्यवसायांची उपलब्धता आहे. विविधघटक राज्यांमध्ये आजपर्यंत घेतलेल्या कर्जावर आदिवासींना सूट देण्यात आली. आदिवासींचा आर्थिक विकास व्हावा यासाठी सहकारी संस्थांची निर्मिती करण्यावर आदिवासी कल्याण कार्यक्रमात विशेष भर देण्यात आला आहे. तसेच आदिवासींच्या जीवनाला एक प्रकारचे स्थैर्य निर्माण करण्यासाठी त्यांची घरे व वसाहती या बाबतीत योजना आखण्यात आल्या आहेत.

### ३) वैदयकीय मदत व आरोग्य संरक्षण

पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून आदिवासींसाठी स्वच्छ पाणी पिण्याची तरतूद करण्याला अग्रक्रम देण्यात आला आहे. आदिवासींसाठी फिरते दवाखाने, मोफत औषधे, कुष्ठरोग निवारण केंद्रे, आरोग्य केंद्रे, प्रसूती केंद्रे, बालसंगोपनगृहे यांची आदिवासी क्षेत्रातील संख्या वाढविणे, यावर भर देण्यात आला.आदिवासी क्षेत्रात रस्ते बांधून आदिवासींचा इतर जगाशी संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होत आहे. आदिवासी समाजातील रंगकाम, संगीत, नृत्य, शिल्पकला इत्यांदींचे संरक्षण करण्यासाठी शासनातर्फे प्रयत्न केले जातात. तसेच आदिवासी कलांचा विकास व्हावा या दृष्टीने आदिवासी विभागात शासनसंस्थेने सांस्कृतिक केंद्रांची निर्मिती केली आहे.

**तक्ता.क्र. १.१**

**भारतातील राज्यनिहाय आदिवासींची लोकसंख्या आणि तिची टक्केवारी दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | राज्य | २०११ | | २००१ | |
|---|---|---|---|---|---|
| | | लोकसंख्या (%) | लोकसंख्या | लोकसंख्या (%) | लोकसंख्या |
| १. | जम्मु व काश्मिर | ११.९ | १४९३२९९ | १०.९ | ११०५९७९ |
| २. | हिमाचल प्रदेश | ५.७ | ३९२१२६ | ४ | २४४५८७ |
| ३. | पंजाब | ० | ० | ० | ० |
| ४. | चंदीगड | ० | ० | ० | ० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | उत्तराखंड | २.९ | ० | ३ | २५६१२९ |
| ६. | हरियाणा | ० | २८ | ० | ० |
| ७. | दिल्ली | ० | ० | ० | ० |
| ८. | राजस्थान | १३.५ | ९२३८५३४ | १२.६ | ७०९७७०६ |
| ९. | उत्तरप्रदेश | ०.६ | ११३४२७३ | ०.१ | १०७९६३ |
| १०. | बिहार | १.३ | १३३६५७३ | ०.९ | ७५८३५१ |
| ११. | सिक्कीम | ३३.८ | २०६३६० | २०.६ | १११४०५ |
| १२. | अरूणाचल प्रदेश | ६८.८ | ९५१८२१ | ६४.२ | ७०५१५८ |
| १३. | नागालँड | ८६.५ | १७१०९७३ | ८९.१ | १७७४०२६ |
| १४. | मनिपूर | ३५.१ | ९०२७४० | ३४.२ | ७४११४१ |
| १५. | मिझोराम | ९४.४ | १०३६११५ | ९४.५ | ८३९३१० |
| १६. | त्रिपुरा | ३१.८ | ११६६८१३ | ३१.१ | ९९३४२६ |
| १७. | मेघालय | ८६.१ | २५५५८६१ | ८५.९ | १९९२८६२ |
| १८. | आसाम | १२.४ | ३८८४३७१ | १२.४ | ३३०८५७० |
| १९. | पश्चिम बंगाल | ५.८ | ५२९६९५३ | ५.५ | ४४०६७९४ |
| २०. | झारखंड | २६.२ | ८६४५०४२ | २६.३ | ७०८७०६८ |
| २१. | ओरिसा | २२.८ | ९५९०७५६ | २२.१ | ८१४५०८१ |
| २२. | छत्तीसगड | ३०.६ | ७८२२९०२ | ३१.८ | ६६१६५९६ |
| २३. | मध्यप्रदेश | २१.१ | १५३१६७८४ | २०.३ | १२२३३४७४ |
| २४. | गुजरात | १४.८ | ८९१७१७४ | १४.८ | ७४८११६० |
| २५. | दमण व दीव | ६.३ | १५३६३ | ८.८ | १३९९७ |
| २६. | दादरा व नगर हवेली | ५२ | १७८५६४ | ६२.२ | १३७२२५ |
| ***२७.*** | ***महाराष्ट्र*** | ***८.८७*** | ***१०५१०२१३*** | ***८.९*** | ***८५७७२७६*** |
| २८. | आंध्रप्रदेश | ७ | ५९१८०७३ | ६.६ | ५०२४१०४ |
| २९. | कर्नाटक | ७ | ४२४८९८७ | ६.६ | ३४६३९८६ |
| ३०. | गोवा | १०.२ | १४९२७५ | ० | ५६६ |
| ३२. | लक्षद्विप | ९४.८ | ६११२० | ९४.५ | ५७३२१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३३. | केरळ | १.५ | ४८४८३९ | १.१ | ३६४१८९ |
| ३४. | तामिळनाडू | १.१ | ७९४६९७ | १ | ६५१३२१ |
| ३५. | पुड्चेरी | ० | ० | ० | ० |
| ३६. | अंदमान व निकोबार बेटे | ७.५ | २८५३० | ८.३ | २९४६९ |

**स्त्रोत :** -http://en.wiki pedia.org/wiki/phase_pardhi

भारताच्या जवळ जवळ प्रत्येक राज्यात आदिवासी राहतात. २०११ च्या जनगणेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची संख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ८.८७ टक्के एवढी म्हणजे १ कोटी ५ लाख एवढी आहे. देशाच्या आदिवासी लोकसंख्येच्या ५.१ टक्के आदिवासी हे महाराष्ट्रात आहेत. आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत पूर्वेकडील राज्ये सोडल्यास महाराष्ट्र हे मध्यप्रदेश पाठोपाठ दुस-या नंबरचे राज्य आहे.

**तक्ता.क्र.१.२**

**महाराष्ट्र राज्यातील आदिवासी लोकसंख्या ( २००१ जनगणना )**

| आदिवासी जमाती | लोकसंख्या |
|---|---|
| गौंड, राजगेंड, अररव | १५,५४,८९४ |
| ***पारधी, फासेपारधी*** | **१,५९,८७५** |
| भिल्ल, गारसिया | १८,१८,८९२ |
| महादेव कोळी | १२,२७,५९२ |
| महादेव कोळी | १२,२७,५९२ |
| वारली | ६,२७,१९७ |
| कोकण, कोकणी, कुकाना | ५,७२,१९५ |
| ठाकूर | ४,८७,४९६ |
| हल्बा, हल्बी | ६,२७,१९८ |
| महादेव कोळी | २,२३,६१७ |
| आंध | ३,७२,८७५ |
| काथोडी | २,६५,०२२ |
| कोलम | १,७३,६४६ |
| कोरकू | २,११,६९२ |
| गमित, गावित | ८६,७७६ |
| परधान, पधारी | १,२६,१३४ |

| | |
|---|---|
| ढोर कोळी | १,७०,६५६ |
| धनगर | २८,९२१ |
| धनाका वळवी | ४५,७४१ |
| नायक | २७,७८६ |
| कावर, कौर | २३,३६५ |
| दुबला, हलपती | १७,०१७ |
| नाईकडा, नायक | २७,७८६ |
| खारीमा | ५२९ |
| घोडिया | ९६३६ |
| खैरवार | ५४० |
| कोल | ५६९१ |
| कोंध, खोंद, कांध | २९३ |
| कोया, भिने कोया, राजकोया | २४१ |
| नागेसिया, नागासिया | २१७ |
| पर्जा | ४६९ |
| पटेलीया | ११९१ |
| पेमला | ६२ |
| राग्वा | ८१० |
| सावर, सावरा | २५४ |
| योटी | १९ |
| वोटोलीया, कोटवालीया, बरोडीया | ३६३ |

**स्त्रोत :** http://en.wiki pedia.org/wiki/phase_pardhi.

महाराष्ट्रात आदिवासींच्या एकूण ४७ जमाती आहेत.यापैकी २०११ च्या जनगणनेनुसार भिल्ल, गोंड, महादेव कोळी, वारली, कोकणा अणि ठाकूर, यांची एकत्रित संख्या महाराष्ट्रातील आदिवासींच्या (५३.३%) एवढी आहे. भिल्लांची संख्या सर्वात जास्त म्हणजे (२१.२%) त्यानंतर गोंड (१८.१%), महादेव कोळी (१४.३%), वारली (७.३%), कोकणा (६.७%), आणि ठाकूर (५.७ %) अशी लोकसंख्येची विभागणी आहे. महाराष्ट्रात एकूण १९ आदिवासी जमाती अशा आहेत ज्यांची संख्या १००० पेक्षाही कमी आहे. महाराष्ट्रातील तीन आदिवासी जमाती या आदिम जमाती म्हणून भारत सरकारने जाहिर केल्या आहेत. यामध्ये कोलाम (यवतमाळ

जिल्हा), काटकरी (ठाणे आणि रायगड जिल्हा) आणि माडीया गोंड (गडचिरोली जिल्हा) या जमातींचा समावेश आहे.

**तक्ता.क्र.१.३**

**महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येतील वृध्दी दर्शविणारा तक्ता (आकडेहजारात)**

| अ.क्र. | वर्ष | महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या | महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्येची राज्यातील एकूण लोकसंख्येशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | १९५१ | ३५,९५६ | १,४९४ | ४.१५ |
| २ | १९६१ | ३९,५५४ | २,२०७ | ५.८३ |
| ३ | १९७१ | ५०,४१२ | ३,८४१ | ७.६२ |
| ४ | १९८१ | ६२,७८४ | ५,७७२ | ९.१९ |
| ५ | १९९१ | ७८,९३७ | ७,३१८ | ९.२७ |
| ६ | २००१ | ९६,८७९ | ८,५७७ | ८.८५ |

**स्त्रोत :** नेगमदुरे मारोनी, आदिवासी विकास आणि वास्तव,२००९, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद पृ.क्र.३३

वरील तक्त्यानुसार महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या १९५१ ते २००१ या कालावधीत वाढली आहे.१९५१ मध्ये एकूण लोकसंख्येच्या ४.१५ टक्के असलेली दिसते.परंतु ती २००१ मध्ये ८.८५ टक्के इतकी झाली आहे.१९९१ मध्ये हे प्रमाण ९.२७ टक्के होते.१९९१ ते २००१ या काळात राज्यातील आदिवासी लोकसंख्येमध्ये ४.७० टक्क्यांनी वाढ झालेली दिसते.

**तक्ता.क्र.१.४**

**महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचे स्त्री-पुरूष निहाय वर्गीकरण दर्शविणारा तक्ता ( आकडेहजारात )**

| अ.क्र. | वर्ष | एकूण लोकसंख्येतील मुलींचे प्रमाण | आदिवासी लोकसंख्येतील मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १९६१ | ९४१ | ९८७ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | १९७१ | ९३० | ९८२ |
| ३ | १९८१ | ९३४ | ९८३ |
| ४ | १९९१ | ९२७ | ९७२ |
| ५ | २००१ | ९३३ | ९७७ |

**स्त्रोत :** :-वर्मा आरसी, आदिवासी जमाती-काल आज आणि उद्या, २००३, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, पृ.क्र.१३

उपरोक्त तक्त्या द्वारे महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचे स्त्री-पुरूष निहाय वर्गीकरण दर्शविले आहे सन १९६१ मध्ये आदिवासी लोकसंख्येतील मुलींचे प्रमाण हे हजारी ९८७ इतके होते. तर सन २००१ मध्ये ते प्रमाण हजारी ९७७ इतके झाले आहे. या वरून असे दिसून येते की आदिवासी आदिवासी लोकसंख्येतील मुलींचे प्रमाणमूलांच्या प्रमाणा पेक्षा दिवसेंनदिवस कमी होत आहे.

**तक्ता .क्र.१.५**
**महाराष्ट्रातील आदिवासी साक्षरतेचे प्रमाण दर्शविणारा तक्ता**

| **वर्ष** | **एकूण साक्षर लोकसंख्या** | | | **आदिवासी साक्षर लोकसंख्या** | | | **एकूण लोकसंख्या व आदिवासी साक्षरतेतील फरक (%)** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **पुरूष** | **स्त्रिया** | **एकूण** | **पुरूष** | **स्त्रिया** | **एकूण** | **एकूण** | **स्त्रिया** |
| १९६१ | ४२.०४ | १६.१७ | २९.८२ | १२.५५ | १.७५ | ७.२१ | २२.६१ | १४.४२ |
| १९७१ | ५१.०४ | २६.४३ | ३९.१३ | १९.०६ | ४.२१ | ११.२४ | २७.८९ | २२.२२ |
| १९८१ | ५८.६५ | ३४.६३ | ४७.०२ | ३२.३८ | ११.९४ | २६.२९ | ३४.०८ | २२.६९ |
| १९९१ | ७६.५६ | ५२.०३ | ६९.८७ | ४९.०२ | २४.०८ | ३६.७७ | २८.०१ | २८.२८ |
| २००१ | ८६.०६ | ६७ | ७६.०९ | ६७ | ४३.०१ | ५२.०२ | २४.०७ | २३.३९ |

**स्त्रोत :** :-Navinchandra Jain,Tribles in Maharatra State, Areport,Trible Situation in India in Vidyut Joshi (Ed.) Ravat Publication Jaipure- P.-९९.

उपरोक्त तक्त्या द्वारे महाराष्ट्रातील आदिवासी साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे सन १९६१ मध्ये महिलचे साक्षरतेचे प्रमाण हे १४.४२% इतके होते तर सन २००१ मध्ये ते प्रमाण २३.३९% इतके झाले आहे. या वरून असे दिसून येते की आदिवासी साक्षरतेचे प्रमाण हे दिवसेंन दिवस वाढत आहे.

**तक्ता क्र.१.६**

**२००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची जिल्हानिहाय आदिवासी लोकसंख्या दर्शविणारा तक्ता (लोकसंख्या हजारात )**

| अ.क्र. | जिल्हा | लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | एकूण आदिवासी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मुंबई उपनगर | ८६४० | ७१ | ०.८२ |
| २ | मुंबई शहर | ३३३८ | २१ | ०.६२ |
| ३ | ठाणे | ८१३२ | १९९९ | १४.७४ |
| ४ | रायगड | २२०८ | २६९ | १२.१८ |
| ५ | रत्नागिरी | १६९७ | २० | १.१८ |
| ६ | सिंधूदुर्ग | ८६९ | ०५ | ०.५८ |
| ७ | नाशिक | ४९९४ | ११९४ | २३.९१ |
| ८ | धूळे | १७०८ | ४४४ | २५.९९ |
| ९ | नंदूरबार | १३१२ | ८६० | ६५.५३ |
| १० | जळगाव | ३६८३ | ४३६ | ११.८४ |
| ***११*** | ***अहमदनगर*** | ***४०४१*** | ***३०३*** | ***७.५*** |
| १२ | पुणे | ७२३२ | २६२ | ३.६२ |
| १३ | सातारा | २८०९ | २२ | ०.७८ |
| १४ | सांगली | ५८४ | १८ | ०.६९ |
| १५ | सोलापूर | ३८५० | ६९ | १.७९ |
| १६ | कोल्हापूर | ३५२३ | २१ | ०.६० |
| १७ | औरंगाबाद | २८९७ | १०० | ३.४५ |
| १८ | जालना | १६१३ | ३२ | १.९८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | परभणी | १५२८ | ३५ | २.२९ |
| २० | हिंगोली | ९८७ | ८७ | ८.८१ |
| २१ | बीड | २१६१ | २४ | १.११ |
| २२ | नांदेड | २८७६ | २५४ | ८.८३ |
| २३ | उस्मानाबाद | १४८७ | २८ | १.८८ |
| २४ | लातूर | २०८० | ४८ | २.३१ |
| २५ | बुलढाणा | २२३२ | ११५ | ५.१५ |
| २६ | अकोला | १६३० | १०० | ६.१४ |
| २७ | वाशिम | १०२० | ७१ | ६.९६ |
| २८ | अमरावती | २६०७ | ३५७ | १३.६९ |
| २९ | यवतमाळ | २४५८ | ४७३ | १९.२४ |
| ३० | वर्धा | १२३७ | १५४ | १२.४५ |
| ३१ | नागपूर | ४०६८ | ४४४ | १०.९१ |
| ३२ | भंडारा | ११३६ | ९८ | ८.६ |
| ३३ | गोंदिया | १२०१ | १९६ | १६.३१ |
| ३४ | चंद्रपूर | २०७१ | ३७५ | १८.११ |
| ३५ | गडचिरोली | ९७० | ३७२ | ३८.३५ |
| ३६ | महाराष्ट्र | १६८७९ | ८५७७ | ८.८५ |

**स्त्रोत :** :-आदिवासी संशोधन पत्रिका Vol.XXI No.२,सप्टेंबर २००७,पृ.क्र.८०

उपरोक्त तक्त्या द्वारे २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची जिल्हानिहाय आदिवासी लोकसंख्या दर्शविली आहे. उपरोक्त आकडेवारी नूसार महाराष्ट्रातील नंदूरबार, नाशिक, गडचिरोली या जिल्हयात आदिवासी लोकसंख्या जास्त आसलेली दिसते. त्याच बरोबर अहमदनगर जिल्हात आदिवासी लोकसंख्या ही ७.५ इतकी आहे.

- **भटक्या व विमुक्त जमाती**

## १.३.६. भटक्या जमाती

भटके व विमुक्त समाज हे भारतीय लोकसंख्येचा मोठा भाग आहे. भारतीय समाजात भटक्या जमाती ब-ल  भारतीय समाज विज्ञान कोश खंड-३ मध्ये पुढील प्रमाणे माहिती दिसून येते. ''भटके या शब्दाची उत्पत्ती नेमो या ग्रिक शब्दात शोधता येते. त्याचा अर्थ चारणे विविध जनावरांना घेवून जेथे चारा उपलब्ध होईल तेथे नेण्याच्या प्रवृत्तीतून एक समाज निर्माण झाला. या निमित्ताने हिंडणारा व पुढे आपल्याही उपजिवीकेसाठी भटकणारा तो भटका समाज बनला.''[२९] आर्थात जो समाज कायम एका ठिकाणी वास्तव्यास नसतो आशा समाजाला भटका समाज असे संबोधले जाते. 'द रॉयल अँथ्रॉपॉलॉजिकल इन्स्टिटयूट ऑफ ग्रेट ब्रिटन' या संस्थेनेही अशी व्याख्या केलेली आहे की ''कोणतेही निश्चित निवासस्थान नसलेल्या आणि शिकार अथवा अन्न गोळा करीत हिंडणे हेच ज्यांचे प्रमुख जीवन असून त्यावरच ते अवलंबून असतात अशा लोकांचा समाज हा भटका समाज यातूनच आपल्या चरितार्थासाठी इतर व्यवसाय करणारे लोकही भटक्या समाजात सामील होत गेले. आणि असे विविध व्यवसायाधिष्टीत समाजांचा एक फार मोठा वर्ग तयार झाला.''[३०] वरील माहिती वरून असे दिसते की ज्यांचे शासकीय दप्तरात नाव नाही,ज्यांना प्रतिष्ठा नाही, गाव नसलयाने या जातींना सतत भटकावे लागते, आशा अनेक जमाती या देशात वास्तव्यास आहेत.यांना आजही भाकरी साठी भटकंती करावी लागते.शेकडो वर्षे त्या भटकत आहेत म्हणून त्यांना भटक्या जमाती म्हटले जाते. कोणत्याही एका ठिकाणी स्थायी स्वरूपाची वस्ती न करता उपजिविकेसाठी सतत आणि वरचेवर स्थलांतर करणा-या जमाती म्हणजे भटक्या जमाती होय. हे भटके इतिहासात कधी राज्यकर्ते देखील होते, पण आर्यांचे हलले, मोगलांचे हलले, इंग्रजी राजवट, अन्य युध्दे आणी स्वकीयांचा ही हलले यामुळे यांना पराभूत व्हावे लागले.पराभूत झालया नंतर ते अन्नाच्या शोधात भटकंती करत राहीले.यांना आपला चरीतार्थ चालवण्या साठी स्थिर समाजाला कोणती ना कोणती सेवा पुरवणे सुरु केले. तसेच स्वत:मध्ये वेगवेगळे कौशलय आत्मसात करत ते भटकत राहीले. प्राचीन काळी मनुष्य हा अस्थीर होता. उदरनिर्वाहासाठी कोणतेही निश्चित साधन नसल्याने त्यांना कायम भटकावे लागे परंतु हळूहळू मानवाला चरितार्थाची साधने प्राप्त होत गेली व तसे मानवी जिवन स्थिर होत गेले. ज्यांना यात

अपयश आले आपल्या चरितार्थांचे साधन निश्चित करणे शक्य झाले नाही. परिणामी त्यांचे जिवन मागासलेले अस्थिर, दरिद्री व दुर्लक्षित असे झाले आहे. या परिस्थितीत आज एकविसाव्या शतकातही फारसा फरक नाही ते आज ही समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

**तक्ता क्र.१.७**

**महाराष्ट्रातील भटक्या जमाती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | जमात | तत्सम |
|---|---|---|
| १ | गोसावी | १.बावा २.बैरागी ३. भारती ४.गिरी गोसावी ५.भारती गोसावी ६.सरस्वती पर्वत ६. सागर ८. बान किंवा वान ९. तिर्थ आश्रम १०.अरण्य घरभारी ११.संन्यासी १२. नाथ पंथी गोसावी १३. पूरी |
| २ | बेलदार | ओड, मुस्लीम बेलदार, बेलदार कापेवार, बेलदार मुन्नर-कापेवार, बेलदार मुन्नर कापू, बेलदार, तेलंगा, बेलदार तेलगी, बेलदार- पेंटरेड्डी, बेलदार बूकेकरी |
| ३ | भराडी | अ.बाळा संतोषी ब.किंगरीवाले क. नाथबाबा ड.नाथजोगी गारपगारी इ. नाथपंथी डवरी गोसावी ई. नाथ जोगी, नाथपंथी उ. उवरी |
| ४ | भुते | भोपे |
| ५ | ** | - |
| ६ | चित्रकथी | - |
| ७ | गारूडी | साप, गारूडी ( मुस्लिम धर्मीयांसह ) |
| ८ | लोहार | घिसाडी, घिसाडी लोहार किंवा गाडी लोहार किंवा चितोडी लोहार, खाती, खातवाढी, जिनगर, चितोडीया-लोहार |
| ९ | गोल्ला | गोल्लेवार, गोलेर, गोलर्व्व्क्ष |
| १० | गोंधळी | - |

| | | |
|---|---|---|
| ११ | गोपाल | अ. गोपाल भोरपी ब. खेळकरी |
| १२ | हेळवे | हिलव |
| १३ | जोशी | अ. बुडबुडकी ब.डमरूवाले क.कुडमुडे ड. मेंढगी इ. सरोदे, सरोदी क. सहदेव जोशी ग. सरवदे ह. सरोदा |
| १४ | काशी कापडी | - |
| १५ | कोल्हाटी | डोंबारी |
| १६ | मैराळ | अ. दांगट ब. वीर |
| १७ | मसनजोगी | अ.सुदगडसिध्द ब.मपनजोशी क.शारदाकर / शार्दाकार / शारदाकाळ , बालासंनु |
| १८ | नंदीवाले | निरमले |
| १९ | पांगुळ | - |
| २० | रावळ | राऊळ किंवा रावळभोगी |
| २१ | सिक्कलगर | कटारी, सेक्कलगर ( मुस्लिम धर्मीय ) शिख-शिकलीगार, शिख-शिकलीकर, कातारी शिकलगार, मुस्लीम शिकलगार, शिकलीगार, शिकलीगर, शिकलगार, शिकलीगर, शिकलकर, शिकलीकर, शिकलीकरी, सिकलकर, सिकलीकर, सिकलीकार, सिकीलकर, सिकलीहार, सिक्कलकर, सिकलीगर, सिकलगर, सिकलीगर, सायकलगर, सैकलकर, सैकलगर |
| २२ | वगळले | - |
| २३ | वैदू | - |
| २४ | वासूदेव | - |
| २५ | भोई | १.झिंगा भोई २.परदेशी भोई ३. राजभोई ४.भोई ५.कहार ६.गोडीया कहार ७.धुरीया कहार ८. किशन ९.मधुआ १०. मांझी ११.जानिया १२. केवट १३. डीवर १४. |

| | | |
|---|---|---|
| | | धीवर १५.धिमर १६.पालेवार १७.मछेंद्र १८.नावाडी भोई , नावाडी तारू नावाडी १९. मल्हार २०.मल्हार २१.बोई २२.गाढव भोई २३.खाडी भोई २४. खारे भोई २५.ढेवरा २६.भनारा, भनारी, भन्नारे |
| २६ | बहुरूपी | अ.बोहरशी ब. बजुरूपीया क.भोरपी ख.रायरंध्र ग. अय्यार व अय्यारी |
| २७ | ठेलारी (धुळे, नासिक , जळगांव व औरंगाबाद जिल्हयात ) | - |
| २८ | ओतारी | अ.ओतनकर ब.ओतकर क. वतारी ख. ओझारी इ. वतकर, वतकरी,वतनकर इवतोकार, वतोकर, ओतकरी, ओतोकार |
| २९ | धनगर | १.अहिर २.डांगे३.गटरी ४. हंडे ५. तेलवार ६.हटकर ७. हाटकर ८.शेगर, सगर, सेगर ९.खुटेकर १०.तेलंगी ११.तेल्लारी १२.कोकणी-धनगर १३.कानडे १४.व-हाडे धनगर १५.झाडे १६.झेंडे १७.कुरमार १८.माहूरे १९. लाडसे २०.सनगर २१.धनवर २२.गडारीया २३.गड्री २४.गढरी २५.डंगेधनगर व डोंगरी धनगर |
| ३० | वंजारी | वंजार, वंजारा |
| ३१ | मरीआई वाले, कडक लक्ष्मीवाले, मरगम्मावाले | |
| ३२ | गिहरा / गहरा | |
| ३३ | गुसाई / गोसाई | |
| ३४ | मुस्लिम मदारी, गारूडी, सापवाले व | |

| | | |
|---|---|---|
| | जादूगर | |
| ३५ | भारतीय इराणी | |
| ३६ | गवळी, मुस्लीम गवळी, गवलान, ग्वालवंश | |
| ३७ | दरवेशी, वाघवाले - शाह ( मुस्लिम धर्मीय ) अस्वलवाले | |

**स्त्रोत :** -शासन निर्णय क्रमांक:संकिर्ण -२००८/यादी/प्र.क्र.५५३/मावक - ५दि.२६/९/२००८ नुसार शासनाने जाहीर केलेली जातीची यादी

उपरोक्त तक्त्या वरुन असे निदर्शनास येते की महाराष्ट्रातील भटक्या जमातीची एकूण संख्या ही ३७ इतकी आहे परंतु वरील तक्या मध्ये पारधी या जमातीचा समावेश दिसत नाही.

**तक्ता क्र. १.८**

**महाराष्ट्रातील भटक्या जमाती - क (N.T.C.) दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | जाती | उपजाती / तत्सम | |
|---|---|---|---|
| २९. | धनगर | १ | अहिर |
| | | २ | डांगे |
| | | ३ | गहरी |
| | | ४ | हंडे |
| | | ५ | तेलवर |
| | | ६ | हटकर |
| | | ७ | हाटकर |
| | | ८ | शेगर, सगर, सेगर |
| | | ९ | खुटेकर |
| | | १० | तेलंगी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ११ | तेल्लारी |
| | | १२ | कोकणी धनगर |
| | | १३ | कानडे |
| | | १४ | बऱ्हाडे धनगर |
| | | १५ | झाडे |
| | | १६ | झेंडे |
| | | १७ | कुरमार |
| | | १८ | महूरे |
| | | १९ | लाडसे |
| | | २० | सनगर |
| | | २१ | धनवर |
| | | २२ | गडरीया |
| | | २३ | गड्‌ |
| | | २४ | गटरी |
| | | २५ | डंगेधनगरव डोंगरी धनगर |

**स्त्रोत :**पुरीदिपक,महाराष्ट्रातीलजाती,जमातीवजातीचेप्रमाणपत्रदेण्याचीकार्यपध्दती,माहितीप्रवाह पब्लीकेशन,पाथर्डी, पृ.क्र.१९

**महाराष्ट्रातील भटक्या जमाती - ब ( N.T.D.) दर्शविणारा तक्ता**

**तक्ता क्र १.९**

| **अ.क्र.** | **जाती** | **उपजाती / तत्सम** |
|---|---|---|
| ३० | वंजारी | वंजार, वंजारा |

**स्त्रोत :** पुरी दिपक, ‘महाराष्ट्रातील जाती, जमाती व जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती, २०१६,माहिती प्रवाह पब्लिकेशन, पाथर्डी, पृ.क्र.२०

**तक्ता.क्र.१.१०**

**महाराष्ट्रातील राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास केलेल्या शिफारसीनुसार खालील तत्सम जातींचा भटक्या जमातीच्या यादि मध्ये मूळ जातीसमोर समावेश करण्यात येत आहे असे दर्शविणारा तक्ता.**

| **प्रवर्ग** | **प्रवर्गातील जातीचा यादीतील क्रमांक** | **जातीचे नाव** | **सदर जातीच्या अ.क्र.तीच्या पुढे नव्याने समावेश करण्यात आलेली तत्सम जात / उपजात** |
|---|---|---|---|
| भज-ब | २५ | भोई | निषाद मल्ला, मल्लाह नावीक, ओडा, ओडेवार, ओडेल, बेस्तार, |
| | | | बेस्ता, बेस्ती, बेसतालु |
| भज-ब | ८ | लोहार | चितारी / जिनर |
| भज-ब | २९ | धनगर | धनगर अहर उपजाती अ.क्र.-१ |
| भज-ब | २९ | धनगर | गडरीया / गडारीया उपजाती अ.क्र.-२६ |
| भज-ब | २१ | सिक्कलगर | कातारी-शिकलकर-शिकलीकरीहिंदू धर्मीयांसह |
| भज-ब | २ | बेलदार | मुस्लिम मेमार, मेमार, मुस्लिम, गवंडी |

**स्त्रोत :** पुरी दिपक, 'महाराष्ट्रातील जाती, जमाती व जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती,२०१६,माहिती प्रवाह पब्लिकेशन, पाथर्डी,पृ.क्र.२७

**तक्ता .क्र.१.११**

**महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास केलेल्या शिफारशींनुसार खालील जातीचा नव्याने भटक्या जमातीच्या यादिमध्ये समावेश दर्शविणारा तक्ता**

| **शासकीय यादीतील अ.क्र.** | **प्रवर्ग** | **प्रवर्गात नव्याने समाविष्ट जात** |
|---|---|---|
| ३८ | भज-ब | बागडी |

**स्त्रोत :** पुरी दिपक, 'महाराष्ट्रातील जाती, जमाती व जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती', माहिती प्रवाह पब्लिकेशन, पाथर्डी, पृ.क्र.२७

**तक्ता क्र.१.१२**

**अहवाल क्र.४४ व ४५ नुसार दिनांक ४ सप्टेंबर २०१४ नुसार भज-बप्रवर्गातील मूळ जातीमध्ये बदल व दुरूस्ती दर्शविणारा तक्ता**

| **जातीचा यादी क्र.** | **भज-ब प्रवर्गातील मुळजात** | **दुरूस्ती नंतर नवीन सुधारित जात** |
|---|---|---|
| ११ | गोपाल | गोपाळ |
| ३६ | गवळी, मुस्लिम, गवळी, गवलान, ग्वालवंश | गवळी, मुस्लिम गवळी, गवलान, ग्वालवंश, गोपाल-गवळी, गवळी-गोपाल |
| ८ | लोहार / जिनगर | सोमवंशी आर्य क्षत्रिय, सोमवंशी, आर्य, क्षत्रिय हेजिनगर भज-ब प्रवर्गातील अनुक्रमांक ८ आहेत असे समजण्यात यावे |

**स्त्रोत :** - पुरी दिपक,'महाराष्ट्रातील जाती, जमाती व जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती',२०१६,माहिती प्रवाह पब्लिकेशन, पाथर्डी, पृ.क्र.३४

## १.३.७.विमुक्त जमाती-

महाराष्ट्रात भटक्या आणि विमुक्त जमातींची संख्या बेचाळीस इतकी मानली गेलेली आहे. त्यापैकी विमुक्तांची संख्या १४ इतकी आहे. विमुक्त जमाती या विशेष करून ब्रिटीश काळात गुन्हेगार जमाती म्हणून ज्यांच्यावर शिक्कामोर्तब झाले त्यांच्या पैकीच आहेत. विमुक्त जमाती नेमके अर्थाने कोणास म्हणावे या संदर्भात प्रा.रामनाथ चव्हाण असे म्हणतात की,"१८७१ साली या देशात ब्रिटीशांनी गुन्हेगारी कायद्याची निर्मिती केली आणि देशातील १९८ भटक्या जमातींना गुन्हेगार जमाती म्हणून जाहीर केले. त्यांच्यासाठी देशात वेगवेगळया ठिकाणी ५२ वसाहती सेटलमेंट निर्माण करून त्या जमातींच्या लोकांना तीन तारेच्या कुपनात डांबून ठेवून दिवसातून तीन

वेळा हजेरी देणे बंधनकारक केले. त्यांना सक्तीची कामे व त्यांच्या मुलांना शिक्षण याचीही इंग्रजांनी वसाहतीत सोय केली. परिणामी त्यांचे जन्म व मृत्यू वसाहतीत होवू लागले.हा गुन्हेगारी कायदा भारतात तब्बल ८१ वर्षे अस्तित्वात होता. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. देशातील ब्रिटीश सत्ता संपुष्टात आली. त्यानंतर १९५२ साली सोलापूर येथील गुन्हेगारी वसाहतीचे तीन तारेचे कुंपन भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी प्रतिकात्मक तोडून वसाहतीतील भटक्या लोकांना मुक्त केले. तेंव्हा पासून त्यांना विमुक्त या नावाने ओळखले जाऊ लागले. ”[३१]

उपरोक्त माहितीवरून आपणास विमुक्त जमाती कोणास म्हणावे याची प्रचीती येते. वास्तविक पहाता भटके आणि विमुक्त जमाती या गुन्हेगारी जमाती कायदा १८७१ अस्तीत्वात येण्यापूर्वी एकच होत्या म्हणजे त्या भटके म्हणूनच ओळखल्या जात होत्या. गुन्हेगारी जमाती कायद्याने भटक्या जमाती पैकी १९८ जमातींना गुन्हेगारीत समाविष्ट करून त्यांनी गुन्हेकरू नये व इतर समाजाला त्यांचा त्रास होवू नये. म्हणून त्यांना तारेच्या कुंपनात डांबले व स्वातंत्र्यानंतर त्या डांबलेल्या भटक्यांनाच मुक्त केले. तेंव्हा पासून त्यांना समावेश विमुक्त जमातीत झाला.

**तक्ता क्र. १.१३**

**महाराष्ट्रातील विमुक्त जमाती / जाती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **जमात** | **तत्सम** |
|---|---|---|
| १ | बेरड | अ. ब. नाईकवाडी क.तलवार ड.वाल्मिक |
| २ | बेस्तर | संचलू वड्र्डक्ष |
| ३ | भामटा | अ.भामटी ब.गिरणी वड्डार क. कामाटी ड.पाथरूट इ.टकारी ( मुस्लीम धर्मीयांसह) फ.उचले ग.घंटीचोर |
| ४ | कैकाडी (मुंबई, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नाशिक, धुळे, जळगांव, पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापुर, सोलापूर, औरंगाबाद, | अ.धोंतले ब. कोरवा क.माकडवाले किंवा कोंची कोरवा ड. पामलोर इ. कोरवी |

| | | |
|---|---|---|
| | बीड, परभणी, उस्मानाबाद, नांदेड व चंद्रपुर जिल्हयातील राजूर तालुक्यातील ) | |
| ५ | कंजारभाट | अ.धारा ब. कंजार क. नाव |
| ६ | कटाबू | - |
| ७ | कटाबू | अ.गोर बंजारा ब. लंबाडा / लंबारा क. लंभाणी ड. चरण बंजारा इ. लमाण फ . मथुरा लमाण ग. कचकीवाले बंजारा ह. हमान बंजारा ई.लमाण / लमाणी ज. लबान फ . ** न. सिंगारी व नावीबंजारा प. जोगी बंजारा स. बंजारी ल. धाली / धालीया ग. धाडी / धारी |
| ८ | ** | पालपारधी |
| ९ | **राजपारधी** | **अ. ** ब.गाव पारधी क. हरण शिकारी ड. ** ** |
| १० | राजपूत भामटा | अ. परदेशी भामटा ब. परदेशी भामटी |
| ११ | रामोशी | - |
| १२ | वडार | अ. गाडी वड्डर ब. जाती वड्डर क. माती वड्डर ड. पाथरवट इ. संगत/दगडफोडू ई.वड्डर |
| १३ | वाघरी | अ. सलात ब.सलात वाघरी |
| १४ | छप्परबंद ( मुस्लिम धर्मीयांसह ) | |

**स्त्रोत** : **-**शासननिर्णयक्रमांक:संकिर्ण-२००८/यादी/प्र.क्र.५५३/मावक -५दि.२६/९/२००८ नुसार शासनाने जाहीर केलेली जातीची यादी

उपरोक्त तक्त्यानूसार पारधी या जमातीचा समावेश हा *विमूक्त* जमातीत होतांना दिसतो. महाराष्ट्रात विमूक्त जमातींची संख्या ही १४ इतकी दिसून येते.

**तक्ता क्र १.१४**

**सामाजिक आरक्षण गट अ ते ड करीता दर्शविणारा तक्ता**

| **प्रवर्ग** | **शासन निर्णय दिनांक २९-०-१९९७ सरळसेवा** | **शासन निर्णय दिनांक २९-०-१९९७ पदोन्नती** |
|---|---|---|
| अनुसूचित जाती | १३ टक्के | १३ टक्के |
| अनूसुचित जमाती | ०७ टक्के | ०७ टक्के |
| विमुक्त जाती - अ | ०३ टक्के | ०३ टक्के |
| भटक्या जमाती - ब | २.५ टक्के | २.५ टक्के |
| भटक्या जमाती - क | ३.५ टक्के | ३.५ टक्के |
| भटक्या जमाती - ड | ०२ टक्के | ०२ टक्के |
| विशेष मागास प्रवर्ग | ०२ टक्के | ०२ टक्के |
| इतर मागास प्रवर्ग | १९ टक्के | १९ टक्के |
| शैक्षणिक आणि सामाजिक | १६ टक्केस्थगिती | - |
| दृष्टया मागास प्रवर्ग- ईएसबीसी अधिसूचना दि.०९-०७-२०१४ | | |
| विशेष मागासप्रवर्ग - अ अधिसूचना दि.०९-०७-२०१४ | ०५ टक्केस्थगिती | - |

**स्त्रोत :** :-पुरी दिपक, 'महाराष्ट्रातील जाती, जमाती व जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती',२०१६, माहिती प्रवाह पब्लिकेशन, पाथर्डी, पृ.क्र.२१

उपरोक्त तक्त्यानुसार पारधी या विमूक्त जमातीला ३ टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे.

### तक्ता.क्र.१.१५
### महाराष्ट्रातील विविध प्रवर्गातील जातींची संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | प्रवर्ग | प्रवर्गात असलेल्या जातींची संख्या |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ५९ |
| २ | अनुसूचित जमाती | ४७ |
| ३ | इतर मागास वर्ग | ३४६ |
| ४ | विशेष मागास वर्ग | ७ |
| ५ | भटक्या जमाती - अ | १४ |
| ६ | भटक्या जमाती - ब | २८१७ |
| ७ | भटक्या जमाती - क | १ |
| ८ | भटक्या जमाती - ड | १ |

**स्त्रोत :** :-पुरी दिपक, महाराष्ट्रातील जाती, जमाती व जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती, २०१६ माहिती प्रवाह पब्लिकेशन, पाथर्डी, पृ.क्र.२२

### तक्ता.क्र.१.१६
### भटक्या / विमुक्त जमातीच्या वर्गानुसार आरक्षण दर्शविणारा तक्ता

| वर्गानुसार आरक्षित पदे | | बिंदू | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती-१३ | ९ | १२ | २१ | २७ | ३७ | ४३ | ५१ |
| | | ६१ | ६७ | ७३ | ८१ | ९१ | ९७ | |
| २ | अनुसूचित जमाती-७ | २ | २३ | ३३ | ५३ | ६३ | ७१ | ९३ |
| ३ | विमुक्त जाती अ-३ | ३ | ४१ | ८३ | | | | |
| ४ | भटक्या | ४ | | ४७ | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जमाती ब-२.५ | | | | ९९ | | | |
| ५ | भटक्या जमाती ब-३.५ | ७ | ३१ | ५७ | | | | |
| ६ | भटक्या जमाती -३.२ | ११ | ७७ | | | | | |
| ७ | इतर मागास प्रवर्ग -२ | १५ | ८७ | | | | | |
| ८ | इतर मागास वर्ग -१९ | ५ | ९ | १७ | १९ | २५ | २९ | ३५ |
| | | ३९ | ४५ | ४९ | ५५ | ५९ | ६५ | ६९ |
| | | ७५ | ७९ | ८५ | ८९ | ५५ | | |
| ९ | सर्वसाधारण | ६ | ८ | १० | १३ | १४ | १६ | १८ |
| | ४८ | २० | २२ | २४ | २६ | २८ | ३० | ३२ |
| | | ३४ | ३६ | ३८ | ४० | ४२ | ४४ | ४६ |
| | | ४८ | ५० | ५२ | ५४ | ५६ | ५८ | ६० |
| | | ६२ | ६४ | ६६ | ६८ | ७० | ७१ | ७४ |
| | | ७६ | ७८ | ८० | ८२ | ८४ | ८६ | ८८ |
| | | ९० | ४२ | ९४ | ९६ | ९८ | १०० | |

**स्त्रोत :** :- पुरी दिपक, 'महाराष्ट्रातील जाती, जमाती व जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती',२०१६, माहिति प्रवाह पब्लिकेशन, पाथर्डी, पृ.क्र.६१.

## १.३.८ पारधी:आदिवासी की विमुक्त जमात ?

क्षेत्रीय संशोधना दरम्यान असे दिसून येते की पारधी जमातीतील काही पोटजाती या आदिवासी मध्ये समाविष्ट आहेत तर काहींचा समावेश हा विमुक्त जमातीत केलेला दिसतो.केंद्रशासनाच्या सन १९७६ मधील आदेशान्वये महाराष्ट्र राज्यातील ४७ जमाती

अनुसूचित जमाती म्हणून जाहीर केल्या त्यात  अ.क्र.३८तर,त्या आदेशातील अ.क्र.३८ वरपारधी,आडवीचिंचर,फासेपारधी,लंगोटीपारधी,बहेलिया,चित्तापारधी,हरणशिकारी,टाकणकार ,टाकीया यांचा समावेश केलेला आहे व महाराष्ट्रातील शासन अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती सुधारणा कायदा १९७६ च्या आदेशातील यादीत अ.क्र.९ वर राजपारधी,गांवपारधी,पालपारधी यांचा विमुक्त जातीत समावेश केलेला आहे.फासे पारधी, लंगोट पारधी, आणि टाकणकार या जमाती महाराष्टात जास्त प्रमाणात आढळतात. आशा प्रकारे पारध्यांमध्ये असलेले जमातींचे विभाजन हे असंयुक्तीक असे आहे.या मुळे पारधी जमातीतील काही जमाती या सरकारी  आरक्षण व कलयाणकारी योजनां पासुन वंचीत राहतात.तसेच यामुळे या जमातींच्या नागरीकत्वाचाही प्रश्न निर्माण होतांना दिसतो.

## १.४ आदिवासी समूहा ब-ल चे विविध दृष्टिकोण-

भारतीय समाज व्यवस्थेचा एक अविभाज्य भाग असणारे आदिवासी समूह हे अभ्यासकांचे अभ्यास विषय बनलेले आहेत. परंतु आदिवासी समूहांब-ल  जे काही अभ्यास झालेले आहेत त्या अभ्यासात ब-याच अभ्यासकांमध्ये मोठया प्रमाणावर मतभेद असल्याचे दिसते. काही अभ्यासकांनी आदिवासींना भारतीय लोकसंख्येत व मुख्य सामाजिक प्रवाहात सामावून घ्यावे असे म्हटले आहे तर काहींनी त्यांना अलिप्त ठेवण्यातच आदिवासी समाजाचा विकास आहे असे म्हटले आहे. तर काहींनी विविध कल्याणकारी योजना राबवून आदिवासी समाजाचा विकास साधावा असे मत व्यक्त केले आहे. आपण आदिवासी समूहाब-ल  भारतीय समाजशास्त्राचे जनक डॉ.गोविंद सदाशिव घुर्ये यांनी मांडलेल्या सामिलीकरणाचा दृष्टिकोण (Assimilation Approach) व्हेरीयर एल्विन यांचा अलिप्ततावादाचा दृष्टिकोण (Isolation Approach) व पंडित जवाहरलाल नेहरू यांचा पंचशील इ.बाबींचा विचार आपणास विचार करावयाचा आहे.

### १.४.१.डॉ.गोविंद सदाशिव घुर्ये यांचा सामिलिकरणाचा दृष्टिकोण-

भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हणून ख्याती पावलेले डॉ.जी.एस.घुर्ये यांनी आदिवासी समूदायाचे विशेष अध्ययन केलेले आहे. ते आदिवासी समूहांना मुख्य सामाजिक प्रवाहात सामावून घेण्यासाठी आग्रही होते. घुर्ये यांनी आदिवासींच्या सामिलिकरणाब-ल  १९४३ साली  'The Aborigines so Called and their feature' हा ग्रंथ प्रकाशित करून भारतातील आदिम समाजाचे वांशिक व समाजशास्त्रीय अध्ययन या ग्रंथात केलेले आहे.ते या ग्रंथात असे लिहतात की

“या भटक्या व आदिम जमाती भारतातील मूळ रहिवाशी व ऐतद्देशीय असून ब्रिटीश काळात त्यांची गणना भारतीय लोकसंख्येत केलेली नव्हती. एवढेच नव्हे तर त्या लोकांचा समावेश भारतीय नागरिकांत केलेला नसल्यामुळे नागरी हक्कांपासून आदिम समाजाचे लोक वंचित राहिले”.[३२] घुर्ये यांच्या मते भारतातील अनेक आदिम जमाती स्वत:स हिंदू-धर्मीय समजतात, परंतु त्या आर्थिक, समाजातील व सांस्कृतिकदृष्टया अत्यंत मागासलेल्या आहेत. यामूळे त्यांना मागासलेले हिंदू अशा संज्ञेने घुर्येंनी संबोधलेले आहे. आदिवासी समाजा संदर्भात सामिलिकरणाचा पुरस्कार त्यांनी केलेला आहे. सांस्कृतिक वेगळेपण कायम टिकवण्याच्या उद्देशातुन आदिम लोकांना अलिप्त ठेवल्यास त्यांचा विकास साध्य होणार नाही. एवढेच नव्हे तर ते अधिक मागासलेपणाचे जिवन कंठीत राहतील अशी शंका डॉ.घुर्येंनी व्यक्त केली. ब्रिटीश सरकारने भटक्या व विमुक्त लोकांचा भारतीय लोकसंख्येत अंतर्भाव न केल्याने त्यांना नागरीकतेचा दर्जा प्राप्त करून दिलेला नव्हता. नागरी हक्कांपासून आदिम लोकांना वंचीत ठेवण्याचा ब्रिटीश सरकारने जो प्रयत्न केला, त्यामुळे विकासाचा किंवा प्रगतीचा लाभ आदिम लोकांना मिळू शकला नाही.आदिम लोकांच्या अज्ञानाचा व दारिद्र्याचा वापर राजकीय स्वार्थासाठी, वसाहतवादी धोरण यशस्वीपणे राबविण्यासाठी व धर्मप्रसाराचे कार्य अधिक वेगाने करता येण्यासाठी अलिप्ततावादी धोरणाला औपचारिक स्वरूपाची मान्यता ब्रिटीश सरकारने दिली होती, परंतु डॉ.घुर्ये यांनी “आदिम लोक या देशाचे मूळ रहिवाशी असून त्यांचा भारतीय लोकसंख्येत अंतर्भाव करून त्यांना नागरिकत्वाचा दर्जा देवून त्यांना नागरी हक्क प्राप्त करून देण्याच्या उद्देशातून सामिलिकरणाचा पुरस्कार केला तर प्रगत व अप्रगत, सुसंस्कृत व असंस्कृत लोकांमध्ये तितका जास्त संपर्क वाढत जाईल तितका तो अधिकाधिक योग्य प्रमाणात ठरेल, असा विश्वास त्यांना वाटत होता.”[३३]

उपरोक्त माहीती वरुन असे दिसून येते की आदिवासी लोक हे हिंदूच्या प्रथा-परंपराचे स्वत:हून अनुकरण करीत असल्यामूळे हिंदू समाजात त्यांचे विलिनीकरण करण्याच्या उद्देशातून त्यांनी सामीलीकरणाचा पुरस्कार केला. ऐवढेच नव्हे तर भारतीय समाजापासून आदिम लोकांना दूर ठेवण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होण्याची दाट शक्यता आहे व आपणास भारतीय लोक सामावून घेत नाहीत अशी जाणीव त्यांच्यात विकसित होईल, अशी भिती आहे.

याशिवाय या वेगळेपणाच्या जाणिवेतून आदिम समाजात फुटीरतावादी प्रवृत्ती वाढीस लागेल व त्यांच्याकडून स्वातंत्र्य चळवळीला विरोध होईल. या भितीतून सामिलीकरणाचे धोरण हेच राष्ट्रीय एकात्मतेस व आदिम समाजाच्या विकासास उपयुक्त ठरणारे आहे, असा आग्रह त्यांनी धरला.

The Tribel culture of India या पुस्तकात लेखक L.P.Vidyarthi आणि Binay kumar Rai यांनी जी.एस.घुर्ये यांचा Assimilatien Approach पुढील प्रमाणे सांगता येईल- "Ghurye Characterized the tribals as backword Hindues and arued that any attempt to isolate them from the main stream of Indian life would be meaningless. While sections of these tribes are properly integrated in Hindu Society, very large sections, in fact the bulk of them, are rather loosely integrated. Only very small sections, living in the recesses of hills and forests, have not been more than touched by Hindusim. He opines that the tribals are the imperfectly integrated classes of Hindu Society."[34]

आदिवासी समूहांब-ल भारतीय समाजशास्त्राचे जनक डॉ.गोविंद सदाशिव घुर्ये यांनी सांगितलेला सामिलिकरणाचा दृष्टीकोण जर अभ्यासला तर असे दिसून येते की भारतीय समाज व्यवस्थेचा भाग असणारा आदिवासी समाज हा शतकानुशतके मुख्य समाज व्यवस्थे पासून वंचित राहिला. भारताचे मूळ रहिवाशी असतांना त्यांना भारताचे मुळ नागरिक असल्याची खात्री देखील वाटत नाही. भारतात राहून आपण भारतीय आहोतच याची खात्री त्यांना वाटत नसल्याने भारतीय असल्याची हमी त्यांना अलिप्त ठेवून त्यांच्यात राष्ट्र प्रेमाची भावना निर्माण होणार नाही. तेंव्हा त्यांचे सामिलिकरण गरजेचे आहे. आदिवासी समूह हे डोंगराळ भाग व अतिदुर्गम प्रदेशात वास्तव्यास राहतात. मात्र तरीही मुख्यसमाज व्यवस्थेतील हिंदू धर्मातील प्रथा परंपरेचे अनुकरण करतांना ते दिसतात. त्यामुळे डॉ.जी.एस.घुर्ये त्यांना मागासलेले हिंदू असा शब्द प्रयोग करतात. याच कारणाने त्यांना मुख्य समाज व्यवस्थेपासून अलिप्त ठेवणे चूकीचे आहे. त्यांच्या मते आदिवासी समूदाय हे भारतीय हिंदू समाजाचाच एक भाग असल्याने त्यांना सामावून घेणे गरजेचे आहे. भारतीय आदिवासींमध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण होवू नये, त्यांच्यात फुटीरतावादी प्रवृत्ती बळावू नये. भारतीय समाजातील विविधतेत एकता साधता यावी, त्यांच्यातील दारिद्रय कमी होवून त्यांचा विकास साधता यावा या सर्व बाबींसाठी आदिवासी समाजाचे सामिलिकरण होणे गरजेचे आहे असे डॉ.घुर्ये यांना अभिप्रेत आहे व ते योग्य आहे.

## १.४.२.व्हेरीअर एल्वीन यांचा आदिवासी समाजाब-ल चा अलिप्ततावादाचा दृष्टिकोण-

व्हेरीअर एल्वीन यांनी आदिवासी समाजाब-ल अलिप्ततावादी धोरणाचा पुरस्कार केलेला आहे. तो पुढील प्रमाणे सांगता येईल. त्यांच्या मते ‘‘आदिम समाजाचे सांस्कृतिक, सामाजिक वेगळेपण अबादित टिकवावयाचे झाल्यास प्रगत समाजापासून आदिम लोकांना वेगळे अलिप्त ठेवणे हेच उचित ठरेल निसर्गाच्या सानिध्यात राहून स्वाभाविक पध्दतीने जिवन कंठण्यात भटक्या जमातींना एक प्रकारचा आनंद वाटत असतो.’’[३५] आदिम लोकांची दैनंदिन जिवन कंठण्याची पध्दत, त्यांचे सामाजिक जिवन, जिवणाकडे त्यांचा पाहण्याचा दृष्टिकोण, त्यांची विवाहाची व वधू वरांची निवड करण्याची पध्दती, वैवाहिक जीवनाबाबत प्रशिक्षण देणारे युवागृह, त्यांची आहाराची व पेहरावाची रीत, इत्यादी अनेक बाबतीत वैशिष्टयेपूर्ण स्वरूपाची लक्षणे आदिम समाजात आढळतात व ही लक्षणे जितकी अबादित राखता येतील तितका राखण्याचा ते आटोकाट प्रयत्न करतात. जर प्रगत समाजातील लोकांशी त्यांचा संपर्क वाढला तर आपली सांस्कृतिक लक्षणे कायम स्वरूपी टिकणार नाहीत, अशी त्यांना भिती वाटत असते. म्हणून प्रगत समाजापासून आदिम लोक त्यांना अलिप्त ठेवल्यास सांस्कृतिक व नैसर्गिक जिवनाचा आनंद उपभोगून आपले सांस्कृतिक वेगळेपण त्यांना कायम टिकविता येते,या जाणिवेतून आदिवासी समूहा संदर्भात भारतात जे विविध विचारवंतांनी वेगवेगळे मते मांडली आहेत. त्यात व्हेरीअर एल्वीन यांचा देखील समावेश होतो. परंतु डॉ.जी.एस.घुर्ये यांनी आदिवासी समाजाब-ल जो सामिलिकरणाचा दृष्टिकोण मांडला आहे त्याच्या अगदी विरूध्द मत व्हेरीअर एल्वीन यांनी मांडलेले आहे ‘‘त्यांनी आदिवासी संदर्भात अलिप्ततावादी भूमिका मांडलेली आहे. आदिम समाज हा निसर्ग सानिध्यात राहातो त्यामुळे त्यांचे जिवन हे निसर्गाशी जोडलेले असते. त्यामुळे त्यांचे सांस्कृतिक जिवनही नैसर्गिक पध्दतीचेच असते. त्यांचे प्रथा, परंपरा, धार्मिक विधी, कर्मकांड हे मुख्य समाजापेक्षा भिन्न असतात. तसेच राहणीमान, बोलीभाषा, खाण्यापिण्याच्या पध्दती, सामाजिक जिवन, कुटूंबसंस्था, विवाहसंस्था, मूल्ये व प्रमाणके इ.बाबी मुख्य समाजापासून भिन्न असतात असे मत व्हेरीअर एल्विन यांनी मांडले यामुळे आदिम लोकांना अलिप्त ठेवले तर त्यांचे सांस्कृतिक वेगळेपण जपले जावू शकते. ’’[३६]

उपरोक्त माहिती वरुन असे दिसून येते की जर ते मुख्य समाजव्यवस्थेच्या संपर्कात आले तर त्यांचे सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक जिवन संपूर्ण नष्ट होईल व प्रगत समाजातील सर्वच बाबी आदिवासी अगदी सहजतेने व जलद गतीने स्विकारू शकत नाही. कारण त्यांचा मुळचा पिंड हा वेगळा असतो व मुख्य समाज व्यवस्थेच्या संपर्कात आल्याने त्यांना या समाजात सामावून जायला बराच अवधी लागेल व ते पूर्णत: आदिवासी राहणार नाहीत व प्रगत ही होणार नाहीत तेंव्हा त्यांना मूळ समाजापासून अलिप्त ठेवनेच त्यांचा विकास साधने उचित होईल. असे मत व्हेरीअर एल्विन यांनी मांडले. व्हेरिअर एल्विन यांनी अलिप्ततावादाचा पुरस्कार केला. त्याचप्रमाणे व्हेरिअर एल्विन यांनी अलिप्ततावादा ब-ल  पुढीलप्रमाणे देखील मत मांडले आहे. "Establishment of a sort of National Park of the tribles and advised that their contact with the outside world should be reduced to the minimum. His national park policy of keeping the tribals as museum specimen became the model for the administration. He clarified we do not want to preserve the tribesmen as meseumns specimens, but equally we do not want to stop the clock of progress but we do want to see that it keeps the right time. We may not believe in the myth of noble savage but we do not want to create a class of ignoble"[37]

आदिवासीं संदर्भात व्हेरीअर एल्विन यांनी नॅशनल पार्क (राष्ट्रीय उद्यान) ही संकल्पना मांडलेली आहे. त्यांच्या मते "आदिवासी समाजाचा इतर समाजाशी कमीत कमी संपर्क यावा व समान वैशिष्टयांच्या व्यक्तींना एकत्र करता यावे यासाठी नॅशनल पार्क स्थापन करून या सर्वांना तेथे एकत्रित ठेवावे, जेणे करून त्यांची मूळ वैशिष्टयांची जपवणूक होईल व त्यांचा विकास देखील साधता येईल".[३८] त्यांची नैशनल पार्क योजना ही आदिवासींना मुख्य समाजा पासून वेगळे ठेवण्यासाठीच होती असे म्हणता येईल थोडक्यात या संदर्भात त्यांचे म्हणणे असे होते की नॅशनल पार्क या संकल्पनेतून आदिवासींना एखाद्या संग्राहालयात ठेवणे हा नाही तर समाज व्यवस्थेतुन वेगळे ठेवून त्यांचा विकास साधने हा आहे.

वरील दोन्ही दृष्टिकोणाचा अभ्यास करता असे दिसून येते की व्हेरीअर एल्वीन यांचे अलिप्ततावादी धोरण व डॉ.घुर्ये यांचे सामिलिकरणाचे धोरण या दोन्ही धोरणातून खरोखर आदिवासी समाजाचा विकास होईल का यात शंका वाटते कारण हे दोन्ही धोरणामध्ये ब-याच त्रुटी आहेत व त्या मुळे या दोन्ही दृष्टिकोणामूळे आदिवासींचा विकास कितपत साधला जाईल हे सांगने

कठीण आहे. अलिप्ततावादाने आदिमांचे प्रश्न न सुटता ते वाढू शकतात. तसेच भारतीय समाजापासून आदिमांना अलग ठेवणे राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टिने घातक आहे. हिंदू समाजातील जाती व अस्पृश्यता, स्त्रीचा कनिष्ठ दर्जा या अनिष्ठ रूढींचे उच्चाटन होत आहे. तेंव्हा आदिम समाज इतर समाजाशी मिसळल्याने आदिमांवर अन्याय कमी होईल असे डॉ.घुर्ये यांचे मत कितपत योग्य आहे हे सांगणे देखील कठीण आहे. कारण सामिलिकरणाने आदिमांच्या दर्जात फरक पडत नाही हे गोंड, बैगा व मोही समाजाच्या उदाहरणातून दिसून येते. अलिप्तता व संम्पूर्ण सामिलिकरण या परस्पर विरोधी उपायांनी अदिवासींचा विकास घडून येण्याची शक्यता कमी दिसते.

### १.४.३. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे पंचशील

आदिवासी समाजाच्या विकासासाठी भारताचे माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी पंचशील मार्गाचा अवलंब करून आदिवासी समाजाचा विकास साधता येईल असे सांगितले. ते पंचशील पुढील प्रमाणे सांगता येतील.

1.People should develop along the lines of their own genious and we should avoid imposing anything on them. We should try to encourage in every way their own traditional arts and culture.

2.Trible rights to land and forests should the respected.

3.We should try to train and built a team of their own people to do the work of administration and development some technical personnel from outside will do dought, be needed, especially in the beginning. But we should avoid introducing to many outsiders into trible territory.

4.We should not overadminister these areas or overwhelm them with multiplicity of schemes. We should rather work through and not in rivalry to, their own social and cultural institutions.

5.We should judge results, not by statistics or the amount of money spent, but by the quality of human character that is evolved ” [39]

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांनी भारतीय आदिवासीं ब-ल असणारी आस्था आदर व प्रेम वरील पंचशील तत्वांच्या आधारे व्यक्त केली आहे. आदिवासी पंचशील नावाने प्रसिध्द् झालेली पाच तत्वांचा सारांश पुढील प्रमाणे सांगता येईल.आदिवासींना त्यांच्या पिंडानुसार

अंत:प्रेरणेनुसार विशेष गुणसंपदेनुसार स्वत:ची सुधारणा, प्रगती व विकास करण्याची मोकळीक आदिवासींना असली पाहिजे. आपल्या कल्पनेतील सुधारणा, प्रगती व विकास आपण त्यांच्यावर लादता कामा नये. त्यांच्या पारंपारिक कला व त्यांची पारंपारिक संस्कृती यांना आपण हर प्रकारे प्रोत्साहन दिले पाहिजे.

जमीन व जंगल या बाबींच्या संबंधातल्या आदिवासींच्या हक्कांचा पूर्ण आदर केला पाहिजे.प्रशासन व विकास कार्यक्रम यांचा भार सांभाळण्यासाठी आपण त्यांच्यातीलच मानसे प्रशिक्षित केली पाहिजेत. त्यांचेच निष्ठावंत समर्पित गट तयार केले पाहिजेत. आदिवासी क्षेत्रात बाहेरच्या खुप व्यक्तींनी प्रशासन यंत्रणा भरून टाकता कामा नये.आपण प्रशासनाच्या गुंतागुंतीच्या अवडंबरा खाली आदिवासींना चिरडून टाकता कामा नये अनेकानेक योजनांची गर्दे करून त्यांची छाती दडपून टाकता कामा नये. त्यांच्या स्वत:च्या चालत आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक संस्था व रिती यांच्या विरोधात व स्पर्धेत आपण आपल्या संस्था व रिती यांच्या माध्यमातून परिवर्तन व विकास घडवून आणला पाहिजे.कोणती लक्ष्ये गाठली याची आकडेवारी वा किती पैसा खर्च केला याचे आकडे या मापदंडांनी आपण आपल्या कामगिरीचे मोजमाप करता कामा नये. चारित्र्य व शिल यांचा विकास व उंची या कसोटयांवर आपण आपल्या योजना व उपक्रम यांचे यश मोजले पाहिजे अशाप्रकारे पंचशील तत्वे आदिवासींब-ल पंडित नेहरू यांनी सांगितले.

### १.४.४. पंडित जवाहरलाल नेहरू व ठक्कर बाप्पा यांचा एकात्मिकरणाचा दृष्टिकोण"[४०]

व्हेरीअर एल्विन यांचे अलिप्ततावादी धोरण व डॉ.घुर्ये यांचे सामिलिकरणाचे धोरण या दोन्हीत आढळून येणा-या त्रुटी दूर करण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी एकात्मीकरणाचा पुरस्कार केला तो पुढीलप्रमाणे. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारत सरकारने आदिम समाजाचे सांस्कृतिक वेगळेपण कायम टिकवून त्यांचा सर्वांगीन विकास साध्य करण्याची जबाबदारी आदिम लोकांवरच सोपविली. डॉ.घुर्ये यांचा सामीलिकरणाचा दृष्टिकोण आदिम समाजाच्या सर्वांगीन विकासाशी जरी निगडीत असला तरी आदिम समाजाच्या संस्कृतिचे वेगळेपण टिकविण्यास उपयुक्त ठरणार नाही, कारण सुसंस्कृत व प्रगत समाजाशी आदिम संपूर्ण विलिन झाल्यास प्रगत समाजाचेच प्रभुत्व आदिम समाजावर पडू शकेल व याचा अनिष्ठ परिणाम आदिम मूल्यांवर होण्याची दाट शक्यता आहे. असे मत विचारवंतांचे आहे. प्रगत समाजात प्रचलीत असणारी भौतिक व व्यक्तीवादाची

संकल्पना ही आदिम समाजाच्या सामूहिक वादाच्या संकल्पनेवर आघात करण्याची शक्यता व्यक्त केली जाते. निसर्गाच्या सानिध्यात राहून स्वाभाविक पध्द्तीने जिवन कंठण्याची प्रवृत्ती नष्ट होईल व आदिम समाज भौतिकवादाकडे झुकेल अशी शंका व्यक्त करण्यात आली, म्हणून अतिरेकी अलिप्तवादी धोरण व अतिरेकी सामिलीकरणाचे धोरण यात सुवर्णमध्ये साधण्याचा प्रयत्न भारत सरकारच्या एकात्मीकरणाच्या धोरणात साधलेला आहे व तोच मार्ग आदिम समाजाच्या कल्याणासाठी व सांस्कृतिक वेगळेपण टिकविण्यासाठी उपयुक्त ठरणारा आहे.

## १.५. भटक्या विमुक्तांच्या चळवळी-

भारतीय समाज व्यवस्थेचा विचार केला तर विविधता हे भारतीय समाजव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे.या विविधतेमुळे समाजात विषमता निर्माण झालेली दिसते ही विषमता जाती, धर्म, जमाती, संस्कृती, वंश, भाषा यांच्या संदर्भात जाणवते. यातुन समाजात श्रेष्ठ कनिष्ठता जाणवते व यातुनच शोषणाची प्रक्रिया सुरु होताना दिसते. व जेथे शोषण अस्तित्वात असते तेथे 'शोषणाविरुध्द बंडही पुकारले जाते.' व बंडांची सुरुवात मोर्चे व चळवळीच्या माध्यमातुन होते. असे मत कार्ल मार्क्स या विचारवंताचे आहे.

**सामाजिक चळवळींची व्याख्याः-**

भटक्या विमुक्तांच्या चळवळी जाणून घेण्यापुर्वी सामाजिक चळवळींच्या व्याख्या जाणून घेवू

**१) टर्नर आणि किलियनः-**"एकत्रित आलेले अनेक लोक ज्या समुहाचे किंवा समाजाचे घटक भाग असतात, त्यात परिवर्तन घडून आणण्यासाठी किंवा परिवर्तनाला विरोध करण्यासाठी जेव्हा काहीशा सातत्याने कार्यरत असतात तेव्हा त्याला सामाजिक चळवळ असे म्हणतात."[४१]

**२) रुडॉल्यु हेबेर्ले**:- "एखादया समाजातील प्रस्थापीत संबंधात रुपांतरण (किंवा परिवर्तन) घडवून आणण्यासाठी केलेले सामूहिक प्रयत्न. "[४२]

**३) ड्रेसलर आणि विलिस**:- "अनेक लोक हेतुपुर्वक आणि सामुहिकरीत्या परिवर्तन घडवून आणण्याचा जेव्हा प्रयत्न करतात तेव्हा त्याला सामाजिक चळवळ असे म्हणतात."[४३]

**४) हर्बर्ट ब्लुमेर**:- "सामाजिक जीवनाची नवी व्यवस्था प्रस्थापीत करण्यासाठी करण्यात येणारा सामुहिक प्रयत्न. "[४४]

वरील व्याख्यांवरुन असे दिसून येते की,

१.सामाजिक चळवळीत अनेक लोक एकत्र येवून, जाणीवपूर्वक आणि हेतुत: सामुहीक प्रयत्नांद्वारे सामाजिक परिवर्तनाला प्रभावीत करणारी एखादी कृती करतात.

२.अशी सामूहिक कृती एकतर सामाजिक परिवर्तन घडून यावे यासाठी असते किंवा होणा-या परिवर्तनाला प्रतिकार किंवा विरोध करण्यासाठी असते.

३.असे सामूहिक प्रयत्न सातत्याने होत राहणे किंवा सापेक्षत: दिर्घकाळ चालु राहाणे अभिप्रेत असते.

४.चळवळीत अंतर्भुत असणारे सामूहिक प्रयत्न कमी-अधिक संघटीत स्वरुपात असणे अभिप्रेत असते.

५.सामाजिक चळवळीतील लोक असंस्थीकृत साधनांचा किंवा मार्गांचा सामान्यत: वापर करतात.

६.या चळवळी गतिशील असताता. त्यांना निश्चीत असे आयुष्य नसते. त्या कधी निर्माण होती किती काळ सुरु राहतील हे निश्चित सांगता येत नाही.

७.या चळवळी असंघटीत स्वरुपाच्या असतात. प्रत्येक चळवळीला एक विशिष्ट विचार प्रणाली असते.

प्राप्त परिस्थिती विषयी लोकांच्या मनात निर्माण होणे आपल्या सारखेच इतरही लोक असमाधानी आहेत अशी त्यांच्यात जाणीव निर्माण होणे प्राप्त परिस्थितीत आपण सामूहिक प्रयत्नांद्वारे बदल घडवून आणू शकतो असा विश्वास लोकांच्या मनात निर्माण होणे.यातून सामाजिक चळवळीची निर्मिती होते.

- **भटक्या विमुक्तांच्या चळवळींचा आढावा** -

भटके व विमुक्त हे भारतीय समाज व्यवस्थेचा एक महत्वपुर्ण भाग आहे. गावगाडा व समाजव्यवस्थेत त्यांना कोणतेच स्थान न मिळाल्याने उपेक्षीत जीवन जगावे लागले त्यातील काही लोकांना शोषणाची व उपेक्षीत जगण्याची जाणीव होऊन त्यांनी स्वत:च्या हक्कांसाठी चळवळी निर्माण केल्या त्याब-ल डॉ. दिपक पवार असे लिहितात की यांच्या चळवळी बाबात ११ एप्रिल १९६० रोजी महाराष्ट्रातील सोलापूर येथे अखील भारतीय स्तरावर भटके व विमुक्त जाती फेडरेशनचे अधिवेशन भरविण्यात आले. या अधिवेशनाकरीता सोलापुर सेटलमेंटची जागा मुद्दाम निवडण्यात आली होती. या अधिवेशनाला स्वतंत्र भारतातचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु

आले होते. त्यांनी त्यांच्या उद्‌घाटनपर भाषणात सांगीतले की, “आजपासून गुन्हेगारी जमात कायदयातुन तुम्ही मुक्त झाला आहात, परंतु मनुष्य म्हणून जो पर्यंत तुम्हाला सुखाने जगता येत नाही, तुमचे पुनर्वसन होत नाही तो पर्यंत मी तुमच्या बंधनात राहिल.”[४५] परंतू असे झालेले दिसत नाही हया अधिवेशनास संपूर्ण देश भरातून विविध भटक्या जमातीचे लोक महाराष्ट्र सोडून इतर राज्यातून देखील या जमातीचे कार्यकर्ती व नेत्यांनी हजेरी लावली होती. व १९६१ ला महाराष्ट्र शासनाने भटक्या विमुक्तांकरीता शिक्षण व नोकरीत ज्या चार टक्के जागा राखीव केल्या हे वरील अधिवेशनाचेच फलीत होय. १९६१ नंतर ११ सप्टेंबर १९६५ ला औरंगाबादला भटक्या विमुक्तांचे राष्ट्रीय पातळीवरील अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनाचा उद्देश महाराष्ट्रभर विखुरलेल्या भटक्या विमुक्तांमध्ये संघटनात्मक जाणिव निर्माण होऊन संघटन तयार करणे हा होता. १९६९-७० या वर्षात संघटनेची बांधणी चांगली होऊन संघटनात्मक कार्यात चांगला जोश निर्माण झाला होता. १९७२ ला वडार समाजाचे अधिवेशन पुण्याला झाले. १९७२ ला कैकाडी समाजाचे अधिवेशन पुण्याला घेण्यात आले. १९७३ ला मांग गारुडी समाजाचे अधिवेशन घेण्यात आले. महाराष्ट्रात १९७२ पासून भटक्या-विमुक्त संघटनेच्या कार्यकर्त्यांनी संघर्षमय चळवळी सुरु केल्या. यात ठिकठिकाणी मोर्चे, जनजागृती, समाज प्रबोधन, आंदोलने करण्यात आली. अनेकदा मंत्री व  अधिका-यांना निवेदनाद्वारे भटक्या विमुक्तांच्या समस्या व मागण्यांची माहिती दिली. पण फारसा परिणाम मिळाला नाही. तेव्हा आंदोलन पुन्हा तिव्र करण्याचे ठरले. व याकरीता ॲड. बी. एस. गोकराळ, दौलतराव भोसले आणि बाळकृष्ण रेनके यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे भटक्या विमुक्तांची भव्य परिषद घेण्यात आली. मुंबईच्या या परिषदेमुळे भटक्या विमुक्त जमातीत जनजागृती होण्यास मदत झाली. गुन्हेगार व भिकारी जात म्हणुन संशयित व तुच्छ दृष्टिकोण बदलला जावा या करिता ‘संशय-निर्मुलन परिषद‘ ११ व १२ फेब्रुवारी १९८३ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. या परिषदेला राज्यातील सर्व राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते, सामाजिक शास्त्रातील कार्यकर्ते, अभ्यासक, पोलिस, न्यायाधीश इत्यादी मंडळींना जाहीर निवेदन देण्यात आले होते. या परिषदेला खुप चांगला प्रतिसाद मिळाला त्यावेळी माननीय शरद पवार यांच्या हस्ते कलंकीत भिक्षेची झोळी आणि हातकडी यांचे सार्वजनिक दहन करण्यात आले. यात शेकडो तरुणांनी कलंकीत जीवन सोडून देण्याची, चांगले जीवन जगण्याची प्रतिज्ञा केली. या

परिषदेसमोर माननीय शरद पवार म्हणाले की "ज्या वर्गाचे लोक तुम्हास त्रास देतात, छळतात त्यांचा एक प्रतिनिधी म्हणून मी आपल्या कस्टडीत उभा आहे. आपण चांगले जीवन जगण्याची घेतलेली प्रतिज्ञा पूर्ण व्हावी म्हणून मी प्रयत्न करीन. यापुढे जातीच्या नावावार आपला छळ होणार नाही. आपण तो होऊ देणार नाही."[४६] या परिषदेमुळे भटक्या व विमुक्त लोकांना एक प्रकारची संजीवनी प्राप्त झाली. व त्यांच्यात नवीन प्रेरणा उत्पन्न झाली. यानंतर देखील समाजात होणा-या छळाला कंटाळून समाजातील जीवनापेक्षा 'तुरुंग हेच आमचे घर आहे' असे म्हणत व जेल बाहेरील जीवन शासनाच्या निष्काळजी पणामुळे जगणे अशक्य आहे असे म्हणून १४ नोव्हेंबर १९८३ ला नाशिक येथील सबजेलवर भटक्या-विमुक्तांनी 'तुरुंग बि-हाड मोर्चा' काढला. हा मोर्चा खुप गाजला. याची दखल प्रसार माध्यमांनी घेतली. त्यानंतर भटक्या विमुक्तांमधील युवकांनी औरंगाबाद येथे राज्यव्यापी बैठक घेतली.आणि सर्व अगतीकतेला बाजूला सारुन संघर्ष करण्याकरीता १९८५ हे 'संघर्ष वर्ष' म्हणून जाहीर केले. व भटक्या विमुक्तांवर झालेल्या अन्याय अत्याचाराचे निवेदन शासनाला सादर केले. २६ जानेवारी १९८५ ला प्रजासत्ताकदिनी, औरंगाबादच्या कमीश्नर कार्यालयावर 'बि-हाड मोर्चा' नेण्यात आला. या मोर्चात हजारो भटक्या-विमुक्तांची बि-हाडे आपल्या समाजाच्या पारंपारिक वेशभुषेत आपल्या मुलाबाळांसह पशुपक्षांसहीत सामिल झाले. त्यांनी एका वेगळया पध्दतीने प्रजासत्ताक दिवस साजरा केला होता. ज्या देशात लोकशाही आहे प्रजेची सत्ता आहे. त्या देशाच्या प्रजेचा एक भाग असणा-या भटक्या विमुक्तांच्या छळाब- लच्या निषेधासाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. "स्वातंत्र्याचे झाले काय ? आमच्या दारी आले नाय ? यह आझादी झूठी है,सही आझादी आनी है " [४७] असे मत भटक्या विमूक्तांनी व्यक्त केले "गांव दया, शिवार दया, शिक्षण दया, कर्ज दया.'पोलीस छळ त्वरीत थांबवा, नाहीतर आम्ही आता थांबणार नाही, घेतल्याशिवाय मरणार नाही."[४८] अशा पध्दतीने घोषणा देत शासनाच्या नावाने बोंबा मारत १५ ऑगस्ट १९८५ ला मराठवाडा विभागातर्फे औरंगाबाद कमीश्नर कार्यालयावर 'बोंबाबोंब मोर्चा' नेण्यात आला. व कोणत्याही प्रकारचे निवेदन न देता स्वातंत्र्यदिनी शासनाचा धिक्कार करण्यात आला. १४ नोव्हेंबर १९८५ रोजी पंडीत नेहरुंच्या जयंतीदिनी संपूर्ण राज्यभर संसार चालू रस्ता बंद आंदोलन करण्यात आले. या दिवशी भटक्या विमुक्तांनी सर्वत्र फलके लावून आपली बि-हाडे थाटली चूली पेटवल्या व रस्त्यावर जेवण

करुन पंडीत नेहरुंची जयंती असा लक्षवेधी कार्यक्रम घेवून साजरी केली. समाजाचे व शासनाचे लक्षण वेधणे हा या मागील हेतु होता. जालना जिल्हयातील परतुर मुक्काम ११ जून १९८७ ला 'राज्यस्तरीय पारधी परिषद' घेण्यात आली. या परिषदेला वॉन्टेड हिस्टरी सिटर, तडीपार, संशयीत गुन्हेगार मोठया हिंमतीने उपस्थित होते. अंदाजे पाच हजार पारधी उपस्थित होते. यातील अनेक पारध्यांनी मनोगत व्यक्त करतांना म्हटले की, "आम्ही चोर गुन्हेगार नाहीत पोलीसच आम्हाला गुन्हेगार ठरवीतात, खोटा आरोप ठेवून कस्टडी देतात, पोलिसांच्या छळापासून वाचवा. "[४९] या परिषदेत गुन्हेगारी जमाती कायदा जो आजही महाराष्ट्रात राबवीला जातो त्याचा अभ्यास करुन या जमातीलाच संरक्षण देणारा नवा कायदा करावा अशा प्रकारचा ठराव या परिषदेत करण्यात आला. या परिषदेच्या निमित्ताने मोठया प्रमाणात पारधी एकत्र आले. ही परिषद ऐतिहासिक ठरली.

भटक्या विमुक्त जमातीचे लोक हे भुमीपुत्र आहेत. ते चोर गुन्हेगार, भिकारी कसे झाले ? त्यांची शिवारे कुठे आहेत ? त्यांची झोपडीसुध्दा कशी नाही ! राज्य शासनाने त्यांचे गाव शिवार कुठे आहे ते दाखवून दयावे. या करीता ११ ऑक्टोबर १९८७, चाळीसगावला बि-हाड अधिवेशन घेण्यात आले. या दिवशी हजारो बि-हाडे आपल्या मुलाबांळां व पशुपक्षांसह चाळीसगाव येथे जमा झाली. "मागून मागून आमचा जन्म गेला. आता आम्ही मागणार नाही. आमचे हक्क आम्ही हिसकावून घेवू, त्याशिवाय आमचे गांव शिवार दिसणार नाही. आमचे गाव शिवार आता आम्हीच उभे करणार आहोत."[५०] असा ठराव करुन शासनाला नोटीस दिली.आंदोलने, अर्ज, विनंत्यांची शासन दखल घेत नाही, त्यामुळे सनदशीर मार्ग व लोकशाही वरील विश्‍वास राहणार नाही. याला शासनच जबाबदार असेल. असे या नोटीशीत सांगण्यात आले.

प्रा. मोतीलाल राठोड यांच्या नेतृत्वाखाली भटक्या विमुक्तांच्या वतीने २५ एप्रिल १९८८ रोजी मुंबई उच्च न्यायालयात केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात 'गुन्हेगारी जमाती कायदा व सवयीचा गुन्हेगार कायदा' या दोन्हींना आव्हान देणारी याचीका दाखल झाली. भटक्यांनी दाखल केलेली याचीका ही एक फार महत्वपूर्ण आणि ऐतिहासिक घटना होती. भटक्या विमुक्तांच्या प्रश्‍नांची गंभीरता व तिव्रता लक्षात घेवुन ३ ऑगस्ट १९८८ रोजी न्यायमुर्ती प.रा.सावंत आणि

न्यायमुर्ती कंथरीया यांनी अंतरीम आदेश म्हणून फार महत्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय दिला. ‘जात हाच पुरावा समजून चाललेला छळ त्वरीत थांबवावा. कोणताही पुरावा नसतांना अटक करु नये. रात्री बेरात्री त्यांच्यावर धाडी टाकू नये. कित्येक जिवघेणी जाचक कलमे, जसे दाखला पध्दत, हजेरी पध्दत, उठसुट अटक, हिस्टरी सीट पध्दती त्वरीत बंद करण्याचा आदेश न्यायमुर्तींनी दिला. १७७१ नंतर १९८८ मध्ये एकशे सतरा वर्षानंतर प्रथमच भटक्यांची दखल न्यायव्यवस्थेने घेतली. इतकेच नव्हे तर भटक्यांकरीता इंग्रजांच्या काळात असलेल्या शेकडो एकर जमिनी भटक्यांना मिळावी म्हणून ‘सेटलमेंट केंद्राची’ चौकशी करण्यासाठी न्यायालयाने आपल्या अधिकारात एक कमीशन नियुक्त केले. अशाप्रकारे भटक्या-विमुक्तांना न्यायालयाच्या न्यायामुळे दिलासा मिळाला. त्यांच्यात उत्साह निर्माण होऊन स्वविश्वास वाढला. याच बरोबर या घटनेमुळे भटक्या विमुक्तांच्या मुलभुत समस्यांची जाणीव सर्व समाजाला झाली.

३१ मार्च १९८९ ला महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्तांची परिषद सोलापूरला घेण्यात आली. या परिषदेत भटक्या-विमुक्तांचे अनेक नेते आणि लाखोंच्या संख्येने भटके विमुक्त उपस्थित होते. या परिषदेला तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.शरद पवार व पंतप्रधान मा.राजीव गांधी हजर होते. या वेळी भटक्या विमुक्तांच्या वतीने नेत्यांना विस्तृत निवेदन दिले. पण त्याचा नंतर काहीही परिणाम झाल्याचे दिसत नाही. अशा प्रकारे अनेक भटक्या विमुक्तांचे नेते, कार्यकर्ते, भटके-विमुक्त युथ फ्रंट इत्यादीच्या माध्यमातुन संघटन, परिषदा, मेळावे, अर्ज विनंत्या निवेदने सुरु आहेत. फार कमी प्रश्न मार्गी लागले. अनेक प्रश्न कायम आहेत. नवे प्रश्न निर्माण होत आहेत. २००६ मध्ये मा. बाळकृष्ण रेणके यांच्या अध्यक्षतेखाली भटक्या विमुक्तांची स्थिती जाणून घेण्यास शासनाने स्वातंत्र्यानंतर प्रथमच आयोगाची स्थापना केली. आयोगाने आपला अहवाल मा. पंतप्रधान मनमोहनसिंग यांना जुलै २००८ मध्ये सादर केला. भटक्या विमुक्तांच्या विकासा करिता ७६ शिफारशी यात करण्यात आल्या. परंतु शासनाने हा अहवाल उघडून बघितला की नाही अशी शंका या आयोगाचे अध्यक्ष बाळकृष्ण रेनके यांना वाटते. सरकारकडे सातत्याने पत्रव्यवहार करुनही प्रतिसाद मिळत नाही.सरकारकडून अहवालावर विचार करीत असल्याचे उत्तर रेनके यांना मिळत आहे. या अहवालावर अजुनही अंमलबजावणी झालेली नाही.

## १.६ सारांशः-

उपरोक्त प्रकरणांतर्गत आदिवासी, भटके व विमुक्त समाज हे भारतीय समाज व्यवस्थेचे अविभाज्य असे वैशिष्टये कसे आहे हे दिसते. प्रत्येक आदिवासी जमातीच्या बोलीभाषा, संस्कृती व सामाजिक व्यवहार हे परस्परांपासून भिन्न आहे. समूह करुन राहाणे ही मानवाची प्रथमपासूनची प्रवृत्ती आहे. परस्पर सहकार्य लाभावे हे त्या मागील मुख्य कारण आहे. आदिवासी समूहांना वनवासी समूह म्हणूनही संबोधले जाते. आदिवासी समूहांचे वर्गिकरण हे कॉकेसॉइड, मंगोलॉईड, निग्रॉईड ऑस्ट्रेलॉइड, नॉर्डीक आणि मेडीटरेनियम असे होतांना दिसते. या आदिवासी भारताच्या पूर्व, पश्चिम व दक्षीणोत्तर भागात वास्तव्यास असून जगातील इतरही देशांत यांचे वास्तव्य असलेले दिसते. भारतात असणाऱ्या आदिवासींचे अनेक सामाजिक, आर्थिक प्रश्न असलेले दिसत येतात. २०११ च्या जणगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची एकूण लोकसंख्या ही राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ८.८७ टक्के एवढी आहे. म्हणजेच १ कोटी ५ लाख एवढी आहे. देशाच्या एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ५.१ टक्के आदिवासी हे महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्र राज्यात आदिवासींच्या एकूण ४७ जमाती आहेत. या आदिवासी जमातीचा आजही (मोठया प्रमाणात) हवा तसा विकास झालेला नाही. आदिवासी युवक आजही बऱ्याच अंशी शिक्षणापासून दूर आहेत. भारतीय म्हणून जीवन जगणारे आदिवासी सामाजिक विवंचनेत जीवन जगतांना दिसत आहेत.

आदिवासी प्रमाणेच भटके व विमुक्त समूह हे देखील भारतीय लोकसंख्येचा मोठा हिस्सा आहेत. महाराष्ट्रात भटक्या जमातींची एकूण लोकसंख्या ही ३७ इतकी आहे. महाराष्ट्रातील भटक्या जमाती क्र. (N.T.C.) अ. क्र. २९ मध्ये धनगर समाजाचा समावेश होतो. यात एकूण २५ उपजमातींचा समावेश आहे. तसेच महाराष्ट्रातील भटक्या जमाती ( N.T.D.) मध्ये अ. क्र. ३० वंजारी या जमातीचा समावेश होतो व महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास केलेल्या शिफारशीनुसार बागडी या जमातीचा भटक्या जमाती 'ब' मध्ये शासकीय यादितील अ.क्र. ३८ वर नव्याने समावेश केला आहे. महाराष्ट्रात भटक्या जमातींप्रमाणेच विमुक्त जमातींची संख्या १४ इतकी आहे. प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेली पारधी ही जमात विमुक्त जमातीत समाविष्ट असलेली दिसते.

भारतात भटक्या व विमुक्त जमाती या ब्रिटीश कालीन गुन्हेगार जमातीच आहेत. स्वातंत्र्योत्तर भारतात या जमाती मोठया प्रमाणावर स्वत:च्या हक्कासाठी संघर्षमय झाल्या बरेच

मोर्चे व आंदोलने आतापर्यंत या जमातींनी केलेले आहेत परंतु यांची दखल आजतागायत पाहिजे तितक्या प्रमाणात झालेली नाही. डॉ. जी. एस. घुर्ये यांनी आदिवासी जमातीब- ल सामीलीकरणाचा दृष्टीकोण मांडला आहे की जेणे करुन या जमातींना मुळ सामाजिक प्रवाहात सामावून घेतले जावे. परंतु आजही पाहिजे तितक्या प्रमाणात या सर्वच जमातींबाबत सामीलीकरणाची प्रक्रिया पाहिजे तितक्या प्रमाणात यशस्वी झालेली नाही. सदर विषया संदर्भात संशोधन करतांना जे पध्दतीशास्त्र उपयुक्त ठरते त्या पध्दतीशास्त्राची मांडणी ही संशोधन विषयाच्या प्रकरण क्रमांक दोन मध्ये सविस्तर पणे केलेली आहे.

## १.७. प्रकरणांची मांडणी :-

*"महाराष्ट्रातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास: विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा."* या संशोधन विषया संबंधित सर्व घटकांचा समाज शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला व विषयाचे अहवाल लेखन घटकनिहाय करण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रकरण नियोजन केले आहे.

### प्रकरण १ ले- प्रस्तावना

या प्रकरणात समाजशास्त्रात समुहांच्या अभ्यासाचे महत्व, भारतातील वांशिक समूहांचे वर्गीकरण, आदिवासी जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जमातींचा अर्थ, नावे तसेच आदिवासी समूहाब- ल चे विविध दृष्टिकोण, डॉ.घुर्ये यांचा सामिलीकरणाचा दृष्टिकोण, व्हेरीएल एल्विन यांचा अलिप्तवादाचा दृष्टिकोण, पंडित जवाहरलाल नेहरू यांचे पंचशील, नेहरू व ठक्कर बाप्पा यांचा एकात्मिकरणाचा दृष्टिकोन, व या दृष्टीकोणांमूळे या जमातीच्या वंचीततेत काही सूधार आला आहे का नाही हे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे तसेच भटक्या विमुक्तांच्या चळवळी इ. घटकांची माहिती दिलेली आहे.

### प्रकरण २ रे - संशोधन साहित्याचा आढावा व संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधन विषयाच्या दुस-या प्रकरणात सदर संशोधन विषया बाबत पुर्वी झालेले समातशास्त्रीय लिखान, या विषया संदर्भात विविध व्यक्तीनी केलेले संशोधने, तसेच विविध मासिके व साप्ताहीकातुन केलेले संशोधनात्मक लिखान व वर्तमान पत्रातुन या जमाती बददलचा सद्यस्थीती दर्शविणारे लेखांचा संदर्भ घेतलेला आहे. तसेच अभ्यास विषयाचे महत्त्व आणि गरज,

संशोधनाची उद्दिष्टे, महाराष्ट्र राज्य व अहमदनगर जिल्हयाचा तपशील, तसेच सदर संशोधनासाठी वापरलेल्या संशोधन आराखडया बाबतची मांडणी करताना विविध संशोधन टप्प्यांची विस्तृतपणे मांडणी करून संशोधन समस्या, संशोधनाच्या मर्यादा, संशोधन पध्दती, नमुना निवड, संशोधन क्षेत्राची निवड, तालुक्याची, गावाची, कुटूंबाची निवड, संशोधनासाठी अवलंबिलेली पध्दती व तंत्रे, तथ्य संकलन, अहवाल लेखन, संशोधन साहित्याचा समाजशास्त्रीय विस्तृत आढावा व या संशोधनासाठी रॉबर्ट मर्टन यांचा सापेक्ष वंचितांचा सिध्दांत व फ्रॅन्कलीन टेनेनबम यांच्या नामाभिदानसिध्दांताच्या समाजशास्त्रीय दृष्टीकोणाची संदर्भ चौकट कशी उपयुक्त ठरते याची मांडणी केलेली आसुन, संशोधन अहवालाची उपयुक्तता इ. घटकांची माहिती देवून आज पर्यंत या विषयावर जी संशोधने झाली त्या पेक्षा हे संशोधन कसे भिन्न आहे हे मांडलेले आहे.

**प्रकरण ३ रे - पारधी जमातीची ओळख**

सदर प्रकरण हे गुणात्मक तथ्य विश्लेषणाधारीत असून या प्रकरणात पारधी जमातीची पार्श्वभूमी, पारधी समाजातील उपजाती, भाषा, गुन्हेगार जमात कायदा व पारधी, भारतातील पारधी जमातीचे लोकसंख्येच्या आधारे राज्यनिहाय वितरण, धर्मनिहाय वितरण, भाषिक वर्गीकरण इ. पारधी जमातीतील स्त्रीयांचे स्थान, पारधी विकास योजना या घटकांची माहिती दिली आहे.या प्रकरणात पारधी समाजाच्या सामाजिक जीवनात पारध्यांची कुळे, विवाहपध्दती, कुटूंबपध्दती, आठवडे बाजार, वेशभूषा, चोरी, जीवनकला, शिकार व सण समारंभाचे महत्व, व्यवसाय व साधने तसेच सांस्कृतिक व धार्मिक विधी व पारधी समाजाची आर्थिक संरचना इ. घटकांब-ल माहिति दिलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात पारधी जातपंचायतीचे स्वरूप व इतिहास व जातपंचायत विरोधी महाराष्ट्र सरकारचा कायदा व त्याचा परिणाम इ.घटकांची माहिती मुलाखत तंत्राद्वारे मिळवून मांडलेली आहे. सदर प्रकरणात लोकसाहित्याचा अर्थ, लोकसाहित्य आणि समाज यांचा संबंध, लोकसाहित्याचे स्वरूप यात लोककथा, पारधी जमातीतील लोककथा, पारधी जमातीतील लोकगीते, पारधी जमातीतील म्हणी व वाक्प्रचार, रूढी, परंपरा, शकून-अपशकून, भाषिक शब्द, सांकेतिक भाषा इ. घटकांची माहिती दिलेली आहे.या सर्व बाबींची माहीती मांडून या समाजाच्या वंचीततेस कोणती कारणे जबाबदार आहेत हे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्रकरण ४ थे पारधी समाजाबद्दल सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक बार्बीविषयक संख्यात्मक तथ्यांचे विश्लेषण**

प्रस्तुत प्रकरणात प्राथमिक स्त्रोत : ंच्या आधारे संकलित केलेल्या संख्यात्मकतथ्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे संशोधन विषयाला अनुसरून वस्तुनिष्ठ पध्दतीने केलेल्या संख्यात्मक तथ्यांचे तक्त्यांच्या साहय्याने संख्याशास्त्रीय दृष्टया निष्कर्ष काढले आहे. संशोधन विषयाला अनुसरून वैयक्तिक माहितीचे विश्लेषण, कौटुंबिक माहितीचे विश्लेषण, शैक्षणिक माहितीचे विश्लेषण, आर्थिक माहितीचे विश्लेषण, आरोग्य विषयक माहितीचे विश्लेषण, शासकीय योजना व सवलती विषयक माहितीचे विश्लेषण, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जिवन विषयक माहितीचे विश्लेषण, पोलीस पारधी यांच्यातील संबंधा विषयक माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**प्रकरण ५ वे संशोधन निष्कर्ष आणी शिफारशी**

प्रस्तुत प्रकरणात पारधी समाजाच्या अभ्यासाच्या आधारे उपलब्ध झालेल्या माहितीनुसार प्रकरणांच्या मांडणीतून या समाज्या विषयी प्राप्त निष्कर्ष मांडलेले आहेत व काही शिफारशी प्रस्तुत प्रकरणात सूचवीलेलया आहेत.

- **संदर्भ सूची**

१.साळुंखे सर्जेराव,'*समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना* ', नरेंद्र प्रकाशन, पुणे,२००६ पृष्ठ क्र.५८.

२.तैत्रव, पृष्ठ क्र.२२.

३.तैत्रव, पृष्ठ क्र.१९१.

४.तैत्रव, पृष्ठ क्र.१९१.

५. तैत्रव, पृष्ठ क्र.१९३.

६.कूलकर्णी पी.के. आणि खैरनार दिलीप, ' *समाजशास्त्र परिचय*', प्र.आ., डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१३ पृष्ठ क्र.१०८.

७.रावत हरिकृष्ण,'*समाजशास्त्र विश्वकोश*', रावत पब्लिकेशन्स, जयपुर,१९९८,पृष्ठ क्र.१४६,.

८. तैत्रव, पृष्ठ क्र. १४९

९.नाडगोंडे गुरुनाथ , '*भारतीय आदिवासी*', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००३,पृ,क्र.५

१०.गिलीन आणी गिलीन, '*कलचरल सोशिओलॉजी*', द मॅकमीलन को, न्युयॉर्क, १९५०,पृ.क्र.२८२

११.नाडगोंडे गुरूनाथ, '*भारतीय आदिवासी*', कॉटीनेंन्टल प्रकाशन, पुणे, १९८६ पृष्ठ क्र. १४९.

१२.कोंडेकर आशोक, '*समाजशास्त्र*', के.सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००७, पृष्ठ क्र. १६९

१३.तैत्रव, पृष्ठ क्र. १६९.

१४.देवगावकर शैलेजा आणी देवगावकर शं.गो.,'*आदिवासी विश्र्व*', आनंद प्रकाशन, नागपूर, प्र.आ., २००१, पृष्ठ क्र.२.

१५.घुर्ये जी.एस., '*द शेडयुल टईब्ज*', द्वि.आ.,पॉप्युलर बुक डेपो, बॉंबे, १९७७,पृ.क्र ९

१६.काचोळे दा.धो, '*नागरी समाजशास्त्र आणि मानवशास्त्र*', प्रथमावृत्ती,कैलास. पब्लिकेशन्स,गोकूळवाडी औरंगपूरा, औरंगाबाद, २०११, पृष्ठ क्र.११४,११५

१७. तैत्रव, पृष्ठ क्र.१०६.

१८. तैत्रव, पृष्ठ क्र.१०६.

१९. तैत्रव, पृष्ठ क्र.१०६.

२०. तैत्रव, पृष्ठ क्र.१०६.

२१. तैत्रव, पृष्ठ क्र.१०६.

२२. तैत्रव, पृष्ठ क्र १०५.

२३. तैत्रव, पृष्ठ क्र.११४,११५

२४.रिसले एच.एच., '*द पिपल ऑफ इंडीया*', कलकत्ता. १९६८

२५.साळूंखे संजय., '*आदिवासी समाजशास्त्र*', कैलास पब्लीकेशन्स, प्र.आ.,औरंगाबाद, २००९,पृष्ठ क्र.२२.

२६.नाडगोंडे गुरूनाथ, '*भारतीय आदिवासी*', काँन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, २००४,पृष्ठ क्र.५.

२७. तैत्रव, पृष्ठ क्र.३५३.

२८.साळूंखे संजय, '*आदिवासी समाजशास्त्र*', कैलास पब्लीकेशन्स, औरंगाबाद, प्र.आ.,२००९, पृष्ठ क्र.१२०.

२९. गार्गे, '*भारतीय समाज विज्ञान कोश*', खंड, ३. पृष्ठ क्र.१५६

३०. तैत्रव, पृष्ठ क्र. १५७.

३१.चव्हाण रामनाथ, '*भटक्या विमुक्तांची जात पंचायत*'- खंड ४, देशमुख आणि कं.पब्लीशर्स, पुणे, २००८,पृष्ठ क्र.१३.

३२.गजेंद्र गड व्ही.एन.व व्ही. एस.मारुलकर, '*समकालीन भारतीय समाजशास्त्र*', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०००, पृ.क्र.१७०.

३३.तैत्रव, पृष्ठ क्र.१७३

३४.L.P.Vidyarthi and Rai Binay Kumar The Tribal Cultural Of India, 2nd Edi., Concept Publishing Company, New Delhi. 1985, P. N0. ४१६,४१७

३५.गजेंद्रगड व्ही.एन.व व्ही.एस.मारुलकर, '*समकालीन भारतीय समाजशास्त्र*',फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०००, पृ.क्र.१७१

३६. तैत्रव, पृष्ठ क्र.१७१

३७.Hasan Needam , ‘*Tribal Indian’*, Phelak Publication , Delhi , 1991 P. No.१६२

३८. तैत्रव, पृष्ठ क्र.१६५.

३९. तैत्रव, पृष्ठ क्र.१४४.

४०.गजेंद्र गड व्ही.एन.व व्ही. एस.मारुलकर, ‘*समकालीन भारतीय समाजशास्त्र’*,फडके प्रकाशन,कोल्हापूर, २०००,पृ.क्र.१७१.

४१.साळुंखे सर्जेराव, ‘*समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना’*, नरेंद्र प्रकाशन, पुणे, पु.मू.२००६ पृष्ठ क्र.११२.

४२.तैत्रव, पृष्ठ क्र.११२.

४३.तैत्रव, पृष्ठ क्र. ११३.

४४.तैत्रव, पृष्ठ क्र.११३.

४५.पवार दिपक, ‘*पारधी समाजाचे अंतरंग’*, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, २०१४. पृष्ठ क्र.२०.

४६.तैत्रव, पृष्ठ क्र.२१.

४७.तैत्रव, पृष्ठ क्र.२२.

४८.तैत्रव, पृष्ठ क्र.२३.

४९.तैत्रव, पृष्ठ क्र.२४.

५०.तैत्रव, पृष्ठ क्र.२५.

# प्रकरण - दुसरे

# संशोधन साहित्याचा आढावा व संशोधन पध्दती

२.१ प्रास्ताविक

२.२ संशोधन क्षेत्र

२.३ संशोधन साहित्याचा आढावा

२.४ संशोधन आराखडा

२.५ संशोधन समस्या

२.६ संशोधनाची उद्दिष्टे

२.७ संशोधनाची व्याप्ती

२.८. संशोधनाची विषयाची उपयुक्तता व महत्व

२.९ संशोधनाच्या मर्यादा

२.१० सैध्दांतिक आधार

२.११ संशोधन पध्दती

- २.११.१ नमुना निवड
- २.११.२ तथ्य संकलन
- २.११.३ तथ्यांचे विश्लेषण

संदर्भ सूची

# प्रकरण - दुसरे

# संशोधन साहित्य आढावा व संशोधन पध्दती

## २.१ प्रास्तविक

सामाजिक शास्त्रातील कोणतेही संशोधन कार्य हाती घेतलया नंतर संशोधकाला संशोधन विषयाशी संबंधीत संशोधन साहीत्याचा मागोवा घेणे व योग्य ती संशोधन पध्दती ठरवणे क्रमप्राप्त आसते त्या दृष्टीने सदर प्रकरणाची मांडणी ही संशोधन साहित्य आढावा व संशोधन पध्दती या दोन भागात केलेली आहे. संशोधन साहित्याच्या मदतीने निवडलेलया संशोधन विषया संदर्भात अगोदर अस्तीत्वात आसलेलया साहीत्याने संशोधनाची दिशा ठरविता येते व आपले संशोधन कार्य हे इतर संशोधना पेक्षा वेगळे कसे आहे हे दर्शविता येते. योग्य संशोधन पध्दती पध्दतीच्या निवडीने हाती घेतलेलया संशोधन कार्याच्या योग्य निष्कर्षा पर्यत पोहचता येते तेंव्हा कुठलयाही संशोधन कार्यात या दोन ही बाबींना अतिशय महत्व आहे.

भारतात अनेक जाती, जमाती, धर्म, संस्कृती व विविध बोलीभाषा बोलणा-या लोकांचे वास्तव्य दिसून येते. काही सुपीक अशा मैदानी प्रदेशात राहतात तर काही डोंगर द-यात व अतिशय दुर्गम भागात राहतांना आढळतात.भारतीय समाज वरील परिस्थितीमूळे विषमतायुक्त आहे. भारतीय समाज व्यवस्थेचा विचार करता असे दिसून येते की जाती व्यवस्थेतीला लोक हे गावगाड्यात ब-यापैकी स्थिर जिवन जगतांना दिसतात. परंतु भारतीय समाजातील ज्या विविध जमाती आहेत त्यांच्या वाटयाला आजही भटकेपण आलेले दिसते त्या समाजव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात सामावलेल्या दिसत नाहीत.या देशातील विविधतेब-ल बोलतांना उत्तम कांबळे असे लिहतात की, ‘‘या देशाला एक नकाशा असला तरी या नकाशात अनेक देश आहेत.’’[१] या विधानावरून असे दिसते की, येथे अनेक संस्कृत्या, अनेक जाती, अनेक जमाती एकत्रित नांदतांना दिसतात. प्रत्येक जमाती व जातीनुसार सांस्कृतिक विविधतेचा प्रत्यय येतो. यातून काही जाती या गावगाडयात तर काही गावगाडया बाहेर दिसतात. या सर्व समूहांचे वेगळेपण हे त्यांच्या संस्कृतीच्या अभ्यासावरून दिसून येते. भारतात चातुवर्ण्य व्यवस्थेतून जन्माला आलेली जाती व्यवस्था सामाजिक विषमतेस मोठया प्रमाणावर कारणीभूत ठरली. या व्यवस्थेमुळे भारतीय समाजातील निम्न जातींना बऱ्याच प्रमाणात सामाजिक विषमतेला बळी पडल्याही भारतीय समाजाच्या गावगाडयातील स्थिती होती.

परंतु जे गावगाडयात नाहीत म्हणजे गावगाडया बाहेर आहेत, ते भारतीय समाज व्यवस्थेत जास्त दुर्लक्षित झालेले दिसतात. त्यांच्या वाटयाला आजही भटकेपण आलेले आहे. वास्तविक पहाता भारतीय लोकसंख्येचा ते एक महत्त्वपूर्ण भाग आहेत.हे समाज भटके विमुक्त समाज म्हणून ओळखले जातात. भारतीय समाजाचा एक मोठा भाग असलेल्या या समाजाला वर्षानुवर्ष हालाखीचे जीवन जगावे लागले आहे.भारतीय समाजातील निम्न जातीच्या वाटयाला जितकी उपेक्षा आली नाही, तितकी या भटके विमुक्त समाज्याच्या वाटयाला आलेली दिसून येते. त्याच्या वाटल्या आलेल्या या उपेक्षेबाबत उत्तम कांबळे असे मत व्यक्त करतात की,"असंख्य भटक्या जमाती आजही फाटंक आभाळ आणि पायांखाली दुभंगलेली जमीन घेऊन भाकरीच्या तुकडयासाठी गावोगावी फिरतात."[२]

वरील विवेचनाचा विचार केला तर समाज व्यवस्थेतील जाती व्यवस्थेत निम्न जातींच्या झालेल्या शोषणाच्या तुलनेत या जमातींना अनेक हाल अपेष्टांना सामोरे जावे लागत आहे. व स्वातंत्र्योत्तर भारतात देखील ही परिस्थिती दिसत आहे. एक समाज स्थिरतेचे जीवन उपभोगतो आहे तर दुसरा समाज वर्षानुवर्ष दोन वेळचे अन्न मिळविण्यासाठी संघर्ष करताना दिसत आहे. ही स्थिती देशाच्या विकास प्रक्रियेत बाधा उत्पन्न करणारी आहे. ही परिस्थिती सुधारणे व सर्वांना समान संधी मिळणे फार गरजेचे आहे. या लोकांच्या अज्ञानाचा व दारिद्रयाचा वापर राजकीय स्वार्थासाठी, वसाहतवादी धोरण यशस्वीपणे राबविण्यासाठी व धर्म प्रसारांचे काम अधिक वेगाने करता येण्यासाठी या जमातीच्या अलिप्ततावादी धोरणाला ब्रिटीशांनी मान्याता दिली. यामुळे आज स्वातंत्र्योत्तर भारतात देखील या जमाती अतिशय मागास स्वरूपाचे जीवन जगतांना दिसत आहेत. या जमाती आजही आपल्या मूळ संस्कृतीशी एकरूप होऊन जगतांना दिसतात. आजही शिक्षण, आरोग्य, यासारख्या नागरी सुविधांचा लाभ यांना मिळू शकला नाही. यामुळे या जमाती विकास प्रक्रियेत आलेल्या दिसत नाही. यामुळे या जमातींच्या मागासलेपणाचे कारण आहे त्यांचे कलंकित जीवन व या कलंकीत जीवनातून त्यांच्या वाटयाला आलेला सामाजिक मागासलेपणा हे कलंकीत जीवन त्यांना मिळाले. ते ब्रिटींशानी १८७१ साली केलेल्या 'गुन्हेगार जमात कायदा' यामुळे या कायदया अंतर्गत बऱ्याच भटक्या जमातींचा गुन्हेगार जमातीत समावेश करून त्यांना तारेच्या कुंपनात डांबण्यात आले. या कायदयानुसार जवळपास १९८ जमातींना गुन्हेगार म्हणून घोषित

करून या जमातीत जन्माला येणारा सभासद हा गुन्हेगारच आहे असे घोषित केले गेले. या गुन्हेगार जमातींपैकी असणारी ‘पारधी‘ ही जमात आजही कलंकीत जीवन जगत आहे ब्रिटीश काळात पूर्वग्रहावर आधारीत गुन्हेगार जमातीत समाविष्ट असलेली ही जमात आजही खूप खडतर जीवन व्यथित करते. आजही ती आपल स्वतंत्र अस्तित्व टिकून आहे. प्रथा व परंपरांना चिटकून आहे. स्वातंत्र्य म्हणजे काय ? असा प्रश्न देखील त्यांना आज पडतांना दिसतो. (ब्रिटीश व्हाईसरॉय टि.व्ही स्टेफन्स (T.V.Stephens) यांनी या जमींब-ल असे विधान केले होते की, “People from time immemorial home been pursuing the cast.”[३] १९५२ साली गुन्हेगार कलंकापासून ही जमात मुक्त झाली व विमूक्त जमात म्हणून ओळखली जाऊ लागली. परंतु आजही लोक या जमातीकडे पूर्वग्रह दूषित दृष्टीनेच पहातात.सदर संशोधन हे पारधी जमाती संदर्भात आहे, भारतीय समाजात जाती व जमाती संदर्भात बरेच संशोधने झालेली आहेत. पारधी या जमाती ब-ल बरेच कमी संशोधन झालेले आहे व जे काही संशोधन झालेले आहे ते पुरेसे नाही किंवा या समाजाच्या विशिष्ट बाजूनेच (सामाजिक, आर्थिक,लोकसाहित्याच्या अंगाने ) अध्ययन झालेले आहे. सदर संशोधनात ‘पारधी‘ जमातीचा सर्वांगीण अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.स्वातंत्र्योत्तर भारतात देखील वरील प्रमाणे परिस्थिती आहे. एक समाज स्थिरतेचे जीवन उपभोगतो तर दुसरा समाज वर्षानुवर्षे दोन वेळेचे अन्न मिळविण्यासाठी संघर्ष करत आहे, ही परिस्थिती बदलणे अतिशय गरजेचे आहे. कारण हे समाज भारतीय समाज व्यवस्थेचे महत्त्वाचे भाग आहेत. या जमातींच्या या स्वरूपाला कोण जबाबदार आहे. या ब-ल मत मांडताना दिलीप डिसूझा असे लिहतात की, “गरीबी, बेकारी, निरक्षरता या गोष्टी कारणीभूत असल्या तरी इतरांच्या मनातील त्यांच्या विषयीचे पूर्वग्रह हे याला सर्वात अधिक जबाबदार आहेत हे एक विदारक सत्य आहे.”[४] सर्वसामान्य जनतेच्या मनात या जमाती ब-ल असणारे पूर्वग्रह हे आजतागायता स्थिर आहेत व यातून या जमातीब-ल चोर, भामटे, गुन्हेगार असा लोकमानस तयार झालेला आहे. याला जबाबदार आहेत लोंब्रोसो सारखे विचारवंत की, ज्याने शारीरिक वैशिष्टयांच्या आधारावर काही व्यक्ती जन्माने गुन्हेगार असू शकतात असे मत मांडले व यामुळे पूर्वग्रहाला जास्त बळकटी मिळाली. अशा पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास होणे गरजेचे आहे. तेव्हा सदर संशोधन हे ‘महाराष्ट्रातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास : विशेष संदर्भ

अहमदनगर जिल्हा.' या विषयाच्या माध्यमातून संशोधन कार्य हाती घेतलेले आहे. तसेच यांच्या प्रथा व पंरपरा काय आहेत ? त्यांचे लोकसाहित्य काय आहे ? त्यांची संस्कृती काय आहे ? त्यांची जातपंचायत काय आहे ? त्यांच्यात ब्रिटीश काळात जो गुन्हेगारीचा शिक्का लावला गेला त्या अनुशंगाने त्यांची आज काय स्थिती आहे ? त्यांचे शैक्षणिक जिवन, आर्थिक जिवन, आरोग्य, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जिवन पोलीस पारधी यांच्यतील संबंध इ. बाबी या संशोधनात तपासून पहाण्याचा वैज्ञानिक व वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून प्रयत्न करण्यात आलेला आहे.


## २.२. -संशोधन क्षेत्र

- **महाराष्ट्र :-**

### १) क्षेत्रफळ व भौगोलीक स्थान:-

भारतात एकूण २८ घटक राज्ये व ७ केंन्द्रशाशीत प्रवेश आढळून येतात. महाराष्ट्र हे या २८ घटक राज्यांपैकी भारतातील एक प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. या राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली.क्षेत्रफळाच्या दष्टीने महाराष्ट्राचा भारतात तिसरा क्रमांक असून महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ ०३,०७,७१३ चौ.कि.मी. आहे.

- **महाराष्ट्र राज्य नकाशा :-**



* **सिमा** -

महाराष्ट्रच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, आग्नेयेस आंध्रप्रदेश व दक्षिणेस कर्नाटक आणि गोवा राज्याच्या सिमा लाभल्या आहेत.

* **व्युत्पत्ती** -

महाराष्ट्र या शब्दाची व्युत्पत्ती केंव्हा कशी झाली  या बाबत अनेक विव्दांनात बरेचशे मतभेद आहेत.इतिहास अभ्यासक चिं.वि.वैदय यांच्या मते, "इ.स.पू.६०० च्या सुमारास आर्य लोक भारतात आल्या नंतर येथे गोपराष्ट्र, पांडूराष्ट्र व मल्लराष्ट्र  इ. वसाहती स्थापन झाल्या. यातील मल्लराष्ट्र म्हणजे महाराष्ट्र होय."[५] असे मत चिं, विं. वैदय यांनी मांडले या वरुन महाराष्ट्र हा शब्द अस्तित्वात आला. असे उपरोक्त विव्दानास म्हणावयाचे आहे. या विव्दानाव्यतीरीक्त महाराष्ट्र राज्याच्या व्युत्पत्ती बददल मत मांडतांना म.म.पां.का. काणे असे मत मांडतात की, महान राष्ट्र यावरुन या शब्दाची व्युत्पत्ती झाली आहे. अशा प्रकारे सर्वसाधारण पणे इ.स. पूर्व ३०० च्या सुमारास महाराष्ट्र हे नाव पडले असावे. तसेच प्राचीन काही देशाच्या विस्तारावरुन त्या प्रदेशाला तशी नावे  पडल्याची उदाहरणेही मिळतात. त्यातून ही व्युत्पत्ती अधीक ग्राहय मानली जाते.

* **संक्षिप्त इतिहास**

अगदी प्राचीन काळात म्हणजे रामायण महाभारतात महाराष्ट्राचे पूर्व व पश्चिम भाग वसले गेले होते. इ.स. पूर्व दुस-या शतकापासून ते सहाव्या शतकापर्यंत महाराष्ट्रात मोठया प्रमाणात स्थित्यंतरे झाल्याचे जाणवते. मौर्य, सातवाहन, राष्ट्रकूल, वाकाटक, चालुक्य, शिलाहार, मोगल इ. अनेक राजघराण्यांनी महाराष्ट्रात राज्य केले. डॉ.कोठारे अनिल व डॉ.नरगाळे एम.एस.असे लिहितात की, "आर्यन आणि द्रविड या दोन्ही संस्कृती मिळून महाराष्ट्राची संस्कृती तयार झाली".[६]  तर डॉ.देवगावकर एस.जीयांच्या मते, "महाराष्ट्राच्या दृष्टीने सातवाहन काळ हा सुवर्ण युगाचा काळ होता."[७]  ख-या अर्थाने स्थापत्य कलेच्या प्रगतीचा काळ हा चालुक्य काळ असल्याचे दिसते. तर  महाराष्ट्राची भरभराटी बाबत यादव काल महत्वपूर्ण आहे. शेवटचे प्राचीन हिंदू घराणे म्हणजे दख्खनचे यादव घराणे होय. औरंगाबाद जवळील देवगीरी ही यादवांच्या साम्राज्यांची राजधानी होती. अल्लाउददीन खिलजीने यादवांचे हे वैभवशाली साम्राज्य संपुष्टात आणले.

“त्यानंतर गोवळकोंडयांची निजामशाही, विजापुरची अदिलशाही व मोगल सम्राटांची सत्ता महाराष्ट्रात होती.”[८] महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना छत्रपती शिवाजी महाराजांनी यवनांच्या ताब्यातून महाराष्ट्राला मुक्त करुन घेतली. व त्यानंतर ब्रिटीशांनी संपूर्ण भारतात आपले राज्य प्रस्थापित केले. व सुमारे १५० वर्षे त्यांची सत्ता संपूर्ण भारतात होती. ब्रिटीश राजवटीतून १५ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला.

### अ) अहमदनगर जिल्हा




- **अहमदनगर जिल्हयाचा संक्षिप्त इतिहास**

अहमदनगर शहराची स्थापना २८ मे १४९० या दिवशी अहमदशह या निजामशाहीतील राजाने केली.वैभवशाली महाराष्ट्राच्या मध्यभागी बसलेला व समृध्द ऐतिहासिक, धार्मिक वारसा जोपासणारा अहमदनगर जिल्हा. रामायण काळात अगस्ती ऋषींनी विंध्य पर्वत ओलांडून गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर वसाहत केल्याचे व त्यांची व श्रीरामाची भेट झाल्याचे सांगितले जाते.

- **प्रारंभिक :-**

१.अहमदनगर जिल्हा हा पूर्वी दंडकारण्य म्हणून ओळखला जाणाऱ्या भागात मोडत होता असे म्हणतात, म्हणून पूर्वीच्या काळी घडलेल्या बऱ्याच घटनांचा या भूमीशी संबंध जोडला जातो.

२.जटायूकथा ही या भागातील पट्टा किल्ल्यावर घडल्याचे सांगतात, श्री अगस्तीची यात्रा आजही अकोल्याशेजारील आगर येथे महाशिवरात्रीस भरते.

३.पाथर्डी तालुक्यात पांडव कालीन अवशेष दाखवितात, पैठण शालिवाहनांची राजधानी प्रतिष्ठान जिल्हयाला लागूनच असल्यामुळे जिल्हयात तत्कालीन अवशेष सापडतात. पुणतांबे शालिवाहन काळापासूनच प्रसिध्द आहे. नेवासे येथे मोहिनीराजांचे प्राचीन प्रसिध्द मंदिर आहे. संत ज्ञानेश्वरानी ज्ञानेश्वरी येथेच लिहिली.

४.पंधराव्या शतकात अहमदनगरला स्थापन झालेल्या निजामशाहीचा इतिहास सांगणाऱ्या नगरचा किल्ला, चांदबिबीचा महाल, अशा अनेक वस्तू आजही व्यवस्थित आहेत.

५.पेशवाईत गाजलेला विठ्ठल सुंदर संगमनेरचा (साडेतीन शाहण्यांपैकी एक ), तर त्रिंबकजी डेंगळे निमगाव जाळीचा.

६.नाथसंप्रदायी कानिफनाथांची समाधी मढी येथे आहे. संत साईबाबांची शिर्डीला समाधी असल्यामुळे ते तीर्थक्षेत्र बनले आहे.

७.अष्टविनायकांपैकी एक सिध्दटेक आहे.

८.राशिन येथील देवी व दीपमाळ प्रसिध्द आहे.

९.शिंगणापूरला शनीचे जाज्वल देवस्थान असून त्याच्या प्रतापामुळे गावात चोरी होत नाही, या श्रध्देमुळे तेथील दारांना कडया कुलुपे नाहीत.

- **पुरातत्व काळ :-**

डेक्कन कॉलेजच्या पुरातत्त्व सर्व्हेक्षणानुसार महाराष्ट्रातील पहिल्या मानवाच्या अस्तित्वाचे पुरावे अहमदनगर जिल्हयातील नेवासा येथे आढळले आहेत. प्रवरा व गोदावरी नद्यांच्या खोऱ्यातील घनदाट अरण्यात मानवी संस्कृतीचे पुरावे व संस्कृतीशी निगडित पुरावे सापडले आहेत. जनस्थान व पंचवटी ही ठिकाणे दंडकारण्यात वसलेली होती. ज्याचा दक्षिणेकडील विस्तार गोदावरी नदीच्या पात्रापर्यंत होता, असे इतिहासकार सांगतात. भारतीय पुरातत्व विभागाने श्रीरामपूर

तालुक्यातील दायमाबाद येथे केलेल्या उत्खननानुसार या जिल्हयात सिंधू संस्कृती अस्तित्वात असल्याचे सिध्द झाले आहे.

- **मध्ययुगीन काळ:-**

पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात तत्कालीन बहामनी साम्राज्यातून स्वतंत्र झालेल्या अहमदशहा बहिरी याने सीना नदीकाठी शहर वसविण्यास सुरूवात केली. १४९४ साली अहमदनगर निजामशाहीची राजधानी बनली. त्या काळी या शहराची तुलना कैरोसारख्या शहराशी केली जात असे. अहमदशहा, बुऱ्हानशहा, चाँदबीबी यांची कारकीर्द असणारी निजामशाही १६३६ पर्यंत होती.

निजामशाहीला आधार देण्याचे कार्य शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे यांनी केले.छोटया मुर्तझा निजामशहाला मांडीवर घेऊन नगरचा कारभार त्यांनी केला.

- **मराठेशाही :-**

१७५९ मध्ये नगरचा ताबा पेशव्यांकडे आला. १८०३ पर्यंत हा प्रदेश पेशवाई अंतर्गत होता.

- **इंग्रजी राजवट** :-

सन १८१८ पासून अहमदनगरवर पूर्णपणे इंग्रजांचा अंमल होता. १८२२ मध्ये ब्रिटिशांनी अहमदनगर जिल्हयाची स्थापना केली.

- **इ.स. १९४२ चे चले जाव आंदोलन :-**

इ.स. १९४२ च्या चले जाव आंदोलनाच्या काळात सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद, डॉ.पी.सी.घोष, नेहरू इत्यादी राष्ट्रीय नेते नगरमधील भुईकोट किल्ल्यातील कारागृहात कैद होते. *'डिस्कव्हरी ऑफ इंडिया'* हा ग्रंथ नेहरूंनी याच किल्ल्यात लिहिला. डॉ.पी.सी.घोष यांनी 'हिस्टरी ऑफ एन्शंट इंडियन सिव्हिलायजेशन' व मौलाना आझाद यांनी 'गुबार-ए-खातीर' हे ग्रंथ याच शहरात लिहिले.ब्रिटिशांच्या अमलानंतर इंग्रज सैनिक व क्रांतिकारक यांच्यात सतत संघर्ष सुरू होता.पारनेर, जामगाव व अकोला भागात कोळी व भिल्ल टोळयांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले होते.राघोजी भांगरिया या क्रांतिकारकांनी १८४७ साली स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले.

१८५७ च्या उठावात भागोजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली ७००० भिल्लांनी एकवटून संघर्ष केला होता.रावसाहेब पटवर्धन, सेनापती बापट हे स्वातंत्र्य संग्रामातील अग्रणी होते.''[९]

## १) भौगोलिक विस्तार

''संतांची भूमी म्हणून ओळखला जाणारा अहमदनगर जिल्हा पश्चिम महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर असलेल्या या जिल्हयाचे क्षेत्रफळ १७४१३ चौ.कि.मी. आहे व ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५.६६% आहे.

पश्चिमेकडील डोंगराळ भाग व पूर्वेकडील सखल भाग हे जिल्हयाचे स्वाभाविक विभाग आहेत. पश्चिम भागातील हवामान थंड व कोरडे आहे तर पूर्व भागातील हवामान उष्ण व कोरडे आहे. जिल्हयातील सरासरी पर्जन्यमान ५६०.४ मी.मी. असून पर्जन्याचे वितरण मात्र असमान आहे.

गोदावरी व भीमा जिल्हयातील प्रमुख नद्या आहेत. अहमदनगर जिल्हयाच्या उत्तर सीमेवरून गोदावरी नदी वाहते. प्रवरा व मुळा या तिच्या उपनदया आहेत. भीमा नदी जिल्हयात दक्षिण सीमेवरून वाहते. दक्षिण भागातून सीना, हंगा, घोंड या नद्या दक्षिणेकडे वाहतात.

- **स्थान व चतु:सिमा :-**

महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी उर्ध्व गोदावरी व भीमा या नद्यांच्या खोऱ्यात वसलेल्या अहमदनगर जिल्हयाचे उत्तर अक्षांश १८.२ ते १९.९ अंश व पूर्व रेखांश ७३.९ ते ७५.५ अंश, असे भौगोलिक स्थान आहे. अहमदनगर जिल्हयाच्या उत्तरेस नासिक जिल्हा, ईशान्येस औरंगाबाद जिल्हा, पूर्वेस बीड व उस्मानाबाद हे जिल्हे, दक्षिणेस सोलापूर जिल्हा व पश्चिमेस ठाणे व पुणे हे जिल्हे आहेत

- **प्रशासकीय रचना :-**

जिल्हयाचे प्रशासकीय मुख्यालय अहमदनगर हे आहे. ग्रामीण विकासासाठी जिल्हा परिषद प्रशासनाखाली जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे १४ पंचायत समित्या आहेत. जिल्हयात १३११ ग्रामपंचायती कार्यरत असून शिर्डी या ठिकाणी नगर पंचायत आहे.

जिल्हयात एकूण १८ नागरी भाग ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) अहमदनगर कटक मंडळ

२) अहमदनगर महापालिका

३) राहूरी, देवळाली प्रवरा, श्रीरामपूर, पाथर्डी, श्रीगोंदा, संगमनेर, कोपरगाव, राहता, पिंपळस (नगरपालिका)

४) नगरपंचायत - शिर्डी

५) श्रीरामपूर (आर), शिंगणापूर, नागापूर, नागरदेवळे, भिंगार, घुलेवाडी, जामखेड (नगरपालिका नसलेले नागरी गाव)

**नैसर्गिक वैशिष्टये :-**

- **नद्या :-**

गोदावरी व भीमा या जिल्हयातील मुख्य नद्या असून प्रवरा नदी ही गोदावरीची उपनदी नेवासा तालुक्यातील टोकाजवळ गोदावरी नदीस मिळते. मुळा ही प्रवरेची उपनदी अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण सरहद्दीवरून वाहते. कुकडी, सीना व घोंड या भीमा नदीच्या उपनद्या पारनेर, श्रीगोंदा व कर्जत तालुक्यांतून वाहतात.

- **प्राकृतिक विभाग :-**

जमिनीच्या उंच-सखलपणानुसार अहमदनगर जिल्हयाचा पश्‍चिमेकडील डोंगराळ भाग व पूर्वेकडील सखल भाग असे दोन विभाग पडतात. सहयाद्री पर्वताची रांग अकोले तालुक्यातून जाते.सहयाद्रीचे सर्वोच्च शिखर कळसुबाई (१६५४ मी.) याच पर्वतराजीमध्ये विराजमान आहे. मुळा व प्रवरा या नद्यांच्या पर्जन्यछायेत हरिश्‍चंद्रगड या उपपर्वतराजीने अहमदनगर जिल्हयाचा पश्यिमेकडील भाग व्यापलेला आहे तर बाळेश्‍वर उपपर्वतराजीने पारनेर तालुक्याचा काही भाग व्यापरलेला आहे.

- **खनिजे :-**

जिल्हयाच्या भूगर्भात आर्थिकदृष्टया महत्त्वाची खनिजे नाहीत. नगर शहराच्या आसपास व पारनेर तालुक्यामध्ये फक्त चुनखडी उपलब्ध आहे. वाळू व दगड ही गौण खनिजे मात्र जिल्हयात विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत.

- **जमीन :-**

संपूर्ण अहमदगनर जिल्हयाचा भू-स्तर ज्वालामुखीच्या लाव्हारसापासून तयार झाला असून तो दख्खन टापू या नावाने ओळखला जातो. जिल्हयाच्या जमिनीचे साधारणपणे तीन भाग पडतात.

१) नदीकाठची पोयटयाची पांढरट जमीन

२) डोंगराळ उतारावरची काळी दगड-गोटे मिश्रित जमीन

३) पांढरट चुनखडीयुक्त जमीन

४) भूजल सर्व्हेक्षण विकास यंत्रणेकडे उपलब्ध माहितीनुसार अहमदनगर जिल्हा गोदावरी, भीमा व सीना या नद्यांच्या खोऱ्यातील विविध ८०% पाणलोट क्षेत्रात विभागला आहे. प्रवरा खोऱ्यातील जमीन जास्त सुपीक आहे. पारनेर तालुक्याचा बराच भाग चुनखडीयुक्त जमिनीने व्यापलेला आहे.

- **हवामान व पाऊस :-**

अहमदनगर जिल्हयाचे हवामान साधारणपणे उष्ण व कोरडे आहे. महाराष्ट्रात अहमदनगर जिल्हा प्रामुख्याने अवर्षणप्रवण क्षेत्र म्हणून ओळखला जातो. अहमदनगर जिल्हयाचे पर्जन्यमान अनिश्चित स्वरूपाचे असून पर्जन्याची वाटणी असमान आहे.

अकोले व संगमनेर तालुक्यांच्या पश्चिम भागातील सरासरी पर्जन्यमान इतर तालुक्यांपेक्षा जास्त आहे पण तेही नियमित नाही. काही ठराविक भाग वगळता जिल्हयातील भूजल पातळी चांगली आहे."[१०.]

- **अहमदनगर जिल्हा विशेष**

**१. आशिया खंडातील पहिले सहकारी औद्योगिक क्षेत्र.**

'विना सहकार नाही उध्दार' हा मंत्र आज जरी महाराष्ट्राच्या विकासाचे ब्रीदवाक्य असले तरी सहकारी चळवळींची भारतातच नाही तर आशिया खंडात पायाभरणी अहमदनगर जिल्हयात झालेली आहे. या सहकारी चळवळीचे श्रेय लोक नेते पद्मशी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांना जाते. प्रवरा सहकारी साखर कारखाना १९४८ साली उभारण्यात आला व अवर्षणप्रवण असलेल्या या जिल्हयाच्या विकासाला गती मिळाली. हे छोटे पाऊल ग्रामविकासाचे 'प्रवरा मॉडेल' म्हणून

नावारूपास आले व ही चळवळ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोचली. शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्यांच्या आर्थिक संपन्नतेसाठी या कारखान्याचे योगदान अनन्यसाधारण आहे.

**२.आदर्श गाव,राळेगण सिध्दी**

जल व्यवस्थापनाचा आदर्श म्हणून महाराष्ट्रच नाही तर भारतातील इतर राज्यांनीही आदर्श घेतला हे गाव म्हणजे राळेगण सिध्दी आणि या गावाचा कायापालट घडवून आणला तो थोर समाजसेवक अण्णा हजारे यांनी.

- ❖ जमिनीची धूप थांबविण्यासाठी डोंगरउतारावर वृक्षारोपणाचा व्यापक कार्यक्रम राबविण्यात आला.
- ❖ कालवे व नाल्यांद्वारे पाण्याची बांधबंदिस्ती करण्यात आली.
- ❖ पावसाचे पाणी अडविण्यात आले व साठविण्यात आले
- ❖ त्याचा परिणाम म्हणून भूजलपातळी कमालीची उंचावली.
- ❖ अपारंपारिक ऊर्जासाधनांचा वापर करून ऊर्जेच्या बाबतीत गाव स्वयंपूर्ण बनत आहे.

**३.आदर्श गाव,हिवरे बाजार**

ग्रामसभेच्या माध्यमातून लोकशाही विकेंद्रीकरणाची, शक्तीची प्रचीती महाराष्ट्राला देणारे आदर्श गाव हिवरे बाजार व गावाला विकासाची दिशा देणोर सरपंच श्री. पोपटराव पवार यांनी गावामध्ये लक्षणीय सुधारणा करून आदर्श असे ‘हिवरे बाजार‘ मॉडेल महाराष्ट्रासमोर ठेवले आहे.

- ❖ ग्रामसभेच्या माध्यमातून गावाच्या गरजांचा आढावा घेण्यात आला.
- ❖ गरजा पूर्ण करण्यासाठी सामूहिक जबाबदारीने पावले उचलण्यात आली.
- ❖ पिण्याचे पाणी, वीजपुरवठा इत्यादी गरजा पूर्ण करण्यात आल्या.

**४. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी.**

महाराष्ट्र कृषी विद्यापीठ राहुरीची स्थापना २९ मार्च १९६८ साली झाली व त्यास महात्मा फुले कृषी विद्यापीठ (MPKV) असे नाव देण्यात आले. अहमदनगरपासून ३५ कि.मी. अंतरावर नगर-मनमाड महामार्गावर हे विद्यापीठ स्थित आहे.कृषि शिक्षण, संशोधन व कृषि विस्तार या तीन आघाडयांवर हे विद्यापीठ कार्य करते. पश्चिम महाराष्ट्रातील १० जिल्हयांत विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. कृषि व कृषि अभियांत्रिकी शिक्षणाची सोय विद्यापीठांतर्गत आहे. २३ संशोधन केंद्रें, ४

क्षेत्रीय केंद्रें यांच्या माध्यमातून कृषि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्याचे कार्य विद्यापीठामार्फत केले जाते.

**५.माळढोक पक्षी अभयारण्य.**

The Great Indian Bustard असे नाव असलेल्या माळढोक या पक्ष्याच्या प्रजातीच्या संरक्षण व संवर्धनासाठी माळढोक पक्षी अभयारण्य विकसित केले जात आहे. माळढोक या दुर्मिळ पक्ष्यांचे निवासस्थान कर्जत, श्रीगोंदा, नेवासा तालुक्यांत आहे. सुमारे ३०० हेक्टर्सवर या अभयारण्याचा विस्तार आहे. सप्टेंबर ते डिसेंबर महिन्यात पर्यटक येथे भेट देण्यासाठी येतात.”[११]

**अहमदनगर जिल्हयाची तालुका निहाय्य लोकसंख्या निदर्शक तक्ता**

**तक्ता क्र. २.१**

| **अ.न.** | **तालुका** | **.लोकसंख्या** |
|---|---|---|
| १. | अकोले | २,९१,९५० |
| २. | संगमनेर | ४,८७,९३९ |
| ३. | कोपरगाव | ३,०२,४५२ |
| ४. | राहता | ३,२०,४८५ |
| ५. | श्रीरामपूर | २,८७,५०० |
| ६. | नेवासा | ३,५७,८२९ |
| ७. | शेवगाव | २,४५,७१४ |
| ८. | पाथर्डी | २,५८,१०९ |
| ९. | नगर | ६,८४,०४४ |
| १०. | राहुरी | ३,२२,८२३ |
| ११. | पारनेर | २,७४,१६७ |
| १२. | श्रीगोंदा | ३,१५,९७५ |
| १३. | कर्जत | २,३५,७९२ |
| १४. | जामखेड | १,५८,३८० |
| **एकूण** | | **४५,४३,१५९** |

**स्त्रोत :** अहमदनगर,जिल्हा,विशेषांक,२०१७,विद्याभारती,प्रकाशन,लातूर,पृ.क्र.४४ते७४

उपरोक्त तक्त्या वरुन असे दिसून येते की अहमदनगर जिल्हयातील नगर या तालूक्यात इतर तालूक्यांच्या तूलनेत लोकसंख्या ही जास्त आहे.

**अहमदनगर जिल्हयाची तालुका निहाय्य आदिवासी लोकसंख्या दर्शवणारा तक्ता**

**तक्ता क्र. २.२**

| अ.न. | तालुका | लोकसंख्या |
|---|---|---|
| १. | अकोले | १,३९,७३० |
| २. | संगमनेर | ५१,६५२ |
| ३. | कोपरगाव | ३४,३७७ |
| ४. | राहता | २०,१३० |
| ५. | श्रीरामपूर | १९,५५६ |
| ६. | नेवासा | १८,८९४ |
| ७. | शेवगाव | ४,६८१ |
| ८. | पाथर्डी | ४,११८ |
| ९. | नगर | १४,३९६ |
| १०. | राहुरी | ३४,०३६ |
| ११. | पारनेर | १७,०५४ |
| १२. | श्रीगोंदा | १३,८७० |
| १३. | कर्जत | ३,४६४ |
| १४. | जामखेड | २,२७२ |
| **एकूण** | | **३,७८,२३०** |

**स्त्रोत - :** बालवाड,रमेश,अहमदनगर,जिल्हा,विशेषांक, २०१७,विद्याभारती,प्रकाशन,लातूर, पृ.क्र४४ते७४

उपरोक्त तक्त्या वरुन असे दिसून येते की अहमदनगर जिल्हयातील अकोले या तालूक्यात इतर तालूक्यांच्या तूलनेत अदिवासी लोकसंख्या ही जास्त आहे.

**तक्ता क्र. २.३**

**अहमदनगर जिल्हयातील पारधी समाजाची गावे व तालुका निहाय कुटुंब लोकसंख्या दर्शवणारा तक्ता**

| जिल्हयातील गावे व तालुका निहाय कुटुंब माहिती | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **तालुका** | **एकूण गावे** | **पारधी समाज नसलेली गावे** | **पारधी समाज असलेली गावे** | **पारधी कुटुंब संख्या** | **व्यक्तींची संख्या** |
| १.श्रीगोंदा | ११५ | ७३ | ४२ | ४२७ | २०६६ |
| २.कर्जत | ११८ | ६८ | ५० | १६५ | ९५३ |
| ३.जामखेड | ८७ | ५९ | २८ | २०६ | ९७९ |
| ४.श्रीरामपूर | ५४ | ३९ | १५ | १०४ | ५१५ |
| ५.राहुरी | ९६ | ९३ | ३ | २५ | १०९ |
| ६.नेवासा | १२० | ११० | १० | ५० | २४६ |
| ७.राहाता | ६० | ५६ | ४ | ९ | ६१ |
| ८.शेवगाव | ११२ | १०० | १२ | ५० | २२७ |
| ९.पाथर्डी | १३७ | १३० | ७ | ३७ | १९५ |
| १०.नगर | ११७ | ९२ | २५ | १७० | १०६९ |
| ११.पारनेर | १३१ | १२५ | ६ | २६ | १९४ |
| १२.कोपरगाव | ७९ | ७४ | ५ | ६० | ३५० |
| १३.संगमनेर | १७१ | १७१ | ० | ० | ० |
| १४.अकोले | १९१ | १९१ | ० | ० | ० |
| **एकूण** | **१५८८** | **१३८१** | **२०७** | **१३३१** | **६९६४** |

**स्त्रोत :** -पारधी जनगनना व विकास प्रारुप आराखडा अहमदनगर जिल्हा २००६पृष्ठ क्र.७

उपरोक्त तक्तानूसार एकूण १४ तालूक्यांपैकी श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, नगर या चार तालूक्यांत सर्वात जास्त पारधी कुटुंबे आहेत, असे दिसते.तेंव्हा संशोधन कार्यासाठी याच चार तालूक्यांची नमुना तालूके म्हणून निवड केलेली आहे.

## २.३. संशोधन साहित्य आढावा-

भारतातील आदिवासी व भटक्या विमुक्त जमातींवर विविध अभ्यासकांनी,संशोधकांनी, केलेल्या संशोधनाचा आढावा या ठिकाणी घेण्यात आलेला आहे. पारधी या आदिवासी / विमुक्त जमातीचा अभ्यास करण्या अगोदर भटक्या विमुक्त जमातीची संकल्पना, व्याख्या, वैशिष्टये, त्यांची सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी, त्यांच्या समस्या, मागासलेपणा, स्वातंत्र्यपूर्व कालखंडात झालेले बदल, त्यांची प्रगती, याचा अभ्यास मार्गदर्शन असून पूर्वीचे संशोधन / संदर्भ प्रस्तुत अभ्यासास पूरक ठरतात.या दृष्टीने आदिवासी संदर्भ साहित्याचा आढावा नक्कीच उपयुक्त ठरेल. उपलब्ध संशोधन साहित्यामुळे प्रस्तुत अभ्यासाची दिशा ठरविता येते.प्रत्यक्ष संशोधन कार्याला सुरूवात करण्यापूर्वी नेमके प्रस्तुत अथवा त्याच्या जवळपास संशोधन झालेले आहे का ? आणि झाले असल्यास त्या संशोधनाचा प्रस्तुत संशोधनाला कितपत व कसा उपयोग होईल हे पाहणे आवश्यक असल्याने आदिवासी समाज जीवनाचा आढावा घेण्यासाठी आदिवासी व भटक्या विमुक्त जमातीवर आधारीत पुस्तके, अहवाल, संशोधने इ. चा अभ्यास करून अनुसूचित जमातीच्या जीवनावर दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच प्रत्यक्ष संशोधन विषयासंबंधित संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आला असून प्रस्तुत संशोधन विषयावर आतापर्यंत लिहली गेलेली पुस्तके व झालेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. जेणेकरून आतापर्यंत झालेल्या संशोधन कार्यापेक्षा प्रस्तुत संशोधन कार्य कोणत्या बाबतीत भिन्न आहे याची कल्पना येईल.”[१२]

आदिवासी समाज व भटक्या विमुक्तांवरील संदर्भ साहित्य या ग्रंथात लेखकांनी महाराष्ट्रातील विविध जमातीच्या उत्पत्तीब-ल  विस्तृत विवेचन केले आहे. गोंड ,भिल्ल, पारधी, कोरकू, परधान इ. जमातींची माहिती अनेक मुद्यांच्या आधारे दिली आहे. या जमातीतील पोटजमाती,त्यांचे धार्मिक, वैवाहिक, पारंपारिक, सांस्कृतिक जीवन, आहार-पोषाख शिकार आणि गुन्हेगारी इ. संदर्भाने सविस्तर आढावा घेतला आहे.

'महाराष्ट्रातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास :विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा' सदर विषया संदर्भात संशोधकाला भटक्या आणि विमुक्त जमातींचा अभ्यास करतांना जे जे साहित्य उपलब्ध झाले त्यात अनुक्रमे या जमाता विषयी झालेले समाजशास्त्रीय लेखन, कादंब-या, विविध मासिके व साप्ताहीकातुन यांची दर्शविलेली सद्यस्थिती व वर्तमान पत्रातुन अहमदनगर मधील पारध्यांच्या दर्शविलेली स्थिती इ. आढावा घेतलेला आहे तो पुढील प्रमाणे सांगता येईल.

- **भटक्या आणि विमुक्त जमातींवरील संदर्भ साहीत्य :-**

**१.Radhakrishnan Meena-"Dishonared By History : Criminal Tribes and British Colonial Policy."**[१३]

या पुस्तकात मीना राधाकृष्णन यांनी गुन्हेगार जमाती आणी ब्रिटीशांचे वसाहतवादी धोरण या बाबत मांडणी केलेली आहे.ब्रिटीशांनी गुन्हेगार जमात कायदा निर्माण करुन भारतातील ब-याच जमातींना जायबंदी केले. या कायद्या नूसार या जमाती जन्मजात गुन्हेगार आहेत असे मानुन त्यांना तारेच्या कुंपनात डांबण्यात येवून त्यांचा आतोनात छळ केला गेला यांना कोठीही फीरण्यावर बंदी घातली गेली. राधाकृष्णन यांच्या मते ब्रिटीशांना आपला राज्य कारभार व्यवस्थीत करता यावा व या जमातींना धर्मपरीवर्तनास भाग पाडता यावे व यांचा कोणताही उपद्रव होवू नये या उददेशानेच गुन्हेगार जमात कायदयाची निर्मीती केली असे प्रतीपादन लेखीकेने या पुस्तकातून केलेले दिसून येते.

**२. R.V. Russell and Rai Bahadur Hiralal- "The and Caste of the Central Provinces of India."**[१४]

या पुस्तकात लेखकांनी महाराष्ट्रातील विविध जमातीच्या उत्पत्ती बददल विस्तारीत वर्णन केलेले आहे.तसेच विविध जमातींची माहीती देखील विस्तृतपणे दिलेली आहे.या जमातीतील उपजाती त्यांची संस्कृती, राहणीमान, कुटूंब व्यवस्था, धार्मीक जिवण, परंपर, चालीरीती व शिकार आणी गुन्हेगीरी यांची सविस्तर माहीती दिलेली आहे.

**३.R.E.Enthoven-"Tribes and the Caste of the Bombay Presidency."**[१५]

मुंबई इलाक्यातील जाती आणी जमाती हे पुस्तक मुंबई व मुंबईच्या आसपासच्या भागातील जाती व जमातींन विषयी अतीशय सखोल व सांगोपांग माहीती देणारे असे पुस्तक आहे या

पुस्तकात एन्थोव्हेन यांनी या ईलाक्यातील जातींची व जमांतीची अतीशय सुक्ष्म माहीती मांडलेली आहे. हे पुस्तक लेखकाने स्वत: भटकून माहीतीचे संकलन करुन लिहलेले आहे. मुंबई ईलाक्यात असणा-या जातींची व जमातींची संख्या, नावे, त्यांचे सामाजीक जिवन, इ.बाबत लेखकाने विस्ताराने मांडणी केलेली आहे.

**४.Devi Mahashwata -"Dust on the Road."**[१६]

सत्तरीच्या दशकात बंगाली समाजिक कार्यकत्या महाश्वेता देवी यांनी समाजातील वंचीत व दुर्लक्षीत घटकांकडे आपले लक्ष वेधले व 'डस्ट ऑन द रोड' या पुस्तकाच्या माध्यमातुन दलीत, आदीवासी, अस्पृश्य आणी गरीब तसेच कामगार व शेतमजूर इ.घटकांबाबत देशातील विविध भागात प्रवास करुन या घटकांच्या वंचनेचा आभ्यास सदर पुस्तकातुन मांडलेला आहे.

**५.Naila Kabber-"Citizenship and the Boundries of the AcknowledgedCommunity :Identity, Affecationand Exclusion."**[१७]

नायला कबीर यांनी उपरोक्त पुस्तकातुन राज्य समाज व नागरीकत्वाचा परस्पर संबंध कसा आहे जगातील गरीब देशात ही संबध दृढ झालेला कसा दिसतो तसेच राजकीय हक्क आणी लोकशाही शासन व्यवस्था यांचा असणारा संबंधांचा मांडणी केलेली आहे.

**६. Rupesh R.R.- "Economy State ande Society."**[१८]

सदर पुस्तकात लेखकाने अर्थव्यवस्था, राज्य आणि समाज यांचा परस्पर संबंध कसा आहे व या संबंधांचा परिणाम कसा होतो या विषयी माहीती दिलेली आहे. या पुस्तकाच्या माध्यमातुन लेखक राज्याची धोरणे ही जास्तीत जास्त समाजव्यवस्थेतील मुख्य प्रवाहाला धरुनच कशी बनविली जातात व या धोरणात मागास घटकांचा व समाजातील उपेक्षीतांचा कमीत कमी कसा विचार होतो हे दर्शविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**७.लष्कर विनायक-"वडार समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास"**[१९]

या पुस्तकात लेखकाने विमुक्त जमातीत समाविष्ठ असलेलया वडार या जमातीचे समाजशास्त्रीय विश्लेषण केलेले आहे. वडार जमातीचे सामाजिक जिवण, आर्थिक स्थिती, मागासलेपणाची कारणे, वंचीतता, शैक्षणीक स्थिती इ. बाबींचा आढावा घेतलेला आहे.

## ८. भोसले भास्कर- "दैना"[२०]

या स्वकथनातून पारधी समाजाच्या सामाजिक स्थितीची व हाल अपेष्टांची प्रचिती येते. पारधी समाजाच्या हाल अपेष्टांचे वर्णन करतांना भास्कर भोसले असे म्हणतात की 'आकाशातुन बिज कोसळली काय अन तुम्हा नाग डसला काय. इथून-तिथून पारध्यांच्या हाती बेडयाच ठोकायच्या असतात. गुन्हेगारीच्या कलंकाने आणि जुल्मी बेडयांनी आयुष्य बेचीराग झाल. या स्थितीत पारधी समाज आपले जीवन कंठीत आहे'. पारधी समाज हा किती दयनिय जिवन कंठीत आहे याचे वर्णन दैना या स्वकथनामध्ये भास्कर भोसले यांनी सांगितलेले आहे.जीवन जगतांना त्यांची होणारी ससेहोलपट, अस्थैर्य, अनिश्चितता, भुकेच्या यातना या सर्व बाबींचे वर्णन करून पारधी समाजाची कशी दैना होतेय हे सांगण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. त्यासाठी त्यांनी या स्वकथनात स्वत:ला आलेल्या बरेच अनुभव सांगितलेले आहेत. परंतु एकूणच केवळ गुन्हेगारीचा कलंक माथी आल्याने ही दैना वाटयाला आली असे लेखकाचे म्हणणे आहे.

## ९.प्रभुणे गिरीश-"पारधी"[२१]

या पुस्तकात लेखक प्रभुणे गिरीश यांनी भटक्या विमुक्त समाजातील पारधी जमातीला अज्ञान, सामाजिक वंचना, गरीबी यांचे वर्णन करून भारतीय पारधी समाजाचे वास्तविक चित्रण मांडण्याचा प्रयत्न केला आहे. गिरीश प्रभुणे यांनी स्वत: गावोगावी भटकून विविध पारधी पाडयांना भेट देवून पारध्यांचे विविध मेळाव्यांना उपस्थित राहून पारधी समाजाचे प्रश्न जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच पारध्यांवर होणारे अन्याय अत्याचार त्यांची जगण्यासाठी चाललेली धडपड पोलिसांचे अटक सत्र पारधी टाकत असलेले दरोडे व त्यातून घडणाऱ्या घटना पोलिसांकडून होणारे आर्थिक शोषण, पारधी स्त्रियांचे होणारे लैंगिक शोषण यातून त्यांच्या मुलांची होणारी वातहत इत्यांदी बाबी या पुस्तकातून मांडण्यांचा प्रयत्न गिरीश प्रभुणे यांनी केलेले आहे. याशिवाय पारधी स्त्रियांचे जीवन , पारध्यांच्या रूढी परंपरा , अंधश्रदा, देवदेव करण्याच्या पध्दती यांनी पारध्यांचे सामाजिक विश्व कसे व्यापलेले आहे. हे देखील मांडलेले आहे. यासाठी लेखकाने अनेक पारधी कुटुंबाशी संपर्क साधले आहे. तसेच या समाजाकडे शासनाने कसे दुर्लक्ष केले आहे . याबाबत देखील लेखक खंत व्यक्त करतात. लेखक स्वत: पारधी समाजाब- ल काम करणारे एक सामाजिक कार्यकर्ते आहेत .

### १०.पवार संतोष-"चोरटा"[२२]

या पुस्तकात लेखक यांनी कलंकीत पारधी समाज हा चोर म्हणून कसा ओळखला जातो व समाज व्यवस्थेत चोर म्हटलं की पारधीच चोर का कलंक स्वत:ला तर आहेच परंतु जन्माला उपाधी सहज सामाजिक गैरसमजातून कशी तयार होते. तसेच समाजातील लोकंच केवळ हा समाज घेवून जगत  नाहीत तर शासन पोलिस यंत्रणा देखील याच मानसिकतेची शिकार बनले आहेत. पोलिसांचा चोर म्हणून पहिला संशय घेतला जातो तो पारधी जमातीवर व चोर या कलंकामुळे सारखा तुरूंगाच्या वा-या, बायका मुलांपासून होणारी ताटातुट या गोष्टींमुळे आपल्या अवती भोवती असणारे मुके प्राणी नशिबवान वाटतात. चोरीच्या आळात स्वकथनात आले आहे. पारध्यांच जिणं या पुस्तकात लेखक रमेश काळे यांनी पारधी समाजाच्या जिवन पध्दतीचे वर्णन केले आहे. काळेंच्या आजोबानं दुस-याच्या तंटयात लक्ष घालून पाटलांच्या जमिनी सोडवल्या होत्या. वर्षाला पोतभर ज्वारी देण्याच्या बोलीवर गुंडाच्या ताब्यातुन दहा एकर जमीन हिसकावून घेवून ख-या हकदार पाटलास दिली होती.  पुण्य आणि समाजसेवेचे हे खोटे भान पारध्याच्या जगण्यावरचा विश्वास वाढू शकला नाही. साधं उन, वा-यात थंडीत पाल ठोण्यासाठीही जागा मिळाली नाही. की सकाळाचा विधी उरकण्यासाठी व मयत पुरण्यासाठी शासनानं पारधी सुधारण्यासाठी खुप उपाय केले. त्यांना उपरे, चोर, बांडगूळ, उपभोगाची वस्तु, काटयानं काटा काढण्याची वस्तु गावची राखण करणारी, अदिम अमानुश ठरवले व सतत असुरक्षित ठेवली, पंख कापून, पिंज-यात  पाण्यावाचून अनेक प्रकारचा त्रास देवून बधीर, थर्ड डिग्री तर नेहमीचीच यामूळे पारध्यांच्या जगण्यावरची श्रध्दाच उडून गेली आहे. त्यांच्यासाठी वसाहती स्थापण्याचा प्रतिकात्मक गाव तयार होईना, जमीन मिळेना, पुन्हा पारधी वसाहत सरकारी जागेवर वसवावी. पारध्यांच्या जमिनी कसण्यास मजूर मिळेना, त्यांच्या विहिरींना पाणी लागेना, त्यांच्या मुलांना शिकवण्यासाठी त्यांच्या वस्तीत जाणारा शिक्षक मिळेना, जन्माने गुन्हेगार मानल्याने आणि ते करण्यास भाग पडल्याने ते आताही गुन्हेगार असणार असा अर्थ  काढला जातो. त्यात  परिवर्तन होवू शकते हे समाजमन मानण्यास तयार नाही असे लेखक म्हणतो.

## ११. डिसूझा दिलीप-"जन्माने गुन्हेगार"[२३]

या पुस्तकातून लेखक दिलीप डीसूझा यांनी या जमातीची सुरूवातीला गुन्हेगार म्हणून झालेली अधिकृत नोंद, स्वातंत्र्योत्तर झालेली विमुक्ती, त्या नंतरची त्यांची दैन्यावस्था आणी इतरांच्या मनात त्यातुन उद्भवलेले त्यांच्याविषयीचे पुर्वग्रह या सर्वाची साधी सरळ कहीणी लेखकाने मांडलेली आहे.त्यांच्या या कथनामध्ये दोन स्त्रोत : एकत्रात विणलेले आहेत, पध्दतशीर ऐतीहासीक अहवाल आणी त्यांचे स्वत:चे विमुक्तांच्या सहवासातील अनुभव यांची व्यवस्थीत मांडणी लेखकाने या पुस्तकातुन केलेली आहे.

## १२. डॉ. पवार दीपक- " पारधी समाजाचे अंतरंग"[२४]

यांनी या पुस्तकात विमुक्त भटक्या जमाती, भटका समाज, गुन्हेगारी जमाती, भटक्या विमुक्तांच्या चळवळी, तसेच पारधी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक संरचना जातपंचायत, पारधी समाजातील स्त्री जीवन व पारधी समाजातील सामाजिक,सांस्कृतिक परिवर्तन गावगाडया बाहेर या पुस्तकातुन लेखक डॉ.प्रभाकर मांडे यांनी ज्या जमाती मुख्य समाज व्यवस्थेत नाहीत म्हणजे गावगाडयाशी ज्यांचा संबंध येत नाही. गावाच्या वेशीबाहेर त्यांना स्थान आहे व ते पण तात्पुरते. अशा भटक्या समाजाची हकीगत त्यांनी या पुस्तकातुन मांडलेली आहे. मुख्य समाजा पासून नेहमी अलिप्त राहिल्यामुळे जो सामाजिक आर्थिक, राजकीय दर्जा यांना प्राप्त व्हायला हवा होता व स्थिरता निर्माण होणे गरजेचे होते ते झाले नाही.

## १३. भोसले नामदेव -"मराशी"[२५]

या पुस्तकात लेखक यांनी पारधी समाजाब-ल चे शब्दकोश, व्याकरण, कथा, कविता, फोटो इ.परिचय करून दिलेला आहे. मराशी या शब्दाचा अर्थ होतो काझा व पारधी समाज हा वेगवेगळया प्राण्यांची शिकार करतांना बरेच वेगवेगळे फासे वापरतो. त्या अनेक फाश्यापैकी मराशी हा एक फाशाचा प्रकार होय. तसेच मराशी मधून त्यांनी परधी स्त्रीयांची स्थिती देखील वर्णन केलेली आहे.

## १४. गायकवाड लक्ष्मण-"उचल्या"[२६]

यांचे स्वकथन अतिशय महत्वपूर्ण असे आहे.लेखक स्वत: या समाजाचे असल्याने त्यांनी समाज व्यवस्थेत त्यांच्या वाटयाला आलेल्या छळ या स्वकथनातून सागिंतला आहे ते असे सांगतात की मी स्वत: उचल्या किंवा पाथरूड जमातीतील असल्यामुळे विषमता समाज व्यवस्थेचा अन्याय, अत्याचार सहन करावा लागला. इंग्रजांनी या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला होता. म्हणून या जमातीत जन्माला येणारीमुले जन्मताच गुन्हेगार मानले जात होते. उचल्या जमतीत संपूर्ण समाजाने गुन्हेगार मानुन त्यांना जवळ केले नव्हते. लेखक जेंव्हा शाळेत जात तेंव्हा मुलं पोर चोर आला रे पाथरूड आला रे म्हणत गर्दी करायचे. प्रत्येक विद्यार्थ्याची नजर बोचक होती संशयी होती. लेखकाला शिक्षण घेण्यास जात पंचायतीचा नकार होता. ते शिक्षणासाठी गेले म्हणून जातीतील लोक आजारी पडले. कुणाला हागवण लागली, कुणाला ताप आला अशी अंध:श्रध्दा होती. मंदीर प्रवेश नसने, वरून पानी वाढणे, सार्वजनिक ठिकाणी पाणी भरू न देणे अशी सामाजिक विषमता देखील लेखकाच्या वाटयाला आली. कोणतीही चूक नसतांना अपराध्याच जीवन लेखक लक्ष्मण गायकवाड यांना जगावे लागले होते. ते केवळ भटक्या विमुक्त समाजात जन्मल्या मुळे ते स्वत: जात चोरून राहू लागले. तेंव्हा नोकरीच्या ठिकाणी राहावयास घर मिळायचे अन्यथा नाही. उचल्या प्रमाणेच पारधी या जमातींची कैफीयत सांगताना लक्ष्मण गायकवाड म्हणतात. कळंब तालुक्यातील मोहा या गावी पारध्यांवर सरपंच आणि पोलिसांनी हल्ला केला. हा हल्ला मानवतेच्या संरक्षणासाठी नव्हता. जातीवादाच्या संरक्षणासाठी होता. ढोकी या ठिकाणी पारधी गुन्हेगार म्हणून पारध्यांचे हत्याकांड घडले. ढोकी गावच्या आणि जवळपासच्या गावातील स्पृश्यांनी सात पारध्यांना जिवनंत कापले. इतके होवून संविद्या नाते अस्पृश्यता निवारण्यासाठी अनेक कायदे केले असतंना जातीयता पाळणारे निर्दोष सुटतात याची खंत लेखक लक्ष्मण गायकवाड यांनी उचल्या स्वकथनातुन मांडली आहे.

## १५.माने लक्ष्मण -"उपरा"[२७]

या स्वकथनात त्यांनी इतर अस्पृश्यांपेक्षा वेगळ दु:ख मांडलेल आहे. महार, मांग आणि इतर अस्पृश्यांचे स्वत:च हक्कच गांव होतं लेखक कैकाडी या भटक्या जमातीत जन्माला आल्यामुळे त्यांना हक्काच गावच नव्हतं तेंव्हा समाजातील अस्पृश्य जातीपेक्षा देखील आपल दु:ख हे मोठं

आहे असे उपरा मधून लक्ष्मण माने सांगतात. त्यांचे बि-हाड नेहमीच गाढवाच्या पाठीवर असायचं जिथं मुक्काम तोच त्यांचा गाव. परंतु त्यांना एका गावात नेहमीसाठी स्थायीक होता येत नव्हतं. कैकाडी समाजाच्या भटक्या जीवनाचे लेखकाने अतिशय प्रभावीपणे चित्रण केले आहे. लेखकाला शिक्षण घेण्याची जिद्द असल्याने पुढे ते शहरात येतात आपला खर्च चालविण्यासाठी हॉटेलमध्ये काम करणे पेपर विकणे इत्यादी अनेक कामे लेखकाने केली आहेत. लेखकाला गावापेक्षा शहर आवडले कारण त्यांना शहरात मनमोकळेपणे जगता आले. लक्ष्मण माने उपरा मध्ये असे म्हणतात- ‘‘गावात बारा बलुत्यांनी गावाची सेवा करायची सर्वातनं एकदा सुगीत पाचूंदा बैल मिळायचं महार, मांग, रामुशी, कैकाडी, सारं गावाचं बलुतेदार आमची कैकाडयांची दहा बारा घरं नुसती पावसाळयात उघडी यरवी कुलपाला शेत थोपून पसार झालेली‘‘ म्हणजेच फिरस्ती जीवनात लेखकांनी असंख्य दु:ख, दारिद्रय व वेदना सहन केल्याचे उपरा स्वकथनातून दिसते.

**१६. चव्हाण प्रकाश -“उदई”[२८]**

यांनी पारधी जमातीला लागलेल्या वाळवीच भेदक वर्णन या पुस्तकात केले आहे. पारधी जमातीत किडीला किंवा वाळवीला उदई अस संबोधलं जात. जामतीच्या उतरंडीची विषमतेची किड, पारधी जमातीला लागली किडन वेढलंल काहीच उपयोगी पडत नाही. कीड गंज आणि झीज या तिन्हींनीही समाज नष्ट होण्याच्या मार्गावर असतो. अशा पारधी जमातीतील प्रकाश चव्हाणं एम.ए.(मराठी), बी.एड. बी.लिब पर्यंत शिकलो आणि नोकरीत ग्रंथपाल पदापर्यंत पोहोचले आहेत. बापानं मुलाच्या शिक्षणासाठी दिलेला संघर्ष हा उदई मध्ये आला आहे. बापाचा पारधी म्हणून झालेला छळ अवहेलना यानं बापाला शिक्षणाची जाग आली आणि आपण मुलाच्या मार्फत या विषमतेच्या आणि अज्ञानाच्या गर्तेतुन मुक्त होवू असा विश्वास प्रकाशच्या बापाला वाटत होता. म्हणून त्यांनी हे सर्व केलं आणि प्रकाशला पुढच्या जिवनातील उदई पासून वाचवलं.

**१७.ईदाते भि.रा.- “ विमुक्त जाती व भटक्या जमाती अभ्यास व संशोधन समीती अभ्यास - खंड-१”[२९]**

जानेवारी १९९९ यात भटके व विमुक्त जाती व जमातीची शासनाची यादी, विविध समित्यांनी भटके-विमुक्तांच्या यादि विषयी केलेल्या शिफारशी, भटके व विमुक्तांची संख्या, भटके विमुक्त जमाती विषयी माहिति देण्यात आलेली आहे.

## १८. डॉ. भोसले नारायण-"विमुक्ती प्रबोधन"[३०]

या पुस्तकातून स्वत: भटक्या जमातीत जन्माला आल्याने कोणती संकटे झेलावी लागली. भटक्याच्या जिवनापासून ते विद्यापीठात प्राध्यापक होईपर्यंत लेखकाने आपले अनुभव या स्वकथनातून सांगितलेले आहे. तसेच महाराष्ट्रातील भटक्या विमुक्तांचे स्थलांतर भटक्या विमुक्तांबाबत असणारे प्रबोधन, त्यांच्या चळवळी, त्यांची स्त्री मुक्ती चळवळ, लिंगाधारीत भेदभाव, भिक मागत्या जमाती इ.बाबींचे सविस्तर वर्णन लेखकाने या पुस्तकातून केले आहे. तसेच भारतीय समाज व्यवस्थेने पिढयान-पिढया ज्यांना स्वत:च्या अस्तित्वा विषयी जाणीव करून दिलेली नाही. किंबहूना या समाज व्यवस्थेत ज्यांना माणस म्हणून स्थान दिले नाही अशा बिनचेह-यांच्या माणसांच्या जगण्याचा संक्षिप्त आढावा वेगवेगळया लेखाच्या माध्यमातून डॉ.भोसले यांनी या पुस्तकातून घेतला आहे.

## १९. Dr. G.S.Ghurye.- "The scheduled Tribes." [३१]

या ग्रंथात लेखकाने भारतातील आदिवासी जीवनावर सखोल अभ्यास केला असून डॉ. घुर्येनी आदिवासींना मागासलेले हिंदू ही संकल्पना वापरली आहे. त्यांनी महादेव कोळी या आदिवासी जमातीचा अभ्यास केला असून त्यांच्या संशोधनाचा मुख्य भर सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर आधारीत आहे. त्याचप्रमाणे त्यांनी भारतीय आदिवासींच्या समस्यांचे विवरण व निराकरण करण्याचे मार्ग सुचविले आहेत.

## २०. मांडवकर भाऊ-"कोलाम"[३२]

प्रस्तुत संशोधनपर ग्रंथात लेखकाने कोलाम जमातीवर संशोधन करून या जमातीच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. कोलाम जमातीचा विस्तृत असा अभ्यास करून इतर आदिवासी जमातीतील तीचे स्थान दर्शविणारा व जमातीच्या जीवनाचा सर्वांगीण वेध घेणारा हा ग्रंथ आहे.

## २१. चव्हाण रामनाथ -"जाती आणि जमाती"[३३]

या पुस्तकात शेकडो वर्षे उपेक्षित राहिलेल्या तळागाळातील समाजाची दु:खे अतिशय प्रभावी शब्दांत मांडली आहेत. भटकंती, असंघटन, शिक्षणाचा अभाव, अंधश्रध्दा ही मागासलेपणाची कारणे सांगितली आहेत.

**२२. डॉ.कदम नागनाथ धो.- "महाराष्ट्रातील भटका समाज-संस्कृती व साहित्य"[३४]**

या पुस्तकात महाराष्ट्रातील भटका समाज, भटक्या विमुक्तांचे स्वरूप, त्यांची उपेक्षा, त्यांची निवेदने,न्यायनिवाडा आणि त्याच्या अभ्यासावरून काढलेले निष्कर्ष महत्त्वाचे आहेत. या ग्रंथात महाराष्ट्रातील एकूण १४ भटक्या-विमुक्त जमातींच्या अंतरंगाच्या परामर्श घेतला आहे. भटक्या समाजाच्या समस्या अभ्यासून त्यावर उपाय सुचविलेला आहे. लेखकाने मांडलेल्या भटक्यांचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक समस्या लक्षात घेता सुचविलेले उपाय तेवढेच अभ्यासपूर्ण आहेत.

**२३. माने लक्ष्मण-"विमुक्तायन"[३५]**

प्रस्तुत संशोधन ग्रंथात लेखकाने विमुक्त जमातींच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाचा आढावा घेतला आहे. भारतातील भटक्या विमुक्त जमातींच्या मुळ उगमांचा शोध घेताना ३ प्रमुख विभाग केले आहेत. विमुक्त जमातींची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करतांना सुमारे ५ हजार वर्षापूर्वीपासून ते आजपर्यंतची स्थित्यंतरे, ब्रिटीश कायदे व जमातीचे कायदे यांच्यातील संघर्ष आणि संघर्षाच्या परिणीतीतून हे निसर्गपुत्र गुन्हेगार ठरले. व या सर्व जमाती 'गुन्हेगार जमाती' म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. या सर्व जमातींचा सखोल अभ्यास हाच या ग्रंथाचा संशोधन विषय आहे.

**२४.Tomar Y.P.S And Dr. Robin D. Tribhuwan–"Development of Primitive Tribes in Maharashatra States-Continuity and Change."[३६]**

प्रस्तुत पुस्तकात अतिमागास जमातीवरील संशोधन व विकास आराखडा दिला आहे. भारत सरकारने विविध निकषांच्या आधारे ७५ आदिवासी जमातींना अतिमागास जमाती म्हणून घोषीत केले. या जमाती भारतातील एकूण १५ राज्ये व केंद्रशासीत प्रदेशात वास्तव्य करतात. कातकरी, कोलम व माडीया या तीन अतिमागास जमातीचा चिकित्सक अभ्यास या पुस्तकात मांडला आहे. या संशोधनाचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र असून या अभ्यासपर पुस्तकात उपरोक्त तीन अतिमागास जमातींचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक पैलुंचा आढावा घेतला आहे.

## २५. कालेलकर गोविंद मंगेश -"मुंबई इलाख्यातील जाती"[३७]

२० व्या शतकाच्या सुरूवातीला एन्थोवेन हे इंग्रज समाजशास्त्रज्ञ तत्कालीन मुंबई प्रांतात म्हणजे आजच्या महाराष्ट्रात सामाजिक संशोधनाचे काम करीत होते. त्यांनी मुंबई प्रांतात सर्वत्र फिरून विविध जाती-जमातींची खूप माहिती गोळा केली. ही माहिती एकत्रितपणे या पुस्तकात प्रसिध्द केली आहे. या पुस्तकात एकंदर ४८३ जमातींची माहिती दिली आहे.ही माहिती लेखकाने अनुवादीत केलेली आहे. लेखकाने प्रत्येक जमातीचे संक्षिप्त पण अत्यंत अभ्यासपूर्वक वर्णन केले आहे. ही माहिती संशोधकांना अतिशय उपयुक्त ठरते.

## २६. माने लक्ष्मण -"भटक्याचं भारूड"[३८]

१९९० ते १९९६ या काळात लक्ष्मण माने राज्यपालांचे नामनियुक्त सदस्य म्हणून महाराष्ट्र विधान परिषदेत कार्यरत होते. त्या काळातील त्यांच्या विधानपरिषदेतील निवडक भाषणांचा संग्रह म्हणजे हे पुस्तक होय. या पुस्तकातील समाविष्ट त्यांच्या भाषणाचा मुख्य भटक्या विमुक्तांचे प्रश्न, राखीव जागा, सवलती, गुन्हेगारी, जमाती कायदा, पोलिस छळ, आरोग्य, आदिवासी, जीवन संस्कृती, स्त्रीयांची उपेक्षा हा आहे. भटक्या विमुक्त जमातीसाठी शासनाकडून होत असलेले प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा लेखक करतात.

## २७. मोरे विमल -"पालातली माणसं"[३९]

या पुस्तकातील लेखात भटक्या विमुक्त जमातीतील स्त्रीयांचे लाचार, अगतिक, पशुतुल्य जीवन, त्यांच्या व्यथा, वेदना इत्यादीवर प्रकाश टाकला आहे. भटक्या विमुक्त जमातीमधील नंदिबैल वाले, पारधी, गोसावी, घिसाडी, मांगगारूडी, रामकोंडाडी, उवरी, कोल्हाटी, गोपाळ, डोंबारी अशा दहा जमातींमधील स्त्रीयांचे जीवन, त्यांच्या हाल अपेष्टा, त्यांची सुख-दु:खे, आशा-आकांक्षा त्यांच्याच शब्दात समोर आणण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे.

## २८. प्रभुणे गिरीश -"पालावरच जिणं"[४०]

गिरीश प्रभुणे यांच्या या पुस्तकातील कथांनी भटके-विमुक्त समाजाच्या स्थितीचे यथार्थ दर्शन घडविणे आहे. या कथा वाचतांना भटके विमुक्त समाजाविषयी दयेची व आपलेपणाची भावना निर्माण होते. पारधी, नंदीबैलवाले, वैदु, भिल्ल, बंडी धनगर, मरिआईवाले, ओतारी,.

शिकलगार यांच्या सामाजिक जीवनाचा वेध घेतला असून भटक्या विमुक्त विकास परिषदेचं काम करतांना या जमातीच्या समक्ष भेटीसाठी भ्रमंती केली. आणि भटक्यांच्या भीषण समस्यांची ओळख अनेक प्रसंगातून करून दिली आहे.पालावरचजीणं खरोखर किती कठीनअसते हे दाखवण्याचा प्रयत्न लेखकाने या पुस्तकाच्या माध्यमातून केलेला आहे.

**२९. त्रि.ना.अत्रे -"गुन्हेगार जाती"[४१]**

हे पुस्तक श्री.त्रि.ना.अत्रे यांनी १९११ मध्ये तत्कालीन मुंबई प्रांताचे इन्सपेक्टर जनरल ऑफ पोलीस श्री.एम.केनेडी यांच्या या इंग्रजी पुस्तकावरून लिहलेले आहे. या पुस्तकात प्रत्येक गुन्हेगार जातीची माहिती, त्या जातीची वस्ती, लोकसंख्या, भाषा, सांकेतीक शब्द, उपजिविकेची इतर साधने वेषांतर, गुन्हे, गुन्हयाची पध्दती, गुन्हयाची हत्यारे अशा प्रमुख मुद्यांची माहिती दिली आहे.

**३०. डॉ. मांडे प्रभाकर-"गावगाडयाबाहेर"[४२]**

(१९८३) मध्ये लिहलेल्या पुस्तकात ज्या जमाती मुख्य समाज व्यवस्थेपासून दूर आहेत. ज्यांना गावगाडयात कोणतेही स्थान नाही त्यांची सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक स्थिती कशी आहे. व ते कोणत्या समस्यांना तोंड देत जीवन जगतात हे सर्व मांडण्याचा प्रयत्न केला आहे व हे सर्व लिखान विमुक्त जमातींशी निगडीत आहे.

**३१. माने लक्ष्मण-"वकिल्या पारधी"[४३]**

या लेखनातून विमुक्त समजल्या जाणाऱ्या पारधी जमातीचे सामाजिक जीवन व त्यांच्या वाटेला आलेला चोर व गुन्हेगार हा कलंक व यामुळे त्यांची झालेली वाताहत व इतर समाजाच्या त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोण इ. अध्ययन लक्षात येते.पारधी समाजाच्या धक्कादायक जीवनाच्या पट उलगडणारी ही कादंबरी आहे.पशुतुल्य जीवन जगणाऱ्या पारधी समाजाच्या जीवघेण्या वेदना, हालअपेष्टा, गुन्हेगारीचा कलंक याचे चित्रण या पुस्तकात अनेक घटनांच्या माध्यमातून मांडले आहे.पारधी समाज हा मुख्य समाज व्यवस्थेपासून व अनेक मुलभूत सोयीपासून वंचित आहे. इंग्रजांच्या कार्यवायांना केलेल्या विरोधामुळे त्यांनी मारलेला गुन्हेगारी समाजाचा

शिकार त्यातून झालेली त्यांचा वाताहत तसेच स्वतंत्र भारतातही ते कशाप्रकारे पारतंत्राचे व वंचिततेचे जीवन जगत आहेत.त्याचे वर्णन या कादंबरीत केलेले आहे .

### ३२. चव्हाण रामनाथ -"भटक्या विमुक्तांची जात पंचायत"[४४]

प्रा. रामानाथ चव्हाण हे महाराष्ट्रतील भटक्या समाजाचे एन्थोवेन समजले जातात. त्यांनी भटक्या विमुक्तांची जात पंचायत हे पुस्तक एकूण ६ खंडात प्रकाशित केलें आहे. या पुस्तकांमधे भटक्या जमातीचे पूर्व इतिहास,त्यांच्या लोककथा ,पुराणकथा,रूढीपरंपरा, देवदेवता, सण, उत्सव, बारसे,विवाहसंस्कार,काडीमोड, अत्यंविधी भाषा आणि पिढयानपिढी चालत आलेली जातपंचायत याविषयी तपशीलाने त्यांची माहिती घेतली आहे.प्रादेशिकतेनुसार त्यांच्या चालीरितीत काही प्रमाणात बदल झालेले आहेत का याची नोंद देखील या पुस्तकातून निर्देशनास आणून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्र शासनाने ज्या भटक्या विमुक्त जातींची यादी प्रसिध्द केली आहे. त्यात ४२ नांवांची नोंद आहे. त्यापैकी निम्म्या जमातींची माहीती मिळविण्यात रामनाथ चव्हाणांना यश आलेल आहे .त्या वेगवेगळया जमातींची माहीती ही त्यांनी यापुस्तकाच्या विविध खंडाच्या माध्यमातून मांडलेली आहे.

### ३३. माने लक्ष्मण -"बंद दरवाजा"[४५]

हे लेखन देखील भटक्या विमुक्तांच्या प्रश्नांशी निगडीत असणारे असे आहे. इतर समाजाच्या संपर्कात न आल्याने व त्यांना येऊ न दिल्याने त्यांची झालेली ससेहोलपट यात दिसते.गावगडयाबाहेरचे जीवन हे कसे पशूतुल्य असते व मुळ समाजव्यवस्थेच्या संपर्कात न आल्याने कोणकोणत्या हालआपेष्टा सहन कराव्या लागतात व त्यामुळे जगण्यासाठी कशा संघर्ष करावा लागतो. या सर्व बाबींची मांडणी या पुस्तकात लेखकाने मांडली आहे.

### ३४. भोसले नारायण-"भटक्यांची पितृसत्ताक जातपंचायत"[४६]

या लिखानात भटक्यांची जातपंचायत ही पुरूषप्रधान संस्कृतीस कशी पोषक आहे किंवा या जातपंचायतीवर पुरूष प्रधान संस्कृतीचे पडसाद दिसून येतात.भटक्यांच्या जीवनात स्त्रीयांचे स्थान कसे दुय्यम आहे. त्यांना किती कष्टमय जीवन जगावे लागते. जात पंचायतीच्या जाचक नियमांना कसे सामोरे जावे लागते.त्यांच्याबाबतीत असणाऱ्या अंधश्रदेमुळे त्यांचे कसे शोषण होते.

या सर्वाचा वेध लेखक नारायण भोसले यांनी भटक्यांची पितृसत्ताक जातपंचायत या पुस्तकात घेतलेली आहे.

**३५. खरात शंकर –"भटक्या विमुक्तांचे प्रश्न"[४७]**

या लेखनात भारतातील भटक्या व विमुक्त जमातींना किती समस्यांना व प्रश्नांना सामोरे जावे लागते. सामाजिक जीवनात त्यांच्या समोर असणारे आव्हाणे त्यांना भेडसावणाऱ्या आर्थिक समस्या व उदरनिर्वाहाचे प्रश्न या सर्वांचे अध्ययन लक्षात येते.

**३६. डॉ वाडकर धोंडीराम व प्रा. बळे बाळासाहेब-"गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या आदिवासी पारधी समाजाचे सांस्कृतिक जीवन"[४८]**

या लेखात पारधी जमातीच्या सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते. पारधी संस्कृतीमध्ये आढळणाऱ्या विविध बाबी व त्यांच्या संस्कृती निर्माण अंतर्गत कोणकोणत्या बाबी आहेत याची प्रचीती येते.पारध्यांचे सांस्कृतिक जीवन हे कसे इतरांपेक्षा भिन्न आहे. त्यांच्यात जन्मप्रथा, विवाहप्रथा, झापीलेवान विधी, देवदेव,जत्रा या सर्वतून पारधी संस्कृतीचा वेध घेतलेला आहे.

**३७.चव्हाण रामनाथ-"भटक्या-विमुक्तांचे अंतरंग"[४९]**

या पुस्तकांमधे भटक्या जमातीचे पूर्व इतिहास,त्यांच्या लोककथा ,पुराणकथा ,रूढीपरंपरा, देवदेवता, सण, उत्सव, बारसे, विवाहसंस्कार, काडीमोड, अत्यंविधी भाषा आणि पिढयानपिढी चालत आलेली जातपंचायत याविषयी तपशीलाने त्यांची माहिती घेतली आहे. प्रादेशिकतेनुसार त्यांच्या चालीरितीत काही प्रमाणात बदल झालेले आहेत का याची नोंद देखील या पुस्तकातून निर्देशनास आणून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्र शासनाने ज्या भटक्या विमुक्त जातींची यादी प्रसिध्द केली आहे.त्यात ४२ नांवांची नोंद आहे.त्यापैकी निम्म्या जमातींची माहीती मिळविण्यात रामनाथ चव्हाणांना यश आलेल आहे .त्या वेगवेगळया जमातींची माहीती ही त्यांनी यापुस्तकाच्या विविध खंडाच्या माध्यमातून मांडलेली आहे.

### ३८. प्रा. बळे बाळासाहेब-"जव्हारी"[५०]

यांच्या या लिखानात पारधी या विमुक्त जमातीच्या जव्हारण या विधीनाटया ब-ल माहिती मिळते. हा विधी या जमातीत अतिशय महत्त्वाचा असा समजला जातो. हया विधी ब-ल सविस्तरपणे मांडणी प्रा.बळे यांनी केल्याचे दिसते.

### ३९. प्रा चव्हाण.रामनाथ-"भटक्या विमुक्तांचे मुक्त चिंतन "[५१]

यांनी लिहलेल्या या पुस्तकातून अनेकांनी दिलेल्या प्रतिक्रयांच्या माध्यमातून रामनाथ चव्हाण यांनी भटके व विमुक्त समाजाब-ल केलेले कार्य व त्यांच्या समस्या एकूण जाती जमाती आहेत. संपूर्ण महाराष्ट्रभर फिरून त्यांनी केलेल्या सर्वेक्षणातून किती महत्त्वपूर्ण असे कार्य केले आहे ते जाणवते व या सर्व बाबींचा मला संशोधन कार्यासाठी उपयोग झाला आहे

### ४०. डॉ.जी.एस.देवगावकर-"आदिवासी विकास प्रशासन "[५२]

या पुस्तकात यांनी आदिवासी समूदाय व पारध्यांच्या धार्मिक जिवनाचे वर्णन केले आहे. पारधी समाज हा वर्षानुवर्षा पासून जंगलात दरी खो-यात राहात आलेला आहे. पारधी समूदायाचे धार्मिक जिवण या पुस्तकात सांगितले आहे. कायम जंगलाशीच संबंध आल्यामुळे आणि शिकारीच्या निमित्ताने रानावनात भटकत असल्यामुळे पारधी जमातीचा कधी गावगाडयाशी संबंध आलाच नाही. हे लोक अत्यंत मागासलेले व अनिष्ट चालिरिती, रूढी, परंपरा यामध्ये गुरफटलेले आहेत. देवावर व यात्राखेत्रा करण्यावर पारध्यांचा जासत विश्‍वास आहे. पारधी पुरूष हे जास्त करून स्त्री देवतांचे उपासक असल्याचे दिसते. भवानीमातेला ते आपली देवी मानतात. ठिकाण परत्वे या देवतांची निरनिराळी नावे दिसून येतात. लंगोटी पारध्यांमध्ये देवीची चांदिची मुर्ती केलेली असते. त्यामुळे लंगोटे पारधी स्त्रीया चांदिचे दागीने कमरेच्या वरच्या भागात परिधान करत नाहीत. त्याचप्रमाणे या स्त्रिया खुंटीला लुगडे अटकवत नाहीत काही ठिकाणी पारधी स्त्रीया लाल रंगाचे कापड वापरत नाहीत कारण त्यांच्या देवीला लाल रंगाच्या कापडावर बसविलेले असते. कोल्हापूर येथील फासेपारधी जमातीतील कार्यकर्ते आण्णाच्या चव्हाण असे म्हणतात की, ''पारधी आपले देव कधीच उघडे ठेवत नाहीत. ते पेटीमध्ये बंद केलेले असतात. पालामध्ये जेथे देवाची पेटी ठेवलेली असते त्या पेटीला बाहेरूनच उदबत्ती लावायची असते. ज्या वेळेस जत्रा

किंवा पुजा असेल त्यावेळी पारधी पुजण्यासाठी देव बाहेर काढतात. स्त्री देवतांमध्ये लक्ष्मीबाई मरिआई या देवता आहेत. तर पुरूष देवतांमध्ये महादेव व धनी यांची पुजा केली जाते.कर्नाटकच्या बाजूला राहणा-या पारध्यांमध्ये दुर्गादेवी व यल्लमा यांची पूजा करण्याची प्रथा आहे.

**४१.L.P.Vidyarthi and Rai Binay Kumar-"Tribal Culture of India"[५३]**

या पुस्तकात लेखकाने आदिवासी समूदायांची आर्थिक पध्दती भारतीय आदिवासींचे सामाजिक संघटन, आदिवासींचे राजकीय जिवन, धार्मिक जिवन, लोककला आणि हस्तकला आदिवासी विवाह पध्दती, आदिवासी ब-ल चे विविध दृष्टिकोण, भारतातील आदिवासी विकास, आदिवासी समाजाची बदलती संस्कृती इ.बाबींचा उल्लेख केला आहे. सदर पुस्तकाचा संशोधकाने वापर करून अभ्यास करून संशोधनास आवश्यक असणारी माहिती उपलब्ध केली आहे. सदर पुस्तक दुय्यम स्त्रोत : म्हणून वापरले आहेत.

**४२.Needam Hassan - "Tribal India"[५४]**

या पुस्तकात लेखक यांनी वेगवेगळया कालखंडातील जमाती, जमातींची व्याख्या, जमातींचे भौगोलिक, भाषीक, वांशिक, आर्थिक, धार्मिक वर्गीकरण विवाह प्रकार, कुटूंब व नातेसंबंध, आर्थिक संघटन, राजकीय संघटन काही जमातींचा लोकलेखात्मक अभ्यास (तोडा, खासी) जमाती ब-ल चे दृष्टिकोण, जमातींच्या मुख्य समस्या गरीबी, बेरोजगारी, आरोग्य, मद्यपान, शैक्षणिक मागासलेपणा, स्थलांतर इ. जंगल कायदे व जमाती, विकास योजना व जमातींचे विस्थापण सामाजिक राजकीय चळवळी, आदिवासी व्यवस्थापनाचा इतिहास राज्यघटना आणि अनुसूचित जमाती, योजना कृती कार्यक्रम आणि त्याची अंमलबजावणी, एन.जी.ओ आणि आदिवासी विकास ही सर्व आदिवासी जमाती ब-ल ची माहिती या पुस्तकात आढळते संशोधकाला द्वितीयक स्त्रोत : ाचा आधार घेतांना सदर पुस्तकाचा बराचसा उपयोग झाला आहे. आदिवासींचे समाजाशास्त्र या पुस्तकात लेखक रा.ज.लाटे यांनी आदिवासी समाजाच्या व्याख्या पासून विविध विकास योजना उपायांची माहिती दिली आहे. संशोधना दरम्यान हे पुस्तकाचा संदर्भ उपयोगात आला आहे.

**४३.गारे गोविंद -"महाराष्ट्रातील आदिवासी जमाती"[५५]**

या पुस्तकात  लेखक यांनी महाराष्ट्रात एकूण किती आदिवासी आहेत याचे संख्येसह वर्णन केले आहे. सदर संशोधनासाठी घेण्यात आलेल्या पारधी जमातीचा उल्लेख मात्र या पुस्तकात केलेला आहे तेंव्हा सदर पुस्तक पारधी जमातीची माहिती मिळविण्यासाठी संशोधकास उपयोग ठरते.या पुस्तकात आदिवासी जमातीचे वंशीक वर्गीकरण प्रादेशिक वर्गीकरण आदिवासींच्या समस्या, उपाययोजना आदिवांसीची वैशिष्टय, आदिवासीची लोकसंख्या अनेक पैलूंवर भर दिला आहे.

**४४. डॉ.सुर्या अनिल  "अंबेडकरी स्वकथने एक समाजशास्त्रीय अध्ययन"[५६]**

या पुस्तकात भारतीय समाजातील चातुर्वर्ण्य आणि जातीव्यवस्थेच्या विषमतेमुळे एका मोठया समाजाला गुलामित ठेवले होते. अज्ञान, दारिद्रय, अंधश्रध्दा आणि दास्यामध्ये देशातील अस्पृश्य,आदिवासी आणि भटका --विमुक्त समाज शेकडो वर्षापासून कसा खितपत पडला आहे. हे दर्शविलेले आहे.

**४५. गार्गे- "समाज  विज्ञान कोश खंड-३ व ४"[५७]**

यांनी भटके व विमुक्त समाजा ब-ल  माहिती दिलेली आहे. ती देखील सदर संशोधना ब-ल  उपयोगी ठरलेली आहे. समाज  विज्ञान कोश खंड-३ व ४ गार्गे यात विमुक्त समाजा ब-ल असणारी माहिती उपयुक्त ठरेली आहे.यामध्ये भटके या शब्दाची उत्पती तसेच काही व्याख्या व या शब्दाचा अर्थ सविस्तर पणे लेखकाने मांडलेला आहे. विमुक्त या शब्दाब-ल देखील सविस्तर माहिती लेखकाच्या खंड ३ व ४ मध्ये आढळते.

**४६. गजेंद्रगड.व्ही.एन. "भारतीय समाजशास्त्र"[५८]**

यांनी आदिवासी जमातीब-ल  वेगवेगळया समाजशास्त्रज्ञांचे योगदान सांगितले आहे. यात त्यांनी डॉ.जी.एस.घुर्ये यांनी आदिवासी जमाती ब-ल  सांगितलेला सामिलीकरणाचा दृष्टिकोण संशोधनास उपयुक्त ठरला आहे.तसेच पंडीत नेहरू यांनी आदिवासी जमातीब-ल सांगितलेली पंचशील तत्वे व ठक्कर बाप्पा यांचे आदिवासी एकात्मतेब-लचे मत इत्यादी सदर संशोधन कार्यस उपयुक्त ठरलेल्या आहे.

**४७.डॉ.प्रदिप आगलावे- "महाराष्ट्रातील आदिवासी जमाती आणि त्यांच्या समस्या"[५९]**

महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय यादी अनुसूचित जाती व जमाती आदेश (सुधारणा अधिनियम १९७६ भाग-१०८ व्या) मधील परिशिष्ट मधील भाग १० अनुसूचीत जाती / जमाती भटक्या जमाती आदेशा सुधारणा अधिनियम २००२-०३ भाग-१० मध्ये नमूद केलेल्या महाराष्ट्र एकूण जमातींची माहिती दिली आहे. यामध्ये पारधी जमातीचा उल्लेख केलेला आहे व त्यांच्या समस्यांचाही उल्लेख केलेला आहे.

**४८. डॉ.अनल अवचट-"मानस"[६०]**

मौज प्रकाशन, मुंबई, भटक्या जमातींनी मुख्य प्रवाहात लवकरात लवकर सामिल झाले पाहिजे. त्यापासून जे तितके दूर राहतील तितके ते वेगळेच पडतील. विमुक्तांनी हे समजून घेतले पाहिजे की, पोटासाठी का होईना जो पर्यंत चोर आहेत तोपर्यंत त्यांना समाजाची सहानुभूती मिळणार नाही. बरं त्यांच्या चालू धंद्यात तरी असे काय आहे ? पोटाला धड मिळत नाही, सतत फरारी जिवन, पोलिसांचा छळ, तुरूंगवास, आणि सामाजिक दृष्टया बहिष्कृताचे जीवन हेच वाटयाला येते. तेंव्हा समाजाला मान्य असणा-या मार्गानेच त्यांनी आपले पोट भरणे हिताचे आहे. तसे वळण पडणे कठीण असते. त्याला वेळ लागणार असला तरी तसे केल्याने पुढच्या पिढयांची या दुष्ट चक्रातुन सुटका होईल.

**४९. काळे किशोर शांताबाई -"कोल्हाटयाच पोर"[६१]**

यांनी लिहलेले कोल्हाटी ही भटकी जमात आहे. गावोगावी फिरून नृत्य व विविध मनोरंजनाचे खेळ करतात. ही कथा या समाजात जन्मून डॉक्टर झालेल्या व्यक्तीची आहे. ज्याला समाजाने पूर्ण पणे नाकारले होते. स्वत:च्या आईचा प्रचंड प्रमाणात झालेला लैंगिक छळ त्यांनी यात उल्लेखलेला आहे. यातून महाराष्ट्रातील या भटक्या जमातीची काय स्थिती आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

## ५०. देवगावकर एस.जी-"महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती"[६२]

या पुस्तकात जात पडताळणी, जात प्रमाणपत्र जाती-जमाती नुसार आरक्षण जात आणि जमातीचे वर्गीकरण असे सर्व काही आहे.तसेच महाराष्ट्रातील काही निवडक जाती व जमातींची माहीती ही देखील या पुस्तकात मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. तिचा उपयोग संबंधित विषयाचा संशोधन कार्यास झालेला आहे.

## ५१. पिंगळे भिमराव -"वनवासी व उपेक्षित जग"[६३]

१९९० यांनी लिहलेल्या पुस्तकातून आदिम समूदायाब-ल तीन खंडात व्यवस्थित मांडणी केलेली आहे. प्रथम खंडात आदिमांचे जंगलातील राहणे, त्यांचा प्राचीन इतिहास, त्यांचे प्रश्न आणि सरकारची, त्यांच्या विषयीचे धोरण दुसऱ्या खंडात विमुक्त जमातींचे वर्गीकरण, गुन्हेगारी कायदा, गुन्हेगारी व्यवसाय स्विकारण्या मागील कारणे, विमुक्त जमाती आणि आदिम जमाती मधील सारखेपणा व भिन्नता आणि तिसऱ्या खंडात जाती, उपजाती, विवाह पध्दती, जातपंचायती, अंध:श्रध्दा इ. वर भर दिलेला दिसतो.

## ५२. प्रा.बडे भास्कर यांनी -"वंजारी आणि बंजारा कोण आहेत."[६४]

या संशोधन लेखात वंजारी भटक्या जमाती ब-ल सुनिश्चित अशी माहिती मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. ऐतिहासिक, सामाजिक, व्यावसायिक व शैक्षणिक माहिती देखील यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना आरक्षणाचे लाभ जास्त प्रमाणात मिळत नाहीत. बंजारा आणि वंजारी या दोन स्वतंत्र जाती म्हणून गणल्या जातात. त्यामुळे हा वाद उद्धवतांना दिसतो. असे बडे यांचे मत आहे.

## ५३. गिऱ्हे के.ओ. "गोपाळ' समाजाच्या परंपरा आणि इतिहास" [६५]

यांनी लिहलेल्या या पुस्तकात या समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक भटकांचा अभ्यास केलेला आहे. जसे प्रथा, परंपरा, विवाह पध्दती, जातपंचायत इ. तसेच गोपाल समाजात स्त्रियांच्या स्थानाब-ल माहिती देखील त्यांनी यात दिलेली आहे.

## ५४. राठोड आत्माराम कनिराम-"तांडा"[६६]

यांनी लिहलेल्या आत्मकथन *'तांडा'* हे केवळ जीवन प्रवासाशी निगडीत नाही तर बंजारा समाजाचे अंतर्गत वर्णन देखील यात समाविष्ठ आहे. या पुस्तकात भटक्या विमुक्त समाजात आढळणाऱ्या बंजारा या जमातीच्या संस्कृतीची जीवनपध्दतीची व नेहमीच्या भटकंतीने झालेली वाताहत या पुस्तकातून लेखकाने समोर आणण्याचा प्रयत्न केले आहे.

## ५५. राऊत किशोर- "पारधी समाज बदल व समस्या"[६७]

या पुस्तकात लेखका यांनी पारधी समाजाची वास्तविक स्थिती, त्यांचे सामाजिक जीवन त्यांच्या समस्या व या जमातीत कोणकोणते परिवर्तन आलेले आहे या विषयी सविस्तर माहिती दिलेली आहे या पुस्तकात पारध्यांब-लची शैक्षणिक स्थिती सामाजिक स्थिती त्यांची भटकंती भिक्षावृत्ती अशा अनेक पैलु मध्ये होत असलेले परिर्वतन दर्शविण्याचा प्रयत्न किशोर राऊत यांनी केला आहे.

## ५६. मटकर गणेश -"धनगर भटकी जमात"[६८]

यांनी अभ्यासलेल्या २१४८ कुटूंबाच्या केलेल्या अभ्यासावरून असे दिसते की इंदौर प्रांतांत ग्रामीण आणि शहरी समुदायातील अभ्यासात 'धनगर' जमात ही मजूरी व त्यांच्या स्त्रीया हया उपजिवीकेसाठी घरकाम करतांना दिसतात. ६०% कुटूंबाची महिन्याची कमाई ही १२५ ते १५० रूपायांच्या दरम्यान आहे. ६०% कुटूंबे ही एका खोलीच्या घरात किंवा पालात राहतात. ६५% कुटूंबांनी शेती व घरांसाठी कर्ज घेतलेले दिसते.भटकंती मुळे मुलांना शाळेत जाता येत नाही व गरीबी मुळे देखील काही मुलं शाळेत जाऊ शकत नाही.

## ५७. गस्ती भिमराव- "बेरड"[६९]

हे आत्मकथन हे आत्मकथन १९८७ मध्ये प्रकाशित झाले. भारतात अनेक उपेक्षीत जाती आहेत त्यातील काही जमातींना गुन्हेगारी जमाती म्हणून समजात हेटाळीणी करतो.अ सेच वास्तवदर्शी शैलीने बरेड जमातीचे चित्रण बेरड समजा, तयांच्या श्रध्दा अंधश्रध्दा लोकजीवन कसे आहे याचे वर्णन आहे यातून गुन्हेगार जमातीचे कलाविश्व जणण्यास मदत होते.

**५८. सौ. गिऱ्हे जनाबाई -"मरणकळा"[७०]**

या आत्मकथनात गोपाळ या भटकया जमातीतील कुटूंबाचे चित्रण आलेले आहे. गोपाळ या जमातीत संयुक्त कुटूंब प्रचलित असते. त्यात कुटूंबातील कर्ता पुरूष हा कुटूंब प्रमुख असतो. आणि ही कुटूंब पध्दती पुरूषप्रधान स्वरूपाची आहे असे वर्णन दिसते.

**५९. मोरे दादासाहेब मल्हारी-"गबाळ"[७१]**

हे आत्मकथन १९८३ मध्ये प्रसिध्द झाले. कुडमुडे जोशी या भटक्या जमातीचे चित्रण यात आलेले आहे. यात वाऱ्याप्रमाणे दिशाहीन जीवन हा समाज जगत असतो.यात स्वत: चे कुटुंबाचे चित्रण लेखकाने केले आहे.पालातील जीवन, भिक मागणे, मजुरीचे कामे, वडीलांचे होणारे हाल, आईचे होणारे हाल, कुटुंबाची अस्थिर दिशाहीन भ्रमंती, प्राण्यांपक्षासोबत त्यांचे चाललेले आयुष्य याचा वेध घेतलेला आहे.

**६०. डॉ. शिरसाठ शिवदास "दलित आत्मकथनांचा समाजशास्त्रीय अभ्यास"[७२]**

या पुस्तकात लेखकाने समाजशस्त्रीय दृष्टीकोनातून सुक्ष्म सखोल सामाजीक संदर्भसहित भटके विमुवत समाज सामाजीक वंचनेत कसे जगतात याचा तपशिल गबाळ, बेरड, मरण कळा, काट्यावरची पोट, अशा काही स्वकथनांचे परिक्षणात्मक मांडणी सदर पुस्तकात केलेली आहे. या पुस्तकातून भटक्यांच्या जीवनावर असलेला जातपंचायतीचा प्रभाव तसेच जमातीपरत्वे रुढी परंपरा व प्रथांचा प्रभाव आणि अंधश्रदेचा प्राबल्य दर्शविलेले आहे.

**६१. डॉ.धोंडीराम वाडकर : "गोल्ला समाजाचा इतिहास" [७३]**

या पुस्तकात लेखकाने गोल्ला समाजातील विविध सामाजिक संस्कृतीक व परंपरांवर तसेच या समाजाच्या जीवनाच्या जडण घडण संस्कृतीक जीवन गोलेवारांचे सण -- उत्सव कला आणि दिवाळी, जात पंचायत, तसेच या जमातीचे मौखिक वांड्मय आणि लोकसाहित्य व भाषिक अभ्यास यांची माहिती दिली आहे.

- **भटक्या विमुक्त समाजावरील संशोधने :-**

**१.श्री दांगट उमाकांत :-"महाराष्ट्रातील आदिवासी पारधी जमातीचा आर्थिक अभ्यास : विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा"(य.च.म.मु.वि.नाशिक)** [७४]

संशोधकाने आदिवासी पारधी जमातीचा आर्थिक अभ्यास करण्यावर भर दिलेला आहे. या जमातीत मोठया प्रमाणावर आर्थिक मागासलेपणा आहे हे शोधले आहे. तसेच त्यांच्या आर्थिक मागासलेपणाची कोणती कारणे आहेत हे देखील संशोधकाने यात शोधले आहे व हे मागासलेपण दूर करण्यासाठी 'पारधी विकास आराखडा' देखील तयार केला आहे.

**२.प्रा.गायकवाड यशवंत जंगलू:-"उस्मानाबाद जिल्हयातील आदिवासी पारधी जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास - डॉ.बा.आं.म.वि.औरंगाबाद"**[७५]

या प्रबंधात पारधी जमातीच्या लोकसंस्कृतीमधील लोकसाहित्याचा व त्यातील लोकगीतांचा अभ्यास केला आहे. पारधी गिते, कथा इ. मधून त्यांचे त्यांच्या मनातील भ्रमांचे, अभ्याससृष्टीच्या कल्पनेचे चित्रण आपल्याला दिसते. त्यांच्या गीतांमधून पाहण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. पारध्यांचे जीवन हे जंगलाशी संबंधित असल्याने त्याचे प्रतिबिंब त्यांच्या गीतात पहावयास मिळते.

**३.शेळके प्रताप शिवाजीराव :-"उस्मानाबाद जिल्हयातील पारधी समाजाचा आर्थिक व सामाजिक अभ्यास(कलंब ता.संदर्भात)" (अर्थशास्त्र एम.फील, प्रबंध) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.**[७६]

संशोधकाने उस्मानाबाद जिल्हयातील कलंब तालुका मर्यादित पारधी समाजाचा आर्थिक व सामाजिक समस्या संदर्भाने अभ्यास केला आहे. त्यांची जातपंचायत, भटकेपणा व इतिहास या विषयीच्या प्राथमिक माहितीचा आढावा घेऊन समाजाच्या विकासासाठी त्यांचे आर्थिक व सामाजिक प्रश्न समजून घेण्यावर भर दिला आहे. पारधी समाजाची वैशिष्टये आर्थिक जीवन, व्यसनाधिनता, कर्जबाजारीपणा, दारिद्रय या मुलभूत बाबींविषयी अभ्यास केला आहे.

**४.प्रा.कोरेकर सुलभा लिंबराज :- "पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा"( टि.म.वी.पुणे)**[७७]

संशोधिकेने उस्मानाबाद जिल्हयातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय पध्दतीने अभ्यास केलेला आहे. यात संशोधिकेने पारधी विवाह, कुटूंब, आर्थिक स्थिती, सामाजिकस्थिती, यांचा सविस्तर अभ्यास करून पारधी समाजातील समस्या दर्शविलेल्या आहेत.

**५.रगडे कमलाकर प्रकाश यांच्या " भोकरदन तालुक्यातील फासे पारधी जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास."[७८]**

या एम.फील. प्रबंधकीच्या अभ्यासातून फासे पारधी या जमातीचा लोकसाहित्याब-ल माहिती मिळते. व लोकसाहित्य हे फासे पारधी जमातीच्या जीवनाचा कसा अविभाज्य भाग आहे हे निदर्शनास येते.

**६.नाईक (पवार) रूख्मीणी पोमा यांनी १९८३ साली सादर केलेलय लघु शोध प्रबंधात -"बंजारा जातीचे समाजशास्त्रीय सामाजिक, आर्थिक पहाणी."[७९] डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद**

समाजशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद. या शोध प्रबंधात कमी उत्पन्नामुळे किंवा कमी आर्थिक मिळकती मुळे या समाजातील लोकांना चोरी, पाकीटमारी करण्याची वेळ आलेली आहे व अतिशय कमी लोक हे शेती व्यवसायात मग्न असतांना दिसतात. या समाजातील बहुसंख्य लोक हे आपल्या मुलांना शाळेत पाठवू शकत नाहीत कारण कमी आर्थिक उत्पन्न, तसेच कुटूंबप्रमुख हा कमी शिकलेला असतो. तसेच ही कम्युनीटी हिंदू प्रथा आणि परंपरा पाळतांना दिसतात. हे मराठी भाषा बोलतांना दिसतात कारण यांचा संबंध मराठी माणसांशी येतो. या समाजात मोठया प्रमाणावर बालविवाह होतांना दिसतात. असे या शोध प्रबंधाच्या निष्कर्षात जाणवते.

**७.जाधव पंडीत यांनी १९८३ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरमराठवाडा विद्यापीठाला सादर केलेल्यासंशोधन अहवालात-"परभणी जिल्हयातील आश्रम शाळांची विशेष मागासघटकातील विद्यार्थ्याच्या विकासातील भूमिमा. "[८०]**

त्यांनी असा निष्कर्ष मांडला की ५७.६४% लोक हे अशिक्षीत आहेत. त्यामुळे या शाळांमधून मुलं शाळा सोडून जाण्याचे प्रमाण अतिशय जास्त आहे. तसेच आश्रमशाळांमधून मिळणाऱ्या सुविधा या गुणवत्तापूर्ण नाहीत. व या शाळांना या लोकांच्या विकासासाठी शंभर टक्के अनुदान हे सरकारकडून मिळते.

* **पारधी जमाती बदद्ल वर्तमान पत्रातुन प्रसीध्द झालेले लेख :-**

**१) पांडे कौस्तुभ-"शिकारी खुद यहा शिकार हो गया." [८१] जुलै सप्टेंबर २००४**

भटक्या विमुक्तांच्या सामाजिक प्रश्नांना वाहिलेले, अनियतकालीक, जुलै सप्टेंबर २००४ अंक पहिली, संपादक, कौस्तुभ पांडे.संवेदना संस्थेच्या, श्री कौस्तुभ पांढरीपांडे यांनी परिषदेच्या चौथ्या सत्रात पारधी जमातीच्या सामाजिक व पर्यावरणीय प्रश्नावर विवेचन केले.पारधी तांडा गावातील पारध्यांच्या सामाजिक परिस्थितीचे वर्णन गावातील लोकांकडून घेतले. माळरान, जंगल, गवताळ प्रदेश व गायरान शेतींच्या प्रदेशात भटकंती करून पक्षी, हरीण, घोरपड व ससा यासारख्या प्राण्यांची परंपरागत पध्दतीने शिकार करणे हे पारधी समाजाचे परंपरागत व्यवसाय होय. परंतु सद्या जंगल नसल्यामुळे उपजिविकेचे शाश्वत पर्याय नसणे ही सर्व भटक्या विमुक्तांची आजची सर्वात महत्वाची समस्या आहे, याचे विवेचन यात केलले आहे.

**२) बोकील मिलिंद- "पारधी बदलतायत पण..." [८२]**

परिवर्तनाचा वाटसरु, १ ते २५ ऑक्टोबर २०१५ प्रस्तुत लेखामध्ये मिलिंद बोकील यांनी पारधी समाजाचा इतिहास, इंग्रज काळातील त्यांच्यावर झालेला अन्याय १८७१ चा सराईत गुन्हेगार कायदा हा कसा अन्यायकारक होता व तो ब्रिटीश राजकारणाचा कसा भाग होता. हे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. परंतु हा सर्व अन्याय सहन करत पारधी जगत आहेत व ते कसे सुधारत आहेत त्यांनी सोलापूर जिल्हयातील केज तालुक्यातील पारध्यांचा अभ्यास केला आहे. या तालुक्यातील पारधी परिवर्तनाकडे वाटचाल करत आहेत असे लेखक म्हणतो ते शेती, ऊसतोडणी, मजुरी, काही ठिकाणी कंत्राटी कामगार, पशुपालन, शिक्षण, जात पंचायतीच्या अन्यायी कारभारा विषयी आवाज उठवणे, लिंगभेद कमी करणे इ.परिवर्तने या समाजात होतांना दिसत आहेत. असे मिलिंद बोचील यांनी आपले निरिक्षण नोंदवीले आहे.

**३) वाघमोट गुलाब -"सम्राट" [८३]**

बुधवार-२२ फेब्रुवारी २००७ प्रबोधन पान क्र.५. प्रस्तुत लेखात छत्रपती शाहू महाराजांनी भटक्या विमुक्त समाजातल्या लोकांसाठी त्यांच्या विकासासाठी कशाप्रकारे काम केले आहे हे सांगितले आहे. छत्रपती शाहू महाराजांनी पारधी लोकांची अस्मीता जागृत करण्यासाठी कृतीशील कार्यक्रमाची आखणी कशाप्रकारे केली याचा आढावा या लेखात घेतला आहे. छत्रपती

शाहूमहाराजांनी फासे पारधी आणि डोंबारी समाजाच्या वेदना समजून घेतल्या आणि त्यांचे पुनर्वसन केले याची माहिती या लेखात दिलेली आहे.

### ५.पांडे पंढरी कौस्तुभ- “तांडा ”[८४]

भटक्या विमुक्तांच्या सामाजिक प्रश्नांना वाहिलेले अनियतकालीक, संपादक, सप्टेंबर २००४, सल्लागार दत्ता साळवे डॉ.दिवाकर  इंगळे.या लेखात आदिवासींच्या प्रश्नांवर सरकार आणि स्वयंसेवी संस्था कशाप्रकारे कार्य करत आहेत. हे या लेखामार्फत समजते. तसे भटक्यांच्या प्रश्नांबाबत मात्र दिसत नाही व भटक्यांब-ल  बोलणारे फार कमी आहे. हे या लेखात दिसून आले आहे. आजवर आपण भटक्यांच्या भूतकाळाचे अत्यंत वाईट असे चित्र पाहिले आहे. याचा अर्थ आपण भूतकाळात चांगले नव्हतो असे आहे. मराठवाडयात व पश्चिम महाराष्ट्रात गुन्हेगारीच्या प्रश्नांची व पोलिस अत्याचाराची भीषणता इतकी आहे की, त्या गुंत्यात आपण रचनात्मक कार्यक्रमाचा विचार करू शकत नाही आणि पारधी समूहात चांगल्या भविष्याचे स्वप्नही पेरू शकत नाही.

### ५) पाटिल नितीन -“नगर मधील पारधी विकासच्या वाटेवर”[८५]

पुण्यनगरी, रविवार २००५-२००७ पान क्र.२ या लेखाच्या माध्यमातून अहमदनगर मधील पारधी समूदायाचा विकास कशाप्रकारे झाला हे दर्शविण्यात आला. यात जिल्हा अधिका-याने त्यांची भूमिका चांगल्या प्रकारे  बजावून (उमाकांत दांगट) महत्वपूर्ण काम केले आहे. यात नगर जिल्हयातील पारधी समूदायाविषयाची प्रमुख माहिती मिळाली. त्यात १५८८ गावांपैकी २०७ गावांमध्ये एकूण १३३१ पारधी कुटूंबे राहात आहे. त्यांच्यातील अनेकांना घरे  नाहीत. रेशनकार्ड नाही. शिक्षणापासून वंचीत आहे. यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध १४ योजना असलेले प्रारूप विकास आराखडा तयार केला. त्यासाठी एकूण ४४३०.२२ लाख रूपये इतका खर्च करण्यात आला. अजूनही अनेक पारधी विकासापासुन वंचित आहेत. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नवनवीन योजनांचा अवलंब कशा प्रकारे केला हे या लेखात सांगितले आहे.

**६) कुलकर्णी अंजली- "भटक्या विमुक्तांची अस्तित्वाची लढाई "[८६]**

या लेखात, यांनी भटक्या विमुक्तांच्या साधनविहीत जगण्याचा विचार न करता बिटीशांनी १८७१ मध्ये क्रिमीनल ट्राइब्ज ॲक्ट आणि इतर कायदे करून त्यांच्यावर जन्मजात गुन्हेगारीचा शिक्का उमटविला. बेचाळीस जमातीती लोकांचा समावेश यात होता. हा घृणास्पद आणि अमानवी प्रकार १९५१-५२ पर्यंत चालला व त्यांनतर सुरू असलेल्या त्यांच्या अस्तित्वाची लढाईचा उल्लेख सदर लेखात आहे.

**७) "गुन्हेगारीचा कलंक पुसण्याचे स्वप्न साकार "[८७]**

सकाळ, नगर टुडे, शुक्रवार २९/५/२०१५. सदर बातमी ही पारधी समाजातील एक तरूण राहुल दिपक भोसले रा.कालठण, जि.पुणे याची आहे. पोलिस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याब-ल आहे. गुन्हेगार म्हणून पोलिस ठाण्यात हजेरी लावत आल्याल्या समाजातील तरूण पोलिस अधिकारी होणं किती कठीण आहे हे लक्षात आणून देणे सदर बातमीचा उद्देश होता.

**८) "पारधी समाजाच्या मुलांना मिळाली नव्याने ओळख "[८८]**

सकाळ, २१ एप्रिल २०१४ सदर वृत्तपत्रातुन आलेली बातमी ही पारधी जमातीतील गुन्हेगार, चोर अशी ओळख असलेल्या पारध्यांच्या मुलांना अनंत झेंडे नावाच्या तरूणाने दत्तक घेतले आहे. मुलांची पहिली नावे बदलून त्यांना दुसरी नावे दिली आहेत. पारधी समाजातील ३० मुलांना दत्तक घेवून त्यांना संस्कारक्षम शिक्षण देवून सामाजिक जाणिव करून देण्याचा प्रयत्न या युवकाने केला आहे. त्यातून त्यांना नवी ओळख मिळत आहे. असे लेखात सांगितलेले आहे.

१) **उकीरडे दत्ता -"अमावस्या त्याच्यासाठी ठरते शुभ"[८९]**

**२)** सकाळ सदर बातमी मधून पिढयान पिढयांचा समाजावर बसलेला गुन्हेगारीचा शिक्का घरी अठराविश्वे दारिद्रय, जगण्यासाठी नित्याचाच संघर्ष, अशातच शहरी आणि ग्रामिण भागात अशुभ समजल्या जाणा-या अमावस्येने रोजगाराची वाट दाखविलेल्या पारधी समाजातील अंबाजी रामा काळे यांना रोजगार मिळाल्या बद्दल ची आहे. अमावस्येच्या दिवशी लिंबू-मिरची, बिब्याची माळ, काळी बाहुली, अमावस्येच्या दिवशी गावोगावी फिरून विकून रोजगार मिळवत आहेत.

**१०) "पारधी समाज व महिलांच्या विकासाचे व्रत"[९०]**

महाराष्ट्र  टाईम्स, १७ जानेवारी २०१६, प्रस्तुत वृत्तपत्रातुन पारधी समाजाच्या महिला, युवक यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी करत असलेल्या विविध योजनांविषयी माहिती आहे. या समाजाला रूढी आणि परंपराच्या जोखंडातून बाहेर काढणे तसेच या जमातीला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी घरकूल घटक योजना, मुलांच्या शिक्षणासाठी सरकार लक्ष देत आहे. तसेच गुन्हेगारीचा शिक्का बसलेला हा पारधी समाज स्वातंत्र्य मिळाले तरी पोलिसांचा या समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोण बदललेला नसल्याने हा समाज लाचारीचे जिवन जगत आहे. यासाठी शासनाने या समाजावर लक्ष केंद्रीत केले व विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करत आहे असे या लेखात सांगितले आहे.

### ११) "भटक्या विमुक्तांवर अन्याय नको"[९१]

सकाळ २८ मार्च २००७, या लेखात महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्त जाती जमातींची स्थिती ही अनुसूचित जाती-जमाती पेक्षाही खालावलेली आहे हे दर्शविले आहे. मात्र त्यांचा संवैधानिक दर्जा अनुसूचित जाती जमातींपेक्षा वेगळा होण्याची चिन्हे आहेत ही वेळ येवू नये म्हणून यासाठी प्रयत्न व्हावेत असे मत आहे.

### १२) "पारधी विकास कार्यक्रम राबवून समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न."[९२]

दैनिक लोकमत दिनांक ३१/१/२०१६पारधी समाजाला एका जागेवर स्थिर स्थावर करून त्यांचा वैयक्तिक व सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी विविध कार्यक्रम राबविले जात आहेत. राज्यसरकारच्या यआदिवासी विकास विभागाच्या वतीने पारधी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविता येतात. या योजना राबविण्याची कारणे पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.भटक्या विमुक्तांचे प्रश्न स्वरूप आणि दिशा सकाळ २२ फेब्रुवारी २००७ वार बुधवार, प्रस्तुत वृत्तपत्रामध्ये पारधी समाजाची दशा सांगितली आहे. प्रमुख राष्ट्रीयत्वाचा अविष्कार भटका विमुक्त समाज देशाच्या मातीशी इमान ठेवणा-या या समाजाने झुंजारपणे सर्वशक्तीनिशी देशासाठी जे लढवय्ये पण दाखविले त्यांची शिक्षा म्हणून १८७१ साली अत्यंत धुर्तपणे ब्रिटीशांनी जाणिवपूर्वक या समाजा

विषयी गुन्हेगारी कायदा केला व त्यांना कायमचेच गुन्हेगार केले. या जातीत जन्माला येणे हाच गुन्हा झाला यामुळे या समाजाचे एकूण जीवनच विस्कटले गेले.

वरिल प्रमाणे संदर्भ साहीत्य हे भटके व विमुक्त सामाज्याच्या संदर्भात लिहलेले दिसून येते.या साहित्यात प्रामुख्याने भटक्या व विमुक्त समाजा बददलचे समाजशास्त्रीय अंगाने झालेले लेखन, काही आत्मचरीत्रपर कादंब-या (दैना,उचलया,उपरा.) इ. तसेच पारधी जमातीवर लिहली गेलेली काही पुस्तके व या जमातीवर झालेली संशोधने त्याच प्रमाणे वर्तमान पत्रातुन या जमाती संदर्भात सध्या चालू असलेली चर्चा इ. बाजूने या जमाती बददल जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.उपरोक्त संदर्भ साहीत्या वरुन असे जाणवते की भटक्य व विमुक्त समाजाच्या वाटयाला अतीशय उपेक्षीत व वंचीत जिवण आहे.स्वतंत्र्यपूर्व काळापासून ते आज पर्यंत या जमातीला अतीशय खडतर जिवण जगावे लागले आहे.सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतीक व नागरीकत्वाबाबतचा मागासलेपणा या जमातींना सहन करावा लागलेली आहे.

## २.४. संशोधन आराखडा :-

आपणास कोणतेही कार्य व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी आपणास सर्वप्रथम त्या कार्याचा आराखडा तयार करावा लागतो. तसेच संशोधन कार्यात देखील संशोधकाला त्या कार्याचे पध्दतशीर नियोजन, त्याची रूपरेषा आणि मांडणी करावी लागते. संशोधन आराखडा ही शास्त्रीय सामाजिक संशोधनातील एक प्रमुख पायरी आहे. संशोधनाचा विषय, उद्देश, संशोधन क्षेत्र, संशोधनास आवश्यक असणारी माहिती संकलित करणे, तथ्य संकलन पध्दती व तंत्र नमुना निवडीचे आधार, तथ्य संकलनाची साधने इ. सर्व गोष्टी प्रथम निश्चित कराव्या लागतात.

डॉ. बोधनकर लोणी यांच्या मते, एखाद्या समस्येचे उत्तर शोधण्यासाठी, वैज्ञानिक पध्दती आणि तंत्राद्वारे संकलित केलेल्या माहितीचे आणि समंकाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन केल्यानंतर नवीन तथ्यांचा शोध घेऊन विविध घटकातील कार्यकारण प्रबंधाच्या आधारे सर्वसामान्य सिध्दांताचे आणि नियमांचे प्रतिपादन करणारी प्रक्रिया म्हणजे संशोधन होय.''[९३] संशोधन ही ज्ञान प्राप्त करण्याची वैज्ञानिक पध्दत आहे. तसेच ही एक बौध्दिक प्रक्रिया असून तिच्या द्वारे नवीन ज्ञान प्रकाशात आणले जाते. किंवा जुन्या ज्ञानातील उणिवा सुधारल्या जाऊन त्यात नवीन ज्ञानाची भर टाकावी लागते. सामाजिक तथ्ये, व्यवहार, घटना, सिध्दांत आणि नवीन ज्ञान यांच्याशी संबंधित असणाऱ्या सर्व प्रकारच्या संशोधनांना 'सामाजिक संशोधन असे म्हणतात. सामाजिक संशोधनाचा

संबंध सामाजिक घटनांशी असून सामाजिक घटनांचा अभ्यास समाज सुधारणा, व प्रगती साठी अत्यंत उपयुक्त ठरतो.

संशोधनाचे मुख्य दोन प्रकार आहेत.

**१) ''मौलिक किंवा शुध्द किंवा सैध्दांतिक संशोधन**

**२) व्यवहारिक किंवा क्रियाभिमुख संशोधन"** [१४]

प्रस्तुत संशोधन विषयासाठी क्रियाभिमुख संशोधनाचा अवलंब केला आहे. कारण एखादी समस्या सोडविणे हा व्यवहारिक संशोधनाचा उद्देश आहे.तसेच महत्त्वाच्या सामाजिक प्रभाव असणाऱ्या समस्यांचे यात अध्ययन केले जाते.

संशोधन कार्यास सुरूवात करण्यापूर्वी प्रथम संशोधन आराखडा तयार करावा लागतो.आराखडयामुळे त्या कार्याला सुसूत्रपणा येतो. कोणत्याही सामाजिक संशोधनातील संशोधन आराखडयामध्ये संशोधन विषय, उद्देश, अध्ययन क्षेत्र, कालावधी, तथ्य संकलन, नमुना निवडीचे आधार साधने, माहितीचे विश्लेषण इ. गोष्टींचा विचार करावा लागतो. त्यामुळे वेळ, पैसा, शक्ती इत्यादींची बचत होते. आणि येणाऱ्या अडचणींची ओळख होते. म्हणून संशोधन आराखडा महत्त्वाचा असतो. ऐकॉफ्र यांच्या मते "संशोधन विषयाची तथ्ये संकलित करण्याच्या पध्दतीची आणि प्रक्रियांची व्यापक आणि क्रियात्मक स्वरूपाची रूपरेषा म्हणजे संशोधन आराखडा होय."[१५] त्यावरून कोणत्या पध्दतीने आणि कोठून आणि कोणती तथ्ये संकलित करावयाची आहेत याची संशोधकाला कल्पना येते. त्यामुळे वस्तुनिष्ठ व समर्पक तथ्ये अल्प खर्चात संकलित करता येतात.

सामाजिक संशोधनासाठी संशोधक आराखडा आवश्यक असून तो संशोधनाच्या उद्दिष्टे याप्रमाणे बदलत असतो. "सामान्यपणे संशोधन आराखडयाचे चार प्रकार पडतात"[१६]

**१) अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा**

**२) वर्णनात्मक संशोधन आराखडा**

**३) निदानात्मक संशोधन आराखडा**

**४) प्रयोगात्मक संशोधन आराखडा**

सदर संशोधनासाठी, संशोधन विषय तसेच संशोधनाची उद्दिष्टे यांचा विचार करून "वर्णनात्मक संशोधन आराखडयाची" निवड केलीली आहे. कारण वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा मुख्य उद्देश 'एखादया समस्येशी संबंधित असलेल्या वास्तविक तथ्यांच्या आधारे वर्णनात्मक विवेचन करणे हा आहे' त्यासाठी संशोधन विषयाच्या बाबतीत यथार्थ आणि पूर्ण माहिती प्राप्त करून घेणे आवश्यक असते.वर्णनात्मक आराखडयात वैज्ञानिक तंत्राचा उपयोग करून तथ्ये संकलित केली जातात. मुलाखती, अनुसूची, प्रश्नावली, प्रत्यक्ष निरीक्षण, सहभागी निरीक्षण, सामुदायिक दस्तऐवज इ. विश्लेषण करण्याच्या कार्याचा प्रामुख्याने या आराखडयात समावेश होतो.

## २.५. संशोधन समस्या :-

सदर संशोधनाचा विषय "महाराष्ट्रातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास : विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा." हा आहे. या संशोधनातून पारधी समाजाचा सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाचा आढावा घेण्यात आला आहे. यामधून त्यांचे जीवनातील अनेक सामाजिक, आर्थिक इत्यादी समस्यांनी व्यापले आहे हे लक्षात येते. आपल्या मागासलेपणाची जाणीव व त्यामागची कारणे याबाबत हा समाज अनभिज्ञ आहे. पारंपारिक जीवनशैली आणि प्रगतांच्या संपर्कामुळे त्यामध्ये होणारे बदल यामुळे हा समाज स्थित्यंतरातून जात आहे. या स्थित्यंतराचाही आढावा या संशोधनातून घेतला आहे.

## २.६. संशोधनाची उद्दिष्टे-

सदर संशोधन हे पारधी या आदिवासी जमाती संदर्भात आहे. अहमदनगर जिल्हा हा संशोधनाचे कार्य क्षेत्र असून ''महाराष्ट्रातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास:विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा." हा संशोधन विषय असून वरील संशोधन विषयाच्या संशोधनासाठी संशोधकाने पुढील उद्दिष्टे ये निश्चित केली आहेत.

१) पारधी जमातीची सामाजिक,सांस्कृतिक व धार्मिक स्थिती अभ्यासणे.

२) पारधी जमातीच्या शैक्षणिक आणि आर्थिक वंचनेचा अभ्यास करणे.

३) पारधी जमातीच्या आरोग्य विषयक स्थितीचा अभ्यास करणे.

४) पारधी जमातीचे लोकसाहित्य व जातपंचायत अभ्यासणे.

५) पारधी जमातीला मिळणा-या शासकीय योजनांच्या लाभांचा अभ्यास करणे.

६) पारधी जमात व पोलिस यांच्यातील संबंधांचा अभ्यास करणे.

## २.७ संशोधनाची व्याप्ती :-

सदर संशोधनासाठी महाराष्ट्रातील महत्त्वपूर्ण असा 'अहमदनगर जिल्हा.' हे संशोधनाचे क्षेत्र निवडलेले असून जिल्हयातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करताना त्यांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, कौटुंबिक जीवन, जातपंचायत, लोकसाहित्य अभ्यासण्यापर्यंत व्याप्ती मर्यादित आहे.

## २.८.संशोधनाची विषयाची उपयुक्तता व महत्व :-

प्रस्तुत संशोधन हे 'पारधी' या विमुक्त जमाती पुरतेच मर्यादित व निगडीत आहे. प्रस्तुत संशोधनातून पारधी जमातीच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, जीवनावर प्रकाश पडतो. गुन्हेगार जमात कायदयाने त्यांची झालेली वाताहत लक्षात येते. सद्यस्थितीत हा समाज कोणत्या अवस्थेत जिवण जगतोय किंवा या जमातीत काही परिवर्तन आले आहे हे वंचीततेची मुख्य कारणे कोणती हे जाणने तसेच अधुनिकतेत व जागतीकी करणात यांच्या वंचीततेत काही परिवर्तन आले का हे शोधण्या साठी व त्यांच्या सर्वांगीन विकासासाठी आणि त्यांच्या अडचणींच्या निराकरणासाठी हे संशोधन निश्चित उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

प्रस्तुत विषयावरील संशोधन अहमदनगर जिल्हा परिषद, श्रीगोंदा पोलीस स्टेशन, जिल्हा पोलीस खाते यांना ही उपयुक्त ठरेल. सामाजिक शास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्था, पारधी जमाती विषयक कार्य करणारे यांना ही या संशोधनाचा फायदा होणार आहे. सामान्य जनतेत पारधी जमाती विषयी असणारा पूर्वग्रह दूर करण्यास देखील सदर संशोधन फायदेशीर ठरणार आहे.

जिल्हा परिषद, राज्य सरकार, केंद्र सरकार इ. सर्व पातळयांवर जमातीच्या विकासासाठी प्रयत्न करत आहेत. सदर संशोधनाच्या अध्ययनातून या प्रयत्नांना कितपत यश आले आहे हे निश्चित होईल व यांना पुढील विकास धोरणे, शासकीय योजना व त्यांची अंमलबजावणी करतांना उपयोगाचे ठरेल.

सदर संशोधनातून पारधी जमातीतील विविध रूढी, प्रथा, परंपरा, शिक्षणाचा अभाव यामुळे हा समाज इतर समाजाच्या तुलनेत कसा मागास आहे हे लक्षात येते व स्वत: पारधी

समाजाला हे संशोधन उपयुक्त ठरेल. प्रस्तुत संशोधन हे संबंधित विषया संदर्भात संशोधन करणाऱ्या इतर संशोधकांसाठी उपयुक्त व प्रेरणादायी ठरेल.

## २.९. संशोधनाच्या मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन विषयातील अभ्यासाच्या मर्यादा खालील प्रमाणे आहेत.

१) प्रस्तुत संशोधन हे अहमदनगर जिल्हयापुरतेच मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधनातून काढलेले निष्कर्ष हे प्रतिनिधीक स्वरूपाचे आहेत.

३) दुय्यम स्त्रोत : ांतील माहिती व वस्तुस्थिती यात काहीशी तफावत जाणवली.

४) या संशोधनात पारधी जमातीच्या राजकीय जीवनाच्या अभ्यासाचा समावेश नसल्याने प्रस्तुत विषयावर सुक्ष्म संशोधनास वाव आहे.

५) उत्तरदात्यांच्या प्रतिसादाबाबत अचूक व नेमकी माहिती या मध्ये काही उणीवा असण्याची शक्यता आहे. कारण माहिती विचारणाऱ्याकडे हे लोक संशयाने पाहतात.

६) शिक्षणाच्या अभावामुळे सुसंगत अशी माहिती देण्यात ही कुटूंबे असमर्थ होती.

७) पारधी पाडयांवर बरेच संशोधक माहिती प्राप्त करण्यासाठी जातात प्रश्न विचारून आपले संशोधन कार्य पूर्णत्वास नेतात परंतु या समाजाचे प्रश्न अनुत्तर्णीतच राहतात. हे या समाजातील लोकांना माहित आहे तेव्हा हे माहिती देण्याचे टाळतात.

प्रस्तुत संशोधन विषयाचा कालावधी हा २००७ त २०१७ हा मर्यादित होय.

## २.१०. सैध्दांतिक आधार :-

सदर संशोधन कार्य हे भटक्या विमुक्त जमाती संदर्भात आसलयाने या संशोधनासाठी योग्य ती सैध्दांतिक चौकट ठरविने महत्वपूर्ण असे कार्य आहे. सैध्दांतिक दृष्टिकोण म्हणजे नेमके काय याचे उत्तर हरिकृष्ण रावत यांच्या समाजशास्त्र विश्वकोशात मिळते ते याब-ल असे लिहतात, "वस्तुओ और घटनाओं की प्रकृति के संबंध में अन्तर्निहित प्रश्नों और उनके संभवित उत्तरों के बारें में हम जो अनुमान लगाते है, इन अनुमानों के समूह को ही सैध्दान्तिक परिप्रेक्ष्य कहते हैं "[९७]

वरील विवेचनावरून सैध्दांतिक दृष्टिकोण कशाला म्हणायचे याची कल्पना येते. सामान्यपणे वस्तु आणि घटनांच्या स्वरूपा संबंधी असणारे प्रश्न आणि त्यांच्या संभाव्य उत्तरा

साठी आपण जे अनुमान लावतो, या अनुमानालाच सैध्दांतिक दृष्टिकोण असे समजले जाते. कारण घडणाऱ्या घटनांबाबत व त्या घटनांच्या स्वरूपाबाबात विभिन्न शास्त्रांतर्गत भिन्न प्रश्न आणि भिन्न उत्तरे असतात. म्हणजेच सर्व विज्ञानांच्या दृष्टिकोणात भिन्नता असते. समाजशास्त्र या विषयात विविध सैध्दांतिक दृष्टिकोणाचा आधार घेऊन विविध बाबींचा अभ्यास केला जातो.तसेच कोणत्याही क्षेत्रात जेव्हा अभ्यासाला सुरूवात करावयाची असते. तेव्हा कशाचा अभ्यास करावयाचा ? याविषयी काही गोष्टी गृहित धराव्या लागतात असे प्राचीन काळी सर्व व्यवहार देवांच्या इच्छेप्रमाणे चालतात असे गृहीत धरलेले होते, आणि मग सर्व व्यवहारांच्या स्वरूपाकडे या दृष्टिकोनातून पाहिले जात असे. आधुनिक काळात या विश्वातील व्यवहारात काही निश्चितता आहे व तिचा शोध घेता येणे शक्य असते असे मानले गेले आहे. अशाप्रकारे अभ्यास करण्यासाठी जी गृहिते धरलेली असतात त्यांना उद्देशून अभ्यास विषयक दृष्टिकोन असे म्हटले जाते.

समाजशास्त्रीय सैध्दांतिकदृष्टया विचार करता समाजातील उपेक्षित वर्गाच्या संदर्भाने **सापेक्ष वंचिताचा सिध्दांत,** (**Relative Depravation Theory**) **वंचितांचा अभ्यास** आणि **नामाभिदानसिध्दांत** (**Labeling Theory**) या सिध्दांताला अनुसरून पारधी समाज जीवनाची व मागासलेपणाची मिमांसा करता येईल.

- **सापेक्ष वंचितता सिध्दांत** :-

सापेक्ष वंचितता ही संकल्पना थोडीशी व्यक्तीनिष्ठ आहे. कारण, प्रत्येक मनुष्य हा नेहमी माझ्या योग्यतेप्रमाणे काही मिळत नाही अशी तक्रार करत असतो. वस्तुनिष्ठ दृष्टिने जर पाहिले तर गरीब लोक खूपच गोष्टींपासून वंचित राहतात. मध्यम वर्गाला उपलब्ध असणाऱ्या साध्या साध्या गोष्टीही गरीबांना संपूर्ण आयुष्यात कधीच मिळत नाहीत. अर्थात काही माणसे किंवा समूह इतरांपासून आपण वंचित आहोत असे समजत असतात. सापेक्ष वंचितता ही संकल्पना समाजातील सर्व गटांना लावता येते.

सापेक्ष वंचितता हा सिध्दांत दोन पैलुंना अनुसरून विकसीत झाला आहे. पहिला पैलु म्हणजे सामाजिक गतीशीलता आणि दुसरा पैलु म्हणजे सामाजिक संघर्ष होय. रॉबर्ट मर्टन यांनी सर्वप्रथम १९५० मध्ये आणि त्यानंतर १९६६ मध्ये रेन्सीमन यांनी विधायक संदर्भ समूहाच्या जीवन पध्दतीच्या संदर्भात इतर गटात होणाऱ्या सामाजिक गतिशीलतेच्या अनुषंगाने सापेक्ष

वंचिततेच्या सिध्दांताचे विश्लेषण केले आहे. एका सामाजिक समूहाला विशिष्ट बाबींचा लाभ झाला तर दुसरा समूह मात्र त्या लाभापासून वंचित राहिला. त्यामुळे तो समूह इतर समाजाच्या तुलनेत स्वत:ला लाभापासून वंचित मानतो.

कार्ल मार्क्स, फ्रेडरिक एंगल्स आणि अबर्ले (Aberle) यांनी १९६६ मध्ये सामाजिक संघर्षाच्या अनुषंगाने सापेक्ष वंचितता सिध्दांताची मांडणी केली. त्यांच्या मते 'भौतिक स्थिती, दर्जा, वर्तन अपेक्षा आणि वस्तुस्थिती यातील नकारात्मक भेद म्हणजे सापेक्ष वंचितता होय.' सुप्रसिध्द विचारवंत गुर्र (Gurr) यांनी १९७० मध्ये सापेक्ष वंचितता सिध्दांताचे आर्थिक स्थिती, राजकीय शक्ती आणि सामाजिक दर्जा या दृष्टीकोणातून महत्त्वकांक्षात्मक वंचितते आधारे विश्लेषण केले. याचाच अर्थ 'जेव्हा लोकांमध्ये आपण काही गोष्टींपासून वंचित आहोत, आपणाशी इतरांप्रमाणे व्यवहार केला जात नाही अशी भावना निर्माण होते तेव्हा ते सामाजिक चळवळ निर्माण करतात.' म्हणजेच समाजातील ही विषमता निर्माण होण्यास आर्थिक वंचना, राजकीय व सामाजिक वंचना जबाबदार आहे. 'पारधी' हा स्वत:ला मूळ निवासी म्हणवणाऱ्या समाजाचा प्रतिनिधी असूनही वंचिततेच्या भावनेमुळे, समाजाच्या नकारात्मक मानसिकतेमुळेच अगतीकपणे वागतो आहे. आणि वंचिततेचे जीवन जगतो आहे. भारतातील सामाजिक चळवळीच्या उदयाचा विचार केल्यास सापेक्ष वंचितता हा घटक सर्वात प्रबळ ठरतो. कारण भारतातील बहुसंख्य जनता ही सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक बाबतीत वंचिततेचे जीवन जगत आहे. पारधी समाजात वरील सर्वच बाबींचा अभाव असल्याने पारधी मागासलेपणाचे जीवन जगतो आहे. पैसा हे स्विकृत अंतिम ध्येय असले तरी तो मिळविण्याच्या संधीचा अभाव येथे आहे. समाजमान्य मार्गाने त्यांना यश मिळत नाही. परिणामी उपजिविकेसाठी गैरमार्गाचा अवलंब केला जातो. इतर घटकाबरोबरच्या वंचिततेच्या प्रबळ जाणीवेतूनच अशा प्रकारचे वर्तन घडून येते असे म्हणता येईल. व ही वंचीतता कमी होण्या एवजी या जमाती बाबत वाढतच जातांना दिसतेय का हे सदर संशोधनातुन तपासले जाणार आहे.

- **नामाभिधान सिध्दांत - लेबलिंग सिध्दांत (Labelling Theory) :-**

१९३८ साली फ्रँकलिन टेनेनबम (Franklin Tannenbaum)यांनी त्यांच्या "Crime and the Community" या ग्रंथात हा सिध्दांत मांडला.''एखाद्या वर्तनास 'गुन्हेगारी' वर्तन

ठरविणाऱ्या प्रक्रियेवरच हा सिध्दांत बोट ठेवतो. एखाद्या व्यक्तिच्या वर्तनास 'गुन्हेगारी' असे नामाभिधान देण्याच्या कृतीने असे वर्तन कमी होण्याऐवजी वाढण्याची शक्यता असते असा हा सिध्दांत सांगतो. टेनेनबम यांनी नामाभिधान प्रक्रियेस असे म्हटले आहे. समाजाचा गुन्हेगार व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा गुन्हेगारी वर्तन कमी करण्याऐवजी असे वर्तन पुन्हा करण्यास उत्तेजन देतो. लेबलिंग पध्दती ही गुन्हा नियंत्रणाऐवजी गुन्हा वाढवण्यास पोषक ठरते".[९८]

'पारधी' ही जमात गुन्हेगार जमात म्हणून ओळखली जाते. कारण १८७१ सालच्या गुन्हेगारी जमात कायदयाने शिक्कामोर्तब केलेल्या गुन्हेगार जमातींपैकी 'पारधी' ही एक जमात आहे. व गुन्हेगार जमातीत समावेश केल्या गेल्याने सामान्य समाजाचा या जमातीकडे पाहण्याचा दृष्टीकोण हा पूर्णपणे बदलला गेला. बरीच वर्षे त्यांच्यावर गुन्हेगार हा शिक्का राहिला. आजही समाजात पारधी म्हणजे चोरच  असा लोकमानस दिसतो बेरड, भिलल या गुन्हेगार जमातीत समाविष्ट आसणा-या जमाती देखील चोरी करतात परंतु संशय मात्र पारध्यावर जातो हा त्यांना मिळालेलया लेबलचाच परीणाम आहे. भारत स्वातंत्र्यानंतर पंडीत नेहरूंनी यांनी विमुक्त म्हणून घोषीत केले. परंतु सर्वसामान्य लोकांचा यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोण आजतागायता तोच आहे. जंगल विषयक कायदे ब्रिटीश काळात व नंतर देखील कठोर केले गेले. उपजीविकेचे कोणतेही साधन नाही अशा परिस्थितीत या समाजाकडून गुन्हा घडणे चोरी करणे साहजिकच आहे. परंतु त्यांची परिस्थिती समजावून घेऊन त्यांना सामिलकरून घेणे मुख्य समाज व्यवस्थेला गरजेचे होते. मात्र समाज व्यवस्थेने चोर गुन्हेगार ठरवून त्यांना बाहेरच ठेवले व 'पारधी म्हणजे चोरच' असा पूर्वग्रहच करून घेतला हे नामाभिधान देखील हयांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीला बळावतांना दिसते. यातुन यांची गुन्हेगारी वृत्ती कती होण्या ऐवजी वाढतांना दिासते. म्हणून या समाजाचा अभ्यास करण्यासाठी हा दृष्टीकोणाच्या संदर्भ चौकटीतुन पहाणे संयुक्तीक ठरते.

विषयक कायदे ब्रिटीश काळात व नंतर देखील कठोर केले गेले. उपजीविकेचे कोणतेही साधन नाही अशा परिस्थितीत या समाजाकडून गुन्हा घडणे चोरी करणे साहजिकच आहे. परंतु त्यांची परिस्थिती समजावून घेऊन त्यांना सामिलकरून घेणे मुख्य समाज व्यवस्थेला गरजेचे होते. मात्र समाज व्यवस्थेने चोर गुन्हेगार ठरवून त्यांना बाहेरच ठेवले व पारधी म्हणजे चोरच  असा पूर्वग्रहच करून घेतला हे नामाभिधान देखील हयांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीला बळावतांना दिसते.

यातुन यांची गुन्हेगारी वृत्ती कमी होण्या ऐवजी वाढतांना दिसते. म्हणून या समाजाचा अभ्यास करण्यासाठी या दृष्टीकोणाच्या संदर्भ चौकटीतुन पहाणे संयुक्तीक ठरते.

## २.११ संशोधन पध्दती :-

सदर संशोधनासाठी संशोधकाने गुणात्मक व संख्यात्मक अशा दोन्ही संशोधन पध्दतींचा अवलंब केलेला आहे. पारधी समाजाची विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, जातपंचायत, संस्कृती, लोकसाहित्य अशा काही घटकांचे गुणात्मक पध्दतीने तथ्य संकलन केले आहे तर कुटुंबाचा आकार, उत्पन्न, शिक्षणाचे प्रमाण, आरोग्य सुविधा व इतर काही बाबींचे संख्यात्मक तथ्य संकलीत करुन त्या तथ्यांचे सारण्यांच्या माघ्यमातुन विश्लेषण करून संशोधन कार्य पूर्णत्वास नेले आहे.

- **गुणात्मक व संख्यात्मक संशोधन पध्दती-**

संशोधकाने हाती घेतलेले संशोधन कार्य एखाद्या अपेक्षीत निष्कर्षाप्रत येण्यासाठी योग्य अशा विश्लेषणात्मक साधने आणि तंत्राच्या वापराशी संशोधन पध्दती निगडीत असते. सामाजिक संशोधनात ज्या नेहमी वापरल्या जाणा-या पध्दती आहेत, त्या म्हणजे तुलनात्मक पध्दती, क्षेत्रकार्य पध्दती, ऐतिहासीक पध्दती, वैज्ञानिक अध्ययन पध्दती, गुणात्मक व संख्यात्मक पध्दती इ. होय.

संशोधकाने सदर संशोधनासाठी निवडलेल्या उपरोक्त विषया संदर्भात गुणात्मक व संख्यात्मक या दोनही संशोधन पध्दतीचा अवलंब करून संशोधन विषयाला पुरक माहिती प्राप्त करण्याचा केलेली आहे.

### १. गुणात्मक संशोधन :-

''एखाद्या सामाजिक घटकांच्या किंवा समस्यांच्या माहितीचे जेंव्हा गुणाच्या आधारे विश्लेषण केले जाते. त्यास गुणात्मक अध्ययन असे म्हणता येईल.''[११] म्हणजे गुणात्मक संशोधन पध्दतीत गुणांच्या आधारे विश्लेषण केले जाते. ही पध्दती प्रामुख्याने तात्वीक स्वरूपाची असते. या संशोधनात सहभागी निरीक्षण, असंरचित मुलाखत, व्यष्टी अध्ययन, आशय विश्लेषण, दृकश्राव्य साधने, कागदपत्रांचे परिक्षण, यांच्या सहाय्याने तथ्य संकलीत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या पध्दतीत तथ्य संकलन हे क्षेत्रकार्य, मुलाखत तंत्र, संस्कृती वर्णन पध्दतीवर अधिक भर दिलेला आहे. सदर संशोधनासाठी ही पध्दती वापरुन पारध्यांची संस्कृती, चालीरीती, प्रथा,

परंपरा, जातपंचायत, धार्मीक जिवन, लोकसाहीत्य, इ. बाबींची माहीती मिळवीण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**गुणात्मक संशोधन पध्दतीची वैशिष्टये-**

१.गुणात्मक संशोधन हे सामाजिक घटनासंदर्भात, सामाजिक घटना, क्रिया, मुल्य व प्रमाणके इ.लोकांच्या जीवन अस्तित्वाशी संबंधीत मुद्दे या दृष्टीकोणात येतात.

२.निसर्गवादी संरचनेत सहभागाच्या दृष्टीकोणातून पूर्णपणे विस्तृत वर्णनात्मक असे हे अध्ययन आहे.

३.समर्गवादी चौकटीतून सामाजिक व भाषिक संदर्भागत सामाजिक घटनांचे वर्णन, व्यक्ती वर्तनाधारे अध्ययन केले जाते.

४.आगमण पध्दती, मुक्त व लवचिक दृष्टीकोण या संशोधन प्रतिमानात आहे."[१००]

एकूणच या पध्दती अंतर्गत एखाद्या घटकाच्या संस्कृतीचे वर्णन, घटनाशास्त्रीय दृष्टीकोन तसेच घटकांचे सौंदर्य, समृध्द, उपयोजन, चांगले अथवा वाईट स्वरूप या आधारे मूल्यमान केले जाते.

**२.संख्यात्मक पध्दती :-**

"संख्यात्मक पध्दती ही अंकीक / संख्यात्मक तथ्य संकलनासाठी अवलंबीली जाते."[१०१] या पध्दतीत वय, उत्पन्न, कुटुंबाचा आकार, आर्थिक घटक, इ. सर्व संख्यात्मक चल म्हणून विचारात घेतले जाते ही पध्दती सामाजिक संशोधन विश्लेषणावर आधारित असते. या पध्दतीत तथ्यांचे विश्लेषण हे गणिती तत्वावर केले जाते. अनेक परस्पर घटकांतील सहसंबंध जाणून घेणे या पध्दतीमुळे शक्य होते. या पध्दतीमुळे मिळणारे निष्कर्ष हे अधिक अचूक व बिनचूक असतात. '' ऐसे तथ्य परिणामात्मक कहलाते हैं जिन्हें किसी माप की इकाइयों के आधार पर संख्याओंमें प्रस्तुत किया जा सकता है।"[१०२]

**२.११.१ नमुना निवड :-**

नमुना निवड ही संशोधन कार्यातील अतिशय महत्वाची अशी बाब आहे, की ज्या मुळे संशोधन कार्य हे सुरळीत होते. "Sample is a collection of observations for which one has data with which he/she going to work".[१०३] प्रस्तुत संशोधन विषयासाठी

प्रश्नावलीच्या माध्यमातून उपयुक्त माहिती संकलित करण्यासाठी अहमदनगर जिल्हयातील पारधी उत्तरदात्यांची लोकसंख्येच्या घटननेनुसार 'सहेतूक नमुना निवड' पध्दतीने निवड केली. कारण सदर संशोधना संदर्भातील लोकसंखेची सुनिश्चीत आकडेवारी संशोधकाकडे होती. संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या माहितीचे संकलन प्रश्नावली मधील विविध प्रश्न विचारून करण्यात आले आहे.

- **क्षेत्र निवड :-**

प्रस्तुत संशोधनाचे अहमदनगर जिल्हा हे कार्यक्षेत्र आहे. जिल्हयात एकूण चौदा तालुके आहेत व जिल्हयात एकूण १५८८ गावे आहेत. त्यापैकी २०७ गावांमध्ये १३३१ पारधी कुटूंबे राहतात. ही संख्या संशोधनासाठी पूरेशी आहे, म्हणून संशोधकाने अहमदनगर जिल्हा हे कार्यक्षेत्र संशोधनासाठी निवडलेले आहे. शिवाय संशोधक स्वत: अहमदनगर जिल्हयातील निवाशी असलयाने क्षेत्रीय सर्वेक्षणाच्या कार्यास अडचणी येणार नाहीत तसेच हे कार्य कमीत कमी खर्चिक व्हावे हा उदेदश देखील क्षेत्र निवडी मागील संशोधकाचा होता.

- **तालुका निवड :-**

अहमदनगर जिल्हयातील कर्जत, श्रीगोंदा, जामखेड व नगर या चार तालुक्यात पारधी वस्त्यांची संख्या अहमदनगर जिल्हा परीषद अहवाला २०११ नुसार अधिक आहे. बाकी तालुक्यांनी अतिशय तुरळक लोकवस्ती दिसून येते. वरील चार तालुक्यांच्या तुलनेत श्रीगोंदा हा एकमेव तालुका असा आहे जेथे पारधी लोकसंख्या सर्वाधिक आहे. म्हणून संशोधकाने संशोधनासाठी जिल्हयात एकूण चौदा तालुक्यांपैकी उपरोक्त चार तालुक्यांची निवड केली आहे.

**तक्ता.क्र. २.४**

**अहमदनगर जिल्हयातील पारधी समाजाची तालुका व गाव निहाय लोकसंख्या दर्शविणारा तक्ता.**

| तालुका | एकूण गावे | पारधी समाज नसलेली गावे | पारधी समाज असलेली गावे | पारधी कुटुंब संख्या | व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| श्रीगोंदा | ११५ | ७३ | ४२ | ४२७ | २०६६ |
| कर्जत | ११८ | ६८ | ५० | १६५ | ९५३ |
| जामखेड | ८७ | ५९ | २८ | २०६ | ९७९ |
| श्रीरामपूर | ५४ | ३९ | १५ | १०४ | ५१५ |
| राहुरी | ९६ | ९३ | ३ | २५ | १०९ |
| नेवासा | १२० | ११० | १० | ५० | २४६ |
| राहाता | ६० | ५६ | ४ | ९ | ६१ |
| शेवगाव | ११२ | १०० | १२ | ५० | २२७ |
| पाथर्डी | १३७ | १३० | ७ | ३७ | १९५ |
| नगर | ११७ | ९२ | २५ | १७० | १०६९ |
| पारनेर | १३१ | १२५ | ६ | २६ | १९४ |
| कोपरगाव | ७९ | ७४ | ५ | ६० | ३५० |
| संगमनेर | १७१ | १७१ | ० | ० | ० |
| अकोले | १९१ | १९१ | ० | ० | ० |
| एकूण | १५८८ | १३८१ | २०७ | १३३१ | ६९६४ |

**स्त्रोत :** पारधी जनगनना व विकास प्रारुप आराखडा अहमदनगर जिल्हा पृष्ठ क्रमांक १

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, श्रीगोंदा, कर्जत नगर जामखेड या तालुक्यात पारधी लोकसंख्या ही सर्वाधिक आहे तेंव्हा संशोधकाने या चार तालुक्यांची नमूना म्हणून निवड केलेली आहे.

**गाव निवड :-**

अहमदनगर जिल्हयात १५८८ गावे आहेत व त्यापैकी २०७ गावांमध्ये १३३१ पारधी कुटूंबे आहेत अशी माहिती प्राप्त झाली. या शिवाय प्रत्यक्ष सर्वेक्षणा दरम्यान इतर ठिकाणी ही यांचे वास्तव्य असल्याचे आढळते. प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षणासाठी गावाची निवड करतांना श्रीगोंदा, कर्जत नगर जामखेड तालुक्यातील जास्त पारधी लोकसंख्या असणाऱ्या गावांतील वस्त्यांची नमुना गावे म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

**अ) श्रीगोंदा तालुक्यातील जास्त पारधी लोकसंख्या असणाऱ्या गावे**

| | |
|---|---|
| १.सुरोडी | ७. बेलवंडी |
| २.कोळगाव | ८.घारगाव |
| ३.भानगाव | ९.पिंपळगाव पिसा |
| ४.देऊळगाव | १०.काष्टी |
| ५. गलांडे | ११. निमगाव |
| ६.लोणी व्यंकनाथ | १२.पेडगाव |

**ब) कर्जत तालुक्यातील जास्त पारधी लोकसंख्या असणाऱ्या गावे**

| | |
|---|---|
| १. पाथरवाडी. | ६. दुरगाव |
| २. चपळगाव. | ७. बरडगाव |
| ३. दिघी | ८. टाकळी |
| ४. खंडाळे. | ९. घुमरी |
| ५. गणेशवाडी | १०. नांदगाव |

**क) नगर तालुक्यातील जास्त पारधी लोकसंख्या असणाऱ्या गावे**

१. नगर शहर (सारस नगर, भिंगार, बूरडगाव रोड, आलमगीर,एम.आय.डी.सी.)

| | |
|---|---|
| २. निमगाव वाघा | ५. घोसपूरी |
| ३. बू-हानगर | ६. शिंगवे तूकाई |
| ४. केडगाव | ७. दरेवाडी |
| ८. वाळूंज पारगाव | ९. कोलहेवाडी |

१०. खंडाळा

**ड) जामखेड तालुक्यातील जास्त पारधी लोकसंख्या असणाऱ्या गावे**

१. खर्डा ६. लोणी

२. जवळा ७. देवदैठण

३. वंजारवाडी ८. पिंपळगाव

४. दरडेवाडी ९. पाडळी

५. शिरुर १०. धानोरा

वरील गावांची नमुना गावे म्हणून निवड केलेली आहे. या गावांची निवड करतांना तेथील लोकसंख्येची घनता लक्षात घेऊन वस्त्यांची निवड केली आहे. इतर तालुक्यांच्या तुलनेत वरील तालुक्यात पारधी कुटूंबे जास्त आहेत.

**कुटूंबाची निवड :-**

कुटूंबाची निवड करतांना खालील चार ही गटातील कुटूंबाना योग्य प्रतिनिधीत्व मिळेल अशी पध्दतीने निवड केली. शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही विभागातील कुटूंबे, स्त्री-पुरूष, विशेष कुटूंब प्रमुख, वयस्कर व्यक्ती इ.निवडलेला नमुना गट प्रतिनिधीक असावा म्हणून उत्तरदाता म्हणून कुटूंब प्रमुखच निवडला जेणे करून संपूर्ण सुसंगत माहिती घेणे सुलभ झाले. ज्या कुटुंबात कुटुंब प्रमुख क्षेत्रीय सर्व्हेक्षणा दरम्यान भेटले नाही त्या कुटुंबातील इतर सदस्या कडून मुलाखत अनुसूची द्वारे माहीती प्राप्त केली ज्यांना जमातीबद्दल माहिती आहे व जे पूर्वीची आणि सद्यस्थिती यांची माहिती देऊ शकतील या उद्देशाने कुटूंबकर्ता अनुभवी, विवाहित व्यक्ती इ. ची निवड केली. तालुक्यातील वस्ती आणि कुटूंब संख्येच्या प्रमाणात निवडक कुटूंबाकडून अनुसूची भरून घेण्यात आली. वस्ती संख्या जास्त असली तरी वस्ती कुटूंब संख्या कमी असल्याने जास्तीत जास्त वस्त्यांना भेटी दयाव्या लागल्या.

**अहमदनगर जिल्हयातील पारधी उत्तरदाते नमुना निवड दर्शविणारा तक्ता.**

**तक्ता. २.५**

| अ.न. | तालुका | नमूना कुटूंब संख्या |
|---|---|---|
| १. | जामखेड | ५ |
| २. | कर्जत | २८ |
| ३. | नगर | ६८ |

| | | |
|---|---|---|
| ४. | श्रीगोंदा | १४९ |
| | **एकूण** | **२५०** |

संशोधना साठी निवड केलेलया सर्व तालुक्यांमधून समान कुटुंबांची निवड करण्याचे संशोधकाचे नियोजन होते मात्र काही तालुक्यांमधील काही नमुणा निवड गावातुन अपेक्षीत सहकार्य न मिळालयाने संशोधकास सहकार्य प्राप्त तालुक्यातील गावांतुन मुलाखत अनुसूची द्वारे तथ्य संकलनाचे कार्य पार पाडले.

**२.१२. तथ्य संकलन :-**

तथ्य संकलन म्हणजे निवडलेल्या संशोधन विषयासंदर्भात माहितीचे संकलन करणे होय. कोणत्याही सामाजिक संशोधनातील तथ्य संकलन ही अतिशय महत्त्वाची प्रक्रिया असून तथ्य संकलनाचे प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची, निरीक्षण, सर्वेक्षण इ. अनेक मार्ग आहेत. "महाराष्ट्रातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास : विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा."या संशोधन विषयाच्या संशोधन कार्यासाठी प्राथमिक तथ्य व दुय्यत या दोनही मार्गाने तथ्य संकलन  केलेले असून मुलाखत, अनुसूची, सहभागी निरीक्षण, असहभागी निरीक्षण, व्हिडिओ कॅमेरा या साधनांचा वापर केला शास्त्रीय पध्दतीने निवडलेल्या गावास वारंवार भेटी दिल्या. विविध धार्मिक विधी, जत्रा व जातपंचायत मिटींगीत उपस्थित राहून तथ्य संकलन केले.

**अ) प्राथमिक तथ्य :-**

प्राथमिक स्त्रोत :  व द्वितीयक स्त्रोत :  असे तथ्य संकलनाचे दोन स्त्रोत :  आहेत. "संशोधकाने प्रथम प्रयत्नातून किंवा अध्ययनातून प्राप्त केलेल्या तथ्यांना प्राथमिक तथ्ये असे म्हणतात."[१०४] निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली इ. तंत्राद्वारे प्राथमिक तथ्ये संकलित केली जातात. या स्त्रोत : यात मुलाखत अनुसूचीचा देखील वापर केला जातो. "मुलाखत अनुसूची ही एक प्रकारे प्रश्नावली असून मुलाखत घेणारा संशोधक उत्तरदात्यांना प्रश्न विचारून इतर व्यक्ती समोर ती भरण्याचे कार्य करतो."[१०५] अनुसूची हे तथ्य संकलनाचे प्रभावी साधन आहे. अनुसूचीचे स्वरूप संशोधन विषयानुसार बदलते. प्रस्तुत संशोधनासाठी मुलाखत अनुसूची या तंत्राचा अवलंब केला आहे. मुलाखत अनुसूचीत संशोधक व संशोधनाचे एकक यांच्यात प्रत्यक्ष संबंध येतो. संशोधक

प्रश्नावली नुसार प्रश्न विचारतो आणि उत्तरदात्याने दिलेली उत्तरे अनुसूचीतील रिकाम्या जागी नोंदविली जातात. या ठिकाणी निरीक्षणावरही भर दिला जातो. प्रत्यक्ष निरीक्षणातूनही नोंदी घेतल्या गेल्या आहेत. सदर संशोधनासाठी अनुसूची तंत्राचा वापर केला, कारण, पारधी जमातीत साक्षरतेचा अभाव आहे तेव्हा प्रश्नावली भरून घेणे शक्य नव्हते. मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून प्रत्यक्ष मुलाखत घेणे देखील शक्य झाले. निरीक्षणाद्वारे उपलब्ध साधनांची जसे घरे, जमीन, सोयी, सवलती इ. माहिती मिळू शकली. त्यांचे सामाजिक जीवन, बोलीभाषा, शिकार , धर्म, व्यसने, समस्या पोलीस इ. वर चर्चा करता आली.

**ब ) दुय्यम तथ्य :-**

"जी तथ्ये स्वत: संशोधकाची नसून अन्य व्यक्ती किंवा संस्था यांच्याद्वारे संकलित केली जातात आणि ती त्यांच्या मालकीची असतात त्यांना द्वितीयक तथ्य संबोधले जाते."[१०६] यात प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, अहवाल, अभिलेख, हस्तलिखित पत्रे, दैनंदिनी यांचा समावेश होतो. प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीयक स्त्रोत : म्हणून विविध लेखकांची पुस्तके, वर्तमानपत्रे, अहवाल, विविध विद्यापीठाची ग्रंथालये, सामाजिक संशोधन संस्था, समाजशास्त्र संशोधन पत्रिका इ. दुय्यम स्त्रोत : ांचा संशोधनासाठी मोठा उपयोग झाला.

**२.१२.१. तथ्य विश्लेषण व निर्वचन :-**

ज्या केलेल्या तथ्यांचे काळजीपूर्वक परिक्षण केले व मुलाखती अनुसूची भरून माहिती संपादित केली. प्राप्त माहिती वेगवेगळया स्वरूपाची असल्याने प्रश्नावलीतील मुख्य घटकांचे वर्गीकरण केले. मिळालेल्या माहितीचे संख्यात्मक आणि गुणात्मक वर्गीकरण करून अनावश्यक माहिती वगळली. तसेच दुय्यम स्त्रोत : ाकडून मिळालेल्या विश्वसनीय माहितीचे विश्लेषण वर्णनात्मक पध्दतीने केले. तथ्यांचे सांकेतीकरण व तक्ता करण केले. काही प्रश्न सामान्य, सरळ कोष्टकात ठेवले व त्यांचे विश्लेषण केले. तर काही माहितीचा परस्पर संबंध जोडून दुहेरी तक्यात बसवून सविस्तर विश्लेषण केले. सर्व माहितीच्या विश्लेषणासाठी संशोधन विषयाचे गुणात्मक व संख्यात्मक विभागांतर्गत विश्लेषण करून संख्याशास्त्रीय दृष्टया निष्कर्ष काढले आहेत.

प्रबंधात शेवटी मुलाखत अनुसूची जोडली असून पुस्तके, मासिके, अहवाल, इंटरनेटवरून घेतलेली माहितीची संदर्भ सूची जोडलेली आहे.

- **संदर्भ सूची-**

१.कांबळे उत्तम, '*भटक्यांचे लग्न*', मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१३,पृष्ठ क्र.१

२. तैत्रव, पृष्ठ क्र.३.

३. डिसूसा दिलीप, *'जन्माने गुन्हेगार'*, (अनु.कामत साधना ), पद्मगंधा प्रकाशन, पुणे. २००८,पृष्ठ क्र.४४.

४. तैत्रव, पृष्ठ क्र.१७.

५.तर्कतीर्थ श्री. जोशी लक्ष्मण शास्त्री, *'मराठी विश्वकोश'*-खंड १२, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ, मुंबई. १९८५,पृष्ठ क्र.१४७०.

६. कोठारे अनिल व  नरगाळे एम.एस., *'मराठवाडयाचा इतिहास'*, अभिजीत पब्लिकेश लातूर , नोव्हेंबर १९९९, पृष्ठ क्र.७५.

७.प्रा.कोरेकर सुलभा लिंबराज, *'पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा'*, २०१३, संशोधन प्रबंध , टि.म.वी.पुणे, पृष्ठ क्र.५९.

८. तैत्रव, पृष्ठ क्र.५९.

९. https://en.m.wikipedia.org > wiki > Ahmednagar

१०.बालवाड,रमेश, *'अहमदनगरजिल्हविशेषांक'*,विद्याभारती,प्रकाशन,लातूर, २०१७,पृ.क्र.०५

११. तैत्रव, पृष्ठ क्र.१४

१२.प्रा.कोरेकर सुलभा लिंबराज, *'पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा'*, २०१३, संशोधन प्रबंध , टि.म.वी.पुणे, पृष्ठ क्र.७४.

१३.R.V. Russell and Rai Bahadur Hiralal., " *The Tribes and Castes of the Central Provinces of India.*" , Rajdhani Book Centre, Delhi.1916.

१४. R.E. Enthoven, '*Tribes and Castes of the Bombay Presidency*.' Cosmo Publication, New Delhi,1997.

१५.Devi Mahasweta, '*Dust on The Road* ', Seaguel Publication,1997

१६.Naila Kabber, '*Citizenship and the Boundaries of the Acknowledgel Community:Identity,Affilation and Exclusion'*., IDS Publication,

New Delhi,2002.

१७.Radhakrishnan Meena, '*Dishonoured By History-Criminal Tribes and British Colonal Policy*.',Orient Black Swan Publication,Delhi,2007

१८.R.R. Rupesh, 'Economy State And Society',SEZ Publication, Delhi, २०१२.

१९.लष्कर विनायक,'*वडार समाजाचा समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास*',हरीती प्रकाशन,पुणे,२०१५.

२०. भोसेले भास्कर, 'दैना' ऋध्दी प्रकाशन, उरळीकांचन,२०१३.

२१. प्रभुणे गिरीश, 'पारधी', राजहंस प्रकाशन पुणे, २००६,द्वि.आ.

२२. पवार संतोष, 'चोरटा', श्री साईनाथ प्रकाशन, भगवानघर कॉम्प्लेक्स, धरमपेठ. नागपुर,२००७.

२३. डिसूसा, दिलीप., '*जन्माने गुन्हेगार*', (अनु.कामत साधना ), पद्मगंधा प्रकाशन, पुणे. २००८.

२४.पवार दिपक, '*पारधी समाजाचे अंतरंग*', श्री साईनाथ प्रकाशन, भगवानघर कॉम्प्लेक्स, धरमपेठ.नागपुर, २०१४,

२५.भोसले नामदेव, 'मराशी', लोक संस्कृती प्रकाशन, नारायणगांव, पुणे, २०१४,

२६. गायकवाड लक्ष्मण, '*उचल्या*', श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ पुणे. २००६, द्वि.आ.

२७. माने लक्ष्मण, '*उपरा*', ग्रंथाली प्रकाशन, चवथी आवत्ती. १९८०,

२८. चव्हाण प्रकाश, '*उदई*', अथर्व पब्लीकेशन,धुळे . २००९,

२९.ईदाते भि.रा., '*विमुक्त जाती व भटक्या जमाती अभ्यास व संशोधन समीती अहवाल*'-खंड-१, जानेवारी १९९९.

३०. भोसले नारायण, '*विमुक्ती प्रबोधन*', अथर्व पब्लीकेशन,धुळे, २०१३,प्र.आ.,

३१.Ghurye.G.S.,'*The Scheduled Tribes*' 2nd Edition, Popular Book Depo, Bombay. 1951.

३२.मांडवकर भाऊ, '*कोलाम*', सेवा प्रकाशन , अमरावती, १९६६, प्र.आ.

३३.चव्हाण रामनाथ, 'जाती आणी जमाती',१९८९, मेहता पब्लीशींग हाऊस पुणे.

३४.कदम नागनाथ धो., *'महाराष्ट्रातील भटका समाज-संस्कृती व साहित्य'*, प्रतीमा प्रकाशन संस्कृती व साहित्य प्रकाशन, पुणे, १९९५.

३५.माने लक्ष्मण, *'विमुक्तायन'*, य.च. प्रतिष्ठान मुंबई. १९९७ .

३६.Y.P.S.Tomar,and Dr. Robin D. Tribhuwan., '*Development of Primitive Tribes in Maharashatra States- Continuity and Change*., T.R.T.I.,Pune, 1997 ,

३७.कालेलकर गोविंद मंगेश *'मुंबई, इलाख्यातील जाती'*, वरदा प्रकाशन पुणे. १९९९,

३८.माने लक्ष्मण, *'भटक्याचं भारूड '*, ग्रंथाली प्रकाशन,मुंबई, २००३.

३९. मोरे विमल, *'पालातली माणसं'*, पद्यगंधा प्रकाशन पुणे. २००७.

४०. प्रभुणे गिरीश, *'पालावरच जिणं,'* साप्ताहीक विवेक मुंबई. २००३.

४१. त्रिं.ना. अत्रे, *'गुन्हेगार जाती'*, वरदा प्रकाशन पुणे,२००९.

४२.मांडे प्रभाकर, *'गावगाडयाबाहेर'*, सविता प्रकाशन, औरंगाबाद, १९८३,

४३.गायकवाड लक्ष्मण, *'वकिल्या पारधी'*, मॅजिस्टीक प्रकाशन मुंबई,२००६. द्वी.आ.

४४.चव्हाण रामनाथ, *'भटक्या विमुक्तांची जात पंचायत'*, देशमुख आणी कंपनी प्रा.पब्लिशर्स प्रा.लि.पुणे.१९९७.

४५.माने लक्ष्मण, *'बंद दरवाजा'*, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,१९९९.

४६.भोसले नारायण, *'भटक्यांची पितृसत्ताक जातपंचायत'*, 'विमुक्ती प्रबोधन'ए अथर्व पब्लिकेशन्स, धुळे. २०१३.

४७.खरात शंकराव, *'भटक्या विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न'*,सुगावा प्रकाशन पुणे,२००३,

४८.वाडकर धोंडीराम व प्रा.बाळासाहेब बळे, *'गुन्हेगार समजल्या जाण-या पारधी या आदिवासी समाजाचे सांस्कृतिक जिवन'*, पद्यगंधा प्रकाशन ,पुणे ,२०११.

४९.चव्हाण रामनाथ, *'भटक्या-विमुक्तांचे अंतरंग'*, मनोविकास प्रकाशन, मुंबई. २००३.

५०. प्रा.बळे बाळासाहेब, *'जव्हारी'*, पद्यगंधा प्रकाशन, पुणे, २०१०.

५१. प्रा चव्हाण.रामनाथ, 'भटक्या विमुक्तांचे मुक्त चिंतन', सुगावा प्रकाशन, पुणे. २००४.

५२.डॉ.एस.जी.,देवगांवकर, *'आदिवासी विकास प्रशासन'*, साईनाथ प्रकाशन, नागपूर.१९९८.

५३. L.P.Vidyarthi and Rai Binay Kumar, *'The Tribal Cultural of India'*, Concept Company, New Delhi,1985.

५४.Hasan Needem, '*Tribal India'*, Falak Publication, Delhi.1999.

५५.गारे गोविंद, *'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती,'* कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, २००२,

५६.डॉ.सुर्या अनिल, *'अंबेडकरी स्वकथने एक समाजशास्त्रीय अध्ययन'*, सुगावा प्रकाशन पुणे. १९९६,प्र.आ.

५७. गार्गे, समाज विज्ञान कोश खंड-३ व ४

५८. गजेंद्रगड.व्ही.एन व मारुलकर व्ही. एस., *'भारतीय समाजशास्त्र'*, फडके प्रकाशन कोलहापुर.२०००.

५९. डॉ. आगलावे प्रदिप, *'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती आणि त्यांच्या समस्या',*

६०.अनिल अवचट, '*मानस*', सुगावा प्रकाशन पुणे, २००१,

६१.काळे किशोर शांताबाई, ' कोल्हाटयाच पोर', ग्रंथाली प्रकाशन,मुंबई, २००८,

६२.देवगावकर एस.जी, *'महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती'*, अभिजीत पब्लीशींग हाऊस,नागपुर. २००९.

६३.पिंगळे भिमराव , *'वनवासी व उपेक्षित जग,'* ग्रंथाली प्रकाशन,मुंबई,२०११.

६४. प्रा.बडे भास्कर, *'वंजारी आणि बंजारा कोण आहेत'*, ग्रंथाली प्रकाशन,मुंबई, २००४.

६५.गिऱ्हे,के.ओ., *'गोपाळ समाजाच्या परंपरा आणि इतिहास'*, ग्रंथाली प्रकाशन,मुंबई. २००१,

६६.राठोड आत्माराम कनिराम, *'तांडा'*, अभिजीत पब्लीशींग हाऊस,नागपुर.१९८९,

६७.राऊत किशोर, *'पारधी समाज बदल व समस्या'*, ,गौरव प्रकाशन पुणे. २००४

६८.मटकर गणेश, *'धनगर भटकी जमात',* ग्रंथाली प्रकाशन मुंबई. १९९९,

६९.गस्ती भिमराव, '*बेरड* ', ग्रंथाली प्रकाशन मुंबई. १९८७,

७०. गिऱ्हे जनाबाई, *'मरणकळा'*, पद्मगंधा प्रकाशन पुणे. २००८,

७१.मोरे दादासाहेब मल्हारी, *'गबाळ'*, पद्यगंधा प्रकाशन पुणे. १९८३,

७२.डॉ.शिरसाठ शिवदास, *'दलित आत्मकथनांचा समाजशास्त्रीय अभ्यास'*, अभिजीत पब्लीशींग हाऊस नागपुर. १९९९,

७३.डॉ.धोंडीराम वाडकर, *'गोल्ला समाजाचा इतिहास,'* पद्यगंधा प्रकाशन पुणे. २००८.

७४.श्री दांगट उमाकांत, *'महाराष्ट्रातील आदिवासी पारधी जमातीचा आर्थिक अभ्यास : विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा'*, २००९,संशोधन प्रबंध,य.च.म.मु.वि.नाशिक.

७५.प्रा.गायकवाड यशवंत जंगलू, *'उस्मानाबाद जिल्हयातील आदिवासी पारधी जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास'*, संशोधन प्रबंध. डॉ.बा.आं.म.वि.औरंगाबाद.

७६.शेळके प्रताप शिवाजीराव, *'उस्मानाबाद जिल्हयातील पारधी समाजाचा आर्थिक व सामाजिक अभ्यास कलंब ता.संदर्भात'*, अर्थशास्त्र एम.फील, प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.

७७.प्रा.कोरेकर सुलभा लिंबराज, *'पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा'*,२०१३, संशोधन प्रबंध. टि.म.वी.पुणे.

७८.रगडे कमलाकर प्रकाश, *'भोकरदन तालुक्यातील फासे पारधी जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास'*,२०११, संशोधन प्रबंध.

७९.नाईक (पवार) रूख्मीणी पोमा, *'बंजारा जामातीचे समाजशास्त्रीय सामाजिक, आर्थिक पहाणी'*, १९८३ ,संशोधन प्रबंध,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

८०.जाधव पंडीत, *'परभणी जिल्हयातील आश्रम शाळांची विशेष मागासघटकातील विद्यार्थ्यांच्या विकासातील भूमिका'*, १९८३ संशोधन अहवाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

८१. पांडे कौस्तुभ, *'शिकारी खुद यहा शिकार हो गया'*, अनियत कालीक जुलै ते सप्टेंबर २००४, अंक पहिला.

८२.बोकील मिलिंद, *'पारधी बदलनायन पण'*, परिवर्तनाचा वाटसरु,तैमासीक, १ ते २५ ऑक्टोबर २०१५.,पृ. क्र.२४.

८३. गुलाब वाघमोट, '*सम्राट*', प्रबोधन , अंक, -२२ फेब्रुवारी २००७,पृ क्र.५.

८४. पांडे पंढरी, '*कौस्तुभतांडा*', अनियतकालीक, सप्टेंबर २००४,

८५.पाटिल नितीन, '*नगर मधील पारधी विकासच्या वाटेवर*', पुण्यनगरी, रविवार २००७ ,पान क्र.२.

८६.कुलकर्णी अंजली, '*भटक्या विमुक्तांची अस्तित्वाची लढाई*', लोकसत्ता, ३० एप्रिल २०१६, पान क्र.३

८७.'*गुन्हेगारीचा कलंक पुसण्याचे स्वप्न साकार*',सकाळ, नगर टुडे, शुक्रवार २९/५/२०१५,पान क्र.१.

८८. '*पारधी समाजाच्या मुलांना मिळाली नव्याने ओळख*', सकाळ, २१ एप्रिल २०१४,

८९.उकीरडे दत्ता, '*अमावस्या त्याच्यासाठी ठरते शुभ*',सकाळ, बुधवार ,२३ सप्टेंबर २०१३,

९०.'*पारधी समाज व महिलांच्या विकासाचे व्रत*', महाराष्ट्र टाईम्स, १७ जानेवारी २०१६.

९१. '*भटक्या विमुक्तांवर अन्याय नको*', सकाळ २८ मार्च २००७,

९२.'*पारधी विकास कार्यक्रम राबवून समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न*', दैनिक लोकमत दिनांक ३१/१/२०१६.

९३.बोधनकर व अलोणी, '*सामाजीक संशोधन पध्दती*'श्री साईनाथ प्रकाशन,नागपूर. जाने.२००७.चतुर्थ आवृत्ती,पृष्ठ क्र.७.

९४.तैत्रव पृष्ठ क्र.१७.

९५. तैत्रव पृष्ठ क्र.६८.

९६. तैत्रव पृष्ठ क्र.७२.

९७.हरिकृष्ण रावत, '*समाजशास्त्र विश्वकोश*', रावत पब्लीकेशन जयपुर,२००२, पृष्ठ क्र.७२.

९८. काळदाते सुधा आणी गोटे शुभांगी, '*गुन्हेगारीचे समाजशास्त्र*', श्रीविद्या प्रकाशन पुणे, द्वी. आ.२ ऑक्टोबर २००६,पृष्ठ क्र.७२.

९९.खैरनार दिलीप आणी किशोर राऊत, '*सामाजीक संशोधन पध्दती*', चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद, २००४, प्र.आ पृष्ठ क्र.५६ .

१००. तैत्रव पृष्ठ क्र.५७.

१०१ .तैत्रव पृष्ठ क्र.५२ .

१०२. हरिकृष्ण रावत, '*समाजशास्त्र विश्वकोश*', रावत पब्लीकेशन जयपुर,२००२, पृष्ठ क्र.७४.

१०३.Bhandarkar P.L.and wilkinsons., '*Methods and Techniques of Social Research*', 26th Edition, 2017, Himalaya Publishing House, Mumbai, P. No.262.

१०४.बोधनकर सुधीर व अलोणी विवेक,'*सामाजीक संशोधन पध्दती*', श्री साईनाथ प्रकाशन नागपूर. जाने.२००७.चतुर्थ आवृत्ती,पृष्ठ क्र.११०.

१०५. तैत्रव पृष्ठ क्र.१९०.

१०६. तैत्रव पृष्ठ क्र.१११.

# प्रकरण - तिसरे

# पारधी जमातीची ओळख

३.१ प्रस्तावना:-

३.२.पारधी जमातीची ऐतीहासीक पार्श्वभूमी :-

३.३ पारधी जमातीचे सामाजिक जीवन :-

३.४ पारध्यांचे सांस्कृतिक जीवन :-

३.५  पारधी जमातीचे धार्मिक जीवन :-

३.६ पारधी समाजाची जातपंचायत:-

३.७.पारधी जमातीचे लोकसाहित्य:-

३.८.महाराष्ट्रातील पारधी समाजा बद्दल सामाजिक संघटनांचे योगदान-

३.९ आदिवासी वैयक्तिक लाभाच्या शासकिय योजना :-

३.१० वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास योजना.

# प्रकरण - तिसरे

# पारधी जमातीची ओळख

## ३.१ प्रस्तावना:-

प्रस्तुत प्रकरणात संशोधकाने पारधी जमातीची गुणात्मक माहीती तथ्य संकलनाच्या दुय्यम साधनांद्वारे प्राप्त करुन मांडलेली आसुन सदर प्रकरण हे संपुर्ण पणे गुणात्मक तथ्य विशलेषणावर आधारीत आहे. पारधी ही भारतात आढळणारी एक विमुक्त जमात आहे, ही भारतात प्रामुख्याने महाराष्ट्र, राजस्थान, गुजराथ, मध्यप्रदेश, तेलंगना, छत्तीसगड, ओरिसा, कर्नाटक, केरळ, आंध्रप्रदेश, गोवा, दमण आणि दिव, दादर आणि नगर, हवेली. म्हणजे अकरा घटक राज्ये व दोन केंद्रशासित प्रदेशात या लोकांची वस्ती आढळते. या पैकी महाराष्ट्र, तेलंगना, मध्यप्रदेश आणि गुजराथ या चार राज्यात या जमातींची संख्या लक्षणीय अशी आहे. पारधी हे नाव मराठी शब्द *'पारध'* वरून पडलेले आहे. पारध म्हणजे शिकार करणे. आदिवासी व विमुक्त जमातीत यांचा समावेश होतो. पारूषी / वाघरी ही त्यांची भाषा असून या भाषेवर भिल्ल, राजस्थानी, गुजराथी या भाषेंचा प्रभाव दिसून येतो. या मुख्य बोली व्यतिरिक्त हे लोक मराठी, हिंदी, भिल्ल, ओडिसा, गुजराथी, तेलगू, खानदेशी, हलबी, छत्तीसगडी, कन्नड, अहिराणी, कोकणी, गोदी, उर्दू इ. भाषा देखील भारताच्या विविध प्रांतातील पारधी समुदाय बोलतांना दिसतात. 'पारधी' हे जास्त संख्येने हिंदू असलेले दिसतात. परंतु इस्लाम, ख्रिश्चन व बौध्द इ. धर्म ही पारध्यांचा असलेला दिसतो.पारधी हे स्वत:ला पृथ्वीराज चौहान व महाराणा प्रताप यांचे वंशज समजतात. त्यांच्यात विशेष करून तीन आडनावे दिसतात ते म्हणजे चव्हाण, पवार व साळुंके व समान आडनावांच्या व्यक्तीत विवाह संबंध निशिध्द मानतात. इतर जातींप्रमाणेच विवाह पध्दती या जमातीत दिसून येते. त्यांचे मुळ स्थान हे राजस्थान व गुजरात दिसते. कारण त्यांची भाषा ही हिंदी, ग्रामीण गुजराथी व राजस्थानी लोकांसारखी असल्याचे दिसते.

पारधी जमात ही '१८७१' च्या गुन्हेगारी जमात कायदयाची शिकार झालेली जमात आहे. तेव्हा एका बाजूला गुन्हेगार जमात म्हणून कलंकीत दिसून येते तर दुसऱ्या बाजूला आधुनिक समाजात ही जमात आजही स्वत:च्या पायावर उभा राहण्यासाठी धडपडत आहे. या जमातीत अनेक उपजाती असलेल्या दिसून येतात. जसे राजपारधी, फासे पारधी, गाय पारधी, हरणपारधी,

टाकणकार, भिल्ल पारधी, गाव पारधी, लंगोट पारधी, चित्तापारधी, बहिलिया इ. या उपजातींपैकी बहुतेक सर्वच जमाती या गुन्हेगार जमाती म्हणून गणल्या गेलेल्या दिसतात. यापैकी केवळ गाव पारधी ही जमात ब्रिटीशांच्या गुन्हेगार जमातीत गनली गेलेली नव्हती. ब्रिटीश काळात देखील या जमातीकडे शेती हे उपजीविकेचे साधन असल्याने ही जमात बऱ्यापैकी स्थिरतेचे जीवन जगतांना दिसते. महाराष्ट्रातील अमरावती जिल्हयात या जमातींची संख्या जास्त असलेली दिसते. गाव पारधी हे मुख्यत्वे राजस्थानी दिसतात. गुजराथ मधील कच्छ भागातील पारधी हे साप पकडण्यात पारंगत आहेत.

महाराष्ट्रातील बऱ्याच जिल्हयात पारधी जमात ही विखुरलेली आहे. यात पुणे, अहमदनगर व सोलापूर येथे पारधी वस्त्या मोठया प्रमाणावर आहेत. जंगलाच्या आश्रयाने राहणे, फासे लावून शिकार करणे हे आजही चालू आहे व यातून भारताच्या महासत्ता होण्याच्या गप्पा किती फोल आहेत हे दिसून येते. शेतीसाठी जमीन नाही. कपाळी बसलेला गुन्हेगारीचा कलंक यामुळे नोकरी मिळत नाही. गावकरी गावात येऊन देत नाहीत. तेव्हा शेतीचा प्रश्नच नाही. लग्न कार्यात फेकलेले खाऊन, गावात भिक मागून ही कुटूंबे दिवस ढकलतात. मुख्य व्यवसाय शिकार असल्यामुळे व सतत भटकंती करत जगत असल्याने हे दुर्लक्षित झालेले आहेत. या जमातीत मोठया प्रमाणावर अज्ञ ाान, अंधश्रध्दा, शिक्षणाचा अभाव, मागासलेले जीवन व दारिद्रय असलेले दिसते. अशा समाजाला स्वातंत्र्य म्हणजे काय हा प्रश्न आजही पडतांना दिसतो.

भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ६९ वर्षे पूर्ण होऊन देखील भटके व विमुक्त समाजातील लोक आजही मानवी हक्कांपासून वंचित राहून एका अर्थाने गुलामीचे जीवन जगत आहेत. आज या जमातीतील ब-याच लोकांना स्वत:चा गाव नाही, की हक्काचे घर नाही. या जमातीतील लोकांना आजही सामाजिक न्यायापासून वंचित राहावे लागते. त्यांच्यावर अनन्वीत अन्याय, अत्याचार होतो. लोक त्यांच्याकडे संशयास्पद नजरेन पाहतात. ही स्थिती बदलण्यासाठी या जमातीवर सखोल अध्ययन व संशोधनाची नितांत गरज आहे. 'विमुक्त जमातीत 'समावेश असलेल्या 'पारधी' या जमाती बद्दलचा लोकमानस आजही पूर्वापार चालत आलेला आहे. सदर प्रकरणामध्ये 'पारधी' या विमुक्त जमातीची ओळख करण्याचा प्रयत्न आहे.

## ३.२.पारधी जमातीची ऐतीहासीक पार्श्वभूमी :-

पारधी म्हणजे शिकारी वेद पुराणांनी ज्या,ज्या आदीम समुहांचा उललेख देशातील आद्य रहीवाशी म्हणून केला आहे त्या पैकी भारतात भिलल, हिकीरात,किन्नर,नाग,निषाद, गोंड,खोड,पारद या जमातीचा उललेख केलेला आहे. 'पारधी' समाजाच्या पार्श्वभूमीचा आढावा घेतला तर ती अनुक्रमे गुन्हेगार जमात, विमुक्त जमात आणि वर्तमानात अनुसूचित व विमुक्त जमात म्हणून ओळखली जाते.पारधी समाजाला आजही गुन्हेगारी शिक्क्यामुळे मुख्य सामाजिक प्रवाहात सामावून घेतले जात नाही.''महाराष्ट्रात प्रामुख्याने नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, सोलापूर, कोल्हापूर औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, यवतमाळ, अहमदनगर जिल्हयात आदिवासी पारधी जमातीचे वास्तव्य आहे."[१] इतर आदिवासी व भटके व विमुक्तांच्या तुलनेत यांची समीलीकरण मंद गतीने होतांना दिसते. गावगाडयाशी कोणताही संबंध न ठेवणारी, जंगलातील प्राण्यांची शिकार करून त्यावर उपजिवीका करणारी पारधी ही एक जमात आहे.''महाराष्ट्रातील शेकडा ८.८५ टक्के इतक्या आदिवासी लोकसंख्येपैकी १.८ टक्के एवढी लोकसंख्या पारधी जमातीची असून महाराष्ट्रात पारधी जमात सर्वाधिक संख्येने अमारावती जिल्हयात असून ती २०५६८ इतकी आहे."[२]

''पारध म्हणजे शिकार, मृगया, परिधी म्हणजे फासा, परिद-व्याघ म्हणजे शिकारी, म्हणून पारधी म्हणजे शिकार करणारा."[३] पारधी हे जे नाव आहे ते मराठीतल्या 'पारध' म्हणजे शिकार करणे या क्रियापदावरून आलेले आहे. पूर्वी या समाजातील मंडळी ही हरिण, ससे, तितर, होले, लावरी इत्यादी पशुपक्षांची शिकार करत असत. त्यामुळे त्यांना या नावाने ओळखू लागले. ब्रिटीश काळातल्या संशोधकांनी केलेल्या नोंदीवरून असे दिसते की, पारधी समाज हा मूळचा राजस्थानमधला. राजस्थानमधील इतर रजपूत राजांनी मोगलांची सत्ता मान्य करून त्यांच्याशी समेट केला असला तरी चित्तोडचा राणा प्रताप मात्र आयुष्यभर मोघलांशी एकाकी झुंज देत राहिला. या लढाईत अरवली पर्वताच्या द-या खो-यात राहणा-या आदिवासी जमातींनी त्याला मदत केली होती. किंबहूना या जमाती हेच त्याचे सैन्य होते. राणा प्रतापच्या मुत्यू नंतर या जमातींना कोणीही वाली उरला नाही. पण प्रतापाने स्वातंत्र्याची आणि बंडखोरीची जी ठिणगी त्यांच्या मनात पेटवली होती. त्यामुळे मोगलांची सत्ता मान्य करून जगण्याऐवजी आपला देश सोडून जाणे

त्यांनी पसंत केले. ही मंडळी मग शेजारच्या गुजराथ, मध्यप्रदेश, महाराष्ट्र या प्रदेशात पांगली. काही उत्तरेकडे हरियाणा, पंजाब, उत्तरप्रदेश, या भागातही गेली.यांचे वास्तव्य प्रामुख्याने महाराष्ट्र व मध्यप्रदेशात येथे दिसून येते. देशाच्या वेगवेगळया भागात या जमातीचे वास्तव्य आहे. महाराष्ट्रात सुरूवातीला त्यांनी सातपुडा पर्वतातील दुर्गम भागांत आश्रय घेतला. नंतर खाली सरकून ते देशावर पसरले.त्या काळात म्हणजे सतराव्या शतकात मराठयांचा अंमल सुरू होता. त्यामुळे इतर क्षेत्रांपेक्षा त्यांना महाराष्ट्रत अधिक सुरक्षित वाटले असावे. महाराष्ट्रामधूनच ते नंतर आंध्रप्रदेश, व कनार्टक मध्येही गेले. पारधी मंडळी ही राजस्थान मधून आली असणार याचा मुख्य पुरावा म्हणजे त्यांची राजस्थानी भाषा. ती समजायला अवघड नाही. राजस्थानातून जे इतर लोक महाराष्ट्रात आले आहेत आणि ज्यांनी आपली भाषा जपली आहे त्यांना ती समजू शकते. पारधी समाजाच्या उत्पत्ती बद्दल निश्चित अशी माहिती निदर्शनास येत नाही.जी माहिती निदर्शनास येते ती मौखिक इतिहासातून प्राप्त होतांना दिसते.मौखिक इतिहासात अनेक अख्यायिका निदर्शनास येतात परंतु त्या संदर्भात कोणताही लिखित पुरावा मिळत नाही.‘‘पारधी हे स्वत:ला राणाप्रतापचे वंशज मानतात’’[४] ते राजस्थान प्रांतातील असावेत असा अंदाज व्यक्त करता येतो. ‘‘राजस्थानात १८ जून १५७६ च्या हळदीघाटीच्या युध्दात राणा प्रतापचा पाडाव झाला. अकबर पकडेल व धर्मांतर करावे लागेल या भितीपोटी अनेक स्वाभिमानी रजपुतांच्या टोळयांनी राजस्थानातून गुजराथ मध्ये पलायन केले त्यांना प्रस्थापितांनी आश्रय न दिल्याने रानावनात भटकंती करून उपजिविका करावी लागली. आणि ते स्वत:ला ‘पराश’ म्हणवू लागले (पराश-भिकारी)’’[५] व पराश म्हणजे आजचे पारधी अशी त्यांनी नवीन ओळख घेतली. पारध्यांचे पुर्वज हे राणाप्रतापच्या पदरी होते. त्यांनी मोगल सम्राट अकबर याला मदत केली या संशयावरून राणा प्रतापने त्यांचा निप्पात करण्याचा निर्धार केला. सध्याच्या पारधी लोकांच्या पूर्वजांनी २५० वर्षापूर्वी गुजरातकडून महाराष्ट्राकडे स्थलांतर केले व येथेच स्थायिक झाले.जुनागडची अंबीकादेवी हे त्यांचे कुलदैवत आहे. यावरून ते गुजरातकडचे आहेत हे सिध्द होते.’’[६] पारधी जमातीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमी बद्दल वेगवेगळी मते आहेत जसे ‘‘पारध्यांचे पूर्वज गोंड होते.त्याला महादेवाने फासे टाकण्याची कला शिकविली, त्यामुळे तो गोळी मारून प्राणी मारण्याच्या पापापासून वाचू शकेल.तेंव्हापासून ते केवळ असे, जाळे आणि सापळे लावूनच शिकार करू लागले’’[७] अशी अख्याईका आहे.‘‘पारधी जमात ही बवेरिआ किंवा तत्सम

रजपुत जमाती, गोंड व इतर जमातीचे बहिष्कृत इत्यादीच्या मिश्रणातून बनलेली एक मिश्र जमात होय."[८] पारधी जमातीच्या उगमाबद्दल के एस.सिंग असे म्हणतात की, "पारधी लोक स्वत:ला 'रामायण' चे रचनाकार महर्षी वाल्मिकी यांचे वंशज मानतात. महर्षी वाल्मिकी स्वत: पारधी होते असे पारधी लोक मानतात."[९]

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, पारधी ही जमात मूळची राजस्थान या प्रांतातील असून ते राजस्थानातून गुजराथ व मध्यप्रदेश मार्गी महाराष्ट्रात आले. महाराष्ट्रातील अमरावती, जळगाव, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, पुणे, बीड, उस्मानाबाद या जिल्हयात बहुसंख्येने आढळतात. ते मुख्यत: मेवाड व गुजराथी भाषेच्या मिश्रणातून तयार झालेली वाघरी भाषा बोलतात.

### ३.२.१ पारधी जमातीतील पोटजाती :-

महाराष्ट्रात 'पारधी' हे सर्वसाधारण नाव असले तरी त्यांच्यामध्ये बरेच उपगट आहेत किंवा उपजाती आहेत.'विमुक्त जाती व भटक्या जमाती अभ्यास व संशोधन अहवाल जानेवारी १९९९' नुसार पारधी जमातीतील पोटजाती / उपजाती पुढीलप्रमाणे आहेत. "[१०]

**१) राजपारधी :-** यांना चित्तापारधी असेही म्हणतात. जंगलातून चित्त्याची पिल्ले पकडून ती या जमातीचे लोक राजाला बक्षीस देत, त्यातून राजाशी येणा-या संबंधामुळे ते स्वत:स राजपारधी म्हणून घेतात.

**२) फासे पारधी :-** शिकार करतांना विशिष्ट फासे, सापळे तयार करून शिकार करणारे ते फासे पारधी

**३) गाय पारधी :-** गाय पाळणारे, शिकार कामात गायीचा वापर करणारे ते गाय पारधी

**४) हरण पारधी :-** हरणांचीच शिकार करणारे ते हरणपारधी अथवा हरण शिकारी.

**५) टाकणकार :-** घरातील जात्यांना टाकी लावण्याचा व्यवसाय करणा-या पारधी समाजास टाकणकार म्हणतात. बिदर जिल्हयात ते प्रामुख्याने आढळतात.

**६) भिल्ल पारधी :-**जंगलात राहणा-या आणि चोरी करण्यात तरबेज असणा-यांना भिल्ल पारधी म्हणतात. अलीकडे हे पारधी स्वत:स धनगर पारधी म्हणून ओळखतात.

**७) गाव पारधी :-**गावगाडयाशी संबंध आलेल्या किंवा गावाजवळच वस्ती करणा-या स्थिर जीवन जगणा-या पारधी समाजास  गाव पारधी म्हणून ओळखतात.

आशा प्रकारे पारधी जमातीतील पोटजाती आहेत या शिवाय उत्तर भारतात भवरा (बहेलीया किंवा बौरिझा ) मध्य भारतात लंगोटी पारधी, मुंबई इलाक्यात टकारी किंवा भामटा, महाराष्ट्रात फासेपारधी या नावाने ही जमात ओळखली जाते.

''पारधी, फासेपारधी, हरणपारधी, कोरचर आणि वाघरी या महाराष्ट्रातील मुख्य जाती मानल्या जातात. प्रत्येक उपजात स्वत:ला श्रेष्ठ मानते. दुस-या उपजातीबद्दल काहीही माहिती नाही असे सांगतात. प्रत्येक उपजाती कुळी, बोली, परंपरा, रूढी, जापंचायत, विधी इ. बाबतीत भिन्नता आढळते.''[११] पारध्यांमध्ये उपरोक्त पोट जाती आढळत असल्यातरी त्यांच्यात अनेक अंतरर्विवाही गट आहेत. फासे पारधी, लंगोट पारधी आणि टाकणकार यांच्यात गोत्र किंवा देवक आढळत नाही. राठोड, चव्हाण, सोळंकीं, पवार, इत्यादी कुळे आहेत. या उपरोक्त सर्व पोटजातींमध्ये पितृसत्ताक कुटुंबपध्दती आहेत. पारध्यांनी बहूतेक सर्व हिंदूचे देव आणि उत्सव स्विकारलेले आहे. या उत्सवात नृत्य करणे, हा त्यांचा आवडता छंद आहे. गुढीपाढवा, अक्षयतृतीया, पोळा, नवरात्र, दिवाळी, होळी इत्यादी सण ते साजरे करतात. वरील सर्व उपजाती / पोटजातीचे प्रकार हे महाराष्ट्रात विमुक्त जाती जमातीमध्ये मोडतात. यातील प्रत्येक पोट प्रकार हा दुस-या पोट प्रकारापेक्षा स्वत:स श्रेष्ठ समजतो. त्यांच्या रूढी रितीरिवाज भिन्न असतात. परंपरा भिन्न आहेत.रोटीबेटी व्यवहार त्यांच्यात होत नाहीत. प्रत्येक पोटजात स्वतंत्र आहे. ''केंद्रशासनाच्या सन १९७६ मधील आदेशान्वये महाराष्ट्र राज्यातील ४७ जमाती अनुसूचित जमाती म्हणून जाहीर केल्या.अ.क्र.३८.त्या,आदेशातील,अ.क्र.३८वर,पारधी,आडवीचिंचर,फासेपारधी,लंगोटीपारधी, बहेलिया,चित्तापारधी,हरणशिकारी,टाकणकार,टाकीया यांचा समावेश केलेला आहे.''[१२] व ''महाराष्ट्र शासन अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती सुधारणा कायदा १९७६ च्या आदेशातील यादीत अ.क्र.९ वर राजपारधी,गांवपारधी,पालपारधी यांचा विमुक्त जातीत समावेश केलेला आहे.''[१३] आशा प्रकारे पारध्यांना वेगवेगळया प्रांतात वेगवेगळया नावांनी ओळखले जाते

### ३.२.२ भाषा :-

बहुतेक पारधी 'वाघरी' भाषा बोलतात. या भाषेचे जाटांच्या भाषेशी साधर्म्य आहे. मराठी बोलणारे ही काही आहेत. परजातीशी ते हिंदीत बोलतात. त्यांची एक सांकेतिक भाषा ही गुन्हेगारीच्या व्यवहारात ते ती भाषा वापरतात. पारधी जमातीची, विदर्भ, मराठवाडा, आणि

खानदेश या भागात संख्या लक्षणीय आहे. त्या शिवाय नाशिक, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, अहमदनगर व सातारा जिल्हयातही मोठया संख्येने हा समाज राहतो. संपूर्ण महाराष्ट्रात या समाजाची ५० ते ६० हजार लोकसंख्या दिसून येते. पारधी जमातीचा समावेश हा आदिवासी व विमुक्त असा जो केला जातो त्याचे मुख्य कारण म्हणजे पारधी जमातीतील व्यवसायिक विविधता होय. जसे फासे पारधी पक्षांना, संशाना फासे लावून पकडत होते, हरण पारधी हरणांची शिकार करतात, तर टाकणकर हे जात्यांना टाकी लावण्याचे काम करीत. पालपारधी किंवा गावपारधी ही नावे ते गावात व पालात राहतात म्हणून पडलीत व याचे कारणाने त्यांचे आदिवासी व विमुक्त असे विभाजन दिसून येते.

### ३.२.३ गुन्हेगारी जमात कायदा व पारधी :-

'गुन्हेगारी जमात कायदा' म्हणजे भारतीय समाज व्यवस्थेतील भटके व विमुक्त जमातीला एक प्रकारे झालेली काळया पाण्याची शिक्षाच होती. गुन्हेगारी जमात कायदा हा पारधी समाजाच्या मागासलेपणाला ख-या अर्थाने जबाबदार आहे, व हा कायदा म्हणजे मानवतेच्या इतिहासातील एका काळया पर्वाला सुरूवात होती. या कायादयाने या जमातीला कलंकीत केल्याने त्याचे परीणाम ही जमात आज पर्यत भोगत आहे. या कायदयाबद्दल प्रा.रामनाथ चव्हाण असे म्हणतात की, ''१८७१ साली या देशात ब्रिटिशांनी गुन्हेगार कायादयाची निर्मिती केली आणि देशातील १९८ भटक्या जमातींना गुन्हेगार जमाती म्हणून जाहीर केले. त्यांच्यासाठी वेगवेगळया ठिकाणी देशात ५२ वसाहती (सेटलमेंट ) निर्माण करून त्या जमातीच्या लोकांना तीन तारेच्या कुंपनात डांबून ठेऊन दिवसातून तीन वेळा हजेरी देणे बंधनकारण होते. त्यांना सक्तीची कामे व त्यांच्या मुलांना सक्तीचे शिक्षण याचीही इंग्रजांनी वसाहतीत सोय केली. परिणामी त्यांचे जन्म व मृत्यु वसाहतीतच होऊ लागले. हा गुन्हेगार जमात कायदा भारतात तब्बल ८१ वर्षे अस्तित्वात होता.''[१४] ब्रिटीशांनी केलेल्या या गुन्हेगार जमात कायदयात ब-याच जमातीवर गुन्हेगार 'चोर' असे शिक्कामोर्तब कायमचेच झाले. ''महाराष्ट्रात बेरड, भामटा, कैकाडी, कंजारभाट, कटाबू, बंजारा, पारधी, राजपुत भामटा, रामोशी, वडार, वाघरी, छप्परबंद, राजपारधी बेस्तर या जमातींचा समावेश गुन्हेगार यादीत होता.''[१५] आशा प्रकारे या कलंकामुळे या जमातींचे सामाजिक स्थान हे वेगळेच निर्माण झाले. गुन्हेगार ठरविलेल्या गेलेल्या अनेक जमातींपैकी 'पारधी' ही एक जमात गुन्हेगार

जमात म्हणून आजही कलंकीत जीवन जगतांना दिसते. गुन्हेगार म्हणून ब्रिटीशांच्या यादीत समाविष्ट असलेली 'पारधी' ही जमात इतर गुन्हेगार जमातींच्या तुलनेत जास्तच कलंकीत असलेली दिसते. याचे कारण समाजात या जमातीबद्दल असलेला गैरसमज होय. व 'पारधी' व 'चोर' हा एक लोकमाणंसच बनलेला दिसत आहे. कारण इतर जमातीही गुन्हेगार जमातीत असून 'पारधी' हेच चोर म्हणून ओळखले जातात. गुन्हेगार जमात कायदयानुसार या जमातीतूनच हे लोक मुक्त झाले असले तरी त्यांच्याकडे पाहण्याचा गावगाडयाचा किंवा प्रस्थापित जातींच्या लोकांचा दृष्टीकोण मात्र बदलला नाही. इंग्रजानी त्यांच्या भोवती निर्माण केलेले संशयाचे वर्तुळ भारतीयांनीही कायम ठेवले आहे. परिणामी या जमातीच्या लोकांना गावगाडयाने जवळ करण्याचे नाकारले आहे.

वास्तविक पाहता गुन्हेगार जमात कायदयाची निर्मिती ही ब्रिटीशांनी या जमातींच्या ससेमी-यातून सुटण्यासाठी बनविलेले एक षडयंत्र होते. या बद्दल दिलीप डिसूझा असे मत मांडतात की, ''सन १८७१ मध्ये ब्रिटीशांनी 'गुन्हेगार जमात कायदा' (क्रिमीनल ट्राइब्ज ॲक्ट) मंजूर केला त्यानुसार सा-या भारतातील अंदाजे १९८ जमाती गुन्हेगार म्हणून घोषीत करण्यात आल्या आणि पोलिसांना त्यांच्या हालचालीवर देखरेख ठेऊन प्रसंगी त्यांना अटक करण्याचे विस्तृत अधिकार देण्यात आले. इतर कायदे गुप्त आणि रहस्यमय मानल्या गेलेल्या गुन्हयांची तपशीलवार व्याख्या देतात. तुलनेने हा कायदा अत्यंत साधा, सरल, अमंलात आणण्यास अगदी सोपा म्हणता येईल. या कायदयाने, या गुन्हेगार जमातीत जन्म घेतला की तो माणूस गुन्हेगार ठरतो.म्हणजेच हा कायदा म्हणतो की, 'तुम्ही जिवंत आहात, म्हणजेच तुम्ही गुन्हेगार आहात.''[१६]

ब्रिटीशांनी जो गुन्हेगार जमात कायदा केला तो म्हणजे एक प्रकारे या जमातींसाठी 'काळा कायदा' होय. किंवा काळया कायदयापेक्षाही कठीण कायदा होय. या कायदयाने 'पारधी' जमात ही कलंकीत तर झालीच पण या जमातीचे पूर्ण स्वातंत्र्य हिरावले गेले. या जमातीत जन्माला येणारी मुले ही जन्मत:च गुन्हेगार म्हणून घोषीत होत व 'चोर' विशेषण माथी घेऊन जगत या विशेषणामुळे या जमातीत जन्माला येणा-यांना व जमातीतील सर्वांना सामाजिक वंचनेची शिकार व्हावे लागले व यामुळेच या समाजाला आजही एकविसाव्या शतकात सामाजिक, आर्थिक,

राजकीय व सांस्कृतिक वंचना सहन करावी लागत आहे. १८७१ साली झालेले षडयंत्र २१ व्या शतकातही या जमातीच्या प्रगतीला अडथळा बनत आहे. ही बाब विचारांत घेण्यायोग्य आहे.

भारतीय समाज व्यवस्था ही अनेक जाती जमातींची मिळून बनलेली आहे व जाती जमातींनी पोखरलेल्या अशा समाजात कुणावर असलेला गुन्हेगारीचा शिक्का व त्यावर शंका न घेणे हे ओघाने आलेच. गुन्हेगारी जमात कायदा मंजूर होण्यासाठी जो ठराव एक ब्रिटीश अधिकारी टी.व्ही स्टीफन्स् यांनी प्रस्तुत केला त्यात त्यांनी असे म्हटले आहे, ''पुरातन काळापासून येथील लोक त्यांच्या जातीव्यवस्थेला अनुसरून आपापले व्यवसाय करीत आहेत.''[१७] 'पारधी' ही गुन्हेगारी जमातींपैकी एक जमात आहे. योगायोगाने मध्यप्रदेशात एकदा या पारध्यांनी केलेल्या चो-यांची साखळीच उजेडात आली. तिचा अहवाल असे म्हणतो. ''गुन्हेगारीचा पूर्व इतिहास असलेले म्हणून पारधी ओळखले जातात.''[१८] तसेच गुन्हेगार वांशिक गट म्हणूनही त्यांची नोंद झालेली आहे. असे दिसते की, या जमाती बद्दल मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री दिग्वीजय सिंह (तत्कालीन) यांनी असे म्हटले आहे की, 'या लोकांच्यात असलेला उपजत गुन्हेगारी प्रवृत्तीवर त्यांना शिक्षण देण्याबाबत राबविण्यात येणा-या प्रकल्पांचा काहीही परिणाम झाला नाही.' समाजातील उच्चभ्रु लोकांचा समज जर 'पारधी' जमाती बद्दल पूर्वग्रह दुषित असेल तर या समाजातील प्रगतीला कितपत चालना मिळेल. एकंदर 'गुन्हेगार' हा कलंक इतका जबरदस्त होता की, त्या व्यक्तींनी कितीही चांगले काम केले तर लोक ते मानन्यास तयार नाहीत. १८७१ च्या गुन्हेगार जमात कायदयाने लोकांच्या मनात भ्रम तयार केलेला आहे व पारधी हे गुन्हेगारच असतात असे गृहीतकच केले आहे. पोलीस, उद्योगपती, विद्यार्थी, प्राध्यापक, खेडूत या सर्वांनी पारधी हे गुन्हेगारच असतात असे मानून चालले आहेत. म्हणजेच १८७१ च्या कायदयाने पारध्यांना अप्रत्यक्ष तुरूंगातच ढकलले आहे. दिलीप डिसूझा यांनी पारध्यांबद्दल जो भ्रम / समज पोलींसात आहे याचा एक अनुभव पुढीलप्रमाणे सांगितला आहे. 'फलटण पोलीस स्टेशनमधील एक सब-इन्स्पेक्टर म्हणाला, ''गुन्हेगारी ही त्यांची संस्कृतीच आहे, 'त्यांच्या सर्व कॉन्स्टेबल्सनी संमती दर्शक माना डोलावल्या.जवळच्याच सास्तेवाडी गावातील पोलीस पाटील-म्हणजे पोलीस नव्हे. पण महसूल खात्याने नियुक्त केलेला एक अधिकारी जो पोलिसांना कायदा व सुव्यवस्थेच्या कामात मदत करतो म्हणाला होता- 'चो-या करून आपला जीव धोक्यात घालायची पारध्यांची सवयच असते.''[१९]

मुंबईतील एका अधिका-याने तर काहीही आढेवेढे न घेता सांगून टाकले होते. पोलिसांच्या दृष्टीने सर्व पारधी हे आपोआप गुन्हेगार ठरतात. ते गुन्हेकरणारच असे आम्ही गृहीतच धरून चालतो."[२०] एकूणच पारधी हे जन्मत:च गुन्हेगार आहेत असा भ्रम सामान्य नागरीक ते लोकांमध्ये झालेला दिसतो. केवळ सामान्य नागरीक  असे मानून चालत नाहीत तर वर उल्लेख केलेले पोलिस, उद्योगपती, प्राध्यापक इ. वर्गात देखील हा समज असल्याने त्यांचे सामाजिक जीवन अतिशय कठीण असे दिसत, व हि हीनता या लोकांच्या वाटयाला येण्याचे मुख्य कारण १८७१ चा गुन्हेगारी कायदा या कादयाने "बावरी, मांगगारूडी, मारवाड, बावरी, उदिया, पारधी, सॉसिया, वडार, बागडी, छप्परबंद, फटगुडी, कम्मी, कटवू, बेरड, रजपूत, भामटा, टकारी, भामटा, भर आणि पाशी, भिल्ल, धरल, कैकाडी, कातोडी, किंवा कातकरी, कोळी लमाणी, मिना, उधिया, रामोशी, तडवी, वंजारी (वंजारी, रजपूत, चारण वंजारी), वाघरी या व इतर अशा एकुन १९८ जाती-जमातींच्या लोकांचा समावेश ब्रिटीशांनी गुन्हेगार जमातीत केला होता."[२१]. परंतु या जमातींपैकी समाजात 'चोर' म्हणून, पारधी, भिल्ल आणि रामोशी, यांची प्रचिती व या जमाती बद्दल लोकमानस जास्त दिसतो, तरी पण या तीन विमुक्तांपैकी 'चोर'  म्हणून  'पारधी'  ही जमात जास्त परिचित आहे. १८७१ चा जो गुन्हेगारी कायदा होता त्याचा सर्वात जास्त परिणाम हा पारधी समाजाला भोगावा लागला. इतर जमातींना ही गुन्हेगारी कलंकाने खूप छळले परंतु इतर जमातींपेक्षा काही जास्त प्रमाणात का होईना पारधी  हेच छळले गेले. पारधी समाजाची किती प्रमाणात गुन्हेगारी कायदयामुळे वाताहत झाली याबद्दल डॉ. दिपक पवार यांनी असे म्हटले आहे की, "विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांपर्यत या गुन्हेगार ठरविण्यात आलेल्या जमातींना जास्तीत जास्त कठोर शिक्षा करून त्यांचे दमन करणे, हा ब्रिटीश सरकारचा हेतू होता. याच हेतूने १८९७ साली हा कायदा दुरूस्त करण्यात आला. गुन्हेगारांसाठी वाढीव शिक्षेची तरतुद करण्यात आली. त्याचबरोबर गुन्हेगार जमातीत जन्माला आलेल्या चार वर्षावरील बालकाला त्याच्या आईबापापासून वेगळे करण्याची तरतूद आली. याच कालखंडात युरोपात अनेक परिवर्तने झाली. युरोपियन देशांमध्ये गुन्हेगारी व शिक्षा या संदर्भात नव्या क्रांतिकारी विचारांची मांडणी झाली. याचा परिणाम भारतातील ब्रिटीश अधिका-यांवर झाला. माणूस जन्मत: गुन्हेगार असतो हे नाकारले गेले. याच सुधारणेचा परिणाम म्हणून १९०८ साली गुन्हेगार जमातीच्या वसाहतीचा कायदा झाला. व्यवसाय, शिक्षण,

रोजगार, पुनर्वसन आणि चार वर्षावरील मुलांना सक्तीचे शालेय शिक्षण यांची तरतुद करण्याल आली.१९०९, १९११, १९१६, १९१७ या वर्षात गुन्हेगारी कायदयात निरनिराळया कलमांची व आदेशाची भर टाकली गेली. पण १९२४ साली पुंन्हा सुधारीत गुन्हेगारी जमाती कायदा लागू करण्यात आला.''[२२] वास्तवीक पहात ख-या अर्थाने गुन्हेगारी जमात कायदा हे ब्रिटीशांचे एक षडयंत्र होते. कारण भारतात आल्यानंतर राज्यकारभार व धर्मप्रसार हे दोन महत्त्वपूर्ण कार्य ब्रिटीश सरकारला पूर्णत्वास न्यावयाची होती. अशातच भारत हा देश अनेक जाती व धर्मांनी मिळून बनलेला आहे व येथे विविध जमातींची संख्या जास्त आहे व ब-याचशा जमाती या भटक्या व चोरी करून चरितार्थ चालवणा-या होत्या. कारण ब्रिटीशांनीच जंगल विषयक कायदे कडक केले होते. ब-याचशा जमाती हया भटकंतीचे जीवन जगत होत्या. त्यापैकी सर्वच जमाती या गुन्हेगारीचे जीवन जगत नव्हत्या परंतु ब्रिटीशांनी या काही जमातींसाठी सर्वच जमातींना गुन्हेगार म्हणून घोषीत केले व कायदे विषयक बाबीतून स्वत:ची सुटका करून घेतली. परंतु युरोपमध्ये कायदेविषयक परिवर्तन आल्यानंतर त्यांनी गुन्हेगारी जमाती संदर्भात जे कठोर कायदे केले होते जसे, ''या कायदयातील १९ व्या परिच्छेदात -१९-१- ज्या व्यक्तीची या कायदयाअतंर्गत नोंद झाली आहे. (या कायदयात नेमून दिलेल्या हालचालींवरील निर्बंधांचे जो उल्लंघन करतो) त्याला पुढील प्रमाणे सक्षम कारावास ठोठावण्यात येईल-गुन्हा प्रथम सिध्द.झाल्यास : एक वर्षापर्यंत दुस-यांदा सिध्द.झाल्यास : दोन वर्षापर्यंत आणि त्यानंतर पुन्हा कधी सिध्द.झाल्यास : तीन वर्षापर्यंत आणि या शिवाय प्रथम किंवा त्यानंतर कधीही गुन्हा सिध्द.झाल्यास तो फटके खाण्याच्या शिक्षेला पात्र होईल.''[२३] परंतु या कठोर कायदयात नंतर परिवर्तन करण्यात आले. मात्र ते परिवर्तन देखील युरोपमध्ये झालेल्या कायदेविषयक परिवर्तनाचा परिणाम होता. ''१९०८ साली गुन्हेगारजमात वसाहत कायदा पास करण्यात आला.''[२४] या गुन्हेगार जमातींना वेगवेगळया ठिकाणी देशात ५२ वसाहती (सेटलमेंट) निर्माण करून त्या जमातीच्या लोकांना तीन तारेच्या कुंपनात डांबून ठेऊन दिवसातून तीन वेळा हजेरी देणे बंधनकारक केले. त्यांना सक्तीची कामे व त्यांच्या मुलांना सक्तीचे शिक्षण याची ही इंग्रजांनी वसाहतीत सोय केली. परंतु ही व्यवस्था या जमातींसाठी तुरूंगापेक्षा कमी नव्हती या वसाहतीमध्ये अप्रत्यक्षरित्या या जमातींचा होत असलेला छळ हा डॉ. दिलीप डिसुझा यांनी पुढीलप्रमाणे सांगितला आहे.''भटक्या जमातीतील कुटुंबेच्या-कुटूंबे कोंडवाडयात टाकलेल्या गुरांसारखी तारांच्या कुंपनात अडकवली गेली. वसाहतीमधील अधिका-यांच्या

मर्जीनुसार सगळा वसाहतीचा कारभार चालत होता. अधिका-यांनी सांगेल त्यावेळी हजेरी अंगझडत्या होत होत्या. धर्मांतर करण्याबाबतही मोठया प्रमाणात दबाव टाकला जात होता. किरकोळ गुन्हयांकरीता जन्मठेप किंवा दीर्घ मुदतीची शिक्षा दिली जायची. एखादया विभागाला वेगळे करून, त्यांना कुंपणामध्ये डांबून ठेऊन, त्यांच्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणावर पाळत ठेवणे ही गोष्ट अत्यंत घृणास्पद आणि अमानवी होती. शिवाय पोलीस, न्यायालय, आणि शासन यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे या जमातीच्या त्रासात प्रचंड भर पडली होती. या जमातींना वसाहतीत डांबण्याची कल्पना ही युरोपातील ज्यूंना ज्याप्रमाणे घेट्टो नावाच्या तटबंदी मध्ये डांबले जात होते, त्यांना दिवसभर फिरण्यासाठी पास दिले होते, ओळखपत्रे जवळ बाळगावे लागत होती.सुर्यास्तापासून तर सुर्योदयापर्यंत नैसर्गिक विधीसाठी सुध्दा त्यांना बाहेर जाता येत नव्हते. त्यावरून ही मानवी पध्दत पुढे आलेली दिसते. भटक्यांना डांबण्यात आलेल्या वसाहतीत सुरूवातीच्या काळात नैसर्गिक विधीसाठी डबे ठेवले जात. रात्री कोणी आजारी पडल्यास दोरी हलवून चौकीदाराला कल्पना दयावी लागत. चौकीदाराची इच्छा असेल तरच हयांना औषधपाणी मिळत असे. या सर्व जाचक कल्पनांमुळे या जमातीचे जीवन पशूहून खालच्या पातळीवर पोहचले होते''[२५] एकूणच या जमातीचा अमानुष असा छळ १८७१ च्या कायदयाने झाला. माणसांना माणसांसारखे नाही तर पशू व पशूपेक्षा ही हीन वागणूक यातून देण्यात आली. एकवेळ जनावरांना स्वातंत्र्य आहे. ते नैसर्गिक नियमाप्रमाणे जगू शकतात मात्र या जमातीतील लोकांना मात्र एका विशिष्ट चौकटीत व तटबंदीत स्वत:ला डांबून घ्यावे लागले होते. व याचा परिणाम आजही इतर समाजात या जमाती बद्दल असलेल्या गैरसमजातून दिसून येतो.

वास्तविक पहाता गुन्हेगारी जमात कायदयाचा मोठा परिणाम हा पारधी या जमातीला भोगावा लागला. ,''बाकीच्या सर्व जाती या गावगाडयाशी कोणत्या ना कोणत्या कारणाने जोडल्या गेल्या होत्या. पारधी मात्र शिकारीच्या व्यवसायामुळे रानवट, बेफीकीर जीवन जगत होते. त्यांचा कृषीनिष्ठ, स्थिर, ग्रामजीवनाशी काही संबंधच नव्हता. गाव समाजही पारध्यांना रानटीच समजत होते व धोकादायकही समजत होते. पारधी व्यवसायाने चोर नव्हते उचले किंवा भामटे असे काही समूह सोडले तर कोणत्याच भटक्या जमाती चोर नव्हत्या, त्यांचे स्वत:चे व्यवसाय होते. जेव्हा पोटाला भ्रांत पडे किंवा रानात काही खाण्यासारखेच नसे तेव्हा शेतातली कणसे खुरड, कुठे सिताफळे तोड, एखादे बकरू मार, कोंबडी, उचल अशा प्रकारच्या चो-या ते करत. कुणबी

शेतक-यांना हे माहिती असायचे आणि चोर सापडल्यावर त्याला रट्टे मिळत असले तरी गाव समाज या गोष्टी सहन करून न्यायचा. इंग्रजाच्या कायदयामुळे मात्र सर्व जमातच गुन्हेगार मानली गेली आणि पोलिसांनी त्यांचा छळवाद सुरू केला. म्हणजे एका अर्थाने या कायदयानेच पारध्यांना गुन्हेगार बनविले. एखादया माणसांला जर चोर-चोर म्हणून बडवले तर मग नंतर त्याला चोरी हा धंदा करण्याशिवाय पर्याय राहत नाही. पारध्यांच्या बाबत देखील असेच झाले. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पूर्वी या चो-या पोटासाठी होत पण गुन्हेगारीचा शिक्का बसल्याने गावतल्या मालदार आसामी, पोलिस व्यापार, सोनार सावकार ही मंडळी पारध्यांना हाताशी धरून आपली इप्सिते साध्य करून घ्यायला लागली. यातून वाटमारी लुटालुट आणि चो-यांना सुरूवात झाली. पारधी चो-या करायचे पण माल खपवणार कोणाकडे ? त्यासाठी गावातल्या सेठ-सावकारांकडेच जावे लागे. महाराष्ट्रातले चित्र असेच होते की, स्वत:च्या पदरी भिल्ल, रामोशी, कोळी, पारधी, बाळगत आणि त्यांच्या मार्फत स्वत:ची कामे करून घेत.''[२६] म्हणजेच एकंदर पहाता गुन्हेगारी जमात हा कायदा निर्माण होण्यापूर्वी पारधी हे किरकोळ स्वरूपाच्या चो-या करत परंतु या कायदयाने त्यांच्यावर गुन्हेगार असा शिक्का मारल्याने या जमाती खरोखरच गुन्हे करू लागल्या. परंतु या जमातीला गुन्हे करण्यास प्रवृत्त करणारे लोक हे उच्चभ्रु समाजातील होते. स्वत:चे मोठे इप्सित साध्य करण्यासाठी पारध्यांना किरकोळ रक्कमेचे अमिश दाखवून यांनीच हे गुन्हे अप्रत्यक्षरित्या घडवून आणले बदनाम मात्र पारधी झाले.

ज्यावेळी ब्रिटीशांनी भारतात राज्यकारभारास सुरूवात केली तेव्हा युरोपमध्ये गुन्हेगारी विषयक वेगवेगळे संशोधने अस्तित्वात येत होते व या संशोधनाचा परिणाम हा गुन्हेगारी जमातीबद्दल १८७१ चा गुन्हेगारी जमात कायदा निर्मितीशी सबंधित आहे. कारण युरोपमध्ये १८३५ मध्ये जन्मलेल्या कैसर लोंब्रोसो, रॅफेल गॅरोफॅलो (१८५२) व एनरिको केरी (१८५६) हे गुन्हेगारी संबंधितच्या प्रत्यक्षवादी विचार सरणीचे पुरस्कर्ते आहेत. (Positivist School) गुन्हेगारी वर्तनास जिवोदभवी किंवा अनुवंशीक घटक जबाबदार असतात. असा त्यांचा सिध्दांत आहे. इटलीतील कैसर लोंब्रोसो हे स्वत: डॉक्टर होते. तसेच ते क्लिनीकल सायकियॅट्री आणि क्रिमीनल अँथ्रोपॉलॉजीचे प्रोफेसर होते. सैन्यदलात डॉक्टर म्हणून काम करताना त्यांनी हजारो कैदयांची तपासणी केली. त्या आधारे लोंब्रोसो यांनी १८७६ साली "Theory of Evolutionry Atavism" हा सिध्दांत मांडला. हाच सिध्दांत 'गुन्हेगारीचा शरीर शास्त्रीय सिध्दांत किंवा

जन्मजात सिध्दांत म्हणून प्रसिध्द आहेत. (Theory of physical criminaltype or theory of born criminals) सामान्य व्यक्ती आणि गुन्हेगार व्यक्ती यांच्यातील शरीर शास्त्रीय वैशिष्टयांचा तुलनात्मक अभ्यास करून लोंब्रोसो यांनी गुन्हेगार व्यक्तींमध्ये काही महत्त्वपूर्ण वैशिष्टये असतात असे मत मांडले. ''जसे रानटीपणा जाणवावा अशी वैशिष्टये म्हणजे अरूंद कपाळ (retreating Forehead), फुगीर पसरट नाकपुडया (highly developed frontal sinuses), अप्रमाणबध्द कवटी, अतिशय कमानदार भुवया, कानाच्या मोठया पळया, सापेक्षत: असंवेदनशील (relative insensibility to pain),दाट व कुरळे केस ( fufted and crispy hairs), आक्रमक व रागीट स्वभाव इ. वैशिष्टये जन्मजात असतात. ही शारीरिक वैशिष्टये असलेली व्यक्ती गुन्हेगार असत.''[२७] गुन्हेगारी बाबत लोब्रोंसो यांचा आणखी एक सिध्दांत चर्चेत राहिला, तो म्हणजे अॅटाव्हीजम (Atavism) उत्क्रांन्तीच्या सिध्दांताने सुधारीत रूप म्हणजे अॅटाव्हीजम, ''याचा अर्थ प्राचीन मानवांच्या शारीरिक वैशिष्टयांचे आजच्या मानवामध्ये पुनरागमन किंवा आजच्या मानवाने प्राचीन मानव वंशाची शरीर वैशिष्टये धारण करणे होय.''[२७] यासच Bioligical Throw Back जैविक पश्चातगमन म्हणतात. गुन्हेगार व सामान्य माणसातील फरक शोधण्यासाठी त्यांनी हे तत्त्व सांगितले. गुन्हेगाराच्या शरीरात प्राचीन मानवाच्या शरीराचा एखादा अवयव अनैसर्गिक आकारात व सामान्य माणसात न आढळणारा दिसतो. त्यावरून त्यास तो गुन्हेगार आहे किंवा नाही हे ठरविता येते. थोडक्यात प्राचीन मानवाचे शारीरिक प्रतिबिंब आजच्या मानवात एखादया अवयवाच्या रूपात दिसते तर तो प्राचीन रानटी वर्तन म्हणजे गुन्हेगारी वर्तन करण्याचे जैविक घटक घेऊनच येतो, त्यामुळे तो गुन्हेगार होतोच. गुन्हा करणे वा ना करणे हे त्याच्या नियंत्रणात राहत नाही.

पारधी जमात व इतर जमाती या १८७१ च्या गुन्हेगारी जमात कायदयाची शिकार होण्याच्या कारणात वरील पार्श्वभूमी महत्त्वपूर्ण आहे. युरोपियन राष्ट्रांत लोंब्रोसो सारख्या अनेक विद्वानांनी गुन्हेगारी विषयक विविध सिध्दांत सांगितले व याचा आधार घेऊनच ब्रिटीशांनी भारतात गुन्हेगारी जमात कायदयाची निर्मिती करून ब-याच जमातींना कलंकीत केले असावे व या कायदयाचे दुरगामी परिणाम काय होतील याची पर्वा त्यांनी केली नाही. किंवा लोंब्रोसो यांनी सांगितलेला गुन्हेगारी विषयक सिध्दांत हा कितपत योग्य आहे. त्यांनी सांगितलेले गुन्हेगारीचे जैविक वैशिष्टये या जमातीत दिसून येतात की नाही याची कोणतीही शहानिशा केली नाही.

लोब्रोंसो यांनी सांगितलेली जैविक वैशिष्टये ही पारधी व इतर ब-याच गुन्हेगार म्हणून ठरविलेल्या जमातीत दिसून येत नाहीत. लोंब्रोसो यांनी जरी जन्मजात गुन्हेगार असू शकतात असे मत मांडले आहे तरी काही विचारवंतांनी त्यांच्या या मताचे समर्थन केले नाही. जसे 'चार्लस बकमन गोरींग' (१८७०) यांनी इंग्लंडमधील विविध तुरूंगात डॉक्टर म्हणून काम करत असतांना ३००० कैंदयांच्या ९६ शारीरिक वैशिष्टयांचा अभ्यास सांख्यकी गणिती, पध्दतीने केला. १५ हजार निरीक्षणे नोंदवली. बारा वर्षाच्या संशोधनावर आधारीत त्याचा The English Convict ' हा ग्रंथ प्रसिध्द झाला. गोरिंग यांनी गुन्हेगारी वर्तनाचे अनुवंशिकतेच्या संदर्भात स्पष्टीकरण केले. लोंब्रोसोने सांगितलेल्या शारीरिक लक्षणांचा आणि गुन्हेगारीचा काहीही संबंध नाही हे त्यांनी प्रतिपादन केले. लोंब्रोसो हे मानवतावादी व सुधारणावादी होते. शास्त्रज्ञ नव्हते असे म्हणून त्यांनी लोंब्रोसोवर टिका केली. ''युरोपातच काही विचारवंतानी लोंब्रोसोवर त्यांनी मांडलेल्या विचारांवर टिका केली होती व लोब्रोंसो याचा हा सिध्दांत कसा अयोग्य आहे हे सांगितले मात्र भारतातील ब्रिटीश अधिका-यांनी या सिध्दांताने प्रभावित होऊन हा गुन्हेगार जमात कायदा केला. या ब्रिटीश अधिका-यांचे या जमाती बद्दल असणा-या मताबद्दल दिलीप डिसूझा यांनी असे मत मांडले आहे की,''[२८] लेफटनंट जनरल सर जॉर्ज मॅक्मन हे ब्रिटीश लष्करी अधिकारी स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय सेवेत होते. तेव्हा इथल्या समाजाची बरीचशी (काळी) कुरूप बाजू त्यांनी पाहिली किंवा तसा त्यांचा समज झाला. कारण १९३२ साली त्यांना 'दि अंडरवर्ल्ड ऑफ इंडिया' या शिर्षकाचे पुस्तक लिहून त्यांना प्रसिध्द करावेसे वाटले. विद्वतेचा फारसा स्पर्श नसलेल्या किंवा ब-याच ठिकाणी हास्यास्पद म्हणावे अशा या पुस्तकात त्यांनी त्यांना दिसलेल्या 'भयानक' प्रवृत्ती विषयी ऐसपैस बेलगाम विधाने केली आहेत. खास करून उल्लेख करावे असे यात 'क्रिमीनल ट्राइब्स अँड क्लासिस ( गुन्हेगार जाती जमाती ) 'असे एक प्रकरण आहे. या जमाती विषयी लेखक म्हणतो, ''हया जमाती म्हणजे अक्षरश: समाजातला घाणेरडा गाळ, कुरूप असा फेकून देण्याच्या लायकीचा सांगाडा, असे म्हणता येईल त्यांना जनावरांपेक्षा अधिक किमंत नाही.''[२९] असे मत या जमातीविषयी या ब्रिटीश अधिका-याचे होते. म्हणजेच ब्रिटीश अधिका-यांचाही मोठया प्रमाणात कुठल्याही जमातीचे अशा शब्दांत वर्णन करणे हे सर्वस्वी चूक आहे. मात्र गुन्हेगार जमात कायदयाने सर्वसामान्य माणसे ते ब्रिटीश अधिकारी सर्वांच्या मनात भ्रम निर्माण केला गेला. त्याचा

परिणाम आजपर्यंत या जमाती व त्यांची वंशावळ भोगतांना दिसते. गुन्हेगारी जमाती म्हणून कलंकीत झाल्याने यांनीही गुन्हे करणे हा व्यवसाय मानला. कारण समाज जर एखादयाला सारखा चोर म्हणून हिनवत असेल तर आपण खरोखर तसेच आहोत असे वाटायला लागते व व्यक्तीच्या हातून मग तसे कृत्य आपोआप घडू लागते. या बाबत फ्रॅन्कलीन टिनेनबम यांनी लेबलींग सिध्दांत नामाभिधान सिध्दांत महत्त्वपूर्ण आहे. यात ते असे म्हणतात की, ‘‘एखादया वर्तनास गुन्हेगारी वर्तन ठरविणा-या प्रक्रियेवरच हा सिध्दांत बोट ठेवतो. एखादया व्यक्तीच्या वर्तनास गुन्हेगारी असे नामाभिदान देण्याच्या वृत्तीने असे वर्तन कमी होण्याऐवजी वाढण्याची शक्यता आहे, असे हा सिध्दांत सांगतो.’’[३०] टेनेनबम यांनी नामाभिदान प्रक्रियेस ‘Dramatization of civil' असे म्हटले आहे.

समाजाचा गुन्हेगारी व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा गुन्हेगारी वर्तन कमी करण्याऐवजी असे वर्तन पुन्हा करण्यास उत्तेजन देतो. याचे उदाहरण देतांना ते म्हणतात. एखादया तरूणाने एक साहस म्हणून किंवा मजा म्हणून एखादे वर्तन केले तर न्यायालयात त्याचा गुन्हा सिध्द झाल्यानंतर त्यास गुन्हेगार हा शिक्का / लेबल लागते. आणि गुन्हेगार म्हणून त्याची समाजाला एक नवी ओळख करून दिली जाते. या लेबलमुळे इच्छा नसतानाही त्यास गुन्हेगारी मार्गाने जीवन जगणे भाग पडते. टेनेनबम यांच्या मते, अशा प्रकारच्या गुन्हेगारास समजावून सांगून, समज देऊन, अशा वर्तनापासून परावृत्त केले जाऊ शकते. त्याने प्रथम गुन्हा केलेला असतो.त्यास गुन्हेगारी वर्तन करण्याची सवय नसते. त्यामुळे तो सराईत गुन्हेगार होण्यापासून वाचू शकतो. समाजाचा प्रयत्न हा त्याला गुन्हेगारी वर्तनापासून मुक्त करण्यासाठी असायला हवा. परंतु त्या ऐवजी तू गुन्हेगार आहेस असा शिक्का / लेबल दिले जाते त्यामुळे तिला गुन्हेगारी वर्तनाचाच मार्ग शिल्लक राहतो. लेबलिंग पध्दत ही गुन्हा नियंत्रणाऐवजी गुन्हा वाढण्यास पोषक ठरते असे मत त्यांनी मांडले.

वरील लेबलिंग सिध्दांत हा पारधी समाजाला गुन्हेगारी पासून परावृत्त होऊ न देण्याशी संबंधित आहे. समाजात लोकांचा या समाजाविषयी झालेला भ्रम व त्यांची या भ्रमामुळे आपण गुन्हेगार आहोत ही मानसिकता यातून ते गुन्हे करण्यापासून परावृत्त होत नाहीत जर झालेच तर त्यांना लावलेले लेबल व सामाजिक मानसिकता ही त्यांना परत त्याच गर्तीत घेऊन जाते. मला स्वत:ला देखील काही वर्षापूर्वी म्हणजे अगदी मी इयत्ता दहावी उत्तीर्ण झालो होतो तेव्हाचा प्रसंग

आठवतो. त्याप्रसंगाचे वर्णन येथे करणे मला क्रम प्राप्त वाटते. कारण आज मी स्वत: या पारधी जमाती बद्दल संशोधन करतोय तेव्हा मला त्यांच्या संवेदना जाणवतात व त्यांची गुन्हेगार हया कलंकामुळे वाताहत होतेय हे जाणवतेय. मला आलेला अनुभव असा होता. ‘मी स्वत: अहमदनगर जिल्हयातील असून नगर तालुक्यात डोंगरगण (सितेचे) हे माझे मूळ गाव आहे. मी एकदा असाच सवयी प्रमाणे फिरत फिरत डोंगरगण स्टँण्डवर आलो. येथे डोंगरगण गावच्या पोलीस पाटलाची वस्ती आहे. मी स्टँण्डवर गेलो तेव्हा मला असे चित्र दिसले की, तेथे लिबांच्या झाडाखाली एक कळकट-मळकट सडपातळ माणूस बसलेला होता. त्याच्या आसपास बरेच लोक जमलेले होते. तो माणूस केवलवाणे सर्वांकडे पाहत होता. तेव्हा मी न राहावून एकास विचारले की , ‘काय भानगड आहे ? तेव्हा ती व्यक्ती म्हणाली ‘चोर पकडलाय व पोलिसांना येई पर्यंत त्याला इथ बसून ठेवलाय’ त्या दरम्यान एक मराठा समाजातील गडमांजर सुंभा या शेजारी गावातील सूर्यभान कदम म्हणून एक ( नागरीक ) गृहस्थ आले. जमावाला सावरून ते थेट त्या चोराजवळ गेले. त्याच्या समोर बसले व त्याला ‘रामराम पाव्हण’ अस म्हणतं त्याच लक्ष स्वत:कडे त्यांनी खेचले व अचानक एक जोरदार फटका त्या चोराच्या गालावर मारला. त्याने चोरास मारल्यामुळे बाकीच्या मंडळीच्या नजरेत एक प्रकारचे समाधान दाटले होते तर सुर्यभान हा काहीतरी पराक्रम केल्याच्या अविर्भावात त्याच्याजवळून उठला व उठता उठता म्हणाला, ‘पारदाड सालं’ व तो शुन्य मानसिकतेतून सर्वांकडे पहात होता चोरी केलंल कोणतही सामान किंवा वस्तू ही त्याच्या आसपास नव्हती तर तो केवळ गावात फिरायला आलाय म्हणजेच तो टेहळणी करायला आलाय व रात्री आपल्या साथीदारांना घेऊन तो चोरी करणार ही भिती व हा गुन्हेगार जमातीचा सदस्य आहे या भ्रमापोटी त्यावर ही वेळ आली असावी. त्यावेळी तो प्रसंग मला निश्‍चित कळला नाही. कारण मी स्वत: उच्च जातीत जन्मलो असल्याकारणाने मला इतर जातीच्या संवेदना, व्यथा कळत नव्हत्या परंतु आज उच्चशिक्षित होऊन जेव्हा मी संशोधक वृत्तीने या जमातींचा अभ्यास करतोय तेव्हा मला त्यांच्या व्यथा जाणवतात. सुर्यभान यांनी उच्चारलेल्या ‘पारदांड सालं’ या शब्दातूनच गुन्हेगार जमाती कायदयान पारधी समाजाची केलेली वातहत दिसून येते. अशा प्रकारे वरिल माहीती वरुन व भ्रमांवरुन पारधी जमातीच्या वाटयाला वंचीतता आलेली दिसून येते.ही वंचीतता कमी करावयाची असलयास पारधेतर समाजामध्ये मोठया प्रमाणात प्रबोधनाची अवश्यकता आहे.

### ३.२.४ पारधी जमातीतील महिलांचे स्थान :-

भारतीय समाज व्यवस्थेचा अभ्यास केला तर असे दिसून येते की, भारतात पुरूषप्रधान संस्कृतीचे प्राबल्य आहे. स्त्रीयांचे स्थान हे पुरूषांच्या तुलनेत दुय्यम असल्याचे दिसते.अगदी सर्वच स्तरात हे दिसून येते. अगदी जन्मल्या पासून जीवनाच्या विविध टप्प्यांवर स्त्रीयांचे दुय्यमत्व जाणवते.अगदी अलीकडे स्त्रीमुक्ती चळवळ सुरू झाल्याने (२०व्या शतकात) स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने दर्जा मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. मात्र अद्याप त्याला पूर्ण यश प्राप्त झालेले नाही. जर सामान्य नागर समाज स्त्रीयांना दुय्यम स्थान देतो, तर आदिवासी, भटके, विमुक्त यांची स्थिती थोडीच सुधारीत असणार आहे. आदिवासी व भटक्या विमुक्त समाजात देखील स्त्रीयांचे दुय्यमत्व जाणवते. पारधी या जमातीत तर संपूर्णपणे स्त्रीदास्यत्वाची कल्पना येते. इतर कोणत्याही आदिवासी व भटक्या जमातीत आढळणार नाही अशी परिस्थिती 'पारधी' जमातीतील स्त्रीयांची आढळते. सदर संशोधनादरम्यान क्षेत्रीय अभ्यास करताना व दुय्यम साधनांचे वाचन करताना जी माहिती हाती आली त्यातून पारधी जमातीतील स्त्रीयांच्या स्थानाच्या दुय्यमत्वाची कल्पना येते. या जमातीत स्त्रीयांसाठी अतिशय जीवघेणे नियम आहेत या नियमांबद्दल व स्त्रियांच्या स्थानाबद्दल बोलताना नामदेव भोसले असे सांगतात की, ''आमच्या महिला भगिनीचा बाट कसा मानला जातो हे जर ऐकले तर किंवा पाहिले तर किमान आठ दिवस तरी डोक्यामधला विचार जाणार नाही, इतका आश्चर्यजनक असा बाट आहे.''[३१]

१.एखादे बाईने लघवी करून एखाद्याच्या घरावर टाकली तर ते घर सोडून जावे लागते.

२.एखाद्या पुरूषाला बाईने चप्पल मारली तर त्या व्यक्तीला वाळीत टाकले जाते.

३.चुकून एखाद्या बाईची लाथ जातीमधल्या माणसाला लागली तर तो माणूस बाटला असा समज असतो.

४.या समाजात बाईचे लग्न झाल्यानंतर तिचा नवरा व मुले, मुलीच तिच्या हातचा स्वयंपाक खातात.

५. सासू,सासरे, दिर, नणंद, जावा आदी नातेवाईक ते खात नाहीत आणि पाणी सुध्दा पित नाहीत.

६.एवढेच काय पण आपल्या मुलीच लग्न झाल्यावर तिचा बाप, आई, भाऊ व तिच्या नात्यातले

देखील तिच्या हातचे खात नाही कारण म्हणजे हिने केलेले अन्न किंवा हिच्या हातचे पाणी पिले तर बाटले जाते असा समज आहे.

७.चुकून एखादी बाई घराच्या वरलाकडून जात असेल तर त्या घरला बाट झाला असे संबोधले जाते.

८.एखादी वस्तु किंवा वस्त्र बाईच्या पायाखाली आले तर ते पुन्हा वापर करत नाही किंवा तिने परिधान केलेले वस्त्र, कपडे देखील घरच्या वलनी वरती किंवा भिंतीवरती ठेवले तरी ती बाटलेली वस्तू संबोधली जाते.

९.लग्न झालेल्या बाईला तिच्या कपडयाला ठेवण्यासाठी एखादा घराचा कोपरा किंवा पालाच्या कोपऱ्यात गुंडाळून गाठोडे ठेवावे लागते.तिला आंघोळीसाठी घरापासून लांब अंतरावरून अंघोळ करावी लागते. तर तिच्या वस्त्राला दुसरे कोणीही स्पर्श करत नसत.

१०.या समाजात स्त्रीने अंघोळ केलेली जागा देखील अपवित्र व बाटलेली संबोधतात. व दुसरे त्या ठिकाणी उभे राहत नाहीत किंवा अंघोळ देखील करत नाही.

११.या समाजातील स्त्रीचे कपडे देखील घरावर किंवा घराच्या आसपासच्या झाडांवरती वाळत घालण्यास तिला बंधन असे.

११. या समाजातील मुलींच्या बाबतीत सांगायचे झाले तर या समाजात मुलींना हुंडा देण्याची पध्दती आहे. या हुंडयापाई मुलींचा विवाह हा तीन-चार वेळा होतो. मुलीचे आई वडील फक्त पैशाचा विचार करत असतात. मुलीला व्यसनी, दारूडा, गुन्हेगारी, मध्ये सामील असलेला वयस्कर झालेला किंवा सवती वरती लग्न करून मुलीला विकले जाते. यामुळे अनेक कुटूंबे बरबाद झाली.

१२. पारधी समाजात स्त्रीयांचे बाळंतपण घरीच होणे योग्य मानले जाते.(बाळंत होणारी  स्त्री जर आडली तर तिने काहीतरी पाप केले असे मानले जाते.)

१३.बाळंत होणाऱ्या स्त्रीला इतर कोणीही हात देखील लावत नाही. स्त्रीला स्वत:चा जीव  मुठीत धरून सर्व काही करावे लागते. स्वत:चा नवरा देखील बाळंतपणामध्ये त्या स्त्रीला स्पर्श करवून घेत नसे.

१४. या समाजात लग्न झाल्यानंतर मधुचंद्राच्या रात्री जर कापड कोरे राहिले तर स्त्रीचे अगोदरच कोठेतरी अनैतीक संबंध होते असे मानले जाते.

१५. एखाद्या बाईन एखाद्याला साडीन हाणलं तर तो बाटला असे समजले जाते. अशा बाटलेल्या व्यक्तीच्या घरी कोणी पाणी सुध्दा पित नाही तर जेवण लांबच.

पारधी जमातीत स्त्रीयांसाठी वरील कठोर नियम आहेत या नियमांमुळे या समाजातील बऱ्याच स्त्रीयांचे आयुष्य उध्वस्त झालेले आहे. अशा विचित्र नियमांमुळे स्त्रीयांचे खुप हाल होत आहेत. बऱ्याच स्त्रीयांना या भयानक नियमांना सामोरे जाऊन आपला जीव गमवावा लागला आहे.

पारधी जमातीत स्त्रीयांना असणाऱ्या दुय्यम स्थानाबद्दल माहिती सांगताना एका मुलाखतीत नामदेव भोसले आपला एक अनुभव पुढीलप्रमाणे नमूद करतात.''मी सन १९९८ साली शाळा सोडली व शेजारच्या पाहुण्यासंगती फिरण्यास दुसऱ्या गावी गेलो. तेथे शेजारच्या पाल्या मधील एक स्त्री बाळंतपणाला आली होती. तिचे दिवस भरले होते. पावशेर खोबरे, पावशेर शेंगदाणे, पावशेर गुळ अशा तऱ्हेने त्या स्त्रीला बाळंतपणात आहार देण्यासाठी त्या वस्तु आणल्या होत्या. संध्याकाळच्या वेळेला त्या स्त्रीला मुल जन्मायच्या काळात वातावरण असे आंधारलेले होते. वादळी पावसाची सुरूवात होत होती. विजेचा कडकडाट व पालापासून जरा दूर त्या स्त्रीला बाळंतपणासाठी एकटीच बसविली होती. जसं जशी कळ लागत होती तसतशी ती बाई मोठ-मोठयांन ओरडत होती. कळा असहय होऊ लागल्याने घरातील माणसांना विनवणी करत होती. ती जमीनदोस्त होऊन गडाबडा लोळत होती. कुणीच तिच्या मदतीला उभे नव्हते. तशीच ती रक्तात न्हालेली कशीबशी दवाखान्यात पोहचली. परंतु सकाळी निरोप आला की पारध्याची लोंबी गेली. तशी ती पुण्याची होती. हे तिचे तिसरे लग्न होते. पहिला नवरा लहान होता म्हणून सोडला होता. तर दुसरा गुन्हेगारीमध्ये जेल काढत होता. आणि तिसरा होता तो बेवडा. दुसऱ्या नवऱ्याची तीन मुले होती मुलांना तिकडंच सोडून मुलीच्या बापानं तिचे हे तिसरे लग्न लावले होते. लग्न तरी काय हळद घेऊन लावली अन् गाठ बांधून दिली की झालं लग्न.मात्र तिचा नवरा भयंकर पेताड असल्याने व्यवसाय गावामध्ये मागून खाणे हाच होता. चित्रे, पारवे, ससे पकडून गावात विकणे. आलेल्या पैशाची दारू पिऊन येण्याचे कार्य करत. घरी पालावरती आई-वडील आणि तिची लहान बहिण होती. भिक्षा मागून आणणे आणि खाणे.

पावसाचे दिवस आणि रात्रीची वेळ भर पावसात त्या बाईला बाळंतपणासाठी पालाच्या बाहेर ठेवले होते. वरून पावसाच्या धो-धो सरीवर सरी चालूच होत्या. ती बाई मोठयाने विनवण्या करीत होती. मला मदतीचा हात द्या. ती रडत-रडत किंकाळत होती पण कोणी तिच्या मदतीला उभे

राहत नव्हते. ती मोकळीही होत नव्हती. वरती विजेचा कडकडाट चालूच होता. जणू वाघाच्या जबडयात तिची मान अडकली आहे. अशी त्या बाईची स्थिती झाली होती. पालाच्या आतुन सासू म्हणणारी म्हणत होती, ‘आग लोंबे, सांगून टाक काही पाप केलं असेल तर ? कोणाच्या पोटंच पोर आहे ? कुणासंग गेली होती तु? काय तुझ्याकडून गुन्हा घडला काय ?’ अशा वेगवेगळया प्रश्नांनी सासूचा त्या घायाळ लोंबीवर शब्दांचा भडीमार चालू होता. ती मात्र मदतीसाठी विनवणी करत होती. ईवळत होती. जमीनीवरती डोकं आपटून घेत होती. देवाला साकड घालत होती. लोटांगण घालत होती.

काही वेळान नवरा म्हणणारा उठून तिच्या जवळ गेला आणि दारूच्या नशेत तिच्या पोटावर कचकण पाय ठेवला व तिची एकदाची सुटका केली. पण मुल मात्र मृत जन्मल. तशा पावसात तिनं स्वत:ला सावरत, नशीबी घेऊन रडत-रडत तिचे तिनेच पालाच्या थोडया अंतरावर खड्डा घेऊन ते मृत जन्मलेलं मुल खड्डयात पुरले. पण नाळ मात्र पोटातच तुटून राहिली होती. ती तिचा जीव वाचवण्यासाठी रात्रीच दवाखान्याची मदत मागत होती. त्या पालापासून दवाखान्यापर्यंचे अंतर दहा ते बारा किलोमीटर पर्यंत दूर होते.तेवढे अंतर स्वत:च्या पायाने चालून गेल्यावरती दवाखान्यापर्यंतच पायरी चढण्यापूर्वीच लोंबीन शेवटचा श्वास घेतला होता. सकाळी लोंबीच्या प्रेताला कोणी हात लावेना, सर्व नातेवाईक लांबूनच पहात होते. म्हणे तिच्या प्रेतला हात लागला की आम्ही भ्रमीत होऊ, अखेर गावकऱ्यांनी तिच्या नवऱ्याला सांगून गावाबाहेरील टेकडीवर तिचे दफन केले. पण सासू, सासरे, दीर, भाऊ,भावजयांनी शेवट पर्यंत लोंबीच्या प्रेताला हात लावला नव्हता. (मुलाखत - भोसले नामदेव, चपळगांव, कर्जत )

वरील प्रमाणे कठोर नियम हे महिलांच्या बाबतीत पारधी समाजात अस्तित्वात असलेले दिसतात. इतर आदिवासी किंवा भटक्या विमुक्तांचा विचार केला तर हे नियम जास्तच कठोर असल्याचे दिसून येते. हे नियम कोणी सुरू केले याबद्दल अजूनही शोध लागलेला नाही. मात्र या समाजात हे नियम सर्वांनी मान्य करून आजपर्यंत पारधी समाजामध्ये रूढ झालेले आहेत. व प्रत्येक पारधी कुटूंब त्याचे काटेकोर पालन करते. आज जगात अनेक बाबतीत परिवर्तन आले आहे. जग चंद्रावर,मंगळावर जाऊन पोहचले आहे. बरेच नवनवीन शोध लागले आहेत. मात्र हा खुळचटलेला समाज हा अजून रूढी, रितीरिवाज यापासून दूर गेलेला दिसत नाही. या समाजात हुंडयापाई पहिला संसार सोडून नवीन संसार करण्यात सार आयुष्य जात. अशा अनेक स्त्रीयांना सोडून दिले जाते. व

त्यांच्या गर्भातून जन्म घेणाऱ्या मुलांचे आतोनात हाल होतात. अनेक मुले व आई यांना पोटाची खळगी भिक मागून भरावी लागतात. आई व मुलांची ताटातुट होते व प्रसंगी गैरमार्गाचाही स्विकार करावा लागतो. यामुळे यांच्यात चोऱ्या करणे, पोटासाठी वाट्टेल त्या गोष्टकरणे, शिक्षणापासून वंचित राहिल्याने ज्ञानाची कमी असते यातून असुरक्षितपणा वाढतो. या नियमांमुळे कितेक पारधी कुटूंबे उध्वस्त झाली कित्येक संसार उजाडले गेले.

परंतु वरील नियमांव्यतिरीक्त पारधी जमातीतील स्त्रीयांचा त्यांच्या जातपंचायती बाबत विचार केला तर अगदी विरोधी परिस्थती दिसून येते. पारधी स्त्री जर पतीव्रता असेल, तर तिला देवी इतका मान दिला जातो. या स्त्रीया पारधी पाच पंचापैकी असतील तर त्यांच्या गैरहजेरीत आपआपल्या कुळांच्या सामाजिक, वैवाहिक, तांडयाचे प्रश्न ती स्वत: पाच पंचापुढे आव्हान देऊन सोडविण्याचा प्रयत्न करते. या प्रमुख स्त्रीयांचा संपूर्ण पारधी समाज मान ठेवतो.पारधी जमातीतील स्त्रीच्या कुटूंबातील स्थानाबद्दल एका मुलाखतीत हैसाबाई चव्हाण ही महीला असे सांगते की, “बापानं लहानपणीच (वय वर्षे ३) ५० रू घेऊन माझं लग्न लावलं बाप मेला. मी शानी झाल्यावर नव-यापासून मला चार पोरं झाली. नव-यानं दोन पोरी ठेऊन घेतल्या. दुस-या नव-यापासून तीन पोरं झाली. सात वर्षात त्यानं मला ति-या नव-याला इकली. तिस-या नव-याजवळ मी दोन वर्ष नांदले. ते असंच होत ( हात हलवून दाखवते ) त्याला काय झालं नाही. त्यांन मला दोन वर्सानं चौथ्या नव-याला इकली.धा वर्स त्याच्यासंग परपंच केला. त्याच्या पोटाची मला पाच पोरं हाय. खून झाला. माहया नव-याला जलमठेप झाली. हयो माझा थोरला पोरगा. आता मला पोरं किती झाली तू सांग. आता मी पाचवा नवरा करणार न्हाई. पंच काई करो, मी उलटया काळजाची म्हणतो. म्या काकडी लावली, म्या खाई. हे भाडखाऊ हायत. म्या पाचवा नवरा केला तर पंच व्हय म्हणतील.”(मुलाखत-चव्हाण हौसाबाई, गलांडे, श्रीगोंदा )

एकूणच पारधी जमातीत असणारे महिलांचे स्थान हे अतिशय दुय्यम आहे. परंतु वरील प्रमाणे असणारी सर्व हकीगत ही पुरूषप्रधान संस्कृतीचे प्राबल्य दर्शविते. वरील सर्व बाबींना विरोध करणे हे पारधी स्त्रियांना अशक्यप्राय बाब आहे. परंतु या समाजातील एक कार्यकर्ता श्री नाम्या भोसले यांनी दिलेल्या मुलाखतीत असे दिसते की,त्यांना स्वत:च्या समाजात असणारी स्त्रीयांची दयनीय स्थिती पहावली नाही व त्यांनी विरोध पत्करून देवदेव करताना एक नियम

बनविला तो असा बोकडाच्या जागेवर नारळाचा बळी व तिखटाच्या जेवणाच्या जागी गोड पुरणपोळीचे जेवण. तसेच ते असे सांगतात की, आमच्या समाजात महिलांचा बाट अतिशय क्रुरपणे पाळता जातो. देवदेवाच्या वेळेस बाईला देवीच्या पुजेपासून बाजूला ठेवले जाते. एवढेच नाही तर तिची सावली देखील देवीवर पडली तर बाट मानला जातो. अशाप्रकारचा समज आमच्या समाजामध्ये असून तो नियमांप्रमाणे कट्टर पाळला जातो. परंतु आम्ही स्त्रीयांना देखील देवकार्यात सहभागी करून ठेवले अशा प्रकारे महिलांच्या बाबतचे क्रांतीकारी परिवर्तन पारधी जमातीत घडविणारे नामदेव ज्ञानदेव भोसले हे पहिले व्यक्ती आहेत''.(मुलाखत - नाम्या भोसले, सुरोडी, श्रीगोंदा )

## ३.३ पारधी जमातीचे सामाजिक जीवन :-

पारधी जमातीचे सामाजिक जीवन हे इतर समाजापेक्षा भिन्न आहे. हे पुढील काही मूद्द्यांवरुन दिसून येते.

### ३.३.१ पारध्यांमधील कुळ पध्दती:-

पारध्यांमध्ये कुळ पध्दती ही अस्तीत्वात आहे.''महाराष्ट्रातील फासे पारध्यांमध्ये सोनोने, दाभाडे, साळूंके, पवार, चव्हाण, शिंदे आणि सुर्यवंशी अशी सात कुळे आहेत.''[३२] भारतीय समाजात गावगाडयात ज्या जाती स्थिरावल्या आहेत, त्या जातीत बहुदा एकाच आडनावे धारण करणा-या व्यक्तींचे एकच कुळ समजले जाते. भिन्न आडनावाच्या व्यक्तींमध्ये असणारे कुळ व कुलदैवते हे भिन्न असतात. एकाच कुळात,देवकात,आडनावात विवाह हे योग्य मानले जात नाहीत. तसेच समान कुळातील व्यक्तींमध्ये शरीर संबंधही निषीध्द मानले जातात. अशाच प्रकारे पारधी समाजाच्या सामाजिक जिवनात कुळपध्दती ही आज देखील प्रचलित आहे.पारधी समाजातील कुळां बददल माहीती सांगतांना परशा चव्हाण असे म्हणतात की ''पारधी समाजात काळे, पवार, शिंदे, चव्हाण, भोसले ही प्रमुख कुळे दिसून येतात. ही जी पाच कुलनामे आहेत. तेच त्यांचे आडनावे देखील मानली जातात. प्रत्येक कुलाचे कुलदैवत देखील वेगवेगळे आहेत. जसे पवार कुलाचे दैवत हे लक्ष्मी आहे.काळूबाई हे काळे कुळाची आहे. खंडोबा हे दैवत चव्हाणांचे ओळखले जाते.तर भोसले यांचे कुलदैवत हे भवानीमाता आहे.''[३३].म्हणजे पारध्यांमध्ये भिन्न कुलाचे कुलदैवत देखील वेगवेगळे आहेत.''पारधी जमातीतील सिसोदिया, पवार, सोळंकी, चव्हाण, राठोड इ.कुळे

ही राजपूत जमातीच्या कुळांसारखीच आहेत. ही कुळे बावरिया व तत्सम राजपुतांना प्रदेशात आढळणा-या जमातींकडून त्यांच्यात आली असावीत. लंगोटी पारध्यांमध्ये चव्हाण, पोहार व साळुंकी ही तीन कुळे आहेत."[३४] एकूणच पारधी ज्या ज्या भूप्रदेशात स्थिरावले त्या त्या प्रदेशातील उच्च जातींच्या लोकांची आडनावे यांनी स्वीकारलेली दिसतात जेणे करुण ते श्रेष्ठ समजले जातील.खोडीयार, पीपळाजीया, हरकत, सवोदिया, एकूणच कोरबीया व सीसोदीया ही सहा कुळे फासे पारध्यांनमध्ये आढळतात.ही सर्व नावे गुजराथी आहेत. महाराष्ट्रात आल्यानंतर त्यांनी महाराष्ट्रीयन नावे धारण केली. खोडीयार, पीपळाजीया, हरखत हे काळे आडनावाने ओळखले जातात. "प्रत्येक कुळात किंवा आडनावामध्ये देवतांची विशिष्ट संख्या असते. उदा. पवार, नटु देव, चव्हाण-सात देव,काळे-खडिया शिंदे-तीन देव, घोसला-पाच देव, माना-सहा देव, खडिया-अकरा देव, सोळंकी-चार देव, फुलमाळी-सात देव."[३५]

वरील माहीती वरुन असे दिसून येते की पारध्यांमधील या पाचही कुळांचे आडनावे देवदेवता, आचार-विचार, पूजा-अर्चा, देवदेवता ठेवण्याच्या जागा वेगवेगळया आहेत.त्यांच्यात उत्सव किंवा जत्रा साजरी करण्याची पध्दती देखील निराळी आहे. कुळाच्या देव देवतेला साक्ष ठेवून हा समाज जगत असतो. त्यांच्या कुळ पध्दतीत देवदेवतेला अतिशय महत्वाचे स्थान आहे. देवाचे नाव घेतल्या शिवाय कोणतेही काम ते करत नाहीत. जात पंचायतीच्या न्याय निवाडयात देवदेवतांची शपत किंवा साक्ष ही अंतिम मानली जाते. पारधी समाजातील सर्व कुळे ही बर्हिविवाही आहेत. एकाच गोत्र किंवा कुळातील पारधी समाजातील स्त्री-पुरूष लैंगिक संबंध व विवाहित होत नाहीत. पारध्यांमधील आडनावे ही राजपुतांशी जुळतात. उदा. पवार, सोलंकी, सिसोदिया, राठोड, जाधव, चौहान, काळे इ. काळे हे यात सर्वश्रेष्ठ मानन्यात येतात. काळे हे एक पुरोहित असून जातीचे पुढारी मानले जातात. चौधरी हे त्यांचे पथदर्शक नाव असून वंशपरंपरेने या पदावर येतात. पारध्यांमध्ये राजपुत आडनावाचे लोक दुस-या कुळातल्या मुली करतात. पण आपल्या मुली दुस-या कुळात देत नाहीत.

### ३.३.२ पारधी विवाह :-

विवाह ही एक सामाजिक संस्था आहे. संपूर्ण मानवी जमातीचे विवाह हे एक खास वैशिष्टये आहे. दोन किंवा दोन पेक्षा अधिक विषमलिंगी व्यक्तींमधील समाजमान्य स्थिर लैंगिक

संबंधाची व्यवस्था म्हणजे विवाह होय. या सामाजिक संस्थेत विविधता दिसून येते. आदिम, ग्रामीण, नागरी भटके व विमुक्त यांच्यात विवाहाच्या संस्कारांमध्ये भिन्नता दिसून येते. जैवकीय दृष्टया विवाह संस्थेची उत्पत्ती ही मानवाची लैंगिक गरज भागविणे व जन्माला येणाऱ्या संततीला समाजमान्यता मिळणे या हेतूने झालेली दिसते. विवाह संस्थेबाबत वेस्टरमार्क हा विचारवंत असे म्हणतो की, ''विवाह की जड़े परिवार में है न की परिवार की विवाह में''[३६] आपण विवाहा शिवाय कुटूंब व कुटूंबा शिवाय विवाह संस्थेची कल्पनाच करू शकत नाहीत कारण विवाहातूनच कुटूंबाची निर्मिती होत असते विवाह न करीता कोणत्याही समाज सदस्यास कुटूंब स्थापता येत नाही. असे कुटूंब समाजमान्य नसते.सुप्रसिध्द समाज शास्त्रज्ञ रेडक्लीक ब्राऊन विवाह संदर्भात असे मत मांडतात की, ''विवाह दो परिवारो अथवा रिश्तेदारों के बीच मैत्रियता अथवा गठबन्धंन है''[३७]म्हणजेच विवाहाच्या माध्यमातून दोन परिवार एकत्र येतात व या दोन परिवारात स्नेह व मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतात व समाज संघटनास ही बाब उपयुक्त आहे.

- **विवाहाच्या व्याख्या :-**

### १) ई.ए.हॉबेल :-

''विवाह हे सामाजिक नियमांचे असे जाळे आहे, त्यात रक्तसंबधितांच्या,पती पत्नीच्या आणि त्यांच्या मुलांच्या नियंत्रणाची व्यवस्था आहे.''[३८]

### २) वेस्टरमार्क :-

''कायद्याने अथवा परंपरेने मान्य केलेला असा एक अथवा अनेक पुरुषांचा एक अथवा अनेक स्त्रीयांशी जो संबंध येतो आणि त्या संबंधा मूळे दोन्ही पक्षांना व संततीला काही हक्क व कर्तव्य प्राप्त होतात त्यालाच विवाह असे म्हणतात.''[३९]

वरील व्याख्यांचा विचार केला तर विवाह संस्था ही मानव समाजातील एक महत्वाची, मुलभूत अशी सामाजिक संस्था आहे. या वरुन असे दिसून येते की,

१.विवाहामुळे स्त्री पुरूषातील लैंगिक संबंधाना सामाजिक व कायदेशीर मान्यता मिळते.

२. विवाह हा कुटूंब संस्थेचा पाया होय.

३.विवाहामुळे स्त्री-पुरूषास पती-पत्नीचा दर्जा मिळतो.

४.होणाऱ्या संततीस समाजाची मान्यता मिळते. व अशाप्रकारे कुटूंब आकारास येते.

५.विवाह संस्था सर्वच समाजात आढळत असली तरी जोडीदार निवडीच्या पध्दती, विवाहाचे वय, विवाह प्रसंगी होणारी देवघेव या बाबत विविधता आढळते.

- **पारधी विवाह :-**

मानवी समाजाच्या निरंतरतेसाठी व अस्तित्वासाठी या विवाह संस्थेची निर्मिती झालेली असावी. विवाह संस्था ही मानवी समाजाचा अविभाज्य असा घटक आहे. व विवाह संस्था ही सामाजिक संरचनेचा देखील महत्वपूर्ण घटक आहे. साधी समाज व्यवस्था ते आदिम समाज व्यवस्था देखील विवाह संस्थेपासून दूर नाही. परंतु सर्व जाती व धर्मीयांमध्ये विवाह संस्काराचे स्वरूप मात्र भिन्न आहे. त्यात पारधी जमातीच्या विवाहाचे स्वरूप तर आणखीनच भिन्न आहे. पारधी समाजातील मुले व मुली वयात आल्यानंतर विवाह होतात, लग्नात वधुमूल्याची प्रथा आहे. जर एखादया नव-या मुलास वधुमूल्य देण्याची ऐपत नसेल तर त्याने आपलया भावी सासऱ्याकडे काम करावे असा रिवाज आहे. विवाहातील प्रथा व चालीरिती हे या हिंदूप्रमाणेच आहेत. मामे भावाशी लग्न सम्मंत असून मावस भावाशी निषिध्द मानण्यात येते. दुसऱ्या जमातीशी रोटीबेटी व्यवहार केल्यास त्या कुटुंबावर बहिष्कार टाकण्यात येतो. या समाजात बहूपत्नीत्वाची चाल आहे. घटस्फोट विशिष्ट पध्दतीत दोघांनाही घेता येतो. आणि विध्वेस पुर्नविवाह करता येतो मात्र विध्वा आपल्या आतेभावाशी लग्न करू शकते. परंतू मावसभाऊ किंवा मामे भाऊ यांच्याशी लग्न करू शकत नाही. मृतपतिच्या धाकटया भावाशी ती लग्न करू शकते. परंतु थोरल्या दिराशी लग्न करू शकत नाही. विध्वा विवाह कृष्ण पक्षात सादर केला जातो. अशी माहिती सर्वेक्षणादरम्यान पारधी विवाहबद्दल मिळालेली आहे. परंतू ही माहीती पुरेशी नसल्याने पुढील प्रमाणे तिचा तपशीलाने विचार करण्यात आला आहे. ‘‘समान गोत्रातील मुला-मुलींचे विवाह होत नाहीत.लग्नात मुला-मुलींची पसंती विचारत घेतली जात नाही.आई-वडील ठरवतील त्याच्या बरोबरच लग्न होते. शहरी भागात राहणा-या पारध्यांमध्ये मात्र ही प्रथा कमी होऊ लागली आहे. लग्नासाठी मुलगा स्वत: मुलगी पाहण्यासाठी नातेवाईकांसोबत जातो. त्याच्या पसंती नापसंतीचा विचार आई-वडील करतात. मुलगी पाहण्यास जातांना जातीतील पंच, पाटील आणि शेजा-यांना न्यावे लागते. मुलगी पसंत पडली की दोन्हीकडील मंडळी तिथी ठरविण्यासाठी पाटलांच्या घरी येतात. दोघेही त्याला दहा रूपये देतात. लग्न करून घेणारे दोघेही मुलगा-मुलगी हे भिन्न गोत्रातील आहेत की नाही हे पाटील

बघतो. दूरच्या नात्याने जरी मुलगा-मुलगी हे समान गोत्राचे असल्याचे सिध्द झाले तर गोत्र तोडण्यासाठी पाटील दहा रूपये घेतो. त्यानंतर साखरपुडा होतो. पानविडा वाटला जातो. या वेळीही पाटलाला पाच रूपये दयावे लागतात. साटे, लोटे पध्दतीनेच लग्न होत असल्याने हुंडा देण्याघेण्याची प्रथा या जातीत नाही. एखादयाला फक्त मुलगीच असेल, तर साटे,लोटे होत नाही, पण तिला होणारी मुलगी याच पध्दतीने करून दयायची असे तिच्या लग्नापूर्वीच ठरते. पण तिला लग्नानंतर मुलगी झालीच नाही तर मात्र पाटील तिच्याकडून दंड वसूल करतात. लग्नात नवरा नवरीला कपडे घेतो.स्वत:चेही कपडे त्यालाच घ्यावे लागतात. पूर्वी लग्नात आहेर आणण्याची प्रथा नव्हती. आता ती सुरू झाली आहे. लग्नासाठी विशिष्ट वार, वेळ लागत नाही. परस्परांच्या सवडीने एखादा दिवस ठरविला जातो. लग्न एकाच दिवसात आणि नव-याच्या दारात होते. लग्नात जेवण म्हणून पूर्वी भात, गुळ आणि तेल वाढले जात असे. आज त्याची जागा मांसाहाराने घेतली आहे. डोंगरद-यात राहणा-या पारध्यांमध्ये मात्र तीच प्रथा आहे.''[४०] अशा प्रकारे पारधी विवाह विविध प्रकारे संपन्न होताना दिसतो.ही विवाह प्रथा इतर समाजा पासून भिन्न दिसते. ''विवाहपूर्व व विवाहबाहय संबंधांना कधीच परवानगी दिली जात नाही. याचे उल्लंघन झाल्यास नाक कापणे किंवा ओठ कापण्याची शिक्षा दिली जाते.''[४१] पारधी समाजातील विवाह निषेध हे काही बाबतीत प्रगत समाजासारखे जाणवतात कारण विवाहपूर्व व विवाहबाहय लैंगिक संबंधांना कोण्यात्याही समाजात स्थान नसलेले आढळते.याला पारधी समाज अपवाद नाही.हे नियम त्यांच्यात कठोरतेने पाळले जातात. नियम मोडलयास जात पंचायतीतील कठोर शिक्षेस सामोरे जावे लागते.तेव्हा विवाहाच्या संबंधामधील हे निषेध कोणीही मोडत नाही.या समाजात बुधवार, शुक्रवार व रविवार हे दिवस विवाहासाठी शुभ मानले जातात.इतर दिवशी विवाह करण्याचे टाळतात.

पारधी समाजातील विवाहा बददल माहीती सांगतांना अकाश काळे असे म्हणतात की, अक्षदा पडण्यापूर्वी नवरा-नवरीला आंघोळ घातली जाते. मातीचा एक नवा डेरा पाणी तापविण्यासाठी आणला जातो. नवरा-नवरीला हळद लावण्याचा मान हा फक्त नव-याच्या आईकडे राहतो. तिच्या शिवाय नवरा-नवरीला कोणीही स्पर्श करू शकत नाही. असे झाल्यास पंचायत दंड वसूल करते. नवरा-नवरीला पाणी घालण्याचा मान प्रथम नव-याकडील महिलांना दिला जातो. त्यानंतर नवरीकडील महिला पाणी घालतात.लग्नाच्या दिवशी तयार केल्या जाणा-या स्वयंपाकाला नवरा-

नवरी आणि नव-याच्या आईने स्पर्श करायचा नसतो. चुकून जरी या तिघांपैकी जरी एकाने स्पर्श केला तर तो संपूर्ण स्वयंपाक फेकून द्यावा लागतो. पंचमंडळीही असा स्वयंपाक जेवत नाहीत. आंघोळीनंतर सर्व देवदेवतांची मांडवात पूजा केली जाते. त्यांना तूपभात व गुळाचा नैवेदय दाखवला जातो. त्यात पिपंळाची सात पाने, तर कापसाची नऊ बोंडे असतात. लग्नात बाशिंगा ऐवजी ही माळच नवरा-नवरीच्या कपाळावर बांधली जाते. ती बांधण्याचे काम नवरा-नवरीच्या गोत्रातील माणसाला करता येत नाही.नवरा काळे आणि नवरी पवार असेल तर माळ बांधण्यासाठी चव्हाणांना बोलविले जाते. त्यासाठी त्याला पाच रूपये, दोन किलो गहू, दोन किलो तांदूळ आणि अर्धा किलो गुळ असा शिधा दिला जातो. देवासमोर बसवून नवरा-नवरीच्या कपाळावार माळ बांधली की झाले लग्न. त्यानंतर नवरा-नवरीची गाठ मारली जाते.एकावर एक अशा सात गाठी मारल्या जातात. त्यांच्या डोक्यावर देवाचे कपडे धरले जाते. मग नवरा आपल्या नवरीला स्वत:च्या घरी घेऊन जातो. तो जात असतांना त्याची आई त्याच्या वाटेवर हळदीत भिजविलेल्या कापसाच्या बिया उगवून कापूस तयार व्हावा, मऊ मऊ कापसावरून आपल्या मुलाचे पाय पडावेत, असा हेतू या विधीमागे असावा. नवरा-नवरी घरी जाताना पंच त्यांचा रस्ता अडवितो. त्याला नाका म्हणतात. त्याला पाच रूपये दिले की तो रस्ता सोडतो. नवरा-नवरीला बांधलेल्या गाठी सोडण्याचे काम लग्न लावणाराच करतो. गाठ सोडल्यावर नवरी तिच्या घरी जाते. लग्नासाठी नव-याच्या घराजवळ नवरीच्या मंडळींना राहण्यासाठी घर दिलेले असते. या घरात नवरी आल्यावर नवरा तेथे येतो. तो नवरीला खांदयावर घेतो आणि पळत आपल्या घरी जातो.” (मुलाखत - अकाश काळे, कोळगांव, श्रीगोंदा )

अशा प्रकारे विवाहात काही सोपस्कर असतात तसेच दुपारी चार वाजण्यापूर्वीच जेवणाचा कार्यक्रम होतो. प्रथम पंच, पाटील आणि लग्न लावणारा जेवतो. त्यानंतर इतरांनी जेवायचे असते. घटस्फोटाच्या प्रकरणात पाटील पती-पत्नी आणि त्यांच्या नातेवाईकांना बोलावतो. चूक कोणाकडे आहे हे बघितले जाते, चूक पत्नीकडे निघाली की तिला पतीला लग्नासाठी आलेला सर्व खर्च दिला जातो. पूर्वी फक्त बारा रूपये दंड केला जात असे. पतीकडे चूक असल्याचे सिध्द झाल्यास त्याला लग्नाचा खर्च मिळत नाही, उलट दंड म्हणून पाटलाला बारा रूपये दयावे लागतात.मुलाने अथवा मुलीने आंतरजातीय लग्न केले की, जातीबाहेर टाकले जाते.जर पती पत्नीत काही वाद झाला तर काय होते या बददल बिस्कीट काळे असे म्हणतो की, लग्नानंतर मुलगा आपली पत्नी

सोडून आणि मुलगी आपला पती कायमचा सोडून परत आल्यास त्यांना प्रथम पंचायतीसमोर उभे रहावे लागते. पाटील त्यांना बारा रूपये दंड करतो. चाबकाचे बारा फटके मारतो. त्यानंतर तो मुलगा अथवा मुलगी जातीत राहू शकतो.'' (मुलाखत-बिस्कीट काळे, बेलवंडी, श्रीगोंदा )
आशा प्रकारे तडजोड केली जाते या जमातीत लैंगिक संबधा बाबत अतिशय कठोर असे निर्बंध आहेत त्या बाबत नामा भोसले  याने माहीती दिली की, एखादयाने आपल्या पत्नीच्या चारित्र्याविषयी शंका घेतल्यास तो वाद पाटलासमोर जातो. पत्नी खरोखर पतीव्रता आहे की नाही हे पाहण्यासाठी परीक्षा घेतली जाते. त्याकरीता मातीचे नवे मडके विकत आणले जाते. त्यात दोन किलो गोडतेल ओतून ते कढवले जाते. त्यात सुई किंवा पैसा टाकला जातो. तेल कढल्यावर या परीक्षेला सुरूवात होते. ज्या महिलावर व्याभीचाराचा आरोप आहे तिने पंच, पाटील, आणि समाजाच्या साक्षीने उकळलेल्या तेलात हात घालून सुई अथवा पैसा बाहेर काढायचा असतो.उकळत्या तेलात हात घातल्यानंतर तीन दिवसात तिच्या हातावर फोड उठले नाहीत, तर ती पतिव्रता समजली जाते. तिच्यावर व्याभीचाराचा विनाकारा आळ घेतला म्हणून तिच्या पतीला बारा रूपये दंड आणि चाबकाचे बारा फटके बसतात. याउलट पत्नीच्या हाताला फोड आल्यास ती दोषी ठरविली जाते. व तिला बारा रूपये दंड होतो. शिवाय चाबकाचे फटके सोसावे लागतात.''(मुलाखत - नामा भोसले, पिंपळगांवपिसा, श्रीगोंदा )

ही प्रथा इतरांना जरी अमानवी वाटत असली तरी या जातीतील सर्वच लोक तिचे समर्थन करतात. अधूनमधून हा प्रकार सारखा घडतो. पन्नास-साठ टक्के महिलांवर तरी या परीक्षेची पाळी येते. उकळलेल्या तेलातील पैसा काढण्याच्या प्रकाराला 'रवा काढणे' म्हणतात. अशा प्रकारे पारधी समाजात विवाह विधी संपन्न केला जातो. मुलाकडच्यांनी मुलीला मागणी घालावयाची अशी यांच्यात प्रथा आहे, तसेच बालविवाह प्रथा आजही यांच्यात रुढ आहे. लग्न हे मुलीच्या घरी लागत आसले तरी खर्च मात्र मुलीच्या बापाला करावा लागतो.या जमातीत बुहूपत्नीत्व प्रथा अस्तीत्वात आहे असे क्षेत्रीय सर्वेक्षणा दरम्यान निदर्शनास आले.या समाजातील विवाहीतील प्रथा या हिंदूप्रथाप्रमाणेच आहेत कारण या जमातीत मामेभावाशी  विवाह संमत आसून आत्ते भावाशी निषिध्द आहे.दुस-या जमातीशी रोटी बेटी व्यवहार केलयास बहिष्कार टाकण्यात येतो.विध्वापुर्नर्विवाह मान्य आसून मृत पतीच्या धकटया भावाशी ती लग्न करु शकते.विवाह ही

एक सामाजिक संस्था आहे. विवाह संस्थेतून कुटूंब संस्थेत प्रवेश करता येतो. कुटूंब व विवाह संस्था हया दोन्ही सामाजिक संरचनेच्या दोन मुख्य बाजू आहेत. भारत हा विविधता असणारा देश आहे. या देशात अनेक जाती, अनेक धर्म, अनेक जमाती व या जमातीची संस्कृती, बोलीभाषा, प्रथा, परंपरा व चालीरीती इतरांपेक्षा भिन्न आहेत.याचाच परिणाम प्रत्येकाची विवाह संस्था व विवाहातील विधी हे देखील एकमेकांपेक्षा भिन्न आहेत.

पारधी या विमूक्त जमातीतील विवाह संस्थेचा जर अभ्यास केला तर पारधी जमातीतील विवाह प्रथेतील काही बाबी जसे हळद लावणे, अक्षदा टाकणे हे सर्वसामान्य जनतेप्रमाणे आहे.पण हळद लावण्याचा मान हा फक्त मुलाच्या आईला असतो तसेच केलेल्या स्वयंपाकास मुलाच्या किंवा मुलीच्या आईने स्पर्श न करणे व हुंडा देण्याघेण्याची प्रथा नसणे, जेवणावळीत मांसाहार अशा काही बाबी इतर समाजापेक्षा भिन्न आहेत.पारधी विवाहात शक्यतो मुलाकडील व्यक्तींनी मुलीसाठी मागणी घालावी अशी प्रथा आहे.बाल विवाह अजूनही काही प्रमाणात रूढ आहे.लग्न मुलीच्या घरी होते.या जमातीत बहूपत्नीत्वाची प्रथा आहे.परंतू आता या जमातीतील लोकांचा इतर लोकांशी संपर्क येवू लागल्यामूळे त्यांच्यातील या प्रथा व परंपरा काही प्रमाणात लृप्त होताना दिसतात.

### ३.३.३ पारधी जमातीतील कुटूंब व्यवस्था :-

कुटूंब संस्था ही सर्वच मानवी समाजाचा अविभाज्य असा भाग आहे. ती सामाजिक संरचनेचा एक महत्त्वपूर्ण असा घटक आहे. विवाह संस्थेच्या माध्यमातून कुटूंब संस्था आकाराला येते व माणसाला कुटूंबामुळे एक प्रकारचे स्थैर्य प्राप्त होते. ही संस्था सार्वत्रिक स्वरूपाची आहे. मानवाला सर्वात प्रथम कुटूंबाची ओळख होते.व्यक्ती आणि समाज कुटूंबामुळे जोडले जातात. इतर प्राण्यांपेक्षा मानवी बालकांचा परावलंबनाचा काळ सर्वात जास्त असतो.मुलांच्या व कुटूंब सदस्यांच्या गरजांची पूर्तता त्याला संरक्षण व सामाजिक वारसाचा योग्य परिचय कुटूंबामार्फत करून दिला जातो. व्यक्ती व समाज यांच्यातील दुवा कुटूंब हा होय. तेव्हा कुटूंब संस्था ही अतिशय महत्वाची सामाजिक संस्था आहे. ही संस्था सर्व जाती, जमाती व धर्मांमध्ये अस्तित्वात आहे.पृथ्वीतलावावर जिथे-जिथे मनुष्य वस्ती आहे तेथे तेथे कुटूंबसंस्था अस्तित्वात आहे. तिचे स्वरूप फक्त जाती, जमाती व धर्मानुसार वेगवेगळे आहे हे मात्र खरे.

- **कुटूंब व्याख्याः-**

कुटूंबसंस्थे बाबत जास्त आकलन हे खाालील व्याख्यांच्या माध्यमातून होईल.

**१.मॅक आयव्हर व पेज-**"कुटूंब म्हणजे पतिपत्नी व मुले या सर्वांचा मिळून झालेला एक जैविक व सामाजिक समूह होय."[४२]

**२.ऑगबर्न व निमकॉफ-**"कुटूंब हे पती पत्नीचे कमी अधिक प्रमाणात चिरस्थायी असे संघटन आहे."[४३]

वरिल व्याख्यांवरुन असे दिसून येते की,

१. कुटूंबात पती-पत्नी आणि त्यांची मुले यांचा समावेश होतो.

२. प्रत्येक व्यक्तीला कुटूंबात एक प्रकारे स्थैर्य मिळते.

३.कुटूंब हा भारतीय समाज व्यवस्थेचा व भारतीय भूभागावरील सर्वच समूहांचा अविभाज्य असा भाग आहे.

४. भारतातील सर्व जाती व जमाती मध्ये कुटूंब व्यवस्था आहे.

५.प्रत्येक जाती व जमाती नुसार तीचे स्वरूप मात्र भिन्न आहे. पारधी जमात देखील याला अपवाद नाही.

पारधी जमातीतील कुटूंब व्यवस्थेबद्दल प्रा. बाळासाहेब बळे असे लिहतात की, "पारधी जमातीमध्ये लहानपणीच विवाह करण्याची प्रथा आहे. लहानपणी मुलीचे लग्न झाले तर उपवर होईपर्यंत ती वडीलांच्या घरी राहते. मुलाचे लग्न झाल्यावर त्याला वेगळे पाल ठोकावे लागते. आई,वडील किंवा इतर पारधी मुलांच्या अगर एकमेकांच्या घरी अन्न घेत नाहीत.मुलीला हुंडा (देज) द्यावा लागतो. स्त्रीला पहिल्या नव-यापासून सोडमोकळीक घेऊन कितीही वेळा लग्न करता येते. वडील मुलीचे लग्न झाले असले तरी पहिल्या नव-याचा हुंडा देऊन जातीतील पुरूषाशी पैसे घेऊन दुसरा विवाह करून देऊ शकतो. कधीतरी नवरा आपल्या बायकोला गहाण टाकतो.गहाण टाकलेल्या काळात त्या स्त्रीला मुलं झाली तर गहाण ठेवून घेतलेल्या इसमाला व्याज म्हणून सांभाळावी लागतात."[४४] उपरोक्त प्रकारातून असे दिसते की, पारधी जमातीतील विवाह प्रथेतील ब-याच बाबी इतर समाजापेक्षा भिन्न आहेत. कुटूंब व्यवस्थेत स्त्रीचे स्थान हे अतिशय दुय्यम आहे.कारण स्त्रीला गहाण टाकणे हा प्रकार निदंनीय आहे. इतर समाजापेक्षा पारधी जमातीच्या

कुटूंब व्यवस्थेचे हे वेगळेपण आहे.स्त्रीला वस्तूरूप मानून तिला गहाण टाकणे. हुंडा मिटवून पहिल्या पतीपासून सोडवून तिला दुस-या बरोबर विवाह करण्यास भाग पाडणे हे केवळ तिला भोगवस्तू समजण्याचे लक्षण आहे.व लग्न झाल्यानंतर मुलांना वेगळे पाल ठोकावे लागते. म्हणजेच या जमातीत लग्न झाल्यानंतर कुटूंबातून विभक्त व्हावे लागते. याचाच अर्थ या जमातीत विभक्त कुटूंब पध्दतीचा अम्मंल असून बाल विवाह प्रथा देखील अस्तित्वात असलेली दिसते.पारधी समाजाची कुटूंब व्यवस्था ही अस्थिर स्वरूपाची आहे. कारण कुटूंब हे प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, पती व पत्नी मधील एकमेकांवर असणारा विश्वास या बाबींवर आधारलेले दिसते. पण पारधी जमातीतील कुटूंब व्यवस्थेचा अभ्यास केला तर असे दिसते की, कुटूंबाचा प्रमुख घटक असलेल्या स्त्रीला या जमातीत अतिशय हीन व कनिष्ठ दर्जाची वागणूक आहे. स्त्रीला विकणे ही गुलामगिरीच्या काळातील प्रथा आज तागायत या समाजात चालत आलेली आहे. आपण आज एकविसाव्या शतकात आहोत व स्त्रीची खरेदी व विक्री होणं हे अतिशय लाजीरवाणी अशी बाब आहे. स्त्रीला सारखे विकले जाणे हे अस्थिर कुटूंबाचे लक्षण आहे. कुटूंबात जन्माला येणा-या मुलांना जो भावनिक आधार व आई-वडिलांचे प्रेम मिळणे गरजेचे आहे ते अस्थिर कुटूंबात मिळू शकत नाही. मुलांचे सामाजिकरण योग्य प्रकारे होऊ शकत नाही व यातूनच समाजास योग्य सभासद लाभू शकत नाही. तेव्हा पारधी जमातीतील कुटूंब व्यवस्था ही विचित्र व समाज विघातक अशी कुटूंब व्यवस्था आहे. पारधी जमातीच्या कुटूंब व्यवस्थे बद्दल लिहितांना बळे बाळासाहेब यांनी असे म्हटले आहे की, ‘‘जातपचांयतीने एखादया पारध्याला शिक्षा, दंड केला आणि त्याच्याकडे पैसे नसतील तर पंचाच्या साक्षीने बायको जातीतील इसमाकडे गहाण टाकून मिळालेल्या पैशातून जातपंचायतीचा दंड भरून एका पारध्याने स्वत:ची सोडवणूक करून घेतली. ’’[४५] संकट समयी, आर्थिक विंवचनेत असताना या जमातीतील सर्वच लोक बायको गहाण टाकतात. एकूणच या जमातीत बायकोला वस्तू समजून आर्थिक विवंचनेत तिचा सर्रास वापर केला जातो. मुलाचे लग्न झाल्यानंतर त्याला कुटूंबापासून वेगळे करण्याचा उद्देश स्वतंत्ररित्या उपजिविका करण्यास तो सक्षम व्हावा हा जरी असला तरी तो कितपत यशस्वी होईल हे मात्र सांगता येत नाही.‘‘कुटुंबात पती स्वत:च्या बायकोचा रांड या नावाने उल्लेख करतो. तर पुरूषाला किंवा पतीला स्त्री किंवा पत्नीने एकेरी नावाने हाक मारण्याची पध्दती या समाजात आहे.’’[४६]पारधी

जमातीत स्त्रियांचे स्थान हे अतिशय दूय्यम स्वरूपाचे आहे. कारण वरील माहितीनूसार पारधी जमाती व्यतिरीक्त इतर कोणत्याही जमातीत स्त्रियांना रांड म्हणून हाक मारण्याची पध्दत नाही व कोणत्याही समाजातील स्त्रिया या पुरूष एकेरी नावाने हाक मारत नाहीत.

### ३.३.४ बाजारहाट :-

पारधी जमातीच्या सामाजिक जीवनाचा एक भाग म्हणजे बाजारहाट होय. महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात आठवडे बाजार भरत असतो.पारधी हे कुठेही माळरानावर वस्ती करून राहतात व ते विखुरलेल्या स्वरूपात असतात. त्यांचा समाज हा एकत्रित स्थिर स्वरूपात नाही. तेव्हा बाजारहाटाच्या निमित्ताने किंवा यात्रा, जत्रेच्या निमित्ताने हे सर्व लोक एकत्रित येतात व सामाजिक जीवनाच्या ब-याचशा बाजू या बाजाराच्या दिवशी पूर्ण करतात. या संदर्भात प्रा. बळे असे लिहितात की, ‘‘कोणत्याही गावातील आठवडे बाजारात पारधी लोक ,बायका-मुलांसह मोठया संख्येने हजर असतात. त्यांचा ठराविक ठिकाणी जथ्थाच जमा होतो. गावातून मागून आणलेल्या अन्नाची भिक ते सामूहिकपणे खात असतात. पारधी भाषेत ते आप-आपसातील व्यवहार बोलत असतात. प्रसंगी तेथेच त्यांचे वाद विकोपाला जाऊन त्यांचे हाणामारीत रूपांतर होऊन पारध्यातील स्त्री-पुरूष रक्तभंबाळ अवस्थेत सैरभैर धावत असतात. पोलीस येताच सर्व पसार होतात. काही वेळा पारधी आणि पोलीस यांच्यातील सौदार्हपूर्ण संबंधामुळे पारधी त्यांना ही घाबरत नाहीत.’’[४७]आशा प्रकारे पारधी जमातीच्या आठवडे बाजारा बद्द्ल माहिती मिळते. हे खेदाने म्हणावसे वाटते. आठवडे बाजारातून एकमेकांची भेट, बाजारहाट, त्याचबरोबर उसनवार केलेल्या व्यवहारातील पैशाची वसूली तसेच व्याजाने दिलेल्या पैशांची वसूली करण्यात येते. पारधी जमातीमध्ये चोरी बाबत घडणा-या घटनांची माहिती होत असल्याने पारधी लोक आवर्जून आठवडे बाजारात हजेरी लावत असतात.

### ३.३.५ व्यवसाय व साधने :-

एकेकाळी आपले बि-हाड गायीच्या पाठीवर टाकून रानोमाळ भटकत असणारा पारधी गायीच्या साहय्याने शिकार करायचा. शेतीच्या पिकांची राखण करायचा. त्याचवेळी शेतातील मालाची चोरीचपेटी हा त्यांचा व्यवसाय होता. शिकारीसाठी ते वेगवेगळया फास्यांचा वापर करत जसे खंदारु, मराशी, पिशा आणि  वाघर या फास्यांच्या साहय्याने सश्याची शिकार केली जात

असे. हरिण,काळवीट आणि रानडुक्कर यांची शिकार करण्यासाठी तातलो असे म्हटले जाते.हे शिकारी फासे निलवंती या रानवेलीच्या साहय्याने बनविले जात. त्या खूपच टणक असत. वीस-वीस वर्षे या तुटत नसत. हया फास्यांच्या साहय्याने केलेली शिकार पारधी गावात विकत. ‘‘महाराष्ट्रात हा समाज अलिकडे शेतीराखण, मोलमजूरी, शेती करूनही जगतो आहे. बायका भिक मागुन अन्न गोळा करतात.तर काही जण मध विक्री देखील करतांना दिसतात. पण ही सर्व साधने कायम स्वरूपाची नाहीत किंवा वरील आर्थिक क्रियेतून त्यांचे पोट भरत नाही.परिणामी आर्थिक कमकुवतपणा, निश्चित उत्पन्नाच्या साधनांचा अभाव यामुळे त्यांना भटकावे लागते. पारध्यांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनामध्ये भटकेपणा हा धर्म मानला गेला.’’[४८]

अशा प्रकारे हे विविध व्यवसायातून तर आपला चरितार्थ चालवितात. घोडे पारधी (गावपारधी) दारू गाळायचा व विक्रीचा व्यवसाय करत. हल्ली पारधी स्थिर होऊ लागल्याने त्यांचे व्यवसाय आणि व्यवसाय साधनेही झपाटयाने बदलत आहे. ते अहमदनगर जिल्हयातील पारधी विकास आराखडयातून व आपल्या सभोवताली होणा-या गुन्हेगारी घटनातून सहजपणे लक्षात येते. याचाच अर्थ पोलिसांनी पकडलेले सर्वच पारधी दोषी अगर गुन्हेगार असत नाहीत. या बाबत प्रा. बळे यांनी पुढील माहिती सांगीतलेला आहे, ‘‘दि. २७/०६/२००७ रोजी श्रीगोंदा येथील सराफी दुकानाच्या लुटीत नगरपालिकेत नोकरीला असलेल्या दिपक काळेला पकडण्यात आले. कित्येक दिवसानंतर त्याला व त्याच्या कुटूंबाला, कुटूंबातील शाळकरी मुलांना मरण यातना सहन करत आपले निरपराधित्व सिध्द करावे लगले.’’[४९] म्हणजे गुन्हेगारी कलंकामुळे पारध्यांचा व्यवसाय हा चोरीच आहे असे लोक मानतात. व तो शिक्षणाने जरी दुस-या व्यवसायात गेला तरी चोरीचा कलंक काही केल्या मिटत नाही. पारध्यांमधील काही लोक दारू विक्रीचा व्यवसाय करतात.शासन धोरणातून काहींना जमीन मिळाली तर काहींना भटकंतीच्या जीवनाचा त्याग करून शेती करायला प्रारंभ केला असून ते शेती उपयोगी साधनांचा वापर करू लागले आहेत. शेतीच्या अनुषंगाने गायी, बैल, शेळया, कोंबडया अशा जीवनोपयोगी प्राण्यांचा सांभाळ काही पारधी करू लागले आहेत. काहींचा सावकारकीचा धंदा असून पठाणी पध्दतीने कर्जाची वसूली करतात. कर्ज घेतलेल्या व्यक्तीने कर्ज दिले नाही तर पारधी आपल्या बायकोला पुढे करतो. कधीकधी पारधी स्त्री रूणकांच्या घरासमोर अगर चूलीच्या आळयात संडास करण्याची धमकी देते. बायको करून

घेण्याची मुलाला दगडावर आपटण्याची भाषा वापरते आणि अशा वर्तनातून पैशाची वसूली करण्याचा धंदा आहे.काही पारधी अद्याप गुन्हेगारीपासून दूर गेले नाहीत. उलट काही ठिकाणी या गुन्हेगारीवृत्तीने अमानुष रूप धारण केल्याचे दिसते. ते म्हणजे शहरात भिक्षा मागायला गेलेले पारध्यांतील काही लोक सधन कुटूंबातील काही मुलांना पळवून आणतात. त्यांना भिक मागायला लावतात. किंवा शेतात काम करायला लावतात. मुलं पळून जावू शकत नाहीत, पळाली तर मारझोड करतात. पूर्वी चोरी केल्यानंतर आसपास प्रात:विधी करणे हा पारध्यात संकेत होता पण पुढे स्थिर समाजातील सराईत गुन्हेगार चोरीचा आळ पारध्यांवर जावा यासाठी अशीच कृती करू लागल्याने या संकेतातही बदल झाल्याचे काहींनी सांगितले. व्यवसायाची गुप्तता सर्वात महत्त्वाची मानली जाते. अविश्वास हा व्यवसायाचा कणा आहे.सांकेतीक भाषा व्यवसायासाठी अपरिहार्य आहे.सध्य स्थिती मध्ये पारधी जमाती शेती, मजूरी, पशुपालन, शेतराखण, भिक्षा, शिकार, उस तोड मजूर, दारू विक्री, हमाली, अशी काही व्यवसायातून आपली उपजिवीका चालविताना दिसून येत आहेत.

### ३.३.६ शिकारीची कला :-

पारध करणे हा पारध्यांचा जाती व्यवसाय असल्याने ते उपजत शिकारी कौशल्य आत्मसात करू लागतात. सश्यांची, चीतराची किंवा लाव्हरांची शिकार कशी करावी याचे प्रशिक्षण मुलांना देण्यात येते. पारधी जमातीच्या शिकारीच्या कले बद्द्ल रोहिदास काळे असे म्हणतात की, ‘‘साधली तर शिकार नाही तर भिकार असे म्हणत मुलांमध्ये शिकारीची गोडी लावण्यात येते.यातून शिकार मिळाली नाही तर भ्रम निरास न होण्याची शिकवण मिळते. हल्ली शिकारीवर मर्यादा आली असली तरी वेळप्रसंगी शिकार करून पारध्यांनी शिकारीची कौशल्ये आत्मसात केलीली आहेत. शिकारी बाबत हनुमंता भोसले अशी माहीती देतात की, ‘‘पूर्वी पारधी गाईच्या आडून फासे लावून सावज पकडत असत.त्यावेळी ससा, लाव्हर, करकुंजीचे हुबेहुब आवाज काढून सावजाला जाळयात ओढण्याची अजब कला पारधी समाजात होती.त्याचबरोबर त्यांनी पोट भरण्याची ही विद्या असल्याच आवर्जून सांगितले.’’ (मुलाखत- हनुमंता भोसले, बु-हाणनगर, नगर )

शिकार करण्यासाठी वापरण्यात येणा-या फास्यांच्या वापरा बाबत मराशी या पुस्तकात लेखक नामदेव भोसले यांनी पुढील माहीती सांगीतलेली आहे.‘‘खंदाऊ, मराशी, पिशा, वाघर , तातलोया फाश्याच्या सहाय्याने हरिण, काळविट आणि रानडुक्कर यांची शिकार केली जाते.‘‘[५०]

हे शिकारी फाशे निलंवती या रानवेलीपासून बनविले जातात ते खूपच टणक असलेले दिसतात या फाश्यांचे आयुष्य २० वर्षे असलेले दिसते, हे फासे जवळपास २० वर्षे पर्यंत उपयोगास येतात.शिकार हा पारधी समाजाचा महत्वाचा व्यवसाय आहे यावरच त्यांचा चरितार्थ चालतो.

### ३.३.७ चोरी :-

पारधी जमातीतील लोक चोरीचे संकेत कोणालाही सांगत नाही. ते संकेत मोडणे हा जातीद्रोह व धर्मद्रोह समजण्यात येतो. त्यामुळे कुणीही चोरी कशी करतात हे सांगत नाहीत. अभ्यासकाने आडोश्याने अगर उत्साही वातावरणात चोरीबाबत किंवा संकेताबाबत विचारणा केली तर सर्वच पारधी कावरेबावरे होऊन आप-आपसात भांडण्याचे सोंग करून माहिती देण्याचे टाळतात. ''चोरी करण्याचे नियम असतात. हे लोक नियमासाठी कायदा मोडतात चोरी, घरफोडया करतांना अत्यंत बेरडपणे दरोडा घातला जातो.''[५१]पारधी जमात ही चोर म्हणून गुन्हेगारी कायदयानुसार कलंकीत झालेले दिसते.व उपजिवीकेचे कोणतेही ठोस साधन उपलब्ध नसल्यामुळे नाविलाजाणे त्यांना चोरीचा मार्ग पत्कारावा लागला आहे.व चोरी करण्याच्या प्रवृत्तीतून त्यांची मुळ वृत्ती देखील गुन्हेगारांचीच बनत गेली आहे.प्रा.डॉ.बळे व मुरूड येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून पारधी समाजामध्ये जनजागृती करत असलेले मुरूड (जि. लातूर) येथील प्रा.डॉ. सर्जेराव शिंदे यांच्यासह बुकनवाडी (जि. उस्मानाबाद) नगर महाविद्यालयात आले असता पारध्यांबद्दल माहिती घेत असताना चोरीच्या संकेताबाबत विचारणा करता अशाच प्रसंगाला सामोरे जावे लागले असे ते म्हणतात.''पारधी चोरी करायला शेतात गेल्यानंतर शेतातील पीक गायीवर घातल्यानंतर विखुरलेल्या पारध्यांना एकत्र करण्यासाठी आवाज देता येत नाही. अशा वेळी हरणांच्या शिंगापासून बनविलेल्या शिटीतून विविध पक्षांचे आवाज काढून सर्व पारधी शेतक-याला सुगावा न लागू देता पसार होतात. पारध्यांन एकदा शिकार किंवा चोरीचे ठिकाण हेरले तर तो लोकांच्या उषाजवळच घेऊन येणार.बंद घरात चोरी करायची असेल तर कटावणीने मागील भिंतीचा अलगद दगड काढून लहान माणूस घरात सोडून सर्व दरवाजाच्या कडया काढून पळण्याचा मार्ग मोकळा करतात. आम्ही सर्व घरात घुसून झोपलेल्या माणसांवर धोपाटी घालतो.भीतीपोटी ते उठत नाहीत त्यांना उठू दिले जात नाही. तोपर्यंत बाकीचे घरात चापसतात. कोणी पाठलाग केला तर आप-आपल्या मार्गाने पळतात. ठरावीक ठिकाणी जमतात. थांबण्याचे आधीचे संकेत ठरलेले असतात. त्यासाठी विविध पक्षांचे आवाज हे त्यांच्या शिकारीतील कौशल्य येथे वापरण्यात

येते.चोरीमध्ये स्त्रीवर अन्याय, अत्याचार करायचा नाही.असं कोणी केलं तर परत त्याला चोरीत घ्यायचे नाही.जातीमध्ये तक्रार करायची तसेच चोरी करतांना एखादा पकडला तर त्याने मेले तरी इतरांची नावे सांगायची नाहीत. पकडलेला जेल मध्ये गेला तर त्याच्या घरच्यांना मदत करायची. कोर्ट कचे-यासाठी त्याला पैसे देऊन त्याला सोडवून आणायचे. असा समाजाचा संकेत आहे. आजही हे संकेत पाळण्यात येतात. संकेत पाळला नाही तर जातपंचायतीला सामोरे जावे लागते. चोरी करताना कोणी पाठलाग केला तर पायाने दगड मारणे, हुलकावणी देणे,लोक पालापर्यंत आले तर बाईला पुढं करणे, प्रसंगी बाईने अंगावरची वस्त्र फेकून देणे, अशा विविध आयुधांचा कौशल्याने वापर करण्यात येतो."[५२]

तसेच या जमातीत जेंव्हा चोरीतुन निर्दोष मुक्त व्हयचे असेल तर वकीलांना अपेक्षीत रक्कत द्यावी लागते.ही रक्कम मिळवीण्यासाठी पुंन्हा दरोडा घालावा लागतो व हे चो-यांचे सत्र असेच सुरु राहते. अशा प्रकारे पारधी जमातीत चोरी करताना नियम पाळले जातात. पारधी जमातीत काही पारधी लोक स्वत:त सोने, सराफी दुकानावर दिवसा दरोडा घालून किंवा देवदेवतांच्या मूर्ती किंवा किंमती शेतमालाची चोरी करण्यात पटाईत आहेत. या चोरीत मोबाईल, मोटार सायकल, प्रसंगी चार चाकी वाहनांचा उपयोग करतांना आढळून येतात. "पारधी लोक दरोडे व रस्तालुट मोठया व्यवस्थित रितीने व क्रुरपणे करतात."[५३] सर्वेक्षणादरम्यान पारधी लोक हे दरोडे, व रस्ता लुट करतात.हे जाणवले नाही परंतु काही पारधेतर लोकांकडून पारध्यांचा चोरीत समावेश असतो असे म्हणणे आले,तसेच अहमदनगर मधील श्रीगोंदा तालूक्यातील ज्या ज्या चोरीच्या घटनांची माहिती वर्तमान पत्रात येते त्या गुन्हेगार म्हणून पारधी व्यक्तींची नावे असतात.यावरून रस्ता लूटीत त्यांचा हात आहे हे सिध्द होते. "क्वचीत प्रसंगी तलवारी, बंदुका, भाले ही असतात.किंकरे कुस (नांगराचा फाळ) कुर्तुने (लाकडी दांडीची लोखंडी मेख) यांनी घरफोडी करतात."[५४] अशा प्रकारे चोरी करतांना पारधी विविध युक्त्यांबरोबर वेळ प्रसंगी विविध हत्यांरांचा देखील वापर करतात.परंतु सध्या उपरोक्त हत्यारांचा वापर या जमाती कडून केला जात नाही व चोरी करण्याचे प्रमाण देखील खूप कमी झाल्याचे जाणवते.

### ३.३.८ घानवट प्रथा- (बायको गहाण टाकणे)

पारधी समाजात बायको गहाण टाकण्याच्या प्रथेला घानवट प्रथा असे म्हणतात या समाजात जर एखादया व्यक्तीने कर्ज घेतले असेल व ती व्यक्ती त्या कर्जाची परत लवकर फेड करु शकत नसेल तर त्या बदल्यात कर्ज देणा-या व्यक्ती कडे बायको गहाण टाकतात जो पर्यंत कर्ज देणारी व्यक्ती कर्ज घेण्याऱ्या व्यक्तीच्या कर्जाची रक्कम परत करत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीची बायको कर्ज देणाऱ्या कडे गहाण असते.हा कालावधी २ वर्षापर्यंत असू शकतो.दरम्यानच्या काळात त्या स्त्रीला मुले देखील होतात.कर्जाची रक्कम परत करून तिला सोडविले जाते." (मुलाखत-मिथुन चव्हाण, बुरूडगांवरोड, नगर )

### ३.३.९ मधाचे पोळं काढणे

मध विक्री करणे हा त्यांच्या अर्थिक जिवनाचा एक भाग होय.पारधी समाजातील लोकांना मधाचे पोळे कुठे आहे याचा लगेच तपास लागतो.मोहळाची मादी कुठे आहे हे शोधण्याची कला पारध्यांना अवगत झालेली आहे. आगेमोहळाचे पोळे काढतांना माशांनी चावा घेऊ नये यासाठी ते अग्नी धूराचा कौशल्याने वापर करतात. सावज हेरण्याची ही त्यांची अजब कला असते. पारधी कधी चोरी करील हे सांगता येत नसल्यामुळे अन्य समाजातील लोक पारध्यांशी फारशी सलगी करत नसावेत. अशी माहिती क्षेत्रीय सर्व्हेक्षणा दरम्यान मिळाली.

### ३.३.१० अलंकार-

भारतातील ब-याच समूहांनमध्ये अलंकार परिधान करण्याची प्रथा असलेली दिसते.विविध समूहांनमध्ये सोने चांदी या धातूंचे अलंकार परिधान केले जाते.अलंकार परिधान करण्याचे प्रमाण हे पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये जास्त असलेले दिसते.पारधी जमात सुध्दा याला अपवाद नाही.पारध्यांना ब-याच वेळा उपजीविकेसाठी स्थलांतर करावे लागते.जीवन अस्थिर व असुरक्षित असल्या कारणाने कोणतेही हौसमौज किंवा छंद जोपासण्यावर या जमातीत भर दिला जात नाही परंतु निसर्गत: स्त्रीयांना दागण्यांची आवड असते.याला पारधी जमातीतील स्त्रीया देखील अपवाद नाहीत. "पारध्यांमध्ये स्त्रीयांना दागिने वगैरेची फारशी आवड नसल्याचे आढळते."[५५] विवाहपूर्व जीवनात तर दागीनेच घातले जात नाहीत. विवाहानंतर हातात, पायात, गळयात आणि क्वचीत नाकात पारंपारिक दागिने घातले जातात. स्त्री पुरूष दोघेही गळयात रंगीबेरंगी मण्याच्या माळा

घालतात. पारधी समाजात विवाह प्रसंगी फक्त स्त्रीच्या गळयात काळी पोत बांधली जाते. इतर दागिने किंवा अलंकार नसतात.विवाह आर्थिक परिस्थितीनुसार पार पाडत असल्याने दागिण्यात विविधता आढळत नाही. हिंदू धर्मातील, स्त्रीयांप्रमाणे सोने-चांदिचे दागिने आवडत असले तरी हातात गोठवजा पितळी बांगडया घालतात. कथील, कॉपर, ब्रास किंवा इतर धातूच्या बांगडया किंवा अलंकार घालतात. स्त्रिया पायात पैंजण, साखळया, जोडवी घालतात. ''धर्माच्या व परंपरेच्या नावाची ती बंधने असतात. हौस किंवा सौंदर्यालंकार म्हणून दागिने वापरले जात नाहीत. ब-याच पारधी स्त्रीया नाक टोचत नाहीत. कपाळावर काही गोंदत नाहीत.''[५६] वरील माहितीवरून असे दिसून येते की, पारधी समाजामध्ये विवाह पूर्व अलंकार वापरले जात नाहीत विवाहानंतर अलंकार परिधान केले जातात.जे अलंकार परिधान केले जातात त्यात प्रामुख्याने सोने व धातूचे प्रमाण नसतेच पारधी समाज हा मुख्य समाजप्रवाहापासून वंचित असलेला दिसून येतो या समाजाकडे उपजिवीकेचा कोणतेही ठोस साधन उपलब्ध नसल्याने त्यांची आर्थिक सुबत्तता नाही.त्यामुळे इच्छा असूनही सोने व चांदी या धातूचे दागिने परिधान करू शकत नाहीत.जरी सोने व चांदी सारखे धातूचे दागिने यांनी परिधान केले तरी त्यांच्याकडे इतर समाज संशयित नजरेने पाहतो.तेव्हा ते इतर धातूचे दागिने परिधान करण्यास पसंती देतात.असे सर्वेक्षणात आढळले.

**३.३.११ भाषा:-**

भारतामध्ये अनेक जाती व जमातीचे वास्तव्य आहे प्रत्येक जाती व जमातीची बोलीभाषा हि एकमेंकापासून भिन्न आहे. पारधी समाजाची बोली भाषा देखील इतरांपेक्षा भिन्न आहे. ''पारधी जमातीची बोलीभाषा ही गुजराथी सारखी आहे. महाराष्ट्रातील कंजारभाट, घिसाडी, यांच्या भाषेशी जुळणारी अशीच पारध्यांची भाषा आहे. त्यांच्या भाषेत मारवाडी आणि हिंदीचे ही मिश्रण आढळते. ते मराठी बोलत असले तरी उर्दू व फारशी बोलणारे पारधी भरपूर प्रमाणात आहेत. तसेच राजस्थानी आणि हिंदूस्थानी बोलीतील अनेक शब्द पारध्यांच्या बोलीत आढळतात.''[५७] पण बरेच वर्षापासून ते महाराष्ट्रात राहत असल्यामुळे त्यांच्या भाषेवर मराठीचा प्रभाव जास्त आहे. पारध्यांची जी बोलीभाषा आहे ती सध्या दुस-या जमातीतील किंवा अन्य लोकांना समजू शकत नाही. त्या व्यतिरीक्त त्यांच्या जमातीची म्हणून असलेली त्यांची स्वतंत्र बोली ते बोलत असतात. त्याचबरोबर गुन्हेगारी स्वरूपाची कामे करण्यासाठी ते सांकेतिक भाषा बोलतात.या भाषेला पारधी व इतर जमाती

'पारूशी' भाषा असे म्हणतात. पारध्यांच्या बोलल्या जाणा-या भाषेची कोणतीही लिपी नाही. लिपीच्या अभावाने केवळ मौखीक स्वरूपातच त्यांची भाषा आहे. कित्येक वेळा, करपल्लवी, नेमपल्लवी, सांकेतिक खुणा, निरनिराळे आवाज, मुद्रा, अभिनय इत्यादीद्वारे तोंडातून एक शब्दही न उच्चारता हे लोक आप-आपसात भाषीक व्यवहार करतात. ''ते गुजरातेतून स्थलांतर करून आल्यामुळे त्यांची गुजराथी बोली अपभ्रष्ट झालेली आहे.''[५८]पारधी जमात ही मुळ महाराष्ट्रातील नाही ते महाराष्ट्रात गुजरात मधून तसेच राजस्थान मधून स्थलांतरीत झालेले आहे.त्यामुळे त्यांची बोलीभाषा ही गुजरात व राजस्थानीभाषेचे मिश्रण दिसून येते. ''गुजराथी, राजस्थानी आणि हिंदूस्थानी बोली मधील अनेक शब्द पारध्यांच्या भाषेत सापडतात. परजातीच्या समोर ते मोठयाने हिंदूस्थानीत बोलतात.''[५९]पारधी जी बोली भाषा बोलतात ती राजस्थानी ,गुजराथी व हिंदी मिश्रीत भाषा बोलतात.त्यांच्या भाषेवर या तिन्ही भाषेंचा प्रभाव मोठयाप्रमाणावर असलेला जाणवतो.बहुतेक पारधी वाघरी भाषा बोलतात. या भाषेचे जाटांच्या भाषेशी सांधर्म्य आहे.ही भाषा पारध्यांची सांकेतीक भाषा म्हणून देखील ओळखली जाते.ज्या ज्या वेळेस त्यांना चोरी किंवा एखादा गुन्हा करावयाचा असल्यास ही भाषा मुख्यत: वापरतात.पारधी गुन्हेगारी व्यवहारादरम्यान पारोशी भाषा वापरतात.''वाघरी भाषा मारवाड भागातील वनवाशी बोलतात. शिवाय ती भाषा मारवाडी गुजराथीच्या जवळची आहे.''[६०] व ''पारधी बोलीभाषा ही प्रामुख्याने मौखिक स्वरूपातच आहे. आदिवासींच्या बोलिभाषेचे अध्ययन व संशोधनाचे कार्य करण्यासाठी भाषा संशोधन व प्रकाशन केंद्र गुजरात संस्था १९९६ साली डॉ.गणेश देवी यांनी स्थापन केली. ही संस्था आदिवासींच्या विकासासाठी तसेच आदिवासींच्या मुलां व बोलीभाषेच्या संवर्धनासाठी कार्यरत आहे.''[६१]भारतातील अनेक जमातींच्या बोली भाषेला कोणतीही लिपी अस्तिवात नाही.तसेच पारधी भाषालाही कोणतीही लिपी अस्तिवात नसल्याचे दिसून येते.ही भाषा येणाऱ्या पिढीला मौख्यिक रूपात हस्तांतरीत केले जाते.पारधी लोक भारतातील ज्या ज्या राज्यात राहतात.त्या राज्याची मातृभाषा त्यांना अवगत असते.जसे महाराष्ट्रात राहणाऱ्या पारध्यांना महाराष्ट्रातील मराठी ही भाषा सराईत पणे बोलाता येते.म्हणजेच त्यांना त्यांची बोलीभाषा व मराठी भाषा यांचे दोन्ही भाषांचे ज्ञान असलेले दिसते.उपरोक्त माहिती वरून पारधी हे मराठी, गुजराथी, पारधी, हिंदी, कन्नड व अहिराणी या भाषा बोलतात.

## ३.४ पारध्यांचे सांस्कृतिक जीवन :-

पृथ्वीतलावावर वस्ती करून राहणाऱ्या प्रत्येक मानवी समाजाच्या सामाजिक संरचनेचा महत्वपूर्ण भाग म्हणजे संस्कृती होय. ग्रामीण, शहरी, आदिवासी, भटके व विमुक्त समाज अशा प्रत्येक मानवी समूहाला संस्कृती ही असतेच असते. संस्कृती ही मानवी समाजाचे एक खास वैशिष्टये आहे. परंतु सर्व मानवी समूहांची संस्कृती ही मात्र एकमेकांपासून भिन्न असते. सांस्कृतिक साधर्म्य हे बऱ्याच समूहात आढळत नाही.खालील काही व्याख्यांच्या माध्यमातून संस्कृती या शब्दाची जास्त प्रचिती येते.

- **संस्कृतीच्या व्याख्या :-**

**१) सर एडवर्ड बी.टायलर :-**''संस्कृती ही अशी संकीर्ण समग्रता आहे की ज्यात ज्ञान, श्रध्दा, कला, नीती, कायदा, रूढी या व अशाच इतर पात्रतांचा व सवयींचा समावेश होतो. आणि या गोष्टी व्यक्तीने समाजाचा सभासद या नात्याने संपादीत केलेल्या असतात.''[६२]

**२) डॉ. इरावती कर्वे :-** ''संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्टरीत (जीवनपध्दती व जीवनमूल्ये) म्हणजे संस्कृती.''[६३]

**३) हॉर्टन आणि हंट :-**''ज्याचे सामाजिक अध्ययन होते आणि ज्यात समाजातील सदस्यांचा सहभाग असतो असे सर्व काही म्हणजे संस्कृती होय.''[६४]

**४) हरस्कोव्हिटस्** :''संस्कृती हा पर्यावरणाचा मानव निर्मित भाग होय.''[६५]

वरील व्याख्यांचा अभ्यास केला तर असे दिसून येते की,

१.संस्कृती ही मानवनिर्मित अशी बाब आहे.

२.संस्कृती ही कोणत्या परिस्थितीत कसे जीवन जगावे हे सांगते. कारण मनुष्य प्राण्याने पर्यावरणाशी समायोजन साधून संस्कृती परिवर्तीत होताना दिसते.

३.संस्कृतीत श्रध्दा, ज्ञान, कला, नीती, अनितीच्या कल्पना व मानव निर्मित सर्व भौतिक वस्तुंचा समावेश होतो.

४.संस्कृती ही संक्रमीत होणारी बाब आहे.ती एक पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते. लोक येतात जातात परंतु संस्कृती ही स्थिर असते.

५.संस्कृती ही प्रत्येक समूहातील सदस्यांना जन्मानंतर शिकावी लागते.या संस्कृतीची निर्मिती ही

समग्र समाजाद्वारे होते व समूहातील सर्वांना ती मान्य असते.

प्रत्येक समूह सदस्यासाठी संस्कृती ही आदर्श जीवनरीतच असते. समूहातील प्रत्येक सदस्य हा संस्कृतीच्या माध्यमातून समाजात एकात्मता निर्माण करतो. संस्कृती ही केवळ मनुष्य प्राण्याला असते. एकूणच व्यक्तीने विशिष्ट समाजांतर्गत काय करावे, काय करू नये, कोणते अन्न खावे, कोणता पोशाख घालावा, केशभुषा कशी करावी, कोणते अलंकार घालावेत इ. सर्व बाबी संस्कृती मध्ये येतात.

- **पारध्यांचे सांस्कृतिक जीवन -**

### ३.४.१ पारधी समाजाच्या चालीरीती:-

पारधी ही विमुक्त जमात आहे. ती सतत भटकत असल्यामुळे त्यांच्या चालीरीतींमध्ये एक सारखेपणा आपणास दिसून येत नाही.पण काही बाबतीत या पारधी समाजाच्या चालीरीती सारख्या आहेत.त्यामध्ये आपल्या घरात सुख-समाधान येण्यासाठी जोगणं नावाचा विधी केला जातो. हा विधी पारधी समाजातील सर्व पोटजातीमध्ये करण्यात येतो. प्रत्येक पोटजातींमध्ये त्याला तेवढेच महत्व आहे. त्यानंतर एखादया व्यक्तीने जर दृष्टकृत्य केले असेल तर त्यासाठी झीपीलेवान हा विधी सांगितला गेला आहे. या विधीमध्ये जर एखादया व्यक्ती दोषी असेल तर त्याला पंचाचा निर्णय मान्य करावा लागतो. कधी-कधी एखादया व्यक्तीला जाती बहिष्कृत केले जाते. या समाजात मुलीच्या घरच्यांना हुंडा दिला जातो. पारधी समाजात त्याला देज असे म्हटले आहे. हा देज किती असावा हे वेगवेगळया गोष्टीवर ठरत असते.पारधी समाजात बोकड, रेडा, हरीण, डुक्कर, आणि पंख असलेल्या सर्व पक्षांचे मांस खाण्याची प्रथा दिसून येते. अशा प्रकारच्या वेगवेगळया चालीरीती या समाजात आहेत.व या सर्व चालीरीती या समाजाचा अविभाज्य असा भाग आहे.ज्या प्रमाने इतर समाजात जिवन जगण्याच्या काही पध्दती आहेत त्याच प्रमाने पारधी या विमूक्त जमातीत देखील उपरोक्त जिवन जगण्याच्या पध्दती दिसून येतात.या चालीरीतीच पारधी सांस्कृतिचे द्योतक आहेत. पारधी सांस्कृती ही खालील काही बार्बीवरून आधिक स्पष्ट होते.

### ३.४.२ पारधी समाजातील जन्म व मृत्यु संस्कार :-

जन्म व मुत्यू या मानवी जीवनातील अतिशय महत्वाच्या घटना आहेत. व्यक्तीचा जन्म हे त्याचे सामाजिक स्थान ठरवत असतो. व्यक्ती जर उच्च जातीत जन्मला तर त्याचे सामाजिक स्थान

हे अतिशय उच्च असते तर तो निम्न जातीत / जमातीत जन्मला तर त्याचे सामाजिक स्थान हे निम्न असते व त्यानुसार त्याचे संपूर्ण जीवन ठरत असते. पारधी जमात तर कलंकीत गुन्हेगारीचा शिक्का बसलेली मग त्या जमातीत ज्याचा जन्म होणार त्याची स्थिती काय असणार याची कल्पनाच न केलेली बरी.पारधी हे इतर समाजापासून दूर आहेत तेव्हा त्यांच्यातील सगळयाच गोष्टी इतर व्यक्तींपेक्षा वेगळया आहेत. त्यांची जीवन जगण्याची एकूणच पध्दत भिन्न आहे. ते पुढील काही बार्बीवरून दिसते.

- **पारध्यांमधील जन्म :-**

पारध्यांमधील जन्मांबद्दल डॉ. दिपक पवार यांनी असे म्हटले आहे की, ''पारधी स्त्रीचे बाळंतपण हे घरात किंवा तसा विचार करता दवाखान्यात व्हायला पाहिजे पण वास्तविकता अशी आहे की, पारधी जरी घरात राहत असले तरी त्यांच्या स्त्रीयांचे बाळंतपण हे आजही जंगलात, झाडाच्या आडोशाला, उघडया पालात (उघडया जागेवर, झाडयाच्या झुडपाच्या आडोशाल, अवतीभोवती नेसायचे लुगडे किंवा साडी लावून कसा तरी आडोसा तयार करतात) होते. बाळंतपण होतांना घरातील वृध्द अनुभवी स्त्री व इतर स्त्रिया मदत करतात. मुल जन्माला आल्यानंतर बाळाला व बाळंतीणीला पाच दिवस घरातील मंडळी व इतर कोणीही हात लावत नाही. बाळं व बाळंतीणीला घरात राहता येत, पण त्याचे सर्व काही त्याच बाळंतीणीला करावे लागते.पाचव्या दिवशी मुलाची पाची करतात, मुलाच्या डोक्यावरील सर्व केस देवाचे नाव घेऊन आईने काढण्याची पध्द्त पारध्यांमध्ये आहे. यावेळी पाच लहान मुलांना जेवायला घातले जाते. मुलाचे नाव याच दिवशी ठेवतात. गुळ, ज्वारीची भाकरी, तुप इ. पदार्थ जेवणात वाढले जातात. न्हानी पूजनाची प्रथा इतर जमाती प्रमाणे यांच्यातही दिसून येते. न्हाणीसमोर सात गारेचे दगड ठेऊन त्यांची पूजा केली जाते. मुलाच्या डोक्यावरून सातवेळा पाणी घालून न्हाणीत सोडतात. बाळाला न्हाणीवरून उतरवीतात. गहू, हरबरा इ. धान्याच्या घुग-या करून त्या वाटतात. सवाष्णींना जेवू घालतात नव-याने बायकोची सात मूठी धान्याने ओटी भरण्याची वेगळीच पध्दत काही ठिकाणी या जमातीत दृढ आहे.जावळ काढण्याचा स्वतंत्र असा विधी या जमातीत दिसत नाही.''[६६]अशा प्रकारे पारधी जमातीमधे जन्मविधी दिसून येतो हा विधी इतरांपेक्षा वेगळा आहे. ''बाळंत होते वेळी त्या महिलेचा पती तेथे असतोच. एखादी महिला लवकर बाळंत होत नसेल तर पतीने / बापाने तीच्या

पोटावर पाय देण्याची पध्दत आहे.''[६७] अशी आघोरी प्रथा ही केवळ याच समाजात दिसते. भारतात अनेक जाती जमाती आहेत पण  अशी अघोरी प्रथा ही केवळ याच जमातीत दिसते.या प्रसंगी ब-याच वेळेस महिलेचा मृत्यु देखील होतो.क्षेत्रीय सर्वेक्षणा दरम्यान सतू-या भोसले यांनीया समाजातील जन्म प्रथेबददल अशी माहीती दिली की, बाळंतपणानंतर बाईला दोन महिने स्वयंपाक करण्यास मनाई असते. मात्र इतर शेतीची कामे, दारू गाळणे वगैरे केलेली चालतात. दोन महिने घरच्या देवाचे दर्शन घ्यायचे नाही. तसे ही पारध्यांना देवाचे दर्शन रोज-रोज होत नाही. कारण त्यांचे देव फडक्यात बांधून पेटीत ठेवलेले असतात. दसरा, होळी किंवा कोणी गंभीर आजारी असल्यास व आजार बरा होत नसल्यास नवस केल्यास तो फेडण्यासाठी प्रसंग विशेष देव फडक्यातून बाहेर काढतात. तसेच घरी बाळंतपण होऊन दोन महिने झाल्यानंतर देव बाहेर काढले जातात. या देवांचे दर्शन घेऊनच ती बाई स्वयंपाक पाण्याला सुरूवात करते.(मुलाखत - सतू-या भोसले, लोणी व्यंकनाथ, श्रीगोंदा )

अशा प्रकारे स्त्री बाळंत झाल्यावर या समाजात बरेच सोपस्कार असतात जे इतर समाज्यापेक्षा भिन्न दिसतात. ''या जमातीत सुईण मिळत नाही कारण सुईणीचा धंदा हलका समजला जातो.''[६९]या वरुन असे दिसते की या जमातीत सुईणीला महत्व नाही व दवाखान्यात देखील भर्ती केले जात नाही ही बाब खूपच विचीत्र आहे कारण आशा बाळंतपणात जास्त प्रमाणात स्त्रीया दगावू शकतात.''मुलाचे सर्व केस देवाचे नाव घेवून आईनेच काढावयाची पध्दत आहे.''[७०]आशा प्रकारे पारधी जमातीतील जन्म विधी असतो.

- **पारधी जमातीतील मृत्यु विधी :-**

प्रत्येक मानवी जीवनात जन्म, विवाह, मृत्यू हया अतिशय महत्वपूर्ण अशा घटना आहेत. त्यात जन्म व मृत्यू हया घटना मानवी जीवनात अटळ आहेत. जन्म कुठे, केव्हा व कोणत्या जाती, जमातीत, प्रांतात होईल हे व्यक्तीच्या हातात नसते. प्रत्येक व्यक्तीचे सामाजिक स्थान हे त्या व्यक्तीच्या जन्मावरून ठरते व प्रत्येक जाती-जमातीतील, धर्मातील मृत्युनंतरचे संस्कार हे वेगवेगळे असतात. 'पारधी' जमातीतील मृत्युनंतरच्या संस्कार हे देखील इतरांपेक्षा वेगळे आहेत. परंपरेने सर्व विधी केले जातात, पण पारध्यांच्या धार्मिक विधीचे स्वरूप अत्यंत साधे आहे. हे लोक दक्षिणेकडे डोके करून प्रेत पुरतात.वर उल्लेख केल्याप्रमाणे पारधी जमातीत मृत व्यक्तीचे

प्रेत पुरले जाते मात्र बाळतंपणात मरणाऱ्या स्त्रियांची व कुलदैवतांच्या तिर्थांची यात्रा करून आलेले व्यक्ती मयत झाल्यावर दहन केले जाते. मयत झाल्यानंतर मातृकुलातील विवाहित आपत्यामध्ये १० दिवसांचे सूतक धरले जाते. एखादी बाई बाळांत झालयावर ९ दिवसाच्या आत मेली तर, जातीचा कोणीही मनुष्य तिच्या प्रेताला शिवत नाही. प्रेताला अंघोळ घातली जात नाही.नूसती लंगोटी लावणारे अवविवाहित मुले प्रेत उचलतात.बैलगाडी मध्ये टाकतात व ते गावकुसाबाहेर नेऊन पुरतात. कुटुंबातील माणसे तिचे सुतक पाळत नाही.तसेच अशा बाबतीत कोणतेही प्रकारचे विधि केले जात नाहीत. अशी माहिती मयत व्यक्तीबद्दल उपलब्ध होते. या बद्दल डॉ. दिपक पवार असे म्हणतात की, ''पारधी जमातीत प्रेताला जाळत नाहीत तर त्याला जमीनीत खड्डा करून पुरतात. फार पूर्वी पारधी समाज जेंव्हा जंगलात वास्तव्याला होता आणि जंगलातच भटकत होता तेव्हा व्यक्तीचा मृत्यु झाल्यानंतर जेथे व्यक्तीचा मृत्यू झाला असेल त्या ठिकाणी त्या मृत व्यक्तीच्या प्रेताला तसेच टाकून ते दूसरीकडे चालले जात. जंगलातील प्राणी त्याला खाऊन टाकत, उरलेला भाग सडून मातीत मिसळून जाई. कोणतेही विधी केले जात नव्हते. पण जसजसा पारध्यांचा संपर्क स्थिर समाजाशी किंवा गावगाडयाशी आल्यानंतर व पारधी जंगल सोडून एका गावातून दुस-या गावात भटकंती करताना मात्र त्याला उघडयावर न टाकता नदी-नाल्याकाठी खड्डा करून पुरण्यात येत होता. प्रेत नेण्याकरीता तिरडी वगैरेचा वापर केला जात नव्हता. तर घरची किंवा इतर पाच-सहा माणसे हातानेच धरून त्याला घेऊन जात आणि पुरत होते.''[७१]

एकूणच वरील स्पष्टीकरणावरून असे दिसते की, पारधी जमातीत मृत्यु नंतर जो संस्कार केला जातो. तो संस्कार देखील निम्न सामाजिक स्थानामुळे अस्थिर अशा स्वरूपाचा आहे. निश्चित निवासस्थाना अभावी त्यांच्या शवांची विल्हेवाट कशाप्रकारे लावायची ही समस्या या जमातीला भेडसावतांना दिसते. या बद्दल एक भयानक वास्तवता प्रा.बाळासाहेब बळे यांनी आपल्या लेखनामध्ये मांडलेली आहे. ती अशी,''पारधी जमातीचे लोक सतत भटकत असल्यामुळे आणि गावगाडयात त्यांना स्थान नसल्यामुळे त्यांना स्मशानभूमी नाही भटकंतीच्या काळात पारध्याचा माणूस मेला तर पाटलाला सांगून त्याला गावच्या शिवेवर पुरत असत. सध्या काहींना सरकारने जमीनी दिल्या. त्यामुळे प्रेताला शेतात पुरतात चाळीस वर्षापूर्वी माझी लहान मुलगी येळपणे (जि.अहमदनगर) येथे शेतात पुरायची तर सर्व गाव एकत्र आलं मुलीचे प्रेत उकरून काढले.

पाटलाने मुलीचे प्रेत शिवेवर पुरण्याची आज्ञा दिली. अशी मुलीच्या दफनाची कहानी हौसाबाई प्रेमराज भोसले या ८० वर्षीय महिलेने दु:खी अंत:करणाने सांगितली.''[७२]

मेलेल्या माणसाला दफनाच्या ठिकाणापर्यंत झोळीत नेतात. मयताला पुरण्यासाठी दक्षिणोत्तर खड्डा खोदतात. त्यात मयताला झोपवतात. (काही ठिकाणी खड्डयात देवळी करून त्यात बसवितात.) मयताचे डोके उत्तरेला (गंगामोरी) व पाय दक्षिणेला करतात. तोंडात सोनं किंवा पैसा ठेवतात. घरातील माणसं,सोयरे त्यावर माती लोटतात.मातीवर एक दगड ठेऊन त्याला सेंदूर लावतात. गुलाल टाकतात. मयत व्यक्ती देव झाली असे समजून त्याला नमस्कार करतात. दुसरे दिवशी अन्नाच्या दामटीचा नैवेद्य तसेच कोंबडीच्या पिलाचे मुंडके तोडून ते पिलू भाजतात. त्याच मांस दातानं तोडून त्याचा नैवेद्य मयताला अर्पण करतात. हा नैवेद्य थोरल्या मुलाने किंवा वडिलाने द्यावयाचा असतो. तेरा दिवस सुतक पाळतात. अशावेळी घरातील लोक मांसाहार करत नाहीत. तेराव्याला नैवेद्य दाखविण्यात येतो. तेराव्याला शिजविलेल अन्न सोयरे घेत नाहीत. मयताला वर्ष झाल्या नंतर वर्षश्राध्द (हडभजन) घालण्याचा विधी होतो. दिवस मावळता बोकड कापून मयताला नैवेद्य  ठेवण्यात येतो. त्यावेळी मयताला असणा-या व्यसनांची पूर्तता करण्यासाठी त्या जागी विडी, तंबाखू, दारू ठेवण्यात येते. आपण पूर्वजाची हाडं जातीने उकरून काढणे ही पारधी जमातीतील सर्वात मोठी शिक्षा समजण्यात येते.'' (मुलाखत- काळे अंकुश, पिंपळगांव पिसा, श्रीगोंदा )

एकूणच पारधी जमातीतील मर्तीक विधी हा इतर जमातींपेक्षा व गावगाडयातील जातींपेक्षा भिन्न असल्याचे दिसते. परंतु सुतकपाळणे, नैवेद्य दाखविणे हे प्रकार काही प्रमाणात इतर समाजाशी मिळते जुळते आहेत. ''या समाजात प्रेतयात्रेत स्त्रियांना बंदी असते.''[७३]अशा प्रकारेपारधी जमातीतील मर्तीक विधी हा इतर जमातींपेक्षा, जातींपेक्षा भिन्न असलेला दिसतो कारण बहूतेक सर्वच जाती जमातीत स्त्रीयांना मयत विधीत समाविष्ट केले जाते.

### ३.४.३ पाचवी किंवा छटी पूजा :-

भारतीय समाजात हिंदू धर्मात मुलाचा जन्म झाल्यानंतर पाच दिवस पूर्ण झाल्यावर पाचवीचा विधी केला जातो. प्रत्येक जातीत व जमातीत देखील हा विधी केला जातो त्याचे स्वरुप मात्र जातीत व जमाती परत्वे भिन्न भिन्न  आहे. पारधी जमातीत मुलाचा जन्म झाल्यानंतर पाच

दिवस पूर्ण झाल्यानंतर ‘पाचवीला‘ जो संस्कार असतो, त्याला अनन्य साधारण असे महत्त्व आहे. त्यालाच छटी पूजा असे देखील संबोधले जाते. या जमातीतील पाचवीच्या पूजेबद्दल माहीती सांगताना हनम्या काळे असे म्हणतात की, ‘‘पाचव्या दिवशी पाचवी केली जाते. सहाव्या दिवशी नाळ पडली तर सहाव्या दिवशी छटी पूजा करतात. हा विधी करतांना घरासमोर एक छोटा खड्डा खनतात. त्यात पाणी टाकतात. त्याच्याभोवती ७ गारगोटी,७ नागवेलीची पानं ठेवतात. तरवड, पानकणीस, सूर्यकाडया किंवा अन्य झाडाच्या सात काडया उभ्या करतात. त्याला लाल रंगाच्या दो-याचे सात वेढे देतात. शेंगदाणे, हरबरे, ज्वारी असे सात प्रकारचे धान्य एकत्र शिजवून हे धान्य पाण्याने भरलेल्या खड्डयात व होमात आहूत करतात. होमामध्ये गुगुळ (उद) टाकण्यात येतो. नंतर बाळंतबाईची केसांची एक बट खड्डयातील पाण्याने धूतात. नवरा वरतून तिच्या केसांवर पाणी सोडतो. नवरा गुगळ, उदबत्तीची धूरी बाळ-बाळंतीनीच्या डोक्यावरून, पाठीवरून, चकोई चेऊ, मेलाई उतरू म्हणत फिरवतो. त्यानंतर ती विटाळमुक्त होते. स्त्रीया तिची खारीक, खोबरे, हळकुंड, धान्यासह ओटी भरतात. मुलाला लाल दो-याचा करगोटा बांधतात. त्यालाच ते नाडापुडी म्हणतात. बाळंतीणीच्या हातात लेकुरवाळया हळकुंडासह नाडापुडी बांधण्यात येते. तिला दानवण लावावयास देतात. दानवण लावणे सौभाग्याचे समजण्यात येते. आई पाचव्या दिवशीच बाळाच्या डोक्यावरील जावळ कापते. हा विधी दुपारी ४-०० वाजता करण्यात येतो. बाळंतपणानंतर ती स्वत: किंवा दुस-याने केलेली भाकरी खाणार मात्र तिच्या हातची भाकरी पाच महिने नव-याला खाऊ घालायची नाही. असा दंडक पारध्यातील भोसले कुळात असल्याचे शोधयात्रेत सांगण्यात आले आहे.’’(मुलाखत-हनम्या काळे, घोसपुरी, नगर )

## ३.५ पारधी जमातीचे धार्मिक जीवन :-

धर्म हा मानवी जिवनातील अतीशय महत्वाचे अंग आहे.संपूर्ण जगात असा कोणताही समाज आस्तीत्वात नाही जो निधर्मी आहे. सर्व समाजात धर्माचे अस्तीत्व आहे त्याचे स्वरूप मात्र एकमेकांपेक्षा भिन्न आहे.या समाजातील धर्माचे स्वरूप वाटते तितके साधे सरळ नाही. या धर्मात अलौकिक शक्तीवर विश्वास मानवाचा त्या शक्तीशी संबंध आणि हा संबंध स्थापन होण्यासाठी विधीचा समावेश होतो. पारधी समाजाच्या जीवनपध्दतीत म्हणजेच सामाजिक, आर्थिक जीवनात धर्माचा सहभाग असतो. ‘धर्म’ ही मानवी जीवनातील एक अतिशय महत्वाची संस्था आहे.

भारतातील समाज बहुधर्मीय असून जगातील प्रमुख धर्म भारतात आहेत. श्रध्दा आणि प्रथा परंपरा ही धर्माच्या दोन महत्वाच्या बाजू आहेत. धर्माच्या माध्यमातून मानवी शक्तीच्या कक्षेबाहेर असे काहीतरी अस्तीत्वात असते जी मानवी वर्तन नियंत्रित करते.संपूर्ण समाज हाच धार्मिक तत्वाने नियंत्रित राहतो. धर्माचा प्रभाव व धार्मिकता ही व्यक्तीच्या वागण्या बोलण्यातून दिसते. अनामिक शक्तीला घाबरून लोक आपल्या वर्तनावर नियंत्रण ठेवतात. व धार्मिक कार्यात सक्रीय सहभागी होताना दिसतात. धर्म ही सामाजिक नियंत्रण करणारी बाब आहे. धर्म म्हणजे केवळ निती नव्हे ,केवळ आचार ही नव्हे तर तो एक अनूभव आहे.

- **धर्म व्याख्या :-**

**१) जॉनस्टोन**-"धर्म म्हणजे दैवी किंवा पवित्र अशा मानलया जाणा-या वस्तुंचा अर्थ लावण्यासाठी व त्यांना प्रतीसाद देण्यासाठी एखाद्या गटातील लोकांनी स्वीकारलेलया श्रध्दा आणि प्रथा यांची पध्दती होय. "[७४]

**२. एडवर्ड टायलर** - "अतिमानवी शक्ती वरील विशवास म्हणजे धर्म होय."[७५]

**३.मॅलिनोवस्कीच्या मते**- "धर्म ही क्रिया करण्याची एक पध्दत आहे त्याच बरोबर श्रध्देची एक अवस्था आहे.धर्म हा समाजशास्त्रीय घटनेबरोबरच एक वैयक्तीक अनूभव ही आहे."[७६]

या शक्तीच्या माध्यमातून संपूर्ण मानवी समाजावर अप्रत्यक्ष नियंत्रण ठेवता येते.मानवी जन्मापासून ते मृत्यूपर्यंत विविध धार्मिक विधी केले जातात. धर्म हा शब्द 'धृ' या संस्कृत धातुपासून बनलेला आहे. 'धृ' म्हणजे धारण करणे. धर्माच्या व्याख्या विविध असल्या तरी त्यातून धर्माचे कार्य सूचित होते. धर्म म्हणजे केवळ भावना वा बुध्दीवाद ही नव्हे तो एक अनुभव आहे. प्रत्येक धर्मात काही एक विशिष्ट तत्व सांगितलेले आहे. व त्याला अनुसरून त्यातील तत्वज्ञानाची मांडणी केलेली असते. धर्म ही मानवाची क्रिया करण्याची एक पध्दत आहे. त्याच बरोबर श्रध्देची एक अवस्था आहे. प्रत्येक धर्माचा आधार कोणत्या ना कोणत्या महान शक्तीवर विश्वास होय. सामाजिक ऐक्य निर्माण करण्याचे कार्य धर्म करतो तेव्हा तो प्रत्येक समूहाला महत्वपूर्ण वाटतो. भारतात प्रत्येक जमातीचा एक विशिष्ट धर्म आहे व धार्मिक श्रध्दांना त्यांच्यात अनन्य साधारण असे महत्व आहे. पारधी जमात देखील यापासून भिन्न नाही.

पारधी समाजाचे धार्मिक जीवन हे इतरांपेक्षा निश्चित निराळे आहे. ते पुढील प्रमाणे काही बाबींतुन दिसुन येते.

### ३.५.१ पारधी समाजाचे देवदेवताः-

पारधी समाजाचा देव धर्मावर खूप विश्वास व श्रध्दा आहे. धर्माने घालून दिलेले संकेत पारधी समाजात कटाक्षाने पाळले जातात. जसे बहुजन समाजात वेगवेगळया देव, देवता असतात. त्यांची एक उपासना पध्दती असते तशा प्रकारचे देवदेवता या पारधी समाजात ही आहेत. पारधी समाजात जी वेगवेगळी प्रमुख कुळे आहेत त्यांचे कुलदैवते हे ठरलेले आहेत. ते त्यांच्या कुलदैवतांचा उत्सव, जत्रा हे वर्षातून एकदा तरी करतात. ‘‘देवतांची पुजा करणा-याला पुढारी म्हणतात.’’[७७] इतर समाजात भगत म्हणतात.रामनाथ चव्हाणांनी पारधी समाजाची चार प्रमुख कुळे मानली आहेत. ते या विषयी म्हणतात की, ‘‘पारध्यांनी आपल्या पोटजातींत निरनिराळया कुळांच्या नावाने देवतांची विभागणी केलेली आहे. पवार, भोसले, शिंदे, काळे ही या समाजाची चार प्रमुख कुळे मानली गेली. असून पवार, शिदयांनी महालक्ष्मी, मरीआई, भोसल्यांनी भवानी, तर काळयांनी काळूबाई आणि दुर्गादेवी ही कुलदैवते म्हणून स्वीकारली आहेत. ’’[७८] या शिवायही पारधी समाज अन्य देवतांची उपासना करतो त्यामध्ये सूर्यदेव (दादोबा), महादेव (शिव),घरामध्ये शेवटी मृत झालेली जी व्यक्ती त्या व्यक्तीचा मुखवटा इ.ची पूजा केली जाते.‘‘जूनागडची अंबिका देवी ही त्यांचीकुलदैवत आहे पारधी शक्तीपंथीय आहेत.’’[७९]उपरोक्त माहितीवरून असे दिसून येते की पारध्यांची कूळे त्यांची आडनावे त्यांच्या देवदेवता या हिंदू धर्माशी निगडीत आहेत. कारण उपरोक्त आडनाव व देवता या हिंदूच्या असलेलया दिसून येतात. महाराष्ट्रामध्ये आल्यानंतर हिंदू धर्मीयांचे बहुसांख्यिक स्वरूप व आर्थिक राजकीय प्रभूत्व हे पारध्यांच्या लक्षात आले असावे . त्यातून त्यांनी स्वत :ची आडनावे उच्च वर्णीय हिंदूच्या आडनावाप्रमाणे धारण केली.व त्यांच्याच देव देवता त्यांनी स्विकारलेल्या दिसून येतात.

पारधी समाजातील प्रत्येक कुळातील व्यक्तीकडे त्या-त्या कुळातील दैवतांचे चांदीचे मुखवटे असतात. देवीच्या यात्रेच्या प्रसंगी हे मुखवटे नागिणीच्या पानावर मांडले जातात. सर्व शिवाची उपासना सर्व कुळांमध्ये केली जाते. या शिवाच्या उपासने विषयी वेगवेगळया आख्यायिका या पारधी समाजात सांगितल्या जातात. अशीच एक अख्यायिका शिवपुराणात पुढील

प्रमाणे सांगितली आहे. 'एकदा पारधी महाशिवरात्रीच्या दिवशी शिकार करण्यासाठी जंगलात गेला होता. त्याने सशाला पकडण्यासाठी जाळे लावले व तो झाडावर जाऊन बसला. तो ज्या झाडावर बसला ते झाड बेलाचे होते. शिकारीची वाट पहात असताना झाडावर बसल्या-बसल्या नकळतपणे तो झाडाचे एक-एक पान तोडून खाली टाकत होता. झाडाच्या खाली महादेवाची पिंड असते. त्याचे पाने त्या पिंडीवर पडत असतात.त्याच्या त्या पाने टाकण्याच्या (वाहण्याच्या) प्रकारावर महादेव त्याला प्रसन्न होतात. महादेव त्या ठिकाणी प्रगट होऊन त्याला काहीतरी वर मागण्यास सांगतात पारध्याने असा विचार केला की, पैसे मागितले तर ते संपून जातील. त्यापेक्षा काही वेगळे मागावे असा विचार करून त्याने देवाला गायी मागितली. देवाने त्या पारध्याला गायी दान दिल्या.'

तेंव्हापासून पारधी हे महादेवाचे उपासक झाले आहे. महादेवाच्या उपासनेबरोबर ते आपल्या कुळातील देवींची उपासना करतात. त्या बरोबर ते सूर्य देवतेची सुध्दा उपासना करतात. जे पारधी कायमचे एका ठिकाणी वास्तव्य करतात. (गावाच्या बाहेर ठरून दिलेल्या जागी ) असे पारधी त्या-त्या गावातील ज्या ग्रामदेवता असतात त्यांची सुध्द् उपासना करतात. त्याच प्रमाणे त्या गावात असणारे जे स्थानिक देव (शिवार देवता) आहेत त्यांची सुध्दा ते उपासना करतात.

### ३.५.२ पारधी समाजाच्या जत्रेचे स्वरूप :-

दरवर्षी पारधी कुटूंब एकत्र येऊन जत्रा करतात. बहुतेक पारधी हे हिंदू असल्याने ते मरीआई, मांढरादेवी, भवानी, जरीमारी, खंडोबा, लक्ष्मी, दुर्गा, सप्तशृंगी इ.दैवतांची त्यांच्या गावी जत्रा करतात. या जत्राच्या स्वरूपाविषयी रामनाथ चव्हाण म्हणतात की, ''दस-याच्या पूर्वी ९ दिवस उपवास केले जातात. दहाव्या दिवशी रात्री बारा वाजता होम पेटविला जातो. भक्ताच्या अंगात देवी येते. रात्रभर पूजापाठ करीत हे लोक बसतात.सूर्योदयापूर्वी होमाजवळ रेडा आणतात. देवीचा भक्त रेडयाच्या अंगावर पाणी टाकतो पाणी अंगावर पडताच रेडयाने अंग झाडले तर त्याचे चार पाय बांधून त्याच्या मानेवर धारदार हत्याराने मारले जाते. मानेतील मांसाचा तुकडा काढून पेटत्या होमात देवीला नैवेदय टाकला जातो. नंतर रेडयाच्या मानेला ज्या ठिकाणी कापलेले असते तेथून वाहणारे रक्त देवाचा भक्त त्या जखमेला तोंड लावून पितो. यात्रेला आलेले लोकही ते रक्त देवीचा प्रसाद म्हणून पितात. नंतर होमाजवळ आणून रेडयाला ठार मारले जाते. त्याचे मांस देवीचा

प्रसाद म्हणून वाटले जाते. याला टोणगा मारणे असे म्हणतात. हा विधी या समाजात अंत्यत पवित्र मानला जातो."[८०]

इतर समाजात जत्रेच्या प्रसंगी बळी देण्याची प्रथा आहे.पंरतू या समाजा सारखी प्रथा इतर कोणत्याही समाजात अस्तीत्वात नाही कोंबडा, बोकड आशा स्वरुपातही बळी दिले जातात. पारध्यांन मधील ही प्रथा मात्र विचीत्र अशी आहे कारण ते रेडयाला अत्यंत क्रूरपणे मारतात.''पारध्यांमध्ये रेडे जत्रा ही अत्यंत पवित्रमानली जाते."[८१] पारधी समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने जास्त प्रमाणात अंधश्रध्दा दिसून येते.देवीच्या भक्तांवर पारधी समाजातील लोक जास्त विश्वास ठेवतात. त्यांचा शब्द हा प्रमाण मानला जातो. काळानुरूप या यात्रेमध्ये बदल होत आहे. रेडया ऐवजी बोकडाचा बळी देण्यात येत आहे. या समाजातील जत्रे विषयी माहीती देतांना प्रा बळे असे म्हणतात की "ज्या गावी मुक्काम असेल त्या गावी वर्षातून एका पौर्णिमेला आपल्या समाजाची सभा भरवतात. त्यांचे जत्रेचे ठिकाण गावापासून दूर आडरानात असते.त्या वेळी वर्गणी काढून रेडा विकत घेतला जातो. मग त्याला क्रूरपणे ठार करतात. त्याचे मांस शिजवून सामुदायिक भोजन करतात.''[८२]वरील विवेचनावरून आपणास असे लक्षात येते की, या जत्रा गावापासून दूर रानात असतात. आणि या जत्रेत रेडा बळी देण्याची प्रथा आहे. जत्रा करण्याचे कारण हेतू हा सर्व समाजात सारखाच दिसून येतो पहिला हेतू देवीला प्रसन्न करणे हा आहे. आपल्या जीवनात अनेक संकटे येतात हे संकटे किंवा वाईट परस्थिती येऊ नये किंवा आपल्या जीवनात वाईट प्रसंग (संकटे) वारंवार येत असेल तर ती नाहीशी व्हावीत म्हणून जत्रा केल्या जातात. तसेच आपल्या व्यवसायात भरभराट व्हावी. आपण मनात जो हेतू बाळगतो तो पूर्ण व्हावा म्हणून हया जत्रा हा समाज करतो. या जत्रेत सर्व स्त्री-पुरूष मांस भक्षण करतात. दारूही पितात. पुरूषांप्रमाणे स्त्रीयाही दारू पितात. संकट प्रसंगी देवाला शरण जाण्याची प्रवृत्ती या समाजाची दिसते. जत्रा करण्यासाठी जर पैसे नसतील तर कर्ज काढून जत्रा केली जाते. ज्या ठिकाणी रेडयाचा बळी दिला जातो. ते ठिकाण पवित्र समजले जाते. अशा ठिकाणी पारधी समाज आपली वस्ती करत नाही. एकूणच या पारधी समाजाच्या जत्रेचे स्वरूप पाहिले तर पारधी समाजातील अज्ञान आपल्याला या ठिकाणी दिसून येते.

### ३.५.३ पारधी समाजातील जोगणंविधी :-

कोणत्याही समाजात उत्सव हा प्रिय असतो. मराठी महिन्याचा जर आपण विचार केला तर प्रत्येक महिन्यात कोणता ना कोणता सण असतो. सणाबरोबर महाराष्ट्रीयन समाज वेगवेगळे विधी करतो. महाराष्ट्रात हिंदू समाज मोठया प्रमाणात आहे. हिंदू समाजातील बहुतांशी लोकांचे कुलदैवत हे तुळजापूरची भवानी, माहूरची रेणूका, जेजुरीचा खंडोबा हे आहे. या देवांचे जागरण-गोंधळ करण्याची प्रथा हिंदू धर्मात आहे. बहुतांशी पारध्यांचे दैवते सुध्दा हिंदू धर्माप्रमाणे आहेत. हिंदू धर्मामध्ये जसे जागरण गोंधळ आहे हा धर्मविधी आहे. तसा जोगणंविधी हा पारधी समाजात आहे. या जोगणं विधीला जंगली जत्रा, जोगणं, देवदेव किंवा जव्हारणं अशा वेगवेगळया नावांनी ओळखले जाते. या विधीला पारधी समाजात महत्वाचे स्थान आहे. हिंदू समाजात ज्यांचे कुलदैवते तुळजापूरची भवानी किंवा माहूरगडची रेणूका माता आहे. तेच लोक गोंधळ घालतात. जागरणं हा विधी ज्यांचे कुलदैवत खंडोबा आहे तेच लोक करतात. बाकीचे लोक करत नाही. तसे मात्र पारधी समाजात नसते. पारधी समाजातील प्रत्येक व्यक्ती हा विधी आपल्या घरी करतात. वर्षभर तेथे उत्पन्न मिळवतात. त्यातली निम्मी रक्कम आप-आपसातली भांडणे व कोर्ट कचे-या यांच्या मध्ये खर्च होतात व उरलेली निम्मी रक्कम ते या देवदेव कार्यासाठी खर्च करतात. हा विधी पारधी समाज खूप श्रध्देने करतो. जर आपल्याकडे पैसे नसतील तर दुस-याकडून पैसे उसणे घेऊन किंवा कर्ज काढून हा विधी केला जातो. आपल्या आयपतीपेक्षाही किंवा मिळकतीपेक्षा जास्त पैसा या विधी मध्ये खर्च केला जातो.

हा विधी करतांना सर्व पारधी समाजाच्या मनात एक वेगळी भावना असते. हा विधी करण्याचे अनेक कारणे आहेत.जसे त्या बाबत प्रा.बळे असे लिहितात, ‘‘चोरीत यश मिळावे, सुगीत चांगली चांदी व्हावी, कोर्टात जामीन मिळावा. गुन्हयातून निर्दोष मुक्तता व्हावी, कोर्टातील अगर जातपंचायतीमध्ये आपल्या बाजूने निवाडा व्हावा, पोलीस आणि मराठा माणसांपासून सुख लाभावे, पहिला वंश जन्माला येणे, समाजात शूध्द करून घेणे, घरातील इडापीडा टळावी, देव स्वप्नात येऊन त्याने बोकडाची मागणी करणे अशा विविध कारणपरत्वे देवाची जत्रा भरवून त्या वेळी एक,तीन, पाच, सात, अकरा प्रसंगी एकवीस बक-यांचा बळी देण्याचा विधी पारधी समाजात मनोभावे करण्यात येतो.’’[८३]

हा विधी करण्याच्या कारणांचा जर आपण विचार केला तर देवांकडून काही तरी मिळवण्यासाठी पारधी समाज हा विधी करतो.स्वत:कडे पैसे नसतील तर कर्ज काढून हा विधी केला जात होता. पूर्वी बक-या ऐवजी नरबळी (मुनष्यबळी) देण्याची प्रथा या समाजात अस्तित्वात होती असे मुलाखतीतून समोर आले आहे. हा विधी करण्यामागे आणखी ही काही कारणे आहे. सासूने जावयाच्या विहिरीत कुत्रे टाकणे, स्त्री-पुरूष मुत्र विहिरीत टाकणे, घरासमोर, अथवा पालासमोर शिंपडणे, कुत्रा, गाढव, गाय, बैल या प्राण्यांचे मांस अंगावर अगर अंगणात टाकणे, दारात कुत्र फडफडणे, कुत्र्याने घरासमोर ढुंगण घासत सरकत जाणे असे प्रसंग पारधी समाजात अशुभ किंवा बाटगेपणाचे समजण्यात येतात.त्यातून शुध्द होण्यासाठी जव्हांरण विधी करून देवाकडून उजवी गुडी घेऊन पवित्र होण्याशिवाय अन्य मार्ग पारधी समाजात नसतो. पारधी समाजात काही संकेत ठरून दिले आहेत. हे संकेत अत्यंत काटेकोरपणे पाळले जातात.जर एखादया व्यक्तीने हे संकेत मोडले तर त्याला हा विधी करावा लागतो. प्रत्येक समाजात असे संकेत आपल्याला पहायला मिळतात. पण शिक्षणाने इतर समाजाची प्रगती झाली या संकेताचा अर्थ त्या समाजातील लोकांना समजला. हे संकेत खोटे आहेत हे समजल्यानंतर त्या समाजातील लोकांकडून हे संकेत पाळले जात नाही. पण पारधी समाजात शिक्षणाचा प्रसार झाला नाही. शिक्षण कमी प्रमाणात आहे, त्यामुळे परंपरेने आलेले संकेत पाळले जातात. हया समाजातील कोणी समाज सुधारक निर्माण झाला नाही. त्यामुळे या समाजाची जी सुधारणा व्हायला हवी ती तेवढया प्रमाणात झाली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. ज्योतीराव फुले, शाहू महाराज, म. विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य या समाजापर्यंत पोहचले नाही. प्रत्येक समाजात काही लबाड, फसवणूक करणारे लोक असतात तसे या समाजात जे देवाचे भक्त आहेत. ते या समाजातील जे लोक धर्म भोळे आहेत त्यांना फसवतात. त्यांना हा विधी करण्यास सांगतात त्यामुळे हा विधी करण्याचे प्रमाण या समाजात जास्त आहे. कधी-कधी वर्षातून दोन वेळेस सुध्दा हा विधी केला जातो.

- **जोगंण विधी नाटयाचे स्वरूप :-**

या समाजातील जोगंण विधी विषयी माहीती अशी आहे की,''जोगंण हा विधी प्रसंगानुरूप आहे. प्रत्येक विधीचे एक स्वरूप असते तसे जोगंण या विधीचे सुध्दा वेगळे स्वरूप आहे. या विधीतील देवदेवतांच्या ओव्या ढोलाच्या साथीने भगत म्हणत असलेली गाणी भगताने देवकार्यात

सहभागी होण्यासाठी देवदेवतांना केलेले आवाहन, विनोदी चुटके, सांगण्यात येणा-या स्फुट लोककथा उपस्थित पारधी मनोभावे ऐकत असतो. यावेळी भगत पारधी भाषेत भिला वाघरी किंवा पारध्यांची भाषा म्हणतात. या भाषेत मंत्रोच्चार करत असतो. या विधीच्या वेळी भगतांकडून उच्चारल्या जाणा-या लोकवाड्:मयात दैवी शक्ती असते किंवा मंत्र सामर्थ्य असते. तसेच या विधीसाठी वापरण्यात येणारी प्रत्येक वस्तू भारलेली असते. तिच्यात वायुशक्ती येते. अशी पारध्यांची समजूत आहे. हा विधी करण्यामागील कारणे आणि धारणा विचारात घेतल्या तर या विधीनाटयाचे पारध्यांच्या जीवनात असणारे स्थान आणि त्यातून प्रकटणारे पारध्यांचे एकूणच जीवन समजण्यास मोठी मदत होते. या विधी नाटयात दुसरे काही उपविधी आपल्याला पाहण्यास मिळतात. जोगणं हे विधी नाटय तीन दिवस चालते. हे विधीनाटय गावापासून दूर जेथे लोकवस्ती नाही अशा रानामध्ये संपन्न केले जाते. या विधीनाटयाच्या वेळी जे भांडे वापरतात, कपडे, हा विधी होण्यासाठी जे वेगळे साहित्य वापरतात त्या साहित्याचा वापर दैनंदिन जीवनात केला जात नाही कारण हे सर्व साहित्य देवाचे आहे. किंवा त्यामध्ये देवाचे वास्तव आहे अशी भावना पारधी समाजाची असल्यामुळे ते त्या भांडयाचा उपयोग करत नाही. हा नियम पारधी समाज कटाक्षाने पाळतो. सर्व पारधी समाज भक्तीभावाने देवाला नैवेदय ठेवतात.''[८४]आशा प्रकारे या विधीतील सोपस्कर असतात.

- **जोगंण विधी मांडणी :-**

या संदर्भात असं दिसते की, ''जोगणं विधी हा तीन दिवस चालतो. तो विधी करताना त्या विधीची मांडणी ठराविक पध्दतीने केली जाते. या विधीमध्ये देवाच्या पालाला महत्व असते. तसेच या विधीतील चलन, मुंजविधी, व झोपीलेवान नावाचे विधी यामध्ये असतात.''[८५] हे विधी झाल्याशिवाय जोगणं विधी पूर्ण होत नाही. यामध्ये सुरूवातीला देवाचे पाल या विषयी माहिती पाहू

- **देवाचे पाल :-**

जोगणं विधी मध्ये हा पहिला विधी आहे. या विधीमध्ये देवाची मांडणी केली जाते. कुळानुसार प्रत्येकाचे देव वेगळे आहेत. व त्यांची मांडणी करण्याचा क्रमही वेगळा असतो. जोगणं विधीमध्ये देवाचे पाल ठोकून जोगणं विधीला प्रारंभ केला जातो. संध्या काळच्या सुमारास

पालाच्या पश्चिम दिशेला पाल ठोकले जाते. ''हे पाल पूर्व पश्चिम दोन बांबू (मेडी) उभे करून त्यावर आठे किंवा दोराच्या साहयाने कापडाचे पाल तयार करण्यात येते. पारधी पक्क्या घरात वास्तव्यास असला तरी या विधीसाठी स्वतंत्र देवाचे पाल ठोकावे लागते. पालाच्या पश्चिमेकडील खांबाजवळ (बेळ) मातीचा गोल आकाराचा ओटा करतात. त्यावर पाणी टाकून नवे वस्त्र अंथरण्यात येते. पश्चिमेकडील खांबावर विधीसाठी झेंडा उभारण्यात येतो. याला झंडो लगाडावलो असे म्हणतात. त्याशिवाय पुढे विधी होत नाही. नंतर गोलाकार जागी अंथरलेल्या वस्त्रावर नागवेलीची पाने ठेवतात भगत गाठोडयातील अगर बंद पेटीतील देव काढून पानावर त्यांची मंत्रोच्चारांसह प्रतिष्ठापना करतो. टाक रूपातील देवदेवतांची उजव्या बाजूने मानाप्रमाणे प्रतिष्ठापना करण्यात येते. यामध्ये पहिला मान दादोजी (सूर्यदेव) नंतर कुलदेवता आणि नंतर अन्य देवदेवता अशी प्रतिष्ठापना करण्यात येते.यात शेवटी आपल्या घरातील मयत झालेल्या थोरल्या पुरूषाच्या टाकाचा मान असतोच कुळाप्रमाणे देवदेवतांची प्रतिष्ठापना करण्यात येते. आपल्या कुलदेवते नंतर वास्तव असलेल्या भूप्रदेशातील तसेच नवसाला पावलेल्या किंवा पावणा-या देवदेवतांची मांडणी भगत करतो. त्यानंतर या देवता समोर देवकार्य असलेल्या घरातील पुरूष व सोयरे नारळ वाढवतात. त्यांची संख्या पाच पासून दहापर्यंत असते.''[८६]

या पूजेच्या मांडणीचा जर विचार केला तर आपल्याला असे जाणवते की, हिंदू धर्मात जसा गोंधळ व जागरणं हा विधी केला जातो तशा स्वरूपाची काहीशी मांडणी या जोगणं विधीशी असते.या विधीमध्ये झेंडाला महत्व आहे. या विधीमध्ये झेंडा लावला नसेल तर हा विधी पूर्ण होत नाही झेंडा प्रमाणेच नागिणीचे पानालाही या विधीत खूप महत्व आहे. नागिणीच्या पानावर देवाचे मुखवटे ठेवतात. ज्या दिवशी हा विधी असेल त्याच दिवशी हे पाने आणले जातात. हा विधी पारधी समाजातील सर्व पोटजाती करतात. त्या समाजातील पाच कुळे प्रमुख आहेत. त्यामध्ये भोसले, काळे, चव्हाण, पवार, शिंदे या कुळांमध्ये हा विधी केला जातो. ज्या वेळेस नागिणीच्या पानावर देवतांची मांडणी केली जाते. ती उजवीकडून डावीकडे अशा पध्दतीने केली जाते. सर्व कुळामध्ये प्रथम सूर्यदेवतेची मांडणी प्रथम उजव्या बाजूला करतात. जी कुलदेवी असेल तिची मांडणी सूर्यदेवतेच्या नंतर केली जाते. हे कुळे (पारधी) ज्या गावात राहतात. (ज्या ठिकाणी हा विधी करतात) त्या ठिकाणचे जी स्थानिक दैवते असतात त्यांची ही मांडणी या कुलदैवतेनंतर केली

जाते व नंतर त्यांच्या घरात जो मुळ पुरूष असेल त्याची ही मांडणी या नागिणीच्या पानावर केली जाते. अशाप्रकारे देवाचे पाल मांडल्यानंतर कार्यक्रमाला सुरूवात होते.

- **जोगणं विधी नाटयाचे चलन :-**

जोगणं हा विधी तीन दिवस चालतो सुरूवातीला देवतांची प्रतिष्ठापना झाल्यानंतर पुढील कार्यक्रमाला सुरूवात होते. जेथे देवाचे पाल बांधले असेल त्याच्या उत्तर दिशेला तीन दगडाची चूल पेटवून विस्तवाचा निखारा खापराच्या उखळीत घेतात. त्या निख-यावर कापूर, मुगुळ टाकून देव्हा-यावरील देवतांना उजव्या बाजूने धुपारती करतात. याला पारधी भोग देणे म्हणतात. त्यानंतर पुरूष मंडळी देवदेवतांची नाव घेऊन गव्हाचे पीठ मळतात. प्रत्येक देवाला प्रत्येकी पाच या प्रमाणात नैवेदय करून देवतेला अर्पण करतात. याला ते चवाळी म्हणतात. देवदेवतांना नैवेदय दिल्यानंतर देवासाठी आणलेली जी नवसाची तीन, पाच, सात बकरं असतील ती देवाच्या पालासमोर उभी करतात. देवकार्य असलेल्या घरातील भगत आपल्या मनातील इच्छा देवासमोर बोलून दाखवतो. व बोकडांच्या डोक्यावर, अंगावर पाणी शिंपडतो. ज्या देवाला बोकड वाहिलेले असते, त्या देवाचे नाव घ्यायचे असते. बोकडाने दोन्ही कान फत्कारून आपली मुंढी उजव्या बाजूने फिरून संबंध अंग झाडले तर बोकडा लिहो, गुढी देय्यो म्हणत उजवी गुढी मिळाल्याचा आनंद भक्त टाळया वाजून व्यक्त करतात. आणि त्याच वेळेस देवाने आपले मागणे मान्य केले असे समजण्यात येते बक-याने जोपर्यंत उजव्या बाजुने आपली मुंढी फिरवत नाही तोपर्यंत बकरे कापले जात नाही. या विधीमध्ये जे नैवेदय केले जातात ते सर्व पुरूष व्यक्ति करतात स्त्रीयांना त्या पासून लांब ठेवले जाते. या विधीमध्ये जी बक-यांची संख्या असते. ती त्या व्यक्तीवर अवलंबून असते. एक पासून अकरापर्यंत ही संख्या असते या विधी करण्याची अनेक कारणे आहेत. चोरीत यश मिळवण्यासाठी, कोर्टाचे निकाल आपल्या बाजूने लागावेत म्हणून घरात पुरूष सुख, शांती नांदावी म्हणून, घरात मुलगा किंवा मुलीचा जन्म झाला असेल तर हा विधी केला जातो. जेवढे कारण मोठे असते त्यावर बक-यांची संख्या ठरलेली असते. आपल्या मनात काय इच्छा आहे. ते भगत लोक जाहिररीत्या बोलून दाखवित असल्यामुळे हा विधी रानात ( जंगलात ) होतो.पारधी सोडून अन्य जाती / जमातीतील लोकांना या विधी मध्ये सहभागी करून घेतले जात नाही. मध्यरात्री पारधी लोक या विधीप्रसंगी नृत्य करतात. जो भगत असेल तो या विधीमध्ये आपआपल्या

देवतांना (कुळाप्रमाणे) या विधीला येण्याचे(सहभागी  होण्याचे) आवाहन करतो. या वेळी भगत मंत्रोच्चार करतो. या विधीमध्ये भगत हा महत्वाची भूमिका पार पाडत असतो.'' (मुलाखत- हानम्या काळे, भानगांव, श्रीगोंदा )

आशा प्रकारे हा विधी चालतो.तसेच या विधी संदर्भात किशोर काळे यांनी दिलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे, ''दुस-या दिवशी देवपालाच्या पुढील बाजूस (पूर्वेकडे) गोल मातीच रिंगन करतात. त्यावर पाणी मारतात. रात्री देवासमोर नैवेदय म्हणून ठेवलेल्या चवाळया उचलून मातीच्या रिंगनामध्ये मुडपून ठेवतात. पालाचे पश्चिम बाजूकडील सर्व देवदेवतांचे चांदीचे टाक भगत उचलून उजव्या बाजूने पूर्वीच्या क्रमाने त्यांची प्रतिष्ठापना करतो. देवासमोर बक-यांची दावण असते. बोकडांच्या शिंगांना कणकीचे गोळे बसवून किंवा झाकण बसवून त्यात कापूर जाळतात. त्याला धूपरेखन म्हणतात. नंतर त्यातील अधिक किंमतीचा मोठा बोकड भगत देवासमोर उभा करतो. बोकड ज्या देवाला वाहिलेला आहे. त्या देवाचे नाव घेऊन पुन्हा आपल्या मनातील इच्छा बोलून बोकडाच्या मुंढी व अंगावर पाणी शिंपडतो. बोकडाने एकाच वेळी मुंढी व सर्व अंग झटकले नाही तर देव आपल्या विधीला मान्यता देत नाही. याबद्दल भगत अस्वस्थ होऊ लागतो. बोकडाच्या माध्यमातून देवाने कौल दयावा यासाठी भगत देवाला विनंती करतो. देवकार्यात देवा अलगड आणू नको, मला हरामांच नको, ऊसाच्या पिकांच डाफचं नको, चोरीचं नको, लुटमारीचं नको असं भगत म्हणत असतो. हे देवाचे बोल असल्याने पारधी भाविका समजतात पुन्हा बोकडाच्या अंगावर पाणी शिंपडण्यात येते हा सर्व विधी नवसाच्या बोकडाकडून कौल मिळेपर्यंत करण्यात येतो. एवढयावरही एखादया बोकडयाने कौल दिला नाही तर त्या बोकडाचा बळी देत नाही. ज्या देवाचे नावाने बोकड वाहिला तो देव भगतावर रूष्ट झाला असे समजण्यात येते. पुन्हा पुन्हा चूक मान्य करून कौल घेण्यात येतो. नंतर मोठा बोकड देवासमोर उभा करतात. त्याला पारधी 'बोकड चाचरक लावानो'  असं म्हणतात. नंतर बोकडाच्या कानाचे मानेच्या दिशेने माप घेतात. कान संपतो तेथे रक्तशीर असते. तेथे सुरीने गोल कानळी कापतात. बोटाने दोन शिरा बाहेर ओढून काढतात त्यातील एका शिरेला दोरी बांधतात. एक रक्ताची शीर कापून त्यातील रक्त ओंजळीत घेऊन प्रतिष्ठापना केलेल्या सर्व देवांना रक्ताभिषेक घालतात. सर्व देव रक्तात माखल्यानंतर दुसरी शीर कापतात. प्रथमत:  घरातील देव संचारीत भक्त रक्त पितो, नंतर बाकीचे भक्त रक्त पिऊन

नृत्य करायला लागतात. देवाचा जयजयकार करतात. याचक्रमाने सर्व बक-यांचा बळी दिला जातो. बकरे एकदम गतप्राण होत नसल्यामुळे शेवटी भगत नाकतोंड दाबून त्याचा अंत घडवितात. यावेळी देवदेवता संचारीत नृत्यगान करणा-या भगताचा वैशिष्टयपूर्ण पोषाख असतो. चरनावाचा पारंपारिक पोषाख भगताने परिधान केलेला असतो. या विधीमध्ये मुलं, पुरूष सहभागी होतात. नंतर देवकार्य असलेल्या घरातील माणसं आणि सोयरे सर्व बकरी कापतात, सोलतात. मुंढी, वझिडया, आतडी, कातडी पहिल्या दिवशी खात नाहीत. भगताचे हात सळसळ करतात. पण खाण्याचा अधिकार नाही. पहिला मान देवाचा नंतर दुस-या दिवशी भगतांचा असतो. नंतर बळी दिलेल्या बोकडाचे काळीज व मांस विस्तवावर भाजतात. त्यावर दूध, तूप घालून हा नैवेदय देवदेवतांना अर्पण करण्यात येतो. तसेच बक-याच्या मुंढी, धुंडी ( कंबरा जवळची हाडमांस ), कराई ( बरगडी जवळचा मासल भाग ) देवापुढे ठेवतात मात्र विधीनंतर सोयरे मंडळी जेवत नाहीत. त्यावेळी देवकार्य करणारा भगत ( घरातील देवकार्य करणारा माणूस ) दंड भरतो. पंच ठराव करतात. ही रक्कम पाच कुळयात वाटून घेतल्या जाते. मटनाचे सर्वांना वाटे देण्यात येतात. अन्य घरातील जे पारधी या विधीप्रसंगी भोजन करतात. त्यांना स्वत:च्या देवकार्यात दंड भरावा लागतो. नेमके जेवणाच्या वेळी पारध्यांमधील वाद उपस्थित होतात . वाद मिटले नाही तर पारध्यांमध्ये हाणामारी होते. कोणीतरी कोणाला बाटवतो आणि पुढील संघर्षाला सुरूवात होते. हल्ली हे वाद हळूहळू कमी होऊ लागले आहे.'' (मुलाखत-किशोर काळे, केडगांव, नगर )

एकूणच या विधीचा जर आपण विचार केला तर पारध्यांची देवाविषयी असणारी श्रध्दा यामध्ये आपणास पहायला मिळते. पारधी समाजात किती अंध:श्रध्दा व अज्ञान आहे हे ही आपल्या लक्षात येते. या विधीमध्ये कौल महत्वाचा मानला जातो. तो बोकडाच्या हालचालीवरून गृहीत धरला जातो. भगतामध्ये देवाचा संचार होतो. देव हा भगताच्या रूपाने बोलतो अशी पारध्यांची समजूत असते. बोकडाचे रक्त प्रसाद म्हणून सेवन केले जाते.हे रक्त आधी भगत पितो, नंतर घरात हे देवकार्य आहे त्या घरातील प्रमुख व्यक्ती, घरातील माणसे, सोयरे-धायरे हे सर्वजण पितात. यामध्ये पारधी समाजाचे असलेले अज्ञान आपल्या दृष्टीत येते. पारधी समाज किती अविकसित आहे हे यावरून लक्षात येते. प्रत्येक समाज कोणतेही कार्य, विधी असेल तर सोय-या धाय-यांना जेवू घालण्याची पध्दत आहे. पण पारधी समाजात मात्र या विधीनंतर सोयरे जेवत नाहीत. या विधी प्रसंगी आप आपसातील वाद उफाळून (दारू पिल्यामुळे) मारामा-याही होतात. एकूण पारधी

समाजामध्ये जी व्यसनाधीनता, अंध:श्रध्दा व अज्ञान आहे ती या विधीतूनही आपणास जाणवल्या शिवाय राहत नाही.याचे मुख्य कारण आहे या समाजात असलेला शिक्षणचा अभाव.

देवासमोर ठेवलेली मुंढी, धुंडी व करोईचे वाटे करून सर्व सोयरे, भाऊबंद यांना देण्यात येतात आदल्या दिवशी ज्यांनी जेवण केले त्यांनाच हा प्रसाद मिळतो. नंतर स्वच्छ पाण्याने देव धुण्याचा विधी होतो. या वेळी स्त्री-पुरूष गाणी म्हणतात. तिसरा दिवस हा या विधीचा शेवटचा दिवस असतो. देव स्वच्छ पाण्याने धुतल्यानंतर त्यांच्या नेहमीच्या जागेवर (पेटीत) ठेवण्यात येतात. या विधीसाठी जी साधनसाम्रुगी वापरली असेल (भांडी,कपडे) तिही ठेवून देण्यात येतात. नेहमीच्या व्यवहारात ती वापरली जात नाही. कारण ती देवाची मानण्यात येतात. शेवटच्या दिवशी स्त्री-पुरूष एकत्रित गाणी म्हणत असली तरी या विधीमध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान असते. या विधीपासून स्त्रियांना दूर ठेवले जाते. जोगणं हा विधी पारधी समाजात महत्वाचा असला तरी इरतही काही उपविधी या समाजात आहेत. त्यामध्ये वधावा, झापीलेवान इ. विधींचा यामध्ये समावेश होतो.'' (मुलाखत- मिथून चव्हाण, बुरूडगांवरोड, नगर )

या विधींची सविस्तर माहिती आपणास पुढील प्रमाणे सांगता येईल

### ३.५.४ वधावा ( मुंजविधी ) :-

या विषयी माहिती सांगतांना सनी चव्हाण असे म्हणाले की, ''जोगणं विधी करताना मुंजविधी करण्यात येतो. मुंजविधी विधी जर केला गेला नाही तर जोगणं विधी पूर्ण होत नाही. म्हणजे जोगणं विधी मध्ये मुंजविधीला अनन्यसाधारण महत्व आहे. हा विधी भगत करतो. प्रामुख्याने हा विधी देवाची संम्मती घेण्यासाठी केला जातो.हा विधी करण्याची एक विशिष्ट पध्दत आहे. भगत मुंजाच्या ढिगा-यातील काही मुंजा आपल्या हातात घेतो. हातातील मुंजाच्या जोडया लावून शेवटी एक मुंज तीन वेळा राहिली पाहिजे दोन वेळा शेवटी दोन मुंजाच्या जोड व शेवटी एक मुंज निघने शुभ समजले जाते. देवकार्याला देवदेवतांची सम्मती समजण्यात येते. या मुंज विधीमध्ये शुभ संकेत जर मिळाले नाही तर या विधीला देवाची संमती नाही असे पारधी समाज समजतो. पारधी समाजाची या मुंजविधी विषयी असीम अशा प्रकारची श्रध्दा असल्यामुळे जो पर्यंत शुभ संकेत मिळत नाही. तोपर्यंत हा विधी पुंन्हा पुंन्हा केला जातो. पारधी समाजाच्या वेगवेगळया कुळानुसार (जे प्रमुख पाच कुळे मानली जातात) या मुंजविधीची संख्या बदलत असते. पण प्रत्येक

कुळामध्ये हा विधी तेवढयाच श्रध्देने केला जातो. पारधी समाजातील सर्व कुळांमध्ये या विधीला अनन्य साधारण असे महत्व आहे.''(मुलाखत-सनी चव्हाण, बुरूडगांवरोड, नगर )
आशा प्रकारे हा विधी पार पाडला जातो.

**३.५.५ झापीलेवान विधी :-** (उकळत्या तेलातून पु-या काढणे होय)

झापीलेवान विधी म्हणजे उकळत्या तेलातून पु-या काढणे होय. हा विधी पारधी समाजातील एखादया व्यक्तीने किंवा स्त्री-पुरूषाने जर गुन्हा केला असेल किंवा याच समाजातील एखादया व्यक्तीने आरोप केले तर आपले निष्कंलक सिध्द करण्यासाठी केला जातो. पुढे ती व्यक्ती जर दोषी ठरली तर पंच सांगतील तो दंड भरून त्याला पारधी समाजात सामावून घेतले जाते. पारधी समाजातील स्त्री-पुरूषांचा जातीतील अगर परजातीतील स्त्री अगर पुरूषांशी अनैतिक संबंध, चोरी बाबत दुस-याची कागाळी करणे, व्यवहारात बिघाड आणणे, देज ( हुंडा ) चुकता केला नसेल तर उकळत्या तेलातून पु-या काढण्याच्या विधीला स्त्री-पुरूषाला सामोरे जावे लागते' हा विधी करताना पारधी समाजातील लोकांमध्ये एक श्रध्देची भावना असते. या समाजातील व्यक्ती समाजातील सर्व लोकांबरोबर खोटे बोलेल पण देवाशी मात्र खोटे बोलणार नाही. अशी त्यांची श्रध्दा असते. जी व्यक्ती निरपराध असते, ज्या व्यक्तीने कोणताही गुन्हा केला नसेल, तीच व्यक्ती हा विधी करण्यासाठी तयार होते. अन्यथा ती गुन्हा कबूल करते. कधी-कधी पारधी समाजातील व्यक्ती ही नाईलाज म्हणून एखादे कृत्य तिच्या हातून होते आणि तिला या विधीला सामोरे जावे लागते. या विषयाचा अभ्यास करत असतांना मी जेव्हा क्षेत्रीय संशोधन करीत होतो तेव्हा मिथून चव्हाण, भोसले आखाडा नगर यांनी पुढील प्रसंग सांगितला, ''एका कुटूंबातील नवरा- बायकोला पोलिसांनी एका गुन्हयात अटक केली. त्यांची एक चौदा वर्षाची मुलगी त्या घरात असते. आई-वडिलांना अटक झाल्यामुळे पारधी समाजातील व्यक्ती तसेच इतर समाजातील व्यक्ती त्या मुलीकडे वेगळया नजरेने पाहतात. मी तुझ्या आई-वडिलांना सोडून आणतो तू माझ्याशी लग्न कर असा प्रस्ताव ठेवला जातो. पण प्रत्यक्षात शारीरिक संबंध ठेवण्यासाठी असे खोटे सांगितले जाते. नंतर लग्नाला नकार दिला जातो. ज्यावेळेस ही गोष्ट जातपंचायत मध्ये जाते, त्यावेळेस हा विधी केला जातो. कधी-कधी विनाकारण मुलीला बदनाम करण्यासाठी सुध्दा असे कट रचले जातात. हा विधी मुलीची सत्वपरीक्षा ठरते. एकूण या विधीला पारधी समाजात खूप महत्त्व आहे. अशा

पध्दतीने या जमातीत वेगवेगळे विधी व सोपस्कर आढळून येतात". (मुलाखत-मिथून चव्हाण, बुरूडगांवरोड, नगर)

### ३.६ पारधी समाजाची जातपंचायत:-

भारतीय समाजात ज्या विविध जमाती आहेत त्यात स्वतंत्रपणे त्यांची जात पंचायत आढळते जिच्या माध्यमातून संपूर्ण जमातीची न्यायव्यवस्था व नियंत्रणाचे कार्य पार पाडले जाते, या सर्वच जमातीची स्वंतत्र जात पंचायत पहावयास मिळते व प्रत्येक जात पंचायतीचे नियम हे देखील भिन्न आहेत.पारध्यांच्या जीवनात परंपरा, रूढी, समजूती, धर्मश्रध्दा, कुलाचार यांना अतिशय महत्त्व असल्याचे दिसते.व या सर्व रूढी परंपरांचा सबंध हा या जमातीच्या रोजच्या जगण्यात आहे.देवदेवता,विधी, उत्सव यांना या जमातीत जे स्थान आहे तसेच स्थान व तितकेच महत्व जातपंचायतीला देखील या समाजात दिसून येते.जातपंचायत हे त्यांचे दैवी अधिष्ठान असलेले पारंपारिक पवित्र असे न्यायालयच मानले जाते. या संदर्भात रामनाथ चव्हाण असे म्हणतात की, "जात पंचायत हे पारध्यांचे पारंपारिक न्यायालय आहे. जात पंचायतीचा प्रमुख एक पाटील आणि इतर अकरा पंच मिळून बारा व्यक्ती न्यायनिवाडयाचे काम पहातात. स्थानिक जात पंचायतीत एखादे भांडण मनाप्रमाणे सुटले नाही तर वादी प्रतीवादीस वरच्या पंचायतीत जाता येते. त्याला ते वरच्या कोर्टात अपिल करणे असे म्हणतात. गुन्हेगारी जमाती हा ठपका असल्याने जवळ जवळ प्रत्येक पारध्याला पोलीस, न्यायालय आणि तुरूंग यांचा संपर्क दुदैवाने असल्याने ते रूढ न्यायालयाच्या कारवाईतील विशिष्ट शब्द उच्चारतात. उदा. खटला, नोटीस, फिर्याद, रिमांड , अपील, अरोपी, पिनल कोड, डिसमीस, साक्षीपुरावे वगैरे वगैर इतकेच नव्हे तर रूढ न्यायालयात ज्याप्रमाणे विशिष्ट कलमांचा उच्चार करून खटला दाखल केला जातो. तसेच अमुक तमुक कलमाखाली अशी भाषा ते जात पंचायतीत ते बोलतात. खून केला तर ते सरळ ३०२ चा झगडा म्हणतात. त्याचप्रमाणे रूढ न्यायालयात ज्या प्रमाणे प्रत्येक गुन्हा दाखल करतांना कलमांचा संदर्भ दिला जातो. त्याच प्रमाणे पंचायतीत कायदयांच्या कलमांचा आधार घेत चर्चा केली जाते.पण न्यायालयातील कायदयाप्रमाणे ती शिक्षा नसते. निर्णय मान्य नसेल तर त्यांच्या पारंपारिक रूढीप्रमाणे वरच्या जात पंचायतीत दाद मागता येते."[८७] प्रा.रामनाथ चव्हाण यांनी पारधी जमातीच्या जात पंचायतीचा जो अभ्यास केला आहे त्यावरून असे दिसते की, पारधी ही जमात

१८७१ च्या कायदयाने गुन्हेगार जमात म्हणून घोषित केली होती नंतर त्यांना विमुक्त म्हणून देखील घोषीत केले याची तपशीलवार माहिती दिलेली आहे. कारण ते गुन्हेगार जमातीतील असल्याकारणाने पोलिसांचा संशय हा प्रथम त्यांच्यावर असतो.पोलिसांनी पकडून नेल्यानंतर बाकीचे नातेवाईक जामीन मिळविण्यासाठी व संबंधित व्यक्तीची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नशील असतात.या दरम्यान या लोकांचा सतत संपर्क हा पोलीस, वकील व कोर्ट यांच्याशी येतो. यामुळे या समाजात कायदे विषयक जागृती ही मोठया प्रमाणावर झालेली आहे. पोलस, वकील व न्यायालय हा ससेमीरा या जमातीच्या पाचीला पुजला आहे व त्यातून त्यांचा कळत नकळतपने कायदयातील कलमांचा अभ्यास झालेला दिसतो म्हणून यांच्या जमातीच्या जात पंचायतीच्या न्यायनिवाडयात कायदे विषयक शब्द येतांना दिसतात. या संदर्भात काही वर्षांपूर्वी 'तुरूंगदेश हा फासे पारध्यांचा' असा मराठी चित्रपटी येऊन गेला आहे. यातून एकच सिध्द होते की तुरूंगात जाणे हे पारधी जमातीतील व्यक्तींना काही नवीन नाही. त्यातूनच त्यांना कायदयातील विविध कलमे, कायदे विषयक भाषेची माहिती या लोकांना झालेली आहे. व त्यातूनच ते जातपंचायतीत देखील या शब्दांचा वापर करतांना दिसतात.

### ३.६.१ पारधी जमातीच्या जातपंचायतीचा इतिहासः-

भारतीय समाज व्यवस्थेत आढळणाऱ्या भटक्या आणि विमुक्त जमातींमध्ये जातपंचायती मार्फत न्यायनिवाडयाचे कार्य चालते. भटक्या व विमुक्तांमध्ये जितक्या जाती/जमातींचा समावेश होतो. तितक्या जाती जमातीत म्हणजे प्रत्येक जमातीची स्वतंत्र अशी जात पंचायत असते. भटक्या विमुक्त जमातींपैकी आढळणारी पारधी या जमातीला देखील स्वतंत्र अशी जात पंचायत आहे.सदर संशोधन हे पारधी जमातीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास असे असल्याने पारध्यांमधील जातपंचायतीचा येथे उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. परंतु या समाजात जातपंचायतीचे अस्तित्व केव्हापासून आहे व ती कशी अस्तित्वात आली याचा उल्लेख करणे ही महत्वाचे आहे. प्रस्तुत संशोधन करताना क्षेत्रीय अध्ययनात ज्या काही मुलाखती घेतल्या त्या मुलाखतीत पारधी जमातीच्या जातपंचायतीचा इतिहास जाणून घेताना या समाजातील कार्यकर्ता व लेखक नामदेव ज्ञानदेव भोसले यांनी मराशी या लेखनातील माहीती महत्त्वपूर्ण वाटली या समाजाच्या जात पंचायतीच्या इतिहासाबद्दल लिहतांना ते असे म्हणतात की, ''पुणे जिल्हयातील इंदापूर, बारामती, परगणा शिवकालापासून पूर्वेकडील महत्त्वाचे ठाणे. कधीकाळी ज्वारीचे कोठार होते. भिमानदीच्या

किनाऱ्यावर  अनेक लहान-मोठी खेडी वसली शिवाय काटेरी वणांनी भरपूर हरणे, तितर, पारवा या पशुपक्ष्यांची रेलचेल, याच परिसरातील भिगवण जवळील पारवडी गाव इथल्या काटेरी वनांनी शिकारीसाठी आदिवासी जमातीतला पारधी तांडा नेहमी हरणांच्या कळपामागे मोर, तितर, पारव्याच्या शिकारीसाठी फिरत होता. एका तांडयामध्ये चारशेएक कुटूंब असत.इंग्रज कालखंडापासून (साधारण१९३०च्या दरम्यान) पारधी कडा, काष्टी, तांदळी ते भिगवण, पारवडी परिसरापर्यंत शिकार करून खात आणि शिकारी वरून येताना ज्वारी, बाजरी, हरबरा, गहू, तुरीची पोटापुरती चोरीही करत. खांद्यावरील झोळीत मावेल इतकेच धान्य खुडून आणीत असा हा दिनक्रम नित्याने चालू होता. परंतु इंग्रजांच्या निष्ठुर राजवटीत साधा गावाचा बाजारही करता येईना. तेव्हा पारधी जमातीच्या तत्कालीन प्रमुखाने एक दिवस पारवडी गावी जमा व्हावे असा चारी गावात निरोप धाडला. नदीपलीकडे, नदीअलीकडेही निरोप देऊन आले. पारवडी गावातील माळावर एक बुजुर्ग झाडाच्या बुंध्यांशी प्रमुख दाढी, केस वाढलेला कापऱ्या आवाजातला म्हातारा, घटु काळे न्यायनिवाडा करण्यासाठी न्यायाधीशाच्या भूमिकेत बसला होता. तस पारध्यांना गाव नव्हतं. पारवडी गावच्या वेशीबाहेर लांब माळरानावर अनेक पारधी स्त्री-पुरूष गायीवरून उतरून पारधी राजाला लऊन मान देत होते. चारी मुलखातील पारधी गायीवरून आले होते.

न्यायाच्या कामात पारधी पंचायत ही प्राचीन गणराज्यासारखी वाटत होती. जातीचे प्रमुख त्याच्या उजव्या बाजूने पाच प्रमुख जमातीचे पंच तर डाव्या बाजूला स्त्रीयाही मांडीला मांडी लावून बसल्या होत्या. काळे कुळीचा पारध्यांचा गट प्रमुख घटु काळे त्याचा उत्तराधिकरी सदा काळे हा तरूण तर बारामतीचा गिरनवाला काळे हे तरूण काळेचे पंच होते.भोसले कुळीचे जयशा गेना, भोसले प्रमुख पंचापैकी जयशा गेनाला मान होता. शिंदे कुळीतून मिया शिंदे, चव्हाण कुळीतून तखलेदारअशा तरूण पंचात घटु काळे बसला होता. पाच कुळींचे पाच पंच आवर्जुन आले. प्रत्येक कुटूंबप्रमुख हे या सभेचे सभासद असायचे.

तीन चारशे पारधी जोडपी मुलाबाळांसह त्या गोताबळयाचा कालवा चालला असतांना म्हातारा पारधी राजा उठला. (हे तांदु हो, आला जरा मारी वात खमजो ), हे आप्तजन हो माझे ऐका. सर्व शांत होताच, तो पुढे बोलु लागला, ‘आज आपल्याला मला महत्वाच्या चार गोष्टी सांगायच्यात ते शांत ऐका ‘.इकडे मुले गोंधळ घालीत रडत ओरडत होती. पण घटु या आवाज चढा झाला. ‘मेवाळा हो दोन चार निवाडे हायत, माझ्या ठिकाणी नवा धनी माझ्या ठायी बसवा

'.सगळा पारधी चमकून उठला,' कारण आजपर्यंत गटप्रमुख जिवंत असेपर्यंत तोच पारध्यांचा नेता असायचा',नाही, नाही बा तुच मरेपर्यंत हामचा राजा, कोन्हाचा इच्चारचं करू शकत न्हाय,' जयशा भोसले विनवणी करू लागला. कारण घटु काळे हा महाराष्ट्रातील पारध्यांचा आवडता नेता होता. त्याच्याकडून आजपर्यंत कोणावर अन्याय झाला नव्हता. लोक त्याच्या नेतृत्वावर सदा खुश राहात. नाही, होय करता करता निर्णय ठरला. परंपरेनुसार घटुचा थोरला मुलगा, सदु काळे हा ही बापामागे राहून नाव कमावलेला तरूण त्यालाच जातीचा प्रमुख. मराठीत त्याला पाटीलकी दिली. पदवी देऊन घटु नंतर सदु काळेला प्रमुख पदाची धुरा सोपवली. जात पंचायतीच्या नियमानुसार त्याने आपल्या दुगाव या देवीची शपत घेतली. तिथून पुढे हा पारधी राजा नेता म्हणून राहीला. घटु काळेचा मान ठेऊन, पारधी पाच पंचानी सदू काळेला नेता निवडले. शपथविधी झाल्यावर तरवडयाच्या फांद्यासह तोडलेल्या फुलांचा हार घातला. म्हताऱ्या गण प्रमुखाच्या अंगात त्याची देवी आली. तो जिथेच देवी पुढे हुम, हुमरी हुगाव म्हणून घुमू लागला. त्याने हुगाव या प्राचीन देवीला तिथेच गुडया लावल्या. आपल्या नव्या राजाच्या सुखासाठी उजव्या घुडया बसल्या. पारध्यांनी हातात हात देऊन हसून खुशी जाहीर केली.

नव्या पारधी राजाने दुगाव देवीला साक्षी ठेऊन त्याचे नवे विचार समाजासमोर मांडले. 'मित्र हो, आजवर आपून हरिण, तितर, पारवा धरून पोटं भरत हुतो, पण पोट भागना, गडया हो (पारधी भाषेत वाघरी हो) इथून पुढं कुणीच ज्वारी, बाजरीची कणसं खुडायची न्हायती, की धान्य चोरायच न्हायं, कारण या पोटाच्या चोरीपाई आपली विसीक माणसं गाओ गावीच्या (म्हाडकावय) लोकांनी जिवं मारली, 'पंचासह सगळेच' हे खरं हाय, सदुचं म्हणून पंचांना (म्हाडकावये) म्हणतात, (न्याव्या हो, हामक्या मारू खमजो, चोरी न करता शिकारच करीन खाईन गामोगाम ज्वास्नी राखलं करीन, खाओ नही, किमला बा, हो खाचू छं राजा') वडीलांना सदूने विचारले, 'पाच पंच न्यायी निवाडा करणाऱ्या हो हा माझा नवा न्याव्य (पाटील) असा जाहीर करतो. इथुन पुढं गावोगावी ज्याला जे योग्य त्या गावी जाऊन ज्वारीची राखण करणारा राखणदार म्हणून राहू, शेतकऱ्यांकडून मागून खाऊ, मंजूर, मंजूर.''[८८] आशा प्रकारे सदू काळेंच्या मुळं गोऱ्या इंग्रजांची कारवाई टाळली जाईल. आपल्याही जातीला लोक जतन करतील. आपल्या मुलाबाळांची पोटं भरतील' असा तो १९३५ चा सदू काळेचा निवाडा प. महाराष्ट्रात गाजला होता. लोक चोऱ्या

करायचे सोडून भले भिकारी झाले. पण पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, उस्मानाबाद पर्यंत पारधी जमातीचेच लोक गावोगाव राखणदार म्हणून राहू लागले. बारा बलुत्यांनंतर हा तेरावा बलुतदार म्हणून देखील शेतकऱ्याने स्विकारला अशी पारध्यांची जात पंचायत न्यायांन काम करीत होती. वेळ पडली तर निर्णय स्विकारला जात. अयोग्य विरोधी पार्टीला न्याय दिला गेला तर राजा न्यायी नाही म्हणून त्याला पदच्यूत केला जाई. तांडा फुटून नवा तांडा निर्माण होत. म्हणून पाच पंच न्यायी असणे, त्यांचा राजा त्यांच्या पेक्षा न्यायी असणे गरजेचे असते. अशी जातपंचायत पारदर्शक होती. म्हणूनच पारध्यांचा तंटा काही प्रस्थापित गावांच्या पारावर निवडलेला इतिहास नाही. हजारो वर्षे याच पंरपरागत संस्कृतीने पारधी जमात चालत आली.

### ३.६.२ जातपंचायतीचे उद्देश :-

१.पारधी जमातीमध्ये व्यवहारातून परस्परांमध्ये होणारा टोकाचा संघर्ष टळावेत.

२.पारधी जमातीतील स्त्री-पुरूषांनी जाती रिवाजाप्रमाणे वागावे, जातीचे म्हणून असलेले कुळाचार पाळावेत, त्याला बाधा येऊ नये.

३.पारधी जमातीतील एकाच कुळात लग्न संबंध होऊ नयेत. तसेच स्त्री-पुरूषांनी जातीबाहय स्त्री-पुरूषांशी संबंध ठेऊ नयेत.

४.विवाह करू नये किंवा जातीमध्ये  अनैतिक वर्तन करू नये, यासाठी समाजावर नियंत्रण हवे असते. कायदयापेक्षा संस्कार रूपात धर्म, कल्पना व पारंपारिक रूढी समजूती हे काम अधिक परिणामकारकतेने करतात यावर त्यांची श्रध्दा आहे.

पारधी जमातीमध्ये आजही या परंपरा दैवी आज्ञा म्हणून पाळण्यात येतात. जातपंचायतीत मिळणारा न्याय हा पंचमुखातून झालेली देवाची आज्ञा समजण्यात येत  असल्यामुळे जात पंचायतीला पारध्यात खूपच महत्व आहे. पारधी जमातीचे स्वातंत्र्य आणि समाजव्यवस्था आबादित ठेवण्यासाठी पारधी जमातीत जे जे प्रश्न वाद निर्माण होतात त्यावर जातीतील पंचानी निर्णय करायचा आणि तो समाजाने मान्य करायचा. अशा उद्देशानेच पारध्यांची जात पंचायत कार्यरत असते.

थोडक्यात पारधी जमातीचे नियमन करण्यासाठी व जमातीचे निराळेपण आबादीत ठेवण्यासाठी जातपंचायतीचे कार्य चालते.

### ३.६.३ जात पंचायतीचे ठिकाण :-

जात पंचायतीच्या ठिकाणा बददल माहीती सांगतांना प्रा. बाळासाहेब बळे असे म्हणतात की ''पारधी जमातीत पंचायत बसे त्या जागेला अत्यंत महत्व असते. देवतेची प्रतिष्ठापणा करून त्या जागेला देवी अधिष्ठान प्राप्त करून दिल्यामुळे पंचमुखातून परमेश्वर बोलतो अशी पारध्यांची धारणा असते. पंचाचा न्याय हा परमेश्वराचा न्याय समजून पारधी जमातीतील लोक न्याय मान्य करत असल्याने गतीशील जीवनात ही पारध्यांची जातपंचायत आजही क्षीण झालेली नाही. त्यामुळे भांडणतंटा, चोरीमारी, अनैतिक संबंध, विवाह किंवा देवकार्य,या मध्ये जातपंचायतीचा विशेषत्वाने प्रभाव जाणवतो. देवकार्यातही काही प्रश्न निर्माण झाला तर जात पंचायत भरवून तात्काळ निर्णय घेण्यात येतो. जातपंचायतीचे ठिकाण हे जातपंचायतीचे पंच, पाटील जे मुख्य सुत्रधार आहेत ते ठरवितात. जातीच्या सर्व सदस्यांना निरोप पाठविला जातो. आधुनिक काळात फोनचा (मोबाईल) देखील वापर केला जातो.सर्वांना सहज प्रवास करून येता येईल असे व गावकुसाबाहेरील ठिकाण निवडले जाते. तसेच जात पंचायत बोलावण्यासाठी एखादी यात्रा किंवा उत्सव हे देखील महत्वपूर्ण मानले जाते. यात्रा निमित्ताने सर्व जमात बांधव एकाच ठिकाणी सापडले जाऊ शकतात. तेव्हा यात्रा व जत्राचे औचित्य साधून जातपंचायत भरविली जाते.जसे अहमदनगर येथील पारधी जमातीची जातपंचायत ही मढी या ठिकाणी भरते.''[८९] आशा प्रकारे जातपंचायतीच्या ठिकाणा बददल माहीती मिळते. साधारणत: जातपंचायत ही वर्षातून एकदाच भरते परंतू गरजे नूसार गावकुसाबाहेरील ठिकाण निवडून जातपंचायत भरवली जाते.

### ३.६.४ जातपंचायतीचे पाटील :-

पारधी जमातीच्या जातपंचायतीत पाटलाला अतिशय महत्व आहे.या समाज्याच्या जातपंचायती  असे लिहले जाते की,''जातपंचायतीचा एक पाटील व अकरा पंच मिळून जात पंचायतीमध्ये न्यायनिवाडयाचे काम करतात. काही जातपंचायतीमध्ये पाटील (न्यायाधीश) व पाच पंच अशा सहा व्यक्ती न्यायनिवाडयाचे काम करू शकतात. पारधी जमातीत आर्थिकदृष्टया सुधारलेल्या व्यवहारात निपून समजल्या जाणा-या प्रतिष्ठित व्यक्तींची पंच म्हणून निवड करण्यात येते. काही ठिकाणी पंचाचा हा मान वंश परंपरागत चालत आलेला असतो. आपल्या  बापदादांनी समाजामध्ये एकोपा नांदावा यासाठी जे समर्पण दिले याचा पंच असलेल्या त्याच्या मुलाला रास्त अभिमान असल्यामुळे तेही पंचाचे नियम कठोरपणे आमलात आणत असतात. पंचानी न्याय

भूमिका घेतली नाही तर या पदावरून पंचाला कमी करून केलेल्या अन्यायाबद्दल त्याला जात पंचायतीत शिक्षा ठोठावण्याची तरतूद जातपंचायतीमध्ये असते. असे पूर्वी पंच असलेले श्रीगोंदा तालुक्यातील (रहिवश्या काळे, मोहबत्या भोसले, गेंदा काळे ) हरिदास भोसले, आसाराम काळे यांनी सांगितले."[१०]स्थानिक पंचायती मध्ये एखादा झगडा मनाप्रमाणे सुटला नाही तर वादी-प्रतीवादीस वरच्या पंचायतीत जाता येते. त्याला ते वरच्या कोर्टात अपिल करणे असे म्हणतात. पश्चिम महाराष्ट्रातील पारधी जमातीचे सेशन कोर्ट (जातपंचायत ) बारामती येथे तर हायकोर्ट पुणे येथे व सुप्रिम कोर्ट अहमदनगर येथे समजण्यात येते. अहमदनगर येथे झपकर रामनाथ चव्हाण न्यायाधीश वकील म्हणून काम पहात असत. त्याच्या दिर्घकालीन आजारामुळे त्यांच्या नंतर अरूण बेट चव्हाण न्यायाधीश वकील म्हणून काम पहातात. पाटीलकी काळे, भोसले यांच्याकडे आहे. जातपंचायतीतील न्यायाधीश आणि पंच यांना आपल्यावरती कसलीही अलगड येणार नाही याची दक्षता घेऊन न्याय दयावा लागतो.

### ३.६.५ जात पंचायतीचे प्रत्यक्ष कामकाज :-

पारध्यांनी एखादया ठिकाणी दरोडा घातला आणि यातील काही लोक पकडले गेले तर पकडलेल्या पारध्यांना कोर्टकचेरी कामासाठी होणारा खर्च पळून जाण्यात जे यशस्वी झाले त्यांनी करावयाचा असतो किंवा एखादया पारध्याने चोरी केली व त्याच्याऐवजी दुस-या पारध्याला तुरूंगात डांबले तर खरी चोरी करणा-याने तुरूंगात डांबलेल्या पारध्याला कोर्टकचेरी कामासाठी येणारा खर्च करावयाचा असतो. हा नियम पारध्यांनी पाळला नाहीतर वाद जातपंचायती पर्यंत जातो. अशी माहीती सर्वेक्षणा दरम्यान मिळाला.

जातपंचायत हे पारध्यांचे पारंपारिक न्यायालय आहे या न्यायालयाचे कामकाज पारध्यांचे सुप्रिम कोर्ट समजल्या जाणा-या अहमदनगरच्या न्यायालयात कसे चालते, याची माहिती किशोर काळे ( एम.ए.द्वितीय वर्ष मराठी विभाग अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर ) यांनी पुढीलप्रमाणे दिला, फिर्यादी प्रथम आपली तक्रार पाटलाकडे करतो व तक्रार निवारण्यासाठी जातपंचायत बोलविण्याची विनंती करतो. एकच गुन्हा अनेक व्यक्तींनी मिळून केलेले असेल तर हे सर्व व्यक्ती मिळून एकच फिर्याद करतात. पंचायतीचे पाटील त्यांच्या फिर्यादीची दखल घेत पंचायत कोठे भरणार, याची माहिती फिर्यादी, आरोपी आणि पारधी जमातीतील लोकांना देतो. पंचायतीची निश्चित केलेली तारीखही पारध्यांना गुप्त पध्दतीने कळविण्यात येते. फिर्यादी आप-

आपल्या पंचासहीत जात पंचायतीला हजर राहतो. जेथे पंचायत बसणार ती जागा साफ करण्यात येते. या जागी पश्चिम बाजूला एक दगड ठेऊन त्याला गुलाल लावतात. उदबत्ती लावून नारळ फोडतात. नंतर या दगडाला गुलाल लावून देव मानलेल्या देवासमोर वकील (न्यायाधीश) पंच बसतात. त्यांच्यापुढे एका बाजूला फिर्यादीचे लोक व दुस-या बाजूला आरोपीचे लोक बसतात. त्यानंतर महिला बसतात. पण आपला पुरूषांना स्पर्श होणार नाही एवढे अंतर राखून महिला पूर्व दिशेला बसतात. स्त्रीया पश्चिम बाजूस बसत नाहीत. पंचायतीत सर्व बसल्यानंतर पंच फिर्यादी व आरोपी यांना समोर बसण्यास सांगतात. पंच लिंबाचा एक ढगळा आणतात व लिंबाचा पाला दोघांनाही तोंडात धरावयास लावतात. (लिंबाचा पाला यासाठी तोंडात धरतात की चंद्र, सूर्यावर लिंबाचे झाड आहे.सूर्य पारध्यांचा देव किंवा अग्रदेवता आहे.लिंबाचा पाला देवाचे प्रतिक समजण्यात येते याचाच अर्थ आम्ही देवाच्या साक्षीने बोलत आहोत असे सूचित होते.) यानंतर जेवढे फिर्यादी असतील,आरोपी असतील ते प्रत्येकी १२०० ते १५०० रूपये याप्रमाणे पंचाकडे रक्कम जमा करतात.नंतर पंचाकडून फिर्यादीला विचारतात तुमचे किती रूपये झाले. फिर्यादी सांगतो दोन लाख खर्च झाले.पंच आरोपींना विचारतात तुम्ही डाका घातला का ? तुम्ही किती जण चोरी करायला गेले होते ? चोरीत किती माल मिळाला ? आरोपीने चोरी केली नाही असे सांगितले आणि त्याच्यातीलच एक फुटला आणि त्याने पंचाना खरे सांगितले तर त्याला दंडामध्ये माफी देण्यात येते.(तो माफीचा साक्षीदार होतो) इथेच गुन्हा केला हे सिध्द होते. मग सर्व पंचासमक्ष न्यायाधीश चोरीतील मालाची रक्कम ठरवितात त्यात खर्चाची व दंडाची रक्कम जमा करून आरोपींना प्रत्येकी किती बायका आहेत याची चौकशी करून बायकांप्रमाणे रक्कम वसूल करतात. हयात न्यायाधीश पंच यांचाही हिस्सा ठरलेला असतो. त्यावेळी आरोपींकडे असणारी रक्कम पंचाकडून फिर्यादीला देण्यात येते. राहिलेली रक्कम कधी देणार ते स्टँप पेपरवर लिहून घेण्यात येते.''. (मुलाखत - किशोर काळे, केडगांव, नगर )

तसेच जात पंचायतीचे प्रत्यक्ष कामकाजा बाबत माहीती सांगतांना अरुण चव्हाण यांनी अशी माहीती दिली का ''आरोपींनी गुन्हा कबूल केला तर इथेच सर्वासमक्ष पंच गुन्हा कबूल आहे की नाही याबाबत पंचायतीतील लोकांची संमती घेण्यात येते. समाजही संमती देतो. आणि हा खटला निकाली काढण्यात येतो. माल आरोपींनी गुन्हा कबूल केला नाही तर आरोपी व फिर्यादीने मोठया रक्कमा देऊन बोलावलेले पंच युक्तीवाद करतात. फिर्यादीचे पंच आरोपींनी गुन्हा कसा

केला, आमच्या अशिलावर अन्याय कसा झाला हे सांगतात. तर आरोपीचे वकील आमच्या अशिलाने गुन्हाच केला नाही. दंड देण्याचा प्रश्नच नाही. असा युक्तीवाद करतात. त्यावेळी झडणा-या या चर्चेतून न्यायाधीशापुढे काही सत्य येते. न्यायाधीश आरोपीला विचारतात. एवढयावरही गुन्हा कबूल केला नाही तर न्यायाधीश उकळत्या पाण्यात लिंबाचा पाला टाकून या पाण्यातील पैसा आरोपीला काढावयास सांगतात. किंवा हातावर सात पिंपळाची पाने गुंडाळून हातावर तापलेली कु-हाड देऊन पाच पावले चालायला लावून किंवा उकळत्या तेलातून पैसा काढण्याचे दिव्य करायला लावतात. भितीपोटी एखादा गुन्हा कबूल करतो. कबूल नाही झाला तर दिव्य करावेच लागते. हात भाजला तर त्याने गुन्हा केला. हात भाजला नाहीतर आरोपी निर्दोष समजण्यात येतात. जर आरोपी दोषी निघाला तर पूर्वीची रक्कम अधिक पंचाची फसवणूक केली म्हणून पंच सूचवितील तो दंड आरोपींना दयावा लागतो."(मुलाखत-अरुण चव्हाण, बुरूडगांवरोड, अ.नगर )

तसेच लष्क-या भोसले एका मुलाखतीत असे सांगतात की, दंड गुन्हयाच्या स्वरूपावर ठरविण्यात येतो. दहा हजार , पंचवीस हजार, तर कधी-कधी एकावन्न हजारापर्यंत दंड आकारण्यात येतो. या दंडात पंचाचा वाटा नसतो. फिर्यादीची ती कमाई समजण्यात येते. असे असले तरी त्यातील बरीच रक्कम फिर्यादी पंचांना देतात. आरोपीकडे तात्काळ एवढी रक्कम नसेल तर बाँड करण्यात येतात. मुदतीत आरोपीने पैसे दिले नाही तर फिर्यादराची बायको आरोपीच्या अंगावर गाय, बैल, कुत्रे यांचे मांस टाकते.त्याच्या अंगावर मूत टाकते. त्यामुळे कुटूंब बाटते. जातीतील लोक त्यांच्याशी कसलाच व्यवहार करत नाहीत. पुन्हा हा वाद पंचामध्ये येतो. पंच चौकशी करतात. दंडाची रक्कम का दिली नाही याची विचारणा करतात. आरोपीने पैसे नाही म्हटले तर त्याला बायको गहाण टाकून रक्कम दयावी लागते. त्याला बायको नसेल तर तर पंच त्याच्या मुलीचा लिलाव करतात (हया लिलावात कितीही वयस्क पुरूष बोली लावून मुलीला बायको म्हणून वागवू शकतो) मुलीच्या लिलावातून आलेली रक्कम फिर्यादीला देऊन बाटलेल्या पारधी कुटूंबाला दंड करून पुन्हा जातीत घेण्यासाठी जव्हारणं विधी करावा लागतो. तेथेही दंड देऊन पाच कुळयांचे पारधी जेवल्या नंतर तो जातीत आला असे समजून पारधी त्यांच्याशी रोटीबेटी व्यवहार करतात.'' (मुलाखत-लष्क-या भोसले, निमगांववाघा, नगर )

असे पारध्यांच्या जातपंचायतीचे कार्य पिढयानं पिढया चालत आले असून त्यात बदल होण्यासाठी पंचायतीच्या दृष्ट चक्रातून बाहेर पडण्यासाठी पारधी समाजातील युवक कार्यकर्ते यांनी पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली असल्याने अहमदनगर येथील वंश पंरपरेने न्याय देण्याचे काम करणारे पारधी समाजाचे वकील अरूण बेट चव्हाण यांनी असे मत व्यक्त केले.

### ३.६.६ पारधी जातपंचायतीतील न्याय निवाडा :-

पारधी जमातीत न्यायनिवाडा हा जमातीमध्येच केला जातो. जमातीच्या बाहेर म्हणजे पोलीस स्टेशन किंवा शासकीय न्यायालयात वाद नेण्यास बंदी असते.पारध्यांनी पारध्यांचा खून केला तरी त्याचा न्यायनिवाडा हा जातपंचायतीतच होतो. जात पंचायतीत आलेला वाद आणि त्याबाबत पंचानी दिलेला न्याय आरोपी आणि फिर्यादी यांना मान्य करावाच लागतो. पंचानी दिलेला न्याय मान्य नसेल तर वरिष्ठ जात पंचायतीत अपील करता येते. पण जातपंचायतीचा न्याय मान्य करावा लागतो. नाहीतर जाती बहिष्कृत केले जाते. किंवा दोषी कुटूंबातील पूर्वजांची हाड उकरून काढली जातात. ही फासे पारध्यांत सर्वात मोठी शिक्षा समजण्यात येते. तेव्हा पारधी लोक पंचायतीने दिलेला न्याय अमान्य करत नाहीत. अशी न्याय निवाडया बददलचीमाहीती क्षेत्रीय सर्वेक्षणा दरम्यान मिळली.

### ३.६.७ जातपंचायतीत दंड व शिक्षा :-

पारधी समाजात ज्या व्यक्ती दोषी आहेत त्यांना त्यांच्या जातपंचायतीत दंडाची शिक्षा किंवा कधी कधी दंड व शिक्षा दोन्ही एकाच वेळी फरमावण्यात येते. अर्थात गुन्हा किती कठोर आहे या नुसार शिक्षेचे स्वरूप ठरत असते व ते ठरविण्याचा अधिकार हा पंचाना असतो. न्यायाच्या सिध्दतेसाठी काही वेळा पंच

१.उकळत्या तेलातून पैसा काढणे

२.तापलेली कु-हाड हातावर घेणे,

३.बाणातून मारलेला तीर आणेपर्यंत आरोपीने आपले निरअपराधित्व सिध्दतेसाठी पाण्यात अशी काही दिव्य ही करावयास लावतात.

व हे दिव्य पार पडले तर आरोपींची निर्दोष मुक्तता होते. जर दिव्य केले नाही तर त्या आरोपीने गुन्हा केला आहे असे गृहीत धरून पंच न्याय देतात. दंड भरला नाही तर दोषी व्यक्तीला जाती  बहिष्कृत करण्याची शिक्षा पंच ठोठावतात. ज्या शिवारात किंवा ज्या ठिकाणी जात पंचायत

बसते.त्या बाबत कमालीची गुप्तता पाळण्यात येते. पारध्यांशिवाय इतरांना कळू नये. हा त्यामागील उद्देश असतो.जातपंचायतीमध्ये गुन्हेगारांचाही समावेश असल्याकारणाने पोलिसांना पंचायतीची कुणकुण लागली तर पंचायत तात्काळ बंद करण्यात येते.कधीकधी पोलिसांची परवानगी घेऊन पंचायत भरवली जाते.पंचायतीचे कामकाज दिवस मावळण्यापूर्वी संपवावे लागते. दिवस मावळावयाच्या आत निर्णय झाला नाही तर दुस-या दिवशी पंचायत बसून न्यायनिवाडा करते. फिर्यादी व आरोपी यांना आपली बाजू मांडता येत नसेल तर जातीतील व्यक्तीला वकील म्हणून नेमण्याची पंचायतीची मुभा असते.

प्रा. रामनाथ चव्हाण यांनी 'भटक्या विमुक्तांची जात पंचायत खंड-५' मध्ये जातपंचायतीत ठोठावण्यात येणारे दंड व शिक्षा पुढीलप्रमाणे."[९१]

हाताने मारले - २५० रू. दंड

लाथ मारली - १५०० रू. दंड

चप्पल मारली - १५०० रू. दंड

दगडाने मारली - २५० रू. दंड

चोरी करून पळाला व सापडला- कुत्र्याचे किंवा गायीचे मटन खायला घालणे.

लघवी अंगावर टाकली - २५०० रू.दंड

विदर्भ व मराठवाडा या भागात गुन्हयाचे स्वरूप व दंडाची रक्कम जास्त आहे. ती खालीलप्रमाणे :

मारामारी केली किंवा मारले - ५०० रू.दंड

चप्पल फेकून मारली - १५० रू. दंड

बाईच्या लुगडया खालून गेला - १५० रू.दंड

अनैतिक संबंध ठेवला - कवडीचा दंड किंवा जाती बहिष्कृत करणे.

जोड मारला - १० रू. दंड

पारधी जमातीत जाती अंतर्गत प्रकरणाला माफी नाही. रोख रकमेचा दंड अथवा जातीबाहेर काढणे ही शिक्षा दिली जाते. आणि त्या शिक्षेची अंमल बजावणी ज्या दिवशी शिक्षा सुनावली त्या दिवसापासून किंवा त्या क्षणापासून केली जाते. जाती अंतर्गत कोणत्याही गुन्हयाला दंड अथवा शिक्षेशिवाय सोडून दिले जात नाही. पारध्यांमध्ये दोषारोपण सिध्द करण्याच्या व शिक्षा देण्याच्या

पध्दती देखील भिन्न आहेत. या बाबत प्रा. दिलीप पवार असे म्हणतात की,"जमातीतील एखादी अविवाहित मुलगी गरोदर राहिली तर तिला जातीत ठेवायचे का ? जाती बहिष्कृत करायचे हे ठरविण्यासाठी शेणाचे दोन गोळे करतात. एका गोळयात चांदीचा तुकडा ठेवतात व दुस-या गोळयात कोळसा ठेवतात. आणि त्या मुलीला पंचा समक्ष कोणताही एक गोळा उचलावयास लावतात. जर तिने चांदीचा गोळा असलेला तुकडा उचलला तर तिला जातीत ठेवायचा निर्णय घेतात व तिने कोळसा असलेला गोळा उचलला तर त्या मुलीला जातीबहिष्कृत करतात. त्याचबरोबर ती मुलगी जातीतील व्यक्तीकडून की जाती बाहेरील व्यक्तीकडून गरोदर राहिली याची देखील तपासणी केली जाते व तिला काय शिक्षा दयायची हे ठरविले जाते. किरकोळ स्वरूपाच्या गुन्हयाला दारू व मटणाच्या जेवणाचा दंड दयावा लागतो. जमातीतील एखादया मुलाने परस्त्रीशी संबंध ठेवला तर जवळ-जवळ दिडशे लोक हातामध्ये वडाच्या फांदया घेऊन असे कृत्य करणा-यास मारतात. स्त्रीने परजातीतील पुरूषाशी संबंध ठेवला तर तिचे नाक कापणे, केस कापणे, नखे उपटणे इ. अघोरी शिक्षा दिल्या जात होत्या. "[९२]

वरीलप्रमाणे विविध गुन्हे व त्या गुन्हयांना अनुसरून जातपचांयतीतील कायदयानुसार शिक्षा दिसून येतात व हया शिक्षा या प्रत्येक जमात सदस्यांना अनिवार्य अशा असतात.अशी न्याय निवाडया बददलचीमाहीती मिळते.परंतु आता या शिक्षा देणे बंद झाले आहे. कारण आता जातपचांयती बददल बरेच कठोर नियम कायदे अस्तीत्वात येत आहेत.

### ३.६.८ कवडीचा दंड :-

पारधी जमातीत कवडीचा दंड होणे अतिशय धोकादायक व भीषण शिक्षा मानली जाते. हा दंड टाळण्यासाठी ते काहीही प्रयत्न करतात. दिपक पवार यांचे मते, "काही प्रकरणात दंडाची रक्कम वसूल करण्याकरीता फिर्यादी व्यक्तीला बायकोची लुगडी धूण्याची शिक्षा दिली जाते. त्याने तसे करण्यास नकार दिला तर जात पंचायत त्याला कवडीचा दंड करते."[९३]कवडीचा दंड होणे ही मृत्युपेक्षाही भयानक शिक्षा या जमातीत समजली जाते. लाखो रूपये भरण्याची आरोपी तयारी दर्शवितो, वेळ प्रसंगी स्वत:ची मुलगी तो लिलावात विकू शकतो, किंवा फिर्यादीच्या बायकोचीही लुगडी तो धुवू शकतो. मात्र कवडीचा दंड तो मान्य करत नाही. अशावेळी आरोपी या प्रकारचा दंड घेऊ नये म्हणून प्रयत्न करतो. समाजातला नावाजलेला वकील शोधून त्याला भरपूर फी देऊन तो

आपल्या बाजू मांडतो. त्यातूनही बचाव झाला नाही तर पंच फोडण्याचा किंवा त्याला लाच देण्याचा तो प्रयत्न करतो. मात्र शक्यतोवर कवडीचा दंड टाळतो. अशा प्रकारे या जमातीत कवडीच्या दंडाचा धाक आहे. न तो होऊ नये यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न हे या जमातीच्या लोकांकडून होत असतात.

### ३.६.९ पूर्वजांची हाड उकरून काढणे :-

दोषी व्यक्तीची मिशी उतरवणे, केस कापून गाढवावर उलटे बसवून धिंड काढणे, जिवंतपणीच स्त्री मेल्याचे जाहीर करणे, कवडीचा दंड, आडनाव बदलणे, जातिबहिष्कृत करणे अशा कठोर शिक्षा पारध्यांच्या जातपंचायतीत ठोठावण्यात येतात.तरीपण पारध्यांमध्ये यापेक्षाही कठोर शिक्षा असते ती म्हणजे दोषी व्यक्तीच्या पूर्वजांची हाडं उकरून काढणे अशाप्रकारच्या शिक्षेला झणकार काळे यांना एकोणीसशे ऐंशी - ऐंक्क्याऐंशी साली सामोरे जावे लागले होते. त्याबाबत त्याने अशी माहिती दिली, अहमदनगर पासून दक्षिणेला दहा ते पंधरा कि.मी. अंतरावर असलेल्या खंडाळा गावातील पारधी झणकार काळे यांनी चाळीस वर्षापूर्वी गावाचा विश्वास संपादन करून गावाजवळ वस्ती केली. त्यांचा गावगाडयाशी संबंध येऊ लागला. झणकारला पोलीस त्रास देत नाहीत. तो लोकांत मिसळतो, जातपंचायतीत येत नाही.हीच गोष्ट पारंपारिक जीवन जगणा-या पारध्यांना खटकत होती. काही पारधी लोकांनी झणकार काळेच्या विरोधात अहमदनगरच्या जात पंचायतीत तक्रार दाखल केली. पंचानी तक्रार दाखल करून घेतली. यातुन भांडण विकोपाला गेले. झणकार काळे याचा वडील हो-यादाजी काळे याचे रांजणगाव ( मशिद ) येथे दफन केले होते. पारध्यांनी हो-याची हाड उकरून नेली. जातपंचायतीने झणकार काळेला जातीबहिष्कृत केले. झणकार काळेंनी पुन्हा पंचायत बोलावली. पंचायतीने सर्व प्रकारचा दंड मिळून तीन लाख रूपयाचा दंड केला. पंचायतीत दंड भरल्या नंतर पंचानी झणकार याच्या वडिलांची हाडं परत करण्याचा फिर्यादी पारध्यांना आदेश दिला. फिर्यादी पारध्यांनी महार समाजातील स्मशान भूमीतील कोणाची तरी हाड उकरून काढूण झणकार काळे कडे दिली. काही दिवसातच पंचाच्या लक्षात ही बाब आली. पुन्हा शिरूर (जि. पुणे) येथे पंचायत बसली. आणि मग पारध्यांनी झणकार काळे याच्या वडीलांची खरी हाडं देऊन टाकली. झणकार काळे यांनी जात पंचायतीत माफी मागितली. नंतर झणकार काळे यांनी जोव्हंरण विधी केला. सुमारे दीड लाख खर्च केला. सात बक-यांचा बळी दिला. पाचही कुळयातील लोकांना जेवण दिले. पंचायतीने जाती

बहिष्कृत तेचा निर्णय मागे घेतला. आमचे कुटूंब पारध्यात आले नसता आम्ही खालच्या जातीत समाविष्ट झालो असतो. जातपंचायत तीन महिने चालली होती. असे झणकार काळे यांचा मुलगा व पारधी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र काळे यांनी सांगितले."(मुलाखत-झणकार काळे, घोसपुरी, अ.नगर )

अशा प्रकारे ही शिक्षा अतिशय कठीन अशी आहे पंचानी या कुटूंबाला जातीत घ्यायला सुमारे तीन लाख रूपयाचा दंड ठोठावला. ही दंडाची रक्कम भरून जोव्हारणं विधीसाठी सुमारे दीड लाख रूपये खर्च करून झणकार काळे यांनी समाजमान्यता मिळवून घेतली. पारधी पंचायतीमध्ये हा खटला अधिक गाजला होता. पंचाच्या अशा निर्णयामुळे कोणीही जातीचे पारंपारीक अलिखित नियम तोडून जातीचा रोष पत्करण्यास तयार होत नव्हता.

**३.६.१० जात पंचायतीचे संकेत :-**

बहुतांशी भटक्या जमातींचे काही विशिष्ट संकेत हे ठरलेले असतात. त्याच प्रमाणे पारध्यांच्याही जातपंचायतीचे संकेत असतात. या संकेतांन विषयी सर्वेक्षणा दरम्यान जानी देवल यांनी दिलेली माहीती पूढील प्रमाने सांगता येईल.

१) पंचायतीविषयी गुप्तता पाळणे.

२) जात पंचायत कोणत्या ठिकाणी किती वाजता बसणार आहे याची माहिती आरोपी, फिर्यादी,पंच आणि जमातीतील लोकांना गुप्त पध्दतीने देण्यात येते.

३) पंचायतीचा निर्णय एक दिवसात सूर्यास्तापर्यंत होणार नसेल तर पुढील पंचायत कोणत्या ठिकाणी बसणार आहे. याची माहिती जातपंचायत सुरू होतानांच देण्यात येते.

४) कारण पंचायतीची खबर पोलीसांना लागली तर कोणत्याही क्षणी पंचायत बरखास्त होऊ शकते. त्यासाठी नंतरच्या पंचायतीची प्रारंभीच देण्यात येत असावी.

५) बरोबर सकाळी ९-०० वाजता सुरू करून व संध्याकाळी सूर्यास्तापूर्वी पंचायतीचे कामकाज संपविण्याचा संकेत असतो. आणि तो कटाक्षाने पाळण्यात येतो.

६) गुन्हयाचे स्वरूप गंभीर असेल आणि त्याचा जमातीवर दुरगामी परिणाम होणार असेल तर अशा गुन्हयांचा निर्णय लावण्यासाठी चार ते आठ दिवस पंचायतीचे कामकाज चालते. दरम्यानच्या काळात गुन्हयाशी निगडीत व्यक्ती अगर साक्षीदाराला पोलिसांनी पकडले तर पंचायतीचे काम पुढेही ढकलण्यात येते.

७) परिसरात कोठेही चोरी झाली तर पहिल्यांदा पारध्यांना पकडतात. नेहमीच एक पाय घरात तर एक पाय तुरूंगात अशी पारध्यांची स्थिती असते.

८) पंचायत होणार नसेल तर खब-यांकडून गुपीत पणे माहिती देण्यात येते. फिर्यादी अगर आरोपी यांनी आपले म्हणणे मांडण्यासाठी जातीतील हुशार व्यक्तीला मग तो पुरूष असो अथवा स्त्री त्यांना वकील म्हणून नेमण्याची मुभा पंचायतीमध्ये असते. असा वकील दिला तर पंच हा संकेत मोडत नाहीत.

९) खटला दाखल करण्यासाठी फिर्यादी आणि आरोपी यांनी जातपंचायतीने सुचविलेली रक्कम पहिल्यांदा जात पंचायतीमध्ये पंचाकडे जमा करावी लागते. वकिलाची फी सुध्दा ठरविण्यात येते.

१०) पंचायतीत कोणी, कोठे बसायचे याचे संकेतही ठरलेले असतात.

११) पंचायतीमध्ये खटला सुरू झाल्या नंतर विविध कलमांचा पूर्वीच्या जात पंचायतीतील खटल्यांचा संदर्भ देण्यात येतात.

१२) एखादया खटल्यात आरोपीला गुन्हा मान्य नसेल आणि फिर्यादीही आपल्या निर्णयापासून ढळत नसेल तर पंचांना निर्णय देणे अडचणीचे किंवा अन्यायकारक वाटते.

अशावेळी आरोपीने उकळत्या तेलातून पैसा काढणे, तापलेली कु-हाड हातावर घेणे, तसेच बाणातून मारलेला तीर आणेपर्यंत आरोपीने आपले निरअपराधित्व सिध्दतेसाठी पाण्यात बुडी घेणे अशी दिव्य करावी लागतात.

१३) पंचांनी दिव्य सूचविली तर ते मान्य करण्याचा संकेत कटाक्षाने पाळला जातो. पंचानी दिलेला निर्णयही मान्य करावा लागतो ". (मुलाखत-जानी देवल, शिंगवेतुकाई, नगर)

एकूणच जातपंचायतीचे कामकाज शासकीय न्यायालयाच्या कलमाप्रमाणे चालते. पण या कलमांची कुठेही लिखित संहिता नसते. तर ते केवळ संकेत असतात. आणि हे संकेत शक्यतो कोणी मोडत नसल्यामुळे आजही पारध्यांच्या जातपंचायतीचे अस्तित्व टिकून आहे.

### ३.६.११ जातपंचायतीत लोककथांचा वापर :-

पारधी जमातीत न्यायनिवाडा करत असताना गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित झाल्यास पारधी जमातीत प्रचलीत असलेल्या पुराणकथा, दंतकथा, लोककथा, बोधकथा यात त्या-त्या प्रश्नांची सोडवणूक कशी केली जाते याचे दाखले देऊन सूचकतेने पंचायत कसा न्यायनिवाडा करते हे

स्पष्ट करून न्याय दिला जातो. उदा. पारधी हे सूर्योपासक असल्यामुळे ते रामायणातील कथांचा सर्रास वापर करतात. एखादी मुलगी पळवून नेण्याविषयीचा न्यायनिवाडा करतांना रावणाचे उदाहरण दिले जाते. शीलभ्रष्ट करण्याच्या प्रयत्नाविषयी न्यायनिवाडा करताना द्रोपदीचे उदाहरण दिले जाते. परिकथातील कल्पनाबंध किंवा पुराणकथातील कल्पनाबंध यांचा कायदयांसारखा ते वापर करण्याचा प्रयत्न करतात. उदा. 'हनुमानाच्या घामापासून नकळत पुत्र झाला होता तरी तो त्याचाच पुत्र होय.' ही रामायणातील मान्यता स्त्री-पुरूष संबंधात कायदयाप्रमाणे वापरली जाते. भ्रष्ट झालेल्या स्त्रीला जातीत घेण्यासाठी सितेच्या सत्वपरीक्षेचा दाखला देण्यात येतो.

### ३.६.१२ जातीत घेण्याची पध्दती :-

पारधी जमातीत एखादया स्त्रीने पुरूषाला लुगडे मारले, चप्पल मारली, अंगावर मानवी मुत्र टाकले किंवा सासूने विहीरीत लघवी किंवा कुत्रे टाकले तर ती व्यक्ती किंवा कुटूंब बाटले असल्याचे मानण्यात येते. जातपंचायतीमध्ये दंड भरून व देवकार्य करून त्याला शुध्द करून जातीमध्ये घेण्याची तरतूद पंचायतीत आहे. एखादया स्त्रीने अगर पुरूषाने व्याभीचार केला असेल तर त्याची नुकसान भरपाई देऊन त्यांना जातीत घेण्याची मुभा पंचायत देऊ शकते. गंभीर स्वरूपाचा गुन्हा जसे मूल मारणे, एखादया स्त्रीचे पोट वाढविणे, अशा गुन्हयात त्याला जाती बहिष्कृत करण्याचा, त्याची कुळी बदलून त्याला नीच समजलेले अडनाव देण्याचा निर्णय पंचायत देऊ शकते. पण आरोपीने क्षमा याचना करून पंचाकडे दया, याचना केली तर दिव्य करून जबरदस्त दंड आकारून व प्रसंगी कवडी दंड करून जातीमध्ये ठेवण्याचा निर्णय पंच घेऊ शकतात. पंचानी दिलेला निर्णय पारधी जमातीला मान्य करावा लागतो.''[९४]

अशाप्रकारे भ्रष्ट होणा-या व्यक्तीला परत जातीत घेतले जाते आशा माहीती प्राप्त होते.

### ३.६.१३ पंचायतीचा खर्च :-

पारधी जमातीच्या पंचायतीचा खर्च हा अत्यंत मर्यादित असतो. प्रवास व जेवणाचा खर्च ज्याने त्याने करावयाचा असतो. पंचायत बसेपर्यंत पहिला खर्चासाठी फिर्यादी, आरोपी, यांच्याकडून हजार बाराशे रूपये घेतले जातात. नंतर पंचानी गुन्हयात दोषी ठरवलेल्या व्यक्तीला फिर्यादीचा खर्च देण्याचा हुकूम करून दंड आकारला जातो. दंड पंचांना मिळतो. पण कोणत्या गुन्हयासाठी किती दंड घ्यावा याचेही संकेत असतात. गंभीर गुन्हयात जाती बहिष्कृतता, कवडी दंड, पूर्वजांची हाडं काढणे अशा स्वरूपाची होणारी गंभीर शिक्षा टाळण्यासाठी आरोपी हुशार

वकील, साक्षीदार यांच्यावर मोठी रक्कम खर्च करतो. पंचाना लाच देण्यासाठी प्रयत्न करतो. हल्ली पंचाच्या कार्यपध्दती बद्दल लोक साशंकता व्यक्त करून लागले आहेत.''[९५]

### ३.६.१४ जात पंचायतीत स्त्रियांचा सहभाग :-

भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रीयांचे स्थान हे दुय्यम दर्जाचे आहे. प्रत्येक जातीत, धर्मात, जमातीत, स्त्रीयांना दुय्यमत्वाचे स्थान भारतीय समाजात असलेले दिसते.इतर जाती जमातींप्रमाणे पारधी जातपंचायतीत स्त्रीयांना असणारे स्थान हे एकदमच गौण आहे असे वाटत नाही या संदर्भात डॉ. दिपक पवार असे म्हणतात की, ''स्त्रीला गहाण ठेवणे, मुलीचे देज घेणे, स्त्रीला वस्तूरूप मानणे व व्यवहार करणे, स्त्रीयांचे पुरूषांच्या तुलनेत काबाडकष्टाचे जीवन या सर्व बाबींचा विचार करता स्त्रियांचे स्थान चांगले नाही. परंतु काही इतर अनेक घटक आहेत व पारधी स्त्रीला अशा अनेक भूमिका वठवाव्या लागताता की, त्या पुरूषांच्या बरोबरीने आहेत असे दिसते. तसेच पारधी जमातीच्या जातपंचायतीचा विचार केला तर स्त्रीला पुरूषांच्या बरोबरीचे स्थान दिले जाते. हे इतर भटक्या विमुक्त समाजापेक्षा पारधी समाजाचे विशेष आहे. स्त्री स्वत: तिची तक्रार मांडू शकते. पुरूषांप्रमाणेच अन्य वादी प्रतीवादींची बाजू ती घेऊ शकते. वकील म्हणून ती तक्रार दाखल करू शकते आणि बाजू मांडू शकते. परांडा शेळगावची गंगुबाई शिंदे ही महिला पारधी समाजात अतिशय हुशार वकील म्हणून ओळखली जाते. जातपंचायतीचा निकाल आपल्या बाजूने लागावा यासाठी वादी प्रतिवादी मुद्दाम आपले खटले गंगुबाईला चालवण्यासाठी देतात. ती आकारेल ती फी मान्य करतात. एखादा खटला स्विकारल्या नंतर गंगुबाई खटल्याची संपूर्ण माहिती आपल्या अशिलाकडून घेते. जातपंचायतीत काय बोलायचे किंवा साथ कशी दयायची याची संपूर्ण माहिती देते. अंतिम निकालाच्या वेळी दोन्ही बाजूचे वकील आपआपल्या अशिलाच्या बाजूचे निवेदन करतात आणि आपल्या अशिलाचे म्हणणे कसे योग्य आहे किंवा आपले अशिल कसे निर्दोश आहेत हे न्यायाधीशांना पटवून सांगतात. तसेच गंगूबाई पंचायतीला वकीलपत्र सादर करते आणि अशिलाला निर्दोष सोडवते. अशी पारधी समाजात तिची ख्याती आहे. विशेषत: स्त्रियांच्या संदर्भातील तक्रारी ती स्विकारते आणि न्याय मिळवून देते.''[९६]भारतीय समाज व्यवस्थेचा विचार केला तर अगदी अलीकडील काळात महिलांना उच्च पदावर जाण्याचा मान अगदी अलिकडे प्राप्त झाला.भारतात ब्रिटीश काळात पहिली स्त्री जिल्हा सत्र न्यायाधीश म्हणून १९३७ ला श्रीमती

अन्ना चंडी यांची नियुक्ती झाली.त्यांनतर स्वांतत्र्याच्या तब्बल बेचाळीस वर्षानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी १९८९ ला मा.एम.फातीमा बीबी यांची नियुक्ती झाली.पण पारधी जमातीत पूर्वी पासूनच जमातीच्या पंचायतीमध्येच स्त्रीयांना सहभाग दिला जातो.इतकेच नव्हे तर या जमातीच्या खटल्याचा न्यायनिवाडा करण्याचे काम सुध्दा महिला करते. जातपंचायतीचा पाटील किंवा पंच जी भूमिका पंचायतीत बजावते किंवा पंचायतीत त्याला ते अधिकार आहेत तेच अधिकार आणि तीच भूमिका बजावण्याचे काम या जमातीमधील महिला करतात. तसेच पारधी जातपंचायतीतील स्त्रीयांना असणा-या स्थानाबद्दल बोलताना डॉ.दिपक पवार असे उदाहरण देतात की, ‘‘लोंढयाबाई काळे ही महिला पारधी जमातीत न्यायाधीश म्हणून काम करते.तिचा पती सदू घोटू काळे हा तिच्या हाताखाली मदतनीस म्हणून काम करतो.पंचायतीत दाखल होणारे खटले त्यांची पार्श्वभूमी किंवा वादी-प्रतिवादींचे जाब-जबाब घेते वेळी लोंढयाबाई आपल्या नव-याची मदत घेते. ती जे सांगेल त्याप्रमाणे तिचा नवरा करतो. ’’[९७]

वरिल उदाहरणावरून असे दिसते की, अन्य भटक्या आणि विमुक्त जमातीत व प्रगत समाजातही हे सापडणे कठीण आहे.पारधी समाजात तसे पाहिले तर स्त्रियांचे स्थान हे अतिशय दुय्यम आहे. कारण स्त्रीयांना गहाण ठेवणे हे इतर जमातीत व सर्व सामान्य समाजात दिसून येत नाही मात्र पारधी जमातीत गहाण ठेवणे, रांड म्हणून हाक मारणे, मुलीचा लिलाव करणे, तिचे कपडे घराबाहेर, तिची न्हानीघर वेगळे, स्त्री प्रसुत झाली तर तिला पाच दिवस कोणी स्पर्श करत नाही.तिने घराच्या पश्चिम दिशेला जायचे नाही. खाऊ घालायचे नाही,परपुरूषाला स्पर्श करायचा नाही, अशी नानाविध बंधनात अडकलेली स्त्री आपली कैफियत मांडू शकते, बोलू शकते. जातपंचायतीने मात्र पारधी स्त्रीला पंचायत कामात पूर्णपणे स्वातंत्र्य दिले आहे असे दिसते.पारधी जमातीत मुलीच्या जन्माचे स्वागत केले जाते. पंरतु मुलगा जन्मला की सगळे मिळून रडतात. एकूणच पारधी जमातीत स्त्रीयांचे स्थान हे जवळपास पुरूषांच्या बरोबरीने आहे कारण हिंदू समाजातील स्त्रीयांना स्वत:च्या हक्कासाठी शेकडो वर्ष लढा दयावा लागला. त्या तुलनेत या जमातीतील स्त्रियांना त्यांचे हक्क केंव्हाच मिळाले आहेत. सती जाणे, केशवपन, विधवा विवाह निषेध, पुनर्विवाह निषेध, कामाच्या हक्कांचा निषेध या बाबी या जमातीत चुकूनही दिसत नाहीत. सांस्कृतिक व प्रापंचिक निर्णय घेणे, नव-याबरोबर सहजीवनाचा हक्क नाकारणे, हे सारे स्त्रीच्या स्वाधीन आहे.या जमातीत कोणत्याच

स्त्रीला तिच्या मनाविरूध्द वागण्यास भाग पाडले जात नाही.व्याभिचार, विवाहपूर्व संबंध किंवा लग्नसंबंधात आलेल्या अडचणीबद्दल स्त्रीयांना आपली बाजू मांडण्याचा अधिकार आहे.असे अनेक प्रकारच्या स्वातंत्र्यावरून असे दिसते की, स्त्रीयांना बरेच उच्च स्थान या जमातीने दिले आहे.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, भटक्या विमुक्तांच्यात जातपंचायत हा अतिशय महत्वाचा घटक आहे.पारधी समाज हा देखील त्यापासून वेगळा नाही. पारधी समाजात न्यायनिवाडा हा जातपंचायती मार्फत होतो.जेथे पंचायत भरते त्या जागेची गुप्तता राखली जाते.या जमातीत शिक्षेचे स्वरूप हे अतिशय कठोर आहे.ते शारीरिक व आर्थिक दंडात्मक असते.प्रत्येकाला न्याय पाळावा लागतो अन्यथा जमातीतून बहिष्कृत केले जाते.पारधी जमातीचे वैयक्तिक व जमात पातळीवरील नियमन करून व्यवहारीक व स्त्रीपुरूष संबंधातील न्यायनिवाडा करण्याचे कार्य जातपंचायत करत असते.या समाजात जातपंचायतीचा निर्णय हा अंतिम आहे.असे आजही ब-याच प्रमाणात मानन्यात येते. आपआपसातील संघर्ष टाळणे स्त्री-पुरूष संबंधाला कठोरपणे जमातमान्य रूप देणे, देवदेवस्की करवून घेऊन जमात आणि कुळे मानसिकदृष्टया शुध्द व सुरक्षित राखण्याचा प्रयत्न करणे अशी उद्दिष्टये असतात. जात पंचायतीत पाटील हा मुख्य न्यायाधीश असतो व अकरा पंच न्यायनिवाडयाचे काम पाहतात. पंचायत बसवण्यासाठी विशिष्ट असे दिवस ठरलेले नसतात. आवश्यकतेनुसार पंचायत भरवली जाते.न्याय भूमिकेत चूक झाली तर दोषी पंचाला पदावरून बहिष्कृत केले जाते.त्यात पाटलाला विशेष महत्व असते. दंड करणे, देवस्की करविणे, पुरलेल्य पूर्वजांची हाडे काढावयास सांगणे, विशिष्ट प्रसंगी स्त्री पुरूष संबंधात सक्तीचे संबंध करण्यात निर्बंध करणे असे पारधी जमातीतील जात पंचायतीत शिक्षेचे स्वरूप असते. चोप देणे, स्त्री वस्त्र व स्त्री मुत्र यांचे उपयोजन शिक्षेत होते.जव्हारणं विधीला या जमातीत अतिशय महत्व आहे. या जमातीतील जातपंचायतीत सामाजिक, कुलधर्मविषयक, प्रापंचिक, व्यवसायविषयक, आणि व्यवहारविषयक विशिष्ट संकेत असतात. त्यांची पूर्ण गुप्तता राखली जाते.संकेतानुसारच न्याय व्यवस्थेत खटले चालविले जातात. खटले चालवतांना पौराणिक संदर्भ व लोककथांचा आधार घेतला जातो. या जमातीतील स्त्री पुरूष संबंध, चोरी व्यवहार यातील नीती अनितीच्या कल्पना अन्य जमातींपेक्षा व नागर संस्कृतीपेक्षा वैशिष्टयपूर्ण व वेगळया वाटतात. परंतु

याच जमातीत त्या कठोर व बंधनकारक वाटतात. जातपंचायतीत 'पारूषी' भाषेतून संवाद घडतो. जातपंचायतीचे नियम, न्याय आणि संकेत जमातीपुरते पूर्णत: बंदिस्त असतात.

सामाजीक बहिष्कारच्या घटनांना पायबंद घालण्यासाठी पंचायतीच्या माध्यमातून चूकीचं काम करणा-या व्यक्तींना शिक्षेची तरतूद असणारा कायदा महाराष्टात १३ एप्रिल २०१६ (महाराष्ट सामाजिक बहिष्कारां पासून व्यक्तिचे संरक्षण प्रतिबंद बंदी व निवारण अधिनियम २०१६) रोजी नूकताच लागू झाला.जात पंचायतीच्या छळाला कोणतेही कायदे लागू होत नसल्यानं पीडीतांना आजवर न्याय मिळत नव्हता. अपू-या तरतूदी मूळे गन्हेगार लगेच सूटत किंवा खटले वर्षानूवर्ष प्रलंबीत राहत. आता मात्र नवीन कायदा आल्यानं जातपंचायताला पायबंद घातला जाणार आहे. सामाजीक बहिष्कार रोखण्या बरोबरच पीडीतांसाठी दिलासा दायक तरतूद कायदयात करण्यात आली आहे.या कायदयानं सामाजिक बहिष्कार हा गून्हा मानला जाईल .या कायदयाची माहीती या समाजाला जास्त प्रमानात नाही परंतू जस जशी माहीती होईल तसं तसं जातपंचायताला आळा बसेल.असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे.

**३.७.पारधी जमातीचे लोकसाहित्यः-**

पृथ्वीवर (समाजाच्या) मानवाच्या उत्पत्ती नंतर दऱ्याखोऱ्यात भटकरणारा मनुष्य, निसर्गाशी झुंझणारा मानव प्राथमिक अवस्थेत शिकार करून आपली उपजिविका भागवत होता. प्रसंगी गुहेमध्ये राहून आपले जीवन व्यथीत करत होता.त्यावेळी भाषेचा शोध लागलेला नव्हता तेव्हा तो संकेताच्या माध्यमातून आपले विचार व इतरांशी आंतरक्रिया करत होता.सुरूवातीला त्याचे जीवन संपूर्णपणे भटके होते.हळूहळू आपण खालेल्या फळांच्या बियांपासून नवीन रोपटे उगवते याचा शोध मानवाची भटकंती काही प्रमाणात कमी करण्यास सहाय्यक ठरला. जेथे पाण्याचा स्त्रोत कायम स्वरूपी आहे अशा ठिकाणी वस्ती करून मानव स्थिरावू लागला. अप्रगत स्वरूपाची शेती करू लागला व भाषेचा शोध लागल्यानंतर मानवातील अंतरक्रिया वाढत गेल्या नंतर मनुष्य समूह करून राहू लागला .समूहात भाषेच्या माध्यमातून आंतरक्रिया होऊ लागल्या परंतू तरीही भाषेसाठी लिपी अस्तित्वात नसल्याने किंवा तिचा शोध न लागल्याने समूहाच्या प्रेरणेसाठी किंवा समूह नियंत्रणासाठी किंवा समूह भावनेसाठी जे काही त्या काळातील मानवाने तयार केले ते सर्व मौखिक स्वरूपातच होते.ते मौखिक वाङ्:मय एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखीक रूपातच हस्तांतरीत होत होते.यात काही लोककथा, गाणी, म्हणी या सारख्या बाबींचा समावेश होता. परंतु

हळूहळू समाज बदलत गेला मानवी प्रगती होत गेली व लिपीचा शोध लागला व मौखीक वाङ्:मयाचे रूपांतर लोकसाहित्यात झाले.

### ३.७.१.लोकसाहित्याचा अर्थ:-

कोणत्याही मानवी समाजात लोकसाहित्य हे अतिशय महत्वाचे असते.कोणत्याही समाजाचा अभ्यास लोकसाहित्याच्या अभ्यासा शिवाय करणे यथा योग्य नाही. किंवा लोकसाहित्याच्या अभ्यासातून कोणत्याही समाजाच्या सर्वांगीण व परिपूर्ण अभ्यास होऊ शकतो. लोकसाहित्य हे समाजाचा आरसाच असते.वास्तविक पाहता लोकसाहित्य या शब्दाच्या अर्थाबाबत विद्वानांनमध्ये बरेच मतभेद आहेत.जसे दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्याची रूपरेखा' या ग्रंथात Folklore साठी 'लोकसाहित्य' हा पारिभाषिक शब्द सुचविला आहे.या संबंधात त्या लिहतात. ''प्रा.द.वा.पोतदारांनी 'लोकविद्या' असा शब्द सुचविला होता. पण तो रूळला नाही, शिवाय साहित्यात वाङ्:मय, ज्ञान व विधी यांची विविध अंगे प्रतित होतात व विद्या या शब्दांपेक्षा 'साहित्य' या शब्दाची व्याप्ती जास्त असल्यामुळे हा रूढ शब्द मी निवडला. याचप्रमाणे डॉ.रा.चि.ढेरे यांनी ''लोकसाहित्याचे उपासक'' या ग्रंथात Folklore या शब्दासाठी लोकविद्या हा शब्द वापरणे अधिक संयुक्तिक ठरेल असे म्हटले आहे.''[९८]

वरील दोन्ही अभ्यासकांप्रमाणे डॉ. कृष्णदेव उपाध्याय यांनी ''Folklore या शब्दासाठी 'लोकसंस्कृती' हा शब्द वापरावा असे मानले आहे.''[९९]वरील विचारवंताच्या मत भिन्नतेमुळे लोकसाहित्य या शब्दासाठी इंग्रजीत वापरला जाणारा Folklore या शब्दांचे नेमके मराठी स्पष्टीकरण होत नाही.म्हणजेच लोकसाहित्य या शब्दाचा नेमका अर्थ काय या बाबत संभ्रम निर्माण होतो.परंतु लोकसाहित्य हा शब्द मानवी समूहाच्या जीवनाशी निगडीत असल्याने त्याचा सुनिश्चित अर्थ मांडण्याचा प्रयत्न देखील अनेक विद्वानांनी केलेला आहे. जसे जोनाल बॅलीस यांच्या मते ''लोकसाहित्य हे आदिमानव निर्मित असून परंपरागत असते.त्याचप्रमाणे सुसंस्कृत मानवाने देखील निर्मिलेले असते.ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्या द्वारे पद्य किंवा गद्य स्वरूपात केली जाते.लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकभ्रम, रूढी, लोककलाकार, नृत्य, नाटय इत्यादींचा अंतर्भाव होतो.लोकसाहित्य हे लोकसमूहाच्या अविष्काराचे शास्त्र नाही. तर लोकसमूहाला परंपरागत चालत आलेल्या जीवनाच्या अविष्कारांचे शास्त्र आहे.''[१००] जोनाल बॅलीसच्या

लोकसाहित्याच्या व्याख्येवरून नेमक लोकसाहित्य कशास म्हणाव हे स्पष्ट होतांना दिसत. पृथ्वीवर राहणाऱ्या सर्व मानवी समूहांची एक विशिष्ट अशी जीवनशैली आहे.विविध प्रदेशातील समूहांनी त्या प्रदेशातील भौगोलिक पर्यावरणाला अनुसरून आपआपली जीवनशैली विकसित केली आहे. व त्या जीवनशैलीत लोकविश्वास, रूढी, श्रध्दा, भ्रम, लोककलाप्रकार, नृत्य, नाटय, संस्कृती या सर्वांद्वारे त्या विशिष्ट समूहांचे भावविश्व दर्शविणे हा अर्थ नेमकेपणे लोकसाहित्यात अभिप्रेत आहे. लोकसाहित्य हे प्रत्येक मानवी समूहानुसार वेगळे असते.ग्रामीण, आदिवासी, भटके व विमुक्त यांच्या लोकसाहित्यात भिन्नता दिसते.कारण वरील सर्व समूह हे विभिन्न भौगोलिक स्थितीत राहतात तेव्हा प्रत्येकाच्या जीवनशैलीत भिनता दिसते.पर्यायाने लोकसाहित्यातही भिन्नता आढळते.कोणत्याही समाजाचे लोकसाहित्य हे जाणीवपूर्वक निर्माण झालेले नसते तर ते सहजगत्या निर्माण झालेले दिसते.प्रत्येक समूहाच्या लोकसाहित्याचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण होत असते.समूहातील प्रत्येक व्यक्तीच्या वागण्यात, कृतित, निर्णय प्रक्रियेत व वर्तन नियंत्रणात लोकसाहित्य मोलाची भूमिका बजावत असते.लोकसाहित्य हे प्रत्येक मानवी समूहाचे भावविश्व किंवा त्यांच्या क्रिया कलापांचे दर्शन घडवत असते.प्रत्येक समाजाच्या लोकसाहित्यात नेमक्या कोणत्या बाबींचा समावेश होतो. याबाबत लोकसंस्कृतीचे उपासक या (ग्रंथात) पुस्तकात रा.चिं.ढेरे असे मत व्यक्त करतात की,''लोकसाहित्य हे लोकजिवनाला गवसनी घालणारे असल्यामुळे त्यात लोकांच्या भाव भावना,इच्छा-आकांक्षा, सुख-दु:खे,राग-द्वेष, आचार-विचार व्यक्त होत असतो.''[१०१] लेखक रा.चि.ढेरे यांच्या वरील विवेचनावरून विविध समाजाच्या लोकसंस्कृतीत नेमक्या कोणत्या बाबींचा उल्लेख होतो याची प्रचीती येते.

वरील सर्व बाबी या प्रत्येक समाजात अस्तित्वात असल्याचे दिसून येतात. केवळ अस्तित्वातच नसतात तर त्या त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेल्या असतात. त्यातून त्यांची जीवन जगण्याची पध्दती दिसून येते. प्रत्येक ग्रामीण भागात नाना वस्तुंचा बाजार भरतो. तमाशाचे फड रंगतात. काही ठिकाणी भजने, गारूडे, बैलगाडयांच्या शैर्यती, कुस्तीचे आखाडे सर्व मोठे लोक व लहान मुले जत्रात फिरून या सर्व गोष्टींचा आनंद लुटत असतात. हे सर्व विशिष्ट समूहांच्या जीवन प्रणालीचे दर्शन घडवित असतात. बदलत्या ऋतुनुसार विविध सणाव्रतांची केलेली योजना हा देखील लोकसंस्कृतीचाच भाग आहे. लोकसंस्कृतीत विविध समूहातील विविध बाबींचा समावेश होतो. तरीही साधारणत: लोकसाहित्यात एखाद्या समूहाच्या लोककथा, जातकथा,

दैवतकथा, उत्पत्तीकथा, परिकथा किंवा अद्भूतकथा, अख्यायिका, बोधकथा, प्राणीकथा, हास्यकथा, पराक्रम कथा, वीरकथा, अनुभव कथा इ.चा समावेश होतो. तसेच लोकगिते, लोककथा गिते, लौकिकगिते इ. चा देखील समावेश होतो. लौकिकगीतांमध्ये पोवाडे, भगतांची लौकिगिते, संताची भारूडे, आरत्या इ. समावेश होतो. लोकसाहित्यातील लोकथांचा उद्देश हा इतरांचे मनोरंजन करत सामाजिक संदेश देणे हा तसेच यात धर्म व देवावर श्रध्दा निर्माण करणे, समूहासाठी वेळप्रसंगी बलीदानाची तयारी दर्शविणे हा होता. लोकगितांच्या माध्यमातून समाज वेदना, प्रेरणा या बाबीं दर्शविण्याचा प्रयत्न होतो. लौकिकगिते, या गीतात पोवाडयांचा समावेश होत असल्याने एक बाब दिसते की विशिष्ट समूहातील पराक्रमी व्यक्तींची शौर्य गाथा गाऊन इतरांना तसा पराक्रम करण्यासाठी प्रेरीत करणे हा देखील उद्देश याचा आहे. वरिल सर्व बाबींवरून लोकसाहित्याची प्रचीती येते.

वरील सर्व उदाहरणांवरून एखाद्या समाजाचे लोकसाहित्य काय आहे हे समजण्यास मदत होते. व प्रत्येक समाजाचे लोकसाहित्य हे वास्तव आहे. कोणत्याही समाजाचा अभ्यास करताना त्या समाजाचे लोकसाहित्य जाणून घेतल्या शिवाय त्या समाजाचे परिपूर्ण अध्ययन करताच येणार नाही.

### ३.७.२ लोकसाहित्य आणि समाज :-

लोकसाहित्य व समाज यांचा अतिशय घनिष्ठ संबंध आहे. मानवी समाजाच्या अस्तित्वानंतर त्या समाजाला पुरक असे लोकसाहित्य निर्माण होत गेले. व कालोघात ते सामाजिक जीवनशैलीचाच एक भाग बनले गेले.समाज हा व्यक्तींचा मिळून बनतो. समाज व लोकसाहित्य हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ज्या समाजाचा सभासद म्हणून व्यक्ती आपले जीवन व्यथित करत असते त्या समाजाचे नियम पाळणे त्यास अनिवार्य असते. समाजात राहायचे असेल तर सामाजिक नियमणांचे पालन व्हावे अशी अपेक्षा असते. आदिवासी, ग्रामीण, भटके व विमुक्त समाजाचे सामाजिक नियमणे ही भिन्न असतात. सामाजिक नियमणांची व्याख्या करताना लाईट व केलर हे विचारवंत असे मत मांडतात की, ''परस्परांशी सामाजिक सबंध ठेवतांना लोक त्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करतात त्यांना नियमणे असे म्हणतात.''[१०२]

प्रत्येक व्यक्तीला आपल्या समाजात सामाजिक संबंध प्रस्थापित करावेच लागतात. कारण समाजाचे अस्तित्व हे सामाजिक संबंधावर आहे.सामाजिक संबंधाबाबत मॅक आयव्हर व पेज असे म्हणतात की, ''समाज म्हणजे सामाजिक सबंधाचे जाळे होय.''[१०३]समाजात राहणाऱ्या व्यक्तींमध्ये

घनिष्ठ सामाजिक संबंध असतात. व सामाजिक संबंध नियमनांनी नियंत्रित असतात. व नियमणे ही काही प्रमाणात लोक साहित्याचाच भाग आहे. म्हणून लोकसाहित्याच्या माध्यमातूनच समाज व्यवस्था कार्यान्वीत होत असते. म्हणजे समाजाचे संचलन हे लोकसाहित्या मार्फत चालते. समाज हा अनेक समूहांचा मिळून बनलेला आहे. व यात पूर्णपरंपरेने चालत आलेले लोकसाहित्य अस्तित्वात असते. व या लोक साहित्याच्या अभ्यासा शिवाय विशिष्ट समाजाच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास पूर्णच होऊ शकत नाही. कोणत्याही समाजाचे वास्तव हे लोकसाहित्यातून अभिव्यक्त होत असते. समाज जीवनाचा अभ्यास करण्यासाठी त्या समाजात प्रचलित असलेल्या लोकसाहित्याचा अभ्यास अनिवार्य असतो. समाज जीवनास आकार देण्याचे कार्य देखील नकळतपणे लोकसाहित्यातून होत असते. लोकसाहित्यातील प्रेरणांनुसार समाज जीवन घडत असते. व समाजातील व्यक्तीच्या जगण्याला दिशा प्राप्त होत असते. समाजा शिवाय लोकसाहित्याची तर लोकसाहित्याशिवाय समाजाची आपण कल्पनाच करू शकत नाही. हे दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कारण समाज हा अनेक जाती, जमाती, धर्म, वंश, भाषा यांची गोळा बेरीज आहे तर प्रत्येक जातीत व जमातीत पूर्वपरंपरेने चालत आलेले लोकसाहित्य हे अस्तित्वात असते. व या लोकसाहित्याच्या अभ्यासाशिवाय कोणत्याही समाजाचा अभ्यास पूर्ण होऊच शकत नाही. समाज जीवनाचे वास्तव चित्रण हे केवळ लोकसाहित्यातून अभिव्यक्त होत असते. लोकसाहित्य हे एखाद्या समाजाचा आरसा असते. एखाद्या समाजाची प्रगती व अधोगती ही त्या समाजाच्या लोकसाहित्यावर अवलंबून असते. समाज जीवनाचा अभ्यास करण्यासाठी त्या समाजात प्रचलित असलेल्या लोकसाहित्याचा अभ्यास करणे अनिवार्य असते. त्या शिवाय ती विशिष्ठ समाज व्यवस्था समजून घेता येत नाही. समाज व लोकसाहित्याच्या संदर्भात बोलतांना प्रभाकर भांडे असे मत मांडतात की, ‘‘जेव्हा समाज एका विचार विश्वातून दुसऱ्या विचार विश्वात जातो त्यावेळी समाज जीवनाच्या जीवनदृष्टीत आणि जीवन पध्दतीत लक्षात घेण्यासारखा बदल होतो. अशावेळी भूतकाळातील समाज जीवनातील काही अवशेष समाज जीवनात शिल्लक राहतात. हे अवशेष असले तरी दैनंदिन समाज जीवनातील त्यांची अर्थपूर्णता पूर्णपणे नष्ट झालेली नसते. म्हणून अशा अवशेषांना दुर्गा भागवत यांनी ‘संजिवावशेष’ असे म्हटले आहे.’’[१०४]

वरील मताचा विचार केला तर असे दिसते की, समाज जीवनात होणारे परिवर्तन हे कितीही जलद अगर मंद गतीने होत असले तरीही समाज जीवनातील काही अवशेषात मुळीच बदल होत नाहीत. व प्रगत समाजाच्या वर्तनावर, वर्तननियंत्रणावर प्रभाव पडत असतो. कोणत्याही समाजाचे लोकसाहित्य हे त्या समाजाची गाथाच असते. लोकसाहित्यातून कोणत्याही समाजाच्या जीवन चरित्राचे दर्शन होत असते. तेव्हा समाज व लोकसाहित्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

### ३.७.३ पारधी लोकसाहित्य :-

भारतात आढळणाऱ्या जमातींपैकी पारधी ही विमुक्त जमातीत समाविष्ट झालेली जमात आहे. ब्रिटीश काळात १८७१ साली मंजूर केलेला 'गुन्हेगारी जमात कायदयाने' ज्या १९८ जमातींना गुन्हेगार म्हणून घोषित केले पारधी ही त्यापैकी एक जमात होय. या कायदयाने या जमातीत जन्माला येणारा प्रत्येक सदस्य हा जन्माने गुन्हेगारच असतो असे मानले होते. तेव्हा इतर समाजाचा या समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा गुन्हेगार म्हणूनच राहिला व मुख्य समाज प्रवाहात यांना सामावून घेतले नाही. व जीवन चालविण्यासाठी, उपजिविकेचे कोणतेही साधन अस्तित्वात नसल्याने व जंगलविषयक कायदे कठोर झाल्याने या समाजाला गुन्हेगारीचा मार्ग धरावा लागला व मुख्य सामाजिक प्रवाहात स्थान न मिळाल्याने हे अलिप्त जीवन जगू लागले त्यातून ते आपली संस्कृती व लोकसाहित्य याला चिटकून राहिले ते आजपर्यंत. पारधी जमातीला देखील इतर समाजाप्रमाणे लोकसाहित्य अस्तित्वात आहे व ते आजतागायता या लोकसाहित्याला मोठया प्रमाणावर चिटकून आहेत. प्रभाकर यांनी लोकसाहित्या बद्दल असे मत व्यक्त केले आहे की, "लोकसाहित्यात पंरपरेने चालत आलेल्या लोकजीवनातील ज्या विशेषांचा समावेश होतो. त्यांना स्थुल मानाने मौखीक अविष्कार, भौतिक संस्कृती, लोकरूढी, विधी, समजूती, लोककला इ. समावेश होतो."[१०५]

वरील विवेचनानुसार पारंपारीक लोकजीवनाच्या शब्दबध्द अविष्काराचा यात समावेश होतो. तसेच म्हणी, वाक्रप्रचार, उखाने हे मौलीक अविष्कारात सामावले जातात. तसेच आदिम जमातींनी बनविलेली हस्तकला व अवजारे व इतर वस्तुंचाही यात समावेश होत असतो. परंपरेने चालत आलेल्या जत्रा, सण, उत्सव, उपासना पध्दती आणि इतर बऱ्याच गोष्टी जमातींच्या लोकसाहित्याचा भाग आहे. 'पारधी' जमातीला सुध्दा स्वतंत्र लोकसाहित्य आहे. व या

लोकसाहित्याने त्यांचे जीवन क्रियान्वीन होताना दिसते. पारधी लोकसाहित्यात प्रामुख्याने लोककथा, लोकगीते, रूढी, परंपरा, श्रध्दा व समजूती, म्हणी, वाक्रप्रचार, नृत्य, नाटय, सांकेतीक भाषा, विविध धार्मिक विधी, या व अशा काही बाबींचा समावेश होतो.

वरील सर्व बाबी या पारधी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. या सर्व बाबींतून पारधी जीवन हे क्रियान्वीत होत असते. तेव्हा पारधी जमातीचा अभ्यास करताना त्यांचा लोकसाहित्याला छेद देऊन चालणार नाही तर पारधी लोकसाहित्यातून ही समाज व्यवस्था चांगल्या प्रकारे समजू शकेल. प्रत्येक समाज व्यवस्थेत असणा-या लोकसाहित्यात पूढील काही बाबींचा समावेश होतो.

### ३.७.४ लोककथा :-

लोककथा या प्रत्येक समूहाचा एक अविभाज्य असा भाग आहे.या मधून नकळतपणे मनोरंजनातून विधायक सामाजिकीकरणाचे कार्य चालते. आधुनिक समाज व्यवस्थेत अमुलाग्र असा बदल झालेला दिसतो. आजचे युग टी.व्ही. संगणक,इंटरनेटचे असले तरी कथेची गोडी कमी झालेली नाही. काही वर्षांपूर्वी वरीलप्रामणे मनोरंजनाची कोणतीच साधने अस्तित्वात नव्हती. तेव्हा कथा-कथन हा लोककथेचा प्रकार लोकरंजनाचे कार्य करीत होता. लोकरंचनाचा भरपूर मसाला लोककथांमध्ये आढळतो. एखाद्या जादुगारणीप्रमाणे ती आपल्या पोतडीतून कधी राजा-राणीच्या, पशु-पक्ष्यांच्या, प्राणीमात्रांच्या, देवादिकांच्या, पऱ्या आणि पक्ष्यांच्या कथा काढते. तर कधी दैनंदिन जीवनातील नाना प्रकारच्या कथा लोकांपुढे आणते.अतिसामान्यापासून असामान्यापर्यंत,लहानांपासून थोरांपर्यंत,सुशिक्षितांपासून ते अशिक्षितांपर्यंत,राजापासून-रंकापर्यंत समाजातील सर्व स्तरातील लोक घटकांना कथेने भूरळ घातलेली असते.तिची नशा, रंगत, लज्जत, काही वेगळीच आहे.लोककथेने बऱ्याच वर्षांपासून लोकांचे मनोरंजन केले.व आजही करत आहेत. परंतु आज मात्र लोककथेचे स्वरूप मात्र बदललेले दिसते.पण नव्या मनोरंजनाच्या माध्यमांना सामोरी जातांना ती नवीरूपे धारण करतांना दिसत आहे.आजच्या माध्यमांनाही लोकथेची भूरळ पडल्यावाचून राहत नाही.दूरचित्रवाणी आणि इंटरनेटवरही तिने आपले साम्राज्य निर्माण केले आहे. उदा.पंचतंत्र, विक्रमवेताल इ. लोककथाही इंटरनेटवरून लोकरंजनाचे कार्य करत आहेत.तर दूरदर्शन वर नंदादीप, इंद्रधनुष, सोनपरी, अलिबाबा चाळीस चोर इ. प्रसारण विविध वाहिन्यांवरून चालू आहे.

भारतात अनेक जाती व जमाती वास्तव्य करतात.या लोकांची जीवन पध्दती ही एकमेकांपासून भिन्न आहे.भारतीय समाज व्यवस्थेचा अविभाज्य भाग असणाऱ्या जाती-जमाती हया परस्पर भिन्न आहेत. भारतात अशी कोणतीही जमात नाही जिला स्वत:चे लोक साहित्य नाही. स्वत:ची जीवनपध्दती नाही, या लोकसाहित्यामुळे व लोकसाहित्यात असणाऱ्या विविध बाबी हया त्या समाजाचे जीवन नियंत्रित करत असतात. लोककथा हा असाच या जमातीच्या जीवनपध्दतीचा भाग असतो जिच्या माध्यमातून त्या समाज व्यवस्थेत एक सामाजिक संदेश त्या जमातीतील नवीन सदस्यांना दिला जातो.तसेच समाजातील समाजाचे मनोरंजन देखील लोककथांच्या माध्यमातून केले जाते. आजही ज्या समाजात आधुनिक मनोरंजनाची साधने उपलब्ध नाहीत तेथे परंपरेने चालत आलेल्या लोककथा हेच लोकमनोरंजनाचे प्रधान माध्यम असते.लोककथांचा समाज मनावरील प्रभाव हा प्राचीन काळापासून चालत आला आहे.लोककथेच्या बाबत प्रभाकर मांडे असे म्हणतात की, ''भारत हा कथा प्रिय देश म्हणून नावाजलेला आहे.''[१०६] भारतात खरोखर प्रत्येक जाती व धर्मानुसार लोककथांचे स्वरूप हे भिन्न असल्याचे दिसते व प्रत्येक जाती व धर्मात या कथांना अनन्य साधारण असे म्हत्त्व आहे.त्या समाजातील लोकांसाठी या लोककथा प्रेरणादाई असतात.

- **लोककथांची निर्मिती :-**

प्रत्येक जमातीत लोककथांची निर्मिती ही काही उद्देशाने झालेली असते.या संदर्भात प्रभाकर मांडे असे मत मांडतात. पुढील लोककथा निर्मितीच्या अवस्था हया डॉ.सत्येंद्र यांनी सांगितलेल्या आहेत.''[१०७].

१) कथांच्या निर्मीतीच्या पहिल्या अवस्थेत आदिमानवाने सृष्टीमध्ये ज्या विविध घडमोडी घडतात त्या पहाणे, त्यांचे नामकरण करणे आणि त्यांचा प्रत्यय घेणे या गोष्टी येतात. या प्रक्रियेत आदिमानवाने सृष्टीमध्ये घडणाऱ्या विविध घटनांमध्ये स्वत:च्या मनोवस्थांचा प्रत्यय घेतला त्यावेळी त्याला सृष्टीच्या व्यापाराचे ज्ञान होते.

२) आदिमानवाला सृष्टी व्यापाराचे जे ज्ञान होते.त्या ज्ञानाची दोन रूपे असतात. पहिल्या स्वरूपात हे ज्ञान विकसित होऊन त्या सृष्टी व्यापाराच्या मूळा वाचक शब्दांना विस्मृत करते आणि त्यांना देवत्व किंवा अलौकित्व देते. कथेच्या निर्मितीच्या या दुसऱ्या अवस्थेत हे जे ज्ञान विकसित

झाले त्याच वेळी या ज्ञान व्यापारात धर्मभावना किंवा श्रध्दा निर्माण झाली किंवा व्यापारात धर्मभावना किंवा श्रध्दा निर्माण झाली किंवा सृष्टी व्यापारामध्ये असलेल्या काही घटकांविषयी भय निर्माण झाले. सृष्टी व्यापारातील असे घटक जे मानवी जीवनाला हितकारक आहेत. त्यांच्या संबंधी श्रध्दा भाव आणि जे बांधक आहेत त्यांच्या संबंधी भय निर्माण झाले. आदिमानवाला सृष्टी व्यापाराचे जे ज्ञान झाले त्याच्या दुसऱ्या रूपात हे ज्ञान विकसित होऊन त्यापासून प्रत्यक्ष जीवनव्यवहाराला मार्गदर्शन करून घेतले.त्यासाठी त्यांनी निसर्गातील घटनांना कथा स्वरूप दिले.

३) लोककथांच्या निर्मितीच्या तिसऱ्या अवस्थेत उपरिनिर्दिष्ट पहिल्या स्वरूपाचे ज्ञान दैवतकथांचे आणि धार्मिक आख्यानांचे आधार बनले.त्या संबंधी मानवाच्या मनात श्रध्दाभाव निर्माण झाला. त्यामुळे पुढे विधीकथा स्थिर झाल्या.समाजातील धार्मिक विधीत त्यांना स्थान प्राप्त झाले. दुसऱ्या स्वरूपाच्या ज्ञानाचा स्विकार जनसामान्याने केला.त्यातून नितीशिक्षण आणि मनोरंजन करून घेतले.नीतीकथा त्याचप्रमाणे मनोरंजनात्मक लोककथा अस्तित्वात आल्या, रूढ झाल्या. जनसामान्यांमध्ये परंपरेने प्रचलित राहिल्यामुळे त्यात परिवर्तन होत गेले.त्यात नवनवीन भर पडत गेली.व या लोककथा जनसामान्यांच्या संपत्ती बनल्या.

४) चौथ्या अवस्थेत लोककथा आपल्या मूळ स्त्रोतापासून तुटल्या आणि निरनिराळया मानव समूहांसमोर जगातील विविध भौगोलिक प्रदेशात प्रसार पावल्या.निरनिराळया प्रादेशिक विभागात कथांमध्ये बदल झाला. त्यात वाढ झाली.त्याला नवीन शाखोपशाखा फुटल्या.कथेचे स्वरूप इतके पालटले की मूळ कथेशी त्याचा कोणताही संबंध उरला नाही.

५) लोकांमध्ये रूढ झालेल्या या लोककथा परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत राहिल्याने समाज मानसाशी त्या एकरूप झाल्या. त्यातून समाज मानसाची अभिव्यक्ती होऊ लागली.सारख्या स्वरूपाच्या इतरही कथा निर्माण झाल्या,काही अशा नवीन लोककथा निर्माण झाल्या. ज्यांचा पंरपरेने चालत आलेल्या लोककथांशी काहीही संबंध नव्हता.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, भारतीय समाजात लोककथांची परंपरा फार प्राचीन आहे.सृष्टीमध्ये घडणाऱ्या विविध बाबींचा अंदाज लावण्यासाठी लोककथांची निर्मिती झाल्याचे जाणवते. आदिम मानवाने सृष्टीचा अभ्यास करून तत्कालीन समाज व्यवस्थेच्या जडणीघडणी संदर्भात लोककथा निर्माण केल्या.सुरूवातीला हया कथा देव व धर्म याकल्पनेशी जोडून तत्कालीन समाज व्यवस्थेत निती अनितीच्या कल्पना निर्माण करून व्यक्ती वर्तनावर कशा

मर्यादा घालता येतील यावर लक्ष केंद्रीत केले.व मानवी जीवनाला हितकारक असणाऱ्या कायदेशीर असणारे वर्तनच व्यक्तीकडून घडून यावे अशी योजना लोककथांच्या माध्यमातून रूजविली गेली.व लोककथांची मांडणी त्या स्वरूपावर केली.की ज्या कथांच्या निर्मितीतून समाज मनावर निसर्गातील अनाकलनीय बाबींची भिती घालून त्यांचे वर्तन नियंत्रित करण्याचे काम लोककथांच्या माध्यमातून केले गेलेले आहे.या लोककथा प्रत्यक्ष जीवन व्यवहाराला मार्गदर्शन करतात. देव, दानव, अतिमानवी शक्ती अशा बाबी लोकांच्या मनावर बिंबवून त्यांच्यामध्ये श्रध्दाभाव निर्माण करण्याचे काम लोककथांनी केले.यातून विविध परंपरा व विधींची निर्मिती झाली व या परंपरा व विधी मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनला.व या विधी व परंपरेला धरूनच मानवी व्यवहार घडू लागले.

अशा कथा प्रत्येक जाती,जमातीत अस्तित्वात असलेल्या दिसतात. कथेकडे केवळ कथा म्हणून पाहिले जात नाही तर त्याद्वारे सामाजिक संदेश त्या-त्या जमातीतील लोकांपर्यंत पोहचविला जातो.

### ३.७.६ पारधी जमातीतील लोककथा व त्यांचे महत्व :-

पारधी समाजाचे भावविश्व हे अनेक लोककथांनी व्यापलेले आहे. या लोककथा या समाजाचे नियमनांचे कार्य पार पाडतात. येणा-या नवीन पिढीला लोककथांच्या माध्यमातून सामाजिक संदेशनाचे व सामाजिकरणाचे काम केले जाते. जमातीतील काही विरांच्या शौर्याच्या गाथा पुढील पिढीला प्रोत्साहीत करतात. अशा काही कथांबददल क्षेत्रीय सर्वेक्षणादरम्यान पुढील प्रमाणे माहिती मिळते.

**''एका कोळयाची गोष्ट''**

''एक कोळी होता. हा कोळी ज्या भागात राहात होता त्या भागात दुष्काळ पडला. दुष्काळा मूळे कोळी दुस-या ठिकाणी स्थलांतरीत झाला. काही दिवसांनंतर कोळयाची बायको गर्भवती राहीली. व तीला मुलगा झाला. एकदा कोळीन मुलाला पळसाच्या पानावर झोपवून बाहेर गेली. तिथे जवळच भवानी मातेचा तलाव होता तलावावर देवी आंघोळीला आल्यानंतर तीला मुलाच्या रडण्याचा आवाज आला. देवीने त्या बाळाला स्वत:च्या घरी आणून त्याचा सांभाळ केला. हळूहळू मुलागा मोठा होत गेला. तो मुलगा रोज होम करायचा. होमात गुग्गुळ टाकून पूजा करायचा. एकदा देवी मुलाला म्हणाली मला झोप यायला लागला,आता तुझ लग्नं करायला हवं. परंतु मुलगा

म्हणाला मला लग्नं करायचं नाही पुढं देवी गाढ झोपी गेली ती समाधीस्त झाली.वयात आलेला हा मुलगा पाणी घेवून येणा-या स्त्रीयांच्या माठाला खडे मारुन माठ फोडू लागला.

स्त्रीयांचीही छेड काढू लागला. बायांनी मुलाची राजाकडे तक्रार केली परंतु देवीचा मुलगा असल्यामुळे राजा देखील त्याला शिक्षा करायला घाबरु लागला. स्त्रीया त्रस्त झाल्या. तुकाई देवी हा सर्व प्रकार  पहात होती व तीला पोराचा राग येत होता. एकदा स्व:त तिनेच  स्त्री रुपात हंडा डोक्यावर घेवून पाण्याला निघाली. तिचा हंडा फोडण्याचा देखील मुलाने प्रयत्न केला पण हंडा फुटला नाही व लगेच ती अंतर्धान पावली व तीने भुंगे सोडले व भुंग्यांना आज्ञा केली की या पोराचे डोळे आणि रक्तशिरा व्यवस्थित ठेवा. भुंग्यांनी जेव्हा मांस खायला सुरुवात केली तेव्हा मुलगा आईभवानी कडे पळू लागला.पळता पळता एका घळीत पडला. देवीचे उठायचे दिवस जवळ आले होते . एके दिवशी देवी जागी झाली.परंतु तीला मुलगा कोठेही दिसेना. तेव्हा देवीने नगरीत जावून जनतेत मुलाविषयी विचारपूस केली तेंव्हा जनतेने देवीस मुलाबददल तक्रारी केल्या. तेव्हा देवी विचारात पडली मुलगा नेमकं कुठं गेला असेल. तेव्हा तीने अंतर्ज्ञानाने मुलाचा शोध घेतला. व मुलाजवळ गेली. तिच्या जवळ असलेल्या छडीने मुलाला उठविले व देवळात घेवून गेली. सर्व लोकांना जमवीले. तेव्हा देवी तुकाईही तेथे आली.

भवानी आईने तुकाईला विचारले तू याचे लग्न का करुन दिले नाही. त्यावर देवीने राजाची एक मुलगी व प्रधानजींची एक मुलगी अशा दोन मुलींशी त्याचे लग्न लावून दिले. व मुलाला सांगीतले की आता मी तुला दिसणार नाही. जेव्हा तुला माणी आठवण होईल तेव्हा देवदेव कर, गुढी लावं, पुढं त्याच्या अंगात वारं येवू लागलं. तो देवदेव करु लागला. फासे लावून हरण पकडून त्याचा नैवेदय देवीला देवु लागला. बोकडाचा नैवेदय देऊ लागला. कढईतील पु-या काढू लागला. पण कढईत पुरी कोणी टाकायची तर चारित्र्यवान बाईनं. असा त्याचा नेम होता. त्याला देवी प्रसन्न झाली. पुढे या दोनही बायकांना एक एक मुलगा झाला. एकाचं नाव धान्य व दुस-याच नाव धनाजी असं ठेवलं. पुढं या धान्य व धनाजी या दोघांचीही लग्न झाली. धान्य राजाला मुलं झाली. पण धनाजी राजाची कुस वांज राहीली. धान्य राजा मुसलमानांकडून देवीला बकरे कापू लागला. हे देवीला पटत नव्हते. धनाजी राजा वडीलांच्या सांगण्यानुसार देवीची पूजा करायचा. होमात गुग्गुळ टाकायचा. गुढी घ्याचया. धान्य राजा गावात राहायचा. त्याने धनाजीला रानात पाठवून दिले. देवी त्याच्या मागे गेली. व त्याला प्रसन्न झाली. मग धनाजीने देवीकडे मुलाची मागणी केली व पुढे

धनाजीच्या बायकोला मूलं झाले. त्याचे खडक्या असे नाव ठेवले. खडक्या मुलाला देवीने घेवून जावून त्याच्यावर माया करु नये म्हणून धान्य राजानं देवी कुलपांत बंद केली. धनाजीने देवदेव केला व गुढी लावली. देवीला तो म्हणला धान्य राजा मला तुला आणू देणार नाही. तेव्हा देवी देऊळ फोडून धनाच्या राजाच्या भक्तीमुळे आली. देवीने रेषा मारली. कारण पुजा होई पर्यंत धान्य राजा येवू नये. म्हणून धनाजीने देवदेव केला व तेव्हा पासून पारध्यांचा वंश वाढत गेला.'' (मुलाखत - मिथुन चव्हाण बुरडगाव रोड अहमदनगर )

## देवीचे सत्व

ब-याच वर्षापूर्वीची गोष्ट आहे. कुरसाळ नावाचा एक पारधी होता. त्याला मुलं होती. या पारध्याला गोधडया पारधी नावाचा भाऊ होय. व गोधडयाला मात्र मुलं नव्हती. मूल होत नसल्याने गोधडया पारध्याने देवदेव करणं बंद केले कारण देवदेव करुन काहीच उपयोग नाही असे त्याला वाटू लागले. व तो बायकोसह राहाते ठिकाण सोडून गेला. एका ठिकाणी गावापासून लांब आंतरावर आडरानात गोधडयानी आपलं पालं लावलं. एके दिवशी गोधडयाची बायको पाण्याला गेली, तेव्हा देवीनं डाकिनीचें रुप धारण केलं व गोधडयाच्या बायकोपुढं येवून उभी राहीली. देवीला न ओळखल्यामुळे त्याच्या बायकोनं देवीला काठीने मारत आणली. तेव्हा देवी नाराज झाली. परंतु जेव्हा देवी तिच्या मूळ रुपात आली तेव्हा मात्र बायको गडबडली व देवीची माफी मागू लागली. परंतु देवीने तीला म्हटलेमी ही तुझी परिक्षा पाहिली. परंतु तु परीक्षेत नापास झालीस तेव्हा मी तुला शाप देते की, तुला देवधर्मात कोणतेही स्थान असणार नाही. तेव्हा पासून बाईला देवधर्मात,देवजयात स्पर्श करु देत नाहीत. तिला देवापासून दूर ठेवलं ते आजपर्यंत .या समाजातील स्त्री देवापासून दूरच आहे.(मुलाखत-अनंता भोसले बु-हाणनगर, अहमदनगर.)

## चव्हाण व शिंदे यांच्यातील वादाची कथा

फार पूर्वी चव्हाण आणि शिंदे या दोन कुळांमध्ये पाचवी पूजतांना वाद झाला होता. या वादात चव्हाणांचा शेवट झाला होता. लुळगा नावाचा पारधी हा चव्हाणांचा गुरु होता. हा लुळगा एका गोसाव्याकडे राहून बंगाली विदया शिकला. नंतर तो राजाकडे राहिला. चांदबीबीच्या महालात लुळगा काही दिवस रहात होता. लुळग्याने एकदा पंगत दिली. लुळग्याने पंगत दिलेल्या ठिकाणी बरेच पारधी भिक मागण्यास आले. लुळग्याने भोसले, काळे, चव्हाण , पवार व शिंदे यां पाचही

कुळांना पंगत घातली. या लुळग्याने शिंदेचा सूड घेण्याच्या दष्टीने त्यांच्या अन्नात विष कालवले. व त्यामुळे सर्व शिंदे मेले, पुढे लुळग्याची बहीन बाळंतीन झाली व तिला मुलगा झाला. हा मुलगा लुळग्याच्या मांडीवर दिला. पुढे पंचांनी लुळग्याची समजूत काढली. पवार कुळातील एक मुलगी लुळग्याला व दुसरी त्याच्या भाच्याला दिली. यामुळे चव्हाण व पवार यांच्यात कोणताही वाद राहीला नाही परंतु चव्हाण शिंदयांत वाद कायम स्वरुपी राहीला म्हणून आजतागायत चव्हाण आणि शिंदयात आज तागायत रोटी व्यवहार होतो पण बेटी व्यवहार होत नाही. ''(मुलाखत-चलाशी रोहीदास काळे निमगाव वाघा, अहमदनगर)

## <u>हरीण आणि पाडस</u>

''महादेव नावाचा एक पारधी होता. ऐके दिवशी हा महादेव पारधी आपल्या भाबासोबत एका तळयाच्या काठावर शिकारीसाठी गेले. हरिण पकडण्यासाठी नानलो नावाचा फासा लावला व एक भाऊ हरिण वळून आणण्यासाठी गेला. ज्या ठिकाणी हा फासा लावला होता त्या ठिकाणी एक बेलाचे झाड होते तेव्हा महादेव पारधी या बेलाच्या झाडावर जावून शिकारीची वाट पहात बसला व वाट पहाता पहाता तो बेलाचे एक एक पान खाली टाकू लागला. तो ज्या झाडावर चढला होता त्या झाडाच्या खाली नेमकी महादेवाची पिंड होती. व ते  पान त्या पिंडीवर पडत होते. त्याच दिवशी महाशिवरात्री होती. त्यामुळे देव पारध्याला प्रसन्न झाला. महादेवाने इच्छा विचारली तेव्हा पारध्याने गाय आणि फासे मागीतले. पारध्याने लावलेल्या जाळयात हरिण सापडले. पारध्याला खुप आनंद झाला. परंतु हरणाने पारध्यास विनंती केली की माझ्या पाडसाला पाजून येते. पारधी म्हणतो कसा काय भरवसा तेंव्हा हरिण म्हणते मी तुला तसे वचन देते. जेव्हा हरिण पाडसाला पाजते तेव्हा पाडस म्हणते आज दुध कडू का लागते. तेव्हा हरणाने घडलेली सर्व हकीकत पाडसाला सांगितली तेव्हा पाडस म्हणते मी पण तुझ्या बरोबर येणार. दोघेही आलेली पाहून पारध्याला अत्यानंद होतो. परंतु पाडंस म्हणजे माझी शिकार करा व माझ्या आईची करु नका. पण हरणी म्हणते मला कापा माझ्या पाडसाला सोडा. हे सर्व प्रकार पाहून पारधी अचंबीत होतोव दोघांनाही सोडून देतो. '' (मुलाखत - सत्तु-या भोसले घोसपुरी,अहमदनगर )

### ३.७.१० पारध्यातील लोकगीते :-

लोककथांप्रमाणेच लोकगीते हे देखील 'पारधी' जमातीच्या समाज जीवनाचा मुख्य भाग आहे व त्यांच्या लोकसाहित्याचा देखील. लोकगीते हे प्रत्येक समाज व्यवस्थेत अस्तीत्वात असलेले दिसतात. आई-आजी कडून प्रत्येक समाज व्ययस्थेतील नवीन सदस्यांना त्या-त्या समाज व्यवस्थतील लोकगीतांची ओळख करून दिली जाते. लग्न, सण, समारंभ या प्रसंगी धार्मिक कार्यक्रमात कितीतरी वेगवेगळया प्रकारची गाणी गायली जातात. आंनदोत्सवात व दु:खद प्रसंगी देखील लोकगीतांना अतिशय महत्त्व असते. सण उत्सवाच्या प्रसंगी देखील लोकांनी पिढयान् पिढया अंगिकारलेली रीत म्हणून देखील काही गीते गायली जातात या सर्वांचा समावेश हा लोकगीतांमध्ये होतो. वास्तविक पाहता मानवी जीवनाचे एकही अंग असे नाही ज्याचा उल्लेख लोकगीतांत होत नाही. लोकगीते गाण्यामागे त्या-त्या समाज व्यवस्थेचा काही ना काही उद्देश असतो.

लोकगीतांच्या माध्यमातून त्या समाजाच्या वेदना, दु:ख, नीती, अनितीच्या कल्पना इ. बाबी व्यथा मांडल्या जातात. या सर्व प्रसंगावधानानुसार गायले जाते. अशी लोकगीते समाज व्यवस्थेच्या अस्तित्वापासून अस्तीत्वात आलेली दिसतात.

प्रत्येक समाज व्यस्थेचा मौखीक परंपरा हा अविभाज्य भाग आहे.व लोकगीते हा कोणत्याही समाज व्यवस्थेच्या मौखिक परंपरेचाच एक भाग आहे, कारण प्रत्येक समाज व्यवस्था ही धर्म, चालीरीती, यांनी युक्त असते व वर उल्लेख केलेली सर्व गीते हे भारतीय समाज व्यवस्थेतच नव्हे तर पृथ्वीतलावावर आढळणाऱ्या सर्वच समाज व्यवस्थेत थोडयाफार फरकाने वरील गीते कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तित्वात असलेली दिसतात. व या गीतांच्या माध्यमातून प्रत्येक समाज व्यवस्थेचे सामाजिक जीवन क्रियान्वीत झालेली दिसते. गीतांमध्ये मोठया प्रमाणात मतीतार्थ असतो.

पारधी जमातीचे जीवन अतिशय कठीण आहे. या जमातीत विविध प्रथा व परंपरा अस्तित्वात असलेल्या दिसतात. व या समाजातील गीतांची प्रासंगिकता स्थल कालानुसार असते. जन्म प्रथा, विवाह प्रथा, शक्ती पूजा, मर्तिक प्रथा याचबरोबर सामाजिक आणि नैतिक अधिष्ठणासाठी धार्मिक विधींना असलेले महत्त्व लोकगीतांच्या निर्मितीचे कारण असते. मर्तिक प्रथात दु:ख व्यक्त करताना काही गीते गायली जातात. पारधी जमातीत वृध्द पंचमंडळी किंवा

कुळातील देवदेव करणारी व्यक्ती जे काही मौखीक मंत्र उच्चारले जातात त्यांना गीतांचे स्वरूप नसते. मात्र जन्म प्रथेत बऱ्याच आया-बाया पारंपारिक गीते गातात. या गीतांमध्ये शक्ती मातेची स्तुती स्तोत्रे गायली जातात.

उदा :

यारी जाग जाग माता आय तू रे

यारी आया मारी जागरे भयना तू

यारी जागोलीनं जगाओ रोटया देवाला मनाओ

मॉ मारंगोळया गळया तारी वहींम राहा दिजे '' [१०८]

विशेषत: स्त्री बाळंत झाल्यानंतर नवऱ्याच्या शुभ हस्ते केस धुण्याचा विधी महत्त्वाचा असतो. अशुभ निवारण, मातृत्व जतन आणि पुर्नरफलन या दृष्टीने हा विधी केला जातो त्यामुळे या विधी प्रसंगीही नदीचे प्रतिकरून विधी विधान मांडून शक्ती आराधणेची गीते गायली जातात. नदी आणि देवी दोन्हीही मातृत्वाच्या प्रतिमा मानवी रक्तप्रवाहाच्या द्योतक आहेत. पौराणिक कथेतील दुर्गा आणि गंगा यांच्या प्रतिमांना मंत्र सामर्थ्य असलेल्या स्तुती गितांना गायीले जातात. मात्र ही गाणी काही विशिष्ट काळापुरतीच गायीले जातात. नागर जीवनातील जन्म प्रथेत पाचवी पुजा किंवा बारशे यातील जागरणाप्रमाणे ही रात्र-रात्र चालत नाहीत.पारधी जमातीबद्दल शिक्षणाची महती व पारधी समाजातील स्त्रीयांची अवस्था या बद्दल 'मराशी' मधून लेखक भास्कर भोसले पुढील गीतातून सांगितलेली दिसते.

''चोरीना शिकारीनां भिक मागावा लागडवाणी

पारधीनी रांड सिक बोल, गोळणीन मारी शिकाडवानी

तु खावघ हुई

पवित्र नख्यु बाळीन

तारारी छिमेलाथीं

देवगई बटाईन,

तु खावीत्री हीरी खुकसे आयुष्यभर झुरावणु ?

उघाडीकरी वाघरीवये

तारो छळ मांडयो

रगन पिणारी देवीये

पछे नाखोडो काडयो

हाल्यान, बोकडानं, कुकडा वाडोनु

आया जगनी तू

तुळ कोणी अर्थ कळयो

द झुगारीन

आ घांळ प्रथान

एक ना ब हया रीवजथी वागवानू

बोल अडाळींपळापर केव्हाणू हुयू

उभा खवखारणी तारा बरबाद होय

धन नको, दौलत नको, चालो ज्ञान मांगे''[१०९]

वरील लोकगीताचा विचार केला तर पारधी या जमातीत स्त्रीयांना असणारे दुय्यम स्थान कसे आहे हे दिसून येते. भास्कर भोसले यांनी पारधी स्त्री ची दैना वरील लोकगीता द्वारे मांडली आहे. ते म्हणतात आपल्या पोरींना शिकारीला पाठवायच की भिक मागाया पाठवायच की चोरी कराया शिकवायच की हे सर्व सोडून शाळेत पाठवायच कारण पिढयान् पिढया आपण हेच करत गेलो. पण आपल्या वाटयाला काय आले तर तू स्वत: शिकार झालीस तुला स्वत:चे पावित्र्य टिकविता आले नाही व तुझ्या स्पर्शाने देव सुध्दा बाटला जातो. खर तर तु सावित्री आहेस पण हे सर्व भोग का तुझ्या वाटयाला आलेत. कित्येक पुरूषांनी तुला नग्न केले तेंव्हा ज्या देवीची तू आराधना करतेस अशा देवीने पळ काढला. तुझी आब्रु जाण्यापासून तुला वाचवले नाही मग तू अशा देवीस का मानतेस. हाल्या, बोकडं, कोंबडे कापून देवीला प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करणारी तू तुला हे काहीच कसे समजत नाही. तेव्हा तू हे सारे झुगारून दे ही सर्व अंधश्रध्दा आहे. तुझे दोन-दोन लग्न होतात तुला गहाण ठेवतात यातन आतापर्यंत तुझी कोणती प्रगती झालेली आहे. यातून केवळ तुझ्या संसाराची बरबादी झाल्याची दिसते. तेव्हा धन दौलत यांच्या मागे न लागता तू केवळ ज्ञानाच्या मागे लाग आणि हे ज्ञान तुला केवळ आणि केवळ शिक्षणाने मिळेल तेव्हा तू तुझ्या मुलींना शाळेत पाठव जेणे करून जे तुझ्या वाटयाला आले ते तुझ्या मुलींच्या वाटयाला येऊ नये.

या समाजातील लोकगीतांच्या स्वरूपाबद्दल बोलताना लष्क-या काळे असे सांगतात की, लोकगीतांचे स्वरूप हे धृवावर्तनीय स्वरूपाचे असते त्यात ध्रपद मांडता येऊ शकते व नाही मांडले तरी चालते. मात्र साखळी गीतांप्रमाणे समान शब्द रचनेसह मालारूपक किंवा सांगरूपक या स्वरूपात ते रचनेची पुनरूक्ती करीत करीत पुढे जाते. उदा.

ओ मारा देईना लंबा लंबा केस

ओ मारो देईना मोठं मोठं दात

अन दात काय का घा पाडापर

ओ मारा देईना लंबा लंबा हात

अन् हात काय छोटया पाडावर

ओ मारा देईना मोठा डोळो

अन् डोळो शू छोटया पाडावर (मुलाखत-लष्क-या काळे, देऊळगांव, श्रीगोंदा)

वरील गीतामधून शक्ती देवतेचे वर्णन केलेले आहे. हया गीतांचे स्वरूप हे वेगळे जरी असले तरी ते बडबड गीतासारखे निरर्थक नाही. यात काहीतरी हेतू बाळगून हेतूपूर्ण वर्णन केलेले असते. कारण पारधी ही जमात सतत भटकंती करणारी जमात आहे. त्यामुळे या जमातीचे जीवन अस्थिर असते. तेव्हा एखादया स्थिर समाजाप्रमाणे हया लोकांचे जीवन अस्थिर असल्याने सणोत्सव साजरे करण्याची फुरसत या जमातीकडे नसते. तेव्हा अशा स्वरूपांच्या गीतांची योजना या समाजाच्या लोकसाहित्यात आढळतात.

या जमातीत विविध प्रसंगी विविध प्रकारच्या गीतांचे गायन केले जाते. जसे जन्म प्रथेचे वेळी पुढील प्रमाणे गीताचे गायन होते हणम्या भोसले असे सांगतात की

न्हाईलरे याडा न्हाईल

तारा उपरती गंगा जमुना बहिजा

तू न्हाई न्हाई हाशील तू न्हाई हाशिल

ले दादाजी तारा हातमं दुडी

न्हाईलरे याडा न्हाईल

तारा उपरती तपती यमुना बहिजा

पान लाऊ काई फुलरं लाऊ

लाऊ तारा मंडप मं

तू न्हाईल रे याडा तू न्हाईल

तारा उपरती गिरजा-दुधना बहिना (मुलाखत-हणम्या भोसले, निमगांव वाघा, नगर)

विवाह प्रथेप्रसंगी विवाहाच्या जवळपास सर्व विधींना आणि विधानांना मंत्र सामर्थ्य असलेल्या विवाह गीतांनी संपन्न केले जाते. नवरा, नवरी, शुध्दशुध्द विवेक, पाठवणी, कुलदैवत, कुलाचार या सर्व गोष्टींसाठी गीते म्हटली जातात.

बायराथी ऊदूकर शाळने शिवार

माळघर ऊीरी राहीन,

फराव गोफळ भर, भर,

बई ग आया आया, खेतरमणा पाखरा, (पिखडा)

काळी आईमं, पडखेतरमं,

कयुमये, जिवनू रान

धरीमये येर झराणी चाव्हंर

काम कर्यु वहाणाथी वाळाथी हुईरी खांज,

कष्टकरीन आ उभु कऱ्यु पिंक आसेल,

पाखरांवणा थवा आव, उभू कर बुजगावणू,

फुलना चिकाटाम, पिक आयु हुडुामं

नासधुस करसे, आ धन मारू सारू

झंजुमंजुम तु उठ वांळहाणी

कडक थंडमं, पिक आयु सेलकू,

आगल्या काळमं नटाय सवकार ''[१११]

वरील लोकगीताचा विचार केला तर शेताची राखण करताना मनोरंजन व्हावे, शेतराखणाची प्रेरणा मिळावी यासाठी या लोकगीताची रचना केलेली दिसते.

पारधी जमातीत वेगवेगळया कुळानुसार वेगवेगळया देवींची पूजा केली जाते तसेच काही विधी करतांना देवीची आठवण करत पुढील गीतातून देवीवरील श्रध्दा व्यक्त करण्यासाठी हे लोकगीत

म्हटले जाते असे भास्कर भोसले म्हणतात. आपणास येतील, या सुरात गाणे गातात व जणू काही साक्षात देवी संगेच बोलतायेत अस दर्शवितात.

जी बोलो, जी बोलो, हुंम हुंम हुंम ....

बोलरी मैना मारी, बोलरी रांळी हो

सिनाथी नाराज छतू रांळी मारी, हो, हा ....

आ देख रांळी महीनाना महायं हाजूक

झवारणू करीश,

आज विच्यारपर बोकडाचे धडमुंडी लिदी,

जी बोलो, जी बोलो जी बोलो

हुंम हुंम l हुंम तो नौकोड हुंम तो नौकोड ''[११२]

अशा प्रकारे वरील गीत हे जव्हारणं वेळी गायीले जाते यातून ती व्यक्ती देवीशी प्रत्यक्ष संवाद साधतांना दिसतात. व देव वर्षानुवर्ष रंगतच राहिले व वर्षातून दोन-तीन वेळा देवीला खुश करावे त्यातून आपली उन्नती साधण्याचा प्रयत्न केला जातो.पारधी जमातीचे सामाजिक स्थान हे अतिशय हालाखीचे आहे. या समाजात जन्म घेणे म्हणजे जन्मत:च गुन्हेगार असणे. या समाजात जन्म घेतल्यानंतर किती हाल अपेष्टांना सामोरे जावे लागते हे दैना मधून पुढील गीताच्या आधारे भास्कर भोसले सांगतात.

**दैना**

निर्भय देह आ म देईन दर्वाजाम आयो

ये यमराजा मं हामंक्या मरळना आगळ आयो .....

फेडसे उपकार खारा, झोळी पाखरावतो, दर्वाजाम थांब्यो,

वायराये बी चेष्टा करवाणी, हामारा फाटका पालनी,

जीम फाटसे तीम ज्याखतच उसवतो गयो,

निर्भय, देह आ म होईन दर्वाजाम आयो ....

माकड वाकुल्या आदमीवनो, बंडखोर होईन उठायो,

जलम्यो पारधी जातम,

क्रुर शिक्षा वाळावणो गुन्हेगार होय,

जन्मताचं कलंक कपाळावर, दैना आ पुरीन उंबरी,
जिम छळयु तीम देह बरबाद होयो,
निर्भय देह, आ म होईन दर्वा जाम आयो ....
पेटना पगे जगणे रांखळ करी,
चोरटावथी आयुष्य डळतो बेठो,
गळी गया हात जुलमी बेडेवधी,
आधुनिक युगमही कायमनो भटक्योच रहयो,
मोहाम आ सजाच होती रही,
काटा तुडाईन नखातांना रक्तबंबाळ होयो,
ये यमराज हमक्या मरळना आगळ आयो,
निर्भय देह, आम होईन दर्वाजान आयो ''[११३]

वरील कवितेच्या माध्यमातून पारधी जमातीत जन्माला आल्यामुळे किती यातनांना सामोरे जावे लागते हे भास्कर भोसले यांनी निडरपणे मांडले आहे. अगदी संकटांचा सामना करून करून मी इतका निडर झालो की प्रत्यक्ष यमदूताला ते म्हणतात की तुझ्यात हिम्मत असेल तर ये मी केंव्हाही मरणाला सामोर जायला तयार आहे. कारण या समाजात जन्म घेतल्या पासून मी इतक्या संकटाना सामोरे गेलो आहे की त्या पुढे मृत्यु ही बाब मोठी नाही तेव्हा ते या कवितेच्या माध्यमातून म्हणतात, निर्भय नरदेह हा मी होऊन दारात आलो, ये यमदूता मी मरणाला सामोरा झालो.

पारधी जमातीला गुन्हेगारी कलंकाने ग्रासले आहे. याबद्दल एका कवितेला 'भास्कर भोसले' यांनी 'मराशी' तून व्यक्त केली आहे ती पुढीलप्रमाणे

**'गुन्हांवाळा कोळ'**

आ केव्हो न्याय भाई ?
हाम पारधी करीनव गुन्हावाळा कशु ?
तुच बोल भाई, हमरो गुन्होतरी शु ?
रातना महाय पोलीस ये
पालनं येडो घाल्यो, मारो तो एखलोच वाघरी

अंगनो थरकाप उडयो ....

सापळाम धरीन च्युरी बाजूथी

कुत्र्यानीगत माऱ्यो ....

उपर धरीम गेटमं लिजानानी पार वाकीन गयो

हानं बोल, हिन बोलं,

खारा गामंभरी करी

पहिल्यान पगेपडी, सरपंचना पगेपडी

मरेलानी नजर करी,

''पौश्या देऊच छोकरी, पळं एक मोका द!''

हिनं चुकाईन, छडो खावती नाखती छुटी,

करीन जामीन भी मळयो कोणी

तुच बोल भाई, हमरो गुन्होतरी शु !

म रोज गेटम येढा मारवाणी

खाजनं छोकरावम शेती बेखोनी

एक दण फौजदार घरच आयो

कोणी त्यो चौवकशे करीन गयो

मारी इज्जनोच तडो गयो

हमक्या तरी छोड

तरीबी हिनं छोडयू कोणी '' [११४]

वरील गीतातून गुन्हेगारी जमात म्हणून कलंकीत झालेली पारधी जमात ही किती क्लेशदायक जीवन व्यथीत करते हे दिसून येते. जन्म घेणं हे व्यक्तीच्या हातात नसंत 'पारधी' म्हणून जन्मला की तो गुन्हेगारच असतो. तो गुन्हा करो अगर न करो पोलिसांचा ससेमीरा हा कायम त्याच्या मागे असतो. पाटलाला विनवल काय किंवा सरपंचा पुढे पदर पसरला काय काहीही फायदा नाही. उलट या साऱ्यांचीच पारधी स्त्रीयांवर वाईट नजर अशी वाईट सामाजिक स्थिती या जमातीची असलेली दिसते.

पारधी जमातीला उपजीविकेचे कोणतेही साधन नाही. जंगल विषयक कायदे कठोर झाले तेव्हा शिकार गोळा करून विकणे हे साधणेही संपली तेव्हा भीक मागण्या शिवाय पर्याय उरला नाही तेव्हा नामदेव भोसले यांनी 'वाड' या लोकगीतातून भिक्षेकरी पारध्याची व्यथा मांडली आहे ती पुढीलप्रमाणे आहे.

**''वाड''**

दरी आया हामक्या दरी आया

शिकारी वाघरी होयो भिकारी

टिचभर पेटणा पगे फरू करू दरवाजू

बरबादीनी मारी कहांळी छं ll

दरी आया हमक्या दरी आया ll१ll

उघडा माळभर पाल मारू उघडू

अटो कोणी थाळीमं, बळं कोणी चुल्हो,

भुक्तो खावानं उठली छं,

दरी आया हमक्या दरी आया ll२ll

ब जिवणी उपासी घ्या, गिधाड टपीलू

बोबानं बी पहाणो, फूटं कोणी,

दरी आया हामक्या दरी आया ll३ll

पाछल्या घर कुत्र कडयू

हाड हाड बोलन, हिनं तारू घर देखाळयु

वाशी कुशी कायबी दरी आया

दरी आया हामक्या दरी आयाll४ll

हामं पारधी पारधी गुन्हेगार होया,

नाखता नाखता हमारू गाम भुलाई गया,

मयत बी किनं झगा दिदी कोणी,

दरी आया हमक्या दरी आयाll५ll

मांगता मांगता आखी ममयी देखी लिही

भिंगरी नी गत गोडाशी दिलीमं आईll
केव्हा केव्हाणं मये मांगवाणे न्याय,
दरी आया हामक्या दरी आया ll६ll''[११५]

या गीताचा सविस्तर तपशील पाहिला तर भिक मागतांना पारधी समाजाची ससेहोलपट दिसून येते. टिचभर पोटासाठी दारोदार फिरावे लागते. 'पारधी' म्हणून जन्माला आल्यानं आम्ही गुन्हेगार झालो, कुणाच्या दारात कुत्र चावतंय तर कुणी अपमानीत करून हाकून देतय भिक मागत हिंडता हिंडता संपूर्ण मुंबई पाहिली भिक मागता मागता मात्र लेकरांची देखील ताटातूट झाली आई मुंबईत भिक मागते तर मुलगा दिल्लीत भिक मागतो. आता असे ही भिक्षा किती दिवस मागायची हे तुम्हीच सांगा.

वरीलप्रमाणे 'पारधी' समाजात आढळणाऱ्या लोकगीतांचा आढावा घेतला तर असे दिसून येते की, सर्वच लोकगीते ही 'पारधी' जमातीची दयनीय स्थिती वर्णीतात. 'पारधी' समाजात आढळणाऱ्या विविध परंपरा प्रसंगी विविध लोकगीतांचे गायन केले जाते. या लोकगीतांमध्ये विशिष्ट अर्थ असतो व तो अर्थ प्रासंगिक असतो. प्रत्येक प्रसंग कसा आहे. त्यावर लोकगीतांची रचना केलेली असते. काही लोकगीते हे तर त्यांच्या सामाजिक संरचनेचाच भाग आहेत. या लोकगीतांच्या अभ्यासातून हया समाजाची दयनीय स्थिती, अंध:श्रध्दा, स्त्रीदास्य, गुन्हेगारीचा कलंक व त्यातून होणारी सामाजिक हेळसांड या सर्व बाबींचा प्रत्यय येतो.

### ३.७.११ पारधी जमातीतील म्हणी व वाक्प्रचार :-

म्हणी व वाक्प्रचार हा प्रत्येक समाज व्यवस्थेच्या सामाजिक संरचनेचा एक भाग आहे. आदिम, ग्रामीण व शहरी संस्कृतीत देखील म्हणी व वाक्प्रचारांचे प्राबल्य दिसून येते या म्हणी व वाक्प्रचारातून प्रत्येक समाज व्यवस्थेत काही सामाजिक संदेश दिला जातो. हया बाबी समाज सदस्यांच्या वर्तनावर देखील नियंत्रण ठेवतात. कारण काही म्हणी या अनुभवावर आधारीत असतात. उदा. करावे तसे भरावे , 'कर नाही त्याला डर कसली', या म्हणी साधारणत: सामान्य समाज व्यवस्थेत आपण जर काही वाईट कृत्ये केली तर आपल्याला काही ना काही संकटाचा सामना करावा लागेल व आपण जर कोणतेही दुष्कृत्ये केले नाही तर आपणास कोणताही त्रास होणार नाही असा लोकमानस आहे व यातुन ब-याच प्रमाणात कोणत्याही समाज व्यवस्थेत

अनैपचारीक नियंत्रणाचे कार्य पार पाडले जाते. अशा बऱ्याच समजूती पारधी जमातीत देखील असल्याचे दिसते.

- **म्हणी :-**

पारधी जमातीत सांकेतीक पारूषी भाषेतही म्हणींचा वापर केलेला दिसतो. किंबहूना म्हणी हे अविष्काराचे भक्कम साधन वाटते. म्हणींच्या पाठीमागे कथात्मक भावाविष्कार दडलेला असतो. उदा-

''आमतानं आयता बेरवीनं खाय
अन् बढाई मारती जाय''[११६]

वरील म्हणीचा अर्थ हा जे व्यक्ती कोणतेही काम करत नाही ते ऐतखाऊ असतात व ते काहीही न करता केवळ बढाया मारण्यात पटाईत असतात. व पारधी जमातीत देखील अशा स्वरूपाचे लोक असतात तेव्हा त्यांना हिनविण्यासाठी जरूर हया म्हणीचा उपयोग केला जातो. हया म्हणीचा उपयोग करण्यामागे मुख्य हेतु हा असतो की रिकामटेकडया मानसाची स्वभाववृत्ती दर्शविणे व त्या व्यक्तीजवळ ही म्हण उच्चारून त्या व्यक्तीच्या स्वभावात काही परीवर्तन होते का ते पाहणे.

''बाकमथी खाकर, मेनमथी''[११७]

वरील म्हणं ही जरी पारधी जमातीत प्रचलित असली तरी ही म्हण इतर समाजातही असलेली दिसते. 'तोडांत साखर, व मनात इखर' असा हिचा शब्दश: अर्थ होतो. ओठात एक आणि पोटात दुसरेच अशी माणसं समाजात असतात. ते वरकरणी गोड बोलत असले तरी कधी धोका देतील हे मात्र सांगता येत नाही. पारधी समाजातही अशा लोकांचा प्रत्यय येतो.

- **वाक्प्रचार :-**

वाक्य संप्रदाय हा त्यांच्या व्यवसायिक व जमात निष्ठ भाषेचा व सांकेतीक भाषेचा फार मोठा भाग असल्याचे दिसते. याचे स्वरूप देखील इतर पंरपरेप्रमाणेच दिसून येते.

''कांगलो खाटक् देखनू''[११८]

(कावळयाच्या नजरेने पहाणे)

एखाद्या व्यक्तीचा स्वभावगुण नेमक्या शब्दात मांडण्यासाठी वरील वाक्प्रचार वापरला जातो. एखादा व्यक्ती जेव्हा एखाद्या घटनेकडे चिकीत्सक वृत्तीने पहातो तेव्हा हा वाक्प्रचार आमलात आणला जातो. पारध्यांमध्ये बरीच मंडळी अशी आहेत की ते एखाद्या घटनेकडे चिकीत्सक वृत्तीने किंवा बारकाईने पहातात.

"नशिब म्हायं कोन हिरा"[११९]

(नशिबामध्ये जे असते ते कोणीही हिसकावून घेवू शकत नाही)

सर्व सामान्य समाजात देखील ही म्हणं जास्त प्रचलित असलेली दिसते. तसेच पारधी जमातीत देखील ही म्हण दिसते. कदाचीत इतर समाजाशी काहीशा प्रमाणात येणाऱ्या संपर्कातून देखील ही म्हण तिकडे संक्रमीत झालेली दिसते. माणसाने आपल्या जीवनात प्रयत्ना बरोबरही नाशिबालाही महत्त्व दिलेले आहे. प्रयत्न करूनही एखादी गोष्ट आपल्या नशिबात नसेल तर मिळणार नाही. अशी धारणा आहे. पारधी समाज हा तर इतर समाजापेक्षा दैवाधीन जगणारा आहे. नशिबाला माननाणारा आहे. असे वाक्प्रचाराला इतर समाजाप्रमाणे या समाजातही या वाक्प्रचाराला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

### ३.७.४ पारधी जमातीतील रूढी आणि परंपरा :-

भारतीय समाज व्यवस्थेत प्रत्येक समाजात स्वत:च्या अशा रूढी व परंपरा दिसून येतात. त्या रूढी व परंपराचे प्राबल्य त्या-त्या समाजात असते व त्या नुसारच त्या समाज सदस्यांचे जीवन क्रियान्वीत होत असते.

- **रूढी : व्याख्या :-**

**१) समाजशास्त्र विश्वकोश :-**

"पिढी-दर-पीढी चले आ रहे सामाजिक मान्यता प्राप्त सोचने विचारणे और व्यवहार करने के ढंग को कहते है l"[१२०]

वरील व्याख्येचा विचार केला तर असे दिसते की, एक पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमीत होणारे विचार, व्यवहाराला रूढी असे म्हटले जाते. एखादा वर्तनप्रकार जेव्हा समाजातील अनेक लोकांकडून स्विकारला जातो तेव्हा त्या वर्तन प्रकाराला रूढीचे स्वरूप प्राप्त होतो. जसे अभिवादन करण्याची पध्दत ही समाजात रूढ असली तरी समाजा-समाजानुसार तिचे स्वरूप वेगळे

असते. वेशभूषा, करण्याची पध्दती, अभिवादन करण्याची पध्दती ही सर्व रूढींची उदाहरणे आहेत. अशा अनेक रूढी पारधी जमातीत असलेल्या दिसतात.

- **पारधी समाजातील धार्मिक रूढी :-** ”[१२१]

१.पारध्याच्या पालात पश्चिमेच्या बाजूला त्यांचे देव पेटीबंद असतात. त्यांची पूजा करतानाच पेटी उघडली जाते.

२. पूजा नैमित्तिक असते. नित्य बाहेरूनच पूजा केली जाते.

३.स्त्रियांच्या विटाळाला धार्मिक कठोर निर्बंध आहेत.

४.जव्हारणं हे विधीनाटय हा त्यांच्या सर्वंकश-जीवनाचा आधार आहे.

५.पुरलेल्या व्यक्तीचे देवात रूपांतर करतात.

६.धार्मिक नैवेद्यात रक्त मांसाचा नैवेद्य दाखवला जातो.

७.लुबाडणे, ओरबाडून नेणे, चोरी करून नेणे या क्रियांना धार्मिक अधिष्ठान आहे. शिकार हा त्यांचा धर्म आहे.

८.बाटवणे किंवा बहिष्कृत करणे व पुनरशुध्दीकरण करणे यासाठी वस्त्रे, मुत्र अंगावर टाकणे, जनावरांचे मांस दारात, अंगावर टाकणे, विहिरीत कुत्रे टाकणे, तेलातून पुऱ्या काढणे, पुरलेल्या व्यक्तीची हाडे उकरून काढणे अशा नागर समाजाला विचित्र वाटणाऱ्या रूढी धर्मश्रध्देने पाळल्या जातात.

९) पाले पूर्व-पश्चिम असतात व पालांची, घरांची रांग दक्षिणोत्तर असते.

१०) जमातबाहय लोकांशी कसलाही संबंध ठेवत नाहीत.

११) वयात आल्यापासून पिता किंवा पती स्त्रीचा विक्रय विवाहाच्या स्वरूपात करून देऊ शकतो. एवढेच नव्हे तर पत्नी गहाण टाकण्याची तसेच दंड वसूली साठी जातपंचायती कडून तिचा लिलावही होऊ शकतो. गहाण वहित झालेली मूले गहाण घेणाऱ्यास व्याज म्हणून सांभाळावी लागतात.

१२) बाळंपणासाठी विश्रांतीची मुभा पाच ते दहा दिवसांची असते. मात्र तीन महिने तिच्या हातचे अन्न नवरा वगळता कोणीही खात नाही.

१३)जातपंचायतीतील पाटील किंवा पंच यांना न्यायाधीकारा विषयी विशेष महत्त्व असते.

१४)शिलभ्रष्ट स्त्री-पुरूष यांना बहिष्कृत करण्याची व जातपंचायती निर्णयाने दंड स्विकारून पुर्नस्वीकार केला जातो.

१५)व्यवसाय करतांना शकून अपशकून संकेत परिणामकारक ठरतात. कुत्रा फडफडणे, शिंक येणे हे अपशकून मानले जातात.

## ३.७.१२ पारधी जमातीतील श्रध्दा व समजूती :-

- **श्रध्दा"**[१२२]

१) शक्ती मातेच्या भक्तीने गुन्हेगारीतही यशस्वी होता येते.

२) जात पंचायतीचा न्याय हाच अंतिम न्याय आहे.

३) भूतेखेते, जादुटोणा या गोष्टी निश्चित असतात.

४)जव्हारणं करणे हा सर्व व्याप, ताप, संताप, शुभ, अशुभ, निवारण, शुध्दाशुध्द विवेक यावरचा अंतिम उपाय आहे.

५)सुर्य हाच आपला देव आहे व तोच आपला वंश आहे अशी त्यांची श्रध्दा आहे.

- **समजूती"**[१२३]

१) अपशकूनाने काम सिध्दीस जात नाही अशी समजूत या समाजात आहे.

२) स्वप्नात दृष्टान्त होतो.

३) या समाजात 'कापड कोरे राहाणे' हा चारित्र्य शुध्दतेचा संकेत आहे.

४) कठोर शिक्षा भोगल्याने शुध्दता प्राप्त होऊ शकते जसे उकळत्या तेलातून पुऱ्या काढणे, तापती कुऱ्हाड हातावर घेणे.

५) जव्हारव्यातील बळी बोकड सुटून पालाच्या पश्चिमेस गेला तर त्याला बळी देणे अशुभ मानतात.

६) गुंजविधीत (वाधवा) संकेतानुसार गुढी मिळाली नाही तर विधी निर्वेध होणार नाही अशी समजूत आहे.

## ३.७.१३ पारधी जमातीतील शकुन-अपशकुन :-

पारधी जमातीतील अंधश्रध्दा किंवा शकुन-अपशकून हा त्यांच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग आहे. हया अंधश्रध्दा त्यांच्या सामाजिक संरचनेचा एक भाग आहे. ज्यांच्या माध्यमातून त्यांचे

जीवन क्रियान्वीत होताना दिसते. या जमातीचा या शकून अपशकुनावर आजतागायता प्रचंड विश्वास असलेला दिसतो. या समाजात शकून हा क्वचीतच मानला जातो. जास्तीत जास्त अपशकुनावर जास्त भर असतो. या समाजातील वडीलधारी मंडळी नियमांचे काटेकोर पालन करताना पिढयान् पिढयांपासून दिसतात.

लेखक नामदेव भोसले यांनी या समाजातील शकून-अपशकुन मराशी पुस्तकातून पुढीलप्रमाणे सांगितलेले आहेत. त्या संदर्भात ते असे दिसतात की, ‘देव जशी तुटी देईल त्याच मार्गावर चालतात. ‘

कुठे चांगल्या कामाला निघालात किंवा काही कार्य करण्याकरता निघालात. लांब प्रवासावर चाललात किंवा शिकारीला निघालात अशा वेळी हे शकुन अपशकून मानले जात होते ते कसे होते.”[१२४]

१.कुत्र्याने कान हलविणे अपशकून मानला जातो.

२.कुठे जातांना एखादी व्यक्ती शिंकली की अपशकून मानला जातो.

३.पाहुण्यांकडे जातांना मांजर आडवी गेली तर अपशकून मानला जातो.

४.एखादया चांगल्या कामाला निघालात आणि मध्येच साप दिसला, तर अपशकून मानला जातो.

५.रात्रीच्या वेळी पिंगळा ओरडला तर उद्याचा दिवस आपणास चांगला जाणार नाही असे संबोधले

६.जाते व पिंगळा जोपर्यंत उडून जात नाही तो पर्यंत वेगवेगळे विचार बोलले जातात.

७.देवीपुढे बसले आणि देवीची गुढी जर देवाने लवकर दिली नाही तर काहीतरी अडचण आली असे समजायचे आणि त्याच आठ दिवसात देवीला बोकडाचा किंवा हब्या (वळू) चा बळी द्यावा लागायचा.

८.एखादी बाई रिकामा पाण्याचा हंडा, चरबी, घागर घेऊन गेली तरी अपशकून मानला जातो.

९.जर मुंगूस किंवा कोल्हा ज्या बाजूला ओरडला तर त्या बाजूला दुसऱ्या दिवशी जात नसे. काहीतरी धोका आहे असे मानले जायचे.

१०.जर का एखाद्या मुलाचे किंवा मुलीचे लग्न जमवायचे झाल्यास सगळया व्यक्ती पाहुणे मिळून आल्यास एखाद्या व्यक्तीला अचानकपणे काही कारणास्तव शिंक आलयस लग्न ठरविणे अपशकून मानले जाते व जमलेले लग्नही काही वेळेस मोडले जाते.

११.सकाळच्या वेळेला एखाद्या व्यक्तीचे तोंड पाहिले आणि दिवस चांगला गेला नाही तरी

देखील अपशकून मानला जातो.

१२. हजारो रोगानं मेलेल्या कोंबडया, शेळया, बकरी खाऊन जर एखाद्या मृत झाला, किंवा कोणी अपघातांन, दारू पिऊन, वयोवृध्द होऊन एखाद्या मोठया आजारांन मेला तर त्याला कुणीतरी करणी करून मारला, त्याच्यावर देवी कोपली. म्हणूनच असं झाल. नाहीतर आजून जास्त दिवस जगणार होता. असा समज आहे.

वरील विवेचनाचा विचार केला तर असे दिसून येते की, पारधी जमातीत प्रवास, लग्न जमविणे, धार्मिक विधी प्रसंग, एखाद्या चांगल्या कामास जाताना विविध अपशकून मानले जातात. या जमातीत आढळून येणारा 'मांजर आडवी जाणे' हा अपशकुन इतर सर्व समाजात आढळून येणारा आहे. भारतात जितके जातीय समूह आहेत. त्या सर्वच समूहांपर्यंत अपशकून आढळतात. परंतु समूहांपरत्वे त्यात भिन्नत्व दिसून येते. अपशकून हा सर्वच समाज व्यवस्थेत थोडयाफार फरकाने आढळून येणारा अंधश्रध्देचा प्रकार आहे. पंरतु बरेच समाज हे शिक्षित झाल्याने त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोण बळावून ते या अंधश्रध्देतून बाहेर पडलेले दिसतात. परंतु पारधी जमात ही आजही या अपशकून व अंधश्रध्देत जगतांना दिसते. पिंगळा ओरडला, पाल चुकचूकली, कोणी शिंकले यावर जास्त विश्वास या जमातीचा दिसतो. याची मुख्य कारणे, अज्ञान, गरीबी हे दिसून येतात. कारण या समाजाला समाज बहिष्कृत ठेवल्याने इतर समाजाशी त्यांचा जास्त संपर्क न आल्याने या लोकांमध्ये पाहिजे तितके परिवर्तन आले नाही व शिक्षणाचे प्रमाण देखील या समाजात अतिशय अत्यल्प राहिल्याने दारिद्रिय निर्मुलन झाले नाही तेव्हा या समाजात अंधश्रध्देचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते. अशा अंधश्रध्देला बळी पडून अनेक कुटूंबे बरबाद झालेली आपणास दिसून येतात. यामुळेच आजही या कुटूंबावर भिक मागण्याची वेळ टळलेली दिसत नाही. व अंधश्रध्देला चिटकून बसल्यामुळे आतापर्यंत गरीबी, अस्वच्छता व भिक मागण्या पलीकडे यांना काहीही मिळालेले नाही.

**पारधी बोलीतील काही वाक्ये :-**

'मराशी' या पुस्तकात लेखक नामदेव भोसले यांनी पारधी बोलीतील काही वाक्ये दिला आहे तो पुढीलप्रमाणे''[१२५]

१.मेथीनी भाजी हिरी तुनं खावानी कशु ?

( मेथीची भाजी आहे, तुला जेवायचे आहे का ?)

२.पालकनी हाटीव भाजी करील छ तुनं खावानी कशू ?

(पालकाची हाटीव भाजी केली आहे, तुला खायची आहे का ?)

३.आळूनी भाजी करील हिरी चालो अपळ खारा जळा मळीन खाये ?

(आळुची भाजी केली आहे, चला आपण सगळे जण मिळून खाऊ ?)

### ३.७.१५ पारध्यांची सांकेतीक भाषा :-

पारधी समाजाला १८७१ च्या गुन्हेगारी जमात कायदयानंतर चोर किंवा गुन्हेगार जमात असे शिक्कामोर्तब झालेले होते. उपजिविकेचे कोणतेही साधन नसल्याकारणाने या जमातीला चोरी करण्याशिवाय पर्याय नव्हता. तेव्हा चोरीचपाटीच्या वेळी परस्परांशी आंतरक्रिया करण्यासाठी ही जमात सांकेतीक भाषेचा वापर करते. पारध्यांच्या सांकेतीक भाषेला पारूशी असे म्हणतात. या त्यांच्या सांकेतीक भाषेत त्यांच्या बोलीभाषेपेक्षा वेगळी घडण नसते तर त्यांच्या दैनंदिन बोलीमध्ये विशिष्ट प्रसंगी जसे उदा.चोरी, जातपंचायत, जोव्हारणं इ. प्रसंगी संकेतांचा भरण असतो. एक प्रकारे जमातीची ही सांकेतीक भाषा अन्य जमातींच्या पलीकडील व पारधी समाजापुरतीच मर्यादीत अशी असते असे क्षेत्रीय अध्ययन करताना लक्षात येते.

**पारधी सांकेतीक भाषेतील काही शब्द पुढील प्रमाणे सांगता येतील.''**[१२६]

| | मराठी | पारधी | सांकेतीक भाषेतील शब्द |
|---|---|---|---|
| १ | पोलीस | डोडया | साटो-ऊस |
| २ | बायको | रांड | ईटी-आंगठी |
| ३ | चोरी | वशाळी | नखट-नखं |
| ४ | पाय | गोडी | बटलो-पाखरू |
| ५ | शेतकरी | माडखावनो | छरी-सुटी |
| ६ | गाव | गाम | सिवा-सिंह |

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, पारध्यांची सांकेतीक भाषा ही त्यांचा व्यवसाय, जातपंचायत, स्त्री-पुरूष सबंध आणि जव्हारणे यासारखे विधिनाटय या संदर्भात पारिभाषिक,

गुप्तभाषे सारखी वापरली जाते. पारधी स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व व गुप्तता सांकेतीकतेच्या साहाय्याने टिकवून ठेवण्यात कडवे असतात हे क्षेत्रीय अभ्यासातून लक्षात येते.

**तक्ता क्र. ३.१**

**ंभारतात पारधी जमातीचे लोकसंख्येच्या आधारे, राज्यनिहाय वितरण दर्शाविणारा तक्ता**

| ***घटक राज्य*** | ***लोकसंख्या*** |
|---|---|
| ***महाराष्ट्र*** | ***१,९९,०००*** |
| तेलंगणा | ४९,००० |
| मध्यप्रदेश | २४,००० |
| छत्तीसगड | १७,००० |
| ओरीसा | १४,००० |
| गुजराथ | १३,००० |
| कर्नाटका | ६,८०० |
| केरळ | २,३०० |
| आंध्रप्रदेश | ९०० |
| राजस्थान | २०० |
| गोवा | ४० |
| ***केंद्रशासित प्रदेश*** | ***लोकसंख्या*** |
| दमण आणि दीव | ४० |
| दादर आणि नगर हवेली | ३० |

**स्त्रोत :** https://joshuaproject.net>people_group

वरिल तक्त्यावरुन असे दिसून येते की महाराष्ट्र, तेलंगणा, मध्यप्रदेश,या राज्यात पारधी जमातीचे लोकसंख्याही सर्वात जास्त दिसते.

**तक्ता क्र. ३.२**

**भारतातील पारधी समाजाचे धर्म निहाय वर्गीकरण दर्शविणारा तक्ता**

| ***धर्म*** | ***पारधी लोकसंख्या*** |
|---|---|
| हिंदू | ९९.५०% |
| ख्रिश्चन | ०.०६% |
| बौध्द | ०.१०% |
| इस्लाम | ०.१७% |
| धर्मच नाही असे | ०.००% |
| इतर | ०.००% |
| माहिती नसणारे | ०.१८% |

**स्त्रोत :** https://joshuaproject.net>people_group

उपरोक्त तक्ता हा भारतातील पारधी समाजाचे धर्म निहाय वर्गीकरण दर्शवितो.या तक्त्या वरून अनुक्रमे असे दिसते की, हिंदू धर्म असणारे पारधी ९९.५० इतके आहेत.तर ख्रिश्चन ०.०६ बौध्द ०.१०, इस्लाम ०.१७, धर्मच नाही असे ०.०० , इतर ०.००, माहिती नसणारे ०.१८ असे आहेत.म्हणजे सर्वात जास्त हिंदू धर्म असलेले पारधी आहे.

**तक्ता क्र. ३.३**

**भारतातील पारधी जमातीचे भाषीक वर्गीकरण (पारधी भाषेव्यतिरीक्त) दर्शविणारा तक्ता**

| ***दुय्यम भाषा*** | ***लोकसंख्या*** |
|---|---|
| मराठी | ७५,००० |
| हिंदी | २५,००० |
| भिल्ल | १७,००० |
| ओडीया | १२,००० |
| गुजराथी | १०,००० |
| तेलगु | ६,००० |

| | |
|---|---|
| खानदेशी | ४,२०० |
| हलबी | ३,३०० |
| छत्तीसगडी | ३,००० |
| कन्नड | २,७०० |
| अहिराणी | २,७०० |
| कोकणी | १,५०० |
| गोदी | ६०० |
| उर्दू | ६०० |

**स्त्रोत :** https://joshuaproject.net>people_group.

वरील तक्त्यावरून सर्वात जास्त पारधी हे मराठी भाषा बोलणारे आहेत. म्हणजेच इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र या राज्यात पारधी जमातीची लोकसंख्या जास्त असलेली दिसते.

**तक्ता क्र. ३.४**

**१९९१ व २००१ च्या जनगननेनुसार महाराष्ट्र राज्यातील पारधी जमातीची जिल्हानिहाय लोकसंख्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | जिल्हा | १९९१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | अमरावती | १३,९४३ | १८,४२४ |
| २ | अकोला / वाशिम | ११,२७१ | १६,६६३ |
| ३ | जळगाव | १२,७७४ | १४,०६४ |
| ४ | बुलढाणा | ९,९०८ | १२,१४० |
| ५ | सोलापूर | ७,३३२ | ८,४७० |
| ६ | धुळे / नंदुरबार | ६,३६७ | ७,८२८ |
| ७ | उस्मानाबाद / लातुर | ५,४५१ | ७,७४१ / ४६३ |
| ८ | यवतमाळ | ४,४१० | ७,००१ |
| ९ | पुणे | २,७२० | ४,७२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | अहमदनगर | ३,६१८ | ४,६५८ |
| ११ | मुंबई आणि उपनगरे | २,१९७ | ३,५४९ |
| १२ | नाशिक | २,२२३ | ३,३०८ |
| १३ | परभणी / हिंगोली | २,३३१ | २,४८५ |
| १४ | वर्धा | १,७४८ | २,२८१ |
| १५ | बीड | २,०७९ | १,९९२ |
| १६ | नागपूर | १,३०० | १,५३२ |
| १७ | नांदेड | ८३२ | १,११४ |
| १८ | ठाणे | ४९४ | १,०२३ |
| १९ | चंद्रपुर / गडचिरोली | १,१०९ | ९०२ / २०९ |
| २० | सांगली | ७१५ | ७६२ |
| २१ | औरंगाबाद / जालना | ६९८ | ६९४ / ६२५ |
| २२ | सातारा | ५११ | ४७१ |
| २३ | कोल्हापूर | ८५२ | ३६९ |
| २४ | रायगड | १०० | १२८ |
| २५ | भंडारा / गोंदिया | ८४ | १०२ |
| २६ | रत्नागिरी / (सिंधुदुर्गसह) | ४२ | ६० / ३२ |
| | एकूण महाराष्ट्र | ९५,११५ | १,२३,८१३ |

**स्त्रोत :** आदिवासी संशोधन-पत्रिका TRTI पुणे सप्टेंबर, २००१ पृ.क्र.७७

❖ टिप :- २०११ उपलब्ध झाला नाही.

उपरोक्त तक्ता हा महाराष्ट्र राज्यातील पारधी जमातीची जिल्हानिहाय लोकसंख्या दर्शवितो.संशोधन क्षेत्रअसणा-या अहमदनगर जिल्हयातिल तत्कालीन पारधी लोकसंख्या ही ४,६५८ इतकी होती.

## तक्ता क्र. ३.५
## महाराष्ट्र राज्यातील पारधी लोकसंख्येतील वाढ दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | वर्ष | पारधी लोकसंख्या | झालेलीवाढ |
|---|---|---|---|
| १. | १९६१ | २१,४१७ | - |
| २. | १९७१ | २४,९५६ | ३,५३९ |
| ३. | १९८१ | ९५,११५ | ७०,१५९ |
| ४. | १९९१ | १,२३,८१३ | २८,६९८ |
| ५. | २००१ | १,५९,८७५ | ३६,०६२ |

**स्त्रोत :** गारे,गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती - पृ.क्र.२३५ आणि वार्षिक आदिवासी उपाय योजना -२००९-१० महाराष्ट्र शासन, आदिवासीविकास विभाग, पुणे पृ.क्र.४९५

## तक्ता क्र. ३.६
## पारधी जमातीची महाराष्ट्रातील जिल्हा निहाय लोकसंख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | जिल्हा | लोकसंख्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | अमरावती | २०,५६८ |
| २ | अकोला | १७५७८ |
| ३ | जळगाव | १६८४९ |
| ४ | बुलढाणा | १६४२८ |
| ५ | उस्मानाबाद | ९९५९ |
| ६ | सोलापूर | ९५१९ |
| ७ | धूळे | ८२३६ |
| ८ | यवतमाळ | ८१२९ |
| ९ | पुणे | ७२३० |
| १० | अहमदनगर | ६२९३ |
| ११ | नाशिक | ३५६६ |
| १२ | बीड | ३४४९ |

| | | |
|---|---|---|
| १३ | ठाणे | २९११ |
| १४ | वाशिम | २८४४ |
| १५ | नांदेड | २७३३ |
| १६ | वर्धा | २६१९ |
| १७ | परभणी | २२४१ |
| १८ | नागपूर | २१७९ |
| १९ | मुंबई-उपनगर | २०८३ |
| २० | मुंबई | १६३० |
| २१ | चंद्रपूर | १६०४ |
| २२ | औरंगाबाद | १६०३ |
| २३ | सातारा | १४४२ |
| २४ | हिंगोली | १४०५ |
| २५ | जालना | १२३९ |
| २६ | सांगली | ११२५ |
| २७ | नंदुरबार | १०४३ |
| २८ | कोल्हापूर | १०१७ |
| २९ | लातुर | ५४३ |
| ३० | रायगड | ३६४ |
| ३१ | गडचिरोली | १५३ |
| ३२ | भंडारा | १२१ |
| ३३ | रत्नागिरी | ८९ |
| ३४ | सिंधूदुर्ग | ५६ |
| ३५ | गोंदिया | ४७ |
| | एकूण | १,५९,८७५ |

**स्त्रोत :** आदिवासी संशोधन पत्रिका Vol.XXI No.2, सप्टेंबर २००७, पृ. क्र. ८०

उपरोक्त तक्त्या असे दिसून येते की राज्यातील एकूण १,५९,८७५ लोकसंख्येपैकी अहमदनगर ६२९३ इतकी पारधी लोकसंख्या आहे.

## ३.८.महाराष्ट्रातील पारधी समाजा बद्दल सामाजिक संघटनांचे योगदान-

१९८० च्या दशकात आंबेडकरी विचारांवर पुष्ट झालेली दलित चळवळ भरात आली होती. खेडया-पाडयात वाडयापाडयावर कार्यकर्ते निर्माण झाले होते. नव्या फळीतील कार्यकर्ते उभे राहात होते. अशा कार्यकर्त्यांपैकी अॅड.वाल्मिक निकाळजे या तरूण कार्यकर्त्याने दलित पॅंथरच्या माध्यमातून आष्टी, जि.बीड येथे वंचित घटकांमध्ये जाणीव जागृतीचे काम करत असतांना त्यांनी आष्टी तालुक्यातील गुन्हेगार समजलेल्या पारधी, भिल्ल व तिरसली समाजाचे संघटन सुरू केले. सन १९८९ साली मानवी हक्क अभियान संघटना स्थापन करून अॅड.निकाळजे, एकनाथराव आव्हाड यांनी मराठवाडा आणि अहमदनगर जिल्हयात भिल्ल पारधी यांचे संघटन सुरू केले. अॅड निकाळजे यांनी राजर्षी शाहू ग्रामीण विकास संघटनेच्या माध्यमातून आष्टी तालुक्यातील पारधी, तिरमली यांच्या पुनर्वसनाचे काम हाती घेतले. याची दखल शिरीष खरे यांनी रोशनी से रुबरू होती पारधी जमात या अंतर्गत इंटरनेटवर नोंदवली आहे. मानवी हक्क अभियानाच्या माध्यमातून जे विविध लढे पुकारले अशा विविध आंदोलनामध्ये पारधी समाजाच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक ठिकाणी ब-याच सामाजिक कार्यकर्त्यांनी आपापल्या पध्दतीने काम केले. जसे राजेंद्र काळे (अहमदनगर), अरूभ जाधव (जामखेड), आसाराम काळे नरसिंह भोसले (श्रीगोंदा), किसन चव्हाण (शेवगाव), अंकुश लंडया, काळे (बारामती), अंकुश काळे असे किती तरी कार्यकर्ते निर्माण होवून त्यांनी काम सुरू केले. आसाराम जाधव,(औरंगाबाद) मोतीराम राठोड, बाळकृष्ण रेणके यांनी गुन्हेगार समजलेल्या जमातीला मानवी प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे काम केले. यातुन पुढे गुन्हेगार समजलेल्या जमातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संस्थात्मक पातळीवर काम सुरू झाले. भैय्यूभूमहाराज यांनी विदर्भात सूर्योदय संस्थेच्या माध्यमातून पारध्यांच्या विकासासाठी शैक्षणिक संकुल सुरू केले. गिरीश प्रभुणे यांनी स्वत:ला या समाजासाठी वाहून घेतले. या भटक्यांच्या जीवनात परिवर्तन घडावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही, या विचारातून २२ ऑगस्ट १९९३ रोजी झाली. यमगरवाडी जि.उस्मानाबाद येथे पारधी मुलांची निवासी त्याला सुरू केली. त्यापोठोपाठ नेले (करमाळा, जि.सोलापूर) येथे कोल्हाटी समाजासाठी वस्तीगृह सुरू केले. तसेच भानगाव (श्रीगोंदा जि.अहमदनगर) येथे पारधी

समाजाचे मुलांचे वस्तीगृह सुरू केले. सय्यद वरवडे ता. मोहोळ, जि.सोलापूर येथे पारध्यांसाठी संस्थेने ५० घरकुले बांधून दिली.

भटक्या जमातींमध्ये पारधी जमातींच्या विकासासाठी काम करणे अतिकठीण आहे. हे आव्हान अहमदनगरचे माजी जिल्हाधिकारी उमाकांत दांगड यांनी स्विकारून पहिल्यांदा अहमदनगर जिल्हयातील पारधी आणि भिल्ल समाजाचे सर्वेक्षण करून विकास आराखडा तयार केला. पारध्यांना त्यांची ओळख निर्माण व्हावी यासाठी जातीचे दाखले, रेशनकार्ड, घरपोहच केले. जिल्हयातील पारधी, भिल्ल यांना शासन योजनेतुन जमीनीचे वितरण केले. त्यावर राज्य सरकारने निधी खर्च केला. पोलिस खात्यात काम करतांना पारधी समाजाचा तितकासा चांगला अनुभव नसतांनाही जिल्हा पोलिस अधिक्षक विश्वास नांगरे यांनी हा पारधी विकास आराखडा बनवीतांना मानवी मुल्यांना प्राधान्य दिले. जिल्हा पोलिस निरीक्षक कृष्ण प्रकाश हे ही या जमातीकडे सकारात्मक भूमिकेतुन पहात होते. प्रांत अधिकारी राजेंद्र कुठे, संजिव पलाडे व महसूल कर्मचा-यांना देखील तसेच अहमदनगरचे माजी जिल्हाधिकारी उमाकांत दांगट यांनी तुरूंगात डांबलेल्या पारध्यांनाही हस्तक्षेप करून जगण्याची संधी निर्माण करून दिली. अशा पध्दतीने पारधी समाजा बद्दल विविध पातळीवर लिखाणं व वेगवेगळया व्यक्तींनी योगदान दिल्याचे जाणवते”[१२७]

### ३.८.१ अहमदनगर जिल्हयातील पारधी समाजातील लोकांनी केलेले आंदोलने व मोर्चाः-

अहमदनगर जिल्हा हा क्षेत्रफळाने मोठा असून या जिल्हयातील १४ तालुक्यात १५८८ गावे आहेत. त्यापैकी २०७ गावांमध्ये पारध्यांचे वास्तव्य दिसते. व या २०७ गावांमध्ये १३३१ पारधी कुटुंबे आहेत. परंतु स्वातंत्र्यानंतर या जिल्हयात पारधी जमातीची आंदोलने व मोर्चे हे अतिशय सिमीत प्रमाणात झालेले दिसतात. जसे ‘पारधी समाजाला शासनाच्या गायरान जमिनी मिळाव्यात यासाठी श्रीगोंदा तहसिल कार्यालयावर काढलेला मोर्चा, दि.२२/४/२००८ रोजी अहमदनगर येथे आदिवासींच्या शिक्षणासाठी भरविण्यात आलेली शिक्षण हक्क परिषद, भिल्ल व पारधी समाजाला गाळपेर व गायराण जमिनी मिळाव्यात यासाठी मानवी हक्क आयोगाचे नेते ॲड.वाल्मिकनिकाळजेंच्यानेतृत्वाखाली श्रीगोंदा तहसिल कार्यालायवर निघालेला मोर्चा व १ मार्च २००३ रोजी स्वातंत्र्यानंतर पहिलेच राज्यव्यापी अधिवेशन नगर येथील एम.सी.ए मैदान कोठी

रोड येथे झाले. भारीप बहुजन संघाचे राष्ट्रनेते खा.प्रकाश आंबेडकर यांच्या हस्ते या अधिवेशनाचे उदघाटन झाले. याप्रसंगी संघटनेचे संस्थापक राजेंद्र काळे हे उपस्थित होते. या अधिवेशनात पारधी समाजाच्या मुलांना 'प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंतचे शिक्षण मोफत मिळावे, आदिवासी विकास मंडळातून ५ टक्के निधी पारधी समाजासाठी राखून ठेवावा.पारधी समाज राहत असलेल्या गायराण, गाळपेरी व सिलींग जमीन त्यांच्या नावे व्हाव्यात यासाठी निवेदन देण्यात आले. तसेच ३ मे २००४ रोजी श्रीगोंदा तालुक्यातील अढळगाव येथे पारधी समाजातील कुटुंबियांवर झालेल्या अत्याचार प्रकरणी पोलिस कारवाई करत नसल्याचा निषेध करण्यासाठी नगरमध्ये या समाजाने मोर्चा काढून मुख्य टपाल कार्यालय चौकात रस्ता रोको आंदोलन केले.इ.' स्वातंत्र्योत्तर काळात अहमदनगरचा विचार करता ही आंदोलने अतिशय कमी असल्याचे जाणवते.

### **३.९ आदिवासी वैयक्तिक लाभाच्या शासकिय योजना :-**

"अहमदनगर जिल्हयातील आदिवासी विकास व कल्याणाच्या योजना अहमदनगर जिल्हा पारधी विकास आराखडयात ख़ालील प्रमाणे नमुद केलेले आहेत."[१२८]

शासनाच्या विविध विभागांमार्फत आदिवासी विकास व कल्याणाच्या अनेक योजना कार्यन्वीत आहेत. या सर्व विविध योजनांची माहिती एकत्रीत केली असुन, सदर आराखडया विषयी आवश्यक निधीची तरतूद निश्चीत करण्यात आलेली आहे.

### **१. भुमीहीन दारिद्रय रेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजना :-**

सदर योजना सन २००४-०५ या वर्षापासून नव्याने सुरु झालेली असून दारिद्रय रेषेखालील भुमीहीनकुटुंबांना उदरनिर्वाहाचे अन्य साधन नसल्याने त्यांना रोजगारहमी योजना किंवा खाजगी व्यक्ती कडे मजुरी करावी लागते. परिणामी त्यांच्या राहणीमानावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यांना कायम स्वरुपाचे उत्पन्नाचे साधन उपलब्ध होण्यासाठी ५० हजार अनुदान व ५० हजार कर्ज या स्वरुपात ही योजना सुरु करण्यात आलेली आहे.

भुमीहीन आदिवासी कुटुंबांना उत्तम प्रतीची जमीन माफक दराने उपलब्ध व्हावी म्हणून जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांची समीतीचे अध्यक्ष म्हणून नेमणूक केलेली आहे. सदर योजना पुढील अटी व शर्तीवर राबवली जाईल.दि. १/१/२००० या दिनांकास भुमीहीन असणारा आदिवासी लाभ घेण्यास पात्र ठरतो.भुमीहीन आदिवासीच्या पती-पत्नीच्या नावे संयुक्तपणे जमीन

नावे केली जाते.प्रत्येक भुमीहीन कुटुंबाला ४ एकर जिरायत किंवा २ एकर बागायत जमीन उपलब्ध करण्यात येते.लाभार्थ्यांचे किमान वय २५ व कमाल ६० इतके राहील.महसूल / वन विभागाने गायरान व अतिरीक्त जमीन वाटप केलेल्या कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.लाभार्थी कुटुंबाला देण्यात येणारे कर्ज हे बिन व्याजी व १० वर्षे मुदतीकरीता असून कर्ज फेडीची सुरुवात २ वर्षानंतर सुरु करण्यात येईल.लाभार्थी कुटुंबाला जमीन विक्री अथवा हस्तांतर करता येणार नाही.या योजनेसाठी १३३१ कुटुंबांना २६.६२ लाख एवढा निधी आवश्यक आहे.

**२.घरकुल योजना :-**

अनुसूचित जमातींच्या काही व्यक्तींना राहावयास स्वत:ची घरे नाहीत तर काहींची घरे कुडामातीची आहेत. अशा गरजू व्यक्तींना इंदिरा आवासच्या धर्तीवर पक्की घरे बांधून देवून त्यांच्या राहणीमानात सुधारण घडवून आणण्याचा उददेश आहे. या घरकुल योजनेमध्ये रस्ता, वीज, पाणी, समाजमंदीर, अंगणवाडी इ. आवश्यक मुलभुत सुविधा विचारात घेवून १००० पारधी कुटुंबांना १ लाख रु. खर्च या प्रमाणे १० कोटी खर्च अपेक्षित आहे.लाभार्थी हा अनुसूचित जमातीचा व दारिद्रय रेषेखालील असावा.स्वत:ची किंवा शासनाने दिलेली जागा असावी. व पक्के घर नसावे.जिल्हा परिषद योजनेअंतर्गत लाभ घेतला असेल तर या योजनेचा लाभ मिळणार नाही.या योजनेसाठी १००० कुटुंबांना रु. १ लाख प्रमाणे १० कोटी खर्च अपेक्षित आहे.

**३. जिवनधारा विहीर योजना :-**

ज्या आदिवासी शेतक-यांना शेतीसाठी पाण्याची गैरसोय अशा लाभार्थ्यांस त्याची शेतजमीन ओलीताखाली आणण्यासाठी शेतात नवीन विहीर खोदुण त्यावर वीजपंप व तेलपंप बसविण्यात येईल. त्यामुळे आदिवासी शेतक-यांच्या शेतीमध्ये बदल घडेल. त्यामुळे उत्पन्नात वाढ होवून त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थीती सुधारेल. या योजनें अंतर्गत विहीर खोदण्यासाठी रु.६०००० अनुदान मंजूर करण्यात येते. लाभार्थ्यांच्या विहीरीची योग्य ठिकाण हे भुजल व विकास यंत्रणा यांचेकडून निश्चीत करण्यात येईल. लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील जातीतील असावा.७/१२ व ८ अ उता-यामध्ये जमीनीचे क्षेत्र कमीत कमी ०.६० आर असावे.या योजनेसाठी ३९३ कुटुंबांना २३५.८० लाख खर्च अपेक्षित आहे.

**४. आदिवासी शेतक-यांना विजपंप व तेलपंप पुरवठा योजना :-**

आदिवासी शेतक-यांजवळ सर्वसाधारणपणे अत्यंत कमी शेतजमीन असते. आर्थिक स्थिती नाजूक असल्याने दुबार शेतीसाठी सिंचन व्यवसाय उभारु शकत नाहीत म्हणून दीड ते सोळा एकर शेतजमीन असणा-या शेतक-यांना १०० टक्के अनुदानावर नाममात्र सहभागाने विजपंप / तेलपंप पुरवठा करण्याची योजना राबविण्यात येते. अर्जदार हा आदिवासी व महाराष्ट्र रहिवासी असावा.स्वत:ची दीड ते सोळा एकर शेतजमीन असावी.नदी, नाला, विहीर मध्ये कमीत कमी ६ महीने पाणी उपलब्ध असावे महाराष्ट्र राज्य विज मंडळाने विज पुरवठा देण्याचे प्रमाणित केलेले असावे.आर्थिक सहभाग -१० एकरापर्यंत रु. २५० व १० वे १६ एकर पर्यंत ५००रु.या योजनेसाठी ३९३ कुटुंबांना विजपंप / तेलपंपासाठी ७२.७३ लाख खर्च अपेक्षित आहे.

**५. सिंचनासाठी पी.व्ही.सी. / एस.डी.पी.ई. पाईपचा पुरवठा करणे :-**

आदिवासी शेतक-यांना नुक्लीयस बजेट योजने अंतर्गत स्थानिक गरजा लक्षात घेउन नियमित योजनेव्दारे जो लाभ आवश्यक असूनही जो लाभ देता येत नाही अशा योजना या योजनेतून दिल्या जातात.१. आर्थिक उत्पन्न वाढ.२. प्रशिक्षण ३. मानव साधन संपत्ती विकास. ४. कल्याणत्मक योजनांकरिता एका कुटुंसास जास्तीत जास्त रु.१५००० पर्यंतचा खर्चाचे प्रकल्प १५% सहभाग व उर्वरित रक्कम वस्तु रुपात अनुदान दिले जाते. या योजनेतुन पी.व्ही. सी./ एस. डी. पी. ई. पाईपचा पुरवठा करण्यात येतो.सदर योजना अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यास दिली जाते.तो दारिद्रय रेषेचा कार्ड धारक असावा.लाभार्थ्यांकडे विहीरीवर तेलपंप / विजपंप असने आवश्यक आहे.या योजनेसाठी ३९३ कुटुंबांना ५८.९५ लाख खर्च अपेक्षित आहे.

**६. आदिवासी शेतक-यांना दारिद्रय रेषेच्या वर आणण्यासाठी पॅकेज योजना :-**

आपला देश कषी प्रधान व विकसनशिल देश आहे. लोकसंख्येच्या ८० % लोक हे शेती व्यवसाय करीत असून अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असल्याने शेती व्यवसायास अनन्यसाधारण महत्व आहे.महाराष्ट्र राज्यातील सुमारे ६८ टक्के आदिवासी लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली आहे. अशा शेतक-यांचे आर्थिक उत्पन्न वाढून आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सामिल होता यावे म्हणून आदिवासी कुटुंबांना कषी निवेष्ठा संच, शेती अवजारे, जुन्या विहीरी आणि पाईपलाईन दुरुस्ती, बैलागाडी, बैलजोडी वाटप इ. योजना दिल्या जातात.लाभधारक अनुसूचित जमातीचा असावा.तो दारिद्रय रेषेखालील असावा.या योजनेसाठी ३९३ कुटुंबांना २३.५८ लाख खर्च अपेक्षित आहे.

**७. आदिवासी कुटुंबांना शेळी गट वाटप करणे, दुभती जनावरे पुरविणे :-**

दुभती जनावरे पुरवठा होण्याच्या दृष्टीने बिगर आदिवासी क्षेत्रातील विशेष : पारधी समाजाच्या उन्नतीसाठी दुधाळ जनावरांचा पुरवठा करणे यासाठी २००५-०६ या वित्तीय वर्षामध्ये मा. आयुक्त आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य नाशिक यांनी शासनाकडे २ गायी, २ म्हशी, १ शेळी मेंढी गट [ यामध्ये १० शेळी, मेंढी व १ नर ] या प्रमाणे शेळी गटासाठी २५ हजार, गायी साठी ३१ हजार व म्हशीसाठी ३५ हजार या प्रमाणे योजना प्रस्तावित केलेली आहे.या योजनेसाठी ३९३ कुटुंबांना ३५७.६३ लाख खर्च अपेक्षित आहे.

**८.इतर योजना :-**

आदिवासी महिलांना शिवणकामाचे प्रशिक्षण देण्यासाठी व शिलाई मशीन घेण्यासाठी रु.५०,००० प्रस्तावित केलेले आहे. सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी न्युक्लीयस बजेट योजने अंतर्गत, शबरी आदिवासी वित्त विभाग, आदिवासी विकास महामंडळ यांचे मार्फत रु १५,००० या मर्यादेला अधिन राहून पारधी कुटुंबातील एकूण ६९ बेरोजगारांसाठी १०.३५ लाख रक्कम प्रस्तावित केलेली आहे. तसेच पारधी कुटुंबातील व्यक्तींना घरपोहच लॅमिनेटेड दाखले देण्यासाठी रु.१०० या प्रमाणे ६.६८ लाख खर्च प्रस्तावित केलेला आहे.

असे एकूण १७.५३ लाख खर्च अपेक्षित आहे.

वरील योजनांचा लाभ हा अहमदनगर जिल्हातील बऱ्याच पारधी बांधवांना झालेला दिसतो. परंतु योजनेत होणारी अडवणूक योजनेंची माहिती नसणे, कागदपत्रांची पूर्तता न करू शकणे, यामुळे बरेच पारधी बांधव या योजनेच्या लाभापासून वंचित आहे.

**३.१० वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास योजना.”**[१२९]

१. विजाभज विद्यार्थ्यांना राज्य सरकारची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (२२२५-०७७१)

२. शिक्षण फी परीक्षा फी प्रदानेविजाभज (२२२५-०८०-६)

३. इयत्ता १० वीच्या परीक्षेत विशेष पाविण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलयास तसेच १२वी मध्ये शिकणा-या विजभज वर्गाच्या मुला मुलींना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती (२२५-३१९१)

४. इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणा-या विजाभज मुलींना सावित्रीबाई फुले

शिष्यवृत्ती योजना (२२२५-३१८२)

५.सैनिकी शाळेत प्रशिक्षण घेणा-या विजाभज विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता (२२२५-०८१५ ९ २२५ ०८६२)

६.औद्योगीक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकणा-या विजाभज विद्यार्थ्यांना विद्यावेतन (२२२५ ज्र ०७९१)

७. माध्यमीक शाळेत शिक्षण घेणा-या विजाभज विद्यार्थ्यांना शिक्षण फी, परीक्षा फी प्रदान करणे.(२२२५-०८०)

८. विमूक्त जाती भटक्या जामाती आश्रमशाळा (२२२५-०७५)

९ . विमूक्त जाती भटक्या जामाती विद्यार्थ्यासाठी निवासी कनिष्ठ महाविद्यालये.

१०. वाहनचालक प्रशिक्षण योजना विजाभजा (२२२५-१०१६)

**सारांशः-**

उपरोक्त प्रकरणाद्वारे संशोधकाने पारधी समाजा बददल सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक, व इतर काही बाबीं दुय्यम स्त्रोत व मुलाखत तंत्राच्या साहयाने अभ्यासण्याचा प्रयत्न केलेला आहे. पारधी समाजाची ओळख या प्रकरणात पारध्यांचे मूळ ठीकाण, उपजाती, बोलीभाषा, कुळे, देवदेवता, सणसमारंभ, धार्मिक जिवण, जातपंचायत, लोकसाहीत्य, विकास योजना आशा काही बाबीं अभ्यासलेलया आहेत.

वरील सर्व बाबींच्या अभ्यासा वरुन या जमाती बददलच्या मागासलेपणास हे लोक स्वत: देखील कशा प्रकारे जबाबदार आहेत हे दिसून येते. या जमातीच्या सामाजिक जिवणचा विचार केला तर असे जाणवते की यांचे मागासलेपण हे सामाजिक जिवणाशी अतिशय निगडीत आसलेले दिसते कारण यांचे आप आपसातील सामाजिक व्यवहारांमध्ये आजही मागासलेपणा जाणवतो. या साठी अनेक बाबी जबाबदार आसलयाचे दिसते. ही जमात आज ही ब-या पैकी आपलया धार्मीक जिवणाशी निगडीत असलेली दिसते. या जमातीतील अनेक धार्मिक प्रथा या अतिशय मागास स्वरुपात आसलेलया दिसतात व या प्रथां मध्ये कोणत्या ही स्वरुपाचे परीवर्तन आलेले दिसत नाही. देवदेव करणे या समाजात अतिशय महत्व आहे. या समाजात छटी पूजेला देखील महत्व असल्याचे दिसते. पारधी जमातीत कुळांनुसार देव वेगळे आहेत. धार्मीकतेचा प्रचंड पगडा आजही या समाजात आहे. देवाला प्रसन्न ठेवण्यासाठी जत्रा करणे हा त्यांच्या धार्मिक

जीवणाचा एक महत्वपूर्ण भाग आहे. जत्रेत रेडयाचा व बकऱ्याचा तसेच कोंबडयाचा बळी देण्यात येतो. धार्मिक व सांस्कृतीक जिवणात कोणतेही परीवर्तन नसलयाने हा समाज ब-याच परीवर्तना पासून वंचीत असलेला दिसतो. या समाजातील विवाह पध्दती ही इतर समाजाच्या तुलनेत वेगळी आसलेली दिसते विवाहात आसलेलया प्रथा हया ब-याच अनिष्ट स्वरुपाच्या आहेत विवाह वयात काही प्रमाणात परीवर्तन जाणवते परंतु हुंडा प्रथा, बहुविवाह, घटस्फोट,बायको गहाण टाकणे, कुटुंब नियोजनाचा अभाव आशा अनेक बाबी या समाजात आढळतात.शिंदे, चव्हाण, भोसले हे मुख्य कुळे आहेत व समान कुळातील व्यक्तीत विवाह निषिध्द मानले जातात. पारध्यांमध्ये वधूमूल्य देण्याची पध्दत विवाहात आहे.

प़ारध्यात विभक्त कुटुंबपध्दती ही प्रकर्षाने जाणवते. स्त्रीयांना असणाऱ्या दुय्यम स्थानाची प्रचीती देखील या कुटुंबात येते. बायको गहाण टाकणे व मुलीला पैशासाठी बऱ्याच जणांशी विवाह करावयाला भाग पाडणे हया बाबी देखील या समाजाच्या सामाजिक जीवणाचा भाग आहे. तो अद्याप कमी झालेला दिसत नाही. परस्पर भेटीचे ठिकाण हे बाजार हे आहे. विविध फाश्यांच्या साहयाने शिकार करुन शेतराखण, मजुरी, मद्यविक्री, चोरी, भिक मागून हे आपला चरितार्थ चालवतांना दिसतात. काहींना जमीनी मिळाल्या आहेत ते शेती करुन उदरनिर्वाह करतांना दिसतात. या समाजातील स्त्रीया सोने चांदी ऐवजी पितळी बांगडया, कथील, कॉपर, ब्रास किंवा इतर धातूंच्या बांगडया अलंकार म्हणून परिधान करतांना दिसतात.

तसेच दोषी व्यक्तीने उकळत्या तेलातून पुऱ्या काढावयास भाग पाडणारा झापीलेवान विधी देखील या समाजात महत्वपूर्ण आहे. उपरोक्त विधी हा या समाजातील जातपंचायतीचाच एकप्रकारे निर्णय असलेला दिसतो. जातपंचायत हे पारधी जमातीचे स्वतंत्र न्यायालय आहे व ते सर्व मानतांना दिसतात. या समाजात जातपंचायतीत महिलांचे स्थान हे उच्च दिसते. पारधी जात पंचायतीत कवडीचा दंड ही सर्वात कठीण व त्या पाठोपाठ पूर्वजांची हाड उकरुन काढणे हया शिक्षा महत्वपूर्ण सर्वात कठीण मानल्या जातात. पारधी जमातीचे लोकसाहित्याच्या माध्यमातून त्यांच्या समाजावर सामाजिक नियंत्रण व समाजाच्या व्यथा देखील दर्शवितांना दिसते.

पारधी जमातीसाठी काम अनेक शासकीय योजना आहेत व या योजनांच्या माध्यमातुन यांचा विकास साधला जावा हा एकमेव हेतू सरकारचा आहे. परंतु या योजना या जमातींपर्यत व्यवस्थीत पोहचवीण्यास सरकारच अपयशी ठरतांना दिसते व यातून देखील यांची वंचीतता वाढते. या जमातीचे सामाजिक जिवन, धार्मिक जिवण व लोकसाहीत्याच्या उपरोक्त आढाव्या वरुन आसे निदर्शनास येते की आज तागायत ही जमात वरील बाबींना अंतर देत नसलयाने मागासलेपणा पासून दूर होत नाहीत व विकास प्रक्रीयेत अपेक्षे प्रमाणे येत नाही.

**संदर्भ सूची**

१. वार्षिक आदिवासी उपाययोजना, २००९-१०, महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग पुणे पृ क्र.५०५.

२. आदिवासी संशोधन पत्रिका, मार्च २००९, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, पृ क्र. ४१.

३. अत्रे त्रिं.ना., '*गुन्हेगार जाती*', वरदा बुक्स, सेनापती बापट मार्ग, पुणे, २००९पृ. क्र.,८६.

४. Sangave Vilas A., '*Phase Pardhi of Kolhapure : A Tribe in Transation'*, Sociological Bulliten, XVI, Sept.1967, page. 81 (229)

५. Singh K.S., '*People of India'*, M.H. Part III Vol. XXX Page.1662.

६. गारे गोविंद, '*महाराष्ट्रातील आदिवासी जमाती सामाजिक व सांस्कृतिक मागोवा*', कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे,२००२ द्वि. आ., पृ क्र.१४६.

७. देवगावकर एस.जी., '*महाराष्ट्रातील जाती जमाती*', श्री साईनाथ प्रकाशन नागपूर,प्र.आ.,२००९,पृ क्र.३१

८. R.V. Russel and rai Bahadur Hiralal, '*The Tribe and Castes of thecentral Provinces of India'*,Vol.IV-Rajdhani Book Center Delhi,1916 ,Page No.359

९. Singh K.S.,'*People of India, National Series'* VoL.III- '*The Scheduled Tribes Anthropologycal Survey of India'* –Oxford University Press Page No.979

१०. भि. रा. इदाते, '*अध्यक्ष विमुक्त जाती व भटक्या जमाती अभ्यास वसंशोधन.समिती* ', अहवाल खंड-१.,१९९९, पृ.क्र २७

११. मांडे प्रभाकर, '*गावगाडयाबाहेर*', परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ., १९८३, पृ.क्र. १५०.

१२. आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, सप्टेंबर २००७ पृ. क्र,७७

१३. देवगावकर शैलेजा, '*महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती*', श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, २००१,प्र.आ.,पृ.क्र,७७.

१४. चव्हाण रामनाथ, '*भटक्या विमुक्तांची जातपंचायत*', खंड-५,देशमुख आणी कंपनी (पब्लिशर्स ) प्रा.लि.,पुणे,२००९,पृ.क्र.२२५

१५. मांडे प्रभाकर, '*गावगाडयाबाहेर*', परिमल प्रकाशन औरंगाबाद, प्र.आ., १९८३,पृ.क्र.

१३८.

१६. डिसूझा दिलीप., *‘जन्माने गुन्हेगार’* , (अनु.कामत साधना ), पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००८, प्र. आ. पृ क्र,१२.

१७. तैत्रव, पृ.क्र.११

१८. तैत्रव, पृ.क्र.१८

१९. तैत्रव, पृ.क्र.२०

२०. तैत्रव, पृ.क्र.२५

२१. पवार,दिपक, *‘पारधी समाजाचे अंतरंग’*, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, २०१४,पृष्ठ क्र.२०.

२२. डिसूसा दिलीप., *‘जन्माने गुन्हेगार’*, (अनु.कामत साधना ), पद्मगंधा प्रकाशन, पुणे,२००८, प्र. आ.,पृ क्र, ३३.

२३. माने लक्ष्मण, *‘विमुक्तायन, महाराष्टातील विमुक्त जमाती’*,यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई- प्रथम आवृत्ती,१९९७,पृ.क्र.१२३.

२४. डिसूसा, दिलीप., *‘जन्माने गुन्हेगार’*, (अनु.कामत साधना ),पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००८,प्र.आ. पृ. क्र,२९.

२५. तैत्रव, पृ.क्र.२७.

२६. बोकील मिलिंद , *पारधी बदलतायत पण* , सकाळ, १५ मे २०१६, पृ . क्र. २

२७. काळदाते,सुधा व गोटे-गव्हाणे शुभांगी, *‘गुन्हेगारीशास्त्र’*, श्रीविद्या प्रकाशन,पुणे, द्वि.आ.,२ऑक्टोबर २००६,पृ.क्र.५१

२८. तैत्रव, पृ.क्र.५२

२९. डिसूसा, दिलीप., *‘जन्माने गुन्हेगार’*,. (अनु.कामत साधना ),पद्मगंधा प्रकाशन, पुणे,२००८, प्र.आ.,पृ क्र,२३

३०. तैत्रव, पृ.क्र.२०

३०. काळदाते,सुधा व गोटे,गव्हाणे,शुभांगी, *‘गुन्हेगारीशास्त्र’*,श्रीविद्या प्रकाशन,पुणे.द्वि.आ., २,ऑक्टोबर २००६,पृ.क्र.६१.

३१. भोसले नामदेव, *‘मराशी’* , लोक संस्कृती प्रकाशन, नारायणगांव.पुणे,२०१४ प्र.आ., पृ.क्र.३२.

३२. Singh K.S., *‘People of India’*, M.H.Part III Vol..XXX Page.2770

३३. तैत्रव, पृ. क्र. २१२.

३४. पं.जोशी महादेवशास्त्री, '*भारतीय संस्कृती कोश खंड-५*' वा- भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे,पृ.क्र.५२२

३५. Singh K.S. '*People of India*' -National Surves Vol.III The Scheduled Tribes, Anthroploogical Survey of India, Oxferd University Press- Page 140.

३६. रावत हरिकृष्ण, '*समाजशास्त्र विश्वकोश*', रावत पब्लीकेशन जयपुर, २०००, पृष्ठ क्र.२११.

३७. तैत्रव, पृ. क्र. २१२.

३८. वैद्य नि.स.,'*समाजशास्त्र*', श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, १९९८, पृष्ठ क्र.२०२

३९. तैत्रव, पृ. क्र. २०२.

४०. कांबळे उत्तम, '*भटक्यांचे लग्न*', मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.क्र.७३.

४१.Sangave Vilas A., *'Phase Pardhi of Kolhapure : A Tribe in Transation'* Sociological Bulliten Vol.No. 16 . 1,1967, Page No.229.

४२. सोमण मा. श., '*समाजशास्त्र*' , नरेंद्र प्रकाशन, पुणे, पृ.क्र. १७१

४३. तैत्रव, १९९३,पृ.क्र.१७२

४४. बळे बाळासाहेब, '*पारधी समाजाच्या लोकसाहीत्याचा चिकीत्सक अभ्यास.,संशोधन प्रबंध*', २००९पृ.क्र.२१

४५. तैत्रव पृ.क्र.५५.

४६. मराठी विश्र्वकोश खंड -९, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ मुंबई, पृ.क्र.५८८

४७. बळे बाळासाहेब, '*पारधी समाजाच्या लोकसाहीत्याचा चिकीत्सक अभ्यास.,संशोधन प्रबंध*', २००९ पृ.क्र.३६

४८. राठोड, '*मोतीराज, एक्स गुन्हेगार जमाती*', मनोज प्रिंटर, औरंगाबाद, प्र.आ.,१९९४, पृ.क्र.२६.

४९. बळे बाळासाहेब, '*पारधी समाजाच्या लोकसाहीत्याचा चिकीत्सक अभ्यास*'., संशोधन प्रबंध,२००९ पृ.क्र.२२५

५०.भोसले,नामदेव, 'मराशी', २०१४ प्र. आ, लोक संस्कृती प्रकाशन, नारायणगांव.पृ.क्र.५५

५१. चव्हाण यशवंतराव, '*कृष्णाकाठ*', प्रस्टीज पब्लीकेशन, पुणे, १९८४,पृ.क्र. ४४.

५२. बळे बाळासाहेब, '*पारधी समाजाच्या लोकसाहीत्याचा चिकीत्सक अभ्यास.*', २००९ संशोधन प्रबंध,पृ.क्र.२२९

५३. अत्रे त्रिं.ना., *‘गुन्हेगार जाती’*, वरदा बुक्स, पुणे, पुर्नरमुद्रन,पृ.क्र.८९.

५४. तैत्रव, २००९,पृ.क्र.९१.

५५. मांडे प्रभाकर, *‘गावगाडयाबाहेर’*, परिमल प्रकाशन औरंगाबाद , १९८३,प्र.आ.,पृ.क्र. १५१.

५६. तैत्रव, पृ.क्र.१५१.

५७. पवार दिपक, *‘पारधी समाजाचे अंतरंग’*, श्री साईनाथ प्रकाशन,नागपुर, प्र. आ. २०१४, पृष्ठ क्र.११.

५८. गारे, गोविंद, *‘महाराष्ट्रातील आदिवासी जमाती’* , कॉन्टीनेटल प्रकाशन पुणे, २००९, द्वि. आ., पृ. क्र.१४७

५९. माने लक्ष्मण, *‘विमुक्तायन-महाराष्ट्रातील विमुक्त जमाती’*, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई, १९९७,प्र. आ.,पृ.क ७७.

६०. प्रभुणे गिराश, *‘पारधी’*, राजहंस प्रकाशन पुणे, २००६,पृ.क्र.३७.

६१. दैनिक लोकसत्ता,१ सप्टेंबर २०१२, पृ.क्र.४

६२.साळुंखे सर्जेराव, *‘समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना’*, नरेंद्र प्रकाशन, पुणे, २००१,पृष्ठ क्र.१२

६३. तैत्रव, पृ.क्र.१४

६४. तैत्रव, पृ.क्र.२२

६५. तैत्रव, पृ.क्र.२४

६६.पवार दिपक, *‘पारधी समाजाचे अंतरंग’*, श्रीसाईनाथ प्रकाशन,नागपुर, प्र.आ.२०१४, पृष्ठ क्र.४१.

६७.चव्हाण रामनाथ, *‘जाती आणी जमाती’*, मेहता पब्लीशींग हाऊस,पुणे, १९८९,पृ.क्र.१४३.

६८. गारे गोविंद, *‘महाराष्ट्रातील आदिवासी जमाती’*, कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे, २००९ द्वि. आ., पृ. क्र.१४७.

६९. माने लक्ष्मण,*‘विमुक्तायन-महाराष्ट्रातील विमुक्त जमाती’*, १९९७,प्र. आ.,यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई -पृ.क्र. ७७.

७०.गारे गोविंद, *‘महाराष्ट्रातील आदिवासी जमाती’*, कॉन्टीनेटल प्रकाशन पुणे, २००९, द्वि.आ., पृ. क्र.१४७.

७१.पवार दिपक, *‘पारधी समाजाचे अंतरंग’*, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, प्र.आ., २०१४,पृष्ठ क्र. २२.

७२. बळे बाळासाहेब, *‘पारधी समाजाच्या लोकसाहीत्याचा चिकीत्सक अभ्यास.’*, २००९ संशोधन प्रबंध, पृ.क्र.३३६

७३.चव्हाण रामनाथ, *‘जाती आणी जमाती’*, मेहतापब्लीशींग हाऊस,पुणे, १९८९,पृ.क्र.१४२.

७४. सोमण मा.,श., *‘समाजशास्त्र’*, नरेंद्र प्रकाशन, पुणे, १९९३,पृ.क्र.२११.

७५. तैत्रव, पृ.क्र.२१२.

७६. तैत्रव, पृ.क्र.२१२.

७७. देवगावकर शैलेजा व देवगावकर शं.गो., *‘आदिवासी विश्व,’* प्र.आ. आनंद प्रकाशन नागपुर,२००१,पृ,क्र.३५६.

७८. Enthoven R.E.,*‘The Tribes and Caste in Bombay Presidency’*.Vol.-3,1975, Casmo. Publication Delhi Page No.170.

७९. गारे गोविंद, *‘महाराष्ट्रातील आदिवासी जमाती’*, द्वि.आ., कॉन्टीनेटल प्रकाशन पुणे, २००९, पृ. क्र.१४७.

८०.चव्हाण रामनाथ, *‘जाती आणी जमाती’*, मेहता पब्लीशींग हाऊस, पुणे, १९८९,पृ.क्र.१४४.

८१.माने लक्ष्मण, *‘विमुक्तायन’*, प्र.आ.यशवंतराव चव्हाण प्रतीष्ठान मुंबई, १९९७, पृ,क्र, ७८

८२. बळे बाळासाहेब, *पारधी समाजाच्या लोकसाहीत्याचा चिकीत्सक अभ्यास.*, २००९संशोधन प्रबंध, पृ.क्र.३६५.

८३.तैत्रव, पृ.क्र.३१६.

८४. तैत्रव, पृ.क्र.४१५.

८५. तैत्रव, पृ.क्र.३१७.

८६. तैत्रव, पृ.क्र.३६९

८७.चव्हाण रामनाथ, *‘भटक्या विमुक्तांची जातपंचायत’*, खंड-५,देशमुख आणी कंपनी (पब्लिशर्स ) प्रा.लि.,पुणे,२००९,पृ.क्र.२२५

८८. भोसले नामदेव, *‘मराशी’*, लोकसंस्कृती प्रकाशन, पुणे, २०१४,पृ.क्र.५५.

८९. बळे बाळासाहेब, *‘महाराष्ट्रातीलपारधी समाजाच्या लोकसाहित्याचा चिकीत्सक अभ्यास’*,

२००९, संशोधन प्रबंध,पृ.क्र.१२३.

९०. तैत्रव, पृ.क्र.१२४.

९१. चव्हाण रामनाथ, *'भटक्या विमुक्तांची जातपंचायत'*, खंड-५,देशमुख आणी कंपनी (पब्लिशर्स) प्रा.लि.,पुणे, २००९,पृ.क्र.२२६.

९२. पवार दीपक, *'पारधी समाजाचे अंतरंग'*, श्रीसाईनाथ प्रकाशन,नागपुर, २०१४,पृ.क्र.५८.

९३. तैत्रव, पृ.क्र.५९.

९४.बळे बाळासाहेब, *'महाराष्टातील पारधी समाजाच्या लोकसाहित्याचा चिकीत्सक अभ्यास'*,२००९,संशोधन प्रबंध,पृ.क्र.१३२

९५. तैत्रव, पृ.क्र.१३२.

९६.पवार दिपक, 'पारधी समाजाचे अंतरंग', श्रीसाईनाथ प्रकाशन,नागपूर, २०१४,पृ.क्र.६२.

९७. तैत्रव, पृ.क्र.६२.

९८. मांडे प्रभाकर, *'लोकसाहित्याचे स्वरुप'*, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, २०००,पृ.क्र.२

९९. तैत्रव, पृ.क्र.३

१००. तैत्रव, पृ. क्र.१५.

१०१. ढेरे रा.चिं,*'लोकसंस्कृतीचे उपासक'*, पदमगंधा प्रकाशन, पुणे, २००२, पृ.क्र.१८१.

१०२. साळुंखे सर्जेराव.,'समाजशास्त्रातील मुलभूत संकलपना',नरेंद्र प्रकाशन, पुणे, २००६,पृ.क्र.८६.

१०३. तैत्रव, पृ.क्र.५८.

१०४.मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरुप', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, २०००,पृ.क्र.२५.

१०५. तैत्रव, पृ.क्र.४८.

१०६. तैत्रव, पृ.क्र.१८४,१८५.

१०७. तैत्रव, पृ.क्र.१८३.

१०८. बळे बाळासाहेब, *'महाराष्ट्रातीलपारधी समाजाच्या लोकसाहित्याचा चिकीत्सक अभ्यास'*,२००९,संशोधन प्रबंध,पृ.क्र.१५७.

१०९. भोसले नामदेव, *'मराशी'*, लोकसंस्कृती प्रकाशन, पुणे, २०१४,पृ.क्र.६०

१११. भोसले नामदेव, *'मराशी'*, लोकसंस्कृती प्रकाशन, पुणे,पृ.क्र.१५०

११२. तैत्रव, २०१४,पृ.क्र.१५१

११३. भोसले भास्कर, *'दैना'*,ऋध्दी प्रकाशन,उरळीकांचन,पुणे प्र. आ.२००३

११४. भोसले नामदेव, *'मराशी'*, लोकसंस्कृती प्रकाशन,पुणे,पृ.क्र.१५३

११५. तैत्रव, २०१४,पृ.क्र.१६५

११६. बळे बाळासाहेब, *'महाराष्ट्रातील पारधी समाजाच्या लोकसाहित्याचा चिकीत्सक* २००९, पृ.क्र.१६४

११७. तैत्रव, पृ.क्र.१६४.

११८. तैत्रव, पृ.क्र.१६५.

११९. तैत्रव, पृ.क्र.१६५.

१२०. रावत हरिकृष्ण, *'समाजशास्त्र विश्वकोश'*, रावत पब्लीकेशन जयपुर, २०००, पृष्ठ क्र.७४.

१२१. बळे बाळासाहेब, *'महाराष्ट्रातील पारधी समाजाच्या लोकसाहित्याचा चिकीत्सक अभ्यास'*,२००९,संशोधन प्रबंध,पृ.क्र.१६३

१२२. तैत्रव, पृ.क्र.१६३.

१२३. भोसले नामदेव, *'मराशी'*, लोकसंस्कृती प्रकाशन, पुणे, २०१४,पृ.क्र.९६

१२४. तैत्रव, पृ.क्र.२७.

१२५. तैत्रव, पृ.क्र.३२.

१२६. तैत्रव, पृ.क्र.३८

१२७. बळे बाळासाहेब, *'पारधी समाजाच्या लोकसाहित्याचा चिकीत्सक अभ्यास'*, २००८, संशोधन प्रबंध, पृ.क्र.२१

१२८. पारधी जनगनना व विकास प्रारुप आराखडा अहमदनगर जिल्हा,२००६, उमाकांत दांगट, पृ.क्र.३७.

१२९. http://sjsa.maharashatra.gov.in> vasantrao)

# प्रकरण चौथे

# पारधी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणी शैक्षणीक बार्बी विषयक संख्यात्मक तथ्यांचे विश्लेषण

**प्रस्तावनाः-**

सदर प्रकरणामध्ये संशोधकाने प्रत्यक्ष सर्वेक्षणातुन मुलाखत अनुसूची द्वारे प्राप्त केलेलया पारधी समाज्या बाबतच्या कौटुंबिक, शैक्षणीक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जिवन विषयक, आर्थिक जिवन विषयक, आरोग्य विषयक, शासकीय योजना व सवलती विषयक, तसेच पोलीस व पारधी यांच्यातील संबंधा विषयक संख्यात्मक माहितीच्या तथ्यांचे विश्लेषण केलेले आहे.

या संशोधनासाठी नमुना पध्दतीने निवडलेल्या अहमदनगर जिल्हयातील पारधी जमातीच्या निवडक कुटुंबाकडून प्रत्यक्ष भेटीद्वारे मुलाखत अनुसूची तंत्राच्या सहाय्याने माहिती गोळा केली आहे. या संशोधनात प्राथमिक स्त्रोतांचा वापर करून पारधी समाज जीवनाचा अभ्यास केला आहे. अहमदनगर जिल्हयातील चौदा तालुक्यांपैकी नगर, श्रीगोंदा, कर्जत आणि जामखेड या चार तालुक्यात पारधी जमातीची संख्या जास्त आहे. या चार तालुक्यातील विविध गांवात ९६६ पारधी कूटूंबे आहेत व हया वस्त्या अनुक्रमे ४२ गावांमध्ये असल्याचे दिसून येते. पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून अभ्यास करण्यासाठी एकूण २५० कुटुंबांची निवड केली आहे. नमुना निवडीसाठी सहेतुक नमुना निवड तंत्राचा उपयोग केला आहे. त्यामुळे जास्त लोकसंख्या असलेल्या वस्त्यांना न्याय देणे सोईस्कर झाले.

सर्वेक्षणसाठी तयार केलेली मुलाखत अनुसूची ही विविध भागात विभागली गेलेली होती त्याद्वारे गोळा करण्यात आलेल्या संख्यात्मक माहितीचे विश्लेषण तक्ता रूपात खालील प्रमाणे मांडले आहे. खाली नमुद केलेले सर्व तक्ते हे संशोधकाने प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षणाच्या माध्यमातुन प्राप्त केलेलया संख्यात्मक तथ्यांच्या आधारे तयार केलेले आहेत. सदर संशोधना साठी निवडलया गेलेलया पारधी उत्तरदात्यांमध्ये पुरुष उत्तरदात्यांचा संख्या ही स्त्री उत्तरदात्यांपेक्षा जास्त होती,तसेच ते ३५ ते ४५ या वयोगटातील आसून विवाहीत होते. अहमदनगर जिलहयात

पारध्यांन मधील फासे पारधी या पोटजातीची संख्या जास्त आढळली व बहुतेक पारधी हे पारधी बोली बोलत आसून बहुतेकांचा व्यवसाय हा मजूरी आसलेला आढळला.

**४.१. पारध्यांची कौटुंबिक माहिती:-**

सदर घटकात उत्तरदात्यांच्या कौटुंबिक जिवन विषयक माहितीचे विश्लेषण केलेले आहे. यात स्त्रीयांचे कौटुंबिक स्थान, कुटुंबातील सुविधा, कुटुंबाचा प्रकार, कुटूंबाचा पूर्वीचा व्यवसाय, आशा व आणखी काही घटकांच्या मिळवीलेलया संख्यात्मक माहीतीचे विश्लेषण केलेले आहे. या माध्यमातून पारध्यांची कौटुंबिक स्थीती जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**तक्ता क्र.४.१.१**

**पारधी कुटुंबातील कुटुंब प्रमुख कोण हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कुटूंब प्रमुख | तालुका | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | पुरूष | **३** | **२७** | **६८** | **१४७** | **२४५** |
| | | १.२% | ११.०% | २७.८% | ६०.०% | १००.०% |
| | | १.२% | १०.८% | २७.२% | ५८.८% | ९८.०% |
| २ | स्त्री | **२** | **१** | **०** | **२** | **५** |
| | | ४०.०% | २०.०% | ०.०% | ४०.०% | १००.०% |
| | | ०.८% | ०.४% | ०.०% | ०.८% | २.०% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरुन कुटुंबातील कारभार कोणाच्या हाती आहे हे दर्शविलेले आहे. वरील तक्त्यातील आकडेवारीनुसार अहमदनगर मधील जामखेड, कर्जत, नगर व श्रीगोंदा या चार ही तालुक्यातुन निवड केलेलया उत्तरदात्यांमध्ये कुटुंबातील कारभार पुरूषांच्या हाती आहे असे म्हणाणारे एकुण उत्तरदाते २४५ (९८.०% ) आहेत. तर कुटूंबातील कारभार स्त्रियांच्या हाती आहे असे म्हणाणारे एकुण उत्तरदाते ५ (२.०%) आहेत. यावरुन पारधी कुटुंब हे पुरुष प्रधान असल्याचे दिसून येते. पारधी कुटुंब हे पुरुष प्रधानच आहे मात्र एखादया स्त्रीच्या पतीचे आचानक

निधन झाले व तीची मुले लहान असतील किंवा तीचे दुसरे लग्न झालेले नसेल तर मात्र ती स्त्री कुटंब प्रमुख म्हणून निर्णय घेते.

**तक्ता क्र.४.१.२**

| पारधी कुटुंबाचा प्रकार दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **कुटूंबाचा प्रकार** | **तालुका** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **संयुक्त** | **२** | **२** | **५** | **११** | **२०** |
| | | १०.०% | १०.०% | २५.०% | ५५.०% | १००.०% |
| | | ०.८% | ०.८% | २.०% | ४.४% | ८.०% |
| **२** | **विभक्त** | **३** | **२६** | **६३** | **१३८** | **२३०** |
| | | १.३% | ११.३% | २७.४% | ६०.०% | १००.०% |
| | | १.२% | १०.४% | २५.२% | ५५.२% | ९२.०% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरून अहमदनगर मधील जामखेड, कर्जत, नगर व श्रीगोंदा या चार ही तालुक्यातुन निवड केलेलया उत्तरदात्यांमध्ये पारधी समाजातील कुटुंब हे आहे असे संयुक्त म्हणणाऱ्यांची एकुण संख्या २०(८.०%) आहे. तर कुटुंब विभक्त आहे असे म्हणणाऱ्यांची संख्या २३० (९२% ) आहे. या वरुन असे दिसून येते की पारधी समाजातील कुटुंब हे विभक्त आहे असे म्हणणाऱ्यांची उत्तरदात्याची संख्या जास्त आहे. कारण या समाजात विवाहा नंतर लगेचच मूलाला स्वतंत्र पाल ठोकावे लागते तो आई वडीलां सोबत राहू शकत नाही असा नियम आहे तेंव्हा या समाजात विभक्त कुटुंब आहे असे निष्पन्न होते.

**तक्ता क्र.४.१.३**

| पारधी कुटुंबातील स्त्रीया स्वतंत्रपणे निर्णय घेतात की नाही हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | स्वतंत्रपणे निर्णय घेतात का | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | **०** | **१** | **३** | **१४** | **१८** |
| | | ०.०% | ५.६% | १६.७% | ७७.८% | १००.०% |
| | | ०.०% | ०.४% | १.२% | ५.६% | ७.२% |
| २ | नाही | **५** | **२७** | **६५** | **१३५** | **२३२** |
| | | २.२% | ११.६% | २८.०% | ५८.२% | १००.०% |
| | | २.०% | १०.८% | २६.०% | ५४.०% | ९२.८% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

पारधी जमातीतील स्त्रीयांचे असणारे कौटुंबिक स्थान जाणून घेण्यासाठी संशोधकाने सदर प्रश्न विचारला आहे. वरील तक्त्या वरून असे निदर्शनास येते की, पारधी कुटूंबामध्ये स्त्रियांना स्वतंत्र निर्णय घेता येतात असे म्हणणारे निवेदक चारही तालुक्यात एकुण १८ इतके म्हणजेच (७.२%) आहेत, तर स्त्रीयांना स्वतंत्र निर्णय घेता येत नाहीत असे म्हणणारे एकुण निवेदक २३२इतके म्हणजेच (९२.८%) इतके आहेत. वरील तक्त्याच्या विश्लेषणावरून असा निष्कर्ष निघतो की,२३२ (९२.८%) इतक्या उत्तरदात्यांनी नाही असे उत्तर दिले म्हणजेच निर्णय प्रक्रीयेत स्त्रिचा फार कमी प्रमाणात सहभाग आहे.यावरून पारधी जमातीतील कौटुंबिक जीवनात स्त्रीचा दर्जा दुय्यम आहे हे सिध्द होते.

**तक्ता क्र. ४.१.४**

| पारधी कुटुंबातील सुविधा दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कुटूंबातील सुविधा | तालुका | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | वीज | **२** | **१३** | **४६** | **९८** | **१५९** |
| | | १.३% | ८.२% | २८.९% | ६१.६% | १००.०% |
| | | ०.८% | ५.२% | १८.४% | ३९.२% | ६३.६% |
| २ | नळाचे पाणी | **१** | **६** | **८** | **१२** | **२७** |
| | | ३.७% | २२.२% | २९.६% | ४४.४% | १००.०% |
| | | ०.४% | २.४% | ३.२% | ४.८% | १०.८% |
| ३ | स्नानगृह | **०** | **२** | **२** | **१४** | **१८** |
| | | ०.०% | ११.१% | ११.१% | ७७.८% | १००.०% |
| | | ०.०% | ०.८% | ०.८% | ५.६% | ७.२% |
| ४ | स्वच्छतागृह | **२** | **७** | **१२** | **२५** | **४६** |
| | | ४.३% | १५.२% | २६.१% | ५४.३% | १००.०% |
| | | ०.८% | २.८% | ४.८% | १०.०% | १८.४% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

पारधी कुटुंब हे मुलभूत सुविधांपासून वंचीत आहे का हे तपासण्यासाठी संशोधकाने हा प्रश्न विचारलेला आहे. वरील तक्त्या वरून असे दिसून येते की, वीज आहे असे म्हणारे निवेदक १५९ इतके म्हणजेच (६३.६%) आहेत. अनेकांनी अवैद्य मार्गाने वीज मिळविलेली आहे. दुर्गम भागात वास्तव्य असल्याने आर्थिक विवंचनेमुळे वीज जोडणी करू न शकल्याने हा समाज कौटुंबिक सुविधांपासून वंचित राहिला आहे. पिण्याचे पाणी आहे असे म्हणणारे निवेदक २७ (१०.८%) आहेत. ब-याच ठिकाणी गावाजवळ वस्ती असूनही या समाजाला बरीच भटकंतीकरावी लागते. कधी कधी काहींना तर ४ ते ५ कि.मी.वरून पाणी आणावे लागते.एकुण २५० उत्तरदात्यापैकी १८(७.२%) उत्तरदात्यांकडे स्नानगृह आहे, तर शौचालय असणारे ४६ (१८.८) इतके उत्तरदाते आहेत. काही मंडळी बाहेर, झाडाझुडपात, उघडयावर शौचास जातात.

लहानमुले व वृध्द हे राहत्या वस्त्यांच्य अगदी जवळच उघडयावर शौचाला जातात. त्यातून आरोग्याचे व स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होतो.

**तक्ता क्र.४.१.५**

| पारधी कुटुंबात अन्न शिजवण्यासाठी कोणते इंधन वापरतात हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कोणते इंधन | तालुका | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | लाकुड | **२** | **११** | **४६** | **१०१** | **१६०** |
| | | १.२% | ६.९% | २८.८% | ६३.१% | १००.०% |
| | | ०.८% | ४.४% | १८.४% | ४०.४% | ६४.०% |
| २ | रॉकेल | **३** | **१३** | **१८** | **४३** | **७७** |
| | | ३.९% | १६.९% | २३.४% | ५५.८% | १००.०% |
| | | १.२% | ५.२% | ७.२% | १७.२% | ३०.८% |
| ३ | गॅस | **०** | **४** | **४** | **५** | **१३** |
| | | ०.०% | ३०.८% | ३०.८% | ३८.५% | १००.०% |
| | | ०.०% | १.६% | १.६% | २.०% | ५.२% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्यातील आकडेवारी नुसार लाकूड इंधन म्हणून वापरतो.असे म्हणणारे एकुण उत्तरदाते १६०(६४.०%) दर्शविते तर रॉकेल इंधन म्हणून वापरतो. असे म्हणणारे उत्तरदाते एकुण ७७ (३०.८%) दिसतात. तर गॅस म्हणून इंधनाचा वापर केला जातो. असे म्हणणारे उत्तरदाते हे १३ (५.२%) इतके म्हणजेच सर्वात कमी आहेत. म्हणजेच जास्तीत जास्त पारधी हे इंधन म्हणून लाकडाचा उपयोग करतांना दिसतात.

**तक्ता क्र.४.१.६**

| कुटुंबात कोणाला मद्यपानाची सवय आहे का हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | मद्यपानाची सवय आहे | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | आहे | **३** | **१९** | **६१** | **१२१** | **२०४** |
| | | १.५% | ९.३% | २९.९% | ५९.३% | १००.०% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १.२% | ७.६% | २४.४% | ४८.४% | ८१.६% |
| **२** | **नाही** | **२** | **९** | **७** | **२८** | **४६** |
| | | ४.३% | १९.६% | १५.२% | ६०.९% | १००.०% |
| | | ०.८% | ३.६% | २.८% | ११.२% | १८.४% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्या वरुन पारधी समाजातील लोकांना मद्यपानाची सवय आहे का हे तपासण्याचा प्रयत्न केलेला आहे.वरील सारणीतील आकडेवारीचा विचार केला तर असे दिसते की मद्यपानाची सवय आहे असे म्हणणारे एकुण २०४ (८१.६%) इतके उत्तरदाते आहेत. तर मद्यपानाची सवय नाही असे म्हणणारे ४६ (१८.४ %) उत्तरदाते आहेत. वरील आकडेवारीचा विचार केला तर असे दिसते की मद्यपानाची सवय आहे असे म्हणणा-यांची संख्या तुलनेने जास्त आहे म्हणजेच ही जमात या सवयी मुळे आज ही मागासलेपणा ओढावून घेतांना दिसतात.

**तक्ता क्र.४.१.७**

**पारध्यां मध्ये विवाहा कोणत्या वयात होतात हे दर्शविणारा तक्ता.**

| **अ.क्र.** | **वय** | **तालुके** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **१२ ते १५** | **४** | **१२** | **५९** | **१२२** | **१९७** |
| | | २.०३% | ६.०९% | २९.९४% | ६१.९२% | १००.०% |
| | | १.६% | ४.८% | २३.६% | ४८.८% | ७८.८% |
| **२** | **१५ते १८** | **१** | **७** | **३** | **५७** | **६८** |
| | | १.४७% | १०.२९% | ४.४१% | ८३.८२% | १००% |
| | | ०.४% | २.८% | १.२% | २२.८% | २७.२% |
| **३** | **१८ ते २१** | **०** | **५** | **४** | **४१** | **५०** |
| | | ०.० % | १०% | ८% | ८२% | १००% |
| | | ०.० % | २% | १.६% | ६४.४% | २०% |
| **४** | **२१ ते २५** | **०** | **४** | **२** | **२४** | **३०** |
| | | ०.०% | १३.३३% | ६.६६% | ८०% | १००% |
| | | ०.०% | १.६% | ०.८% | ९.६% | १२% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **एकुण** | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरून एकुण चार तालुक्यात पारधी समाजातील विवाह समईच्या वयाचा विचार केला तर एकुण २५० उत्तरदात्यां पैकी १९७ (७८.८%) उत्तरदाते हे समाजातील विवाह समईच्या वय हे १२ ते १५ असलयाचे सांगतात तर १५ ते १८ विवाह समईचे वय आहे असे ६८(२७.२%) म्हणाले. तसेच ५० (२०%) उत्तरदात्यांनी १८ ते २१ दरम्यान विवाह होतो असे म्हटले. २१ ते २५ या वयोगटात विवाह होण्याचे प्रमाण हे ३०(१२%) दिसते. या वरुन असे निदर्शनास येते की या समाजात आज ही विवाह समईचे वय हे कती असलयाचे दिासते

**तक्ता क्र.४.१.८**

**पारधी विवाहात हुंडा हा कोणाकडून घेतला जातो हे दर्शविणारा तक्ता.**

| **अ.क्र.** | | **तालुके** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **वरा कडून** | **४** | **२५** | **६७** | **१४४** | **२४०** |
| | | १.७% | १०.४% | २७.९% | ६०.०% | १००.०% |
| | | १.६% | १०.०% | २६.८% | ५७.६% | ९६.०% |
| **२** | **वधू कडुन** | **१** | **३** | **१** | **५** | **१०** |
| | | १०.०% | ३०.०% | १०.०% | ५०.०% | १००.०% |
| | | ०.४% | १.२% | ०.४% | २.०% | ४.०% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वरील तक्ता असे दर्शवितो की पारधी या जमातीत हुंडा हा वराकडुनच घेतला जातो कारण एकुण २५० उत्तरदात्यांपैकी २४० (९६.०) उत्तरदाते हे वराकडून हुंडा घेतात आसे म्हणतात तर वधुकडुन हुंडा घेतला जातो आसे १० (४.०) उत्तरदाते म्हणतात.

## ४.२) पारध्यांच्या सामाजिक, जीवन विषयक माहिती :-

पारधी जमातीचे सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवन हे प्रगतांपेक्षा भिन्न आहे.पारधी जमात ही मुळ सामाजिक प्रवाहा पासून दूर आहे.तेव्हा इतर प्रगत समाज आणि पारधी हे समीकरण अतिशय भिन्न आहे.पारध्यांची स्वतंत्र अशी वेगळी संस्कृती आहे.व ते सर्व आजही बऱ्याच प्रमाणात सांस्कृतिक मुल्यांचे पालन करतात. त्यांचे धार्मिक जीवन, देवदेदव करण्याच्या पध्द्ती या सर्वच बाबी इतर समाजपेक्षा भिन्न आहे. पारधी हे स्वत:ला हिंदू धर्मीय मानतात तेव्हा हिंदू धर्माच्या देवतालाच ते मानतात फक्त देवदेव, पूजाअर्चा करण्याच्या पध्दती हया भिन्न आहेत. हिंदू धर्मात भवनीमातेची उपासना केली जाते. या समाजात याच भवानीमातेला वेगवेगळया रूपात ते मानतात व तिला प्रसन्न ठेवण्यासाठी वेगवेगळे विधी करतात. तसेच हे लोक खंडोबाला, विठ्ठल रूक्मीणीला देखील मानतात. हनुमानावर देखील यांची श्रध्दा आहे.हनुमान लंगोटी वापरतो म्हणून आम्हीही लंगोटी वापरतो असे काहींनी मत व्यक्त केले.सप्तशृंगी, मांढरादेवी, भवानी, लक्ष्मी अशा देवदेवतांची देखील पूजा पारधी करतात. पुढील काही प्रश्नांच्या आधारे व त्या प्रश्नांच्या मिळालेल्या उत्तरांच्या आधारे सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवनाचे विश्लेषण केलेले आहे.

**तक्ता क्र.४.२.१**

| पारधी समाजाचा सामाजिक दर्जा बदलतोय की नाही हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सामाजिक दर्जा बदलतोय | तालुका | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | १ | १५ | १५ | ३९ | ७० |
| | | १.४% | २१.४% | २१.४% | ५५.७% | १००.०% |
| | | ०.४% | ६.०% | ६.०% | १५.६% | २८.०% |
| २ | नाही | ४ | १३ | ५३ | ११० | १८० |
| | | २.२% | ७.२% | २९.४% | ६१.१% | १००.०% |
| | | १.६% | ५.२% | २१.२% | ४४.०% | ७२.०% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

पारधी जमात ही आज बऱ्याच प्रमाणात इतर लोकांच्या संपर्कात येत आहे.शासनाच्या विविध योजना यांच्यासाठी राबविल्या जात आहेत. त्यातून नेमका त्यांचा सामाजिक दर्जा बदलतोय का हे जाणून घेण्यासाठी संशोधकाने उपरोक्त प्रश्न विचारलेला आहे वरील तक्त्या वरून असे निदर्शनास येते की, सामाजिक दर्जा बदलतोय असे म्हणणारे एकुण उत्तरदाते ७०(२८.८%) इतके आहेत तर बदलत नाही असे म्हणणारे उत्तरदाते १८० (७२.०%) आहेत.

वरील तक्त्या वरून असे निदर्शनास येते की, आमचा समाजीक दर्जा बदलतोय असे म्हणणारे उत्तरदाते हे सामाजिक दर्जा बदलत नाही असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांपेक्षा जास्त आहेत. म्हणजेच सामाजिक दर्जात बदल होतोय हे दिसून येते. बऱ्याच उत्तरदात्यांनी सर्वेक्षणा दरम्यान असे मत व्यक्त केले की, आज आम्हाला सरकारकडून जमिनी मिळाल्या आहेत. तेव्हा काही प्रमाणात का होईना आमची भटकंती थांबलेली आहे.शासनाने आदिवासी विकास योजनेअंतर्गत विविध योजना केल्या आहेत. त्या योजना प्राप्त होण्यात काही अडचणी ओहत परंतू तरी देखील या योजनेंचा लाभ काही बांधवांना मिळत आहे.कितीतरी वर्षापासून गुन्हेगार कलंकाने पिढीत पारधी समाज मूळ समाज प्रवाहात येत आहे. प्रगतांशी संपर्क वाढत चालला आहे.आणि समाजा बद्दलचा पूर्वग्रह दूर करण्याच्या कामात अनंत झेंडे, राजू काळे, अविनाश निकाळंजे, प्रा.बाळासाहेब बळे, अहमदनगर जिल्हयाचे माजी जिल्हाधिकारी उमाकांत दांगट आदि प्रयत्नशील आहेत. ज्याच्या माध्यमातून इतर लोक एका आपुलकीच्या भावनेने आमच्याकडे पहात आहेत. हा बदल गेल्या १५ ते २० वर्षात जाणवत आहे.

### तक्ता क्र.४.२.२

| सामाजिक दर्जा बदलत असल्यास पारध्यांना इतरांकडून कशी वागणूक मिळते हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कशी वागणूक मिळते | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | सामाजिक प्रतिष्ठेत फार फरक नाही | ४ | १३ | ५३ | ११० | १८० |
| | | २.२% | ७.२% | २९.४% | ६१.१% | १००.०% |
| | | १.६% | ५.२% | २१.२% | ४४.०% | ७२.०% |
| २ | गावच्या सामाजिक कार्यक्रमात समावून घेतले जाते. | ० | ४ | ३ | १५ | २२ |
| | | ०.०% | १८.२% | १३.६% | ६८.२% | १००.०% |
| | | ०.०% | १.६% | १.२% | ६.०% | ८.८% |
| ३ | विवाह प्रसंगी आपणास आंमत्रित केले जाते. | ० | ६ | ८ | १९ | ३३ |
| | | ०.०% | १८.२% | २४.२% | ५७.६% | १००.०% |
| | | ०.०% | २.४% | ३.२% | ७.६% | १३.२% |
| ४ | घरगुती कार्यक्रम जसे, वास्तुशांती, वाढदिवस इ. आमंत्रित केले जाते. | ० | ५ | ४ | ४ | १३ |
| | | ०.०% | ३८.५% | ३०.८% | ३०.८% | १००.०% |
| | | ०.०% | २.०% | १.६% | १.६% | ५.२% |
| ५ | ग्रामसभेत सहभाग नोदंवितात का व त्याची दखल घेतली जाते. | १ | ० | ० | १ | २ |
| | | ५०.०% | ०.०% | ०.०% | ५०.०% | १००.०% |
| | | ०.४% | ०.०% | ०.०% | ०.४% | ०.८% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

सामाजिक दर्जा बदलतोय या अनुशंगाने दर्जा बदलत असल्यास गावकऱ्यांकडून आपणास कशी वागणूक मिळते हे वरील तक्ता वरून दिसून येते. वरील तक्त्या नुसार सामाजिक स्थान नाही म्हणणारे एकुण १८०(७२.०२%) उत्तरदाते होते. गावच्या सामाजिक कार्यक्रमात समावुन घेतले जाते असे २२(८.८) उत्तरदाते म्हणतात. विवाहप्रसंगी आमंत्रित केले जाते असे म्हणणारे ३३ (१३.२%) उत्तरदाते होते. घरगुती कार्यक्रम जसे वास्तुशांती, वाढ दिवस इ. ठिकाणी

आमंत्रित करतात असे १३(५.२%) उत्तरदाते म्हणत होते. ग्रामसभेत सहभाग नोंदविल्या नंतर त्याची दखल घेतली जाते असे म्हणणारे उत्तरदाते २ (०.८%) आहेत. या वरुन असे लक्षात येते की या जमातीतील लोकांचा सामाजिक दर्जा बदलत जरी असला तरी त्याचे प्रमाण मात्र अतीशय कमी आहे.

**तक्ता क्र.४.२.३**

**समाजातील कोणाकडुन त्रास होतो हे दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | कोणत्या घटकांकडून त्रास | तालुके | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | सावकार | ० | ३ | ३ | १४ | २० |
| | | ०.०% | १५.०% | १५.०% | ७०.०% | १००.०% |
| | | ०.०% | १.२% | १.२% | ५.६% | ८.०% |
| २ | पुढारी | ४ | ७ | १० | २१ | ४२ |
| | | ९.५% | १६.७% | २३.८% | ५०.०% | १००.०% |
| | | १.६% | २.८% | ४.०% | ८.४% | १६.८% |
| ३ | पोलीस पाटील | १ | ७ | ८ | १६ | ३२ |
| | | ३.१% | २१.९% | २५.०% | ५०.०% | १००.०% |
| | | ०.४% | २.८% | ३.२% | ६.४% | १२.८% |
| ४ | सरपंच | ० | ११ | ४७ | ९८ | १५६ |
| | | ०.०% | ७.१% | ३०.१% | ६२.८% | १००.०% |
| | | ०.०% | ४.४% | १८.८% | ३९.२% | ६२.४% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

पारधी जमातीला इतर समाजाच्या संपर्कात येण्यासाठी बरेच प्रयत्न झाले आहेत चालू आहेत. परंतु आजही काही प्रमाणात समाजात या लोकांना त्रासास सामोरे जावे लागत आहे. ते कोणते घटक आहेत जे या समाजातील लोकांना त्रासदायक आहेत हे जाणून घेण्यासाठी संशोधकाने हा प्रश्न केला आहे.

वरील तक्त्या वरून सावकाराकडून त्रास होतो असे २०(८.४%) उत्तरदाते म्हणत होते तर ४२ (१६.८%) उत्तरदात्यांना पुढाऱ्यांकडून त्रास होतो असे म्हणतात. तसेच पोलीस पाटीलांकडून त्रास होतो असे ३२ (१२.८%) उत्तरदाते सांगतात तर सरपंच हा घटक आम्हाला त्रास देतो असे म्हणणारे १५६ (६२.४%) उत्तरदाते आहेत.

**तक्ता क्र.४.२.४**

**पारध्यांना गुन्हेगार जमात हा कलंक आजही वाटतो का? वाटत नाही हे दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | गुन्हेगार जमात हा कलंक | तालुके | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | **३** | **१४** | **२७** | **५७** | **१०१** |
| | | ३.०% | १३.९% | २६.७% | ५६.४% | १००.०% |
| | | १.२% | ५.६% | १०.८% | २२.८% | ४०.४% |
| २ | नाही | **२** | **१४** | **४१** | **९२** | **१४९** |
| | | १.३% | ९.४% | २७.५% | ६१.७% | १००.०% |
| | | ०.८% | ५.६% | १६.४% | ३६.८% | ५९.६% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त सारणी नूसार एकुण १०१ (४०.४%) उत्तरदात्यांना आजही आपण गुन्हेगार जमातीत जन्मलयामुळे समाजात आपण कलंकीत आहोत असे वाटते. तर १४९ (५९.६%) उत्तरदात्यांनी कलंकीत असलयाचे जाणवत नाही असे मत व्यक्त केले.पारधी जमातीच्या सामाजीक मागासले पणाचे मुख्य कारण हे गुन्हेगार हा कलंक आहे तो मीटवण्या साठी शासकीय पातळीवर काही उपाययोजना होणे गरजेचे आहे.

**तक्ता क्र.४.२.५**

| पारध्यांना स्वतंत्र स्मशानभूमी आहे का नाही हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **स्मशानभूमी** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१.** | **आहे** | **४** | **९** | **९** | **२२** | **४४** |
| | | ९.१% | २०.५% | २०.५% | ५०.०% | १००.०% |
| | | १.६% | ३.६% | ३.६% | ८.८% | १७.६% |
| **२.** | **नाही** | **१** | **१९** | **५९** | **१२७** | **२०६** |
| | | ०.५% | ९.२% | २८.६% | ६१.७% | १००.०% |
| | | ०.४% | ७.६% | २३.६% | ५०.८% | ८२.४% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरून स्वतंत्र स्मशानभूमी आहे असे म्हणणारे एकुण उत्तरदाते ४४ (१७.६%) इतके आहे तर स्वतंत्र स्मशानभूमी नाही असे म्हणणारे एकुण उत्तरदाते २०६ (८२.४%) इतके आहे. उपरोक्त आकडेवारीनुसार स्वतंत्र स्मशानभूमी नाही असे म्हणणारे उत्तरदात्यांची संख्या सर्वाधिक आहे. पारधी समाज हा भटके व अस्थिर जीवन जगत असल्यामुळे स्मशानभूमीची समस्या ही नेहमी त्यांना भेडसावते गावगाडया बाहेर असल्यामुळे पारध्यांना अंत्यविधी हा माळरानावर करावा लागतो.तेव्हा शासकीय पातळी वरुन यांच्या स्मशानभूमी साठी देखील प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**तक्ता क्र.४.२.६**

| जातपंचायत असावी असे वाटते का हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जात पंचायत असावी का | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | असावी | **३** | **२५** | **५७** | **१३०** | **२१५** |
| | | १.४% | ११.६% | २६.५% | ६०.५% | १००.०% |
| | | १.२% | १०.०% | २२.८% | ५२.०% | ८६.०% |
| २ | नसावी | **२** | **३** | **११** | **१९** | **३५** |
| | | ५.७% | ८.६% | ३१.४% | ५४.३% | १००.०% |
| | | ०.८% | १.२% | ४.४% | ७.६% | १४.०% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरून एकुण २१५ (८६.०%) उत्तरदाते हे जात पंचायत असावी असे म्हणतात. तर ३५ (१४.०%) उत्तरदाते जातपंचायत नसावी असे म्हणतात. उपरोक्त तक्त्या तील आकडेवारी वरून असे दिसून येते की जात पंचायत असावी असे अनेक उत्तरदात्यांचे म्हणणे आहे या वरून हा समाज आज ही आपल्या समाजाच्या सामाजिक संरचनेला चीटकून आहे असे दिसते.

**तक्ता क्र.४.२.७**

| जात पंचायत वर्षातून किती वेळा भरते हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जातपंचायत | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | एकदा | **५** | **१२** | **५६** | **१२२** | **१९५** |
| | | २.६% | ६.२% | २८.७% | ६२.६% | १००.०% |
| | | २.०% | ४.८% | २२.४% | ४८.८% | ७८.०% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | दोनदा | **०** | **१५** | **१२** | **२३** | **५०** |
| | | ०.०% | ३०.०% | २४.०% | ४६.०% | १००.०% |
| | | ०.०% | ६.०% | ४.८% | ९.२% | २०.०% |
| ३ | दोन पेक्षा जास्त वेळा | **०** | **१** | **०** | **४** | **५** |
| | | ०.०% | २०.०% | ०.०% | ८०.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.४% | ०.०% | १.६% | २.०% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या नुसार जात पंचायत वर्षातून एकदा भरते असे म्हणणारे १९५ (७८.०%) इतके उत्तरदाते आहेत. तर जात पंचायत वर्षातून दोनदा भरते असे म्हणणारे इतके ५० (२०.०%) उत्तरदाते आहेत. तसेच वर्षातून दोन पेक्षा जास्त वेळा जात पंचायत भरते असे म्हणणारे ५ (२.०%) इतके उत्तरदाते आहेत या व वरून असे दिसून येते की जात पंचायत वर्षातून एकदा भरते असे म्हणणारे जास्त उत्तरदाते आहेत.

**तक्ता क्र.४.२.८**

**पारध्यांना सामाजिक बहिष्कार कायदा २०१७ माहिती आहे की नाही हे दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **सामाजिक बहिष्कार कायदा** | **तालुके** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होय** | **२** | **८** | **११** | **२३** | **४४** |
| | | ४.५% | १८.२% | २५.०% | ५२.३% | १००.०% |
| | | ०.८% | ३.२% | ४.४% | ९.२% | १७.६% |
| **२** | **नाही** | **३** | **२०** | **५७** | **१२६** | **२०६** |
| | | १.५% | ९.७% | २७.७% | ६१.२% | १००.०% |
| | | १.२% | ८.०% | २२.८% | ५०.४% | ८२.४% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

सामाजिक बहिष्कार अधिनियम २०१७ हा जात पंचायती विरोधातील कायदा नुकताच महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेला आहे या कायदयाबाबत या समाजाला कितपत माहिती आहे हे जाणून घेण्यासाठी संशोधकांनी उपरोक्त प्रश्न विचारलेला आहे. वरील तक्त्यातील आकडेवारीनुसार एकुण ४४(१७.६%) टक्के लोकांना या कायदयाबाबत माहिती आस ल्याची दिसून येते. तर केवळ २०६ (८२.४%) लोकांनाच या कायदयाबाबत जागृती नसलयाची दिसते.

**४.३. पारध्यांची आर्थिक माहिती:-**

प्रस्तुत घटकात पारधी जमातीच्या आर्थिक स्थितीचा संख्यात्मक तथ्यांच्या आधारे अभ्यास केलेला आहे. कार्ल मार्क्स या विचारवंताने मांडलेलया आर्थिक निर्धारण वादाची संकलपना ही ज्या प्रमाणे सर्व क्षेत्रात लागू पडते त्याच प्रमाणे ही जमात देखील या पासून वेगळी नाही.पारधी लोक मागास राहण्याचे मुख्य कारण हे त्यांच्या आर्थिक मागासलेपणात आहे व त्यांना ठोस उपजिविकेचे साधन प्राप्त न झालयाने त्यांची आर्थिक वंचना वाढतच गेली. पारधी लोकांचा शिकार हा मूळ पारंपारिक व्यवसाय आहे.पारधी समाजाचे शिकार या व्यवसायावर कसाबसा उदरनिर्वाह होत होता.परंतु ब्रिटीश काळात जंगल विषयक कायदे निर्माण झाल्याने या जमातीच्या उदरनिर्वाहावर एकदम गदा आली.तेंव्हापासून आजपर्यंत त्यांचे आर्थिक जीवन कसे आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न यातून केलेला आहे. शेती, मजूरी, पशुपालन, शेतराखण, नोकरी, व्यवसाय, भिक्षा, शिकार, उसतो, मजूरी, दारूविक्री, चोरी, इ. कामातुन पारधी समाजाची आर्थिक जिवन दिसुन येते.

**तक्ता क्र.४.३.१**

| शेती आहे का नाही हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | शेती आहे का | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | २ | १५ | १४ | ३८ | ६९ |
| | | २.९% | २१.७% | २०.३% | ५५.१% | १००.०% |
| | | ०.८% | ६.०% | ५.६% | १५.२% | २७.६% |
| २ | नाही | ३ | १३ | ५४ | १११ | १८१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १.७% | ७.२% | २९.८% | ६१.३% | १००.०% |
| | | १.२% | ५.२% | २१.६% | ४४.४% | ७२.४% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरून पारधी समाजातील लोकांकडे किती शेती उपल्बध आहे हे दर्शविलेले आहे. वरील तक्त्यातील आकडेवारीनुसार शेती असलेले उत्तरदाते एकुण ६९ (२७. ७%) इतके आहेत व शेती नसणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ही १८१ (७२.४% ) इतके आहे. यावरून शेती नसणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या जास्त असलेली दिसून येते.

**तक्ता क्र.४.३.२**

| **शेती असल्यास किती एकर आहे हे दर्शविणारा तक्ता** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **शेती एकरात** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **शेती नाही** | **३** | **१३** | **५४** | **१११** | **१८१** |
| | | १.७% | ७.२% | २९.८% | ६१.३% | १००.०% |
| | | १.२% | ५.२% | २१.६% | ४४.४% | ७२.४% |
| **२** | **१.एकर** | **२** | **०** | **५** | **१४** | **२१** |
| | | ९.५% | ०.०% | २३.८% | ६६.७% | १००.०% |
| | | ०.८% | ०.०% | २.०% | ५.६% | ८.४% |
| **३** | **२.एकर** | **०** | **१३** | **९** | **२१** | **४३** |
| | | ०.०% | ३०.२% | २०.९% | ४८.८% | १००.०% |
| | | ०.०% | ५.२% | ३.६% | ८.४% | १७.२% |
| **४** | **३.एकर पेक्षा जास्त** | **०** | **२** | **०** | **३** | **५** |
| | | ०.०% | ४०.०% | ०.०% | ६०.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.८% | ०.०% | १.२% | २.०% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

स्त्रोत : क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरून पारधी समाजातील लोकांकडे शेती असल्यास किती एकर आहे हे दर्शविलेले तक्ता

आहे.वरील तक्त्यातील आकडेवारीनुसार शेती नाही म्हणणारे उत्तरदाते एकुण १८१ (७२.४%) इतके आहेत. व १.एकर शेती असणा-या उत्तरदात्यांची संख्या ही २१ (८.४ %) इतके आहे, तर २.एकर शेती असणा-या उत्तरदात्यांची संख्या ही ४३ (१७.२) तर ३ एकर पेक्षा जास्त शेती असणा-या उत्तरदात्यांची संख्या ही ५(२.०) इतकी आहे. यावरून शेती नसणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या जास्त असलेली दिसून येते.

**तक्ता क्र.४.३.३**

**पारध्यांकडे असलेलया शेतीचा प्रकार दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | शेतीचा प्रकार | तालुके | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | जिरायत | **२** | **१२** | **११** | **२७** | **५२** |
| | | ३.८% | २३.१% | २१.२% | ५१.९% | १००.०% |
| | | ०.८% | ४.८% | ४.४% | १०.८% | २०.८% |
| २ | बागायत | **०** | **३** | **३** | **११** | **१७** |
| | | ०.०% | १७.६% | १७.६% | ६४.७% | १००.०% |
| | | ०.०% | १.२% | १.२% | ४.४% | ६.८% |
| ३ | शेती नाही | **३** | **१३** | **५४** | **१११** | **१८१** |
| | | १.७% | ७.२% | २९.८% | ६१.३% | १००.०% |
| | | १.२% | ५.२% | २१.६% | ४४.४% | ७२.४% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्ता पारधी समाजाकडे असणाऱ्या शेतीचा प्रकार दर्शवितो. वरील तक्त्यातील आकडेवारी नुसार जिरायत शेती असणाऱ्या कुटुंबांची एकुण संख्या ५२ (२०.८%) इतकी आहेत. व बागायत शेती असणाऱ्यांची संख्या १७ (६.८%) आहेत. तसेच शेतीच नाही असे म्हणणारे १८१ (७२.४%) उत्तरदाते आहेत. शासकीय योजनेत पारधी जमातीला शेती वाटपाचा लाभ हा अतिशय कमी प्रमाणात मिळाला आहे. व जो लाभ मिळाला आहे. त्यात बागायत शेती असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अतिशय कमी प्रमाण आहे. बहूतेकांना जिरायत व कोरडवाहू शेती मिळालेली दिसते. अशा शेतीतून उपजिवीका भागवणे अतिशय कठीण कार्य आहे. त्यामूळे नाविलाजास्तव या जमातीतील लोकांना चोरी व इतर व्यवसाय करावा लागतो.

**तक्ता क्र. ४.३.४**

**पारधी लोक शेतीला जोड धंदा म्हणून अन्य कोणता व्यवसाय करतात हे दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | शेती व्यतिरीक्त इतर व्यवसाय | तालुके | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | गायीपालन | ३ | १३ | ५४ | १११ | १८१ |
| | | १.७% | ७.२% | २९.८% | ६१.३% | १००.०% |
| | | १.२% | ५.२% | २१.६% | ४४.४% | ७२.४% |
| २ | शेळीपालन | २ | ० | ५ | १४ | २१ |
| | | ९.५% | ०.०% | २३.८% | ६६.७% | १००.०% |
| | | ०.८% | ०.०% | २.०% | ५.६% | ८.४% |
| ३ | कुकूटपालन | ० | १३ | ९ | २१ | ४३ |
| | | ०.०% | ३०.२% | २०.९% | ४८.८% | १००.०% |
| | | ०.०% | ५.२% | ३.६% | ८.४% | १७.२% |
| ४ | कोणताही नाही | ० | २ | ० | ३ | ५ |
| | | ०.०% | ४०.०% | ०.०% | ६०.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.८% | ०.०% | १.२% | २.०% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

श्रीगोंदा व इतर तीन तालुक्यात ब-याच पारधी कुटुंबांना शेतजमीन मिळालेली आहे.परंतु शेतीला काही जोडधंदा हे लोक करतात का हे पाहण्यासाठी संशोधकाने सदर विचारलेला आहे.वरील तक्त्या वरून एकुण १८१ (७२.४%) उत्तरदाते म्हणाले की, आंम्ही शेतिव्यतिरिक्त गायीपालन करतो. तर काहींचे म्हणणे आहे की, २१(८.४%) शेळीपालन करतो. तसेच ४३ (१७.२%) कुक्कुटपालन करतात असे म्हणाले. तर या पैकी कोणताही नाही असे म्हणण-यांची संख्या ही ५ (२.०%) इतकी आहे.

**तक्ता क्र.४.३.५**

| पारध्यांना स्वत:चे घर आहे का ? नाही हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **स्वत:चे घर आहे** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **आहे** | **०** | **०** | **११** | **४३** | **५४** |
| | | ०.०% | ०.०% | २०.४% | ७९.६% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ४.४% | १७.२% | २१.६% |
| **२** | **नाही** | **५** | **२८** | **५७** | **१०६** | **१९६** |
| | | २.६% | १४.३% | २९.१% | ५४.१% | १००.०% |
| | | २.०% | ११.२% | २२.८% | ४२.४% | ७८.४% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरुन अहमदनगर मधील जामखेड, कर्जत, नगर व श्रीगोंदा या चार ही तालुक्यातुन निवड केलेलया एकुण उत्तरदात्यांमध्ये पारधी समाजातील व्यक्तीला स्वत:चे घर आहे का नाही हे दिसून येते. तक्त्यातील आकडेवारीनुसार स्वत:चे घर आहे असे म्हणणारे एकुण ५४ (२१.६%) उत्तरदाते आहेत. तर स्वत:चे घर नाही असे म्हणणारे १९६( ७८.४% ) इतके उत्तरदाते आहेत. यावरून असे दिसते की पारधी जमातीसाठी असणाऱ्या घरकूल या शासकीय योजनेचा लाभ अतिशय कमी लोकांना मिळाला आहे. बरेचशे पारधी कुटूंब आजही पाल किंवा

झोपडी मध्ये राहताना दिसतात. अतिशय कमी लोकांचे घरे हे सिंमेंट विट पत्र्यांचे आहेत.२०२० साली महासत्ता बनु पहाणाऱ्या भारत देशात एक वर्ग उघडयावर आपला संसार थाटत आहेत ही एक चिंतेची बाब आहे.

**तक्ता क्र.४.३.६**

| पारध्यांच्या घराचा प्रकार दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **घराचा प्रकार** | **तालुका** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **पाल** | **२** | **१९** | **१८** | **४६** | **८५** |
| | | २.४% | २२.४% | २१.२% | ५४.१% | १००.०% |
| | | ०.८% | ७.६% | ७.२% | १८.४% | ३४.०% |
| **२** | **झोपडी** | **३** | **९** | **४०** | **६५** | **११७** |
| | | २.६% | ७.७% | ३४.२% | ५५.६% | १००.०% |
| | | १.२% | ३.६% | १६.०% | २६.०% | ४६.८% |
| **३** | **पत्राशेड** | **०** | **०** | **५** | **१५** | **२०** |
| | | ०.०% | ०.०% | २५.०% | ७५.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | २.०% | ६.०% | ८.०% |
| **४** | **विट सिमेंट पत्र्याचे पक्के घर** | **०** | **०** | **३** | **१६** | **१९** |
| | | ०.०% | ०.०% | १५.८% | ८४.२% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | १.२% | ६.४% | ७.६% |
| **५** | **सिमेंट ब्लॉकचे घर** | **०** | **०** | **२** | **७** | **९** |
| | | ०.०% | ०.०% | २२.२% | ७७.८% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.८% | २.८% | ३.६% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरुन पारधी समाजातील व्यक्ताचे स्वत:चे घर कोणत्या प्रकारचे आहे हे दिसून येते. एकुण चारही तालुक्यातील आकडेवारीनुसार पाल आहे असे म्हणणारे एकूण ८५ (३४%) उत्तरदाते आहेत. तर झोपडी आहे असे म्हणणारे ११७ (४६%) इतके उत्तरदाते आहेत. तसेच पत्राशेड आहे असे म्हणणारे २० (८.०%) इतके उत्तरदाते आहेत. तर विट सिमेंट पत्र्याचे घर आहे असे म्हणणारे एकुण १९(७.६% ) उत्तरदाते आहेत. तसेच सिमेंट ब्लॉकचे घर आहे असे म्हणणारे ९ (३.६% ) उत्तरदाते आहेत.

**तक्ता क्र.४.३.७**

| पारध्यांकडे कोणते रेशन कार्ड आहे हे दर्शवीणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | रेशन कार्ड | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | पिवळे | ५ | २८ | ६८ | १४३ | २४३ |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | १००% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५७.२% | ९७.२% |
| २ | पांढरे | ० | ० | ० | ७ | ७ |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | १००% | १००% |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | २.८% | २.८% |
| ३ | केशरी | ० | ० | ० | ० | ० |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.०% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरुन अहमदनगर मधील चारही तालुक्यांचा विचार केला तर या तालुक्यात पिवळे रेशन कार्ड आसणारे २४३(९७.२%) इतके उत्तरदाते आहेत तर पांढरे रेशन कार्ड आसणारे ७(२.८%) इतके उत्तरदाते आहेत तर तसेच केशरी रेशनकार्ड धारण करणारे उत्तरदात्यांचा विचार केला तर चार ही तालुक्यात एकही उत्तरदाता दिसून आला नाही. म्हणजेच या जमातीत पिवळे रेशनकार्ड आसणारे उत्तरदाते सर्वाधीक आहेत.

**तक्ता क्र.४.३.८**

| पारध्यांकडे मतदान कार्ड आहे की नाही हे दर्शवीणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | मतदान कार्ड | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | ५ | २८ | ६७ | १४७ | २४७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २.०% | ११.३% | २७.१% | ५९.५% | १००.०% |
| | | २.०% | ११.२% | २६.८% | ५८.८% | ९८.८% |
| **२** | **नाही** | **०** | **०** | **१** | **२** | **३** |
| | | ०.०% | ०.०% | ३३.३% | ६६.७% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.४% | ०.८% | १.२% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरुन अहमदनगर मधील जामखेड या तालुक्याचा विचार केला तर या तालुक्यात मतदान कार्ड आसणारे ५(२.०%) इतके उत्तरदाते आहेत तर कर्जत २८(११.२%),नगर ६७ (२६.८%), श्रीगोंदा १४७ (५८.८%), म्हणजेच या चार ही तालुक्यात मतदान कार्ड आसणारे एकुण २४७ (९८.८) इतके उत्तरदाते आढळून आले. तसेच मतदान कार्ड नासणारे जामखेड येथे ००% इतके उत्तरदाते आहेत तर कर्जत ००%, नगर १(०.४%), श्रीगोंदा २ (०.८%), म्हणजेच या चार ही तालुक्यात मतदान कार्ड आसणा-यांची एकुण संख्या ही सर्वाधीक आहे.

**तक्ता क्र.५.३.९**

| पारध्यांकडे आधारकार्ड आहे की नाही हे दर्शवीणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **आधारकार्ड** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होय** | **५** | **२८** | **६७** | **१४६** | **२४६** |
| | | २.०% | ११.४% | २७.२% | ५९.३% | १००.०% |
| | | २.०% | ११.२% | २६.८% | ५८.४% | ९८.४% |
| **२** | **नाही** | **०** | **०** | **१** | **३** | **४** |
| | | ०.०% | ०.०% | २५.०% | ७५.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.४% | १.२% | १.६% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

स्त्रोत : क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरुन अहमदनगर मधील जामखेड या तालुक्याचा विचार केला तर या तालुक्यात आधार कार्ड आसणारे **५**(२.०%) इतके उत्तरदाते आहेत तर कर्जत २८(११.२%),नगर ६७ (२६.८%), श्रीगोंदा १४६ (५८.४%), म्हणजेच या चार ही तालुक्यात आधार कार्ड आसणारे एकुण २४६ (९८.४) इतके उत्तरदाते आढळून आले. तसेच मतदान कार्ड नसणारे जामखेड येथे ००% इतके उत्तरदाते आहेत तर कर्जत ००%, नगर १(०.४%), श्रीगोंदा २ (०.८%), म्हणजेच या चार ही तालुक्यात मतदान कार्ड आसणा-यांची एकुण  संख्या २४७ (९८.८) इतकी आहे.

**तक्ता क्र.४.३.१०**

| **पारधी लोकांना सहजासहजी रोजगार उपलब्ध होतो का होत नाही हे दर्शवितो.** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **रोजगार उपलब्धता** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होतो** | **०** | **३** | **२** | **१५** | **२०** |
| | | ०.०% | १५.०% | १०.०% | ७५.०% | १००.०% |
| | | ०.०% | १.२% | ०.८% | ६.०% | ८.०% |
| **२** | **होत नाही** | **५** | **२५** | **६६** | **१३४** | **२३०** |
| | | २.२% | १०.९% | २८.७% | ५८.३% | १००.०% |
| | | २.०% | १०.०% | २६.४% | ५३.६% | ९२.०% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

पारधी लोक रोजगार उपलब्धी कशी करतात व कुठे करतात हे जाणून घेण्यासाठी संशोधकाने हा प्रश्न विचारलेला आहे.वरील तक्त्या वरून गावात रोजगार उपलब्ध करतो असे म्हणणारे एकुण २० (८.०%)उत्तरदाते होते. तर करत नाहीत इतरत्र करतो असे म्हणणारे

उत्तरदाते २३०(९२.०%) होते. वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की २३० लोक हे इतरत्र रोजगार शोधतो असे म्हणाले.

**तक्ता क्र.४.३.११**

| **पारधी कुटुंबातून कोणी नोकरीला आहे की नाही हे दर्शविणारा तक्ता.** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **नोकरी आहे** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होय** | **०** | **०** | **०** | **७** | **७** |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | १००.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | २.८% | २.८% |
| **२** | **नाही** | **५** | **२८** | **६८** | **१४२** | **२४३** |
| | | २.१% | ११.५% | २८.०% | ५८.४% | १००.०% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५६.८% | ९७.२% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

नोकरी हा स्थिर आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत आहे तेंव्हा संशोधकाने हा प्रश्न विचालेला आहे.वरील तक्ता पारधी जमातीतील कुटुंबात कोणी नोकरीला आहे की नाही हे दर्शविते. नोकरीत आहे म्हणणा-या उत्तरदात्यांची एकुण संख्या ७ (२.८%) आहे.  तर नोकरीस नाही असे म्हणणा-यांची संख्या २४३ (९७.२%) आहे. वरील तक्त्यातील टक्केवारी वरून असे दिसून येते की, नोकरीस नाही असे म्हणणा-या उत्तरदात्यांची संख्या जास्त आहे.व जे लोक नोकरीत आहेत असे म्हणाले त्या पैका काही प्राथमीक शिक्षक तर काही ग्रामपंचायत शिपाई तर शाळेवर शिपाई म्हणून कार्यरत आहेत.व नोकरीचा प्रकार हा कायम नोकरी आसा नाही.

इतर समाजातील लोक आजही पारधी जमातीवर विश्वास ठेवत नाहीत शिक्षणात त्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. ज्यांनी शिक्षण घेतले त्यांना केवळ पारधी आहे म्हणून नोकरीस ठेवत नाहीत किंवा ती मिळू दिली जात नाही.अशा सामाजिक परिस्थितीमुळे या लोकांची आर्थिक परिस्थिती सबळ होवू शकलेली नाही.

**तक्ता क्र.४.३.१२**

| पारधी शिकार करतात का करत नाहीत हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | शिकार करता | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | **०** | **१०** | **९** | **१८** | **३७** |
| | | ०.०% | २७.०% | २४.३% | ४८.६% | १००.०% |
| | | ०.०% | ४.०% | ३.६% | ७.२% | १४.८% |
| २ | नाही | **५** | **१८** | **५९** | **१३१** | **२१३** |
| | | २.३% | ८.५% | २७.७% | ६१.५% | १००.०% |
| | | २.०% | ७.२% | २३.६% | ५२.४% | ८५.२% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

शिकार आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत आहे तेंव्हा संशोधकाने हा प्रश्न विचालेला आहे. वरील तक्ता पारधी जमातीतील कुटुंबात कोणी शिकार करतात का? की नाही हे दर्शविते. शिकार करतात असे म्हणणा-या चार तालुक्यातील एकुण उत्तरदात्यांची संख्या ३७(१४.८%) आहे. तर शिकार करत नाही असे म्हणणा-यांची संख्या २१३ (८५%) आहे असे दिसते. वरील तक्त्या तील टक्केवारी वरून असे दिसून येते की, शिकार करत नाही असे म्हणणा-या उत्तरदात्यांची संख्या जास्त आहे.

**तक्ता क्र.४.३.१३**

| पारधी कुटुंबातील भिक मागणा-यांची संख्या दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कोणी भिक्षुक आहे | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | **०** | **४** | **४** | **९** | **१७** |
| | | ०.०% | २३.५% | २३.५% | ५२.९% | १००.०% |
| | | ०.०% | १.६% | १.६% | ३.६% | ६.८% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **२** | **नाही** | **५** | **२४** | **६४** | **१४०** | **२३३** |
| | | २.१% | १०.३% | २७.५% | ६०.१% | १००.०% |
| | | २.०% | ९.६% | २५.६% | ५६.०% | ९३.२% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

भिक मागून पैसा मिळविणे हा पारधी जमातीच्या आर्थिकतेचा एक भाग आहे. खरोखर या कुटुंबातून कोणी भिक मागते का ? हे तपासण्यासाठी संशोधकाने उपरोक्त प्रश्न विचारलेला आहे. वरील तक्त्या प्रमाणे कुटुंबात कोणी भिक मागते आहे का ? असा प्रश्न विचाला असता होय म्हणणा-या एकुण उत्तरदात्यांची संख्या ही १७ (६.८%) आहे. तर कुटुंबात कोणीही भिक्षुक नाही असे म्हणणा-या उत्तरदात्यांची संख्या ही २३३ (८९.२%) आहे. उपरोक्त टक्केवारीचा विचार करता असे दिसून येते की २३३ म्हणजे जास्तीत जास्त कुटुंबातील सदस्य हे भिक मागत नाहीत.तरी पारधी जमातीतील लोक हे भिक मागुन आपला चरितार्थ चालवतात व भिक मागण्यासाठी या लोकांचे नेहमी स्थलांतर चालू असते.श्रीगोंदा तालुक्यातील पारधी ही भिक मागण्यासाठी मुंबई व सोलापूर येथे स्थलांतरीत होतात. भिक मागणे हे काम कमी कष्टाचे आहे. असे त्यांना वाटते.या जमातीतील लहान मूले देखील भिक मागतात. वृध्द व काही तरूण स्त्रीया भिक मागतांना दिसतात. भिक मागणा-यांमध्ये तरूण पुरूष अतिशय कमी प्रमाणात दिसतात. हे क्षेत्रीय पाहणी मध्ये दिसून आले आहे. अहमदनगर जिल्हयात हे लोक अहमदनगर रेल्वे स्थानक, बस स्टँण्ड, स्टेट बँक चौक, डी.एस.पी कार्यालयाजवळील सिग्नलवर तसेच १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिवशी अहमदनगर भुईकोट किल्ला जवळ, कापड बाजारात, राहूरी रेल्वे स्टेशन व बस स्थानकावर, श्रीरामपूर बस स्थानक, अहमदनगर महाविदयालयात,लाल टाकी जवळ, शिर्डी देवस्थानात देखील हे लोक भिक मागतात. अहमदनगर जिल्हयात विविध ठिकाणी आढळणा-या भिका-यांमध्ये सर्वात जास्त किंवा बहुतेक करून पारधी भिकारी हे जास्त आहेत. असे क्षेत्रिय निरीक्षणात जाणवले आहे.काही पारधी तर यात्रा किंवा काही समारंभातुन मुलांना पळवून नेवून भिक मागावयास लावतात. असे वर्तमान पत्रात आलेलया काही बातम्यांवरुन निदर्शणास आले.

**तक्ता क्र.४.३.१४**

| पारधी आर्थिक उन्नती साठी काही व्यवसाय करु इच्छीतात की नाही हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | व्यवसाय करू इच्छिता | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | ३ | २३ | ६३ | १३० | २१९ |
| | | १.४% | १०.५% | २८.८% | ५९.४% | १००.०% |
| | | १.२% | ९.२% | २५.२% | ५२.०% | ८७.६% |
| २ | नाही | २ | ५ | ५ | १९ | ३१ |
| | | ६.५% | १६.१% | १६.१% | ६१.३% | १००.०% |
| | | ०.८% | २.०% | २.०% | ७.६% | १२.४% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरुन असे निदर्शनास येते की आर्थिक उन्नती साठी पारधी काही व्यवसाय करु इच्छीतो असे म्हणणारे एकुण उत्तरदाते हे २१९ (८७.६%) उत्तरदाते आहेत तर व्यवसाय करु इच्छीत नाही असे म्हणणारे ३१ (१२.४%) उत्तरदाते आहेत. म्हणजेच या समाजातील लोकांना आर्थिक सधन व्हावे असे निश्चीतच वाटते परंतु त्या प्रमाणात त्यांना संधी उपनब्ध होतांना दिसत नाही.

**तक्ता क्र.४.३.१५**

| महीला बचत गटामध्ये पारधी महीलांचा समावेश आहे का नाही हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | महिला बचत गट | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | ० | ३ | ३ | ९ | १५ |
| | | ००% | २०% | २०% | ६०% | १००.०% |
| | | ००% | १.२% | १.२% | ३.६% | ६.०% |
| २ | नाही | ५ | २५ | ६५ | १४० | २३५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २.१% | १०.६% | २७.७% | ५९.६% | १००.०% |
| | | २.०% | १०.०% | २६.०% | ५६.०% | ९४.०% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्यातील एकुण १५ (६.०%) लोक गावातील महीला बचत गटामध्ये कुटुंबातील महीलेचा समावेश आहे असे म्हणतात. तर गावातील महीला बचत गटामध्ये कुटुंबातील महीलेचा समावेश नाही असे २३५ (९४.०%) म्हणतात. या वरुन यांचे सामाजिक मागासलेपणा दिसून येतो.

**तक्ता क्र.४.३.१६**

**पारधी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दर्शवितो**

| **अ.क्र.** | **वार्षिक उत्पन्न** | **तालुके** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **१००००पर्यंत** | **०** | **१४** | **१०** | **२५** | **४९** |
| | | ०.०% | २८.६% | २०.४% | ५१.०% | १००.०% |
| | | ०.०% | ५.६% | ४.०% | १०.०% | १९.६% |
| **२** | **१००००ते २००००पर्यंत** | **३** | **४** | **१३** | **२१** | **४१** |
| | | ७.३% | ९.८% | ३१.७% | ५१.२% | १००.०% |
| | | १.२% | १.६% | ५.२% | ८.४% | १६.४% |
| **३** | **२०००० ते ३००००पर्यंत** | **२** | **९** | **४३** | **९९** | **१५३** |
| | | १.३% | ५.९% | २८.१% | ६४.७% | १००.०% |
| | | ०.८% | ३.६% | १७.२% | ३९.६% | ६१.२% |
| **४** | **४००००पेक्षा जास्त** | **०** | **१** | **२** | **४** | **७** |
| | | ०.०% | १४.३% | २८.६% | ५७.१% | १००.०% |
| | | ०.०% | ०.४% | ०.८% | १.६% | २.८% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

वरिल तक्त्या नुसार एकुण चार तालुक्यात १०,००० पर्यत वार्षीक उत्पन्न असणारे एकुण ४९ (१९.६), १००००ते २०००० पर्यत वार्षीक उत्पन्न असणारे एकुण ४१ (१६.४),२०००० ते ३००००पर्यत वार्षीक उत्पन्न असणारे एकुण १५३ (६१.२) तर ४००००पेक्षा जास्त वार्षीक उत्पन्न असणारे एकुण ७ (२.८) इतके उत्तरदाते दिसतात.

**तक्ता क्र.४.३.१७**

| **पारधी कुटुंबाच्या उत्पन्नातून दैनंदिन गरजा भागतात की नाही हे दर्शविणारा तक्ता.** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **गरजा भागतात का** | **तालके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होय** | **०** | **३** | **०** | **१०** | **१३** |
| | | ०.०% | २३.१% | ०.०% | ७६.९% | १००.०% |
| | | ०.०% | १.२% | ०.०% | ४.०% | ५.२% |
| **२** | **नाही** | **५** | **२५** | **६८** | **१३९** | **२३७** |
| | | २.१% | १०.५% | २८.७% | ५८.६% | १००.०% |
| | | २.०% | १०.०% | २७.२% | ५५.६% | ९४.८% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्ता हा मिळणा-या आर्थिक उत्पन्नातून पारधी कूटूंबांच्या गरजा भागतात की नाही हे दर्शवितो या तक्त्या वरुन असे दिसते की गरजा भागतात म्हणणारे एकुण १३(५.२%) इतके आहेत तर गरजा भागत नाहीत असे म्हणणारे २३७(९४.८ %) इतकें उत्तर दाते आहेत.

**तक्ता क्र.४.३.१८**

| **मुलांनी कोणता व्यवसाय करावा हे दर्शविणारा तक्ता** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **कोणता व्यवसाय** | **तालुका** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **पारंपारिक** | **०** | **२** | **५** | **३** | **१०** |
| | | ०.०% | २०.०% | ५०.०% | ३०.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.८% | २.०% | १.२% | ४.०% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **२** | **आधुनिक** | **५** | **२६** | **६१** | **१४३** | **२३५** |
| | | २.१% | ११.१% | २६.०% | ६०.९% | १००.०% |
| | | २.०% | १०.४% | २४.४% | ५७.२% | ९४.०% |
| **३** | **इतर** | **०** | **०** | **२** | **३** | **५** |
| | | ०.०% | ०.०% | ४०.०% | ६०.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.८% | १.२% | २.०% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

पारधी जमातीची आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची आहे तेंव्हा भविष्यात पुढील पिढीने कोणता व्यवसाय करावा जणेकरून त्यांची परिस्थिती सुधारेल असे जाणून घेण्यासाठी संशोधकाला उपरोक्त प्रश्न विचारला.वरील तक्त्या नुसार पारंपारिक व्यवसाय करावा असे म्हणणा-या उत्तरदात्यांची संख्या ही एकुण १० (४.०%) आहे. तर मुलांनी आधुनिक व्यवसाय करावा असे म्हणणा-या उत्तरदात्यांची संख्या ही २३५ (९४.०%) इतकी आहे. इतरांमध्ये ५(२.०%) इतके उत्तरदाते आहेत. पारधी जमात ही अत्यंत श्रध्दाळू असल्याने देवाचा कोप होवू नये म्हणून मुलांनी पारंपारिक शिकार हा व्यवसाय करावा असे बहुतेकांना वाटते परंतु पारंपारिक व्यवसायातून दैनंदिन गरजा भागत नाहीत म्हणून मुलांनी आधुनिक व्यवसाय करावा जेणेकरून त्यांच्या दैनंदिन गरजा व्यवस्थित भागतील असे मत बहुसंख्य उत्तरदात्यांनी व्यक्त केले.

**तक्ता क्र.४.३.१९**

| **कर्ज घेतले आहे की नाही हे दर्शविणारा तक्ता** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **कर्ज घेतले आहे का** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होय** | **२** | **६** | **१५** | **३८** | **६१** |
| | | ३.३% | ९.८% | २४.६% | ६२.३% | १००.०% |
| | | ०.८% | २.४% | ६.०% | १५.२% | २४.४% |
| **२** | **नाही** | **३** | **२२** | **५३** | **१११** | **१८९** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १.६% | ११.६% | २८.०% | ५८.७% | १००.०% |
| | | १.२% | ८.८% | २१.२% | ४४.४% | ७५.६% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

पारधी जमातीचे असलेले आर्थिक उत्पन्न हे अतिशय कमी आहे. तेंव्हा दैनंदिन गरजा व इतर काही खर्चासाठी ते कर्जावू रक्कम कोणाकडून घेतात का हे जाणून घेण्यासाठी संशोधकाला सदर प्रश्न विचारावा वाटला. तक्त्या वरून असे निदर्शनास येते की, कर्ज घेतले आहे असे म्हणणारे एकुण उत्तरदाते ६१(२४.४%) इतके उत्तरदाते आहे. तर कर्ज घेतले नाही असे म्हणणारे एकुण १८९ (७५.६%) इतके उत्तरदाते आहेत. एकूण उत्तरदात्यांच्या टक्केवारीचा विचार करता असे निदर्शनास येते की कर्ज घेतले नाही असे म्हणणा-या उत्तरदात्यांची संख्या जास्त आहे.

**तक्ता क्र.४.३.२०**

| **घरातील वस्तुबद्दलची माहिती दर्शविणारा तक्ता.** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **वस्तु** | | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१) रेडिओ** | होय | **५** | **२५** | **६५** | **१४६** | **२४१** |
| | | २.०% | १०.०% | २६.०% | ५८.४% | ९६.४% |
| | नाही | **०** | **३** | **३** | **३** | **९** |
| | | ०.०% | १.२% | १.२% | १.२% | ३.६% |
| **२) घडयाळ** | होय | **३** | **२५** | **५७** | **११६** | **२०१** |
| | | १.२% | १०.०% | २२.८% | ४६.४% | ८०.४% |
| | नाही | **२** | **३** | **११** | **३३** | **४९** |
| | | ०.८% | १.२% | ४.४% | १३.२% | १९.६% |
| **३) पंखा** | होय | **४** | **१२** | **२४** | **६६** | **१०६** |
| | | १.६% | ४.८% | ९.६% | २६.४% | ४२.४% |
| | नाही | **१** | **१६** | **४४** | **८३** | **१४४** |
| | | ०.४% | ६.४% | १७.६% | ३३.२% | ५७.६% |
| **४) दुरदर्शन** | होय | **५** | **२०** | **६०** | **१२९** | **२१४** |
| | | २.०% | ८.०% | २४.०% | ५१.६% | ८५.६% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नाही | **०** | **८** | **८** | **२०** | **३६** |
| | | ०.०% | ३.२% | ३.२% | ८.०% | १४.४% |
| **५) पलंग** | होय | **३** | **१०** | **२६** | **६४** | **१०३** |
| | | १.२% | ४.०% | १०.४% | २५.६% | ४१.२% |
| | नाही | **२** | **१८** | **४२** | **८५** | **१४७** |
| | | ०.८% | ७.२% | १६.८% | ३४.०% | ५८.८% |
| **६) कपाट** | होय | **३** | **१४** | **३३** | **६२** | **११२** |
| | | १.२% | ५.६% | १३.२% | २४.८% | ४४.८% |
| | नाही | **२** | **१४** | **३५** | **८७** | **१३८** |
| | | ०.८% | ५.६% | १४.०% | ३४.८% | ५५.२% |
| **७)मोबाईल** | होय | **५** | **१६** | **६२** | **१२३** | **२०६** |
| | | २.०% | ६.४% | २४.८% | ४९.२% | ८२.४% |
| | नाही | **०** | **१२** | **६** | **२६** | **४४** |
| | | ०.०% | ४.८% | २.४% | १०.४% | १७.६% |
| **८)सायकल** | होय | **५** | **२१** | **५७** | **११५** | **१९८** |
| | | २.०% | ८.४% | २२.८% | ४६.०% | ७९.२% |
| | नाही | **०** | **७** | **११** | **३४** | **५२** |
| | | ०.०% | २.८% | ४.४% | १३.६% | २०.८% |
| **९)दुचाकी** | होय | **३** | **१** | **१५** | **३५** | **५४** |
| | | १.२% | ०.४% | ६.०% | १४.०% | २१.६% |
| | नाही | **२** | **२७** | **५३** | **११४** | **१९६** |
| | | ०.८% | १०.८% | २१.२% | ४५.६% | ७८.४% |
| **१०)शिवणयंत्र** | होय | **०** | **०** | **३** | **७** | **१०** |
| | | ०.०% | ०.०% | १.२% | २.८% | ४.०% |
| | नाही | **५** | **२८** | **६५** | **१४२** | **२४०** |
| | | २.०% | ११.२% | २६.०% | ५६.८% | ९६.०% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उत्तरदात्यांच्या आर्थिक स्थितीचा अंदाज हा त्यांच्याकडे वरीलपैकी असणा-या वस्तुंवरून येतो. म्हणून उपरोक्त माहितीच्या आधारे त्याची आर्थिक स्थिती लक्षात येण्यास मदत होते. चार तालुक्यातुन एकूण निवडलेल्या २५० उत्तरदात्यांपैकी १४१(९६.४%) उत्तरदात्यांकडे रेडीओ सोय आहे.तर नाही म्हणणा-यांची संख्या ही ९ (३.६%) इतकी आहे सायकलधारक आसणारे १९८ (७९.२%) तर नसणारे ५२(२०.८%), मोटर सायकल धारक ५४(२१.६%) नसणारे

१९६ (७८.४%), २०१(८०.४%) उत्तरदात्यांनी घरात घडयाळ असल्याचे सांगितले.तर ४९(१९.६%) उत्तरदाते हे घरात घडयाळ असल्याचे सांगत होते. यापैकी काही उत्तरदाते हे शहरात राहणारे आढळले. घडयाळ आहे असे म्हणणा-यांनी ते सापडले आहे असे ते म्हणाले याचा अर्थ ते चारीचे असावे. दुरदर्शन संच आहे असे म्हणणारे ११४ (८५.६%) तर नसणारे उत्तरदाते ३६(१४.४) आहेत. १०३(४१.२%) उत्तरदात्यांकडे लोखंडी व लाकडी पलंग असल्याचे निदर्शनास आहे,तर पलंग नाही १४७ (५८.८%), उत्तरदात्यांकडे कपाट आहे ११२ (४४.८%) तर नाही म्हणणारे १३८ (५५.२), २०६(८२.४) उत्तरदात्यांकडे मोबाईल फोन आहे.तर ४४(१७.६%) कडे नाही. सर्वात जास्त मोबाईलधारक एकूण उत्तरदात्यांपैकी आहेत. जमात बांधवाशी सातत्याने संर्पकात राहता येते व माहिती मिळविता येते हे उत्तरदात्यांनी सांगितले. १०( ४.०%)उत्तरदाते घरी शिवणयंत्र आहे असे म्हणाले. तर २४०(९६.०४) नाही म्हणाले १०६ (४२.४%) उत्तरदाते पंखा धारक आहेत. तर नाही म्हणणारे १४४ (५७.६% ).

### ४.४.पारध्यांची शैक्षणिक माहीती:-

या घटकात पारधी समाजाच्या शैक्षणीक माहीतीचे विश्लेषण केलेले आहे. पारधी जमातीच्या सर्वांगीन विकासासाठी शिक्षण ही बाब अतिशय महत्वपुर्ण आहे, या अनुशंगाने त्यांची शैक्षणीक प्रगती व समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न सदर विभागात केलेला आहे.

**तक्ता क्र.४.४.१**

| पारधी कुटुंबप्रमुखांचा शैक्षणीक दर्जा | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | शिक्षण | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | निरक्षर | ५ | २० | ४८ | ८७ | १६० |
| | | ३.१% | १२.५% | ३०.०% | ५४.४% | १००.०% |
| | | २.०% | ८.०% | १९.२% | ३४.८% | ६४.०% |
| २ | प्राथमीक | ० | ४ | ८ | ३७ | ४९ |
| | | ०.०% | ८.२% | १६.३% | ७५.५% | १००.०% |
| | | ०.०% | १.६% | ३.२% | १४.८% | १९.६% |
| ३ | माध्यमीक | ० | ४ | ७ | २२ | ३३ |
| | | ०.०% | १२.१% | २१.२% | ६६.७% | १००.०% |
| | | ०.०% | १.६% | २.८% | ८.८% | १३.२% |
| ४ | उच्च | ० | ० | ३ | ३ | ६ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | माध्यमीक | ०.०% | ०.०% | ५०.०% | ५०.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | १.२% | १.२% | २.४% |
| ५ | पदवी | **०** | **०** | **०** | **२** | **२** |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.८% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्याच्या निरिक्षणावरून असे दिसुन येते की अहमदनगर मधील जामखेड, कर्जत, नगर व श्रीगोंदा या चार ही तालुक्यातुन संशोधनासाठी निवड केलेलया एकुण उत्तरदात्यांमध्ये निरक्षर पारधी उत्तरदात्यांची एकुण संख्या ही १६०(६४.०%) इतकी आहे तर प्राथमीक ३९(१९.६%), माध्यमीक ३३ (१३.२%), उच्च माध्यमीक ६(२.४% ) तर पदवी पर्यंत शिक्षण घेणारे उत्तरदाते हे २ म्हणजेच (०.८%) इतके आढळले. या वरुन असे दिसते की जास्तीत जास्त उत्तरदाते हे निरक्षर होते.

**तक्ता क्र.४.४.२**

| **पारधी मुला-मूर्लींच्या शैक्षणीक दर्जा संबंधी माहीती दर्शविणारा तक्ता.** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **शिक्षण** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **निरक्षर** | **३** | **१३** | **१८** | **४३** | **७७** |
| | | ३.९% | १६.९% | २३.४% | ५५.८% | १००.०% |
| | | १.२% | ५.२% | ७.२% | १७.२% | ३०.८% |
| **२** | **प्राथमीक** | **२** | **७** | **१२** | **२५** | **४६** |
| | | ४.३% | १५.२% | २६.१% | ५४.३% | १००.० % |
| | | ०.८% | २.८% | ४.८% | १०.०% | १८.४% |
| **३** | **माध्यमीक** | **०** | **४** | **१६** | **३९** | **५९** |
| | | ०.०% | ६.७% | २७.११ | ६६.१० | १००.० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | % | % | % |
| | | ०.०% | १.६% | ६.४ % | १५.६% | २३.६% |
| ४ | **उच्च माध्यमीक** | **०** | **२** | **१३** | **२४** | **३९** |
| | | ०.०% | ५.१२% | १६.९% | ६१.५३ % | १००.० % |
| | | ०.०% | ०.८ % | ५.२% | ९.६% | १५.६% |
| ५ | **पदवी** | **०** | **२** | **५** | **१०** | **१७** |
| | | ०.०% | ११.७६ % | २९.४१% | ५८.८२ % | १००.० % |
| | | ०.०% | ०.८% | २% | ४.०% | ६.८% |
| ६ | **पदव्युत्तर** | **०** | **०** | **४** | **८** | **१२** |
| | | ०.०% | ०.०% | ३३.३३ % | ६६.६६ % | १००.० % |
| | | ०.०% | ०.०% | १.६% | ३.२% | ४.८% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

वरील तक्या नुसार एकूण चार तालुक्यातील निरक्षराची संख्या ही एकुण ७७ (३०.८%) इतकी आहे. तर प्राथमीक शिक्षण घेत असलेलयांची एकुण संख्या ४६(१८.४%) आहे.माध्यमीक पर्यंत शिक्षण घेत असलेलया उत्तरदात्यांच्या मुलांची संख्या ५९ (२३.६%) इतकी तर उच्च माध्यमीक पर्यत शिक्षण घेणा-यांची संख्या ही ३९ (१५.६%) इतकी तर पदवी १७ (६.८%) व पदव्युत्तर १२(४.८%) इतकी दिसून येते या वरुन हे सिध्द होते की या जमातीतील उच्च शिक्षणाचे प्रमाण हे कमी जरी असले तरी मागील पीढीच्या तुलनेत सुधारीत असलेले दिसते ही बाब संशोधनाच्या दष्टीने महत्वपुर्ण आहे.

**तक्ता क्र.४.४.३**

| पारधी जमातीतील मुले शाळेत न जाण्याची नेमकी कोणती कारणे आहेत हे दर्शवीणारा. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **कारणे** | **तालके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **आर्थिक परिस्थिती** | **२** | **१७** | **१८** | **४१** | **७८** |
| | | २.६% | २१.८% | २३.१% | ५२.६% | १००.०% |
| | | ०.८% | ६.८% | ७.२% | १६.४% | ३१.२% |
| **२** | **शाळेविषयीची भीती** | **०** | **०** | **१** | **३** | **४** |
| | | ०.०% | ०.०% | २५.०% | ७५.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.४% | १.२% | १.६% |
| **३** | **जवळपास शाळा उपलब्ध नाही** | **०** | **०** | **४** | **१** | **५** |
| | | ०.०% | ०.०% | ८०.०% | २०.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | १.६% | ०.४% | २.०% |
| **४** | **शिकूनही नोकरी मिळत नाही** | **१** | **२** | **५** | **५** | **१३** |
| | | ७.७% | १५.४% | ३८.५% | ३८.५% | १००.०% |
| | | ०.४% | ०.८% | २.०% | २.०% | ५.२% |
| **५** | **शाळेत शिक्षक विद्यार्थ्यांकडून मिळणारी वाईट वागणूक** | **२** | **९** | **४०** | **९९** | **१५०** |
| | | १.३% | ६.०% | २६.७% | ६६.०% | १००.०% |
| | | ०.८% | ३.६% | १६.०% | ३९.६% | ६०.०% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

अहमदनगर मधील जामखेड, कर्जत, नगर व श्रीगोंदा या चार ही तालुक्यातुन संशोधनासाठी निवड केलेलया एकुण उत्तरदात्यांमध्ये पारधी जमातीतील मुलांना शाळेपासून वंचित ठेवणारी नेमकी कारणे जाणून घेणे हा या प्रश्नामागील संशोधकाचा उद्देश आहे. उपरोक्त तक्त्या वरून या समाजातील मुलांची शाळेत न जाण्याची कारणे जाणून घेतली आहेत. त्यात प्रामुख्याने आर्थिक परिस्थिती नाही म्हणून मुले शाळेत जात नाहीत असे म्हणणारे चार तालुक्यातील एकुण उत्तरदाते ७८ (३१.२%) आहेत. शाळेची भिती वाटत असल्यामुळे शाळेत जात नाहीत असे म्हणणारे चार तालुक्यातील एकुण उत्तरदाते ४ (१.६%) होते.जवळ शाळा उपलब्ध नसल्यामुळे ५ (२.०%) मुले शाळेत जात नाहीत. शिकून नोकरी मिळत नसल्यामुळे शाळेत न जाणा-यांचे चार तालुक्यातील एकुण उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण १३(५.२%) आहे. शाळेत शिक्षक व विद्यार्थ्यांकडून मिळणारी वाईट वागणूकी मूळे शाळेत जात नाहीत असे म्हणणारे एकुण उत्तरदाते १५०(६०.२%) होते.

क्षेत्रीय पाहणी दरम्यान चिंभळे, ता. श्रीगोंदा येथील नंदा भोसले या पारधी समाजातील तरूणीने सांगितलेली कथा अंतर्मुख करणारी आहे. नंदाचा उदरनिर्वाह इतरांसारखाच पण परस्थितीवर मात करून ती १९९९ मध्ये दहावी ७५ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली. मुख्याध्यापक बी. आर. नागवडे यांनी तीला बालवाडी शिक्षीकेचे प्रशिक्षण घेण्यासाठी मदत केली. शिक्षणामुळे तीने तलाठी कार्यालयातून शिधा पत्रीकाही मिळविली. पण केवळ पारधी असल्यामुळे तीला नोकरी मिळू न देण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केल्याने शिक्षण व्यर्थ गेले असे तीचे म्हणणे आहे.

**तक्ता क्र.४.४.४**

| पारधी वस्तीपासून शाळेचे अंतर किती आहे या संबंधीची माहिती दर्शविणारी तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **शाळेचे अंतर** | **तालके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **१. कि.मी.** | **०** | **६** | **६** | **१८** | **३०** |
| | | ०.०% | २०.०% | २०.०% | ६०.०% | १००.०% |
| | | ०.०% | २.४% | २.४% | ७.२% | १२.०% |
| **२** | **२. कि.मी** | **५** | **९** | **१४** | **३८** | **६६** |
| | | ७.६% | १३.६% | २१.२% | ५७.६% | १००.०% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २.०% | ३.६% | ५.६% | १५.२% | २६.४% |
| **३** | **३. कि.मी.** | **०** | **३** | **१७** | **३०** | **५०** |
| | | ०.०% | ६.०% | ३४.०% | ६०.०% | १००.०% |
| | | ०.०% | १.२% | ६.८% | १२.०% | २०.०% |
| **४** | **४.कि.मी.पेक्षा जास्त** | **०** | **१०** | **३१** | **६३** | **१०४** |
| | | ०.०% | ९.६% | २९.८% | ६०.६% | १००.०% |
| | | ०.०% | ४.०% | १२.४% | २५.२% | ४१.६% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

वरील तक्त्या वरुन असे दिसून येते की शाळेचे अंतर घरापासून १ कि.मी. आहे असे म्हणणरे एकुण उत्तरदारते हे ३० (१२.०%) इतके आहेत. तर २ कि.मी. अंतर आहे असे म्हणणारे एकुण उत्तरदारते ६६ (२६.४%) इतके आहेत, ३ कि.मी. अंतर आहे असे म्हणणारे उत्तरदारते ५०(२०.०%) आहेत. ४ कि.मी. पेक्षा जास्त अंतर आहे असे म्हणणारे उत्तरदारते १०४ (४१.६%) इतके आहेत. म्हणजेच पारधी वस्ती पासून शाळेचे अंतर हे ४ कि.मी. पेक्षा जास्त आहे असे म्हणणा-या उत्तरदात्यांची संख्या ही सर्वात जास्त आहे याचा परीणाम हा अप्रत्यक्षरीत्या त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर होतांना दिसून येतो.

**तक्ता क्र.४.४.५**

**स्थलांतरामुळे मुलांचे शिक्षण बंद केले जाते का ? हे दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **स्थलांतरामुळे मुलांचे शिक्षण बंद केले जाते** | **तालुके** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होय** | **१** | **७** | **४४** | **९७** | **१४९** |
| | | ०.७% | ४.७% | २९.५% | ६५.१% | १००.०% |
| | | ०.४% | २.८% | १७.६% | ३८.८% | ५९.६% |
| **२** | **नाही** | **२** | **८** | **१४** | **३९** | **६३** |
| | | ३.२% | १२.७% | २२.२% | ६१.९% | १००.०% |
| | | ०.८% | ३.२% | ५.६% | १५.६% | २५.२% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | या पैकी नाही | **२** | **१३** | **१०** | **१३** | **३८** |
| | | ५.३% | ३४.२% | २६.३% | ३४.२% | १००.०% |
| | | ०.८% | ५.२% | ४.०% | ५.२% | १५.२% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्ता हा स्थलांतरा मुळे पारधी समाजातील मुलांचे शिक्षण बंद होते की नाही हे दर्शवितो. उपरोक्त तक्त्यातील आकडेवारीनुसार मुलांचे शिक्षण स्थलांतरामुळे बंद होते.असे म्हणणारे एकुण १४९(५९.६%) इतके उत्तरदाते आहेत.तर नाही म्हणणारे ६३(२५.२%), तर या पैकी नाही म्हणणारे ३८(१५.२%) इतके उत्तरदाते आहेत. उपरोक्त आकडेवारीनुसार जास्तीत जास्त मुलांचे शिक्षण स्थंलांतरामुळे बंद केले जाते. पारधी समाजाच्या मुलांसाठी आश्रमशाळेची व्यवस्था आहे.परंतु जिल्हातील पारधी लोकसंख्येचा विचार करतात.उपलब्ध आश्रम शाळा अतिशय कमी आहेत.तेव्हा शासनाने जास्तीत जास्त मंजुरी दयावी व त्या आश्रम शाळेत राहणे व भोजणांची सोय करावी.तसेच आणखी काही सवलती दयावी जेणे करून या समाजातील मुले शिक्षणाकडे आकर्षित होतील.

**तक्ता क्र.४.४.६**

| **पारध्यांच्यां सरकारकडून शिक्षणाबाबत असणारी अपेक्षा दर्शविणारा तक्ता.** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **अपेक्षा** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **गावामध्ये शाळेची सोय व्हावी** | **०** | **२** | **२** | **१०** | **१४** |
| | | ०.०% | १४.३% | १४.३% | ७१.४% | १००.०% |
| | | ०.०% | ०.८% | ०.८% | ४.०% | ५.६% |
| **२** | **जि.प.प्रा.शाळा एक केंद्र मिळून निवासी शाळेची सोय करण्यात** | **२** | **४** | **१३** | **२७** | **४६** |
| | | ४.३% | ८.७% | २८.३% | ५८.७% | १००.०% |
| | | ०.८% | १.६% | ५.२% | १०.८% | १८.४% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | यावी | | | | | |
| ३ | प्रत्येक तालुका स्तरावर आदिवासी आश्रमशाळा व वस्तीगृह असावे | **१** | **८** | **४४** | **९८** | **१५१** |
| | | ०.७% | ५.३% | २९.१% | ६४.९% | १००.०% |
| | | ०.४% | ३.२% | १७.६% | ३९.२% | ६०.४% |
| ४ | इतर | **०** | **०** | **०** | **१** | **१** |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | १००.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.४% | ०.४% |
| ५ | या पैकी नाही | **२** | **१४** | **९** | **१३** | **३८** |
| | | ५.३% | ३६.८% | २३.७% | ३४.२% | १००.०% |
| | | ०.८% | ५.६% | ३.६% | ५.२% | १५.२% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

आपणास सरकारकडून मुलांच्या शिक्षणाबाबतीत काय अपेक्षा आहेत असा प्रश्न विचारला असता उत्तरदात्यांच्या अपेक्षा वरील तक्त्या मधून दर्शविलेली आहेत. सरकारने गावामध्ये शाळेची सोय करावी अशी अपेक्षा एकुण १४ (५.६%) उत्तरदात्यांनी व्यक्त केली. जि. प. प्राथमिक शाळा एक केंद्र मिळून निवासी शाळेची सोय करण्यात यावी असे ४६ (१८.४%) उत्तरदात्यांना वाटते.तर प्रत्येक तालूका स्तरावर आदिवासी आश्रमशाळा व वस्तिवगृह असावे असे मत १५१ (६०.४%) उत्तरदात्यांनी व्यक्त केले. तसेच इतर या घटकात १ (०.४ %), या पैकी नाही म्हणणारे ३८ (१५.२%) इतके उत्तरदाते दिसून येतात.

**तक्ता क्र.४.४.७**

| पारध्यांना मुलांसाठी शासनाने दिलेलया सवलतीची माहीती आहे की नाही हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | माहिती आहेत का | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | **१** | **८** | **१४** | **३७** | **६०** |
| | | १.७% | १३.३% | २३.३% | ६१.७% | १००.०% |
| | | ०.४% | ३.२% | ५.६% | १४.८% | २४.०% |
| २ | नाही | **२** | **७** | **४४** | **९८** | **१५१** |
| | | १.३% | ४.६% | २९.१% | ६४.९% | १००.०% |
| | | ०.८% | २.८% | १७.६% | ३९.२% | ६०.४% |
| ३ | या पैकी नाही | **२** | **१३** | **१०** | **१३** | **३८** |
| | | ५.३% | ३४.२% | २६.३% | ३४.२% | १००.०% |
| | | ०.८% | ५.२% | ४.०% | ५.२% | १५.२% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरुन असे निदर्शनास येते की शासणाने दिलेलया सवलती माहीती आहेत असे मत चार तलुक्यातील एकुण ६० (२४.०%) उत्तरदात्यांनी व्यक्त केले. तर कोणत्याही शासकीय सुविधांची माहीती नाही असे मत एकुण १५१ ( ६०.४%) उत्तरदात्यांनी व्यक्त केले. तर या पैकी नाही हे म्हणणारे एकुण ३८ (१५.२%) उत्तरदाते होते. वरिल आकडेवारीचा विचार केला तर असे निदर्शनास येते की जास्तीत जास्त पारधी ही शासकीय योजनांबाबत अनभिज्ञ आहेत.

## ४.५. पारध्यांच्या सांस्कृतीक व धर्मिक जिवण विषयक माहीती:-

**तक्ता क्र.४.५.१**

| पारधी जमातीत मृत व्यक्तीवर कशा प्रकारे संस्कार केले जातात हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **मृत व्यक्तीवर संस्कार** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **दफन** | **४** | **२७** | **६७** | **१४१** | **२३९** |
| | | १.७% | ११.३% | २८.०% | ५९.०% | १००.०% |
| | | १.६% | १०.८% | २६.८% | ५६.४% | ९५.६% |
| **२** | **दहन** | **१** | **१** | **१** | **८** | **११** |
| | | ९.१% | ९.१% | ९.१% | ७२.७% | १००.०% |
| | | ०.४% | ०.४% | ०.४% | ३.२% | ४.४% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्या वरुन पारधी समाजातील लोकांना मृत्यू नंतर जाळतात की पूरतात हे तपाण्यासाठी संशोधकाने हा प्रश्न विचारलेला आहे कारण पारधी हे स्वत:ला हिंदू धर्मीय समजतात व हिंदू धर्मात व्यक्तीच्या मृत्यू नंतर दहन संस्कार केला जातो परंतू उपरोक्त सारणीतील आकडेवारीचा विचार केला तर असे दिसते की मृत व्यक्तीवर संस्कार दफन केले जातात असे म्हणणारे एकुण २३९ (९५.६%) इतके उत्तरदाते आहेत. तर दहन संस्कार केले जातात असे म्हणणारे ११ (४.४%) इतके उत्तरदाते आहेत. हिंदू असूनही दफन केले जाते ही बाब विशेष आहे परंतु हे लोक आजही गावगाडयात व्यवस्थीत स्थिरावू न शकलयाने यांना स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध होवू शकलेली नाही तेव्हा प्रेत जाळण्यासाठी यांना हक्काची जागा आजही मिळत नसलयाने दहन ऐवजी दफन विधी करावा लागतो.

### तक्ता क्र.४.५.२

| पारध्यांना त्यांची संस्कृती कशी वाटते हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | श्रेष्ठ | ० | २ | ४ | १३ | १९ |
| | | ०.०% | १०.५% | २१.१% | ६८.४% | १००.०% |
| | | ०.०% | ०.८% | १.६% | ५.२% | ७.६% |
| २ | कनिष्ठ | ५ | १५ | ५७ | १२७ | २०४ |
| | | २.५% | ७.४% | २७.९% | ६२.३% | १००.०% |
| | | २.०% | ६.०% | २२.८% | ५०.८% | ८१.६% |
| ३ | मध्यम | ० | ११ | ७ | ९ | २७ |
| | | ०.०% | ४०.७% | २५.९% | ३३.३% | १००.०% |
| | | ०.०% | ४.४% | २.८% | ३.६% | १०.८% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरून एकुण १९ (७.६%) उत्तरदाते हे पारधी संस्कृती ही श्रेष्ठ आहे असे म्हणतात तर ही संस्कृती कनिष्ठ आहे असे २०४ (८१.६%) उत्तरदात्यांचे मत आहे. तसेच २७ (१०.८%) उत्तरदाते हे आपली संस्कृती मध्यम असलयाचे सांगतात.पारधी जमातीत जन्म नको रे बाबा असे बरेच पारधी म्हणतात.

### तक्ता क्र.४.५.३

| पारध्यांमध्ये स्त्री बाळंत झाल्यास रुढी प्रमाणे वागवले जाते का नाही हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | रूढी प्रमाणेच वागविले | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | ४ | १६ | ५६ | १२५ | २०१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २.०% | ८.०% | २७.९% | ६२.२% | १००.०% |
| | | १.६% | ६.४% | २२.४% | ५०.०% | ८०.४% |
| २ | नाही | **१** | **१२** | **१२** | **२४** | **४९** |
| | | २.०% | २४.५% | २४.५% | ४९.०% | १००.०% |
| | | ०.४% | ४.८% | ४.८% | ९.६% | १९.६% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरून स्त्री बाळंत झाल्यास रुढी प्रमाणे वागवले जाते असे म्हणणारे एकुण २०१ (८०.४%) उत्तरदाते आहेत. तर स्त्री बाळंत झाल्यास रुढी प्रमाणे वागवले जात नाही असे ४९ (१९.६%) उत्तरदाते मत व्यक्त करतात. या वरुन असे दिसून येते की पारधी आज ही ब-या पैकी अंधश्रध्दा व रुढींना चिटकून आहेत.

**तक्ता क्र.४.५.४**

**पारधी दैवीशक्ती, भगत व जादूटोण्यावर विश्वास ठेवतात का नाही हे दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | जादुटोण्यावर विश्वास | तालुके | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | **४** | **१२** | **५९** | **१२२** | **१९७** |
| | | २.०% | ६.१ % | २९.९ % | ६१.९% | १००.०% |
| | | १.६% | ४.८ % | २३.६ % | ४८.८% | ७८.८% |
| २ | नाही | **१** | **१६** | **९** | **२७** | **५३** |
| | | १.९% | ३०.२% | १७.०% | ५०.९% | १००.०% |
| | | ०.४ % | ६.४ % | ३.६% | १०.८% | २१.२% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त सारणी नूसार दैवीशक्ती, भगत व जादूटोण्यावर विश्वास ठेवतात का असे विचारले आसता होय म्हणणारे उत्तरदाते हे १९७ (७८.८%) इतके आहेत तर नाही म्हणणारे उत्तरदाते हे ५३ (२१.२%) इतके आहेत. उपरोक्त आकडेवारीचा विचार करता असे दिसून येते की या जमातीत आजतागायत दैवी शक्ती, भगत व जादूटोण्यावर विश्वास ठेवला जातो. यामुळे देखील यांच्या प्रगतीला बाधा उत्पन्न होंतांना दिसते.

**तक्ता क्र.४.५.५**

**पारध्यांत देवांना कोणत्या पशूंचा बळी दिला जातो हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पशुचा बळी दिला | तालुके | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **बकरा** | **५** | **११** | **५२** | **११७** | **१८५** |
| | | २.७% | ५.९% | २८.१% | ६३.२% | १००.०% |
| | | २.०% | ४.४% | २०.८% | ४६.८% | ७४.०% |
| **२** | **कोंबडा** | **०** | **१४** | **१०** | **२२** | **४६** |
| | | ०.०% | ३०.४% | २१.७% | ४७.८% | १००.०% |
| | | ०.०% | ५.६% | ४.०% | ८.८% | १८.४% |
| **३** | **रेडा** | **०** | **३** | **६** | **९** | **१८** |
| | | ०.०% | १६.७% | ३३.३% | ५०.०% | १००.०% |
| | | ०.०% | १.२% | २.४% | ३.६% | ७.२% |
| **४** | **इतर** | **०** | **०** | **०** | **१** | **१** |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | १००.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.४% | ०.४% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या नुसारदेवांना कोणत्या पशूंचा बळी दिला जातो हे विचारले असता बकरा बळी देतो  असे म्हणणारे उत्तरदाते एकुण १८५ (७४.०%) इतके आहे.तर कोंबडा बळी देतो असे म्हणणारे ४६(१८.४%) इतके उत्तरदाते आहेत. तसेच रेडा बळी देणारे १८ (७.२%) इतके उत्तरदाते आहे.तर इतर मध्ये १(०.४) उपरोक्त आकडेवारीचा विचार करता या समाजात रेडा या प्राण्याचा बळी यात्रेत दिला जातो परंतु बकरा या प्राण्याचा बळी देण्याचे प्रमाण जास्त दिसून येते.

**तक्ता क्र.४.५.६**

| धार्मीक विधी कोणाच्या हस्ते केला जातो हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | | **तालुका** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **ब्राम्हण** | **२** | **६** | **६** | **११** | **२५** |
| | | ८.०% | २४.०% | २४.०% | ४४.०% | १००.०% |
| | | ०.८% | २.४% | २.४% | ४.४% | १०.०% |
| **२** | **भगत** | **१** | **११** | **२०** | **३३** | **६५** |
| | | १.५% | १६.९% | ३०.८% | ५०.८% | १००.०% |
| | | ०.४% | ४.४% | ८.०% | १३.२% | २६.०% |
| **३** | **कुटूंब सदस्य** | **२** | **१०** | **४२** | **१०३** | **१५७** |
| | | १.३% | ६.४% | २६.८% | ६५.६% | १००.०% |
| | | ०.८% | ४.०% | १६.८% | ४१.२% | ६२.८% |
| **४** | **इतर** | **०** | **१** | **०** | **२** | **३** |
| | | ०.०% | ३३.३% | ०.०% | ६६.७% | १००.०% |
| | | ०.०% | ०.४% | ०.०% | ०.८% | १.२% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या नुसार धार्मीक विधी कोणाच्या हस्ते केला जातो हे दर्शविलेले आहे. धार्मीक विधी ब्राम्हणाच्या हस्ते केला जाता असे म्हणणारे उत्तरदाते २५ (१०.०%) इतके आहे. तर भगताच्या हस्ते केला जातो असे म्हणणारे ६५ (२६.०%) इतके उत्तरदाते आहेत. तसेच

कुटूंबातील सदस्य पारधी समाजात धार्मीक विधी पार पाडतात असे म्हणणारे १५७(६२.८%) उत्तरदाते आहेत. उपरोक्त आकडेवारी वरुन या समाजात धार्मीक विधी हा कुटूंबातील सदस्यां कडूनच पार पाडला जातो हे दिसून येते.

**तक्ता क्र.४.५.७**

| पारधी जमातीतील लोकांनी धर्मांतर केलेले आहे की नाही हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **तुम्ही धर्मांतर केले आहे का** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होय** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.०% |
| **२** | **नाही** | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्ता हा पारधी समाजातील कोणी धर्मांतर केले आहे का नाही हे दर्शवितो.या तक्त्यातील माहीती वरुन हे निदर्शनास येते की संशोधनासाठी नमूना म्हणून निवडलेलया २५० कूटूंबापैका एका ही कुटूंबाने धर्मांतर केलेले नाही हे दिसून येते.पारधी हे स्वत:ला हिंदू धर्मीयच समजतात. परंतु तरी देखील हिंदू लोकांकडुन यांना मीळणारी वागणुक ही दुय्यम स्वरुपाचीच आसलेली दिसते.

## ४.६) पारध्यांना मिळणा-या शासकीय योजना व सवलती विषयक माहिती -

संशोधनासाठी निवडलेला अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा, कर्जत,नगर व जातखेड या पारधी वसाहती असणा-या तालुक्यांतील पारध्यांना आदिवासी विकासाच्या विविध योजना या समाजापर्यंत पोहचतात का या योजनेचा लाभ देतांना तालुक्यातील पारधी समाजाच्या लोक संख्येच्या प्रमाणात लाभ देण्यात येतो का ? हे खालील सारण्यांच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**तक्ता क्र ४.६.१**

**पारध्यांना शासकीय योजनांची माहिती आहे की नाही हे दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | माहिती | तालुके | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | **२** | **१४** | **१९** | **३४** | **६९** |
| | | २.९% | २०.३% | २७.५% | ४९.३% | १००.०% |
| | | ०.८% | ५.६% | ७.६% | १३.६% | २७.६% |
| २ | नाही | **३** | **१४** | **४९** | **११५** | **१८१** |
| | | १.७% | ७.७% | २७.१% | ६३.५% | १००.०% |
| | | १.२% | ५.६% | १९.६% | ४६.०% | ७२.४% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत -** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

पारधी समाज हा ब-याच प्रमाणात मुख्य समाज व्यवस्थेपासून दूर राहतो काही ठिकाणी चार कुटूंबे तर काही ठिकाणी दहा ते विस कुटूंबाची वस्ती आढळते. समाजामध्ये मोठया प्रमाणात निरक्षरता व अज्ञान आहे तेंव्हा योजनांची माहिती हे प्रत्येकास असेलच असे नाही. म्हणून संशोधकाने सदर प्रश्न विचारलेला आहे. वरील तक्त्या वरून असे दिसून येते की, नमुना पाहणीतून असे दिसून येते की २५० पैकी केवळ एकुण ६९(२७.६ %) उत्तरदात्यांना शासकीय योजनांची माहिती होती तर १८१ (७२.४%) उत्तरदात्यांना शासकीय योजनांची माहिती नव्हती.

**तक्ता क्र. ४.६.२**

| शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे किंवा नाही हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **योजनांचा लाभ** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होय** | **०** | **२** | **२** | **६** | **१०** |
| | | ०.०% | २०.०% | २०.०% | ६०.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.८% | ०.८% | २.४% | ४.०% |
| **२** | **नाही** | **५** | **२६** | **६६** | **१४३** | **२४०** |
| | | २.१% | १०.८% | २७.५% | ५९.६% | १००.०% |
| | | २.०% | १०.४% | २६.४% | ५७.२% | ९६.०% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

वरील तक्त्या वरून एकुण १०(४.०%)उत्तरदात्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे तर २४० (९६.६%) उत्तरदाते हे शासकीय योजनेच्या लाभ मिळालेला नाही असे म्हणाले यावरून हे सिध्द होते की, पारधी समाजातील बरेचसे लोक आजही शासकीय योजनेच्या लाभापासून वंचीत आहेत व यामुळे हा समाज आर्थिक उन्नती व प्रगती पासून दूर आहे असे दिसून येते. पारधी जमातीत बहुसंख्य लोकांना शासनाने केलल्या योजना माहित नाहीत. याचे कारण हे प्रामुख्याने या लोकांचा इतर समाजाशी न येणारा संपर्क व हे स्वत: देखील इतरांशी संपर्क करण्यास घाबरतात तसेच शासकीय दप्तरात जावून माहीती मीळविण्याचा प्रयत्न करत नाहीत कारण या ठीकाणी देखील सर्वणांचा जास्त वावर असतो व हे या समाजातील लोकांकडे जाणून बुजून दुर्लक्ष करतात.तेंव्हा योजना आस्तीत्वात असतांनाही यांच्या पर्यंत त्या पोहचत नाहीत.

## तक्ता क्र. ४.६.३

| पारध्यांना शासकीय योजनांचा लाभ न मिळण्यास कोणते कारण जबाबदार आहे हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | लाभ न मिळण्यास कारणे | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | योजनांची माहिती नसणे | **२** | **२०** | **५१** | **११६** | **१८९** |
| | | १.१% | १०.६% | २७.०% | ६१.४% | १००.०% |
| | | ०.८% | ८.०% | २०.४% | ४६.४% | ७५.६% |
| २ | प्रकरण करण्यास कोणाची मदत नसणे | **०** | **२** | **१** | **३** | **६** |
| | | ०.०% | ३३.३% | १६.७% | ५०.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.८% | ०.४% | १.२% | २.४% |
| ३ | जमीन सुरक्षितता नसणे | **३** | **४** | **१३** | **१९** | **३९** |
| | | ७.७% | १०.३% | ३३.३% | ४८.७% | १००.०% |
| | | १.२% | १.६% | ५.२% | ७.६% | १५.६% |
| ४ | कागदपत्रांची पूर्तता न होऊ शकणे | **०** | **१** | **२** | **६** | **९** |
| | | ०.०% | ११.१% | २२.२% | ६६.७% | १००.०% |
| | | ०.०% | ०.४% | ०.८% | २.४% | ३.६% |
| ५ | इतर | **०** | **१** | **१** | **५** | **७** |
| | | ०.०% | १४.३% | १४.३% | ७१.४% | १००.०% |
| | | ०.०% | ०.४% | ०.४% | २.०% | २.८% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

पारधी जमाती बाबत असणा-या शासकीय योजनांचा जर विचार केला तर बरेच उत्तरदाते हे या योजनांच्या लाभापासून वंचित आहेत. या वंचिततेचे मुख्य कारण काय हे जाणण्यासाठी संशोधकाने उपरोक्त प्रश्न विचालेला आहे. वरील तक्ता पारधी समाजास कोणत्या कारणांमुळे शासकीय योजनांचा लाभ मिळाला नाही हे दर्शवितो. वरील तक्त्या वरून पारधी जमातीतील उत्तरदात्यांना शासकीय योजनांचा कोणत्या कारणांमुळे लाभ मिळाला नाही हे दिसून येते. या समाजातील एकुण १८९ (७५.६%) उत्तरदात्यांना योजनांची माहिती नाही असे दिसून येते ६(२.४%) उत्तरदाते योजनांचे प्रकरण करण्यास मदत मिळत नाही म्हणून लाभ मिळण्यास

अडचण येते असे म्हणतात. ३९(१५.६%) उत्तरदात्यांना प्रकरण करण्यास जामीन मिळत नाही म्हणून योजनांचा लाभ घेता येत नाही. तर ९ (३.६%) उत्तरदात्यांना कागदपत्राची पूर्तता करता येत नाही. तर इतर कारणाने म्हणजे मतदानकार्ड नसने, आधारकार्ड नसने, स्थलांतरामुळे रहिवासी दाखला उपलब्ध न होणे अशा काही कारणांनी ७ (२.८) या उत्तरदात्यांना विकास योजनांचा लाभ मिळाला नाही हे दिसून येते.

**तक्ता क्र. ४.६.४**

**पारध्यांची शासकीय योजनेत अडवणूक होते का? होत नाही हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | अडवणूक होते | तालुके | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | ५ | १७ | ६१ | १२१ | २०४ |
| | | २.५% | ८.३% | २९.९% | ५९.३% | १००.०% |
| | | २.०% | ६.८% | २४.४% | ४८.४% | ८१.६% |
| २ | नाही | ० | ११ | ७ | २८ | ४६ |
| | | ०.०% | २३.९% | १५.२% | ६०.९% | १००.०% |
| | | ०.०% | ४.४% | २.८% | ११.२% | १८.४% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

वरील तक्ता हा शासकीय योजनेत अडवणूक होते का नाही ? हे दर्शवितो. उपरोक्त तक्त्यातील आकडेवारीचा विचार केला तर असे दिसते की शासकीय योजनेत अडवणूक होते असे म्हणणारे उत्तरदाते एकुण २०४ (८१.६% ) इतके आहे तर अडवणूक होत नाही असे म्हणाणारे उत्तरदाते ४६(१८.४%) इतके आहे.भारतामध्ये अदिवासी जमातीसाठी अस्तीत्वात आसणा-या शासकीय योजनांची संख्या बरीच आहे परंतु शासकीय कर्मचाऱ्यांमार्फत या जमातीतील लोकांची मोठया प्रमाणात अडवणूक केली जाते. त्यामुळे योजना मिळण्यासाठी या जमातीतील लोक प्रयत्न करण्यांचे सोडून देतात, व त्यामुळे त्यांचा विकास खुंटतो.

**तक्ता क्र. ४.६.५**

| पारध्यांना कोणत्या शासकीय योजनांची गरज आहे हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | शासकीय योजनांची गरज | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | घर | ० | ० | १० | २९ | ३९ |
| | | ०.०% | ०.०% | २५.६% | ७४.४% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ४.०% | ११.६% | १५.६% |
| २ | नोकरी | २ | १२ | २२ | ६४ | १०० |
| | | २.०% | १२.० % | २२.०% | ६४.०% | १००.०% |
| | | ०.८% | ४.८% | ८.८% | २५.६% | ४०.०% |
| ३ | व्यवसायाईक प्रशिक्षण | १ | ३ | ४ | ५ | १३ |
| | | ७.७% | २३.१ % | ३०.८% | ३८.५% | १००.०% |
| | | ०.४% | १.२% | १.६% | २.०% | ५.२% |
| ४ | शिक्षण | ० | १३ | ३१ | ३३ | ७७ |
| | | ०.०% | १६.९ % | ४०.३% | ४२.९% | १००.०% |
| | | ०.०% | ५.२% | १२.४% | १३.२% | ३०.८% |
| ५ | कायदा व न्यायालय | ० | ० | ० | १४ | १४ |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | १००.० % | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | ५.६% | ५.६% |
| ६ | आरोग्य विमा | २ | ० | १ | ४ | ७ |
| | | २८.६% | ०.०% | १४.३% | ५७.१% | १००.०% |
| | | ०.८% | ०.०% | ०.४% | १.६% | २.८% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

शासकीय योजना व सवलतीच्या संदर्भात माहिती प्राप्त करण्याच्या उद्देशाने संशोधकाने हा प्रश्न विचारलेला आहे. शासकीय योजनेतून घर मिळावे असे एकुण ३९ (१५.६%) उत्तरदात्यांनी सांगितले. नोकरीची गरज असणारे उत्तरदाते १००(४०%) आहेत. तर योजना

अंतर्गत व्यवसायाईक प्रशिक्षण असे म्हणणारे १३(५.२% ) उत्तरदाते आहेत. शिक्षणाची प्रक्रिया सुलभ व्हावी अशी मागणी ७७ (३०.८%) उत्तरदात्यांनी केली आहे. पारध्यांना संरक्षण देणारा व गुन्हेगारी कलंक नष्ट करणारा कायदा असावा अशी मागणी १४ (५.६%) उत्तरदात्यांनी केली, तर ७ (२.८%) उत्तरदात्यांनी आरोग्य विमा मीळावा असे सांगितले. तसेच काहींनी रोजगार उपलब्ध करून द्यावा, अटकेतून सुटका व्हाव्यात. तसेच पारंपारिक व्यवसायाला संरक्षण द्यावे अशी मागणी ही केली.

उत्तरदात्यांना अपेक्षित असलेल्या वरील सर्व योजना राबविल्या जातात परंतु या योजनांची अंमलबजावणी व्यवस्थित होत नसल्याने या योजना समाजापर्यंत पोहचत नाहीत. योजनांचा लाभ मिळवितांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागते. योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळत नाही.पक्षपात केला जातो.बऱ्याच वेळा योजनांची अंमलबजावणी केवळ कागदोपत्री होते. केवळ पारधी असल्यामुळे बऱ्याच अधिकाऱ्यांना आपुलकी व आस्था वाटत नाही.यामुळे या योजना केवळ मृगजळासारख्या वाटतात असे मत किशोर काळे यांनी दिले.तरी देखील बऱ्याच उत्तरदात्यांना या योजनांचा लाभ काही प्रमाणात का होईना झालेला दिसतो.दोषपूर्ण यंत्रणा, दप्तरदिरंगाई, भ्रष्टाचार या गोष्टी थांबविल्या तर योजनांचा लाभ निश्चित सर्वांना मिळेल, अशी अपेक्षा आहे.

## तक्ता क्र. ४.६.६

**जात प्रमाणपत्र आहे का नाही हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | जात प्रमाणपत्र | तालुके | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | आहे | **३** | **१३** | **१९** | **३५** | **७०** |
| | | ४.३% | १८.६% | २७.१% | ५०.०% | १००.०% |
| | | १.२% | ५.२% | ७.६% | १४.०% | २८.०% |
| २ | नाही | **२** | **१५** | **४९** | **११४** | **१८०** |
| | | १.१% | ८.३% | २७.२% | ६३.३% | १००.०% |
| | | ०.८% | ६.०% | १९.६% | ४५.६% | ७२.०% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

स्त्रोत : क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्ता जात प्रमाणपत्र आहे का ? नाही हे दर्शवितो या तक्या तील आकडेवरीनुसार जातप्रमाणपत्र आहे असे म्हणाणा-यांची एकुण संख्या ७०(२८.०%) इतकी आहे. तर जात प्रमाणपत्र नाही असे म्हणणा-यांची संख्या १८० (७२.०%) इतकी आहे. यावरून असे निदर्शनास येते की बहूसंख्य पारध्यांकडे जातीचे प्रमाणपत्र उपल्बध नाहीत त्यामुळे शासनाच्या असणाऱ्या कोणत्याही योजनेत पारधी जमात बसत नाहीत व योजनेच्या लाभापासून ते वंचित राहतात तेव्हा पारध्यांना जातप्रमाणपत्र उपल्बध करून देणे अतिशय गरजेचे आहे.

## ४. ७) पारध्यांची आरोग्य विषयक माहिती:-

पारधी जमात ही स्वत:च्या आरोग्य बाबत सतर्क नाही. त्याचे बरेच दुष्परीणामही यांना भोगावे लागलेले आहेत. पारधी जमातीत स्वच्छतेबद्दल, खाण्यापिण्याबाबत, कोणतीही काळजी घेतली जात नाही. तसेच मुख्य समाज प्रवाहापासून हे लोक अतिशय दूर असल्याने तसेच काही समूह प्रगतांच्या संपर्कात आल्याने यांच्यात आरोग्य जागृती झाली का हे अभ्यासण्याचा प्रयत्न काही प्रश्नांच्या आधारे सदर घटकामध्ये केलेला आहे.

**तक्ता क्र. ४.७.१**

| **आजारी पडल्यानंतर कोठे जातात हे दर्शविणारा तक्ता** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **आजारी पडल्यानंतर कोठे जाता** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **सरकारी दवाखाना** | **४** | **९** | **४०** | **१०३** | **१५६** |
| | | २.६% | ५.८% | २५.६% | ६६.०% | १००.०% |
| | | १.६% | ३.६% | १६.०% | ४१.२% | ६२.४% |
| **२** | **खाजगी दवाखाना** | **१** | **८** | **२०** | **२४** | **५३** |
| | | १.९% | १५.१% | ३७.७% | ४५.३% | १००.०% |
| | | ०.४% | ३.२% | ८.०% | ९.६% | २१.२% |
| **३** | **झाडपाला (घरगुती)** | **०** | **५** | **८** | **१३** | **२६** |
| | | ०.०% | १९.२% | ३०.८% | ५०.०% | १००.०% |
| | | ०.०% | २.०% | ३.२% | ५.२% | १०.४% |
| **४** | **मांत्रिक / भगत** | **०** | **६** | **०** | **९** | **१५** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ०.०% | ४०.०% | ०.०% | ६०.०% | १००.०% |
| | | ०.०% | २.४% | ०.०% | ३.६% | ६.०% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

वरील तक्ता हा पारधी जमातीतील लोक आजारी पडल्यावर कोठे जातात हे दर्शवितो. निवडलेल्या चार तालुक्यातुन निवडलेलया एकूण २५० उत्तरदात्यांपैकी एकुण १५६ (६२.४%) उत्तरदात्यांनी आम्ही सरकारी दवाखान्यात जातो असे सांगितले तर खाजगी दवाखान्यात जाणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण हे ५३(२१.२%) इतके आहे. तसेच झाडपाला किंवा घरगुती उपाय करतो असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २६(१०.४%) इतकी आहे. मांत्रिक भगतांकडे जाणाऱ्यांची संख्या एकूण उत्तरदात्यांपैकी १५ (६.०%) इतकी आहे.वरील आकडेवारी वरून सरकारी दवाखान्यात जाणाऱ्यांची संख्या जास्त आहे हे दिसून येते. कारण खाजगी दवाखान्यातील डॉक्टर यांना चांगली वागणूक देत नाहीत.

**तक्ता क्र. ४.७.२**

| **पारधी स्त्रीयांना गरोदरपणात आरोग्य सुविधा उपलब्ध होतात की नाही हे दर्शविणारा तक्ता** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **आरोग्य सुविधा** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होतात** | **०** | **४** | **५** | **१८** | **२७** |
| | | ०.०% | १४.८% | १८.५% | ६६.७% | १००.०% |
| | | ०.०% | १.६% | २.०% | ७.२% | १०.८% |
| **२** | **होत नाही** | **५** | **२४** | **६३** | **१३१** | **२२३** |
| | | २.२% | १०.८% | २८.३% | ५८.७% | १००.०% |
| | | २.०% | ९.६% | २५.२% | ५२.४% | ८९.२% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्ता हा गरोदरपणात आरोग्य सुविधा उपलब्ध होतात की नाही हे दर्शवितो, या तक्त्या नुसार एकुण चार तालुक्यांपैकी एकुण २७ (१०.८) उत्तरदाते सुवीधा उपलब्ध होतात असे सांगतात.तर सुवीधा उपलब्ध होत नाही असे एकुण २२३ (८९.२) उत्तरदाते म्हणतात.या वरुन या जमातीतील लोकांना आरोग्य विषयक समस्या असलयाचे जाणवले.

**तक्ता क्र. ४.७.३**

| पारधी स्त्रीयांची प्रसुती कोठे करतात हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रसुती कोठे करतात | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | घरी | ५ | १९ | ५७ | १२२ | २०३ |
| | | २.५% | ९.४% | २८.१% | ६०.१% | १००.०% |
| | | २.०% | ७.६% | २२.८% | ४८.८% | ८१.२% |
| २ | दवाखान्यात | ० | ९ | ११ | २७ | ४७ |
| | | ०.०% | १९.१% | २३.४% | ५७.४% | १००.०% |
| | | ०.०% | ३.६% | ४.४% | १०.८% | १८.८% |
| | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

वरील तक्ता पारधी जमातीतील स्त्रीचे बाळंतपण कोठे होते हे दर्शवितो. निवडलेल्या एकूण २५० उत्तरदात्यांपैकी एकुण २०३ (८१.२%) उत्तरदाते स्त्रीचे बाळंतपण हे घरीच होते असे म्हणाले तर ४७ (१८.८%) उत्तरदाते बाळंतपणासाठी दवाखान्यात दाखल करतो असे म्हणाले. उपरोक्त आकडेवारी वरून असे निदर्शनास येते की, ८१.२ % बाळंतपणे ही दवाखान्यात न जाता घरीच केले जातात.

या समाजात प्रसूत होणाऱ्या स्त्रीला बऱ्याच संकटाना सामोरे जावे लागते.कारण बाळंत होणाऱ्या स्त्रीला बाळंतपणाला एकटीलाच सामोरे जावे लागते.मुलं आडवे झाले तर प्रसंगी मृत्युला देखील सामोरे जावे लागते.तसेच जर स्त्री लवकर प्रसुत होत नसेल तर तिने काहीतरी पाप केले

आहे अशी धारणा आहे.तसेच वेळ प्रसंगी प्रसुत होणाऱ्या स्त्रीच्या पोटावर पती पाय देतो व तिला जबरदस्तीने प्रसुत होण्यास भाग पाडतो अशी माहिती देखील सर्वेक्षणा दरम्यान प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ४.७.४**

**स्त्रीची प्रसुती घरी करत असल्यास प्रसुती कोण करते हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | | तालुका | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | स्वतः स्त्री | ५ | २७ | ६६ | १३० | २२८ |
| | | २.२% | ११.८% | २८.९% | ५७.०% | १००.०% |
| | | २.०% | १०.८% | २६.४% | ५२.०% | ९१.२% |
| २ | पती | ० | ० | १ | ९ | १० |
| | | ०.०% | ०.०% | १०.०% | ९०.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.४% | ३.६% | ४.०% |
| ३ | पती व पत्नी | ० | १ | १ | ९ | ११ |
| | | ०.०% | ९.१% | ९.१% | ८१.८% | १००.०% |
| | | ०.०% | ०.४% | ०.४% | ३.६% | ४.४% |
| ४ | सुईण | ० | ० | ० | १ | १ |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | १००.०% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.४% | ०.४% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

वरील तक्ता पारधी जमातीतील स्त्रीचे बाळंतपण कोण करते हे दर्शवितो. निवडलेल्या एकूण २५० उत्तरदात्यांपैकी एकुण २२८ (९१.२%) उत्तरदाते स्त्रीचे बाळंतपण हे स्वत: स्त्रीच करते असे म्हणाले, तर १० (४.०%) उत्तरदाते पती करतो असे म्हणाले, पती व पत्नी मिळुन करतात असे ११ (४.४%) म्हणाले,तर या समाजात बाळंतपणासाठी सुईणीला बोलावतो असे १(०.४%) म्हणाले. उपरोक्त आकडेवारी वरून असे निदर्शनास येते की, ९१.२% बाळंतपणे ही दवाखान्यात न जाता घरीच केले जातात.

**तक्ता क्र. ४.७.५**

| बाळंतपणामध्ये माता व बाळाचा मृत्यु होणे असा प्रकार घडला आहे का हे दर्शाविणरा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | माता व बाळाचा मृत्यु | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होतो | ३ | १२ | २० | ३६ | ७१ |
| | | ४.२% | १६.९% | २८.२% | ५०.७% | १००.०% |
| | | १.२% | ४.८% | ८.०% | १४.४% | २८.४% |
| २ | होत नाही | २ | १६ | ४८ | ११३ | १७९ |
| | | १.१% | ८.९% | २६.८% | ६३.१% | १००.०% |
| | | ०.८% | ६.४% | १९.२% | ४५.२% | ७१.६% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

वरील तक्त्या वरुन असे दिसुन येते की बाळंतपणामध्ये माता व बाळाचा मृत्यु होणे असा प्रकार घडला आहे असे म्हणणारे एकुण उत्तरदाते हे ७१(२८.४%) इतके आहेत,तर मृत्यु होत नाही आसे म्हणणारे एकुण उत्तरदाते हे १७९ (७१.६%) इतके होते.

**तक्ता क्र.४.७.६**

| बाळंतपणात होणाऱ्या मृत्युमध्ये कोणते प्रमाण जास्त आहे हे दर्शाविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | मृत्युमध्ये कोणते प्रमाण | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | माता | २ | ९ | १३ | २३ | ४७ |
| | | ४.३% | १९.१% | २७.७% | ४८.९% | १००.०% |
| | | ०.८% | ३.६% | ५.२% | ९.२% | १८.८% |
| २ | बाळ | ३ | ७ | १२ | २३ | ४५ |
| | | ६.७% | १५.६% | २६.७% | ५१.१% | १००.०% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १.२% | २.८% | ४.८% | ९.२% | १८.०% |
| **३** | **या पैकी कोणचाही नाही** | **०** | **१२** | **४३** | **१०३** | **१५८** |
| | | ०.०% | ७.६% | २७.२% | ६५.२% | १००.०% |
| | | ०.०% | ४.८% | १७.२% | ४१.२% | ६३.२% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

वरील तक्ता हा पारधी जमातीत स्त्रियांच्या बाळंतपणात होणाऱ्या मृत्युचे प्रमाणात बाळाचे की आईचे मृत्यु प्रमाण जास्त आहे हे दर्शवितो.सर्वेक्षणा दरम्यान ज्या उत्तरदात्यांकडून मुलाखती अनुसूची भरुन घेतल्या त्या मुलाखती नुसार बाळंतपणात ४५ (१८.०%) इतक्या बाळांचा मृत्यु होतो. तर मातांचा मृत्युदर हा ४७ (१८.८%) इतका आहे. दोघांपैकी कोणाचाच मृत्यु होत नाही असे १५८(६३.२%) उत्तरदाते आहेत.

वरील आकडेवारी वरून १८.८ माता मृत्यु होतात हे बाळांच्या मृत्यू पेक्षा जास्त प्रमाण आहे म्हणजेच बाळंतपणात बाळाचा मृत्युदर जास्त आहे. पण दोघांचे मृत्यु हो त नाही असे म्हणणारे २३८ उत्तरदाते जास्त आहेत.

पारधी समाजात स्त्री गरोदर असतांना तिची व्यवस्थितपणे कोणतीही काळजी घेतली जात नाही.गरोदर पणात गर्भाला काही अडचणी आहेत का हे दवाखान्यात जाऊन तपासले जात नाही.गरोदर स्त्रीला योग्य तो आहार मिळत नाही.त्यामुळे बाळांचे मृत्यु जास्त होतात. असे काहींनी सांगितले.तसेच बाळंतपणाबाबत असणाऱ्या अघोरी प्रथा देखील बालमृत्युचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र.४.७.७**

| पारधी लहान बाळांना वेळेवर लसीकरण करतात का हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **लसीकरण होते** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होते** | **०** | **२१** | **५४** | **१११** | **१८६** |
| | | ०.०% | ११.३% | २९.०% | ५९.७% | १००.०% |
| | | ०.०% | ८.४% | २१.६% | ४४.४% | ७४.४% |
| **२** | **होत नाही** | **५** | **७** | **१४** | **३८** | **६४** |
| | | ७.८% | १०.९% | २१.९% | ५९.४% | १००.०% |
| | | २.०% | २.८% | ५.६% | १५.२% | २५.६% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

वरील तक्त्या नुसार पारधी जमातीतील लहान मुलांना वेळेवर लसीकरण होते की नाही हे तपासण्याचा प्रयत्न केला आहे.लहान मुलांना वेळेवर लसीकरण होते का असे विचारले असता १८६ (७४.४%) उत्तरदात्यांनी वेळेवर लसीकरण होते असे सांगितले आहे.तर एकूण ६४(२५.५%) उत्तरदात्यांनी वेळेवर लसीकरण होत नाही असे सांगितले. उपरोक्त आकडेवारीचा विचार करता वेळेवर लसीकरण होते असे म्हणणारे उत्तरदाते जास्त आहेत. म्हणजेच एकूण २५० उत्तरदात्यांपैकी १८६ (७४.४%) उत्तरदाते लसीकरण करून घेतात. याचा अर्थ पारधी जमातीत जन्माला येणाऱ्या अपत्याच्या आरोग्याबद्दल हा समाज जागृत झालेला दिसतो.

**तक्ता क्र.४.७.८**

| कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया केलीली आहे का नाही हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **शस्त्रक्रिया केली आहे** | **तालdुका** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होय** | **३** | **२०** | **५९** | **१२०** | **२०२** |
| | | १.५% | ९.९% | २९.२% | ५९.४% | १००.०% |
| | | १.२% | ८.०% | २३.६% | ४८.०% | ८०.८% |
| **२** | **नाही** | **२** | **८** | **९** | **२९** | **४८** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ४.२% | १६.७% | १८.८% | ६०.४% | १००.०% |
| | | ०.८% | ३.२% | ३.६% | ११.६% | १९.२% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

स्त्रोत : क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

वरील तक्त्याचे निरीक्षण केले तर असे दिसते की, एकुण २०२ (८०.८%) उत्तरदात्यांनी कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया करून घेतली आहे. तर ४८ (१९.२%) उत्तरदात्यांनी कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया केली नाही.परंतु उपरोक्त आकडेवारीचा विचार केला तर कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया करणारे उत्तरदाते हे जास्त आहेत. म्हणजेच पारधी जमात ही कुटूंबनियोजना बाबत जागृत झालेली दिसते.या जमातीत अनेक प्रथा, परंपरा आहेत. कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया ही या जमातीच्या धार्मिक बाबींच्या विरूध्द असतांना देखील वरील आकडेवारीत शस्त्रक्रियेचे प्रमाण जास्त आहे असे दिसून येते. म्हणजेच ही जमात आज काही प्रमाणात का होईना प्रथा, परंपरेला फाटा देऊ पाहत आहे.

**तक्ता क्र.४.७.९**

**कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया केली असल्यास कोणीकेलेली आहे हे दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया** | **तालुके** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **पुरूष** | **५** | **२२** | **५७** | **१२७** | **२११** |
| | | २.४% | १०.४% | २७.०% | ६०.२% | १००.०% |
| | | २.०% | ८.८% | २२.८% | ५०.८% | ८४.४% |
| **२** | **स्त्री** | **०** | **६** | **११** | **२२** | **३९** |
| | | ०.०% | १५.४% | २८.२% | ५६.४% | १००.०% |
| | | ०.०% | २.४% | ४.४% | ८.८% | १५.६% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

वरील तक्ता हा पारधी जमातीत पुरूष की स्त्रीने  कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया केलेले एकुण प्रमाण दर्शविते. २११ (८४.४%) पुरूष उत्तरदात्यांनी आम्ही कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया केलेली आहे असे उत्तर दिले. तर केवळ ३९ (१५.६%) महिला उत्तरदात्यांनी आम्ही शस्त्रक्रिया केलेली आहे असे म्हणाल्या.

वरील आकडेवारीचा विचार करता एकूण २५० पैकी २११ (८४%) पुरूष उत्तरदात्यांनी ही शस्त्रक्रिया करून घेतली असे दिसते.  म्हणजे वरील टक्केवारी नुसार कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्यांमध्ये पुरूषाचे प्रमाण हे स्त्रियांपेक्षा जास्त आहे. पारधी समाजात स्त्रियांचे स्थान हे दुय्यम आहे.तिला 'रांड' असे संबोधले जाते.तसेच तिचा विटाळही मानला जातो.तसेच स्त्रीला विकले जाते ती एकाच पती कडे नसते या कारणास्तव तिचे कुटूंबनियोजन रखडले जाते.तरी वरील आकडेवारीचा विचार करता या समाजातील लोक कुटूंबनियोजनाबाबत बरेच जागृत झालेले आहेत हे दिसून येते.

**तक्ता क्र.४.७.१०**

| कुटुंबात कोणी अपंग आहे का हे दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **अपंग** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होय** | **०** | **२** | **२** | **१५** | **१९** |
| | | ०.०% | १०.५% | १०.५% | ७८.९% | १००.०% |
| | | ०.०% | ०.८% | ०.८% | ६.०% | ७.६% |
| **२** | **नाही** | **५** | **२६** | **६६** | **१३४** | **२३१** |
| | | २.२% | ११.३% | २८.६% | ५८.०% | १००.०% |
| | | २.०% | १०.४% | २६.४% | ५३.६% | ९२.४% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरून कुटुंबात कोणी अपंग आहे का नाही  हे दर्शविलेले आहे. तक्त्यातील आकडेवारीनुसार कुटुंबात अपंग व्यक्ती आहेत असे म्हणणाऱ्यांची संख्या एकुण १९ (७.६% ) आहे व अपंग व्यक्ती नाही म्हणणाऱ्यांची संख्या २३१ (९२.४% ) आहे व पारधी समाजातील १० टक्केच अपंग व्यक्तींकडे प्रमाणपत्र आहेत य़ावरून पारधी कुटुंबातील अपंग व्यक्तींमध्ये अपंगत्वाचे प्रमाण कमी असल्याचे दिसते.

**तक्ता क्र.४.७.११**

**अपंग असलयास अपंगत्वाचा प्रकार कोणता हे दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **प्रकार** | **तालुके** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **अस्थिव्यंग** | **०** | **२** | **१** | **४** | **७** |
| | | ०.०% | २८.६% | १४.३% | ५७.१% | १००.०% |
| | | ०.०% | ०.८% | ०.४% | १.६% | २.८% |
| **२** | **दृष्टीदोष** | **०** | **०** | **२** | **१४** | **१६** |
| | | ०.०% | ०.०% | १२.५% | ८७.५% | १००.०% |
| | | ०.०% | ०.०% | ०.८% | ५.६% | ६.४% |
| **३** | **नाही** | **५** | **२६** | **६५** | **१३१** | **२२७** |
| | | २.२% | ११.५% | २८.६% | ५७.७% | १००.०% |
| | | २.०% | १०.४% | २६.०% | ५२.४% | ९०.८% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

उपरोक्त तक्ता हा उत्तरदात्यांचा अपंगत्वाचा प्रकार दर्शवितो. यात प्रमुख्याने अस्थिव्यंग आसणारे एकुण ७ (२.८%) इतके, दृष्टीदोष १६ (६.४%) तर कोणते अपंगत्व नाही असे म्हणणरे २२७ (९०.८%)  उत्तरदाते दिसून येतात. अस्थिव्यंग हे अपंगत्व येण्याचे कारण काहीनी व्यक्तीगत भांडणातून व पोलीस कोठडीतील मारहीणी मुळे आलेले आहे असे सांगीतलेले दिसून येते.

**तक्ता क्र.४.७.१२**

| राजीव गांधी आरोग्य पत्रिका आहे की नाही हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **आरोग्य पत्रिका** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **आहे** | **२** | **१२** | **१९** | **३६** | **६९** |
| | | २.९% | १७.४% | २७.५% | ५२.२% | १००.०% |
| | | ०.८% | ४.८% | ७.६% | १४.४% | २७.६% |
| **२** | **नाही** | **३** | **१६** | **४९** | **११३** | **१८१** |
| | | १.७% | ८.८% | २७.१% | ६२.४% | १००.०% |
| | | १.२% | ६.४% | १९.६% | ४५.२% | ७२.४% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरून राजीव गांधी आरोग्य पत्रिका आहे असे म्हणणारे एकुण ६९(२७.६%) उत्तरदाते आहेत.तर ज्यांच्याकडे ही आरोग्य पत्रिका नाही असे म्हणणारे उत्तरदाते १८१ (७२.४%) आहेत. राजीव गांधी आरोग्य पत्रिका ही शासनाने मागास घटकास देवू केलेली एक आरोग्य विमा पत्रिका आहे. ज्या माध्यमातून कुटुंबातील एखादी व्यक्ती आजारी झाली तर शासनाकडून इलाज करण्यासाठी संपूर्ण रक्कम प्राप्त होते. परंतु ही रक्कम प्राप्त होण्यासाठी कुटुंबाकडे राजीव गांधी आरोग्य पत्रिका असावयास हवी.ही पत्रीका नसलयाने या जमातीतील लोकांना मोफत उपचार मिळत नाही

## ४.८. पोलीस व पारधी यांच्यातील संबंध विषयक माहिती:-

पारधी जमातीकडे सर्वसाधारण पणे गुन्हेगार जमात म्हणून पाहीले जाते.याचे प्रमुख कारण म्हणजे १८७१ सालचा गुन्हेगार जमात कायदा होय़ तेव्हा पासून आजपर्यत पारधी म्हणजे चोर अशा दृष्टीकोनातून समाज त्यांच्याकडे पाहतो.कोणत्याही गावी दरोडा किंवा जबरी चोरीची घटना घडली की त्या परिसरातील पारधी वस्तीवर छापा टाकून अटक सत्र सुरु होते. ही पोलिसांची

मानसिकता आजपर्यंत तसेच आहे का ? पोलिसांकडून आजही पारध्यांचा छळ होतो का हे जाणून घेण्याचा प्रयत्न खालील काही प्रश्नांच्या आधारे केलेला आहे ?

**तक्ता क्र.४.८.१**

**पारध्यांचा चोरी किंवा गुन्हयाशी संबंध लावला जातो का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | चोरी / गुन्हयाशी संबंध लावला जातो | तालुके | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होय | **५** | **२५** | **६४** | **१३४** | **२२८** |
| | | २.२% | ११.०% | २८.१% | ५८.८% | १००.०% |
| | | २.०% | १०.०% | २५.६% | ५३.६% | ९१.२% |
| २ | नाही | **०** | **३** | **४** | **१५** | **२२** |
| | | ०.०% | १३.६% | १८.२% | ६८.२% | १००.०% |
| | | ०.०% | १.२% | १.६% | ६.०% | ८.८% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

चोर म्हटले की तो पारधीच असणार असा सामान्य लोकांची व पोलिसांची धारणा आहे.ती आज पण आहे का? हे जाणून घेण्यासाठी संशोधकाने उपरोक्त प्रश्न विचारला आहे.क्षेत्रिय पहाणी दरम्यान उत्तरदात्यांशी चर्चा करतांना त्यांचा चोरी किंवा गुन्हांशी संबंध लावला जातो का याची माहिती उपरोक्त तक्त्यात दर्शविलेली आहे.वरील तक्त्या वरून असे स्पष्ट होते की, एकूण २५० उत्तरदात्यांपैकी एकुण २२८ (९१.२%) उत्तरदात्यांचा चोरी किंवा गुन्हयांशी संबंध लावला जातो. तर २२ (८.८%) उत्तरदात्यांनी चोरी किंवा कोणत्याही गुन्हयाशी संबंध लावला जात नसल्याची माहिती दिली.

वरील तक्त्यातील आकडेवारी वरून असे सिध्द होते की, चोरी किंवा गुन्हयांशी संबंध लावला जातो असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.परंतु यावरून हे ही सिध्द होते की, सर्वच पारधी गुन्हेगार किंवा चोर नाहीत केवळ परिस्थितीमुळे त्यांच्यावर ही वेळ आलेली आहे. अहमदनगर जिल्हयातील बहुसंख्य पारधी समाज हा गुन्हेगारी चक्रात आडकलेला आहे परंतु त्यावरून सर्वच पारधी गुन्हेगार आहेत हा अंदाज काढणे देखील कठीण आहे.

**तक्ता क्र.४.८.२**

| कुटूंबातील सदस्य अटकेत आहेत का यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **तुरूंगात आहे का** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होय** | **३** | **१६** | **१६** | **३१** | **६६** |
| | | ४.५% | २४.२% | २४.२% | ४७.०% | १००.०% |
| | | १.२% | ६.४% | ६.४% | १२.४% | २६.४% |
| **२** | **नाही** | **२** | **१२** | **५२** | **११८** | **१८४** |
| | | १.१% | ६.५% | २८.३% | ६४.१% | १००.०% |
| | | ०.८% | ४.८% | २०.८% | ४७.२% | ७३.६% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

पारधी आणि गुन्हा व तुरूंग हे समीकरण अतिशय जुने आहे परंतु आज परिस्थिती काय आहे हे जाणून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे तेव्हा संशोधकाने हा प्रश्न विचारला.वरील तक्त्या वरून असे दिसून येते की, एकूण २५० उत्तरदात्यांपैकी एकुण ६६ (२६.४%) उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सदस्य मुलाखत अनुसूची भरून घेतांना अटकेत आहेत असल्याचे सांगितले. तर १८४ (७३.६%) उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सदस्य अटकेत नसल्याची माहिती मिळाली.काहींना संशयावरून पकडून नेले जाते परंतु चौकशी नंतर सोडून दिले जाते. पोलिसांनी पकडलेल्या उत्तरदात्यांमध्ये स्त्री उत्तरदात्यांचा देखील समावेश आढळला. तुरूंगात गेलेले किंवा अटकेत असलेल्या स्त्री व पुरूषांच्या पाल्याची आतोनात हाल होते.वेळप्रसंगी जर पतीला जास्त शिक्षा असेल तर स्त्री दुसरे लग्न करते किंवा पत्नीला जास्त शिक्षा असेल तर पती दुसरे लग्न करतो

असे काही उत्तरदात्यांनी सांगितले.शिक्षणाचा अभाव व कायदेविषयक अज्ञान या दोन गोष्टीमुळे त्यांना अनंत अडचणींना व आर्थिक शोषणास बळी पडावे लागते. अशी माहिती प्राप्त झाली.

उपरोक्त माहिती वरून असे दिसून येते की, दारू विक्री, बलात्कार, खून, चोरी / दरोडा, हरणांची शिकार व मुलांचे अपहरण या विविध गुन्हयांमुळे उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सदस्य अटकेत आहेत. मध्यंतरी पारध्यांच्या तुरूंगातील सततच्या जाण्याविषयी तुरूंगदेश हा फासेपारध्यांचा हा चित्रपट देखील येऊन गेला.

**तक्ता क्र.४.८.३**

| **आपसात तंटा झाल्यास पारधी पोलिसात तक्रार देतात की नाही हे दर्शविणारा तक्ता** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पोलीसात तक्रार देता का** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होय** | **३** | **१८** | **२३** | **३६** | **८०** |
| | | ३.८% | २२.५% | २८.८% | ४५.०% | १००.०% |
| | | १.२% | ७.२% | ९.२% | १४.४% | ३२.०% |
| **२** | **नाही** | **२** | **१०** | **४५** | **११३** | **१७०** |
| | | १.२% | ५.९% | २६.५% | ६६.५% | १००.०% |
| | | ०.८% | ४.०% | १८.०% | ४५.२% | ६८.०% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

पारधी समूहात होणारा कोणताही तंटा किंवा भांडण हे विषय जात पंचायतीत मिटवतात परंतु त्यात काही बदल झाला का हे तपासण्यासाठी संशोधकाने सदर प्रश्न विचारला आहे.वरील तक्त्याद्वारे पारधी जमातीतील उत्तरदाते आपसात तंटा झाल्यास पोलिसात तक्रार देतात असे म्हणणारे ८० (३२.०%) इतके उत्तरदाते आहेत. तर १७० (६८.०%) पारधी जमातीतील उत्तरदाते आपसात तंटा झाल्यास पोलिसात तक्रार देत नाहीत असे दिसून येते. या आकडेवारीची

विचार करता असे दिसते की पारधी समूहात होणारा कोणताही तंटा किंवा भांडण हे जास्तीत जास्त जात पंचायतीत मिटवतात.

करण्याचा प्रयत्न करतात.परंतू वरील आकडेवारीनुसार हे प्रमाण कमी झाल्याचे दिसुन येते.

**तक्ता क्र.४.८.४**

| पारध्यांना पोलिसांकडुन विनाकारण त्रास दिला जातो का हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पोलीसांकडून त्रास दिला जातो का** | **तालुके** | | | | |
| | | **जामखेड** | **कर्जत** | **नगर** | **श्रीगोंदा** | **एकुण** |
| **१** | **होय** | **३** | **२०** | **१८** | **३७** | **७८** |
| | | ३.८% | २५.६% | २३.१% | ४७.४% | १००.०% |
| | | १.२% | ८.०% | ७.२% | १४.८% | ३१.२% |
| **२** | **नाही** | **२** | **८** | **५०** | **११२** | **१७२** |
| | | १.२% | ४.७% | २९.१% | ६५.१% | १००.०% |
| | | ०.८% | ३.२% | २०.०% | ४४.८% | ६८.८% |
| **एकुण** | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरुन असे निष्पन्न होते की अहमदनगर मधील जामखेड या तालुक्यात पोलीसांकडून त्रास दिला जातो असे म्हणणारे एकुण उत्तरदाते हे ३(१.२%) इतके आहेत तर कर्जत मध्ये हे प्रमाण २०(८.०%) इतके आहे,नगर या मालुक्याचा विचार केला तर १८(७.२%) इतके उत्तरदाते होते. तसेच श्रीगोंदा तालुक्यातील ७८(३१.२%) इतक्या उत्तरदात्यांनी आजही पोलीसांकडून त्रास होतो असे सांगीतले. या उलट पोलीसांकडून त्रास दिला जात नाही असे म्हणणारे उत्तरदाते हे जामखेड या तालुक्यात २ (०.८%) तर कर्जत मध्ये हे प्रमाण ८(३.२%),नगर या मालुक्याचा विचार केला तर ५०(२०.८%) तसेच श्रीगोंदा तालुक्यातील ११२ (६८%) इतके दिसुन येते या वरुन असे निष्पन्न होते की चार ही तालुक्याचा विचार केला तर आज मितीस पारध्यांना पोलीसांकडून त्रास होणे कमी झालेले दिसून येते.

**तक्ता क्र.४.८.५**

| जर पोलिस विनाकारण त्रास देत असतील तर कशा प्रकारे देतात? हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | त्रास कोणत्या प्रकारचा | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | या पैकी नाही | **२** | **८** | **५०** | **११२** | **१७२** |
| | | १.२% | ४.७% | २९.१% | ६५.१% | १००.०% |
| | | ०.८% | ३.२% | २०.०% | ४४.८% | ६८.८% |
| २ | स्त्रियांचे लैंगिक शोषण | **०** | **४** | **३** | **१४** | **२१** |
| | | ०.०% | १९.०% | १४.३% | ६६.७% | १००.०% |
| | | ०.०% | १.६% | १.२% | ५.६% | ८.४% |
| ३ | आर्थिक शोषण होते | **३** | **१२** | **११** | **१८** | **४४** |
| | | ६.८% | २७.३% | २५.०% | ४०.९% | १००.०% |
| | | १.२% | ४.८% | ४.४% | ७.२% | १७.६% |
| ४ | मारहाण होते | **०** | **४** | **४** | **५** | **१३** |
| | | ०.०% | ३०.८% | ३०.८% | ३८.५% | १००.०% |
| | | ०.०% | १.६% | १.६% | २.०% | ५.२% |
| एकुण | | **५** | **२८** | **६८** | **१४९** | **२५०** |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

स्त्रोत : क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

उपरोक्त तक्त्या वरुन असे दिसून येते की पोलीसांकडून या समाजातील एकुण चार तालुक्यात अनुक्रमे २१(८.४%) महीलांचे लैगीक शोषण होते. तर या समाजातील ४४ (१७.६%) व्यक्तींना पोलीसांकड्डुन आर्थिक शोषण होते. तसेच १३(५.२%) उत्तरदात्यांची मारहाण होते. तर या पैकी काहीही होत नाही म्हणणारे ६२ (२४.८) इतके उत्तरदाते आहेत.

**तक्ता क्र.४.८.६**

| कुठलाही गुन्हा घडल्यास प्रगतांकडून पारधी वस्तीवर हलला होतो का? होत नाही हे दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वस्तीवर हलला होतो का | तालुके | | | | |
| | | जामखेड | कर्जत | नगर | श्रीगोंदा | एकुण |
| १ | होतो | ३ | १५ | १७ | ३४ | ६९ |
| | | ४.३% | २१.७% | २४.६% | ४९.३% | १००.०% |
| | | १.२% | ६.०% | ६.८% | १३.६% | २७.६% |
| २ | होत नाही | २ | १३ | ५१ | ११५ | १८१ |
| | | १.१% | ७.२% | २८.२% | ६३.५% | १००.०% |
| | | ०.८% | ५.२% | २०.४% | ४६.०% | ७२.४% |
| एकुण | | ५ | २८ | ६८ | १४९ | २५० |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |
| | | २.०% | ११.२% | २७.२% | ५९.६% | १००% |

**स्त्रोत :** क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

कुठलाही गुन्हा घडल्यास प्रगतांकडून वस्तीवर हलला होतो हे समीकरण पारधी समाजाबाबत ठरलेले आहे ते आजही तसेच आहे की त्यात काही सुधारणा झालयात हे तपासण्यासाठी संशोधकाने उपरोक्त प्रश्न विचारलेला आहे. तर ६९ (२७.६%) उत्तरदाते प्रगतांकडून वस्तीवर हलला होतो असे म्हणतात तर १८१ (७२.४%) उत्तरदाते प्रगतांकडून वस्तीवर हलला होत नाही असे म्हणतात व ही बाब नोंद करण्या सारखी आहे. म्हणजेच या समाजावर इतरोकडून होणारे हलले कमी होत आसलयाचे दिसुन येते.

# प्रकरण पाचवे

## संशोधन निष्कर्ष आणि शिफारशी

प्रस्तुत संशोधनाचा विषय हा *महाराष्ट्रातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास विशेष : संदर्भ अहमदनगर जिल्हा.* हा असून अहमदनगर जिल्हयातील जामखेड, कर्जत, नगर व श्रीगोंदा या चार तालुक्यातील सहेतुक नमुना निवडीच्या माध्यमातुन निवडलेल्या एकुण ४२ गावातील २५० कुटुंबांच्या अध्ययनातुन पारधी या विमुक्त जमातीच्या सामाजिक वंचीततेच्या आढाव्या बरोबरच अहमदनगर जिल्हयातील पारधी जमातीच्या सामाजिक स्थितीकडे टिकात्मक दृष्टीकोणातून पाहिलेले आहे. यांच्या सामाजिक, आर्थिक, व्यवसायीक, सांस्कृतीक गतीशीलतेच्या वेद व भारतीय नागरीकत्वात यांचे कितपत समायोजन आत्ता पर्यंत झालेले आहे हे तपासण्याचा प्रयत्न सदर या संशोधनातून केलेला आहे. तसेच कुटुंब, व्यवसाय, आरोग्य, शिक्षण, इ.चले देखील सदर संशोधनातून अभ्यासलेली आहेत. या संशोधनातून असे निष्पन्न होते की आज एकविसाव्या शतकात देशात विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी, उद्योग, व इतर अनेक बाबतीत प्रगती झालेली आहे मात्र भारतीय समाजव्यवस्थेचा महत्वपूर्ण भाग असलेल्या विमुक्त जमाती या वंचीत अवस्थेतच जिवन व्यथीत करतांना दिसतात. जागतीकीकरण व आधूनिकीकरणच्या युगात या जमातीची स्थितीत आपेक्षीत परीवर्तन झालेले दिसत नाही. स्वत:च्या हक्कासाठी अनेक वेळा या जमातीने लोक उठाव करुन याची दखल घेतली गेलेली नाही तेव्हा पारधी या जमातीला आजही सामाजिक, आर्थिक, शैक्षणीक, वंचीततेचा सामना करावा लागत आहे असे निष्पन्न होते.

या संशोधनासाठी रॉबर्ट मर्टन यांचा सापेक्ष वंचिततेचा सिध्दांत व फ्रॅन्कलीन टेनेनबम यांच्या नामाभिदानसिध्दांताच्या समाजशास्त्रीय दृष्टीकोणाची संदर्भ चौकट उपयुक्त ठरते कारण पारधी जमातीचा समावेश हा समाजातील उपेक्षीत व वंचीत घटकात होतो, तसेच १८७१ च्या गुन्हेगार जमात कायद्याची शिकार ही जमात झालेली असल्याने चोर किंवा गुन्हेगार हे लेबल माथी घेवुनच आजही हे जगतांना दिसतात. भारतीय समाजव्यवस्थेत काही घटकांचे स्थान हे प्रथम पासूनच वंचीत असलेले दिसून येते व भारतीय संविधानात स्वातंत्र्य व समता या मानवी मूलयांचा समावेश असतांना देखील ही वंचीतता आबादीत असलेली दिसते. या देशातील समाजव्यवस्थेचा आविभाज्य भाग असतांना देखील समानतेची वागणूक पारध्यांना मिळतांना दिसत नाही व पूर्वग्रह

दुषीत दृष्टीकोणातून समाजातील लोक या जमीतीकडे पहातांना दिसतात. या वरुन असे निष्पन्न होते की या जमातीच्या समाजिक वंचीततेत अपेक्षीत असे परीवर्तन आजतागायत झालेले दिसत नाही व ही जमात आजही अतिमागास व संघर्षमय, जिवन जगत आहे. व यांच्या या स्थीतीस यांचे सामाजिक, आर्थिक, व्यवसायीक, सांस्कृतीक मागासलेपणा व गुन्हेगार जमात कायदा ब-याच अंशी जबाबदार असलेला दिसून येतो.

सदर संशोधन कार्य वर्णनात्मक संशोधन आराखडयाच्या मदतीने पूर्णत्वास नेलेले असून गुणात्मक व संख्यात्मक पध्दतीच्या वापरातून सदर संशोधनास उपयुक्त आसणा-या तथ्यांचे संकलन केलेले आहे. तसेच प्राथमीक व दुय्यम स्त्रोतांच्या माध्यमातुन जसे प्रश्नावली, मुलाखती, पारधी समाजाबददल झालेले समाजशास्त्रीय लिखान, विविध पुस्तके, मासिके व वर्तमान पत्रातुन यांची दर्शविलेली सध्यस्थीती इ. माध्यमातून पारधी जमाती बददल प्राप्त केलेली माहीती संशोधन प्रबंधाच्या प्रकरण क्रमांक तीन व चार मध्ये मांडून संशोधन कार्य पूर्णत्वास नेलेले आहे.

## ५.१. निष्कर्ष

***सदर संशोधनासाठी निश्चीत केलेल्या संशोधन उदिष्ठांनुसार पुढील काही बाबी निष्पन्न होतात.***

### पारधी समाजाची कौटुंबिक स्थिती :-

जामखेड कर्जत नगर व श्रीगोंदा या तथ्य संकलना साठी निवडलेलया चार नमूणा तालुक्यातुन प्राप्त संख्यात्मक माहीतीच्या आधारोजिल्हयातील पारधी समाजाची कौटुंबिकस्थिती बाबत असे निष्पन्न होते की, पारधी कुटुंब हे पुरुष प्रधान असल्याचे दिसून येते तसेच या जमातित विभक्त कुटंबाची संख्या जास्त आहे कारण या समाजात विवाहा नंतर लगेचच मूलाला स्वतंत्र पाल ठोकावे लागते तो आई वडीलां सोबत राहू शकत नाही असा नियम आहे. निर्णय प्रक्रीयेत स्त्रिचा फार कमी प्रमाणात सहभाग पारधी कुटंबात दिसतो. यावरून पारधी जमातीतील कौटुंबिक जीवनात स्त्रीचा दर्जा दुय्यम आहे हे सिध्द होते. कुटुंबात आसणा-या सुविधांमध्ये वीज ही सुविधा जास्त प्रमाणात आहे असे म्हणणारे निवेदकांचे प्रमाण जास्त आढळले. पारधी कुटुंबात विवाह प्रसंगी वराकडून हुंडा घेतात . विवाह वेळेच्या वयात लक्षणीय वाढ झालेली दिसुन येते नाही.

**पारधी समाजाची सामाजिक स्थिती :-**

अहमदनगर जिल्हयातील पारधी जमातीच्या सामाजिक स्थिती बददल जामखेड, कर्जत, नगर व श्रीगोंदा या निवडलेलया चार नमूणा तालुक्यातुन प्राप्त संख्यात्मक माहीतीच्या आधारे असे निष्पन्न होते की, पारधी समाजाच्या सामाजिक दर्जात फार फरक पडलेला नसून या समाजाला इतर समाजाकडून मिळणारी वागणूक ही आजही दुय्यम स्वरुपाची आहे. सरपंच या घटकाकडून त्रास होण्याचे प्रमाण जास्त आसलयाचे या संशोधनातुन दिसुन आले तसेच यांना मद्यपानाची सवय जास्त आहे. यांना आज पर्यत स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध होवू शकतलेली नाही ही अतिशय खेदाची बाब सदर संशोधनातून निदर्शनास आली. ब-याच जणांना जातपंचायत आसावी आसेच वाटत आसलयाचे संशोधनातुन जाणवले. कारण सामाजिक बहिष्कार अधिनियम २०१७ हा जात पंचायती विरोधातील कायदा नुकताच महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेला आहे या कायदयाबाबत या समाजाला जास्त प्रमाणात माहीती नसलयाचे दिसते. या मुळेच यांना मोठया प्रमाणात सामाजिक भेद भावाला सामोरे जावे लागते. या समाजाचे मुख्य प्रवाहात सम्मीलीकरण आज पर्यत अपेक्षे प्रमाणे झालेले नाही. आजही यांचा गुन्हेगार जमात हा कलंक पुर्णपणे पुसला गेलेला नाही. यांना आज देखील कोणत्याही सामाजिक कार्यात यांना सहभागी करुन घेतले जात नाही.

**पारधी समाजाची आर्थिक स्थिती :-**

अहमदनगर हा जिल्हा महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात अतिशय नावाजलेला असा आहे मात्र या जिल्हयातील पारधी जमातीस आर्थिक मिळकतीचे कोणतेही ठोस साधन आजपर्यत उपलब्ध होवू शकलेले नाही. काहींना शेती मिळालेली आहे, परंतु त्या शेतीचा प्रकार हा जिरायत असल्याने त्यातून त्यांचा आर्थिक स्तर उंचावलेला दिसून येत नाही. शेतिव्यतिरिक्त पशुपालन कले जाते. बरेचशे पारधी कुटूंब आजही पाल किंवा झोपडी मध्ये राहतानां दिसतात. या जमातीत पिवळे रेशनकार्ड आसणारे उत्तरदाते सर्वाधीक आहेत. चार ही तालुक्यात मतदान कार्ड, आधार कार्ड आसणारे आसणा-यांची संख्या जास्त दिसून येते. गावात रोजगार उपलब्ध करतो असे म्हणणारे निवेदक खुपच कमी असलयाचे संशोधना दरम्यान दिसते. शिकार आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत आहे. जास्तीत जास्त कुटुंबातील सदस्य हे भिक मागत नाहीत. गावातील महीला बचत गटामध्ये कुटुंबातील महीलेचा समावेश आहे असे दिसते .परंतु हा सहभाग खुपच कमी दिसून येतो. २०००० ते ३०००० पर्यत वार्षीक उत्पन्न असणारे कुटुंबे जास्त दिसुन येतात. मिळणा-या

आर्थिक उत्पन्नातून पारधी कूटूंबांच्या गरजा भागतात की नाही. मुलांनी आधुनिक व्यवसाय करावा जेणेकरून त्यांच्या दैनंदिन गरजा व्यवस्थित भागतील असे मत बहुसंख्य उत्तरदात्यांनी मत व्यक्त केलयाचे सर्वेक्षणा दरम्यान दिसतन येते. कर्ज घेतले नाही असे म्हणणा-या उत्तरदात्यांची संख्या जास्त आहे . जास्तीत जास्त कुटुंबात पारधी हे इंधन म्हणून लाकडाचा उपयोग करतांना दिसतात. रेडीओ हे साधन ब-याच पारध्यांकडे दिसुन येते. तसेच नोकरीत असणाऱ्यांचे प्रमाण हे अगदी बोटावर मोजण्या इतके आहे व शिकारीवर बंधने आल्याने शिकार करण्याचे प्रमाणही अतिशय कमी झालेले आहे. यातुन यांच्या कोणत्याही व्यवसायाक गतीशिलतेला वाव न मिळालयाचे दिसुन येते व एकंदर व्यवसायीक गतीशीलता व आर्थिक सुबत्तता नसल्याने खाजगी सावकाराकडून कर्ज घेतले जाते. याचा परिणाम कर्ज फेडीसाठी मुलांना शाळा सोडून व घरातील वृध्दांना इतर ठिकाणी स्थलांतरीत होवून भिक मागणे इ.बाबी कराव्या लागत आहेत.यातून सुटका होण्यासाठी मुलांनी आधुनिक व्यवसाय करावा व आर्थिक उन्नतीसाठी सरकारने ठोस भूमिका पार पाडावी असे यांना वाटते.कार्ल मार्क्स या विचारवंताने मांडलेल्या आर्थिक निर्धारण वादाची संकल्पना ही ज्या प्रमाणे सर्व क्षेत्रात लागू पडते त्याच प्रमाणे ही जमात देखील या पासून वेगळी नाही.पारधी लोक मागास राहण्याचे मुख्य कारण हे त्यांच्या आर्थिक मागासलेपणात आहे व त्यांना ठोस उपजिविकेचे साधन प्राप्त न झालयाने त्यांची आर्थिक वंचना वाढतच चाललेली दिसते.

**पारधी समाजाची शैक्षणीक स्थिती :-**

अहमदनगर जिल्हयातील पारधी जमातीच्या शैक्षणीक स्थिती बददल जामखेड कर्जत नगर व श्रीगोंदा या निवडलेलया चार नमूणा तालुक्यातुन प्राप्त संख्यात्मक माहीतीच्या आधारे दिसून येणारी शैक्षणीक स्थिती ही जुन्या पीढीच्या तुलनेत ब-या पैकी सुधारलेली जाणवते. तसेच जे काही शैक्षणीक मागासलेपण आहे त्याची प्रमुख कारणे ही शाळेत शिक्षक वविद्यार्थ्यांकडून मिळणारी वाईट वागणूक, पारधी वस्ती पासून शाळेचे अंतर जास्त आसने, स्थलांतर, इ. आसलेली दिसतात. तसेच प्रगती साठी प्रत्येक तालूका स्तरावर आदिवासी आश्रमशाळा व वसतीगृह असावे असे मत अनेकांनी क्षेत्रीय पहाणी दरम्यान दिले. जास्तीत जास्त पारधी मुलांना मिळणा-या शैक्षणीक सवलतीबददल अनभिज्ञ आहेत असे संशोधनात जाणवते. म्हणजेच पारधी जमातीच्या एकूणच सामाजिक पार्श्वभूमीचा परिणाम हा त्यांच्या मुलांच्या शालेय जीवनावर होत

असला तरी मुलांचे शाळेत जाण्याचे प्रमाण हे सदर संशोधनातुन वाढलेले दिसते व शिक्षणा बददल या समाजात जागृती होत आहे.

**पारधी समाजाची सांस्कृतीक व धार्मीक स्थिती :-**

अहमदनगर जिल्हयातील पारधी लोकांना आपली संस्कृती ही कनिष्ठ वाटत आहे. इतर लोकांशी संपर्क वाढल्याने ते इतरांच्या संस्कृतीशी व जीवनमानाशी आपलया संस्कृतीची तुलना करु लागले आहेत. या जमातीत मृत व्यक्तीला दफन केले जाते. दफण विधी हा प्रमुख्याने खिश्चन व मुस्लीम धर्मात दिसुन येत आ सला तरी पारध्यांचा धर्म हा हिंदूच आहे कारण क्षेत्रीय पहाणीत कोणीही धर्मांतर केलेले दिसले नाही. या जमातीत स्त्री बाळंत झाल्यास रुढी प्रमाणे वागवले जाते. दैवीशक्ती, भगत व जादूटोण्यावर विश्वास ठेवण्याचे प्रमाण आजही बरेच आहे. देवाला आजही पशूंचा बळी दिला जातो व बक-याचा बळी देण्याचे प्रमाण रेडयाच्या तुलनेने पुर्वीपेक्षा आज जास्त दिसुन येते. कुटूंबातील सदस्याच्या हातानेच या जमातीत धार्मीक विधी पार पाडतात. नावीलाजास्तव व स्वत:च्या समाजाच्या दबावामूळे रुढी प्रमाणे वागणे, विविध परंपरांचे पालन करणे, नवस करणे, उपवास करणे, जत्रा करणे देवांना प्रसन्न ठेवण्यासाठी वेगवेगळया पशुंचा बळी देणे हे आजही चालूच आहे. या समाजात आजही अनेक प्रथा व परंपरा या काटेकोरपणे पाळण्याचे प्रमाण अपेक्षीत कमी झालेले नाही. धार्मिक कार्यात विशेषत: या जमातीतील स्त्रीयांना सहभागी करुन घेतले जात नाही. जव्हारणं, देवकारण अशा काही विधींना आजही या जमातीत महत्वपुर्ण स्थान आहे.असे संशोधनातून आढळले.

**पारधी समाजाची आरोग्य विषयक स्थिती :-**

जिल्हयातील पारधी जमातीच्या आरोग्य विषयक स्थिती बददल जामखेड, कर्जत, नगर व श्रीगोंदा या निवडलेलया चार नमूना तालुक्यातुन प्राप्त संख्यात्मक माहीतीच्या आधारे असे निष्पन्न होते की, आजारी पडलया नंतर हे लोक आपला विलाज जास्त करुन सरकारी दवाखण्यातच करतांना दिसतात. तसेच या समाजातील महीलांना गरोदरपणात कोणत्याही प्रकारच्या आरोग्य सुविधा उपलब्धहोत नाहीत, या जमातीतील स्त्रीयांची प्रसुती अद्यापही घरीच होतांना दिसते, प्रसुती दरम्यान माता व बाळाचा मृत्यु होण्याचे प्रमाण मात्र कमी जाणवते, या समाजात लहान मुलांना मात्र वेळेवर लसीकरण करतात असे संशोधनातील प्राप्त संख्यात्मक तथ्यांवरुन निष्पन्न होते. त्याच बरोबर या संशोधनातुन प्राप्त विधायक माहीती अशी आहे की या जमातीतील बहुसंख्य

पुरुषांनी कुटुंबनियोजन शस्त्रक्रीया करुन घेतलयाचे आढळते. सदर संशोधनातील संख्यात्मक माहीतीच्या आधारे हे निदर्शनास येते की या जमातीत काहींना आलेले अपंगत्व हे पोलीस कोठडीत झालेलया मारहाणीतुन आलेले आहे. या वरुन या जमातीच्या आरोग्य विषयक स्थितीत अपेक्षीत सुधार नसलयाचे जाणवते.

**पोलीस आणि पारधी यांच्यातील संबंध :-**

पोलीस आणि पारधी यांच्या संबंधाबद्दल सदर संशोधनातून असे आढळून येते की आजही पोलीसांकडून पारध्यांवर संशय घेतला जातो व काही गुन्हयांशी त्यांचा संबंध लावला जातो परंतु पुर्वीच्या तुलनेत हे प्रमाण बरेच कमी आसलयाचे प्राप्त संख्यात्मक तथ्यांच्या आधारे आढळले. तसेच बऱ्याच कुटुंबातील सदस्यांचा विविध गुन्हयांशी संबंध लावून न केलेल्या गुन्हयांची शिक्षा आजही भोगत आहेत. प्रगतांचा संशय, गुन्हेगारीचा शिक्का यामूळे पोलिसांचा दृष्टीकोण आजही पूर्णपणे बदललेला दिसत नाही. या समाजातील स्त्रीयांचे काही प्रमाणात पोलीसांकडून लैंगीक शोषण होते याचे संख्यात्मक प्रमाण मात्र अतिशय कमी झालेले संशोधनातुन दिसुन येते. तसेच आर्थिक पिळवणूकीला देखील सामोरे जावे लागते. आस पास गुन्हा घडल्यास वस्तीवर हल्ला होण्याचे प्रमाण कमी झालेले आहे, संपले मात्र नाही. अहमदनगर मध्ये विविध वर्तमान पत्रातुन चोरी संदर्भात ज्या बातम्या येतात त्यात प्रामुख्याने श्रीगोदा तालुक्यातील पारधी या जमातीतील युवकांची नावे आसलेली आढळले.

**पारधी व शासकीय योजना :-**

पारध्यांना विकासास पाठबळ मिळावे म्हणून सरकारने काही शासकीय योजना देवू केलेल्या आहेत परंतु यांना बऱ्यापैकी माहिती असतांनाही अहमदनगर जिल्हयातील मधील अनेक पारधी कुटुंबे योजनेच्या लाभांपासून वंचीत आसलयाचे संशोधनातील प्राप्त संख्यात्मक आकडेवारी वरुन आढलेले आहे. काहींना योजनांची माहिती नाही, प्रकरण करण्यास मदत होत नाही, जामीनदार मिळत नाही, कागदपत्राची पूर्तता होत नाही. अशा काही कारणाने हे योजनांच्या लाभांपासून वंचीत आहेत. शासकीय योजनेत अडवणूक होण्याचे प्रमाण जास्त आहे. बऱ्याच लोकांकडे राजीवगांधी आरोग्य पत्रिका नाही, जात प्रमाणपत्र, शिधापत्रक नाही म्हणून हे योजनांपासून म्हणजेच स्वत:च्या विकासापासून वंचीत आसलयाचे संशोधनातुन प्राप्त संख्यात्मक माहीतीच्या आधारे आढळुन आले.

***उपरोक्त संशोधनाचा समारोप करतांना खालील काही बाबी महत्वपूर्ण वाटतात.***

१. अहमदनगर जिल्हयातील काही तालुक्यातील महीलांचा बचत गटात समावेश असलयाची महत्वपूर्ण बाब या संशोधनातुन दिसून आली.

२. या जिल्हयातील पारध्यांच्या नविन पीढीची शैक्षणीक स्थिती सुधारत असुन शैक्षणीक जागृकता वाढत आसलयाचे सदर संशोधनातुन दिसून आले.

३. जिल्हयातील काही तालुक्यातील ब-याच पारधी पुरुषांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया करुन घेण्याचे प्रमाण

स्त्रीयांच्या तुलनेने जास्त जाणवले.

४. या जमातीतील मुलांचा पारंपारीक व्यवसाय सोडून अधूनीक व्यवसायाकडे वळण्याचा कल संशोधनातुन दिसून आला.

५. जिल्हयातील पोलीसांकडुन महीलांचे होणारे लैंगीक शोषण हे अतिशय कमी झालयाचे प्राप्त संख्यात्मक माहीतीच्या आधारे दिसते.

६. जिल्हयात कोणताही गुन्हा घडलयास पारधी वस्तीवर हलला होण्याचे प्रमाण देखील प्राप्त संख्यात्मक माहीतीच्या कमी दिसते.

७. या जमातीतील लोक आजही ब-यापैकी जातपंचायत, अनिष्ट प्रथा,व देवकारणातुन बाहेर आलेले नाही व याचा परीणाम त्यांच्या एकुण प्रगतीला बाधा ठरत आसलयाचे देखील जाणवते.

८. अहमदनगर जिल्हयातील पारधी जमातीच्या लोकांना स्वतंत्र स्मशानभूमी नाही ही बाब संशोधनातुन निष्पन्न होते.

९. जिल्हयातील पारधी भारताचे नागरीक असतांना देखील ब-याच जणांनकडे नागरीकत्वाचा कोणताही पूरावा नाही (रेशन कार्ड, आधारकार्ड, मतदान कार्ड )

१०. पारधी ही विमुक्त जमात की आदीवासी जमात हा प्रश्न आजही अनुत्तरीतच आहे.

११. आधूनिक जिवण जगण्याचा यांचा प्रयत्न आर्थिक मिळकतीच्या ठोस साधना अभावी फोल ठरतो आहे.

१२. अहमदनगर जिल्हयातील पोलीसांचा दृष्टीकोण पूर्णपणे बदलेला नसून तो आज ही पारध्यांप्रती ब-याच प्रमाणात पूर्वग्रह दुषीतच आहे.

१३. अहमदनगर जिल्हया मधील पारधी हे यांच्या समाजातील कार्यकर्त्याच्या योगदाना बददल उदासीन असलेले दिसतात.

१४. अहमदनगर जिल्हयातील पारध्यांच्या विकास प्रक्रीये बाबत जिल्हाधीका-यांकडून शासकीय पातळीवर चालू आसणा-या प्रयत्नांबाबत (नोकरी मेळावा, शैक्षणीक प्रबोधन ) मात्र हया जमातीतील लोकांमध्ये ब-या प्रमाणात समाधान कारक वातावरण असलयाचे सर्वेक्षणा दरम्यान दिसून आले.

एकंदरीत प्रस्तुत संशोधनावरुन असे लक्षात येते की पारधी ही जमात स्वातंत्र्योत्तर भारतात आजही समाजिक, आर्थिक, शैक्षणीक बाबतीत उपेक्षीत व वंचीत अवस्थेत असलेली दिसते, कारण या जमातीबददल असणा-या पूर्वग्रह मानसीकतेतुनच इतर समाज या जमातीतील लोकांबरोबर सामाजिक संबंध प्रस्थापीत करतांना दिसतो. तसेच शिक्षणाचे कमी प्रमाण, दारीद्रय, अनिष्ठ प्रथा, जातपंचायतीचे कठोर नियम व शिक्षा, मद्यपानाचे प्रमाण, बहुविवाही पध्दती, स्त्रीयांचे दुय्यमत्व या काही बाबी मधुन हा समाज पूर्ण पणे बाहेर न आलयाने या जमातीची कलंकीत मानसीकतेतुन अपेक्षीत प्रमाणात सूटका आजतागायत होवू शकलेली नाही व यातुनच यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यास अनंत अडचणी येत आहे. तसेच या समाजातील व्यवसायीक गतीशीलता व आधूनीक जिवण जगण्याची इच्छा आसतांना देखील या जमातीला वंचीततेचे जिवण जगावे लागत आहे.

## ५.२. शिफारशीः

*प्रस्तुत संशोधना अंती प्राप्त निष्कर्षातून जमातीच्या सर्वांगीन विकास व प्रगती होण्यासाठी पुढील शिफारशी*

*सूचवित आहे.*

१) प्रगतांचा त्यांच्याकडे पहाण्याचा पूर्वग्रह दुषीत दृष्टिकोन बदलणे अतिशय महत्वाचे आहे. हा दृष्टिकोन बदलावा म्हणून प्रबोधना बरोबरच यांच्या सामीलीकरणाच्या प्रक्रीयेत सरकारने हस्तक्षेप करावा.

२) पारधी जमातीच्या लोकसंख्येची जनगणना करावी अहमदनगर जिल्हयात डॉ.उमाकांत दांगट माजी जिल्हाधीकारी यांनी सन २००६ साली पारधी जनगणना व विकास प्रारुप आराखडा बनवीला होता. त्यात पारधी जनगणना आहे परंतु त्यानंतर मात्र पारध्यांची स्वतंत्र जनगणना व

ठोस आकडेवारी अहमदनगर जिल्हयात उपलब्ध होत नाही.

३) पारधी जमातीला उदरनिर्वाहासाठी स्थलांतर करावे लागते. तेंव्हा त्यांना उपजिवीकेचे ठोस साधन उपलब्ध करुन दयावे.

४) पारधी जमातीतील काही पोटजाती या आदिवासी जमातीच्या सूचीत दर्शवीलेल्या आहेत. तर काहींचा उल्लेख हा विमुक्त जमातींमध्ये केलेला आहे. तेव्हा पारधी हे विमुक्त कि आदिवासी याची निश्चिती व्हावी. यातून ख-या अर्थाने त्यांचा नागरीकत्वाचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

५) जिल्हयामधील पारधी समाज शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जास्तीत जास्त आश्रमशाला व इतर शैक्षणीक सवलतींची तरतुद करण्यात यावी.

६) जिल्हयामधील पारध्यांना व्यवसायासाठी किंवा इतर बाबींसाठी कर्जाची तरतुद व्हावी.

७) पारधी व्यक्तीने पोलीसात केलेल्या तक्रारीची दखल घ्यावी.

८) राजीव गांधी आरोग्य पत्रिका उपलब्ध करुन दयावी.

९) शासकीय लाभाच्या योजनांमध्ये पारदर्शकता आणावी.

१०) या जमातीतील स्त्रीयांना गरोदरपणातील आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देवून त्या बाबत प्रबोधन करावे.

११) ३ जुलै २०१७ रोजी महाराष्ट्र राज्यात केलेल्या सामाजिक बहिष्कार प्रतिबंध कायदा हे जातपंचायतीकडील टोकाच्या अवस्थेला निष्प्रभ करणारे आणि कायदयापुढे सर्वांची समानता माननारे महत्वाचे पाऊल आहे. या बाबत या जमातीत प्रबोधन होवून याचे उल्लंघनकरणा-यावर कठोर करवाही करावी.

१२) पारधी जमातीवर अन्याय होवू नये म्हणून विशेष कायद्याची निर्मीती करावी व त्या कायदयाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

१३) सरकारने आदिवासी विकासासाठी सुधारीत सुविधांची वाढ करावी, जी सदर समूदायाच्या सध्य स्थितीवर व गरजांवर अवलंबून असावी.

१४) खाजगी दवाखान्यातील डॉक्टरांना या समाजातील लोकांना सवलतीच्या दरात सुवीधा देणेबाबत आवाहन करावे.

## परिशीष्ट - १ (ब)

## सामान्य ग्रंथ सूची

**मराठी ग्रंथ सूची**.

१. अत्रे त्रि. ना., '*गुन्हेगार जाती*', वरदा बुक्स, सेनापती बापट मार्ग, पुणे २००९.

२. बळे बाळासाहेब, '*जव्हारी*', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१०

३. बालवाड रमेश, '*अहमदनगर जिल्हा विशेषांक*', विद्याभारती, प्रकाशन, लातूर, २०१७.

४. बडे भास्कर, '*वंजारी आणि बंजारा कोण आहेत*', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई २००४.

५. बोधनकर आणी अलोणी, '*सामाजीक संशोधन पध्दती*'.चतुर्थ आवृत्ती, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर. जाने.२००७.

६. काळदाते सुधा, आणी गोटे शुभांगी '*गुन्हेगारीचे समाजशास्त्र*', द्वी. आ., श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २ ऑक्टोबर २००६.

७. कूलकर्णी प्रभाकर.के.आणि खैरनार दिलीप, '*समाजशास्त्र परिचय*',प्र.आ., डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१३.

४. कोंडेकर आशोक, '*समाजशास्त्र*', के., सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००७.

८.काचोळेदा. धो.,'*नागरीसमाजशास्त्रआणिमानवशास्त्र*',प्र.आ.,कैलासपब्लिकेशन्स,गोकूळवाडी,औरंगपूरा औरंगाबाद, २०११.

९. कांबळे उत्तम, '*भटक्यांचे लग्न*', मनोविकास प्रकाशन, ६५२ नारायण पेठ,पुणे, २०१३.

१०.कोठारे अनिल व नरगाळे एम.एस, '*मराठवाडयाचा इतिहास*', अभिजीत पब्लिकेश लातूर, नोव्हेंबर १९९९.

११. कदम नागनाथ धो.,'*महाराष्ट्रातील भटका समाज-संस्कृती व साहित्य*', प्रतीमा प्रकाशन संस्कृती व साहित्य प्रकाशन पुणे. १९९५.

१२. कालेलकर गोविंद मंगेश, '*मुंबई इलाख्यातील जाती*', वरदा प्रकाशन पुणे, १९९९.

१३. काळे किशोर शांताबाई, '*कोल्हाटयाच पोर*', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २००८.

१४. डिसूसा दिलीप, '*जन्माने गुन्हेगार*', (अनु.कामत साधना ), पद्मगंधा प्रकाशन,पुणे, २००८

१५. ईदाते भि.रा, '*विमुक्त जाती व भटक्या जमाती अभ्यास व संशोधन समीती अहवाल*' -खंड- १,जानेवारी १९९९.

१६. साळूंखे संजय, भा.,'*आदिवासी समाजशास्त्र*',कैलास पब्लीकेशन्स,पुणे,२००९

१७. खरात शंकराव, '*भटक्या विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न*', प्र.आ., सुगावा प्रकाशन,पुणे, २००३.

१८.खैरनार दिलीप, प्रा किशोर राऊत, '*सामाजीक संशोधन पध्दती*', प्र.आ.चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २००७.

१९.गजेंद्रगड व्ही.एन. व व्ही.एस.मारुलकर '*समकालीन भारतीय समाजशास्त्र*',फडके प्रकाशन कोल्हापूर,२०००.

२०. गार्गे, '*भारतीय समाज विज्ञान कोश*', खंड, ३. १९६६.

२१. गायकवाड लक्ष्मण, '*वकिल्या पारधी*', द्वी.आ., मॅजिस्टीक प्रकाशन, मुंबई. २००६.

२२. गायकवाड लक्ष्मण, '*उचल्या*', द्वि.आ.,श्रीविद्या प्रकाशन,शनिवार पेठ पुणे. २००६.

२३. गारे गोविंद, '*महाराष्ट्रातील आदिवासी जमाती*', कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे, २००२.

२४. गिऱ्हे के.ओ., '*गोपाळ समाजाच्या परंपरा आणि इतिहास*', ग्रंथाली प्रकाशन,मुंबई २००१.

२५. गस्ती भिमराव- '*बेरड*', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०००.

२६. गिऱ्हे जनाबाई, '*मरणकळा*', पद्मगंधा प्रकाशन,पुणे, २००८.

२७. गारे गोविंद, 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती', सामाजिक व सांस्कृतिक मागोवा,कॉन्टिनेटल प्रकाशन पुणे,द्वि.आ.२००१.

२८. साळुंखे सर्जेराव., '*समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना*', नरेंद्र प्रकाशन, पुणे,२००६.

२९. सुर्या अनिल, '*अंबेडकरी स्वकथने एक समाजशास्त्रीय अध्ययन*',प्र.आ., सुगावा प्रकाशन पुणे, १९९६.

३०. नाडगोंडे गुरुनाथ, '*भारतीय आदिवासी*', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००३.

३१. नेगमदूरे मारोनी, '*आदिवासी विकास आणी वास्तव*', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००९.

३२.वर्मा आरसी, '*आदिवासी जमाती काल आज आणी उद्या*',माहीती आणी प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली. २००३

३३. विनायक लष्कर, '*वडार समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास*', हरिती प्रकाशन पुणे २०१५

३४. वाडकर धोंडीराम व प्रा.बाळासाहेब बळे, '*गुन्हेगार समजल्या जाण-या पारधी या आदिवासी समाजाचे सांस्कृतिक जिवन*'.,पद्मगंधा प्रकाशन,पुणे, २०११

३५. चव्हाण,रामनाथ, '*भटक्या विमुक्तांची जात पंचायत*', खंड४,देशमुख आणि कं.पब्लीशर्स, पुणे, २००८.

३६. चव्हाण प्रकाश, 'उदई', अथर्व पब्लीकेशन, धुळे . २००९,

३७. चव्हाण रामनाथ, '*जाती आणी जमाती*', मेहता पब्लीशींग हाऊस, पुणे, १९८९.

३८ .चव्हाण रामनाथ, *‘भटक्या विमुक्तांची जात पंचायत’* ,देशमुख आणी कंपनी प्रा.पब्लिशर्स प्रा.लि.पुणे.२००९.

३९. चव्हाण रामनाथ, *‘भटक्या-विमुक्तांचे अंतरंग’*, मनोविकास प्रकाशन,मुंबई,२००३.

४०. प्रा.चव्हाण.रामनाथ, *‘भटक्या विमुक्तांचे मुक्त चिंतन’*, सुगावा प्रकाशन,पुणे, २००९.

४१. चव्हाण यशवंतराव, *‘कृष्णाकाठ’*, प्रस्टीज पब्लीकेशन, पुणे, १९८४.

४२. चव्हाण रामनाथ, *‘भटक्या विमुक्तांची जातपंचायत’*, खंड-५, देशमुख आणी कंपनी (पब्लिशर्स) प्रा.लि.,पुणे, २००९.

४३. पूरी दिपक, *‘महाराष्टातील जाती जमाती व जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती’*, माहिती प्रवाह पब्लिकेशन,पाथर्डी अहमदनगर, २०१६.

४४. पवार दिपक, *‘पारधी समाजाचे अंतरंग’*, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, २०१४.

४५. प्रभुणे गिरीश, *‘पारधी’*, द्वि. आ., राजहंस प्रकाशन, पुणे, २००६.

४६. पवार संतोष, *‘चोरटा’*, श्री साईनाथ प्रकाशन, पुणे, २००७.

४७. प्रभुणे गिरीश, *‘पालावरच जिणं’*, साप्ताहीक विवेक, मुंबई, २००३.

४८. पिंगळे भिमराव, *‘वनवासी व उपेक्षित जग’* ,ग्रंथाली प्रकाशन,मुंबई,२०११.

४९. पं.जोशी,महादेवशास्त्री, *‘भारतीय संस्कृतीकोश’*,खंड-५वा-भारतीय संस्कृतीकोश मंडळ,पुणे.

५०. भोसेले भास्कर, ‘दैना ’ ऋध्दी प्रकाशन, उरळीकांचन. पुणे,२०१३.

५१. भोसले नामदेव, *‘मराशी’*, लोक संस्कृती प्रकाशन, नारायणगांव, २०१४.

५२. भोसले नारायण, *‘विमुक्ती प्रबोधन’*, प्र.आ., अथर्व पब्लीकेशन,धुळे, २०१३.

५३. तर्कतीर्थ श्री.जोशी लक्ष्मणशास्त्री, *‘मराठी विश्र्वकोश’*-खंड१२, महाराष्ट्र राज्य मराठी विश्र्वकोश निर्मीती मंडळ,मुंबई. १९८५.

५४. देवगावकर शैलेजा आणी देवगावकर शं.गो.,*‘आदिवासी विश्र्व’*,आनंद प्रकाशन,नागपूर, २००१.

५५.देवगावकर शैलेजा, *‘महाराष्टातील निवडक जाती जमाती’*, प्र,आ., श्री साईनाथ प्रकाशन नागपूर २००१.

५६ देवगांवकर, एस.जी. *‘आदिवासी विकास प्रशासन’*, साईनाथ प्रकाशन, नागपूर.२००१.

५७. माने लक्ष्मण, ‘उपरा’, ग्रंथाली प्रकाशन मुंबई,चवथी आवत्ती. १९८०

५८. मांडवकर भाऊ, *‘कोलाम’*, प्र.आ., सेवा प्रकाशन ,अमरावती, १९६६.

५९. माने लक्ष्मण, *‘विमुक्तायन’*, य. च., प्रतिष्ठान मुंबई, १९९७.

६०. माने लक्ष्मण, *‘भटक्याचं भारूड’*, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २००३.

६१. मांडे प्रभाकर, ‘*गावगाडयाबाहेर*’, सविता प्रकाशन, औरंगाबाद, १९८३.

६२. माने लक्ष्मण, ‘*बंद दरवाजा*’, ग्रंथाली प्रकाशन,मुंबई,१९९२

६३. मोरे विमल, ‘*पालातली माणसं*’, पद्मगंधा प्रकाशन पुणे, २००७.

६४. मोरे दादासाहेब मल्हारी, ‘*गबाळ*’, पद्मगंधा प्रकाशन,पुणे,२००७.

६५. माने लक्ष्मण, ‘*विमुक्तायन*’, महाराष्टातील विमुक्त जमाती, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई- प्रथम आवृत्ती,१९९७,

६६. मटकर गणेश, ‘*धनगर भटकी जमात*’, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,१९९९.

६७. मांडे प्रभाकर, ‘*गावगाडयाबाहेर*’, प्र. आ., परिमल प्रकाशन औरंगाबाद, १९८३.

६९. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्र्वकोश खंड -९, महाराष्ट्रा राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, १९६६.

७०. मांडे प्रभाकर, ‘*लोकसाहित्याचे स्वरुप*’,गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, २०००.

७१. राठोड आत्माराम कनिराम, ‘*तांडा*’, अभिजीत पब्लीशींग हाऊस, नागपुर. १९८९.

७२. राऊत किशोर, ‘*पारधी समाज बदल व समस्या*’, गौरव प्रकाशन, नागपुर, २००४.

७३. राठोड मोतीराज, ‘*एक्स गुन्हेगार जमाती*’,प्र.आ., मनोज प्रिंटर, औरंगाबाद,१९९४.

७४. सोमण मा. , श., ‘*समाजशास्त्र*’, नरेंद्र प्रकाशन,पुणे, १९९३.

७५. शिरसाठ शिवदास,‘*दलित आत्मकथनांचा समाजशास्त्रीय अभ्यास*’, अभिजीत पब्लीशींग हाऊस, नागपुर, १९९९.

७६. वाडकर धोंडीराम, ‘*गोल्ला समाजाचा इतिहास*’, पद्मगंधा प्रकाशन, पुणे२००८.

७७. ढेरे रा.चिं, ‘*लोकसंस्कृतीचे उपासक*’, पदमगंधा प्रकाशन, पुणे, १९९६.

- **हिंदी ग्रंथ सूची.**

१. हरिकृष्ण रावत, ‘*समाजशास्त्र विश्वकोश*’, रावत पब्लीकेशन जयपुर, पु.मु., २००२.

- **इंग्रजी ग्रंथ सूची.**

1. Bhandrkar P.L. and T.S. Villkinson, ‘*Methods and Techniques of*

2. Enthoven R.E., ‘*Tribes and Castes of the Bombay Presidency*’ Vol. III, Cosmo Publication Delhi, 1975.

3. Gillin and Gillin, ‘*Cultural Sociology*’, The Macmillan Co. New Yourk. 1950

4. Ghurye G.S. , ‘*The Scheduled Tribes*’ 2nd Edition, Popular Book Depot Bombay. 1966

5. Hasan Nadeem, '*Tribal India'*, Phalak Publication Delhi. 1991

*Social Research'*, 26th Ed., Himalaya Publishing House, Mumbai.2017

6. Jha Arivind Kumar, 'A Study of Pardhi's Struggle for Surrival VIS. A VIS Wild life Protection acts : An Anthro – Economical Study'.2003

7. Jehn Navinchandra, '*Trible in Maharashatra State areport tribal situation in India'*, Vidut Joshi (Ed.), Rawat Publication Jaipur.

8. Kaibbr Naila, '*Citizenship Narratives in absence of good Government'*, IDS Publisher. 2009

9. L.P.Viddrathi and Rai Banye Kumar, '*The Tribal Culture of India'*., Rawat Publication Jaipur 1996

10. Mahasweta Devi, '*Dust on the road'*, Seaguel Book publication, Delhi.1999.

11.Radhakrishnan Meena, '*Dishonoured By History-Criminal Tribes and British Policy'*.,Orient Black Swan, New Delhi. 2001

12. R.R. Rupes, '*State Economy and Society'*., SEZ, Publication, Delhi, 2012.

13. Risley H.H., '*The People of India'*, Culcutta 1968

14. R.V. Russel and Rai Bahadur Hiralal, '*The Tribes and Castes of theCentral Provinces of India'*, Rajdhani Book Centre Delhi. 1916

15. Sing K.S. *People of India National Series* Vol. III. 'The Scheduled Tribed', Anthropological Survey of India Oxford University Press.1997

16. Singh K.S. '*People of India'- Maharashatra* Part III, Vol. No. XXX

17. Singh K.S. '*People of India'- National Services* Vol. III, The Scheduled Tribes, Anthroplogical Survey of India Oxford University Press New Delhi.

18. Y.P.S. Tomar and Dr. Robin D. Tribhawan, *Development of* '*Pramative Tribes in Maharashatra State-Continuity and Change'*, TRTI Pune 2004.

- **वर्तमानपत्रे, मासीके, नियतकालीके, शासन निर्णय व शासकीय माहीती पुस्तीका.**

१. आदिवासी संशोधन पत्रिका, VOL, २१, NO.२ .सप्टेंबर २००७.

२. आदिवासी संशोधन पत्रिका, मार्च २००९, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण

३. आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, सप्टेंबर २००७

४. आदिवासी संशोधन-पत्रिका, टी. आर. टी.आय ,पुणे, सप्टेंबर, २००१

५. आदिवासी संशोधन पत्रिका, Vol.XXI No.२, सप्टेंबर २००७,

६. बालवाड,रमेश, *'अहमदनगर जिल्हा विशेषांक'*, २०१७,विद्याभारती, प्रकाशन,लातूर.

७. बोकील मिलिंद, *'पारधी बदलनायत पण'*, परिवर्तनाचा वाटसरु,तैमासीक, १ ते २५ ऑक्टोबर २०१५.

८. कुलकर्णी अंजली, *'भटक्या विमुक्तांची अस्तित्वाची लढाई'*,लोकसत्ता,३०एप्रिल २०१६,

९. ईदाते भि.रा, *'विमुक्त जाती व भटक्या जमाती अभ्यास व संशोधन समीती अहवाल खंड- १'*,जानेवारी १९९९.

१०. गुलाब वाघमोट, *'सम्राट'*, प्रबोधन , अंक, -२२ फेब्रुवारी २००७,

११. *'गुन्हेगारीचा कलंक पुसण्याचे स्वप्न साकार'*, सकाळ, नगर टुडे, शुक्रवार २९/५/२०१५,

१२. उकीरडे दत्ता, *'अमावस्या त्याच्यासाठी ठरते शुभ'*,सकाळ,बुधवार ,२३ सप्टेंबर २०१३,

१३. झारे,प्रदीप, *'पारधी विकास आराखडा'*, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, तुळजापूर.

१४. पांडे पंढरी, *कौस्तुभ तांडा*, अनियतकालीक, सप्टेंबर २००४,

१५. पाटिल नितीन, *'नगर मधील पारधी विकासच्या वाटेवर'*, पुण्यनगरी, रविवार २००७

१६. *'पारधी समाजाच्या मुलांना मिळाली नव्याने ओळख'*, सकाळ, २१ एप्रिल २०१४,

१७. *'पारधी समाज व महिलांच्या विकासाचे व्रत'*, महाराष्ट्र टाईम्स, १७ जानेवारी २०१६.

१८. पांडे कौस्तुभ, *'शिकारी खुद यहा शिकार हो गया'*, अनियतकालीक जुलै ते सप्टेंबर २००४, अंक पहिला.

१९. *'पारधी विकास कार्यक्रम राबवून समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न'*,दैनिक लोकमत दिनांक ३१/१/२०१६.

२०. *'भटक्या विमुक्तांवर अन्याय नको'*, सकाळ २८ मार्च २००७,

२१. शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण -२००८ / यादी / प्र.क्र.५५३/ मावक जावक क्र. ५

दि.२६/९/२००८ नुसार शासनाने जाहीर केलेली जातीची यादी.

२२. सांगवे विलास ए., *'फासे पारधी ऑफ कोलहापूर : अ टाईब इनट्रांजेशन'*,सोशोलॉजीकल बुलेटिन, XVI, सप्टें.१९६७

२३. दैनिक लोकसत्ता, १ सप्टेंबर २०१२,

२४. दांगट उमाकांत, *'पारधी जनगनना व विकास प्रारुप आराखडा'*,अहमदनगर जिल्हा. २००६.

२५. वार्षिक आदिवासी उपाययोजना', २००९-१०, महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग पुणे, संस्था पुणे,

- **संशोधन शोधप्रबंध**

१. प्रा.बळे,बाळासाहेब, *'पारधी समाज्याच्या लोकसाहीत्याचा चिकीत्सक अभ्यास'*,२००८, संशोधन प्रबंध सावित्रीबाई पुणेविद्यापीठ पुणे

२. प्रा.कोरेकर सुलभा लिंबराज, *'पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा'*, २०१३, संशोधन प्रबंध , टि.म.वी.पुणे.

३. प्रा.गायकवाड यशवंत जंगलू , *'उस्मानाबाद जिल्हयातील आदिवासी पारधी जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास'*,संशोधन प्रबंध. डॉ.बा.आं.म.वि.औरंगाबाद.

४. रगडे कमलाकर प्रकाश, *'भोकरदन तालुक्यातील फासे पारधी जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास'*, २०११, संशोधन प्रबंध.

५. श्री दांगट उमाकांत, *'महाराष्ट्रातील आदिवासी पारधी जमातीचा आर्थिक अभ्यास : विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा'*, २००९,संशोधन प्रबंध,य.च.म.मु.वि.नाशिक.

६. शेळके प्रताप शिवाजीराव, *'उस्मानाबाद जिल्हयातील पारधी समाजाचा आर्थिक व सामाजिक अभ्यास कळंब ता.संदर्भात'*,अर्थशास्त्र एम.फील, प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.

७. नाईक (पवार) रूख्मीणी, *'पोमा बंजारा जामातीचे समाजशास्त्रीय सामाजिक, आर्थिक पहाणी'* १९८३, संशोधन प्रबंध,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

८. जाधव पंडीत, *'परभणी जिल्हयातील आश्रम शाळांची विशेष मागासघटकातील विद्यार्थ्यांच्या विकासातील भूमिका'*,१९८३ संशोधन अहवाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.

**संकेतस्थळे**

१.http://en.wiki pedia.org/wiki/phase_pardhi

२.http://en.wiki pedia.org/wiki/phase_pardhi

३. https://en.m.wikipedia.org> wiki > Ahmednagar

४. https://joshuaproject.net>people_group

५. https://sjsa. Maharashatra. Gov.in > vasantrao.